[दक्षिणा प्राईझ कमिटीनें बक्षिस दिलें आहे.]

सातारा वाचनालय, सातारा.

शिक्षणमीमांसा.

SHRI.CHA.PRATAPSINH
MAHARAJ (THORALE)
NAGAR WACHNALAYA, SATARA.
090289

हें पुस्तक

हरबर्ट स्पेन्सर,

यांच्या

एज्युकेशन

नामक इंग्लिश ग्रंथाधारें,

वासुदेव गणेश सहस्त्रबुद्धे

यांनीं केलें,

तें

मुंबईमध्यें

नेटिव ओपिनियन छापखान्यांत छापिलें.

सन १८८९.

किंमत दीड रुपया.

[हें पुस्तक १८६७ चा आक्ट २५ प्रमाणें नोंदलें आहे.]

सातारा वाचनालय सातारा
संगणकीकृत

श्रीमंत महाराज राजराजेश्वर

शिवाजीराव होळकर

साहेब बहादूर जी. सी. एस्. आय्.

संस्थान इंदूरचे अधिपति,

यांची

उत्कट देशप्रीति उदात्तविद्यादृति इत्यादि

गुणसमुच्चयालंकृतता जाणून

हें पुस्तक

त्यांचे सेवेसी

विनयपुरःसर

अनुज्ञापूर्वक

कर्त्यानें

अर्पण केलें असे.

प्रस्तावना.

पुस्तकाचा प्रसंग व उद्देश.

" आपल्या देशाची व समाजाची स्थिति " या विषयावर कोठेंही जा चार शब्द बोललेले तरी तुह्मांस ऐकूं येतील. विशेषेंकरून शिकलेल्या मंडळींत तर याबद्दल चर्चा चाललेली आहेच. त्याचप्रमाणें धर्मोपदेशक, साधारण वक्ता, व वर्तमान पत्राचा एडिटर यांशीं प्रसंग आला कीं, या विषयाचा उल्लेख व्हावयाचाच. बरें साधारण चोंहींकडे नजर फेंकली तर फिकट चेहरे, हाडांचे सांगाडे, खोल डोळे, खुरटी वाढ, क्षयाची भावना, व अकालिक मृत्यु या गोष्टी पुष्कळच दृष्टीस पडतात. मानसिक गोष्टींकडे लक्ष दिलें तरी कोती बुद्धि, पोपटपंचीपणा, बुद्धीचा दुबळेपणा व पराधीनता, व स्वतंत्र शोधांचा अभाव यांचाच फैलावा नजरेस येतो. बरें आचार व नीति यांचा विचार केला तरी मनाची अस्थिरता, दुटप्पीपणा भेकडपणा, परनेयबुद्धिता, अनुकरणौत्सुक्य, लांगूलचालनप्रवृत्ति इत्यादि प्रकारच दृष्टोत्पत्तीस येतात. अशी स्थिति पाहून ज्याला थोडीबहुत तरी विचार करण्याची संवय आहे, त्यास या सर्वांचें बीज काय असावें अशी आकांक्षा उत्पन्न होऊन तें बीज शोधून काढून यावर काय उपाय योजितां येतील, हें पाहण्याची बुद्धि स्वाभाविक उत्पन्न होणारच. हेच विचार मनांत येऊन आपल्या देशाचा शारीरिक, मानसिक, व नीतिविषयक शोचनीय असा ऱ्हास दिवसेंदिवस कसा होत चालला आहे, हें प्रथमतः आमच्या मनांत आलें. अर्थात् यांचें बीज काय असावें हें पाहण्याकडे मनाची प्रवृत्ति झाली. विचार करितां करितां, कोणतेंही कार्य उत्पन्न होण्यास शेंकडों कारणांचा समुच्चय लागतो, हें मनांत आणून त्या त्या कारणांचा हें कार्य उत्पन्न करण्यांत किती भाग आहे याचा निर्णय ठरवितां शेवटीं आमचा असा सिद्धांत झाला कीं, या आमच्या ऱ्हासाचें प्रधान कारण झटलें झणजे आमच्या शिक्षणाची सदोषता हें होय. रोगाचें निदान ठरल्यानंतर औषधाची योजना करण्याचें स्वाभाविकच मनांत येणार, औषध कोणतें हें सांगावयास नको च. अर्थात् सुशि-

क्षण. हल्लीं या औषधाबद्दल कोणाचाही वाद नाहीं. शीत झालें आहे तर हेमगर्भाचीच मात्रा द्यावयाची हें सर्वांस संमत आहे. परंतु खरी अडचण दुसरीच आहे. खरी हेमगर्भाची मात्रा कोठें मिळणार? नाकाडोळ्याच्या वेदूंजवळ ही मात्रा आहे. वैद्य डाक्टरांनीं तर गर्दी उसळून दिली आहे; एक घर सोडून पुढें जावें तों पाटी आहेच. त्यांच्या कपाटांतून पाहावें तों हेमगर्भ झणून चिट्या मारलेल्या बाटल्यांची चंगळ आहेच. परंतु या मात्रा विकत आणून घरीं पाहावें तों एकींत नुसती माती, दुसरींत रखा, तिसरींत कचीं रसायणें, व चौथीवर बेगडेच्या वर्खाची नुसती भुकी टाकलेली अशी स्थिति आहे. कांहीं कांहीं नामांकित वैद्यांच्या घरच्या मात्रा आणून पाहिल्या त्या मात्र बऱ्याच अंशीं गुणकारक आहे, परंतु व्हावें तसें रसायन झालेलें नाहीं. एखादी गोम तरी आढळून येतेच. असें होतां होतां शेवटीं एक धन्वंतरी वैद्य सांपडला. तो मेडिकल कालेजांत शिकलेला नाहीं. तो एल. एम्. एंड एस्. किंवा बिएस्. सी. किंवा एम्. डी. कांहीं एक नाहीं. त्याची पितळेची किंवा लांकडाची पाटी लागलेली नाहीं. तो सभांतून व्याख्यानें देत नाहीं; परंतु तो विचार करून करून व हजारों गोष्टींची प्रतीति पाहून पाहून जबरदस्त ज्ञानभांडार होऊन बसला आहे; आणि तो पक्का अनुभवशाली आहे. या वैद्यराजांजवळ हेमगर्भाची मात्रा आढळली, ती मात्र आमच्या मतें शास्त्रसिद्ध असावी तशी आहे. त्या अर्थी तिचे कांहीं वळसे आमच्या समाजाला द्यावे असा आह्मीं निश्चय केला. हा अलंकार दूर करण्याची जरूरी नाहीं. कारण हे वैद्यराज झणजे हरबर्ट स्पेन्सर, व हेमगर्भाची मात्रा झणजे त्यांचा शिक्षणावरील ग्रंथ, नामांकित वैद्य झणजे क्रिंटिलिअन, आशाम, कोमीनिअस, लॉक, पेस्टलाझी, व बेनसारखे ग्रंथकार, व इतर पदवीवाले डाक्टर, वैद्य, व वैदू झणजे आज अजागळ, निरर्थक, व क्षुद्र शिक्षणपद्धति अमलांत आणूं पाहणारे लोक, हें आमच्या वाचकांचे ध्यानांत आलेंच असेल. असो; हरबर्ट स्पेन्सर यांचा शिक्षणावरील ग्रंथ फारच उत्कृष्ट असून शिक्षणाची मीमांसा त्यांत फारच पूर्णतेनें केलेली आहे. हरबर्ट स्पेन्सरांप्रमाणें पूर्णतेनें व व्यापकतेनें शिक्षणविषयावर आजपर्यंत कोणीही विचार केलेला नाहीं. शिक्षणविषयासंबंधें यांची योग्यता सर्वानुमतें पहिल्या प्रतीची ठरली आहे; व यामुळें त्यांच्या

वरील पुस्तकाचा प्रसारही विलक्षण झाला आहे. अमेरिकेंत तर या पुस्तकावर उड्या पडत आहेत; व सन १८८६ पर्यंत फ्रेंच, जर्मन, इटालिअन, रशिअन, हंगेरिअन, डच, डॅनिश, स्पानिश, स्वीडिश, बोहिमिअन, ग्रीक, जपानी आणि चिनी इतक्या भाषांत त्याचीं भाषांतरें झालीं आहेत. या ग्रंथांतील विचार फारच अनुभवसिद्ध असल्याकारणानें ते वाचल्याबरोबर त्यांच्या सत्यतेविषयीं खात्री होऊन जाते. हरबर्ट स्पेन्सर ह्मणतात ह्मणून खरें मानावयाचें असें एक वाक्यही या ग्रंथांत सांपडावयाचें नाहीं; आणि सामान्यतःसर्व पुस्तक व्यावहारिक उपदेशानें ओतप्रोत भरलें आहे. यास्तव खरें शिक्षण ह्मणजे काय,व तें देण्याचा खरा प्रकार कोणता,या गोष्टी समाजास कळण्यास हरबर्ट स्पेन्सरांच्या ग्रंथाशिवाय दुसरें साधन नाहीं, असें वाटून तो ग्रंथरूपांतरानें समाजास सादर करावा असा आह्मीं संकल्प केला; व त्याप्रमाणें उद्योगास लागलों. या गोष्टीस सुमारें चार साडेचार वर्षें झालीं. परंतु असा चमत्कार झाला कीं, वर लिहिल्याप्रमाणें उद्योगास लागून एक महिना झाला नाहीं तोंच स्पेन्सरच्या शिक्षणविषयक ग्रंथावरून मराठींत पुस्तक करण्याविषयीं दक्षिणाप्राइझ कमेटीकडून एक जाहीरात प्रसिद्ध झाली, अर्थात् कमेटीनें एक बक्षीसहही ठेविलें. प्रथम एक वर्षाची मुदत ठेविली होती, परंतु पुस्तकाचें काठिन्य पाहून कमेटीनें साहा महिने मुदत वाढविली. मुदतीप्रमाणें आह्मीं आपलें पुस्तक कमेटीस सादर केलें. कमेटीकडे तें जवळ जवळ दोन वर्षें राहिलें. परंतु शेवटीं आमचें पुस्तक योग्य ठरून तदनुसार आह्मांस बक्षीसही मिळालें. पुस्तक आमचे हातीं मार्च सन १८८८ चे सुमारास आलें. तेव्हां त्यांत जरूर ते कांहीं फेरफार करून पुस्तक छापून तें समाजास अर्पण करावें अशा हेतूनें तें छापण्याची सुरवात केली. एकंदर सर्व काम चार महिन्यांत आटपावें असा अजमास होता; परंतु मूळ स्पेन्सरच्या ग्रंथावरून रूपांतर होण्यास दीड वर्ष लागलें, व कमेटीचा शिक्का पडण्यास दोन वर्षें लागलीं, तेव्हां जणू काय एक प्रकारची अनुरूपता रहावी ह्मणूनच छापण्याच्या वगैरे कामानें,मध्यें नानाप्रकारच्या हरकती आल्यामुळें, आठ नऊ महिने खाल्ले. असो; परंतु शेवटीं समाजाची यथामति सेवा करण्याचा आमचा संकल्प येथपर्यंत सफल झाला.

पुस्तकाचें स्वरूप.

वर लिहिल्याप्रमाणें आमचा उद्दिष्ट हेतु सिद्ध होण्याची हरबर्ट स्पेन्सर यांचा शिक्षणविषयक अमोलिक ग्रंथ यांचा लाभ झाल्यानें बहुतेक अनुकूलता झाली. परंतु आपल्या समाजास जें पुस्तक सादर करावयाचें तें कोणत्या रूपानें करावें या विषयीं मात्र बरीच मोठी अडचण येऊन पडली. हरबर्ट स्पेन्सर यांचा मूल ग्रंथ केवळ कांहीं कांहीं ठिकाणीं उपपत्तिपरंपरा आहे, आणि कित्येक विचार केवळ इंग्लिश समाजास पटण्यासारखे असे आहेत. शिवाय त्यांचे कांहीं विचार सर्वांशीं ग्राह्य खरे, परंतु अगदीं नवीन असे असल्याकारणानें मराठींत केवळ जशाच्या तसेच उतरून देण्याची मुष्किल. शिवाय त्यांचे विचार विशेष प्रगल्भ अशा समाजासच लागू पडणारे असे असल्यामुळें आजच त्यांची उपक्तयुता आमचे लोकांस पाहिजे त्या रीतीनें व्यक्त होणारी नाहीं. आणखी, स्पेन्सर यांचें तत्वज्ञान सर्वांशीं अनुभवावलम्बि असल्यामुळें सकृद्दर्शनीं तरी पारलौकिक गोष्टींशीं विरोधाभास उत्पन्न करणारें आहे, आणि आज आमचा समाज पाहिला तर सुखोत्पादक तेंच पुण्य, दुःखोत्पादक तेंच पाप, सर्व आचार शास्त्राचें तत्व भूयिष्ठहितपरता (पुष्कळ लोकांचें पुष्कळ हित संपादन करण्याची प्रवृत्ति), मनुष्याचा सर्व वर्तनक्रम उपयुक्ततेनें नियमित इत्यादि विचार तावडतोब ग्रहण करण्याची शक्ति त्याचे अंगांत अद्यापि आली नाहीं. आणि असें आहे तर आजच हे विचार धडधडीत जशाचेतसे आपल्या समाजापुढें ठेवणें कोणत्याही दृष्टीनें इष्ट व समंजस होणार नाहीं. असे विचार मनांत येऊन पुस्तकाचें स्वरूप काय ठेवावें या गोष्टीविषयीं कांहीं दिवसपर्यंत आमचा निश्चय होईना. पुस्तक तर अत्यंत उपयुक्त व मनोरंजक, परंतु मनोरंजक म्हणून जीं पुस्तकें हल्लीं फैलावलेलीं आहेत त्या कोटीपैकीं मात्र हें नव्हे. दिवसाचें कामकाज आटपून रात्रीचें जेवणखाण झाल्यानंतर बिछान्यावर हुश करीत पडून झोंप आणण्याकरितां एखादें नाटक किंवा मनोरंजक गोष्टीचें पुस्तक हातांत घेऊन बिडीबरोबरच त्याचा एखाददुसरा झुरका घेण्याचा हल्लीं विशेषें करून शिकलेल्या लोकांत परिपाठ आहे. परंतु याप्रमाणें हें पुस्तक झोंपेची प्रस्तावना होणारें नव्हे. यांत ब्रह्मानंद आहे खरा, परंतु तो संपादन होण्यास ध्याननिदिध्यासात्मक तपाचें आचरणच आवश्यक आहे. हें पुस्तक उडत

वाचनाचें नव्हे, तर एकाग्र व्यासंगाचें होय. फार तर काय हें पुस्तक शाळांतून आणि कालेजांतून विषयक्रमांत घालण्याजोगें आहे. शिवाय यांतील कांहीं भाग असे आहेत कीं, ते स्त्रियांनाही उत्तम रीतीनें समजले पाहिजेत. नीतिविषयकशिक्षण व शारीरिकशिक्षण या संबंधाच्या गोष्टी पुरुषांप्रमाणेंच स्त्रियांना कळणें ही अत्यंत आवश्यक होय. मुलांचा विशेष सहवास आईजवळ, यास्तव बापाप्रमाणेंच आईलाही या शिक्षणाच्या तत्वांची पूर्ण ओळख असली पाहिजे. आणि हा हेतु साधला पाहिजे तर हे दोन भाग जितके सुबोध होतील तितके थोडेच. हाही विचार मनांत आला, तेव्हां एकंदर सर्व गोष्टी मनांत आणून असें ठरविलें कीं मूळ ग्रंथाचें निवळ भाषांतर करावें,तर तें व्हावें तसें उपयोगीं होणार नाहीं, व मुळांतील तत्वांच्या आधारानें निराळेंच पुस्तक लिहावें तर मुळांतील प्रतिपादनांत जी एक गंमत आहे ती नाहींशी होते; त्याअर्थीं दोन्ही अंगें एकत्र करून जें स्वरूप देतां येईल तेंच द्यावें म्हणजे आपले सर्व उद्देश सिद्धीस गेले. याप्रमाणें निर्णय करून जें स्वरूप पुस्तकास दिलें तें हें हल्लींचें स्वरूप होय. या स्वरूपाचा थोडक्यांत प्रकार असा आहे कीं, आमचें सांप्रतचें पुस्तक मूल ग्रंथाचें अगदीं दास होऊन बसलेलें नाहीं, व त्याच्याशीं उद्दामही झालेलें नाहीं.

पुस्तकाची रचना.

याबद्दलही चार शब्द लिहिणें अगत्याचें आहे. हरबर्ट स्पेन्सर यांचें मूलग्रंथांत चार भाग आहेत. पहिल्या भागांत अत्यंत उपयुक्त ज्ञान कोणतें याविषयीं विचार केलेला आहे. दुसऱ्या भागांत मानसिक शिक्षणाविषयीं विवेचन केलेलें आहे. तिसऱ्या भागांत नीतिशिक्षणाचें उपपादन केलेलें आहे, व शेवटीं चवथ्या भागांत शारीरिक शिक्षणाचा ऊहापोह केलेला आहे. आमच्यामतें अनुक्रम निराळा पाहिजे होता. पहिल्या भागांतील विषय प्रथमच आला पाहिजे. परंतु शिक्षणाचा व्यावहारिक क्रम मनांत आणिला म्हणजे शारीरिक शिक्षण, नीतिशिक्षण व मानसिक शिक्षण हा क्रम विशेष बरोबर झाला असता. शिवाय विषयकाठिन्य मनांत आणिलें तरीही हाचक्रम ग्राह्य व इष्ट दिसतो. एकंदर मनुष्यमात्राचें किंबहुना प्राणिमात्राचें वस्तुतः सर्व प्रकारचें शिक्षण जन्माबरोबरच सुरू होतें. तथापि व्यवहारदृष्ट्या पाहिलें तर शारीरिक शिक्षण प्रथम, नंतर

नीतिशिक्षण व नंतर मानसिक शिक्षण असा क्रम आहे. मुलांच्या शरीराची काळजी अगदीं स्तनंधेयावस्थेपासून घेतली पाहिजे; नीतिबद्दलची काळजी जवळ जवळ चवथ्या पांचव्या वर्षापासून सुरू झाली पाहिजे, व मानसिक शिक्षणाची तर्तूज सातव्या आठव्या वर्षापासून केली पाहिजे. त्या अर्थी याच अनुक्रमानें पुस्तकांतील भाग असावेत, असा आमचा अभिप्राय होता; व तदनुसार पुस्तकाची रचना ठेवण्याचा आमचा मानसही होता. परंतु शास्त्रीयदृष्ट्या पाहिलें तर मूल ग्रंथांतील अनुक्रमाचीही सयुक्तिकता प्रतिपाद्य आहे. मनुष्य हा प्राणि असा आहे कीं, त्यास पुष्कळ गोष्टींत पुष्कळ काळपर्यंत दुसऱ्यावर अवलंबून राहवें लागतें. आतां तिन्ही शिक्षणांचा विचार केला तर असें दिसून येईल कीं, सर्वांत मानसिक शिक्षणासंबंधानें मुलांस दुसऱ्याच्या साहाय्याची विशेष अपेक्षा आहे. भूक लागली तर मूल खावयास कांहीं तरी मागेल, व त्यास कांहींना कांहीं तरी मिळेल. थंडी लागली तर मुलास कसा तरी उबारा मिळेल. त्याचप्रमाणें अनुभवरूपी शास्ता कांहीं तरी मुलास नीतिशिक्षण देईल, परंतु मानसिकशक्तींचा प्रगल्भतेनें विकास होण्यास ज्या गोष्टींची व ज्या योजनांची आवश्यकता आहे त्या गोष्टी व त्या योजना साहजिक रीतीनें उपलब्ध होणें शक्य नाहीं. त्या मिळण्यास देणाऱ्याचीच जरूरी आहे. शिवाय तिन्ही शिक्षणांत मानसिक शिक्षणाचे संबंधानें शास्त्याचे अंगीं विशेष तयारी असली पाहिजे. मानसिकशिक्षण योग्य रीतीनें देण्यास स्वतः शास्ताही चांगला विद्वान् व शहाणा असला पाहिजे. बाकी दोन शिक्षणासंबंधानें तो विद्वान व विशेषेंकरून शहाणा तर पाहिजेच, विद्वान् जरा कमी असला तरी चालेल. सारांश तिन्ही शिक्षणांत मानसिक शिक्षणाचे कामीं मुलांस शास्त्याची व त्यांतही विशेषेंकरून विद्वान् व धूर्त अशा शास्त्याची जरुरी आहे. या म्हणण्याची सत्यता पाहण्यास फार लांब जावयास नको. पोरकीं पोरेंही धट्टींकट्टीं व नीतिमान् निपजलेलीं बरींच आढळतात. परंतु अशा स्थितींतील मुलांना विद्वान् होण्यास फार कठीण जातें. त्या अर्थी हें उघड होतें कीं मुलांच्या संबंधानें शारीरिक शिक्षण अत्यंत महत्त्वाचें खरें, तथापि शास्त्यांच्या म्हणजे आईबापांच्या संबंधानें तिन्ही शिक्षणांत मानसिक शिक्षणच अत्यंत महत्त्वाचें होय. आतां हरबर्ट स्पेन्सर यांचा ग्रंथ मूळ कोणाकरितां केला आहे हें

जर पाहिलें, तर असें स्पष्ट दिसून येईल कीं, तो ग्रंथ मूळ शास्त्यांकरितां म्हणजे आईबाप व शिक्षक यांकरितांच केलेला आहे. त्याअर्थी यां दृष्टीनें त्यांतील भागांच्या अनुक्रमाचा विचार केला म्हणजे असलेला अनुक्रमच उचित आहे असें म्हणतां येईल. आणि याचकरितां आम्हीं आपल्या पुस्तकांत मूलांतील विषयानुक्रम कायम ठेविला आहे.

पुस्तकाचा बरोबर रीतीनें उपयोग होण्यास प्रथम काय समजलें पाहिजे.

हरबर्ट स्पेन्सर यांजवर कित्येकांचा असा आक्षेप आहे कीं, त्यांनीं प्रतिपादन केलेली शिक्षणपद्धति कांहीं अंशीं अव्यावहारिक आहे. एका अलीकडील विद्वानास याबद्दल खुद्द आम्हीं प्रश्न केला होता तेव्हां त्यानें या पद्धतीचा विलक्षण रीतीनें उपहास केला. आम्हीं त्याचें खंडन करण्याचा प्रयत्न केला नाहीं. कारण त्यानें उपहास करण्याचीं एक दोन कारणें सांगितलीं त्यांवरून त्याच्या मनाचा कोतेपणा तेव्हांच व्यक्त झाला. शिवाय त्यानें एक उदाहरण सांगितलें त्यावरून असेंही समजलें कीं, त्यास या पद्धतीचें खरें स्वरूपच कळलेलें नाहीं. हे गृहस्थ उपपदधारी विद्वानांपैकीं आहेत. त्यांचें हें अज्ञान पाहून आम्हांस किंचित खेद झाला. परंतु बरेच विद्वान् या वर्गातील आहेत असा अनुभव असल्यामुळें या खेदाचें लवकरच निरसन झालें. असो. मनाचे जे स्वाभाविक कल आहेत, व त्याची जी नैसर्गिक वर्धिष्णुता आहे त्या कलांस व त्या वर्धिष्णुतेस अनुसरून मुलांचें मानसिक शिक्षण असलें पाहिजे; त्याचप्रमाणें नैसर्गिकपरिणामात्मकशिक्षणपद्धत्यनुसार नीतिशिक्षण असलें पाहिजे; व क्षुत्पिपासादि शारीरिक विकारांच्या धोरणानें शारीरिक शिक्षण पाहिजे; हा जो हरबर्ट स्पेन्सर यांचा सिद्धांत त्याचें खरें आकलन पुष्कळांस झालेलें नाहीं. मुख्य गोष्ट ही लक्षांत ठेविली पाहिजे कीं, हरबर्ट स्पेन्सर यांनीं जी पद्धति सांगितली आहे ती हें पुस्तक वाचल्याबरोबर आम्हीं अमलांत आणावी असा त्यांचा उद्देश नाहीं, व आणणें अशक्य आहे हें तेही जाणत आहेत, व त्यांनीं याप्रमाणें आपल्या ग्रंथांत अनेक ठिकाणीं म्हटलेंही आहे. त्यांची पद्धति अर्थात् शेवटच्या कोटीची होय. समाजाची अत्युत्तम स्थिति जेव्हां होईल तेव्हांच ही पद्धति जशाची तशी अमलांत आणण्याजोगी आहे. अमेरिकेंतील इंडियनलोकांमध्यें

संगणकीकृत

ही पद्धति सुरू केली तर खरोखर अनर्थ होतील. समाजाला विशिष्ट-स्थिति प्राप्त झाल्याशिवाय ही पद्धति प्रचारांत आणणें शक्यच नाहीं. अ-त्युत्कृष्ट पद्धति कोणती हेंच हरबर्ट स्पेन्सर यांनीं सांगितलें आहे. आपणांस शेवटीं कोणत्या स्थलास जावयाचें आहे एवढेंच यांत सांगितलेलें आहे. आज एकदम त्या स्थलास जाववणार नाहीं. परंतु आपणांस जो प्रवास करावयाचा त्याची दिशा कोणती असावी हें ठरवितां येईल, व त्या अनु-रोधानें आपणांस वागतां येईल एवढाच त्यापासून आज उपयोग आहे. मुंबईहून प्रयागास जावयाचें आहे इतकें ठरलें ह्मणजे आपण जरूर त्या तयारीला लागूं. नुसतें मुंबईहून कोठें तरी जावयाचें आहे एवढेंच आपल्या मनांत असलें तर आपली फजितीच व्हावयाची. अगोदर आग-गाडींत बसावें किंवा आगबोटींत बसावें येथपासून धांदल उडावयाची. ही धांदल उडूं नये, प्रवासांत आपले हाल होऊं नयेत, व मुक्कामास पोंचल्या-वर आपली गैरसोय होऊं नये याकरितां हरबर्ट स्पेन्सर यांणीं जरूर ती सर्व माहिती दिली आहे. जबलपूरमेलमधून कोठेंही न उतरतां गेलें तरी प्रयागास पोंचण्यास अडतीस तास लागतात हें माहीत असल्याशिवाय फराळाची, पाण्याची, व हांतरूणपांघरुणाची तजवीज आपल्या हातून होईल काय? दिजंवर जानेवारीच्या सुमारास प्रयागास थंडी ह्मणजे मी ह्मणत असते हें ठाऊक असल्याशिवाय प्रयागास गेल्यावर थंडीनें कुड-कुडण्याचीच पाळी यावयाची नाहीं काय? असो. सारांश आपणांस शेवटीं कोणत्यास्थलीं जावयाचें आहे, त्यास्थळीं जाण्यास कोणत्या दिशेचें अव-लंबन केलें पाहिजे, व आपल्या बरोबर काय घेतलें पाहिजे हेंच हरबर्ट स्पेन्सर यांणीं सांगितलें आहे. ज्या कोणत्याही स्थितींत तुह्मी असाल त्या स्थितीस अनुसरूनच तुह्मी शिक्षणपद्धति ठेवा. परंतु त्याशिक्षण-पद्धतीची दिशा मात्र वर दिलेल्या शेवटच्या कोटीस अनुलक्षून ठेवा ह्म-णजे झालें. त्या शेवटच्या कोटीचीं तत्वें जीं आहेत तीं आपणांस शेवटीं साध्य करून घ्यावयाचीं आहेत इतकें लक्षांत बाळगून विशिष्ट स्थितीच्या अनुरोधानें शिक्षण ठेवा ह्मणजे तुह्मीं हरबर्ट स्पेन्सर यांचे ह्मणण्याप्रमाणें वागलां. हरबर्ट स्पेन्सर यांणीं शेवटची मर्यादा रेखून दिली आहे; तिच्या अनुरोधानें हळूहळू आपणांस आपली गति ठेविली पाहिजे. खुद्द आपल्याच समाजाची आजची स्थिति पाहिली तर हरबर्ट स्पेन्सरांच्या पद्धतीनें सर्वांशीं

सार्वजनिक वाचनालय, सातारा

वागणें आज अशक्य आहे. तथापि नीतिविषयक शिक्षणासंबंधानें कांहीं अंशीं, मानसिक शिक्षणासंबंधानें त्यापेक्षां जास्त अंशीं, व शारीरिक शिक्षणासंबंधानें बऱ्याच अंशीं, त्यांच्या तत्वांस अनुसरून वागतां येण्याजोगें आहे; व एवढें केलें ह्मणजे आह्मीं आपलें कर्तव्य केलें असें होईल. जबलपुरास आगगाडींतून जावयाचें आहे तर ठाणें कल्याण हीं स्टेशनें घेऊन क्रमाक्रमानेंच गेलें पाहिजे. आगगाडींत बसल्याबरोबर जबलपुरास आपण पोंचत नाहीं ह्मणून मुळींच आगगाडींत बसावयाचें नाहीं असें ह्मणणें निवळ वेडेपणा होईल. आज आपण हिंदुस्थानांत राजकीय सुधारणा करण्यास झटत आहों. या राजकीय सुधारणेची अप्रतिम कोटि पार्लमेंट होय. ही कोटि आपणास साधावयाची आहे हें निर्विवाद आहे; तथापि आज नाहीं. आज स्थानिक स्वराज्याचा अधिकार मिळाला आहे हें बरेंच आहे. आणखी कायदेकौन्सिलांत लोकांच्या निवडणुकीनें कांहीं मेंबर गेले ह्मणजे सध्यां पुरे आहे. व इतकेंच आज साधण्याविषयीं आमची खटपट आहे. बालविवाह अहितकारक आहे या करितां मोठेपणीं लग्न करण्याची पद्धति सुरू होणें इष्ट आहे. धर्मशास्त्रान्वयें व प्राणिधर्मशास्त्रान्वयें वराचें वय २० पासून २५ वर्षांपर्यंत असावें, व वधूचें वय १५ पासून २० वर्षांपर्यंत असावें असें दाखवितां येतें. परंतु ही शेवटची अभीष्ट कोटि झाली. आज मुली २० वर्षांपर्यंत अविवाहित ठेविल्या तर कदाचित् त्यांस जन्मभर अविवाहितच राहण्याची पाळी येईल. आज २५ वर्षांपर्यंत मुलांस अविवाहित ठेविलें तर त्यांस संसारसुखाचा उपभोग घेण्याची पाळी येण्याचे पूर्वीच संसार सुखोपभोगाची असमर्थता येण्याचा संभव आहे. तथापि क्रमाक्रमानें योग्य सुधारणा करितां येण्यासाठींच अत्युच्च कोटीचें निदर्शन करून ठेविणें इष्ट आहे; तें आपण करून ठेवितों, व ठेविलेंही आहे. आतां राजकीय व सामाजिक सुधारणेच्या संबंधानें जर अत्युच्चकोटिनिदर्शन आपण इष्ट व आवश्यक मानितों, तर शिक्षणाविषयक सुधारणेच्या संबंधानेंही तें कां मानूं नये?

शिवाय दुसरी एक गोष्ट महत्वाची आहे तिचा कांहीं अंशीं वर उल्लेख आला आहे. ती ही. ज्यावेळेस कित्येक लोक हरबर्ट स्पेन्सर यांच्या पद्धतीस अव्यावहारिकत्वाचा दोष देतात त्यावेळेस ते स्वतःकडे

अवलोकन करीत नाहींत. कोणत्याही गोष्टीचा विचार करणें झाल्यास तिच्या सर्व अवयवांचा विचार केला पाहिजे. एखादा लांकडी जिन्नस एखाद्या सुतारास तयार करण्यास सांगितलेला असून तो जर बिघडला आणि तो बिघडण्याचें कारण जर आपणास पाहणें आहे तर आपणास किती गोष्टींचा बरें मुख्यत्वें करून विचार केला पाहिजे ? अर्थात् मुख्यत्वेंकरून तीन गोष्टींचा; लांकूड, सुतार, आणि हत्यार. हत्यार कितीही चांगलें असलें तरी सुतार जर अडाणी असेल तर काम चांगलें व्हावयाचें नाहीं. आणि त्यांतही लांकूड व सुतार दोन्हीं वाईट असतील तर मग बोलावयासच नको. बरें अशा स्थितींत काम वाईट झालें तर आपण हत्यारास दोष देऊं काय ? आणि दिला तर आपला वेंडेपणा नव्हे काय ? परंतु असाच वेंडेपणा वर सांगितलेले आक्षेपक हरबर्ट स्पेन्सर यांच्या शिक्षणपद्धतीच्या संबंधानें करीत आहेत. हरबर्ट स्पेन्सरच्या पद्धतीप्रमाणें शिक्षण देऊन अभीष्टफलप्राप्ति होण्यास मुलें तर चांगलीं पाहिजेतच, परंतु विशेषेंकरून आईबापें हल्लीं आहेत त्यापेक्षां फारच निराळ्या प्रकारचीं पाहिजेत. त्यांच्या अंगीं विद्वत्ता पुष्कळच असली पाहिजे. प्राणिधर्मशास्त्र, मानसशास्त्र, समाजसंस्थाशास्त्र, रसायनशास्त्र, शारीरशास्त्र, आलेख्यशास्त्र इत्यादि सर्व शास्त्रांचीं निदान मूलतत्वें तरी त्यांस अवगत पाहिजेत. त्यांच्या अंगीं दृढनिश्चय, शांति, मनोनिग्रह, भूतदया, धूर्तता, विमृश्यकारिता इत्यादि गुण बऱ्याच अंशीं अवश्य वसले पाहिजेत. असलीं आईबापें हल्लीं आमच्या समाजांत कोठें आढळांत येतील काय ? आईची गोष्ट एकीकडे टेविली. असले बाप तरी आढळतील काय? अलीकडील विद्वानांत तरी असले बाप किती आढळतील? कदाचित् मोजण्याचा त्रास मुळींच द्यावा लागणार नाहीं. प्रजोत्पादनानें पितृत्वपद संपादणें फारसें कठीण नाहीं, व त्यांत फारसें भूषणही नाहीं. परंतु प्रजासंगोपनानें पितृत्वपद संपादणें फार कठीण आहे. युनिव्हर्सिटीचीं शंभर उपपदेंही खऱ्या पितृत्वोपपदाची बरोबरी करूं शकणार नाहींत. असें आहे तर आज हरबर्ट स्पेन्सरच्या शिक्षणपद्धतीपासून अभीष्टफलप्राप्ति झाली नाहीं तर दोष पद्धतीचा किंवा आईबापांचा? सारांश या संबंधानें प्रत्येकानें जें पक्कें लक्षांत ठेवणें अवश्य आहे तें हें कीं हरबर्ट स्पेन्सर यांनीं शिक्षणाच्या संबंधानें केवळ अत्युच्च कोटीचें निदर्शन केलें आहे; तशीच्यातशीच ती

प्रचारांत आणणें आज शक्य नाहीं; आपला समाज ती प्रचारांत आणण्यास जरूर त्या स्थितीला अद्यापि येऊन पोंचला नाहीं; आपणांस हळूहळू सुधारणा करून शेवटीं त्या कोटीप्रत जाऊन पोचणें आहे; आणि म्हणून आज आपण त्या कोटीचीं जीं तत्वें आहेत त्यांस यथावकाश अनुसरून आपल्यामध्यें सुधारणा करण्याकरितां झटलों म्हणजे आपलें कर्तव्य केलें.

पुस्तकासंबंधी सामान्य विचार.

हरबर्ट स्पेन्सर यांच्या मूलग्रंथाची योग्यता म्हणजे आम्हीं वर्णन केली पाहिजे असें नाहीं. त्या ग्रंथाचें महत्व वाढविण्यासाठीं आम्ही त्याची स्तुति करितों असेंही नाहीं. कारण त्याचें महत्व अगोदरच सर्वांस कळलें आहे, व त्याचा विलक्षण विस्तार हें त्या महत्वाचें अत्युत्तम ज्ञापक होय. तथापि एखाद्याचे गुण अवलोकन केल्यावर त्याचें उच्चारण करण्याची जी मनुष्याची स्वाभाविक प्रवृत्ति आहे तीस अनुसरूनच आम्ही चार शब्द लिहितों. शिवाय ज्या कित्येकांस आंग्लभौमभाषामंदिरांत प्रवेश करण्याचें साधन नाहीं, त्यांस तरी आमच्या या चार शब्दांचा उपयोग थोडाबहुत होईल असा संभव आहे.

हरबर्ट स्पेन्सर यांचा ग्रंथ आमच्यामतें रोज भगवद्गीतेप्रमाणें त्याचा नेमानें पाठ करावा असा आहे. तो एक व्यावहारिक वचनरूप रत्नांचा अमोलिक हारच आहे. जो कोणी याचा संग्रह करून यास नेहमीं कंठांत बाळगील त्यास या संसारांत सुखरूपधनाची कधींही उणीव पडावयाची नाहीं. ज्ञानलवदुर्विदग्धत्वामुळें ज्यांस गर्वज्वर झाला असेल त्यांस हा ज्वरकुठारच आहे. पाहावें तिकडे सर्व अशाश्वत दिसल्यामुळें विचारशील मनुष्यांस निदान कित्येकवेळां ऐहिक गोष्टींविषयीं औदासिन्य प्राप्त होतें, आणि अशा स्थितींत जीव म्हणजे एक ओझें वाटूं लागतें. अशा वेळेस जर हा ग्रंथ हातांत घेतला तर तो तें सर्व औदासिन्य उडवून टाकून पुनः मनामध्यें उत्साह उत्पन्न करील.या ग्रंथांत मुख्यत्वें करून शिक्षणाची मीमांसा आहे हें खरें, परंतु निरनिराळ्या अनेक शास्त्रांचा यांत उल्लेख आलेला आहे. आणि शिवाय मधून मधून वेदांताचे चुटके आहेत. सर्वच अशाश्वत दिसणें हें कोत्यादृष्टीचें फल होय. अशाश्वत तेवढें केव्हां तरी नष्ट होतें हा जो नियम आहे तो तरी निदान शाश्वतिक आहे. त्याचप्रमाणें ही सर्व सृष्टि

कांहीं नियमांनीं चाललेली आहे ते नियम चिरंतन आणि अनपायि असेच आहेत; वास्तव या चिरंतन आणि अनपायि नियमांकडे लक्ष देऊन जो वागेल तोच तरेल, जो या नियमांचें उल्लंघन करील तो बुडेल हेंच थोडक्यांत हरबर्ट स्पेन्सर यांचें तत्व आहे. त्यांनीं शास्त्रीय विषयांच्या अभ्यासांस महत्व दिलें आहे तें याच कारणानें; मानसिक शिक्षणाची जी पद्धति त्यांनीं प्रतिपादन केली आहे तिचें तरी बीज हेंच आहे; नीतिशिक्षणाच्या संबंधानें जो कित्ता गिरविण्याविषयीं त्यांनीं सांगितलें आहे त्याचें तरी वळण हेंच आहे; व शारीरिक शिक्षणाच्या संबंधानें क्षुद्रिपादि विकारांस एकनिष्ठेनें अनुसरण्याविषयीं जो त्यांनीं उपदेश केला आहे त्यांत तरी हाच मुद्दा आहे. सारांश जगन्नियंत्याचे सृष्टिसंचियमनाचे जे चिरंतन आणि अनपायि असे नियम आहेत, त्यांस एकनिष्ठेनें भजणें हेंच त्यांच्या सर्व प्रतिपादनाचें सार होय. दुसरी एक गोष्ट यांच्या प्रतिपादनापासून लक्षांत ठेवण्याजोगी आहे ती ही कीं सर्व सृष्टि आणि सृष्टींतील सर्व व्यापार कार्यकारणभावानें नियामित आहेत. या ज्ञानापासून व्या, वहारिक असे दोन लाभ आहेत. या ज्ञानाच्या योगानें मनुष्याच्या अंगीं उद्योगशीलता व समाधानवृत्ति हीं निःसंशय उत्पन्न होतील. कोणतीही एखादी गोष्ट घडली असतां तिचें कारण समजलें झणजे मन हलकें झाल्यासारखें वाटतें. तीच गोष्ट यदृच्छेनें घडली असें कोणीं आपलें समाधान केलें तर मनाची मळमळ जात नाहीं, आणि युक्तिप्रयुक्तीनें आपण कारण शोधण्यास लागतों; व शोधाअंतीं कारण सांपडलें झणजे कार्य कितीही अप्रिय असलें तरी मनाला एक प्रकारचें समाधान वाटतें, आणि आपण असें झणतों कीं तें कसेंही होवो, पण यामुळें असें झालें, आतां हरकत नाहीं. हा साधारण गोष्टींविषयीं प्रकार झाला. परंतु ज्या कित्येक गोष्टी अत्यंत महत्वाच्या आहेत, व ज्या आपल्या सुखदुःखाशीं अगदीं खिळून गेल्या आहेत, त्या यदृच्छेनेंच होतात असें आपण मानितों, व या यदृच्छेस नशीब असें नांव देऊन त्याजवर सर्व हवाला सोंपवितों. या मनाच्या स्थितीची जर मीमांसा केली तर असें दिसतें कीं, ज्या गोष्टी आपण नशिबानें झाल्या असें झणतों त्यांस शेंडाबुंधा नाहीं, त्या अनियमित आहेत, त्या आज होतील उद्यां होणार नाहींत अशा आहेत, अमुक स्थिति असली तर त्या होतीलच असें नियमानें सांगतां येणार नाहीं, सारांश

त्या कार्यकारणभावानें नियामित नाहींत असें आपण समजतों. अर्थात् त्यांस कार्यकारणभावात्मक नियमाचें बंधन आहे हेंच जर आपणांस माहीत नाहीं, तर त्यांचें कारण शोधून काढण्याकडे आपली प्रवृत्ति कशी होईल? आणि अशी प्रवृत्ति जोंपर्यंत होणार नाहीं तोंपर्यंत ज्ञानाची अभिवृद्धि होण्याचा संभव आहे काय? तात्पर्य कोणत्याही बाबतींत सुधारणा होण्यास प्रत्येक गोष्ट कार्यकारणभावानें नियामित आहे हा सिद्धांत ठाम होऊन गेला पाहिजे. आणि हा सिद्धांत हरबर्ट स्पेन्सर यांच्या प्रतिपादनानें मनावर पूर्णपणें ठसल्याशिवाय रहावयाचा नाहीं. दुसरी गोष्ट समाधानवृत्ति. या शब्दाचा अर्थ अजगरवृत्ति असा मात्र समजावयाचा नाहीं, उतावीळपणाचा अभाव इतकाच समजावयाचा आहे. मनुष्याला प्रिय तेवढेंच व्हावें, अप्रिय तेवढें होऊं नये, असें नेहमीं वाटत असतें. परंतु सृष्टि हें एक यंत्र आहे. त्या यंत्राला जशी गति मिळालेली असेल त्याप्रमाणेंच त्यापासून फळ मिळावयाचें. जास्ती मिळावयाचें नाहीं, आणि कमीही मिळावयाचें नाहीं. तुमची कशीही इच्छा असली तरी ज्याकारणांचीं जीं कार्यें आहेत तींच त्यांपासून व्हावयाचीं. कांहीं लोक असे आहेत कीं, ते आपल्या मुलांनीं मोठेपणीं विनयानें वागावें ह्मणून त्यांस लहानपणीं फार जरबेंत ठेवितात. परिणाम असा होतो कीं, तीं मुलें मोठीं झाल्यावर त्यांस पूर्वी जितक्या जरबेंत ठेविलेलें असतें तितका उच्छृंखलपणा त्यांच्या आंगीं येतो. असें झालें ह्मणजे हे लोक चिडून जातात, आणि इतकी जरब ठेविली तरी मुलगा सुधारला नाहीं ह्मणून त्यांच्या अंगाचा संताप होतो. वस्तुतः पाहिलें तर होतें तें योग्यच असतें. नंतरचा उच्छृंखलपणा केवळ पूर्वीच्या जरबेचाच परिणाम असतो. या लोकांची समजूत मात्र उलट होते, आणि ह्मणून ते अगदीं चिडल्यासारखे होऊन त्रासून जातात. बरें त्याच वेळेस यांस जर असें कळलें कीं, हा उच्छृंखलपणा आपल्या जरबेचाच परिणाम आहे, तर त्यांस आपल्या चुकीबद्दल किंचित वाईट वाटेल, परंतु खचित चीड येणार नाहीं; निदान एरव्हीं ते जसे वस्तुस्थितीवर त्रासून जातात तसे त्रासणार नाहींत. शीतोपचारासाठीं उन्हांत जाऊन बसलों ही चुकी झाली, परंतु एकदां बसल्यावर आंगाला दाह झाला हें ठीकच झालें असें त्यांस खचित वाटेल. एखादा मनुष्य एखाद्या ठिकाणीं लवकर जाऊन पोंचण्यासाठीं धांवत सुटतो. धा-

वतांना मागेंपुढें पाहत नाहीं; अशावेळीं ठेंच लागून पडला झणजे मुक्कामावर लवकर तर पोंचत नाहींच, उलट साध्या चालीनें जितक्या वेळांत पोंचला असता त्यापेक्षां जास्त वेळ लागतो. असें झालें झणजे तो रस्त्यावर व ज्या दगडाची ठेंच लागली असेल त्या दगडावरही किंबहुना रागवूं लागतो. वस्तुतः पाहिलें तर त्याच्या निष्काळजीपणाचा ठेंच लागणें हा परिणाम होय, आणि त्या दगडाची प्रतिबंधात्मकशक्ति व याची गति यांच्या संयोगांचा यायें पडणें हा परिणाम होय. हें जर त्यावेळेस या मनुष्याच्या मनांत आलें, तर आपल्या निष्काळजीपणाबद्दल तो किंचित् खिन्न होईल खरा, परंतु त्रासून जाणार नाहीं, व मनाची असमाधानवृत्ति होणार नाहीं. असें. वस्तुस्थितीचें यथार्थ व पक्कें ज्ञान जर होईल तर ज्यापासून फायदा नाहीं, परंतु नुकसान मात्र आहे, असा संताप कधींही व्हावयाचा नाहीं. कारणांचीं कार्यें झालींच पाहिजेत, व प्रत्येक गोष्टीस कारण आहे हें प्रत्येकानें लक्षांत ठेविलें पाहिजे. कारणें उत्पन्न करणें उद्योगसाध्य आहे व तसें करणें हें आपलें काम आहे. परंतु एकदां कारणांचा व्यापार सुरू होऊन कार्य निष्पन्न झालें झणजे मग असमाधानवृत्तींत फायदा नाहीं; आणि वस्तुस्थितीच्या कार्यकारणभावात्मक बंधनाचें जर पक्कें यथार्थ ज्ञान होईल तर ही पश्चात् असमाधानवृत्ति होणें शक्यही नाहीं.

दुसरी एक गोष्ट हरबर्ट स्पेन्सर यांच्या प्रतिपादनापासून कळते ती ही कीं, मनुष्यास प्रत्येक गोष्ट श्रम करून मिळविली पाहिजे. हें तत्व जितकें लवकर समजेल तितकें पाहिजेच आहे. त्यांच्या शिक्षणपद्धतीच्या योगानें मुलांस होता होईतों प्रत्येक गोष्ट स्वकष्टानें मिळवावी असेंच वळण लागेल, आणि हें वळण जर पुष्कळांच्या अंगीं असेल तर समाजाचा उदय होण्यास उशीर लागणार नाहीं. श्रीमंत आईबापांची या संबंधानें कित्येक वेळां मोठी चूक होत असते. आपल्या मुलांचे लाड करून पैसा मिळविण्यास काय श्रम लागतात याविषयींच्या ज्ञानापासून ते त्यांस पराङ्मुख ठेवितात. आणि असें झाल्यामुळें तो बहुतकरून उधळ्या निपजतो. कवडी कवडीकरून ज्यानें पैसा मिळविलेला असतो त्याचा मुलगा बहुशः उधळ्या निघतो असें आपल्या पाहण्यांत येतें. यास पुष्कळ कारणें आहेत. परंतु त्यांत वरील चुकी हें एक बरेंच मोठें कारण असतें.

दुसरी एक हल्लींच्या आमच्या शिक्षणांत मोठी चुकी आहे. ती कोणती झणाल तर मुलांच्या शरीराची अनास्था. आपला मुलगा विद्वान, आणि तोही लवकर व्हावा अशी बहुतेक लोकांची इच्छा असते, मग तो पाप्याचा पितर झाला तरी हरकत नाहीं. या स्थितीचें एक कारण प्राणिधर्मशास्त्राचें अज्ञान हें होय. मानसिक विकासाकडे लहानपणींच लक्ष दिलें तर शरीराची वाढ खुंटलीच पाहिजे, व शरीर दुबळें झालेंच पाहिजे. मानसिक वैभव शारीरिक वैभवावर अवलंबून आहे हें त्यांस माहीत नसल्यामुळें, मुलांच्या विद्येपासून होणाऱ्या लाभांविषयीं उतावीळ होऊन पुष्कळ लोक मुलांच्या अकालिक मृत्यूस कारणीभूत झालेले आहेत. परंतु या स्थितीचें दुसरें एक कारण आहे, व तें कोणतें झणाल तर कार्यकारणभावाच्या संबंधानें अज्ञान. मोलमजुरी करणारे लोक बऱ्याचअंशीं सुदृढ असतात, व ते अशिक्षित असतात. आतां सुशिक्षित लोकांस अज्ञानामुळें असें वाटतें कीं सुदृढपणा हें अशिक्षितपणाचें कार्य होय. अर्थात् सुदृढपणा हें अशिक्षितपणाचें ज्ञापक होय, झणजे अशक्तपणा व सुशिक्षितपणा यांचें साहचर्य आहे. अशी वेडगळ समजूत असल्यामुळें कित्येक सुशिक्षित लोक आपल्या अशक्तपणानें लज्जायमान न होतां उलट आपला हाडांचा पिंजरा झणजे एक भूषणच आहे असें समजतात. आतां उदर निर्वाहाचें काम दिवसेंदिवस कठीण होत चाललें आहे, त्यामुळें मुलांस लहानपणींच विद्याभ्यासाकडे लाविल्याशिवाय कांहीं अंशीं गत्यंतर नाहीं असें झालें आहे हें खरें. तथापि आईबाप जर विशेष सुशिक्षित असतील, मागें सांगितलेल्या शास्त्रांचीं निदान मूलतत्त्वें जर त्यांस अवगत असतील, आणि मुलांची शरीरप्रकृति सुदृढ राखणें हें अत्यंत अगत्याचें आहे हें जर त्यांच्या मनावर पूर्णपणें ठसलेलें असेल, तर दाहाबारा वर्षेपर्यंत मुलांचे मानसिक शिक्षण त्यांनीं स्वतः आपल्या हातांत घेतलें झणजे झालें. परंतु असें होण्यास वर सांगितल्याप्रकाचीं आईबापें असणें मात्र आवश्यक आहे. आज जे कित्येक विद्वान् झणून आहेत त्यांस असें होतां येणार नाहीं असें नाहीं. त्यांच्या मनांत शरीरसंपत्तीचें महत्व बिंबलें पाहिजे झणजे झालें. उत्तम विद्वान् जरठकारूपेक्षां धट्टाकट्टा साधारण विद्वान् जास्ती योग्यतेचा होय. आत्मसुखाबद्दल तर वादच नाहीं. परंतु जगालाही पहिल्यापेक्षां दुसऱ्याचा

जास्ती उपयोग आहे. एखादा कवडीचुंबक जसा मोठा धनवान् असून ही केवळ रक्षक असतो, स्वतां धनाचा उपभोग घेत नाहीं व दुसऱ्यासही देत नाहीं, त्याप्रमाणें पहिल्याचा प्रकार आहे. दुसऱ्याजवळ संपत्ति अपार नाहीं, परंतु तो खाऊन पिऊन चांगला सुखी आहे, स्वतां चांगला भोक्ता आहे व दुसऱ्यांसही शक्त्युनुसार देत असतो. सारांश कोणत्याही मनुष्यानें चांगलें व्हावयाचें झणजे मन आणि शरीर या दोहोंनींही चांगलें झालें पाहिजे, व आईबापांनींही आपल्या मुलांच्या संबंधानें ही गोष्ट पक्की लक्षांत ठेवणें अवश्य आहे.

आणखी एक गोष्ट विचार करण्याजोगी आहे. ती कोणती झणाल तर एकदेशीयता. कित्येकांचा समज असा असतो कीं आपण विद्वान् झालों झणजे कृतकृत्य झालों. कांहीं लोक असे आहेत कीं धनसंचय हें त्यांचें सर्वस्व. कांहीं असे आहेत कीं केवळ सार्वजनिक कामें आपण केलीं झणजे कृतार्थ झालों अशी त्यांचीं समजूत असते. आणि कित्येकांस तर जगायचें झणजे चैनीकरितां एवढेंच माहीत असतें. यांपैकीं प्रत्येक आपापल्या घेंमेडींत असतो. पहिल्या वर्गांतील मनुष्यास व्यवहारज्ञान बिलकूल नसतें. पुस्तकें सोडून जरा बाहेर गेला कीं त्यास भांबावल्यासारखें होतें. त्याच्या संसाराकडे पाहिलें तर त्यांत रमणीयता काडीमात्र नसते. त्याच्या मुलांबाळांस मिळावें तसें शिक्षण मिळत नाहीं. कलादिमनोरंजनाच्या ज्या गोष्टी आहेत त्यांचें त्यास वारेंही नसतें, व त्या तुच्छ मानण्यांत त्यास एक प्रकारची प्रतिष्ठाही वाटत असते. दुसऱ्या प्रकारचा मनुष्य पाहिला तर त्याची नजर कीर्दखतावणीच्या पलीकडे मुळीं जातच नाहीं. जगांत चाललें आहे काय इकडे त्याचें लक्ष कधींच जात नाहीं, त्याचें मनोरंजन झणजे कच्यांचा हिशोब. सार्वजनिक हा शब्दच त्याच्या कानावर पडलेला नसतो. मुलांचें शिक्षण झणजे काय याची वार्ताही त्यास नसते. प्राणिधर्मशास्त्र, रसायनशास्त्र, मानसशास्त्र वगैरे शब्द त्याजपुढें उच्चारिले तर या कोणत्या सावकाराच्या पेढ्या आहेत असें तो विचारील. तिसऱ्या वर्गातील मनुष्यास असें वाटत असतें कीं मी करीत आहें यांत सर्व कांहीं आलें. त्याचे ते व्यवसाव झाव्य आहेत खरे. परंतु प्रथम कुटुंबस्वास्थ्य करणें हें आपलें कर्तव्य आहे, हें त्याच्या लक्षांतून जातें. मुलांचें शिक्षण हें सामाजिक उत्कर्षाचा पाया आहे हें

तो विसरून जातो. आणि झाडाला पाणी खत वगैरे घालून वाढविण्याच्या पूर्वीच तो फळें तोडण्यास धांवतो. शेवटच्या वर्गातील मनुष्याची स्थिति फारच विलक्षण असते. मनोरंजनाशिवाय जगांत आपणास कांहीं कर्तव्य आहे हें त्याच्या गांवींही नसतें. "ऋणं कृत्वाघृतंपिब" हें त्याचें तत्व असतें. यांतील कोणताही मनुष्य वस्तुतः कृतार्थ होत नसतो. हरबर्ट स्पेन्सर यांनीं व्यवसायांचे पांच वर्ग सांगितले आहेत ते मनांत नेहमीं बागविले पाहिजेत. जगांत खरोखर जगला कोण, जगांत आपल्या जन्माचें कोणी सार्थक्य केलें, याविषयीं स्पेन्सर यांचे जे विचार आहेत ते खरोखर त्यांचें रोज प्रातःस्मरण करावें असे आहेत. ज्याच्या हातून सर्व प्रकारचे व्यवसाय त्या त्या प्रमाणानें घडले तोच खरा जगला, व त्यानेंच आपल्या जन्माचें सार्थक्य केलें. थोडक्यांत असें झणतां येईल कीं, खालीं दिलेलें वर्णन ज्यास लागू होईल तोच या जगांत कृतार्थ झाला. शरीरप्रकृति सुदृढ, विद्येनें भूषित, चांगल्या रीतीनें उदरनिर्वाह होण्यासारखी ऐपत, मुलांचें संगोपन व संवर्धन करण्याचे कामीं कुशल, सार्वजनिक हित संपादण्याविषयीं तत्पर व समर्थ, व काव्य, नाटक संगीत, चित्रकला, शिल्प इत्यादिकलांपैकीं कोणत्या तरी निदान एका कलेंत निपुण,—इतके गुण ज्याच्या अंगीं आहेत, व यांच्या संबंधानें ज्याचे निरनिराळे व्यवसाय चालले आहेत तोच खरा धन्य पुरुष होय. हे जे वर गुण सांगितले ते या धन्यतेच्या परीक्षेंत पसार होण्यास अंगीं अवश्य असलेच पाहिजेत असे आहेत. प्रत्येकानें आपल्या मुलाच्या जन्माचें सार्थक व्हावें अशी जर इच्छा असेल तर त्यास याप्रमाणें चौरस करण्यास झटलें पाहिजे, व त्यास तदनुसार शिक्षण दिलें पाहिजे, तरच त्यानें आपल्या मुलास आपल्या जन्माचें सार्थक्य करण्याचें साधन दिलें, असें होईल.

हरबर्ट स्पेन्सर यांनीं हे पांच प्रकारचे व्यवसाय सांगितले आहेत, त्यांपैकीं पहिल्या वर्गांतील व्यवसायांची तर्तूद जगन्नियंत्यानेंच केली आहे. त्यांबद्दल आपणास फारशी काळजी करणें नलगे. बाकी चार वर्ग उरले त्यांचें महत्व तत्वदृष्ट्या त्यांच्या अनुक्रमानुरोधानेंच आहे; परंतु निरनिराळ्या स्थितींच्या मानानें त्यांचें महत्व कमजास्त होण्याचा संभव आहे. असें झाल्यानें त्यांच्या वर्गीकरणास बाध येतो असें नाहीं. तत्वदृष्ट्या

जो पांचवा वर्ग त्याचा संबंध विशिष्टस्थितींत दुसऱ्या वर्गाशीं जर विशेष असला, तर त्यास चौथ्या वर्गापेक्षां त्या विशिष्टस्थितीच्या संबंधानें जास्त महत्व येईल; आणि या संबंधानें हें लक्षांत ठेविलें पाहिजे, त्यास जें विशेष महत्व आलें तें केवळ दुसऱ्या वर्गाशीं त्याचा संबंध असल्यामुळेंच.

यावरून स्वाभाविक आणखी एक गोष्ट मनांत येते ती ही कीं, मोठ्या मनुष्यांनींसुद्धां आपल्या जन्माचें सार्थक्य त्यांस करावयाचें असेल तर वरील धोरणानेंच वागलें पाहिजे. सर्व प्रकारचे व्यवसाय त्या त्या धोरणानें त्यांनीं केले पाहिजेत. आजची आपल्या समाजाची स्थिति पाहिली तर असावी तशी नाहीं. गोरगरीब व अडाणी लोक तर सोडूनच द्या, परंतु साधारण मध्यवर्गांतील लोक पाहिले तर त्यांचे दोनच व्यवसाय दिसतात. उदरनिर्वाहाचे व मनोरंजनाचे; यांशिवाय वरील वर्गापैकीं इतर व्यवसाय फारसे दृष्टिगोचर होत नाहींत. एखाद्याचे सर्व शरीर सारखें प्रमाणानें भरलेलें नसून एखादाच अवयव जसा वाढवा तशी या लोकांची स्थिति आहे. हा क्रम सोडून निदान ज्यांना साधेल त्यांनीं चौरस होण्याचा यत्न केला पाहिजे. असें होण्यास त्यांचा वर्तनक्रम कसा असावा याबद्दल चार शब्द लिहिणें जरूर आहे. परंतु त्यापूर्वी हल्लीं आपणास विशेष आवश्कता कोणत्या गोष्टीची आहे हें पाहूं.

आमच्या देशाच्या सांप्रतच्या स्थितीचा विचार केला ह्मणजे आम्हांस असें वाटतें कीं, ती हरएक प्रकारें फारच निकृष्ट आहे, व ती सुधारण्यास प्रत्येकानें मनापासून झटलें पाहिजे. आज ज्यांस शक्ति असेल त्या सर्व लोकांनीं सामाजिक व्यवसाय बरेच केले पाहिजेत,आणि त्या सामाजिक व्यवसायांच्या संबंधानें त्यांनीं केल्या पाहिजेत अशा दोन गोष्टी आहेत; एक स्वतां ज्ञान करून घेणें, व दुसऱ्यांस तें मिळेल अशी तजवीज करणें. या सर्वांवर कोणी एखादा असें ह्मणेल कीं, तुह्मी ह्मणतां तें सर्व खरें आहे, परंतु इतकें सर्व व्हावें कसें? रात्र थोडी आणि सोंगें फार अशी स्थिति झाली आहे, तर हा तुमचा चौरसपणा साध्य कसा व्हावा? हें ह्मणणें कांहीं लोकांच्या संबंधानें कांहीं अंशीं खरें आहे. ज्यांस नियमानें वागण्याची संवय नसेल, व ज्यांस परिश्रमाचा कंटाळा असेल त्यांस खरोखर वरील आमची गोष्ट दुःसाध्य आहे. परंतु खरोखर आह्मी असें ह्मणूं शकतों

कीं, आज जे मध्यवर्गातील व उच्च वर्गातील लोक आहेत त्यांस वरील गोष्ट निःसंशय साध्य आहे. मात्र या संबंधानें त्यांचे ठायीं कर्तव्यता-बुद्धि उत्पन्न झाली पाहिजे. आमच्या मतें सामान्यतः खालील वर्तनक्रम जर सदर्हू लोक ठेवितील तर पुष्कळ काम होणार आहे. हल्लीं साधारण-पणें प्रत्यक्ष उदरनिर्वाहाचे कामाकडे सुमारें साहा तास जातात. त्या साहा तासांतही कांहीं वेळ रिकामा जातो त्याचाही उपयोग करतां येण्याजोगा आहे. उदरनिर्वाहाच्या प्रत्यक्ष कामाशिवाय त्या कामांत विशेष कुशलता येण्याकरितां जरूर ती तयारी करण्याकडेही कांहीं वेळ दिला पाहिजे. शारीरिक श्रमांकरितांही कांहीं वेळ राखून ठेविला पाहिजे. मग हे शारीरिक श्रम कोणत्याही प्रकारचे असोत. तालीम असो, किंवा खेळ असो, किंवा नुसतें फिरणें असो. परंतु सर्वांत खेळ विशेष श्रेयस्कर होय. अर्थात् खेळ ह्मणजे पत्त्यांचा नव्हे, शारीरिक खेळ असें समजलें पाहिजे. धर्मसंबंधीं नित्य नैमित्तिक कर्म, भोजनादि व्यापार, व निद्रा यांतही कांहीं वेळ गेलाच पाहिजे. बाकी वेळ उरला यांत तीन प्रकारचे व्यवसाय व्हावे, मुलांचें शिक्षण, सामाजिक हिताच्या गोष्टी, व मनोरंजन. मुलांच्या शिक्षणासंबंधानेंही दोन गोष्टी आहेत. मुलांस शिक्षण उत्तम रीतीनें देतां येण्यासाठीं अवश्य तें ज्ञान संपादन करण्याकडे कांहीं वेळ घातला पाहिजे, व कांहीं वेळ प्रत्यक्ष मुलांस शिक्षण देण्याकडे घालविला पाहिजे. सामाजिक संबंधानेंही दोन गोष्टी आहेत; स्वतः माहिती करून घेणें, व दुसऱ्यांस देण्याची तजवीज करणें, या दोहोंकडेही त्या त्या प्रमाणानें वेळ दिला पाहिजे. शेवटीं मनोरंजन. या संबंधानें एक गोष्ट प्रथम लक्षांत ठेविली पाहिजे ती ही कीं श्रम झाल्याशिवाय मनोरंजनाकडे वळण्यास कोणासही हक्क नाहीं. हल्लीं कित्येकांची अशी स्थिति आहे कीं मनोरंजनानें थकल्यानंतर इतर व्यवसायांकडे कांहीं तरी पालट पाहिजे ह्मणून ते वळतात. असो; या मनोरंजनाचे वेळांत संगीत, चित्रकला, शिल्पकला आदिकरून कलांचें संपादन करावें. बऱ्याच कलांचीं मूलतत्त्वें माहीत असणें इष्ट आहे. त्या अर्थी कांहीं काळपर्यंत एका कलेनंतर दुसरी कला याप्रमाणें मनोरंजनाची व्यवस्था ठेविली ह्मणजे चोहोंकडून आपले हेतु सिद्धीस जातील. या सर्व गोष्टी केवळ सामान्यतः आहेत हें लक्षांत ठेविलें पाहिजे. पुष्कळ वेळां अपवाद येतील तेथें निरुपाय आहे. परंतु

साधारण वरील धोरणानें जर लोक वागतील तर त्यांच्या जन्माचें सार्थक्य होणें फारसें कठीण नाहीं.

असो. याप्रमाणें आणखी शेंकडों गोष्टी हरबर्ट स्पेन्सर यांच्या प्रतिपादनावरून मिळण्याजोग्या आहेत. या गोष्टी अर्थात् आह्मीं नवीन ह्मणून सांगितल्या नाहींत. स्पेन्सर यांचीं पुस्तकांत जीं तत्वें आहेत त्यांचा परिपाक झाला ह्मणजे या वरील गोष्टींच्या रूपानें रसनिष्पत्ति होतेच; ती रसनिष्पत्ति करण्यास कालादिसंबंधानें कित्येक वाचकांस अनुकूलता नसण्याचा संभव आहे, अशा वाचकांची गैरसोय होऊं नये ह्मणून प्रस्तावना किंचित् लांब करून वरील गोष्टी आह्मीं दिल्या आहेत.

हरबर्ट स्पेन्सर यांचा ग्रंथ कित्येक ठिकाणीं अगदीं उपपत्ति परंपरा आहे. व कित्येक ठिकाणीं तर त्यामध्यें अगदीं अर्वाचीन शास्त्रांच्या मूलतत्वांचें दिक्प्रदर्शन केलेलें आहे. यामुळें त्यांतील कांहीं विचार मराठीमध्यें बरोबर रीतीनें उतरून देण्याचें आह्मांस फार कठीण पडलें. स्थलविशेषीं आह्मांस संस्कृताच्या आधारें अगदीं नवीन शब्दांची योजना करावी लागली, व कांहीं स्थलीं मुळामध्यें एक दोन शब्दांनीं प्रदर्शित केलेला विचार मराठीमध्यें प्रदर्शित करण्यास वाक्यांचाही उपयोग करणें माग पडलें. अशा रीतीनें आह्मी आपलें पुस्तक करतां आलें तितकें सुबोध करण्याचा प्रयत्न केला आहे, तथापि तें अजूनही कित्येक स्थलीं कांहीं वाचकांस बरेंच दुर्बोध होईल असें आमचें आह्मांलाही वाटतें. आतां असें कठीण पुस्तक पूर्वीचा कांहीं एक अनुभव नसतां आह्मी एकदम लिहिण्यास लागलों ह्याबद्दल आह्मी साहसाच्या दोषास पात्र आहों ही गोष्ट आह्मी कबूल करितों. परंतु ह्यावर आमचें एवढेंच ह्मणणें आहे कीं, आमच्या समाजाची शिक्षणसंबंधीं शोचनीय स्थिति व ती सुधारण्यास पुस्तकाचा होणारा उपयोग या दोन गोष्टी मनांत आणून आह्मी आपल्या योग्यतेची विशेष पर्वा न करितां या उद्योगाला लागलों. ह्याप्रमाणें केवळ कार्यमाहात्म्यावर नजर देऊन आह्मी पुस्तक लिहिण्यास प्रारंभ केला, व तें पुरें करून पूर्वी लिहिल्याप्रमाणें दक्षिणाप्राइज कमिटीच्या जाहिरातीअन्वयें तिजला सादर केलें. सुदैवानें तें पुस्तक कमिटीस पसंत पडून तें प्रसिद्ध करण्यापूर्वी त्यांनी कोणत्या सुधारणा होणें इष्ट आहेत, अशाविषयीं तिजकडून कांहीं उपयुक्त सूचनाही करण्यांत आल्या. त्या सूचनांप्रमाणें जरूर

ते फेरफार करून आतां समाजरूपी विशेष व्यापक 'कमिटीस' आह्मी हें पुस्तक सादर करीत आहों. तर समाजानें हें पुस्तक वाचण्याची कृपा करून त्यांत अद्यापि ज्या सुधारणा होणें इष्ट दिसतील, त्याविषयीं आह्मांस सूचना करण्याची तसदी द्यावी, आह्मी त्यांचा दुसऱ्या आवृत्तीच्यावेळीं अवश्य विचार करूं.

काय झालें ह्मणजे आह्मी कृतार्थ होऊं.

पुस्तकाचा उद्देश वगैरे वर आलाच आहे. स्पेन्सर यांचे विचारांचा प्रसार होऊन तदनुसार वर्तन ठेवण्याची वाचकांचे मनांत इच्छा उत्पन्न झाली ह्मणजे बराच फायदा झाला असें ह्मणण्यास हरकत नाहीं. आजच या विचारांनुसार बरोबर वर्तन ठेविणें पुष्कळांस किंबहुना बहुतेकांस कठीण जाईल. परंतु अशा प्रकारचें वर्तन ठेविण्याचा कांहीं दिवस यत्न झाला ह्मणजे साहजिक जरूर तें वळण अंगीं येऊन पाहिजे आहे तसें वर्तन ठेविणें सुलभ होणार आहे. परंतु हें होण्याच्या पूर्वी या विचारांची नुसती दिशा जरी लोकांचे मनांत प्रतिबिंबित झाली, आणि अनुकूल किंवा प्रतिकूल कोणत्याही बुद्धीनें का होईना, या विचारांची फक्त चर्चा जरी सर्वत्र सुरू झाली, तरी तेवढ्यानें आमचे श्रम भरून आले असें आह्मी समजूं. यास्तव आमच्या महाराष्ट्रीय बंधूंस आमची एवढीच विनंती आहे कीं, पुस्तक किंचित् कठीण आहे खरें तथापि वेळांत वेळ काढून एक वार तें सबंद मनःपूर्वक वाचण्याची तसदी त्यांनीं अवश्य द्यावी.

आतां उपसंहार करण्यापूर्वी या पुस्तकाच्या संबंधानें कित्येक गृहस्थांनीं आह्मांवर उदार बुद्धीनें अनुग्रह केला आहे त्याबद्दल त्यांचे मनःपुरःसर आभार मानणें हें आमचें एक कर्तव्य आहे. पुस्तकाचें महत्व मनांत आणून तें एखाद्या थोर गृहस्थास समर्पण करावें असा आह्मीं संकेत केला. श्रीमंत महाराज शिवाजीराव होळकर संस्थान इंदूर यांस समर्पण करावें असा हेतु धरून त्यांची अनुज्ञा मिळण्यासाठीं विज्ञप्ति केली. आणि आह्मांस लिहिण्यास आनंद वाटतो कीं, श्रीमंतांनीं परम औदार्यानें आमच्या विज्ञप्तीचा आदर करून आह्मांस ती अनुज्ञा दिली. श्रीमंतांच्या अनुज्ञेप्रमाणें आह्मीं हें पुस्तक परम भक्तीनें श्रीमंतांस अर्पण केलें आहे, व या योगानें तें आमच्या महाराष्ट्रीय बंधूंस विशेष आदरणीय होईल अशी आह्मांस

उमेद आहे. पुस्तक तयार झाल्यानंतर त्याच्या गुणदोषपरीक्षणार्थ तें आह्मीं कित्येक विद्वान् गृहस्थांस सादर केलें. त्यांनीं त्यांस इतर व्यवसाय पुष्कळ असतांही वेळांत वेळ काढून पुस्तक वाचून त्यावर आपले अभिप्राय दिले आहेत याबद्दल आह्मी त्या गृहस्थांचे फारच आभारी आहों. या गृहस्थांनीं दिलेले अभिप्राय आह्मीं जशाचे तसे अलाहिदा छापले आहेत. तसेंच हें पुस्तक तयार करण्याच्या कामीं आह्मांस एका सद्गृहस्थाची जी मदत झाली आहे तीही आमच्यानें येथें कबूल केल्याशिवाय राहवत नाहीं. हे गृहस्थ आमचे परमपूज्य ऋणानुबंधी मित्र रा. रा. विष्णु मोरेश्वर मराठे वसईकर हे होत. या गृहस्थांनीं पुस्तकास कोणतें स्वरूप द्यावें हें ठरविण्याच्या कामीं आह्मांस वेळोवेळीं बहुत सूचना केल्या, व त्यांचा आह्मांस मोठा उपयोग झाला आहे. तसेंच पुस्तक छापून प्रसिद्ध करण्यामध्यें सर्वांत दगदगीचें काम जे प्रुफें तपासणें तें करण्यामध्येंही सदर्हू गृहस्थांचें आह्मांस मोठें साहाय्य झालें आहे. ह्या दोन्ही गोष्टींबद्दल आह्मी रा. रा. विष्णुपंत मराठे ह्यांचें फार फार आभारी आहों.

वासुदेव गणेश सहस्रबुद्धे.

पुस्तककर्ता.

तारीख ८ महे फेब्रुवारी सन १८८९.
मुंबई, खेतवाडी, गल्ली ७, घर नं. १२६.

हरबर्ट स्पेन्सर यांजविषयीं चार शब्द.

हरबर्ट स्पेन्सर यांचा जन्म सन १८२० त झाला. यांची सर्व विद्या घरींच झाली. यांचे वडील व चुलते यांणींच यांस विद्या शिकाविली. हे कोणत्याही शाळेंत किंवा कालेजांत कधीं गेले नाहींत, व यांस युनिव्हर्सिटीच्या पदव्या वगैरे कांहीं नाहींत. हे आपल्या वयाच्या सत्राव्या वर्षीं सिव्हिल एन्जिनिअर झाले. परंतु आठ वर्षेपर्यंत हा धंदा केल्यानंतर तो त्यांनीं सोडून दिला. तथापि या वेळांत हे नुसता धंदाच करून राहिले नाहींत. इतक्या कालांत त्यांनीं धंद्यासंबंधी विषयांवर अनेक निबंध लिहिले. धंद्याच्या बाहेरील विषयांवर यांचा पहिला लेख सन १८४२ त प्रसिद्ध झाला. 'यावेळीं त्यांनीं राजाचा वास्तविक अधिकार' या विषयाचें विवेचन केलें. सन १८४३ पासून सन १८५२ पर्यंत यांनीं एकॉनमिस्ट नांवाच्या वर्तमानपत्रांत लिहिण्याचें काम केलें. आणि या कामांत त्यांनीं आपला "सोशलस्टॅटिक्स" नांवाचा विशेष महत्वाचा ग्रंथ प्रसिद्ध केला. सन १८५५ त त्यांचा 'मानसशास्त्राचीं तत्वें' या नांवाचा लोकमान्य ग्रंथ बाहेर आला. या ग्रंथाचे योगानें त्यांनीं तत्वज्ञानास एक प्रकारची नवीनच दिशा दिली असें म्हणण्यास हरकत नाहीं. यांनीं पुढें सन १८८२ त अमेरिकेमधील संयुक्तसंस्थानांत पर्यटण केलें. सन १८८३त फ्रान्स देशांत राजकीय व नीतिसंबंधी शास्त्रांचा उत्कर्ष करण्यासाठीं जें एक प्रसिद्ध विद्यापीठ आहे त्याच्या तत्वज्ञानाच्या शाखेच्या संबंधानें विख्यात इमरसन यांच्या जागेवर यांस निबंधकार नेमिलें. यांणीं आजपर्यंत शेंकडों मासिक पुस्तकांतून अनेक विषयांवर लिहिलें आहे, व त्यांतील बरेच लेख त्यांणीं "शास्त्रीय, राजकीय व तात्विक निबंध" ह्मणून जो ग्रथ प्रसिद्ध केला आहे त्यांत आलेले आहेत. त्यांनीं शिक्षण विषयावर (मानसिक, शारीरिक व नीतिसंबंधी शिक्षणावर) सन १८६१ च्या पूर्वी लेख लिहिले होते ते सर्व एके ठिकाणीं करून एक स्वतंत्र ग्रंथ सन १८६१ त प्रसिद्ध केला. या ग्रंथाची दुसरी आवृत्ति न्यूयार्क येथें अमेरिकेंत सन १८६४ सालीं निघाली. यांनीं प्राणिधर्म-

शास्त्र, समाजसंस्था शास्त्र, शारीरशास्त्र वगैरे अनेक गहन शास्त्रांवर सर्वमान्य असे ग्रंथ केले आहेत, व त्यांतील कित्येकांची तिसरी चौथी आवृति निघाली आहे. हरबर्ट स्पेन्सर हे परिणतिवादाचे परमभक्त आहेत; व त्यांनीं या तत्वज्ञान पद्धतीची अथपासून इतिपर्यंत संगतवार उपपत्ति प्रतिपादन केली आहे. या परिणतिवादाच्या इतिहासाचीं चार अंगें आहेत. प्रथम सुमारें दीडशें वर्षांपूर्वी एका तत्ववेत्त्यानें ज्योतिश्चक्राबद्दल ही उपपत्ति प्रतिपादन केली. पुढें दुसऱ्या एका विद्वानानें भूमंडळाची व या उपपत्तीची सांगड घातली. पुढें विख्यात डारविन यांनीं प्राण्यांची उपपत्ति याच तत्वानुसार झाली आहे असें दाखविलें. परंतु येथपर्यंत एक विशेष गोष्ट होती ती ही कीं, प्रत्येक तत्ववेत्त्यानें आपलें अंग स्थापन करून पूर्वीच्या तत्ववेत्त्याचा पक्ष अंगीकारिला, परंतु पुढील अंगाच्या संबंधानें तीच उपपत्ति लागू आहे हें मात्र कबूल केलें नाहीं. परंतु शेवटीं हरबर्ट स्पेन्सर यांणीं मनाच्या संबंधानें व मनोविकारांच्या संबंधानेंही हीच उपपत्ति लागू आहे असें दाखवून मागील सर्व अंगांचें मंडन केलें, व परिणतिवादास व्यापकतनें उपपत्तीचें स्वरूप देऊन आकाशांतील नक्षत्रगोलांपासून तों महाकवीच्या किंवा महा तत्ववेत्त्याच्या मनोमंदिरापर्यंत सर्व सृष्टि परिणतिवादाच्या तत्वानुरोधानेंच झाली आहे हें त्यांनीं उत्कृष्टरीतीनें सिद्ध करून दाखविलें आहे. असो. यांचाव्यासंग फारच दांडगा आहे. यांचें ज्ञानभांडार आगाध आहे, व यांचे परिश्रम विलक्षण आहेत. हल्लीं यांचें वय जवळजवळ सत्तर वर्षांचें आहे, तरी ग्रथांवरग्रंथ लिहिण्याचा यांचा धडाका सुरू आहे. यांणीं आपल्या तत्वज्ञानानें जगाला एक प्रकारचें चलन दिलें आहे. असे पुरुष सर्व युरोपखंडांत आजपर्यंत फारच थोडे निर्माण झाले आहेत. आरिस्टाटल, लार्ड बेकन, व हरबर्ट स्पेन्सर येथेंच कदाचित् ही मालिका पुरी झाली पाहिजे असें वाटतें. विशिष्ट गोष्टींत एक एक विद्वान् प्रतिसूर्य होऊन गेला आहे. परंतु ज्यांच्या तत्वज्ञानास व्यापकता व सार्वत्रिकता आहे असे तत्ववेत्ते आजपर्यंत यूरोपखंडांत तीनच होऊन गेले आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं

पुस्तकावद्दल अभिप्राय.

"I have examined this translation into Maràthi of Herbert Spencer's work on Education. Mr. Sahasrabuddhe has succeeded in reproducing with correctness the meaning of the original, and has expressed it in well-chosen language. Considering the special difficulties arising from the abstract character of some parts of this dissertation, the work of translation has been most creditably performed.

Herbert Spencer's work is well-known. It is scarcely necessary to say that the views set forth in this work are worthy of the earnest attention of all who are engaged in the work of education. This translation will place them within the reach of a large number of teachers, who will prefer to peruse the work in their own language. To such I would specially commend Mr. Sahasrabuddhe's work; they cannot fail to be interested and assisted by its perusal."

(Signed) D. MACKICHAN, M. A. D. D.,
Principal F. C. College
And Vice-Chancellor of the University of Bombay.

FREE CHURCH COLLEGE,
29*th January* 1889.

"I have gone through a considerable portion of Mr. Sahasrabuddhe's Adaptation of Herbert Spencer's Essay on Education. Upon the whole I think the adaptation is very well done; and in most parts, as far as I can judge, it will be quite intelligible to purely Marathi readers. In some places, perhaps, the sense is not quite easily made out. I have noticed a few such places myself. But in these places, the difficulty is not due mainly to any shortcoming of the author of this adaptation, but to the fact that he has been constrained to use words, some what unfamiliar to ordinary Marathi readers, in order to express the meaning of Spencer's text. The use of such unfamiliar words could only have been avoided, I think, by long peri-phrasis. This is a difficulty which is always encountered, in a greater or less degree, by every Marathi author endeavouring to express modern ideas in the Marathi Language. Perhaps in the present condition of the Marathi language, it may be desirable to surmount this difficulty, by using the short, if unfamiliar phrase in the text, and appending a note affording ample

explanation of its meaning. And this leads me to one recommendation which I wish to make to Mr. Sahasrabuddhe. Throughout this essay, I should like to see a good deal more of illustrative matter. Spencer's Essay even in the original English requires a great deal on the part of the reader. In an adaptation, I think, some of this work ought to be done for the Marathi reader. And it can best be done by taking illustrations from our existing educational conditions, both to illustrate defects existing, and remedies or reforms suggested. In a new edition I should like this to be done on a large scale. The book, as it is, is likely to be very useful, particularly to our teachers in Marathi schools and others similarly situated. With the additions which I suggest its value and influence for practical purposes will, I think, be very much enhanced."

(Signed) K. T. Telang, M. A. LL. B. C. I. E.
Advocate, High Court Bombay.

19*th January* 1889.

"I have cursorily looked into Mr. Saharabuddhe's translation or rather adaptation of Mr. Herbert Spencer's work on Education, and I have no hesitation in saying that it is a very successful attempt. It is written in a good style, and although here and there an Anglicism is observable, the langnage is on the whole pure idiomatic Maràthi, and well suited to the subject. The original work being somewhat of a theoretical character, its translation or even adaptation cannot but present some difficulty, to the ordinary reader. But Mr. Sahasrabuddhe has done all that could be done to lessen this difficulty, and has on the whole made his work very readable. The subject is of the utmost importance in itself, and considering how little is known even among the intelligent classes in this country of the true principles of the Science of Education, Mr. Sahasrabuddhe's work cannot but prove a very useful one to a very large class of readers."

(Signed) V. A. Modak, B. A.
Principal, Elphinstone High School.

Elphinstone High School,
21*st January* 1889.

"Of all questions that have engaged public attention of late, none is, I believe, more important and less cared for, than that of public and private instruction. How young boys are to be educated is always a bewildering problem. Various standards of excellence are put before them, and their guardians, in their over-anxiety for the young

people, very often chalk out a career for them, for which, perhaps, they have very little inclination either from their very nature or from the training they have received. Under these circumstances, any book, professing to analyse the very principles of education, even if it may not succeed in every minute investigation completely, is most welcome. And for this reason I am very glad to recommend the शिक्षणमीमांसा of Mr. Sahasrabuddhe to the reading public. It is a translation of Herbert Spencer's famous Essay on Education, but it is not a mere rendering into another language. He has been quite happy in his adaptation of the book to the idioms and the requirements of the Marathi language and Marathi-speaking public. All Spencer's ideas are fully explained, and occasionally illustrations specially Indian and bearing particularly on our present educational wants are added. Some of the conclusions of Spencer on Theological and Speculative matters have been a little softened down, as they ought to have been, especially when they are presented to the young reader who is not yet accustomed to think for himself. From my reading of the book I can unhesitatingly say that it is one eminently suited to our people and especially to our students at the present time, when the lessons that happen to be given in the school classes alone are called education, and when there is very little real home-teaching. Education must have had a solid foundation in home-life before a boy is put to school, and this principle is often insisted upon in the present work. I think it deserves to be made a text-book in the upper Marathi standards, and every head of a family and every gentleman of any culture ought to have a copy of it."

(Signed) SHRIDHAR GANESH JINSIVALE, M. A.,
Professor of Sanskrit, F. C, College, Bombay.

25th January 1889.

रा. रा. वासुदेव गणेश सहस्रबुद्धे यांनीं मराठी भाषेंत शिक्षणमीमांसा ह्मणून एक उत्तम ग्रंथ इंग्लंडांतील प्रसिद्ध विद्वान् हरबर्ट स्पेन्सर यांच्या एजुकेशन नांवाच्या ग्रंथावरून लिहिला आहे. त्याचा हस्तलेख त्यांनीं मला दाखविला, तो मीं समग्र वाचून कित्येक ठिकाणीं मूळ ग्रंथाशीं ताडून पाहिला. मूळग्रंथ कित्येक ठिकाणीं इतका कठीण आहे कीं मोठमोठ्या विद्वानांस देखील त्या ठिकाणीं याचा अमुकच अर्थ असें निश्चयात्मक लवकर ठरवितां येत नाहीं. अशा ग्रंथाचें भाषांतर करण्याचें काम फारच बिकट ह्यांत संशय नाहीं. हें हातीं घेतल्यावद्दल रा. रा. वासुदेवराव यांची तारीफ करावी तितकी थोडीच. हा ग्रंथ शास्त्रीय ह्मणजे एखाद्या

शास्त्राच्या विषयाचें प्रतिपादन त्यांत आलें आहे असा नाहीं. तर या ग्रंथांत सर्व शास्त्रांचें दिक्प्रदर्शन आहे. त्यांपैकीं कित्येक अर्वाचीन शास्त्रें युरोपांत देखील आद्यापि पूर्णत्वास आलेलीं नाहींत. तिकडे देखील त्यांचा नुकता आरंभच आहे. अशा शास्त्रांतील पारिभाषिक शब्दांचें लोकांस कळण्यासारखें भाषांतर करणें किती काम कठीण आहे याचा अनुभव 'जावें त्याच्या वंशा तेव्हां कळे' ह्या म्हणप्रमाणें ज्याने असा यत्न केला असेल किंवा करून पाहील त्यासच कळेल एरव्हीं कळणार नाहीं; यामुळें हे पुस्तक सर्वांच्या मतें सर्वदोषरहित झालें आहे असें होणार नाहीं, व असें असणें हेंच स्वाभाविक आहे. तसेंच यांत कित्येकांस जीं स्थलें सदोष वाटतात, ती दुसऱ्यांस तशीं दिसणार नाहींत. उदाहरणार्थ जे कित्येक शास्त्रीय किंवा पारिभाषिक शब्द यांनीं योजिले आहेत, त्यांबद्दल दुसऱ्यांस दुसरेच बरे वाटतील. तसेंच यांनीं पुस्तकास कोठें कोठें भाषांतर स्वरूप, व कोठें कोठें रूपांतर स्वरूप दिलें आहे. दोन्ही प्रकार चांगले साधले आहेत तरी असें असणें बरोबर दिसत नाहीं. यापेक्षां कोणतें तरी एक स्वरूप असतें तर बरें होतें.

पुस्तक कठीण असून लिहिलें एवढ्याचकरितां रा. सहस्रबुद्धे यांची तारीफ करावयाची असें नाहीं. तर इंग्रजींतून आजपर्यंत जीं पुस्तकें झालीं आहेत त्यांत एकही पुस्तक यापेक्षां अधिक उपयोगाचें झालें असेल असें म्हणतां येणार नाहीं. इंग्रजी राज्य होऊन आमचें सर्वप्रकारें स्थित्यंतर झालें आहे, त्यामुळें आतां आपल्या पुढील पिढीस कोणत्या प्रकारच्या शिक्षणाचें वळण लावावें याविषयीं मोठ्या राज्यकार्यधुरंधरांसही विचार पडला आहे. सर्व प्रकारचें शिक्षण राज्यकर्त्यांच्या धोरणाप्रमाणें चालू झाल्यामुळें आमच्यांतील शहाण्या लोकांसही कांहीं सुचत नाहीं अशासारखें झालें आहे. यामुळें बहुतेक एतद्देशीय संस्थानांतदेखील सर्व शिक्षणप्रकार इंग्रजी वळणावर सुरू झाले आहेत. अशा प्रसंगीं या पुस्तकाचा फैलाव जितका चोहींकडे होईल तितका विशेष फायदा होईल. या पुस्तकाच्या ज्ञानानें प्रत्येक आईबापांस आपल्या मलांस हरबर्ट स्पेन्सरच्या म्हणण्याप्रमाणें 'पूर्ण जीवन' देण्यास येईल हतकेंच नव्हे, तर ज्यांच्या हातीं थोडेंबहुत प्रजाकल्याणाचें सूत्र आहे त्यांस आपलें काम चांगलें करण्यास मदत होईल यांत संशय नाहीं. याकरितां सर्वांनीं या पुस्तकाचा संग्रह करून लक्षपूर्वक वाचणें योग्य आहे.

(सही) गोविंद शंकर शास्त्री बापट.

मुंबई माघ वद्य ३ रविवार शके १८११.

शिक्षणमीमांसा.

सरकार वाचनालय, सातारा.

भाग १ ला.

जगांत अत्यंत उपयुक्त ज्ञान कोणतें?

लोकांचें लक्ष वस्त्रप्रावरणापेक्षां अलंकारांकडे आधीं जातें हें म्हणणें अगदीं यथार्थ आहे. जे लोक सुरेख दिसण्याकरितां शरीराला नाना प्रकारें गोंदून घेतात तेच लोक थंडी वाऱ्याच्या निवारणार्थ यत्किंचित्ही प्रयत्न करीत नाहींत असें आढळून येतें. 'हंबोल्ट' नांवाचा एक विख्यात प्रवासी एके ठिकाणीं असें म्हणतो कीं अमेरिकेंतील ओरिनोको इंडियन लोक हे शरीरसुखाविषयीं अगदीं काळजी करीत नाहींत, परंतु तेच आंगें रंगवून नटण्याकरितां रंग वगैरे मिळविण्यासाठीं आठ पंधरा दिवस खुशाल खपतात. तसेंच त्या लोकांमध्यें जी स्त्री आंगावर सुताचा धागा नसतां-नाहीं बाहेर जाण्यास जरा सुद्धां मागें पुढें पहात नाहीं तिच्यानेंच आंग रंगविल्याखेरीज बाहेर जाववत नाहीं. रानटी लोकांमध्यें लोंकरीच्या ऊबदार कपडयांपेक्षांही कांचेच्या मण्यास फार जास्त किंमत येते; तसेंच त्यांना कोणीं बंडी किंवा अंगरखा दिला असतां तो आंगांत न घालतां त्यानेंच आपणास एखाद्या वेडयाविद्रया रीतीनें ते सजवून घेतात. ह्या वरील गोष्टींवरून उपयोगापेक्षां शोभेकडे लोकांचें लक्ष किती जास्त असतें हें सहज लक्षांत येईल. ह्याहीपेक्षां कांहीं विलक्षण उदाहरणें आहेत. 'क्याप्टन स्पीक' साहेब आपल्या आफ्रिकेंतील चाकर लोकांविषयीं असें सांगतो कीं, बाहेर ऊन असलें कीं ते आपले बकऱ्याच्या कातडयाचे झगे घालून मिरवत; परंतु पाऊस आला कीं ते घडी घालून ठेवीत, आणि पावसामध्यें उघडे हिंडत. रानटी लोकांच्या आयुष्यक्रमणाच्या ह्या गोष्टींवरून असें दिसतें कीं प्रथमतः अलंकारांवरूनच वस्त्रप्रावरण घेण्याची कल्पना लोकांचें मनांत आली असावी, आणि हल्लीं आमच्या-

सरकार वाचनालय सातारा
संगणकीकृत

मध्यें सुद्धां पोषाखाच्या संबंधानें पाहिलें तर पुष्कळ लोकांचें लक्ष कापडाच्या सफईकडेच विशेष असतें; कापड ऊबदार टिकाऊ वगैरे आहे कीं नाहीं हें कोणी फारसें पहात नाहीं. पोषाख सोईवार नसला तरी चालेल, पण झोकदार पाहिजे अशी लोकांची सामान्य स्थिति आहे. हें मनांत आणिलें ह्मणजे वरील कल्पना खरी मानण्यास सबळ कारण दिसतें.

मनाच्या संबंधानें सुद्धां ही गोष्ट लागू पडते. विद्या शिकतांना आपणांस कोणत्या विद्येचें ज्ञान विशेष अगत्याचें आहे हें आह्मी फारसें पहात नाहीं. ज्या ज्ञानाच्या योगानें लोकांमध्यें प्रतिष्ठा वाढेल तेंच ज्ञान संपादन करण्यास आपण आधीं झटतों. हा क्रम प्राचीन काळीं मात्र होता आणि हल्लीं त्यासंबंधानें कांहीं विशेष सुधारणा झाली आहे असें नाहीं. ग्रीक लोकांच्या पाठशाळांमधून गायन, कविता, अलंकारशास्त्र, तत्वज्ञान हे विषय मुख्यत्वें करून शिकवीत असत; तत्वज्ञानाचा सुद्धां साक्रेतिसाच्यापूर्वी ऐहिक कृत्यांमध्यें उपयोग होत नसे. सारांश जगांत ज्या गोष्टीचा विशेष उपयोग व्हावयाचा तिकडे कोणी फारसें लक्ष देत नसे. आणि हल्लीं तरी आमच्या विद्यालयांमधून हाच प्रकार चालला आहे. पुढें व्यवहारामध्यें संस्कृत, लॅटीन आणि ग्रीक भाषांच्या ज्ञानाचा उपयोग दहा मुलांतून एकासही होत नाहीं हें कोणाला सांगितलें पाहिजे असें नाहीं. घरचा संसार पहातांना, आपल्या इस्टेटीची वहिवाट करितांना, कचेरींत काम चालवितांना, किंवा पेढीवरील हिशेब लिहितांना, वर्षांच्या वर्षें रात्रंदिवस परिश्रम करून मिळविलेल्या ह्या ज्ञानाचा यत्किंचित् तरी उपयोग कोणाला होतो काय? यत्किंचित्ही उपयोग होत नसल्यामुळें पुढें बहुतेक लोक ह्या भाषा अगदीं विसरून जातात. पुढें व्याख्यानें वगैरे देतांना कोणी एखादें संस्कृत किंवा लॅटीन वाक्य मध्यें घुसडून दिलेंच किंवा एखाद्या पौराणिक कथेचा संबंध आणिलाच तर त्यांत ह्मणजे चालू विषयाचें विशेष निरूपण करण्याचा उद्देश असतो असें नाहीं तर मुख्य मुद्दा विद्वत्तेचा डौल मिरविण्याचाच असतो. ह्या प्राचीन भाषा मुलांना लोक शिकवितात त्यांत त्यांचा खरा हेतु काय असावा, हें पाहूं गेलें असतां लोकांत ज्याच्या योगानें प्रतिष्ठा मिळते, तें आपल्या

मुलास येत असावें असें त्यांस वाटतें, ह्याशिवाय दुसरा कांहीं असेलसें दिसत नाहीं. आईबापें मुलांच्या विद्येच्या संबंधानेंही त्यांच्या पोषाखाप्रमाणेंच लोकरीतीस अनुसरून व्यवस्था ठेवितात. ओरिनोको इंडियन लोक झोपडींतून बाहेर पडतांना आंगास रंग लावितात तो काय त्यापासून आपणांस कांहीं फायदा आहे असें त्यांस वाटतें ह्मणून? नाहीं; तर रंगावांचून बाहेर पडण्यास त्यांस संकोच वाटतो ह्मणूनच. ह्याप्रमाणेंच मुलांस प्राचीन भाषा आल्याच पाहिजेत असें आपणास वाटतें हें त्यांपासून कांहीं तादृश उपयोग आहे ह्मणून नव्हे तर ह्या भाषा न आल्या तर आपल्या मुलांची विद्या झाली, असें लोक ह्मणत नाहींत ह्मणून. आपल्या मुलास "सुशिक्षित, शिकलेला, पंडित, विद्वान्" असें लोकांनीं ह्मणावें ही आईबापांस मोठी हौस असते. मुलगा शिकलेला किंवा विद्वान् ठरला ह्मणजे त्याला चोहींकडे लोक सन्मानपूर्वक "या" "जा" ह्मणतात, आणि यामुळें त्याचीच काय पण आईबापांचीही प्रतिष्ठा वाढते, हेंच या स्थितीचें बीज आहे.

स्त्रियांच्या संबंधानें तर हा प्रकार अधिक स्पष्ट रीतीनें दिसून येतो. पुरुषांपेक्षां स्त्रियांच्या पेहरावामध्यें थाटमाटाचा भाग खचितच जास्त असतो. अगदीं प्राचीनकाळीं स्त्री आणि पुरुष ह्यांचें नटण्याकडे लक्ष सारखेंच होतें असें ह्मटलें तरी चालेल. परंतु पूर्वीची अनाडी स्थिति आतां जसजशी जात चालली आहे तसतशी पुरुषांच्या पेहरावामध्यें बरीच सुधारणा होत चालली आहे. आतां पोषाख साधा असला तरी चालेल, सोयीवार टिकाऊ मात्र असावा असें त्यांना वाटूं लागलें आहे. विद्येच्या संबंधानेंही आतां उपयुक्त गोष्टींचें ज्ञान आधीं करून घेण्याकडे दिवसानुदिवस पुरुषांच्या मनाचा कल होत चालला आहे. परंतु स्त्रियांची इतकी सुधारणा झाली आहे असें दिसत नाहीं. त्यांच्या त्या कानांतल्या कित्येक प्रकारच्या बाळ्या, बोटांतल्या आंगठ्या, हातांतील कांकणें, गंगावनें वगैरे घालून केश नाना तऱ्हांनीं जखडून घातलेल्या त्या वेण्या, अजूनही कधीं कधीं तोंडास लाविलेला तो रंग, आणि एकंदर तो पेहरावाचा थाट ह्या सर्व गोष्टी मनांत आणिल्या ह्मणजे हल्लींही पोषाखाच्या संबंधानें सोय आणि सुख ह्यांपेक्षां नटण्याकडे स्त्रियांचा विशेष कल आहे असें दिसतें. आतां स्त्रियांच्या शिक्षणाच्या संबंधानें पाहिलें

तर आमच्याकडे अद्यापि स्त्रीशिक्षण बाल्यावस्थेतच आहे त्या अर्थी त्याबद्दल फारसें बोलतां येणार नाहीं. हल्लीं आमच्यामध्यें चालू असलेला स्त्रियांचा शिक्षणक्रम सामान्यतः असावा तसा आहे, असें म्हणतां येईल. तथापि प्रस्तुतचा ग्रंथ सामान्यतः मनुष्याच्या शिक्षणाविषयीं आहे. त्या अर्थी एकंदर स्त्रीजातीच्या शिक्षणाविषयीं विचार करणें इष्ट आहे. यास्तव जेथें स्त्रीशिक्षण बऱ्याच उच्च कोटीला जाऊन पोचलें आहे, अशा इंग्लंडांत स्त्रीशिक्षणाची हल्लींची स्थिति काय आहे हें पाहिलें पाहिजे. शिवाय विशेषेंकरून इंग्लंडांतीलच स्थिति पाहण्याचें दुसरें कारण असें आहे कीं, हल्लीं आमच्यामध्यें चाललेला स्त्रीशिक्षणक्रम कदाचित् इंग्लंडांतील स्त्रीशिक्षणक्रमाच्या धर्तीवर जाईल अशी कित्येकांस भीति आहे, आतां ही भीति साधार असो किंवा निराधार असो. भीति आहे त्या अर्थी इंग्लंडांतील स्त्रीशिक्षणक्रमाचा प्रकार काय आहे हें पाहणें इष्ट आहे. तो प्रकार येणेंप्रमाणेः—

इंग्लंडांत स्त्रियांच्या शिक्षणांत हजारों प्रकारच्या भानगडी आहेत; त्यांस गातां आलें पाहिजे, वाचतां आलें पाहिजे, वाजवितां आलें पाहिजे, चित्रें काढितां आलीं पाहिजेत, फार तर काय पण त्यांचें बोलणें चालणें सुद्धां टापटिपीचें असलें पाहिजे. आतां इतक्या गोष्टी शिकावयाच्या म्हटल्या म्हणजे त्यांत किती बरें वेळ जाईल? इंग्लंडांतील बायकांना इटालियन आणि जर्मन भाषा कशाला आल्या पाहिजेत? असा कोणी प्रश्न केला असतां कारणें द्यावयास लागलें तर पुष्कळ देतां येतील, परंतु खरें अंतस्थ कारण पाहूं गेलें म्हणजे हें आहे कीं, ह्या भाषांच्या ज्ञानाशिवाय प्रतिष्ठा होत नाहीं. ह्या भाषांत लिहिलेलीं पुस्तकें वाचून त्यांनीं कधीं फायदा करून घेतला आहे असें आढळत नाहीं. जर्मन आणि इटालियन गाणीं आपणांस चांगल्या रीतीनें म्हणतां यावीं आणि लोकांमध्यें आपली वाहवा व्हावी हाच त्यांचा मुख्य हेतु असतो. तसेंच इतिहासांतील राजांचा जन्म, लग्न, मरण इत्यादिकांचे सन इंग्लंडांत स्त्रिया शिकतात, तें कांहीं त्यापासून होणारा फायदा करून द्यावा म्हणून नव्हे, तर शिकलेल्या स्त्रीस ह्या गोष्टी आल्याच पाहिजेत, असें लोक समजतात म्हणून. त्यांस अशी भीति असते कीं ह्या गोष्टींचें ज्ञान आपणांस नसल्यास लोक आपणास तुच्छ मानतील. हल्लीं

इंग्लंडांत मुलींना जें कांहीं शिकवितात त्यांत संसारांत उपयोगीं पडणाऱ्या गोष्टी झटल्या झणजे काय त्या लिहिणें, वाचणें, व्याकरण, हिशेब व शिवणकाम इतक्याच आहेत. आणि यांपैकीं सुद्धां कांहींचा संबंध लौकिकाकडेच विशेष आहे असें झणतां येईल. ज्ञान प्रसारक ग्रंथालय, सातारा

पोषाख आणि विद्या या संबंधानें उपयोगापेक्षां शोभेकडेच मनुष्याचें लक्ष जास्त असतें; ही गोष्ट तिचें कारण समजल्यावर पूर्णपणें ध्यानांत येईल. तें कारण हें कीं, अतिप्राचीन काळापासून आजपर्यंत जगाची रहाटी पाहिली तर, ती अशी आहे कीं, नेहमीं मनुष्यमात्राच्या आत्मविषयक अपेक्षेकडे समाजविषयक अपेक्षेपेक्षां गौणत्व येत गेलें आहे. प्रत्येक मनुष्य केवळ आपणास जी गोष्ट इष्ट दिसते ती करण्यापेक्षां समाजास जी गोष्ट इष्ट दिसते ती करण्यास नेहमीं झटत असतो. त्यास सदासर्वकाळ असें वाटत असतें कीं लोकांमध्यें आपली प्रतिष्ठा वाढत जाऊन त्यांवर आपलें वर्चस्व असावें,व ह्याच उद्देशानें तदनुरूप आपलें वर्तन ठेवून तो त्यांस संतुष्ट करण्यास पाहत असतो. याप्रमाणें स्वतांचे कल एकीकडे ठेवून तो समाजाच्या कलांप्रमाणें वागून समाजास वश करीत असतो, झणजे अर्थात् एका प्रकारें समाजाच्या व्यक्तींचें संनियमन करण्याच्या उद्योगास तो एकसारखा लागलेला असतो. बहुतेक लोकांची अशी समजूत आहे कीं, वर लिहिल्याप्रमाणें व्यक्तिसंनियमन करणारें एक काय तें सरकार होय; मग तें सरकार झणजे एखादा राजा असेल, किंवा एखादी पार्लमेंटासारखी सभा असेल, किंवा योग्य रीतीनें नियुक्त असे कांहीं अधिकारी असतील. परंतु ही समजूत चुकीची आहे. वर लिहिलेलीं तर जगजाहीर सरकारें आहेतच. पण यांखेरीज लोक ज्यांस सरकार असें झणत नाहींत, अशीं अंतर्गत आणखीं कित्येक सरकारें आहेत; आणि तीं प्रत्येक कुटुंबांत, प्रत्येक समाजांत, व प्रत्येक मंडळींत आढळून येतात. साधेल तिथें आपणच स्वतंत्र सरकार होण्याविषयीं प्रत्येक पुरुषाचे आणि त्याचप्रमाणें प्रत्येक स्त्रीचे अव्याहत प्रयत्न सुरू आहेत; आणि अशा प्रकारचे राजे किंवा राण्या किंवा लहान सान संस्थानिक सर्व प्रकारच्या मंडळ्यांमध्यें असलेले आढळून येतात; आपलें दुसऱ्यांवर वर्चस्व असावें, आपणांस त्यांच्याकडून मान मिळावा,आपल्यापेक्षां वरिष्ठ असतील त्यांस आपण मान द्यावा, व त्यांची मर्जी सुप्रसन्न

राखावी वगैरे प्रकारच्या खटपटी सर्वत्र सुरू आहेत. व अशा प्रकारच्या खटपटी करण्यांतच आयुष्याचा पुष्कळ भाग जातो; द्रव्यसंचयानें, श्रीमंतीच्या थाटानें, व पोषाखाच्या भपक्यानें, तसेंच ज्ञानानें किंवा बुद्धि-प्रभावानें, प्रत्येक जण आपला पगडा दुसऱ्यावर बसवूं पहात असतो; आणि अशा प्रकारें समाजाची व्यवस्था यथास्थित राहण्यास जरूर अशी एक प्रकारची संनियमनपरंपरा सहजीं उत्पन्न होते. या सिद्धांताच्या समर्थनार्थ शेकडों उदाहरणें देतां येतील. रानटी लोक घ्या किंवा सुधारलेले लोक घ्या, स्त्रियांची स्थिति पहा किंवा पुरुषांची स्थिति पहा, आह्मीं वर दिलेलेंच तत्त्व जिकडे तिकडे आढळून येईल. रानटी लोकांचा नायक आपला लष्करी रंगित भव्य पोषाख घालतो; त्यांत तरी त्याचा उद्देश पाहिला तर हाताखालचे लोकांवर आपला दरारा बसविणें हाच असतो. नागरिक तरुण स्त्रिया चार चार घटका वेणीफणी करण्यांत आणि इतर प्रकारें नटण्यांत घालवितात, त्यांत तरी त्यांचा उद्देश पाहूं गेलें तर खरोखर एवढाच असतो कीं आपल्या नखऱ्यानें लोकांची मनें वेधून घेऊन तीं आपणाकडे आकर्षण करून घ्यावीं. हीं तर सर्वांच्या लक्षांत येण्यासारखीं ढळढळीत उदाहरणें आहेत. परंतु पंडित, शास्त्री, वैदिक, वेदांति, वगैरे महान् महान् विद्वानांची स्थिति पाहिली तरी अशीच आहे. तेही आपआपल्या ज्ञानाचा उपयोग वर लिहिलेल्या फलाच्या प्राप्तीसाठींच करीत असतात. आपणांस जें कांहीं ज्ञान प्राप्त झालें असेल, किंवा जें कांहीं कसब आपल्या अंगीं असेल, त्याचें आपण निमुटपणें उद्घाटन केलें झणजे पुरे आहे असें कोणासही वाटत नाहीं; तर आपल्या अंगच्या ज्ञानाची किंवा कसबाची छाप दुसऱ्यावर बसवावी याविषयीं प्रत्येकाची धडपड चाललेली असते. याप्रमाणें सर्व गोष्टींच्या संबंधानें सर्वांची स्थिति आहे. आणि असें आहे तर आमची शिक्षण पद्धतिही या स्थितीसच अनुसरून असावी यांत फारसें नवल नाहीं. कोणत्या ज्ञानाचा आपणांस खरा उपयोग आहे हें कधींही आपण पहात नाहीं. तर ज्या ज्ञानाच्या योगानें वाहवा होऊन लोकांमध्यें आपली मान-प्रतिष्ठा वाढेल तेंच ज्ञान मिळविण्यास आह्मी सतत झटत असतों. ज्याप्रमाणें संसारांत आपली खरी स्थिति काय आहे हें आह्मी पहात नाहीं, तर आपणांस लोक काय झणतील इकडेच आपलें लक्ष असतें, त्याचप्रमाणें शिकतांना ज्ञानाची खरी किंमत आपण पहात नाहीं, तर आपलें

सर्व लक्ष ह्या ज्ञानापासून लोकांवर काय परिणाम होईल इकडे असतें; आणि अशी जर आपली स्थिति आहे तर जे रानटी लोक केवळ शोभेकरितां आपले दांत तासून घेतात आणि नखें रंगवितात त्यांच्यामध्यें आणि आमच्यामध्यें फरक तो कोणता ?

आमच्यामधील शिक्षणक्रम अद्यापि अगदीं बाल्यावस्थेंत आहे व त्यांत अद्यापि पुष्कळ सुधारणा पाहिजे आहे, या गोष्टीस पुरावा पाहिजे असल्यास फार लांब जावयास नको. कोणत्या ज्ञानाची योग्यता अधिक, कोणत्या ज्ञानाची कमी, या विषयीं आमच्यामध्यें अद्यापि नुसती चर्चा ही झालेली नाहीं; मग पद्धतवार विवेचन होऊन सिद्धांत ठरण्याची तर वार्ता नकोच. या ज्ञानाची योग्यता अधिक, त्या ज्ञानाची कमी हा निर्णय कोणत्या गोष्टीच्या संबंधानें करावयाचा हें अजून सर्वानुमतें मुळींच ठरलेलें नाहीं; ह्मणजे निरनिराळ्या प्रकारच्या ज्ञानांच्या अन्यसापेक्षयोग्यतेचें प्रमाण सर्वानुमतें अमुक एक असें अजून ठरलेलें नाहीं इतकेंच नव्हे तर असें एखादें निर्विवाद प्रमाण मिळणें शक्य आहे इतकेंही लोकांस अजून वाटूं लागलें नाहीं. फार तर काय पण असें एखादें प्रमाण असणें जरूर आहे असेंही लोकांस अद्यापि भासलेलें नाहीं. या विषयावर पुस्तकें वाचावयाचीं, त्या विषयावर व्याख्यान असलें ह्मणजे नाहींच चुकवावयाचें, आपले मुलांस अमुक विषय शिकवावयाचे, अमुक शिकवावयाचे नाहींत असा निश्चय लोक नेहमीं करीत असतात. परंतु हें सर्व लोकरीति, स्वतांची आवड, किंवा मनाचा एक प्रकारचा कल यांसच केवळ अनुसरून असतें. कोणतें ज्ञान खरोखर अत्यंत उपयोगाचें आहे हें सारासार विचार करून ठरविणें किती अगत्याचें आहे याची कोणासही कल्पना नाहीं. आतां लोक एके जागीं बसले आणि गोष्टींवरून गोष्टी निघाल्या ह्मणजे अमुक ज्ञानापासून असे फायदे आहेत, अमुक ज्ञानापासून असे तोटे आहेत असें कधीं कधीं त्यांच्या बोलण्यांत येतें. परंतु कोणतेंही ज्ञान संपादन करण्यामध्यें जो वेळ आपण घालवितों त्या वेळाच्या मानानें तें ज्ञान महत्वाचें आहे किंवा कसें, अथवा तोच वेळ दुसरा एखादा विषय शिकण्यामध्यें घातला तर फायदा होईल कीं नाहीं, हें प्रश्न कधींही कोणी काढीत नाहीं; आणि काढलेच तर त्यांचा निकाल थोडक्यांत स्वतांच्या

कलाप्रमाणें ताबडतोब उडवून देतात. आतां नाहीं म्हणावें तर संस्कृत लॅटीन वगैरे पुरातन भाषा आणि गणितशास्त्र यांची अन्यसापेक्षयोग्यता पूर्वापार वादग्रस्त आहे व त्याचसंबंधानें पुनःपुनः वादविवाद सुरू होऊन कधीं कधीं चर्चा चालते. परंतु ती बहुतकरून स्थूल व ठोकळ मानानें चालते; या दोन विषयांच्या अन्यसापेक्षयोग्यतेचें एखादें प्रमाण निश्चित करून त्यावरून कधींही चालत नाहीं. शिवाय हा वादविवाद केवळ एकदेशीय होय, आणि म्हणून त्यास तितकें महत्त्वही नाहीं. आपणांस जो विचार करणें आहे तो एक किंवा दोन विषयांच्या संबंधानें नाहीं तर सर्व विषयांच्या व सर्व प्रकारच्या ज्ञानांच्या संबंधानें आहे. एकंदर अन्नाच्या पौष्टिकपणाविषयीं विचार करणें असल्यास बटाट्यांपेक्षां चपातींत अधिक सत्व आहे एवढें समजल्यानें आपलें सर्व काम झालें असें कोणीही कबूल करणार नाहीं.

आमच्यामतें अमुक ज्ञानाचा उपयोग अमुक आहे एवढेंच समजण्यांत कांहीं अर्थ नाहीं. प्रत्येक ज्ञानाची इतर ज्ञानाच्या संबंधानें कमजास्त योग्यता आपणांस कळणें अगदीं अवश्य आहे. जें ज्ञान आपण साध्य करितों त्यापासून आपणांस अमुक फायदे आहेत इतकें सांगितलें म्हणजे तें ज्ञान संपादन करण्यासाठीं खर्च केलेला वेळ आणि श्रम सार्थकीं लागले असें लोक समजतात, परंतु त्यांच्या ध्यानांत ही गोष्ट येत नाहीं कीं, दुसरें एखादें ज्ञान संपादन करण्यामध्यें जर तितकाच वेळ घातला असता, किंवा तितकेच श्रम केले असते, तर त्यापासून कदाचित् आपणांस जास्त फायदा करून घेतां आला असता. जो जो विषय आपण शिकतों त्या त्या विषयापासून कांहींना कांहीं तरी उपयोग असणारच. जुन्या काळच्या सनदा, वंशावळी वगैरे लेख, जुनीं नाणीं ह्यांचा शोध करून त्यांविषयीं माहिती मिळविण्याच्या खटपटीस लागलों तर प्राचीन काळच्या लोकांच्या रीतीभातीविषयीं आपणांस थोडीबहुत जास्त माहिती मिळेल. हिंदुस्थान देशांतील सर्व शहरांचीं अंतरें जो शिकला असेल त्याला आपल्या माहितीचा कधीं कधीं प्रवास करितांना अल्प स्वल्प उपयोग होईल. मुलुखांमध्यें घरोघर चाललेल्या बारीक सारीक गोष्टींची माहिती मिळविणें जरी खरोखर निरर्थक आहे तरी तिचाही एखादा सिद्धांत काढण्याच्या कामीं उपयोग होईल. एका पिढीचे गुण

दुसऱ्या पिढींत येतात, दुसरीचे तिसऱ्या पिढींत येतात, हें जें एक परंपरागतगुणदोषाद्यवतरणाचें तत्व आहे, ह्या तत्वाचें उदाहरण देतांना वरील माहितीचा कदाचित् उपयोग होईल. तथापि वरील प्रकारची माहिती मिळविण्याकरितां केलेल्या श्रमाच्या मानानें तिजपासून फलप्राप्ति नाहीं, हें कोणीही कबूल करील. दुसरें जास्त महत्वाचे विषय शिकण्यामध्यें मुलगा जो वेळ घालविणार, तोच वेळ अशा प्रकारची क्षुल्लक माहिती मिळविण्याकडे त्यानें घालवावा, असें जर कोणीं सांगितलें, तर ही गोष्ट कोणी ऐकणार सुद्धां नाहीं. ह्यावरून कांहीं कांहीं गोष्टी शिकतांना ज्ञानाची कमजास्ती योग्यता आह्मी मनांत आणितों असें सिद्ध होतें. असें आहे तर, हाच क्रम प्रत्येक विषयाचा अभ्यास करितांना आपण ठेविला पाहिजे. सर्व विषयांचें पूर्ण ज्ञान मिळविण्यास आपणांस वेळ असता तर गोष्ट निराळी. परंतु रात्र थोडी आणि सोंगें फार अशा प्रकारची आपली जगांतील स्थिति आहे. आधींच आपलें आयुष्य टींचभर आणि त्यांत आपणांस हजारों धंदे करावयाचे असतात. केवळ विद्याभ्यासाच्या वांटणीस पाहूं गेलें तर फारच थोडा वेळ येतो. तर त्या वेळामध्यें आपण होईल तितका फायदा करून घेतला पाहिजे; ह्मणजे लौकिक किंवा स्वतःचा कल ह्यांकडे तिळमात्र लक्ष न देतां, प्रत्येक विषयाची योग्यता मनांत आणून ज्यापासून आपलें विशेष हित आहे तोच विषय आपण हातीं धरिला पाहिजे. ह्यास्तव कोणता विषय शिकला पाहिजे, हें ठरविणें शिक्षणाच्या संबंधानें विशेष महत्वाचें होय; व हें ठरविण्याकरितां अत्यंत अगत्याचा विषय कोणता, हें आपणांस प्रथम पाहिलें पाहिजे, ह्मणजे प्रसिद्ध लार्ड बेकन ह्मणत असे, त्याप्रमाणें सर्व ज्ञानांची अन्यसापेक्षयोग्यता ठरविली पाहिजे.

विशेष अगत्याचे विषय कोणते, हें समजण्याकरितां निरनिराळे विषय ताडून त्यांची कमजास्त योग्यता ठरविण्यासाठीं कांहीं तरी योग्यतेचें प्रमाण (माप) अवश्य आहे; आणि ह्या संबंधानें एवढें बरें आहे कीं, असें वास्तविक प्रमाण कोणतें, हें साधारण स्थूल मानानें ठरलेलें आहे, व त्याबद्दल वाद पडण्याचा संभव नाहीं. आपण कोणत्याही ज्ञानाची योग्यता ठरविणें झाल्यास, लोकांस व्यवहारामध्यें त्या ज्ञानाचा अमुक प्रसंगीं असा उपयोग आहे, हेंच दाखवून ठरवितों. गणिती, भाषाभिज्ञ, पदार्थविज्ञानवेत्ते, वेदान्ती,

वगैरे विद्वानांस तुमच्या ज्ञानाचा उपयोग काय असें विचारिलें असतां, त्यापासून अमुक नडी टाळतां येतात, अमुक प्रकारें आपलें हित करून घेतां येतें, व एकंदरीस या प्रकारें त्यापासून व्यवहारामध्यें सुखप्राप्ति आहे, हेंच उत्तर ते आपणांस देणार. लेखनविद्या शिकविणारानें एकंदर धंद्यांमध्यें अक्षराचा किती उपयोग आहे व त्याची आपणांस पोट भरण्याच्या कामीं केवढी मदत आहे, सारांश जन्माचें सार्थक ह्मणून ज्याला आपण ह्मणतों, तें करण्याच्या कामीं लेखनविद्या आपणांस किती उपयोगीं पडते, हें त्यानें दाखविलें ह्मणजे लेखनविद्येची योग्यता त्यानें सिद्ध केली असें आह्मी समजतों. जुने लेख, जुनीं नाणीं, वगैरे पुरातन गोष्टींचा शोध करणाऱ्या विद्वानास आपल्या ज्ञानापासून जगामध्यें कांहीं ह्मणण्यासारखा फायदा आहे असें दाखवितां आलें नाहीं, ह्मणजे अशा प्रकारच्या ज्ञानाची योग्यता फारशी नाहीं हें त्यालाच कबूल करावें लागतें. ह्याप्रमाणें सर्व लोक कोणत्याही ज्ञानाची योग्यता ठरवितांना प्रत्यक्ष रीतीनें किंवा कांहीं पर्यायानें वरील कसोटीचाच उपयोग करितात असें सिद्ध होतें.

ह्या जगामध्यें आपण काय केलें ह्मणजे खरोखर जगलों असें होईल, हीच गोष्ट अत्यंत महत्वाची आहे, व ती आपणास प्रथम समजून घेतली पाहिजे. खरोखर जगणें ह्याचा अर्थ आपण बसावें कसें, उठावें कसें, किंवा आपलें प्राणरक्षण करावें कसें, एवढाच ध्यावयाचा नाहीं; तर त्याचा अर्थ अत्यंत व्यापकतेनें घेतला पाहिजे. आणि एकदां या अत्यंत व्यापक प्रश्नाचा निर्णय झाला, ह्मणजे त्यांत बाकी सर्व एकदेशीय विशेष प्रश्नांचा निर्णय झालाच पाहिजे. आपलें शरीर व मन ह्यांची व्यवस्था कशी ठेवावी; मुलाबाळांचें संगोपन कसें करावें; आपल्या कामकाजाचा बंदोबस्त कसा ठेवावा; सार्वजनिक कामामध्यें आपलें वर्तन कसें ठेवावें; जगांत सुखाचीं साधनें ह्मणून जीं काय आहेत त्यांचा सुखसंपादनाचे कामीं उपयोग कसा करावा; आणि आपल्या शारीरिक व मानसिक वगैरे सर्व शक्तींपासून आपणांस व इतरांस होईल तितका फायदा कसा करून घ्यावा; ह्मणजे एकंदरीस ह्या जगांतील आपली कामगिरी आपण बजावली असें होण्यास आपलें वर्तन कसें असलें पाहिजे; सारांश आयुष्याची सार्थकता होण्यास कसें वागलें पाहिजे; हाच अत्यंत व्यापक व अ-

त्यंत महत्वाचा प्रश्न होय, व हीच गोष्ट कळणें अत्यंत आवश्यक आहे. आतां ज्याअर्थी ही गोष्ट कळणें अत्यंत आवश्यक आहे, त्याअर्थी आमचें शिक्षणही त्यामध्यें ही गोष्ट अवश्य कळेल अशाच प्रकारचें असलें पाहिजे. आयुष्याची सार्थकता होण्यास ज्या प्रकारचें आपलें वर्तन पाहिजे, तशा प्रकारचें वर्तन ठेवण्याची योग्यता आपल्या अंगीं आणून देणें, हेंच आपल्या शिक्षणाचें मुख्य काम होय. आणि ज्या शिक्षणपद्धतीच्या योगानें हें काम पूर्ण साधेल तीच शिक्षणपद्धति सर्वांत उत्तम होय.

ज्ञानाची योग्यता जाणण्याची कसोटी कोणती, हें आतां आम्हीं वर सांगितलें. या कसोटीचा उपयोग अद्यापि कोणींही पूर्णपणें केलेला नाहीं; कोणीं अर्धवट रीतीनें कधीं केला असलाच तर असेल; परंतु कदाचित् केला असलाच, तर खरी कसोटी ती हीच असें समजून बुद्धिपुरःसर केला असेल असें नाहीं. आतां आमचें मुख्य म्हणणें आहे, तें हें कीं, कोणत्याही ज्ञानाची योग्यता ठरविणें झाल्यास याच कसोटीचा उपयोग केला पाहिजे आणि तोही नेहमीं बुद्धिपुरःसर व नियमितपणानें केला पाहिजे. आयुष्याची सार्थकता हा उद्देश मनामध्यें नेहमीं जागृत ठेविला पाहिजे. मुलांना कोणते विषय शिकवावयाचे व ते कसे शिकवावयाचे, ह्याचा विचार करितांना या वरील उद्देशाच्या सिद्धीस ते कितपत अनुकूल किंवा प्रतिकूल होतील हेंच पाहिलें पाहिजे.

सांप्रत चालू असलेली शिक्षणपद्धति, आज ती प्रचारांत आहे इतक्यावरच ग्रहण करणारी मंडळी पुष्कळ आहे. ती बरी आहे किंवा वाईट आहे, या विचारानें ते आपल्या डोक्याला कधींही तसदी देत नाहींत. दुसरी एखादी पद्धति प्रचारांत असती, तर ती ही ते तितक्याच खुषीनें ग्रहण करिते. ही या मंडळीची अंधपरंपरेची तऱ्हा तर सर्वांशीं असमंजसपणाची व अग्राह्य होय. परंतु यांच्यापेक्षां जरा जास्त बुद्धीचे कांहीं लोक आहेत, ते आपल्या मुलांच्या शिक्षणाविषयीं कांहीं काळजी घेतात व त्याबद्दल कांहीं विचारही करितात, पण त्यांची विचारसरणि केवळ स्थूल मानाची असते; सरासरी चार गोष्टी वरवर पाहून त्यांवरून आपले सिद्धांत हे लोक ठरवितात; वास्तव या लोकांची ही विचारसरणि ग्राह्य नाहीं. अमुक ज्ञानाचा व्यवहारांत उपयोग होईल, किंवा अमुक एक ज्ञान दुसऱ्या एखाद्या ज्ञानापेक्षां सं-

सारांत जास्त फायदेशीर होईल, इतकें नुसतें मनाला वाटून उपयोगी नाहीं; तर अशी एखादी विचारसरणि काढली पाहिजे कीं, जिच्या योगानें निरनिराळ्या प्रकारच्या ज्ञानांची अन्यसापेक्षयोग्यता आपणांस ठरवितां येईल व सर्वांत कोणत्या ज्ञानाकडे आपण विशेष लक्ष दिलें पाहिजे हें आपणांस खात्रीनें सांगतां येईल.

हें काम पाहूं गेलें तर फारच कठीण आहे, आणि तें करावयास गेलें तर कधींच पूर्णपणें साधणार नाहीं. परंतु तें ज्याकरितां करावयाचें, तें आपणांस किती महत्वाचें आहे हें मनांत आणिलें ह्मणजे काम कठीण आहे ह्मणून हातपाय गाळून आपणांस उगीच बसतां येत नाहीं. तशाच प्रकारची कडेकोट तयारी करून तें करण्यास एकदम लागलें पाहिजे. तशांत मुख्य गोष्ट ही आहे कीं, जर आपण पद्धतवार विचार करीत गेलों, तर आपलें काम बरेंच होईल.

प्रथमतः आयुष्यामध्यें आपण जे कांहीं व्यवसाय करितों, त्या सर्वांचें महत्वाच्या मानानें वर्गीकरण केलें पाहिजे; ते वर्ग सहजीं असे होतात; (१) प्रत्यक्ष प्राणरक्षणार्थ होत असलेले (२) निर्वाहाकरितां ज्या गोष्टींची जरूर, त्या मिळविण्याठीं होत असलेले, ह्मणजे अप्रत्यक्षरीतीनें प्राणरक्षणार्थ होत असलेले. (३) मुलांचें पालन, पोषण, शिक्षण, वगैरे बाबतींत होत असलेले. (४) सामाजिक आणि राजकीय व्यवस्थेसाठीं होत असलेले. (५) मनोवृत्ति उल्हासित व आनंदित करण्यासाठीं फुरसुतीच्यावेळीं होत असलेले.

ह्याप्रमाणें आपल्या आयुष्यांतील सर्व व्यवसायांचे मुख्य पांच वर्ग करितां येतात. ते ज्या अनुक्रमानें दिले आहेत, तो अनुक्रम त्यांच्या महत्वाच्या मानानें यथार्थ आहे, हें सहज ध्यानांत येण्यासारखें आहे; त्याविषयीं विशेष विचार करण्याची गरज नाहीं. आपण आपल्या जिवाला किती जपतों व त्याच्या संरक्षणार्थ काय व्यवस्था करितों हें मनांत आणिलें, ह्मणजे हे व्यवसाय पहिल्याच वर्गांत आले पाहिजेत हें उघड आहे. असा एखादा जर मनुष्य असेल कीं, तो एरवीं चांगला विद्वान्, पण नेहमींच्या पाहण्यांतल्या पदार्थांविषयीं एखाद्या लहान मुलाप्रमाणें अनभिज्ञ, ह्मणजे त्यांपासून कोणते अपाय होण्याचा संभव आहे व ते आपणांस कसे टाळतां येतील हें त्याला अगदीं समजत नाहीं; तर तो मनुष्य घरा-

च्या बाहेर पडला कीं, बहुतकरून लागलीच त्याच्या जिवावर पाळी यावयाची. रस्त्यामध्यें एखादी भरधांव गाडी आली कीं त्याची इतर विद्वत्ता बाजूला राहील, आणि गाडीचा रस्ता सोडून जरा दूर व्हावें, एवढीसुद्धां साधी गोष्ट माहीत नसल्यामुळें तिच्याखालीं सांपडून तो मरेल. ह्यावरून पहातां हें उघड होतें कीं, इतर विद्वत्तेचा सर्वथैव अभाव जितका अपायकारक होईल, त्यापेक्षां प्राणरक्षणसंबंधीं ज्ञानाचा सर्वथैव अभाव जास्त अपायकारक होईल. आणि असें आहे म्हणूनच अशा प्रकारच्या ज्ञानाची योग्यता आम्ही पहिल्या प्रतीची समजतों.

प्राणरक्षणानंतर निर्वाहाकडे पाहिलें पाहिजे; कारण निर्वाहाचा प्राणरक्षणाशीं अगदीं निकट संबंध आहे. मुलांचें पालनपोषण कसें करावें वगैरे गोष्टींचा विचार स्वतांच्या निर्वाहाच्या विचारानंतरचाच होय; कारण मुलेंबाळें होऊन त्यांचें पालन पोषण करणें म्हणजे लग्नानंतरच्या गोष्टी होत; आणि आपला निर्वाह चालवून बायकोचें पोट भरण्याचें सामर्थ्य असल्याशिवाय पुरुष लग्नासच योग्य नाहीं. म्हणून कुटुंब पोषणाचें ज्ञान मागाहून आलें तरी चालेल; म्हणजे स्वतांच्या निर्वाहाच्या गोष्टींचें ज्ञान आमच्या वरील वर्गातील दुसऱ्या वर्गातच आलें पाहिजे.

मुलेंबाळें वगैरे कुटुंब पोसण्याचें ज्ञान ह्यानंतर यावयाचें; व तें सामाजिक आणि राजकीय गोष्टींच्या ज्ञानाच्या आधींच आलें पाहिजे. यांचें कारण असें आहे कीं, राष्ट्राची कल्पना कुटुंबाच्या कल्पनेनंतरची आहे. राष्ट्र असो किंवा नसो, त्या शिवाय कुटुंबाचें काम चालवितां येईल. परंतु कुटुंबें नसतील तर राष्ट्र असण्याचा संभवच नाहीं. ह्यावरून असें दिसतें कीं, राजकीय गोष्टींचें ज्ञान मिळविण्यापूर्वी आपणांस कुटुंबपोषणाचें ज्ञान मिळविलें पाहिजे;आणखी असें आहे कीं,एकंदर समाज चांगला असणें हें त्यांतील निरनिराळ्या व्यक्तींच्या चांगुलपणावर अवलंबून आहे. आणि मनुष्यास चांगुलपणाचें वळण जसें लहानपणीं लावतां येईल तसें कधींही लावतां येणार नाहीं. असें आहे तर कुटुंबाचा म्हणजे मुलांचा चांगुलपणा हा समाजाच्या चांगुलपणाचा पाया होय. सारांश मुलांचें पालनपोषण, विद्या वगैरेकडेच सामाजिक आणि राजकीय गोष्टींपेक्षां आधीं लक्ष दिलें पाहिजे असें सिद्ध होतें. आणि म्हणूनच आम्हीं वर

केलेल्या वर्गीकरणामध्यें या दोन प्रकारच्या व्यवसायांस अनुक्रमें जी तिसरी आणि चौथी जागा दिली आहे ती अगदीं बरोबर आहे.

महत्वाचीं कामें होऊन, राहिल्या वेळांत निरनिराळ्या प्रकारच्या मनोरंजनाचे व्यवसाय होत असतात. गाणें, बजावणें, कविता, चित्रें इत्यादि संबंधीं जे व्यवसाय ते मनोरंजनाचे व्यवसाय होत. मनोरंजनाचे हे प्रकार म्हणजे निरनिराळ्या कला होत. या कलांचा विकास समाज बनल्याशिवाय होणें नाहीं, आणि त्यांतही विशेषेंकरून समाज बनून बरेच दिवस झाले पाहिजेत. शिवाय, समाज असल्याशिवाय या कलांना अगोदर विषयच मिळावयाचे नाहींत. उदाहरणार्थ एक कविताच घ्या. रामायणभारतादिकांपासून तों अनंतफंदी किंवा जोशीबुवांच्या लावण्यांपर्यंत पाहिलें, तरी या निरनिराळ्या काव्यांत जे विषय वर्णन केलेले आहेत, त्यांचें अस्तित्व केवळ समाजावर अवलंबून आहे. रामसुग्रीवादिकांचा समागम व त्यानंतर झालेलें, केवळ त्यामुळेंच शक्य, असें रामरावणयुद्ध, हें समाज नसता, तर घडूनच आलें नसतें, व मग रामायणाला जागाच नाहीं. हस्तिनापूरचें राज्य हें समाजावर अवलंबून, हस्तिनापूरच्या राज्यामुळें कौरवपांडवांचें वैर, व त्यामुळें भारत–सारांश समाज नसता तर भारत उत्पन्नच झालें नसतें. समाज नसता तर पेशवाई झाली नसती, आणि पेशवाई नसती तर श्रीमंतांवरील पवाडे ऐकूं आले नसते. शृंगारविषयक पद्यें समाज नाहीं तर उत्पन्न व्हावयाचीं नाहींत. शिवाय कवितेचा विकासही समाजाच्या उदयाशिवाय व्हावयाचा नाहीं. आज काव्याचे जे निरनिराळे भेद आहेत, ते एकाच कालीं उत्पन्न झालेले नाहींत; क्रमाक्रमानें समाजाच्या भिन्नभिन्न रचींस अनुसरून निरनिराळ्या काळीं झालेले आहेत. सारांश कवितेचा उत्कर्ष आणि प्रतिपाद्यविषय या दोहोंसही समाजाची आवश्यकता आहे. याचप्रमाणें बाकींच्या कलांचा प्रकार आहे. यास्तव हें उघड आहे कीं, मनोरंजनाच्या गोष्टींचा उत्कर्ष होण्यास, पूर्वी समाजाचा उत्कर्ष झाला पाहिजे. म्हणजे अर्थात् सामाजिक गोष्टींसंबंधी व्यवसाय मनोरंजनाच्या व्यवसायांपेक्षां विशेष महत्वाचे होत, आणि असें आहे तर पहिल्या व्यवसायांबद्दलची तयारीही दुसऱ्या व्यवसायांबद्दलच्या तयारीच्या पूर्वीच झाली पाहिजे.

याप्रमाणें आयुष्यांतील एकंदर व्यवसायांचे पांच वर्ग करितां येतात,

व महत्वाच्या मानानें त्यांचा अनुक्रमही याप्रमाणेंच ठरतो. आतां आमचें शिक्षण या अनुक्रमास अनुसरूनच असलें पाहिजे, ह्मणजे आपल्या शिक्षणाचेही असेच पांच भाग होतात. ते भाग येणेंप्रमाणें:- (१) प्रत्यक्ष आत्मरक्षणविषयक शिक्षण, (२) अप्रत्यक्ष आत्मरक्षण-विषयक शिक्षण, (३) पितृधर्मविषयक शिक्षण, (४) समाजविषयक शिक्षण, आणि (५) मनोरंजनविषयक शिक्षण.

आतां हे वर दिलेले व्यवसायांचे वर्ग अगदीं शास्त्रीयरीत्या बरोबर आहेत असें नाहीं; एका वर्गांतील व्यवसाय दुसऱ्या कोणत्याही वर्गांत पडणार नाहींतच असें आमचें ह्मणणें नाहीं. त्यांमध्यें परस्पर इतका संकर आहे कीं, आपण कोणत्याही एका वर्गांतील व्यवसायांचे संबंधीं ज्ञान शिकलों, तरी त्यांत इतर सर्व वर्गांतील व्यावसायांसंबंधीं ज्ञान आप-णांस थोडें बहुत मिळेलच. वर वर्गांचा अनुक्रम दिला आहे तो मह-त्वाच्या मानानें आहे, हें वर सांगितलेंच आहे. तथापि कधीं कधीं असें आढळून येईल कीं, मागाहून आलेल्या वर्गांतील कांहीं गोष्टी, आधीं आलेल्या वर्गांतील कांहीं गोष्टींपेक्षां अधीक महत्वाच्या आहेत. असें पहा कीं, एक मनुष्य पैसे मिळविण्याच्या कामामध्यें चांगला हुषार आहे, परंतु त्याला इतर प्रकारचें कांहीं धोरण नाहीं; तसाच दुसरा एक मनुष्य असा आहे कीं, तो पैसा मिळविण्याच्या कामांत साधारण हुषार आहे, परंतु मुलांचें संगोपन वगैरे करण्याचे कामीं त्याच्या आंगीं चांगली कुशलता आहे. आतां द्रव्यसंपादन जरी आमच्या वरील अनुक्रमान्वयें मुलांच्या संगोपनापेक्षां जास्त महत्वाचें आहे, तरी एकंदरीनें पाहतां दुसऱ्या मनुष्याचीच योग्यता जास्त ठरेल. त्याचप्रमाणें सामाजिक गो-ष्टींमध्यें जो मनुष्य अतिशय वाकबगार, परंतु जो मनोरंजनाच्या कलां-मध्यें ढ, त्या मनुष्याची योग्यता दोहोंमध्यें ज्याची थोडथोडी गति आहे, अशा मनुष्यापेक्षां कमी असें आह्मी ह्मणूं. सारांश निरनिराळ्या मनुष्यांची योग्यता ठरवितांना अशा प्रकारच्या अपवादांचा विचार केलाच पाहिजे. तथापि स्थूलमानानें पाहिलें असतां, व्यवसायांचे वर दिलेले पांच वर्ग बरोबर आहेत असें ह्मणावें लागेल; आणि त्याचप्रमाणें त्यांचा अनुक्र-मही निर्विवाद आहे, असें कबूल करावें लागेल. कारण ज्या गोष्टींच्या संबंधानें हे व्यवसाय आहेत त्या गोष्टी जगांत याच अनुक्रमानें शक्य

आहेत, हें कसें हें वर दाखविलेंच आहे; आतां सर्वोत्कृष्ट शिक्षण म्हणजे ह्या सर्व व्यवसायांचे संबंधानें पूर्ण तयारी हें होय. आतां ह्यांची आमची स्थिति पाहिली तर अशा प्रकारचें सर्वोत्कृष्ट शिक्षण आपणांस मिळणें शक्य नाहीं. यास्तव सर्व व्यवसायांची, त्यांचें त्यांचें महत्व लक्षांत आणून, योग्य प्रमाणानें तयारी करणें, हेंच आपलें मुख्य कर्तव्य होय. एकाच प्रकारच्या व्यवसायांकडे लक्ष देऊन चालावयाचें नाहीं. कदाचित् ते व्यवसाय अत्यंत महत्वाचेही असतील तरी केवळ त्यांजकडेच सर्व लक्ष देणें ग्राह्य होणार नाहीं. त्याचप्रमाणें दोन तीन किंवा चार प्रकारच्या व्यवसायांकडेच लक्ष दिलें, तरी कांहीं उपयोग नाहीं. सर्व प्रकारच्या व्यवसायांकडे लक्ष ठेविलें पाहिजे आणि तें त्यांच्या त्यांच्या महत्वाच्या मानानें ठेविलें पाहिजे. याप्रमाणें सर्व व्यवसायांची योग्य प्रमाणानें तयारी झाली, व ते व्यवसाय योग्य प्रमाणानें आपण करीत गेलों, म्हणजे आपण आपल्या आयुष्याचें सार्थक केलें असें होईल. आतां आमच्या वर दिलेल्या अनुक्रमाच्या संबंधानें कोणी अशी शंका काढील कीं, आमच्या वर्गीकरणाप्रमाणें जो व्यवसाय तिसऱ्या चवथ्या किंवा पांचव्या वर्गांत पडतो, त्या व्यवसायांत जर एखाद्याची जात्याच बुद्धि विशेष चालत असेल, तर त्यानें त्या व्यवसायाचें ज्ञान संपादनकरण्याकडे विशेष लक्ष ठेवूं नये कीं काय आणि त्या व्यवसायाच्या संबंधानें जात्याच असलेल्या बुद्धीचे अंकूर खुरटूं द्यावे कीं काय ?

उदाहरणार्थ गाणें. एखाद्याचा उपजतच विशेष कल गाण्याकडे असेल व स्वाभाविक त्याला गाणें लवकर साधत असेल, तर त्या मनुष्यानें या कलेचा विकास करण्याकडे विशेष लक्ष कां देऊं नये ? यावर आमचें असें उत्तर आहे कीं, या शंकेनें आह्मीं जें वर म्हटलें आहे त्यास बाध येणार नाहीं. जर एखाद्याला गाणेंच उत्तम रीतीनें साधेल, तर त्यानें तो आपल्या उदरनिर्वाहाचाच धंदा करावा. आणि त्या संबंधानें खुशाल लागेल तितकी मेहनत करावी. कारण त्या मनुष्याच्या संबंधानें गायनाचे व्यवसाय अप्रत्यक्ष आत्मरक्षणविषयक व्यवसायच होतील. आणि असें झालें म्हणजे त्या संबंधानें पाहिजे तितके परिश्रम करण्याची त्याला मोकळीक झाली.

आतां याप्रमाणें शिक्षणाची व्यवस्था ठेवतांना आणखी कांहीं गोष्टी

वाचनालय, सातारा.

आहेत त्याही मनांत नेहमीं बागविल्या पाहिजेत. ज्ञान दोन प्रकारचें आहे. एक नित्य, दुसरें अनित्य. अनित्य ज्ञानाचेही दोन भेद आहेत. एक नित्यप्राय व दुसरा लौकिक. ज्या ज्ञानाचा उपयोग आज आहे, दहा हजार वर्षांपूर्वी होता, व दहा हजार वर्षांनंतरही होईल, ज्याचा उपयोग एशिया, युरोप, आफ्रिका, व अमेरिका ह्या चारही खंडांत आहे, जें देश-कालांतरानें अविकार्य आहे, आणि ज्याचा उपयोग सार्वकालिक आणि सार्वत्रिक आहे, तें ज्ञान नित्य होय. ज्या ज्ञानाचा उपयोग विशिष्ट लोकांस विशिष्ट स्थितींतच असतो, ह्मणजे ती विशिष्ट स्थिति आहे तों पर्यंतच असतो, अर्थात् ज्याचा उपयोग विशिष्ट लोकांस विशिष्ट काल-पर्यंतच असतो, सारांश ज्याचा उपयोग सार्वकालिक आणि सार्वत्रिक नसून, स्थलकाललोकादिसंबंधानें एकदेशीय असतो, परंतु नियमित पण बऱ्याच कालापर्यंत असतो, तें ज्ञान नित्यप्राय होय. आणि ज्या ज्ञानाचा उपयोग सार्वकालिक आणि सार्वत्रिक तर नाहींच, परंतु केवळ कांहीं लोकांस असून, आज आहे उद्यां नाहीं अशा तऱ्हेचा असतो; सारांश ज्या ज्ञानाचा उपयोग लोकाचार व लोकरूढि यांवर अवलंबून असून लोकांच्या रुचिभेदानें प्रतिक्षणीं विकार्य असतो, तें ज्ञान लौकिक होय. शरीर बधिर होणें व शरीराच्या आंत एक प्रकारचा कंप सुटणें, किंवा लचक मारणें, हीं अर्धांगवायूचीं किंवा पक्षघाताचीं लक्षणें होत. पाण्यांतून एखादा पदार्थ जात असतां तो ज्या वेगानें जात असेल, त्या वेगाच्या वर्गाच्या प्रमाणानें त्यास पाण्याचा प्रतिबंध होतो. क्लोराइन द्रव्यापासून स्पर्शजन्य रोग नाहींसा होतो. ह्या आणि सामान्यतः सर्व शास्त्रीय गोष्टी अशा आहेत कीं, त्यांचा उपयोग कोणत्याही कालीं व कोणत्याही देशांत व्हावयाचा; ह्मणजे या गोष्टींचें ज्ञान अविकार्य, सार्वकालिक, आणि सार्वत्रिक असें आहे; अर्थात् हें ज्ञान नित्यज्ञान होय. गीर्वाण भाषा अवगत झाल्यानें मराठी भाषेचें जें विशेष ज्ञान होईल त्याचा उपयोग काय तो मराठी भाषा बोलणाऱ्यांना; आणि फार झालें तर संस्कृतापासून उत्पन्न झालेल्या इतर भाषा बोलणाऱ्यांना; शिवाय जोंपर्यंत त्या भाषा चालू आहेत तों पर्यंतच या ज्ञानाचा उपयोग. सारांश हें ज्ञान सार्वकालिक व सार्वत्रिक नसून एक-देशीय आहे, परंतु पुष्कळ काळपर्यंत याचा उपयोग होण्याचा संभव

आहे. म्हणून हें नित्यप्रायज्ञान होय. आतां लौकिक ज्ञानाचें उदाहरण पाहूं. आमच्या शाळांत हल्लीं इतिहास म्हणून जें शिकवितात, तें याचें उत्तम उदाहरण आहे. ज्याला हल्लीं शाळांत इतिहास म्हणतात, तें राजादिकांचीं नांवें, सन, शक, व अशाच दुसऱ्या शुष्क व निरर्थक गोष्टींचें चऱ्हाट असतें. या चऱ्हाटाचा उपयोग लोकाचारापलीकडे नाहीं. व्यवहाराशीं याचा तिळमात्रही संबंध नाहीं. याचा एक मात्र उपयोग होतो तो हा कीं, हें चऱ्हाट तोंडपाठ नसलें तर लोक हंसतात, ते हें पाठ असलें म्हणजे हंसत नाहींत. आतां हें कोणीही कबूल करील कीं, ज्या ज्ञानाचा उपयोग सर्व मनुष्यांनां सर्वकाळीं होतो, तें ज्ञान ज्याचा उपयोग फक्त कांहीं मनुष्यांना आणि विशिष्ट कालपर्यंतच होतो, त्या ज्ञानापेक्षां अधिक महत्त्वाचें आहे; आणि ज्याचा उपयोग फक्त कांहीं लोकांसच होऊन विशिष्ट लोकाचार आहे तोंपर्यंतच होतो, त्या ज्ञानापेक्षां तर फारच महत्त्वाचें आहे. यावरून हें स्पष्ट रीतीनें सिद्ध होतें कीं, विचारपूर्वक ज्ञानाच्या प्रकारांचें वर्गीकरण केलें, तर नित्यज्ञान, नित्यप्रायज्ञान, आणि लौकिकज्ञान, हाच महत्त्वाच्या मानानें त्यांचा अनुक्रम ठरतो.

आतां आणखी एका गोष्टीचा विचार केला म्हणजे झालें. कोणतेंही ज्ञान संपादन केल्यापासून दोन फायदे आहेत. एक प्रत्यक्ष उत्पन्न होणारें ज्ञान आणि दुसरा तें ज्ञान संपादन करण्याच्या कामीं मनाला होणारी एक प्रकारची कसरत. एखाद्या गणितांतील विषयाचा व्यासंग केला असतां वर सांगितल्याप्रमाणेंच दोन फायदे होतात. एक विवक्षित विषयाची माहिती व दुसरा फायदा असा कीं, गणिताच्या व्यासंगानें बुद्धीला एका प्रकारची निश्चितता येते. आतां या विषयाच्या प्रत्यक्ष माहितीचा जसा व्यवहारांत उपयोग आहे, तसाच बुद्धीच्या निश्चिततेचाही व्यवहारांत उपयोग आहे. कोणतेंही काम करण्याचा प्रसंग आला असतां, करावें कीं न करावें, या डुचमळ्यांत मनुष्य पडला म्हणजे त्याच्या हातून कांहीं न होतां शेवटीं फजिती होते. सारांश प्रत्यक्ष ज्ञान आणि मनाची कसरत हे दोन फायदे निर्विवाद आहेत. वास्तव ज्ञानाच्या प्रकारांची अन्यसापेक्षयोग्यता पाहतांना या वरील दोन्ही गोष्टींचा विचार केला पाहिजे.

एकंदरीस शिक्षणक्रम ठरवितांना कोण कोणत्या गोष्टी पाहिल्या पाहिजेत, हें आतां ठरलें. ह्या गोष्टी मुख्यत्वें करून तीन आहेत. (१)

जगांतील आपले एकंदर व्यवसाय व महत्त्वाच्या मानानें वर केलेलें त्यांचें वर्गीकरण. (२) कोणताही विषय शिकणें झाल्यास (अ) नित्य (ब) नित्यप्राय किंवा (क) लौकिक, अशा प्रकारचे आपल्या निरनिराळ्या व्यवसायांवर त्या विषयापासून होणारे परिणाम. आणि (३) त्या विषयापासून तज्जन्य ज्ञान आणि कसरत यांसंबंधानें व्यवहारांत होणारे फायदे.

आपल्या शिक्षणामध्यें आत्मरक्षणाच्या साधनांचें ज्ञान अत्यंत महत्त्वाचें होय. परंतु काय चमत्कार आहे-ह्या संबंधाचें ज्ञान आपणांस बहुतांशीं आपोआप प्राप्त होतें. ह्या अत्यंत महत्त्वाच्या ज्ञानाची व्यवस्था आह्मां मनुष्यांच्या हातून नीटपणें होणार नाहीं, ह्मणूनच ईश्वरानें अशी योजना केली असावी असें दिसतें. अगदीं लहान तान्हें मूल नवखा मनुष्य पाहिल्याबरोबर रडूं लागतें, आणि आपलें तोंड फिरवतें. ह्यावरून अपरिचित गोष्टींपासून आपणास धोका असण्याचा संभव आहे, ह्मणून त्यांपासून आपण दूर राहिलें पाहिजे हें ज्ञान त्यालाही आहे असें होतें. पुढें तेंच मूल जरा मोठें होऊन चालावयास लागलें ह्मणजे एखादें नवीन मांजर किंवा कुत्रें दृष्टीस पडलें कीं त्याला तें भितें. तसेंच त्यानें एखादी मोठी आरोळी ऐकिली, किंवा एखादी भयंकर वस्तु पाहिली कीं, तें एकदम किंकाळी फोडून आईजवळ जातें. ह्याप्रमाणें मुलांचें आत्मरक्षणाचें ज्ञान नेहमीं वाढत असतें. आपल्या आंगाचा तोल कसा संभाळावा, कोणत्याही पदार्थाशीं आपलें आंग घासटूं नये ह्मणून हालचाल कशी बेतानें ठेवावी, कोणते पदार्थ टणक आहेत आणि त्यांवर आपण आपटलों असतां आपणांस इजा होईल, कोणते पदार्थ जड आहेत आणि ते आपणांवर पडले असतां आपलें आंग दुखावेल, कोणते पदार्थ आपला भार सहन करतील, कोणते करणार नाहींत, विस्तव, धारेचीं हत्यारें, इत्यादींपासून आपणांस कोणता अपाय होण्याचा संभव आहे, ह्या आणि अशा दुसऱ्या पुष्कळ गोष्टी मूल क्षणोक्षणीं शिकत असतें. पुढें कांहीं वर्षांनीं तेंच मूल इकडे तिकडे धांवतें, उड्या मारतें, झाडावर चढतें आणि नाना तऱ्हेचे दांडगाईचे व कसबाचे खेळ खेळतें. ह्या सर्व प्रकारांनीं त्याचे स्नायु भरतात, आणि हातापायास चांगला जोर येतो. तसेंच पुष्कळ प्रकारचे कल्पनेचे खेळ खेळून त्याची इंद्रियशक्ति तीक्ष्ण होते, विचार शक्तीस तीव्रता येते, आणि या योगानें

सृष्टींतील पदार्थांशीं आपण कसा संबंध ठेवावा व आयुष्यामध्यें होणारे लहानमोठे अपघात कसे टाळावे, हें ज्ञान कोणी शिकविल्याखेरीज त्यास प्राप्त होतें. ह्याप्रमाणें आपल्या आत्मरक्षणाच्या ज्ञानाची काळजी जगन्नियंताच घेत असतो, आणि ह्मणून त्यासंबंधानें आपणांस अगदीं पहावयास नको असें ह्मटलें तरी चालेल. परंतु मुलांस सृष्टीचा अनुभव येण्याकरितां वरील त्यांचा खेळण्याचा वगैरे क्रम मात्र आपण नीटपणें चालूं दिला पाहिजे. त्यांस आपली अगदीं आडकाडी असतां कामा नये. कित्येक श्रीमंतांच्या मुलांस ही आडकाडी असल्यामुळें तीं पुढें पोशाखी व बावळीं निपजून प्रसंगीं त्यांस आपलें रक्षण करितां येत नाहीं.

आतां एवढें झालें ह्मणजे आत्मरक्षणाचें काम झालें असें मात्र नाहीं. केवळ बाह्य अपघातांशिवाय दुसऱ्या गोष्टींपासूनही आपल्या शरीरास होणारे अपाय आपणांस टाळतां आले पाहिजेत. आरोग्यरक्षणाचे नियम न पाळल्यामुळें आपणास रोग जडण्याचा आणि अकालीं मरण येण्याचा संभव आहे, तो संभव टळला पाहिजे. आकास्मिक मृत्यु टळला ह्मणजे आपलें काम झालें असें नाहीं, तर नानाप्रकारच्या मूर्खपणाच्या चाली लागल्यामुळें, आपल्या शरीरांत निरनिराळीं व्यंगें उत्पन्न होऊन आपल्या शक्तीचा जो हळूहळू क्षय होतो तोही टळला पाहिजे. आपली प्रकृति सुदृढ असून अंगांत चांगली ताकद असल्याशिवाय निर्वाहासंबंधी व्यवसाय, पितृत्वसंबंधी व्यवसाय, समाजसंबंधी व्यवसाय व मनोरंजनसंबंधी व्यवसाय, यांपैकीं कोणतेही व्यवसाय नीटपणें होणें शक्य नाहीं. यास्तव हें स्पष्ट होतें कीं, या दुसऱ्या प्रतीच्या प्रत्यक्षआत्मरक्षणाचें ज्ञान पहिल्या प्रतीच्या प्रत्यक्षआत्मरक्षणाच्या ज्ञानापेक्षां मात्र कमी योग्यतेचें, परंतु बाकीच्या सर्व प्रकारच्या ज्ञानापेक्षां यांचें महत्व विशेष होय.

आतां या संबंधानेंही जगनियंत्यानें कांहीं अंशीं आयती तर्तूज करून ठेविली आहे. कामक्रोधादिक जसे आपले मनाचे विकार आहेत, तसेच क्षुधा, तृषा इत्यादि आपले शरीराचे विकार होत. हे शारीरिक विकार उत्पन्न झाले ह्मणजे तन्निरसनार्थ कांहीं मानसिक प्रवृत्ति उद्भवतात. क्षुधा लागल्याबरोबर खावेसें वाटणें, ही मानसिक प्रवृत्ति होय. हे शा-

रीरिक विकार आणि ह्या मानसिक प्रवृत्ति जगन्नियंत्यानें आमच्या कल्याणासाठीं उत्पन्न केल्या आहेत. यांच्या अनुरोधानें जर आपण नेहमीं वागूं, तर पुष्कळ अंशीं आरोग्यरक्षणाचें काम सुलभ रीतीनें आमच्या हातून होणारें आहे. आतां ज्या वेळेस हे शारीरिक विकार अनावर होतात, तेव्हां तज्जन्य मानसिक प्रवृत्तिही अतिप्रबल असतात, व त्या वेळेस त्या प्रवृत्तींच्या अनुरोधानें वागल्याशिवाय आपणांस गत्यंतरच नसतें; तेव्हां अशा वेळेस आह्मी तदनुसार वागतों यांत आह्मांस कांहींएक भूषण नाहीं. परंतु ह्याच प्रवृत्ति जेव्हां फार प्रबल नसून साधारण असतात, तेव्हांसुद्धां जर यांस अनुसरून वागण्याचा आह्मीं क्रम ठेविला, तर मात्र खरोखर हल्लींपेक्षां आरोग्य पुष्कळच जास्त राहील. भुकेनें कळवळलों ह्मणजे खाऊंच; उष्णतेनें आंगाची लाही ह्माली ह्मणजे शीतोपचार करूंच; थंडीनें कुडकुडलों ह्मणजे आंगावर पांघरूण घेऊंच; यांत विशेष नाहीं. परंतु बराचवेळ काम करून किंवा वाचून थकलेंसें वाटल्याबरोबर लागलीच कांहीं वेळ विश्रांति घेणें, बराच वेळ कोंदट जागेंत असल्यानें कोंडल्या सारखें वाटल्याबरोबर लागलेंच मोकळ्या हवेवर जाणें, भूक लागल्याखेरीज कांहीं न खाणें, तहान लागल्याखेरीज कांहीं न पिणें, अशा प्रकारें नेहमीं व्यवस्था ठेविली तर आपली शरीरप्रकृति पुष्कळ अंशीं दुरुस्त राहील ह्या विषयीं काडीमात्र संशय नाहीं. परंतु आरोग्यरक्षणाच्या नियमाचे संबंधानें लोक इतके अज्ञानी आहेत कीं, वर सांगितलेले आपले शारीरिक विकार व मानसिक प्रवृत्ति हे आमच्या आरोग्यरक्षणार्थ ईश्वरानें नेमलेले पाहरेकरी आहेत आणि शिवाय, पुष्कळ दिवस त्यांचें न ऐकिल्यामुळें तेही मग स्वाभाविक सुस्तावतील ही गोष्ट निराळी आहे, परंतु अशी स्थिति नसेल तेव्हां ते मोठे इमानीही आहेत, हें अद्यापि लोकांस कळतही नाहीं. ह्याप्रमाणें आरोग्यरक्षणाचीं साधनें जन्मतः आपणांजवळ असूनही केवळ आमच्या एक अज्ञानानें तीं सर्व फुकट होऊन गेलीं आहेत.

आरोग्यरक्षणाचे ज्ञानाची आपणांस किती आवश्यकता आहे, हें कोणास पाहणें असल्यास त्यानें आपल्या सभोवतालच्या लोकांची स्थिति पहावी. आयुष्याच्या भर अमदानीमध्यें किंवा जरा उतारवयामध्यें

ज्यांची शरीरप्रकृति सुदृढ आहे, अशीं मनुष्यें आपणांस किती आढळतील बरें? अगदीं ह्यातारपणापर्यंत एक सारखा धट्टाकट्टा राहिला आहे असा तर मनुष्य क्वचितच आढळेल. कोणाला दमा आहे, कोणाच्या छातींत दुखतें, कोणाचें पोट दुखतें, कोणाला नळाची व्यथा आहे, कोणाला मूळव्याधि आहे, कोणाला अकालीं वार्धक्य आलें आहे अशीं शेंकडों उदाहरणें घडोघडीं आपल्या पहाण्यामध्यें येतात. ह्यांपैकीं प्रत्येकाला विचारून पाहिलें तर आपल्या अज्ञानानें किंवा अविचारानें कधींना कधीं तरी आपणांवर आपण दुखणें आणून घेतलें नाहीं असें बहुधा एक सुद्धां उदाहरण सांपडावयाचें नाहीं. थंडीवाऱ्यामध्यें फिरून ताप आल्याचीं आणि तापावर वेळीं योग्य औषध न घेतल्यानें कडकी बसल्याचीं उदाहरणें पहावयाला गेलें तर पुष्कळ सांपडणार नाहींत काय? अभ्यास करकरून किती बरें आंधळे झालेले आहेत? पायास इजा झाली असून तसेंच दांडगाईनें दहा वीस कोस जास्त मजल खेटल्यानें अमुक मनुष्य लंगडा होऊन घरीं बसला आहे असें आमच्याकानीं आज येतच आहे. काल अमुक मनुष्यानें आपल्या शक्तीच्या बाहेर ओझें उचलून उसण भरून घेतली असेंही आह्मी ऐकतों; ह्याप्रमाणें कोणी असा कोणी तसा फाजीलपणाकरून आपणास जन्माची इजा करून घेतल्याचीं उदाहरणें आह्मी नेहमीं पाहतों व ऐकतों. आपणास जीं दुखणीं येतात त्यांपैकीं बहुतेक आह्मीं केवळ आपल्या हयगयीनें आपणावर आणून घेतों असें ह्मटलें तरी चालेल. एक दुखणें आलें ह्मणजे आपली अनेक प्रकारें हानि होते. एकतर आधीं आपणास नानाप्रकारचे क्लेश काढावे लागतात. पैशाची आणि वेळाची खराबी होते ती होतेच. मनास कोणतेही प्रकारचा उल्हास राहत नाहीं. सर्व गोष्टींवरून आपलें मन उडतें, कशामध्यें सुख वाटत नाहीं; बायको नको, पोरें नकोत अशी स्थिती होते, संसारांतील सर्व कृत्यांचा घोटाळा होऊन जातो आणि कोणतेंच काम आपल्या हातून नीटपणें तडीस जात नाहीं. सारांश ह्या जगांतील आपले कोणत्याही प्रकारचे व्यवसाय आपल्या हातून नीट होत नाहींत, आणि आपल्या आयुष्याचें अगदीं मातेरें होऊन जातें.

परंतु ही हानि येथेंच संपत नाहीं, ह्याप्रमाणें आयुष्याची दुर्दशाच होऊन राहत नाहीं, तर आपलें आयुष्य कमीही होतें. पुष्कळ लोक असें समजतात

कीं, एकदां दुखण्यांतून औषध वगैरे घेऊन आपण बरे झालों, ह्मणजे आपली शरीरप्रकृति अगदीं पहिल्याप्रमाणें दुरुस्त होते. परंतु ही त्यांची मोठी चूक आहे. शरीरप्रकृतीची एकदां घडी बिघडली ह्मणजे ती पूर्ववत् कधीं बसावयाची नाहीं. दुखण्यांतून आह्मी बरे झालों, तरी एकदां प्रकृति ढांसळली ती ढांसळलीच; तीमध्यें काहींतरी नेहमीं थोडीबहुत गोम रहावयाचीच व ती आज ना उद्यां केव्हांतरी उपटल्याशिवाय रहावयाची नाहीं. असें प्रत्येक खेपेस होत गेल्यानें आपल्या आयुष्याचीं कांहींना कांहींतरी वर्षे खुंटल्याशिवाय रहावयाचीं नाहींत. आपल्या शरीरप्रकृतीचा कांटा इतका नाजुक आहे कीं, त्यामध्यें एक रतीचीही कसर खपावयाची नाहीं. दरवेळेस थोडी थोडी कसर रहात जाते खरी, तरी अखेरीस एकंदर कसरीएवढा आयुष्याला हिसका बसावयाचाच. आपल्या आयुष्याची मर्यादा काय आहे, व हल्लीं साधारणपणें मनुष्यें जगतात किती वर्षें, वगैरे गोष्टींचा विचार केला ह्मणजे ह्या संबंधानें आपला तोटा किती होतो हें चांगलें लक्षांत येईल. दुखण्यामध्यें फुकट जातो तो वेळ, आणि शेवटीं आयुष्याला येणारी तूट हीं मिळविलीं ह्मणजे आपल्या आयुष्यापैकीं निमें आयुष्य अगदीं व्यर्थ जातें, असें ह्मणणें भाग पडतें.

वरील गोष्टींचा विचार केला ह्मणजे आरोग्यरक्षणाच्या ज्ञानाची आपणांस किती आवश्यकता आहे हें लक्षांत येईल. आमचें असें ह्मणणें नाहीं कीं हें ज्ञान असलें ह्मणजे आपल्या शरीरप्रकृतीचा बंदोबस्त अगदीं नेहमीं उत्तम राहीलचराहील. हल्लींची आपली स्थिति अशी आहे कीं, उदरनिर्वाहाला ज्या गोष्टी जरूर त्या मिळविण्याकरितां आपणांस वारंवार आरोग्यरक्षणाचे नियम मोडावे लागतात. आतां कित्येकांस हे नियम मोडावे लागणार नाहींत हें खरें आहे; तरी मनुष्यस्वभावाकडे पाहिलें ह्मणजे असें दिसून येतें कीं, मनुष्यांच्या मनाचा कल तात्कालिक समाधान प्राप्त करून घेण्याकडे विशेष असतो; त्याकरितां तीं पुढील सर्व सुखांस अंतरण्यास समजूनउमजूनही तयार होतात, व अशी स्थिति असल्यामुळें त्यांच्या हातून आरोग्यरक्षणाच्या नियमांचें उल्लंघन सहजीं होत जातें. असा जरी प्रकार आहे, तरी आह्मी खात्रीनें असें सांगतों कीं, आरोग्यरक्षणाचे नियमांचें ज्ञान जर मनामध्यें जसें ठसावें तसें ठसलें, तर आपलें

काम बरेंच होईल; व शिवाय आमचें आणखी असें ह्मणणें आहे कीं, ज्या अर्थी आरोग्यरक्षणाच्या नियमांचें ज्ञान आपल्या आंगीं असल्यावांचून आपणांस ते नियम पूर्णपणें कधींही पाळतां येणार नाहींत, त्या अर्थी आमच्या शिक्षणक्रमामध्यें ह्या ज्ञानाचा समावेश झाल्याखेरीज आपली ह्या संबंधाची स्थिति कधींही सुधारावयाची नाहीं. एक शरीरप्रकृति उत्तम राहून आपली मनाची उल्हासवृत्ति सदोदित कायम राहिली, ह्मणजे या जगांतील अर्धेअधिक सुख आपणांस मिळाल्यासारखेंच आहे असें जर आहे, तर शरीरप्रकृति उत्तम राहण्यास जें ज्ञान अवश्यतें ज्ञान फार महत्त्वाचें होय, हें कोणी सांगावयाला नको. याकरितां प्रत्येकानें आरोग्यरक्षणाच्या संबंधानें निदान नेहमीं लागणाऱ्या ठळक ठळक गोष्टींचें ज्ञान अवश्य करून घ्यावें, असें आमचें ह्मणणें आहे.

ह्यासंबंधानें इतकें ह्मणण्याची तरी जरूरी पडावी, हा तरी चमत्कारच आहे. परंतु काय करावें, ह्या संबंधानें लोक इतके अज्ञानी आहेत कीं, नुसतें एवढें ह्मणूनच आमचें काम होत नाहीं. हें सिद्ध करण्याकरितां लोकांजवळ चार चार घटका कपाळकूटही करावी लागते. आपल्या तोंडांतून बोलतां बोलतां जेथें "मत" यावयाचें तेथें चुकून "मत्त" आलें, कीं लागलेंच आपणांस मरणापेक्षां मरण होतें; किंवा एखाद्या कल्पित राक्षसाचीं कल्पित राक्षसीकृत्यें माहीत नाहींत असें कोणी झटलें, तर आपल्याला राग आल्यासारखें होतें; परंतु त्याच आपणांस रक्ताशय आणि फुप्फुस ह्मणजे काय, रुधिराभिसरण कसें चालतें, किंवा नेहमींचें नाडी चालण्याचें मान काय असतें, वगैरे गोष्टी सांगतां येत नाहींत, ह्याबद्दल थोडी सुद्धां शरम वाटत नाहीं, हा तरी काय लहान चमत्कार आहे? ह्या गोष्टींविषयींचें अज्ञान आपण खुशाल हंसून चैनीनें कबूल करितों. दोन हजार वर्षांपूर्वी लोकांच्या धर्मसंबंधी काय वेडया समजुती होत्या, ही माहिती आपल्या मुलांस असलीच पाहिजे असें आपणांस वाटतें, व त्याप्रमाणें आपल्या मुलांनीं प्राचीन इतिहासाचा लक्षपूर्वक अभ्यास करावा अशी आमची इच्छाही असते; परंतु आपल्या शरीरांतील रचना कोणत्या प्रकारची आहे, त्यांतील सर्व क्रिया कशा चालतात, इत्यादि गोष्टींचें ज्ञान त्यांस असावें, असें आमच्या कधीं मनांत तरी

येतें काय? कित्येक लोकांची तर आपल्या मुलांनीं ह्या गोष्टी शिकू नयेत अशीही इच्छा आहे. तर ह्या ज्ञानाच्या संबंधानें आपली वृत्ति अशी कां असावी? का ह्या ज्ञानाचा आपणास उपयोग कळत नाहीं ह्मणून? नव्हे, उपयोग कळतो, सर्व कांहीं होतें; परंतु करावें [illegible] चालत आलेल्या चाली आपल्या अगदीं हाडीं खिळून [illegible] ह्या लौकिकानें तर आपणांस अगदीं ग्रासून टाकलें आहे, ह्याच्यापुढें आपलें कांहीं चालत नाहीं. समजून उमजून केवळ मृगजळाच्या पाठीस लागल्यासारखी आपली स्थिति आहे.

उदरनिर्वाहाचे ज्ञानाच्या योग्यतेविषयीं आह्मांस विशेष सांगत असण्याचें कारण नाहीं. ह्या ज्ञानाची योग्यता [illegible] लोकांस कळे; किंबहुना विद्येचा उदरनिर्वाहाकडेच कायतो उपयोग आहे असें लोक समजतात. उदरनिर्वाहाचें ज्ञान महत्वाचें आहे इतकेंच नव्हे, तर अत्यंत महत्वाचें होय असें लोक मोठ्या थाटानें माना डोलवून कबूल करितील हें खरें आहे; परंतु हें ज्ञान कसें प्राप्त करून घ्यावें ह्याविषयीं विचार करणारे लोक फारच थोडे. आपण शाळेमध्यें लेखन, वाचन आणि अंकगणित ह्यांचा अभ्यास करितों हें ठीक आहे; कारण त्यांचा धंद्यामध्यें साक्षात् उपयोग आहे; परंतु ह्यापलीकडे पाहूं गेलें, तर ज्या भाराभर गोष्टींचा आपण सतत एकनिष्ठपणें शाळेंत अभ्यास करितों, त्यांचा उदरनिर्वाहाशीं कांहीं संबंध नाहीं असें आह्मांस वाटतें; त्याच वेळामध्यें उदर निर्वाहास अगदीं जरूर अशा अनेक गोष्टी आपणांस शिकतां येतील.

आतां साधारण सर्व लोकांचे नेहमीं काय व्यवसाय चालले आहेत हें पाहिलें तर आपणांस असें आढळून येईल कीं, अगदीं थोडे लोक शिवायकरून बाकीचे सर्व लोक निर्वाहाला लागणारे जिन्नस उत्पन्न करण्याच्या, ते तयार करण्याच्या, किंवा ते इकडे तिकडे पाठविण्याच्या कामास लागले आहेत. आतां हीं सर्व कामें उत्तम प्रकारें साधण्याकरितां या सर्व जिनसांच्या जाति मनांत आणून तदनुसार प्रत्येक जिनसाची व्यवस्था ठेविली पाहिजे हें उघड आहे. ही व्यवस्था बरोबर रीतीनें ठेवितां यावी ह्मणून प्रत्येक पदार्थाची स्थिति, गुण, धर्म वगैरे सर्व कांहीं आपणांस उत्तमप्रकारें माहीत असलें पाहिजे, ह्मणजे आपणांस तत्पदार्थविषयक

शास्त्राचें ज्ञान असलें पाहिजें. परंतु आपल्या शाळांतील शिक्षणक्रमांतून हें शास्त्रीयज्ञान गाळून टाकिलेलें असतें असें झटलें तरी चालेल. शास्त्रीयविषयांच्या महत्त्वाच्या मानानें लोकांचें लक्ष अद्यापि त्यांकडे लागलें नाहीं. शास्त्रीयविषयांचें ज्ञान हेंच आमच्या सांप्रतच्या सर्व सुधारणेचें मूळबीज आहे हें सर्व लोक आपल्या तोंडानें कबूल करितात; त्यांचें वर्तन मात्र ह्यासंबंधानें असावें तसें नसतें. हें ज्ञान अगदीं प्रचारांतलेंसें वाटून आपलें तिकडे सहजीं दुर्लक्ष होतें. ही गोष्ट वाचकांच्या नीटपणें लक्षांत येण्याकरितां शास्त्रीयविषयांच्या ज्ञानाची आपणांस प्रत्येक धंद्यामध्यें कशी गरज लागते ह्याचें थोडक्यांत निरूपण करणें इष्ट दिसतें.

प्रत्येक शेतकऱ्याला व व्यापाऱ्याला आपल्या धंद्यामध्यें चांगली किफायत होण्याकरितां मागील पुढील गोष्टी लक्षांत आणून सर्व बंदोबस्त ठेविला पाहिजे; व हें करतांना त्याला तर्कशास्त्रासारख्या गहन व अत्यंत अमूर्त शास्त्राच्या नियमांस बुद्धिपूर्वक किंवा सहजीं अनुसरावें लागतें; तसेंच त्यांना गणितशास्त्राचा व त्यांत मुख्यत्वेंकरून अंकगणिताचा फार उपयोग होतो. शेतकऱ्याला इतकें धान्य पेरिलें तर इतकें धान्य उत्पन्न होतें, ह्याच अजमासावर पेरणीचें काम करावें लागतें. व्यापाऱ्याला तर जिन्नस खरेदी करितांना व विकतांना नेहमीं हिशेबच करावयाचे असतात. सारांश अंकगणिताचा धंद्यामध्यें आपणांस किती उपयोग होतो हें सांगत बसण्याची जरूरी नाहीं.

कारागिरीच्या कामांत तर अंकगणिताचीच काय पण भूमितीचीही गरज लागते. गांवठी सुतार आपलें काम केवळ अजमासावर डोकळ नियमांनीं चालवितो खरें, परंतु तोही नर्मदेचा पूल बांधणाऱ्या विद्वान् इंजनेराप्रमाणें लांबी, रुंदी, उंची इत्यादिकांचें प्रमाण नेहमीं मनांत आणितो. जमिनीचें माप घेणारे मोजणीदार, तसेच सुतार, अरकशी, गंवडी, वगैरे ज्यांची घर बांधितांना गरज लागते अशा सर्व कारागिरांचें काम भूमितीच्या आधारावरच चालतें. आगगाडीच्या संबंधानें लोखंडी रस्ते बांधितांना अथपासून इतिपर्यंत भूमितीच्या ज्ञानाखेरीज चालतच नाहीं. ज्या प्रदेशांतून आगगाडी न्यावयाची त्या प्रदेशाचा नकाशा काढितांना, रस्ता आंखितांना, खडी घालून रस्ता सारखा करितांना, पूल बांधितांना,

रस्त्याच्या चढउतारांचें मान बरोबर साधितांना, वगैरे हरएक कामांत भूमितीशीं संबंध आहेच. तसेंच समुद्रकांठीं बंदरें, गोद्या, धक्के वगैरे बांधितांना व देशामध्यें गिरण्या व इतर कारखाने उठवितांना तरी हें ज्ञान अगदीं अवश्य आहे; आणि अलीकडेतर कांहीं सुधारलेल्या देशांमध्यें शेतीचींही सर्व कामें अगदीं यंत्रावरच आहेत; तेथें शेतामध्यें भरणी वगैरे टाकण्याचें काम पाणसळीवर चालतें. म्हणजे इकडेही भूमितीचा प्रवेश आहेच.

आतां आपण मूर्तामूर्तविषयक शास्त्राकडे वळूं, व ह्यांपैकीं अत्यंत सुलभ जें यंत्रशास्त्र त्याचा आपणांस धंद्यामध्यें किती उपयोग होतो तें पाहूं. हल्लीं जीं कलाकौशल्यें इतक्या ऊर्जित दशेस येऊन पोहोंचलीं आहेत, तीं खचित या शास्त्राच्या साहाय्यानें होत. तरफ, कप्पी इत्यादिकांचा उपयोग प्रत्येक कारखान्यामध्यें चाललाच आहे. आपले खाण्याचे सर्व पदार्थ यंत्राच्या साहाय्यानें निर्माण होतात. इंग्लंडामध्यें गहूं वगैरे सर्व धान्यांचें लागवडीचें काम यंत्रानें चालतें आहे; तेथें शेताची भरणी, नांगरणी, उखळ, बेर, पेरणी, कापणी, झोडणी, मळणी, वगैरे सर्व शेतकीचीं कामें यंत्रांवर चालविण्याचा धडाका सुरू आहे. धान्य दळण्याचेंही यंत्र आहे. फारतर काय, कर्णाक जर 'गासपोर्ट' शहरीं पाठवून दिली, तर यंत्रावर तयार केलेल्या आयत्या चपात्या आपणांस मिळतील. ज्या खोलीमध्यें आपण बसतों ती तरी सर्व यंत्रांनीं केलेल्या वस्तूंनीं भरून गेलेली आहे, खोलीच्या भिंतीच्या विटा पाहूं गेलें तर यंत्रांनींच केलेल्या आहेत. आपण बसतों ती खुर्ची, आपल्या पुढील मेज, त्यावरचा बुट्टीदार कपडा, खालीं घातलेला गालिचा, वगैरे सर्व जिनसा यंत्रावरच्याच आहेत. आपण वाचीत आहों तें पुस्तकच पाहा, त्याचे कागद व तें छापून व बांधून यंत्रावरच तयार झालेलें आहे. आपले साधे किंवा चिटाचे सर्व कपडे विणून व बहुतकरून शिवूनही यंत्रावरच झाले आहेत. ह्याप्रमाणें प्रत्येक पदार्थ तयार करण्यामध्यें यंत्राचें साहाय्य आहेच. तसेंच व्यापाराचे जिन्नस जमिनीवरून किंवा पाण्यांतून इकडे तिकडे पाठवितांना आपणांस यंत्रशास्त्राच्या ज्ञानाची गरज आहेच. ह्या सर्व गोष्टींवरून हरएक कामामध्यें आपणांस यंत्रशास्त्राच्या ज्ञानाचा किती उपयोग होतो हें प्रत्येकाच्या नीटपणें लक्षांत येईल. पूल बांधणारानें सामान मजबूत आहे किंवा नाहीं हें पाहिल्याखेरीज जर

पूल बांधिला तर तो तावडतोब खालीं कोसळावयाचाच. साधारण चालचलाऊ यंत्रानें काम करणाऱ्या कारागिराच्यानें ज्याच्या यंत्रास घर्षणाचा वगैरे प्रतिबंध होत नाहीं, अशा कारागिराची कधींही बरोबरी करवणार नाहीं. अगदीं जुन्या नमुन्यावर बांधलेल्या गलबतास नवीन सुधारलेल्या धरतीवर बांधलेलें गलबत हटकून मागें टाकील. ह्यावरून एका राष्ट्राचें दुसऱ्या राष्ट्रावर वर्चस्व राहण्याकरितां त्यांतील लोक यांत्रिकविद्येमध्यें निपुण असले पाहिजेत, व एकंदर राष्ट्राची भरभराटी यंत्रशास्त्राच्या ज्ञानावर अवलंबून आहे, असें स्पष्टपणें सिद्ध होत नाहीं काय ?

पदार्थविज्ञानशास्त्राचाहीं आपणांस पराकाष्ठेचा उपयोग आहे. पदार्थविज्ञान व यंत्रशास्त्र ह्या दोन शास्त्रांच्या ज्ञानाच्या योगानें लक्षावधि मजुरांचें काम करणारीं प्रचंड वाफेचीं यंत्रें आपणांस तयार करितां येतात; उष्णतेचे नियम समजल्यानें आपणांस कारखान्यांमध्यें सर्पणाचा खर्च बेतानें करितां येतो; खोल खाणीमध्यें आपणांस हवा सोडितां येते; एका प्रकारच्या 'रक्षणदीप' नामक चमत्कारिक दिव्याचा उपयोग करून पृथ्वीचे पोटांतील ज्वालाग्राही पदार्थांपासून होणारे अपाय आपणांस टाळितां येतात; आणि उष्णतामापक यंत्रापासूनही आपणांस असेच अनेक प्रकारचे फायदे करून घेतां येतात. ह्याच पदार्थविज्ञानशास्त्राचा दर्शनानुशासनशास्त्र म्हणून जो एक भाग आहे, त्याच्या ज्ञानाच्या योगानें वृद्धांस आणि कमी नजरेच्या मनुष्यांस चांगले डोळे आणून देतां येतात; सूक्ष्मदर्शक यंत्राच्या योगानें रोगांचें चांगलें निदान करितां येतें; मलयुक्त द्रव्यें तपासून शुद्ध करितां येतात; आणि सुधारलेल्या नवीन दीपस्तंभाच्या योगानें गलबतांचा पुष्कळ बचाव होतो. विद्युत् आणि लोहचुंबक यांच्या धर्मांचें चांगलें ज्ञान प्राप्त झाल्यानें असंख्य लोकांच्या प्राणांचें रक्षण होतें; लोकायंत्राच्या योगानें समुद्रपर्यटन अगदीं सुलभ झालें आहे; कृत्रिम विजेपासून नवीन चमत्कारिक युक्ति निघूं लागल्या आहेत; तारायंत्राच्या योगानें व्यापारास आणि दूरदूरच्या देशांमध्यें इतर प्रकारचें दळणवळण ठेवण्यास उत्तमप्रकारची सोय झाली आहे. फार तर काय, ही पदार्थविज्ञानशास्त्राच्या अभ्यासानें झालेली सुधारणा अगदीं आमच्या घरांतील चुलीपर्यंत येऊन पोहोंचली आहे. घरांतील

 सार्वजनिक वाचनालय, सातारा.

प्रत्येक सुखाच्या व आरामाच्या वस्तूंमध्यें ही सुधारणा अंशतः तरी दृष्टीस पडतेच पडते.

रसायनशास्त्राचा तर याहीपेक्षां जास्त उपयोग आहे. धोबी रंगारी वगैरे लोकांचें काम, ते लोक जसजसे ह्या शास्त्राच्या नियमांस अनुसरतील, त्याप्रमाणें बरें वाईट होणार आहे. तांबें, कथील, लोखंड, पोलाद, रुपें वगैरे धातूंचा रस रसायनशास्त्राच्याच धोरणानें केला पाहिजे. साखर, साबण, बंदुकीची दारू, पिण्याची दारू, कांच, चिनीभांडीं, इत्यादिकांच्या कारखान्यांमध्यें रसायनशास्त्राचा भाग आहेच. खरोखर असा एकही धंदा नाहीं, कीं ज्यामध्यें रसायनशास्त्राचा उपयोग होत नाहीं. शेतकीमध्यें या ज्ञानाचा उपयोग आहेच; जमिनीच्या कसाप्रमाणें निरनिराळ्या पदार्थांचें खत तयार करणें हें शेतकऱ्यांस अवश्य आलें पाहिजे. आगकाड्या तयार करितांना, शहरामध्यें स्पर्शजन्य रोग होऊं नये ह्मणून शहरांतील मोऱ्या, गटारें, वगैरे साफ व स्वच्छ ठेवितांना, सूर्यकिरणांच्या योगानें तसबिरी काढितांना, किंवा अगदीं टाकाऊ पदार्थांपासून सुगंधी द्रव्यें तयार करितांना, रसायनशास्त्राची हमेष गरज लागते. ह्याप्रमाणें सर्व धंद्यांमध्यें रसायनशास्त्र अगदीं मी ह्मणत आहे. यास्तव ज्यांचा ह्या वरील धंद्यांमध्यें साक्षात् किंवा पर्यायानें संबंध आहे, त्या सर्वांस ह्या शास्त्राची माहिती असणें अत्यंत महत्वाचें होय.

आतां आपण मूर्तविषयक शास्त्रांपैकीं ज्योतिःशास्त्राविषयीं प्रथमतः विचार करूं. ह्या शास्त्राच्या ज्ञानाचा हल्लीं बराच फैलाव झाल्यामुळें नौकागमन सुलभ होऊन दूर दूरच्या देशांमध्यें व्यापार चालविण्यास उत्तम सोय झाली आहे; आणि व्यापाराच्याच योगानें आपणांस उदरनिर्वाहाचे आणि ऐषआरामाचे बहुतेक पदार्थ मिळतात.

भूगर्भशास्त्राचे ज्ञानाचाही आपणांस धंद्यांमध्यें बहुत उपयोग होतो. यंत्रांच्या प्रत्येक कारखान्यामध्यें आपणांस लोखंडाची इतकी जरूरी पडते कीं, हल्लीं लोखंड ह्मणजे अगदीं सोनें होऊन गेलें आहे. विलायती कोळशांचा आपणांस कसा पुरवठा होईल ,इकडे सांप्रत सर्व इंग्लंडच्या लोकांचें लक्ष लागलें आहे. तसेंच खनिज पदार्थांचें ज्ञान संपादन करण्यासाठीं स्वतंत्र मंडळ्या निघून पाठशाळाही स्थापन झाल्या आहेत.

इतक्या गोष्टी मनांत आणिल्या ह्मणजे ह्या शास्त्राच्या अभ्यासानें आपला किती फायदा होण्यासारखा आहे हें आपल्यास सहजीं कळून येईल.

आतां आपण जीवनशास्त्राकडे वळूं. ह्या शास्त्राचा तर आपल्या उदरनिर्वाहाच्या व्यवसायांशीं अगदीं निकट संबंध आहे. कलाकौशल्य ह्मणून जें आपण समजतों, त्याच्याशीं ह्या शास्त्राचा फारसा संबंध नाहीं हें खरें आहे; तथापि प्राणरक्षणास अत्यंत अवश्य जें अन्न, तें ज्या कृतींनीं उत्पन्न होतें, त्या कृतींशीं ह्याचा अगदीं अतिनिकट संबंध आहे. ज्याअर्थी आपणांस वनस्पति आणि प्राणी ह्यांच्या जीवनास अनुकूल गोष्टी कोणत्या हें प्रथम लक्षांत आणून कृषिकर्माच्या सर्व कृतींची योजना करावी लागते;त्या अर्थी जीवनशास्त्र हें कृषिकर्मास अगदीं आधारभूत आहे असें मानणें जरूर आहे. जीवनास अनुकूल आणि प्रतिकूल गोष्टी कोणत्या ह्याविषयीं पूर्णपणें निर्णय होऊन अद्यापि जीवनशास्त्र स्वतंत्र शास्त्र बनलें नाहीं ही गोष्ट खरी आहे; तथापि शेतकरीलोकांनीं केवळ अजमासावर ह्या संबंधाचे अनेक नियम बसविले आहेत, आणि प्रसंगीं ते त्यांस अनुसरून चालतात. अमुक खत अमुक पिकास चांगलें, जमिनींतून अमुक प्रकारचें पीक काढलें ह्मणजे तींत अमुक प्रकारचें पीक व्हावयाचें नाहीं, अमुक गोष्टी घडून आल्या ह्मणजे गुराढोरांचे अमुक रोग उत्पन्न होतात, ह्या आणि दुसऱ्या नेहमींच्या अनुभवावरून कळून येणाऱ्या अनेक गोष्टी, ह्यांवरून शेतकरीलोक आपलें जीवनशास्त्र ढोकळ मानानें ठरवितात. ह्या गोष्टी जितक्या जास्त माहीत असतील तितकें चांगलें हें उघड आहे. प्राण्यांच्या जीवनास जी उष्णता पाहिजे, ती सर्व अन्नापासून उत्पन्न होते, ह्यावरून प्राण्यांच्या अंगांत उत्पन्न झालेली उष्णता जर फुकट जाऊं दिली नाहीं, तर अर्थात् कमी अन्नानें आपलें काम होणार आहे. ह्याच तत्वावर गुराढोरांच्या पोषणाचा बंदोबस्त ठेविल्यानें चारा कमी लागतो ही गोष्ट आतां प्रत्यक्ष अनुभवानें सिद्ध झाली आहे. तसेंच आपल्या अन्नामध्यें भिन्न भिन्न पदार्थ असावे असें वैद्यांचें मत आहे. खाण्यामध्यें बदल केल्यानें शरीरप्रकृति चांगली राहते हें तर आहेच; परंतु शिवाय अन्नामध्यें निरनिराळे परमाणु असल्यामुळें अन्नपचनही सहज होतें, असें वैद्य लोक आपल्या अनुभवास आणून देतात. गुरांढोरांदि जनावरांमध्यें असा एक रोग उत्पन्न होतो कीं त्यापासून ती असतां असतां बेशुद्ध पडून ताब-

डतोब प्राण सोडितात. ह्या रोगानें आजपर्यंत हजारों मेंढरें मेलीं आहेत. परंतु हल्लीं असें समजलें आहे कीं, ज्या मेंढरास हा रोग होतो त्याच्या डोक्यांत मगजाच्या नरम जागीं एक किडा निर्माण होतो; तो किडा काढून टाकिला असतां मेंढरूं बहुतकरून निभावतें. तसेंच शेतकरी लोकांस वादा, पायलाग, फांशी, इत्यादिकांवर अशीं कांहीं झाडपाल्याचीं औषधें माहीत आहेत कीं त्यांचा प्रयोग केला असतां गुरूं बहुतकरून दगावत नाहीं. पुष्कळ वेळां तर गुरांस केवळ डागून त्यांचें काम होतें. ह्याप्रमाणें जीविताविषयीं जी आपणांस सरासरी वरवरची थोडीबहुत माहिती आहे, तिचाही प्रसंगीं उपयोग फार होतो. तर जीवितासंबंधीं सर्व गोष्टींची यथास्थित पूर्णपणें शास्त्रीय रीतीनें माहिती मिळवून स्वतंत्र जीवनशास्त्र बनविलें असतां, त्यापासून आपला किती फायदा होईल, याचा विचार वाचकांनींच करावा.

अजूनही आणखी एका शास्त्राचा विचार करावयाचा आहे. व्यवहारामध्यें समाजसंस्थाशास्त्राचें ज्ञान आपणांस असणें अवश्य आहे. हें ज्ञान प्राप्त करून घेण्यास कोणी पुस्तक घेऊन बसत नाहीं. परंतु बाजारामध्यें पैशाची चणचण कशी आहे; जिनसांचे भाव काय आहेत; धान्य, कापूस, साखर, लोंकर, रेशीम इत्यादिकांचें यंदां उत्पन्न कसें आहे; कोठें लढाई वगैरे होण्याचें चिन्ह आहे किंवा कसें; वगैरे गोष्टींचा विचार करून व्यापाराच्या संबंधाच्या सर्व गोष्टींचा निर्णय करणें ह्मणजे वरील शास्त्राचा अभ्यास करणेंच होय. हा कांहीं शिस्तवार अभ्यास नव्हे हें कोणीही सांगेल. तथापि वरील तर्क ज्याप्रमाणें खरे खोटे ठरतील, त्यामानानें व्यापाऱ्याचें नफा नुकसान होणार आहे. प्रत्येक जिनसाच्या खपाच्या मानानें पुरवठा असला पाहिजे वगैरे पुष्कळ गोष्टींचें ज्ञान मोठमोठ्या व्यापाऱ्यांस आणि कारागिरांस असलें ह्मणजे झालें असें नाहीं; अगदीं टोपल्या मांडून बसणाऱ्या दुकानदारासही ह्या गोष्टींचें ज्ञान असलें पाहिजे. कारण पुढें कोणत्या जिनसाचा खप होईल त्या जिनसाचा घाऊक दर काय ठरेल हें जसजसें त्याला कळेल तसतशी त्याची दुकानदारी नीट चालेल. ह्यावरून हें उघड आहे कीं, ज्याचा एकंदर देशांतील अनेक धंद्यांशीं कोणत्या तरी प्रकारचा संबंध आहे त्या प्रत्येकाला ह्या धंद्यांतील व्यवसाय ज्या तत्वांवर होतात त्या तत्वांचें ज्ञान अवश्य असलें पाहिजे.

याप्रमाणें शेती, कलाकौशल्य, व्यापार, वगैरे धंद्यांतील सर्व मनुष्यांस कांहींतरी शास्त्रीय विषयांचें ज्ञान असणें जरूर आहे. प्रत्येक मनुष्याचा वरील धंद्यांपैकीं निदान एखाद्यामध्यें कसातरी संबंध पोहोंचतोच पोहोंचतो, आणि ह्मणून प्रत्येक मनुष्याला शास्त्रीय विषयांचें ज्ञान असणें अगदीं अवश्य आहे. जीवनशास्त्र व समाजसंस्थाशास्त्र, यांखेरीज कोणाचेंच चालावयाचें नाहीं. आपला उदरनिर्वाह तर पूर्वी सांगितलेल्या शास्त्रीयविषयांचे ज्ञानावर अवलंबून आहे. आतां हें ज्ञान प्रत्येक मनुष्यास जसें असावें तसें असतें असें आमचें ह्मणणें नाहीं; बहुतेक लोकांस हें ज्ञान तर केवळ ठोकळ मानानेंच प्राप्त झालेलें असतें. कोणताही धंदा शिकणें ह्मणजे त्या धंद्यामध्यें ज्या शास्त्राचा संबंध येतो, त्या शास्त्राचा अभ्यास करणें होय. आतां हा अभ्यास कोणी ज्या रीतीनें शास्त्रीय विषयांचा अभ्यास करावा त्या रीतीनें करीत नाहीं त्या धंद्यांत पडलें ह्मणजे हें ज्ञान त्यास सहजीं हळूहळू प्राप्त होतें व त्यांत चांगली वाकबगारी आली ह्मणजे त्याचा धंदा चांगला चालतो हें खरें; तथापि प्रत्येक धंद्यामध्यें जें ज्ञान लागतें तें शास्त्रीयरीत्या मिळविलें तर तें आपणांस अधिक श्रेयस्कर होईल. जे पदार्थ आपण उत्पन्न करितों, किंवा ज्यांचा आपण व्यापार करितों त्या पदार्थांच्या संबंधाचें तेवढें ज्ञान आपणांस प्राप्त झालें ह्मणजे आपलें काम झालें असें नाहीं; तर त्याशिवाय आणखीही बऱ्याच शास्त्रांची माहिती असणें अगत्याचें आहे. कारण हल्लीं अगदीं मोलमजुरी करणारे लोक शिवायकरून बाकीचे बहुतेक सर्व लोक सर्कतीनें एखाद्या मोठ्या व्यापारामध्यें थोडा बहुत तरी पैसा घालितात, तर त्या व्यापारामध्यें ज्या शास्त्राची गरज लागत असेल, त्या शास्त्राची त्यास माहिती असणें अवश्य आहे. विलायती कोळशांच्या खाणींत पैसा घालणारास भूगर्भशास्त्राची माहिती पाहिजे. एकदां खाणींत तांबडा मऊ रेताळ कातळ लागला ह्मणजे त्याच्या खालीं कोळसा सांपडावयाचा नाहीं, ही गोष्ट माहीत नसल्यामुळें हजारों लोक खाणीच्या व्यापारांत पैसा घालून बुडाले आहेत. कित्येक लोकांनीं वाफेच्या यंत्राऐवजीं विद्युत् आणि लोहचुंबक यांच्या योगानें चालणारीं यंत्रें सुरू करण्याच्या कामांत अ-

तोनात पैसा खर्च केला आहे; परंतु वाफेची शक्ति आणि विद्युत् व लोह-चुंबकाकर्षण यांचा परस्परसंबंध व प्रमाण यांचे नियमांचें ज्ञान जर त्यांस माहीत असतें, तर त्यांचा पैसा या कामांत खर्च न होतां पेढीवर पुष्कळ शिल्लक राहिला असता. शास्त्रीयविषयांमध्यें ज्यांचा अभ्यास अगदीं नवीनच सुरू आहे, असे लोकसुद्धां जीं यंत्रें असाध्य आहेत असें सांगूं शकतील, तीं यंत्रें तयार करण्याच्या भरीस पडून कैक लोकांचे यत्न फुकट जात आहेत. फार तर काय, पण असें एकही शहर मिळावयाचें नाहीं, कीं ज्यामधील लोक एखाद्या अघटित कामांत पैसा घालून बुडाले नाहींत.

शास्त्रीयविषयांचें ज्ञान नसल्यानें जर आमचें अगोदरच इतकें नुकसान झालें आहे, तर यापुढें हें ज्ञान नसल्यानें जास्तच नुकसान होण्याचा संभव आहे. अलीकडे शेती आणि कलाकौशल्य यांकडे लोकांचें लक्ष दिवसानुदिवस जास्त लागत चाललें आहे, व एकदां बरेच लोक या धंद्यामध्यें पडून त्यांची धंद्यामध्यें परस्पर चढाओढ सुरू झाली झणजे या संबंधाचें हरएक काम ते शास्त्रीयरीत्या यंत्रानेंच करूं लागतील. तसेंच भागीनें मोठें भांडवल जमवून व मोठमोठ्या मंडळ्या काढून लोक हल्लीं हजारों प्रकारचे व्यापार सुरू करीत आहेत, तर सांप्रतच्या काळामध्यें शास्त्रीय विषयांच्या ज्ञानाखेरीज आपलें क्षणभरही चालावयाचें नाहीं.

यावरून आपल्या शाळांमधून जे विषय मुळीं चालतच नाहींत असें झटलें तरी चालेल, त्याच विषयांचा आपणांस व्यवहारामध्यें नेहमीं उपयोग होतो. शाळेंतील विद्या पुरी झाल्यासारखी झाल्यावर इतर प्रकारची माहिती मिळेल तितकी मिळविण्याच्या कामास लोक लागतात व तसें ते न करितील तर आज आपले सर्व कारखाने बंद पडतील. खासगी रीतीनें अभ्यास करून आपल्या पूर्वजांनीं संपादिलेलें ज्ञान जर आपणांस परंपरेनें प्राप्त झालें नसतें, तर हल्लींचे सर्व कारखाने मुळीं अस्तित्वांतच आले नसते. शाळांमधून जें शिक्षण मिळतें तेंच कायतें शिक्षण अशी जर स्थिति असती, तर इंग्लंददेश आज अगदीं पूर्वीच्या रानटी स्थितींत असता. सृष्टींतील गोष्टींचे नियम आपणांस कळत चालल्यामुळें बहुतकरून प्रत्येक

वस्तूचा आतां आपणांस उपयोग करितां येऊं लागला आहे, व पूर्वी राजालाहुद्धां जें सुख मिळत नसे, तें हल्लीं केवळ मोलमजुरी करणारासही मिळत आहे; हें सर्व सुख ठरविलेल्या इयत्तांप्रमाणें प्रत्येक तासास घंटा वाजवून शाळांमधून चालत असलेल्या अभ्यासानें होत आहे काय? ज्या ज्ञानाच्या योगानें सांप्रतची उच्चस्थिति प्राप्त झाली आहे, तें ज्ञान आपण कोनाकोपऱ्यामध्यें बसून शिकावें व धडधडीत पाट्या मारून जेथें अभ्यास चालला आहे त्या ठिकाणीं ठरींव निरर्थक गोष्टींचा घोष चालावा. वाहवा! एकून आमच्या शाळांमधून सुरू असलेली शिक्षण पद्धति फारच योग्य आहे खरी!

येथपर्यंत पूर्वी सांगितलेल्या वर्गीकरणाच्या पहिल्या दोन वर्गांतील कृत्यांविषयीं विवेचन झालें. आतां आपणांस तिसरे वर्गांतील कृत्यांचा झणजे मुलांबाळांसंबंधीं आपल्या कर्तव्याचा विचार करणें आहे. खरोखर या संबंधाची आपली बिलकुल तयारी नसते असें झणणें भाग आहे. समजा कीं असा एक चमत्कार घडून आला कीं त्याच्या योगानें आमच्या नंतर पुष्कळ वर्षांनीं होणारे लोकांस आमचीं फक्त पुस्तकें आणि परीक्षेच्या प्रश्नांचे कागद एवढेंच कायतें उपलब्ध झालें; आतां जर कोणी त्यावेळच्या प्राचीन शोध करणारानें हे कागद चाळिले, तर त्यांमध्यें त्याला आमच्या वेळच्या विद्यार्थ्यांपैकीं कोणी पुढें संसारी होऊन त्यास पुढें मुलेंबाळें वगैरे होण्याचा संभव होता, अशाप्रकारचा उल्लेख त्यास खात्रीनें मिळणार नाहीं. बिचारा तो घोटाळ्यांत पडेल आणि झणेल कीं हीं सर्व पुस्तकें आणि कागद या वेळच्या ब्रह्मचर्यव्रत धारण करणारे विद्यार्थ्यांचीं असावीं; तो झणेल कीं, चांगली मेहनत घेऊन निरनिराळ्या पुष्कळ विषयांमध्यें यांनीं चांगली तयारी केली आहे; विशेषेंकरून समूळ नाहींशा झालेल्या व त्यावेळीं सुरू असलेल्या इतर लोकांच्या भाषांचा अभ्यास ह्यांनीं उत्तम केला आहे, (ह्यावरून इतकें समजावयाचें कीं, ह्या लोकांच्या स्वताच्या भाषेंत वाचण्यासारखीं पुस्तकें नव्हतीं); परंतु मुलांबाळांचें पालनपोषण व विद्याभ्यास ह्या संबंधानें कोठें चकार शब्दही आढळत नाहीं. अशा महत्वाच्या विषयाच्या संबंधानें ते चार शब्दही लिहिणार नाहींत इतके मूर्ख ते लोक असतील असें दिसत नाहीं. यावरून सहज असा तर्क

होतो कीं, हीं पुस्तकें आणि हे सर्व कागद त्यावेळच्या कोणी मठवासी महंतांनीं विद्यार्थ्यांकरितां लिहिलेले असावे.

खरोखर मुलांना होणारें सर्व सुखदुःख व त्यांचें हरएक प्रकारें बरें वाईट होणें हीं अगदीं त्यांस लहानपणीं मिळालेल्या शिक्षणावर अवलंबून आहेत. असें जर आहे तर भावी आईबापांस आपल्या मुलांचें पालनपोषण कसें करावें ह्याविषयीं उपदेशाचे चार शब्द मिळूं नयेत ही गोष्ट चमत्कारिक दिसते. पुढील संततीचें सर्व प्रकारचें बरें वाईट होणें केवळ पूर्वीपासून अविचाराच्या चालत आलेल्या चाली, लोकांचे कल, अज्ञान दाइचे विचार, आणि ह्याताऱ्या आऊच्या कोत्या समजुती, ह्यांवरच सर्वस्वी अवलंबून असावें हें विलक्षण दिसत नाहीं काय ? हिशेबाची आणि जमाखर्चाची माहिती अगदीं नसून जर कोणी व्यापार करूं लागला तर त्याच्या वेडेपणाला आपण हंसतों, आणि असा तर्क करितों कीं, ह्याचा हा व्यापार आंतबट्ट्याचा होणार. शारीरशास्त्राचें मुळींच ज्ञान नसतांना जर कोणी शस्त्रवैद्याचें काम करूं लागला, तर त्याच्या फाजीलपणाचें आपणांस नवल वाटतें आणि ज्यांच्यावर ह्याच्या शस्त्रांचा प्रयोग होणार त्यांची आपणांस खचीतच दया येते. परंतु आईबापांनीं शारीरिक व मानसिक शक्तींची यत्किंचितही माहिती नसतांना मुलांचें पालनपोषण व विद्याभ्यास इत्यादि कामांस लागावें, ह्याचें आपणांस मुळींच नवल वाटत नाहीं, व त्या मुलांबाळांचें पुढें काय होईल ह्याविषयीं त्यांच्या मनांत अगदीं कधींही विचार येत नाहींत हें चमत्कारिक नव्हे काय ?

आईबापांस आरोग्यरक्षणाचे नियम माहीत नसल्यामुळें मुलांच्या प्रकृतीस किती धक्का पोहोंचतो हें जाणण्याची कोणाची इच्छा असेल, तर त्यानें सभोंवतालच्या स्थितीचें क्षणभर अवलोकन केलें ह्मणजे झालें. आधीं हजारों मुलें तर अगदीं लहानपणींच मरून जातात ; लक्षावधि मुलें पुढें अशक्त निपजतात ; आणि कोट्यावधि मुलांची प्रकृति जशी असावी तशी धट्टीकट्टी असत नाहीं. मुलाला ज्याप्रमाणें लहानपणीं जतन व शिक्षण मिळेल त्याप्रमाणें पुढें त्याला जन्मभर सुख किंवा दुःख होईल ; व हल्लीं आपल्या हातून मुलांची जी जतन होते व त्यांना जें शिक्षण मिळतें त्यांत एक गुण असला तर वीस दोष असतात;

ह्या दोन्ही गोष्टी मनांत आणिल्या ह्मणजे लहानपणीं मुलांचें पालन-पोषण व विद्या हीं आपण अगदीं अविचारानें दैवावर टाकिल्यानें काय नुकसान होतें, ह्याचा आपणांस थोडाबहुत अंदाज करितां येईल. आंगांत चांगले मजबूत व ऊबदार कपडे असल्याखेरीज त्यांस थंडीवाऱ्यांत फिरूं देणें व त्याच्या योगानें त्यांचे हातपाय फुटूं देणें हें योग्य आहे किंवा नाहीं ह्याविषयीं कोणी विचार करीत नाहीं; परंतु हा विचार करणें जरूर आहे; कारण मुलांचे भावी सुखदुःखाशीं ह्याचा अगदीं निकट संबंध आहे. मुलें पुढें रोगी होतात, त्यांची वाढ खुंटते, त्यांच्या आंगांत चांगली ताकद राहत नाहीं, व भरतारुण्यामध्यें जो तकवा त्यांच्या आंगांत दिसावा तो दिसत नाहीं. हे सर्व आपल्या हयगयीचे परिणाम होत, व हे होत गेल्यानें आयुष्यांतील कोणतींच कृत्यें सुरळीतपणें न चालून त्यांच्या पुढील सर्व सुखांस व्यत्यय येतो. मुलांना नेहमीं एकाच प्रकारचें व हलकें अन्न खावयास द्यावें असें लोक ह्मणतात ह्याला कांहीं कारण आहे, किंवा पूर्वापार अशा प्रकारचें अन्न मुलांस देत आले ह्मणून? ह्यांत कांहीं अर्थ असेल तर मग ठीक आहे, नाहीं तर आपल्या चुकीचें प्रायश्चित्त विनाकारण त्या बिचाऱ्या मुलांस मोठेपणीं करीत बसावें लागतें. तसेंच मुलांना जर आरडाओरडीचे व उनाडकीचे खेळ खेळूं दिले नाहींत किंवा आंगांत घालावयास नाहीं ह्मणून त्यांस बाहेर जाऊं न दिलें, तर तीं व्हावीं तितकीं सशक्त व कंटक होणार नाहींत. मुलेंबाळें रोगी व अशक्त निपजलीं ह्मणजे आपलें दुर्दैव किंवा कांहीं तरी आपल्यावर ईश्वराचा कोप आहे असें लोक बहुतकरून समजतात; किंवा ह्या गोष्टी आपल्या स्वाधीनच्या नाहींत, सर्व ईश्वरीसूत्राप्रमाणें घडून यावयाचें असें ह्मणून ते उगीच बसतात. परंतु असें करणें ह्मणजे मोठा वेडेपणा आहे, हें कोणीही विचारी मनुष्य कबूल करील. खचित कधीं कधीं आईबापांच्या चैनी व ढंग मुलांस नडतात हें जरी खरें आहे, तथापि त्यांचा लहानपणीं खाण्यापिण्याचा वगैरे नीट बंदोबस्त न ठेविल्यानें त्यांच्या प्रकृति बिघडतात, असेंच फार वेळां घडून येतें. खरोखर आह्मांला तर असें वाटतें कीं, मुलांना जे हाल, कष्ट व विपत्ति काढाव्या लागतात, त्यांस पुष्कळ अंशीं आईबापेंच कारण आहेत. लहानपणीं मुलांस अन्नवस्त्र वगैरे देण्याचा पतकर आई-

बापांनीं आपल्या कडेसच घेतल्यासारखा आहे; बरें त्यांच्या खाण्या-पिण्याची व्यवस्था जी तीं ठेवितात, तिच्या योगानें त्यांच्या शरीरप्रकृतींवर काय परिमाण होतात ह्याची त्यांना कांहीं माहिती नसते; ह्याप्रमाणें आरोग्य-रक्षणाच्या अगदीं साधारणही गोष्टी आईबापांस माहीत नसल्यामुळें मुलांच्या प्रकृति दिवसानुदिवस क्षीण होत जातात; व असा क्रम चाल-ल्यानें मुलांस व त्यांस पुढें होणाऱ्या संततीस कांहीं भयंकर रोग जडून तीं पुढें अकालीं मृत्यूच्या मुखांत पडल्याचीं उदाहरणें घडून आलीं आहेत. अशा प्रकारचें अनर्थ केवळ आईबापें मुलांच्या संगोपनाकडे दुर्लक्ष करितात ह्मणून होतात; आतां हें त्यांचें दुर्लक्ष्य बुद्धिपुरःसर नसतें हें खरें; तसें असतें तर त्यांस आह्मी आईबापें न ह्मणतां तीं कोणी त्या मुलांचीं अन्यजन्मींचीं वैरी आहेत असेंच ह्मटलें असतें.

मुलांस चांगली नीति लागावी, ह्मणून जें त्यांस आह्मीं लहानपणीं शिक्षण देतों, त्यांत सुद्धां अशाच प्रकारचा घोटाळा दिसून येतो. ज्या-अर्थी लहानपणीं मुलांचा सर्व संबंध आईपाशींच असतो, त्याअर्थी नीति-शिक्षणाचा पहिला धडा त्यांस आईकडूनच मिळतो. बरें ती आई निदान पहिल्या मुलाच्या वेळेस तरी बहुधा स्वतां पोरच असते, व त्या-मुळें तिला जगाचा अनुभव अगदीं बातांबेताचाच असतो. शिवाय आमच्या स्त्रियांची शिक्षणाच्या संबंधानें स्थिति पाहिली तर फारच शोच-नीय आहे. त्यांपैकीं बहुतेक अगदीं अडाणी व अशिक्षितच असतात. त्यांनीं शाळेचें तोंड तर कधींच पाहिलेलें नसतें; व पुस्तकाची व त्यांची तर बहुधा ओळखच नसते. अलीकडे कोठें मोठमोठ्या शहरांतून कांहीं मुली शाळेंत जातांना नजरेस पडतात व ह्या पुढें मोठ्या झाल्या ह्मणजे आपल्या ज्ञानाच्या योगानें मुलांबाळांस नीतीचें वगैरे योग्य वळण ला-वून देण्यास समर्थ होतील असें कदाचित् कित्येकांस वाटेल. परंतु त्या मुलींस सांप्रत शाळांमध्यें कोणत्या प्रकारचें शिक्षण मिळत असतें ही गोष्ट मनांत आणिली ह्मणजे त्यांस तसें वाटण्याचें कांहीं एक कारण नाहीं असें ह्मणावें लागतें. त्या शाळेंत असतांना जें काय शिकतात तें सन, शक, किंवा नांवें. ह्यांच्या योगानें त्यांची स्मरणशक्ति कदाचित् सुधारत असेल ह्या पलीकडे कांहीं नाहीं. ह्यांस शाळेमध्यें विचार करण्याचें काम बहुधा पडत नसल्यामुळें त्यांच्या विचारशक्तीस यत्किंचितही

ह्या दोन्ही गोष्टी मनांत आणिल्या ह्मणजे लहानपणीं मुलांचें पालन-पोषण व विद्या हीं आपण अगदीं अविचारानें दैवावर टाकिल्यानें काय नुकसान होतें, ह्याचा आपणांस थोडाबहुत अंदाज करितां येईल. आंगांत चांगले मजबूत व ऊबदार कपडे असल्याखेरीज त्यांस थंडीवाऱ्यांत फिरूं देणें व त्याच्या योगानें त्यांचे हातपाय फुटूं देणें हें योग्य आहे किंवा नाहीं ह्याविषयीं कोणी विचार करीत नाहीं; परंतु हा विचार करणें जरूर आहे; कारण मुलांचे भावी सुखदुःखाशीं ह्याचा अगदीं निकट संबंध आहे. मुलें पुढें रोगी होतात, त्यांची वाढ खुंटते, त्यांच्या आंगांत चांगली ताकद राहत नाहीं, व भरतारुण्यामध्यें जो तकवा त्यांच्या आंगांत दिसावा तो दिसत नाहीं. हे सर्व आपल्या हयगयीचे परिणाम होत, व हे होत गेल्यानें आयुष्यांतील कोणतींच कृत्यें सुरळीतपणें न चालून त्यांच्या पुढील सर्व सुखांस व्यत्यय येतो. मुलांना नेहमीं एकाच प्रकारचें व हलकें अन्न खावयास द्यावें असें लोक ह्मणतात ह्याला कांहीं कारण आहे, किंवा पूर्वापार अशा प्रकारचें अन्न मुलांस देत आले ह्मणून? ह्यांत कांहीं अर्थ असेल तर मग ठीक आहे, नाहीं तर आपल्या चुकींचें प्रायश्चित्त विनाकारण त्या बिचाऱ्या मुलांस मोठेपणीं करीत बसावें लागतें. तसेंच मुलांना जर आरडाओरडीचे व उनाडकीचे खेळ खेळूं दिले नाहींत किंवा आंगांत घालावयास नाहीं ह्मणून त्यांस बाहेर जाऊं न दिलें, तर तीं व्हावीं तितकीं सशक्त व कंटक होणार नाहींत. मुलेंबाळें रोगी व अशक्त निपजलीं ह्मणजे आपलें दुर्दैव किंवा कांहीं तरी आपल्यावर ईश्वराचा कोप आहे असें लोक बहुतकरून समजतात; किंवा ह्या गोष्टी आपल्या स्वाधीनच्या नाहींत, सर्व ईश्वरीसूत्राप्रमाणें घडून यावयाचें असें ह्मणून ते उगीच बसतात. परंतु असें करणें ह्मणजे मोठा वेडेपणा आहे, हें कोणीही विचारी मनुष्य कबूल करील. खचित कधीं कधीं आईबापांच्या चैनी व ढंग मुलांस नडतात हें जरी खरें आहे, तथापि त्यांचा लहानपणीं खाण्यापिण्याचा वगैरे नीट बंदोबस्त न ठेविल्यानें त्यांच्या प्रकृति बिघडतात, असेंच फार वेळां घडून येतें. खरोखर आह्मांला तर असें वाटतें कीं, मुलांना जे हाल, कष्ट व विपत्ति काढाव्या लागतात, त्यांस पुष्कळ अंशीं आईबापेंच कारण आहेत. लहानपणीं मुलांस अन्नवस्त्र वगैरे देण्याचा पतकर आई-

बापांनीं आपल्या कडेसच घेतल्यासारखा आहे; बरें त्यांच्या खाण्या-पिण्याची व्यवस्था जी तीं ठेवितात, तिच्या योगानें त्यांच्या शरीरप्रकृतींवर काय परिमाण होतात ह्याची त्यांना कांहीं माहिती नसते; ह्याप्रमाणें आरोग्य-रक्षणाच्या अगदीं साधारणही गोष्टी आईबापांस माहीत नसल्यामुळें मुलांच्या प्रकृति दिवसानुदिवस क्षीण होत जातात; व असा क्रम चाल-ल्यानें मुलांस व त्यांस पुढें होणाऱ्या संततीस कांहीं भयंकर रोग जडून तीं पुढें अकालीं मृत्यूच्या मुखांत पडल्याचीं उदाहरणें घडून आलीं आहेत. अशा प्रकारचे अनर्थ केवळ आईबापें मुलांच्या संगोपनाकडे दुर्लक्ष करितात ह्मणून होतात; आतां हें त्यांचें दुर्लक्ष्य बुद्धिपुरःसर नसतें हें खरें; तसें असतें तर त्यांस आह्मी आईबापें न ह्मणतां तीं कोणी त्या मुलांचीं अन्यजन्मींचीं वैरी आहेत असेंच ह्मटलें असतें.

मुलांस चांगली नीति लागावी, ह्मणून जें त्यांस आह्मीं लहानपणीं शिक्षण देतों, त्यांत सुद्धां अशाच प्रकारचा घोटाळा दिसून येतो. ज्या-अर्थी लहानपणीं मुलांचा सर्व संबंध आईपाशींच असतो, त्याअर्थी नीति-शिक्षणाचा पहिला धडा त्यांस आईकडूनच मिळतो. बरें ती आई निदान पहिल्या मुलाच्या वेळेस तरी बहुधा स्वतां पोरच असते, व त्या-मुळें तिला जगाचा अनुभव अगदीं बाताबेताचाच असतो. शिवाय आमच्या स्त्रियांची शिक्षणाच्या संबंधानें स्थिति पाहिली तर फारच शोच-नीय आहे. त्यांपैकीं बहुतेक अगदीं अडाणी व अशिक्षितच असतात. त्यांनीं शाळेचें तोंड तर कधींच पाहिलेलें नसतें; व पुस्तकाची व त्यांची तर बहुधा ओळखच नसते. अलीकडे कोठें मोठमोठ्या शहरांतून कांहीं मुली शाळेंत जातांना नजरेस पडतात व ह्या पुढें मोठ्या झाल्या ह्मणजे आपल्या ज्ञानाच्या योगानें मुलांबाळांस नीतीचें वगैरे योग्य वळण ला-वून देण्यास समर्थ होतील असें कदाचित् कित्येकांस वाटेल. परंतु त्या मुलींस सांप्रत शाळांमध्यें कोणत्या प्रकारचें शिक्षण मिळत असतें ही गोष्ट मनांत आणिली ह्मणजे त्यांस तसें वाटण्याचें कांहीं एक कारण नाहीं असें ह्मणावें लागतें. त्या शाळेंत असतांना जें काय शिकतात तें सन, शक, किंवा नांवें. ह्यांच्या योगानें त्यांची स्मरणशक्ति कदाचित् सुधारत असेल ह्या पलीकडे कांहीं नाहीं. ह्यांस शाळेमध्यें विचार करण्याचें काम बहुधा पडत नसल्यामुळें त्यांच्या विचारशक्तीस यत्किंचितही

प्रागल्भ्य आलेलें नसतें. मुलांच्या कोमल मनास कोणत्या प्रकारचें शिक्षण असलें पाहिजे ह्या गोष्टींचें ज्ञान त्यांस मुळींच आलेलें नसतें; मग एखादी नवीन शिक्षणपद्धति स्वतः शोधून काढण्याचें तर बोलावयासच नको. बरें पुढें त्यांनीं एकदां शाळा सोडिली ह्मणजे पाहिलें मूल होईपर्यंत त्यांचीं मधलीं वर्षें शिवणकाम शिकणें, काशिदा काढणें, लोंकरीचें काम करणें, व कादंबऱ्या वाचणें ह्यांमध्यें जातात. तशांत ह्यांपैकीं एखादीचा नवरा जर तसाच गुलहौशी व शिकलेला असला, तर तिचा हा मधला वेळ कदाचित् इंग्लिश तऱ्हेचीं वाद्यें वाजविणें व क्वचित् सभा मेजवान्या थाटणें यांतही जातो. खरोखर आमच्या अलीकडील मंडळी-मध्यें बहुधा असा एकही मनुष्य आढळावयाचा नाहीं, कीं ज्यानें आपल्या बायकोकरितां लोंकर रेशिम वगैरे जिनसा विकत घेण्यामध्यें निदान एक दोन रुपये तरी खर्च केले नाहींत. ह्याप्रमाणें आमच्या ज्या कांहीं थोड्या शिकलेल्या स्त्रिया आहेत, त्यांच्या शिक्षणाची स्थिति आहे; त्यामध्यें मुलांस लहानपणीं सन्मार्गाचें वळण लावण्यास उपयोगी पडण्यासारखें कांहीं नसतें असें ह्मटलें तरी चालेल. ह्मणजे आमच्या अडाणी किंवा शिकलेल्या दोन्ही प्रकारच्या स्त्रियांच्या आंगीं आपल्या मुलांस लहानपणीं कोणत्या प्रकारचें शिक्षण दिलें पाहिजे, ह्या ज्ञानाचा गंधही नसतो. ह्यावरून आमच्यापैकीं कोणतीही स्त्री घेतली तरी तिला पहिलें मूल होण्याच्यावेळीं आई होणें ह्मणजे काय ह्याची कल्पनाही नसते, किंवा आईच्या संबंधानें आपलीं कर्तव्यकर्में करण्याची यत्किंचित्ही योग्यता तिजमध्यें नसते असें ह्मणतां येईल. अशाच प्रकारच्या आईशीं त्या मुलाची पहिल्यानें गांठ पडावयाची. लहानपणीं मुलांचीं मनें कशीं असतात व त्यांस कोणत्या प्रकारचें वळण दिलें पाहिजे ह्याविषयीं तिला अगदीं ज्ञान नसून ती मुलांचीं मनें सुधारण्याच्या कामास लागणार; व हें काम असें आहे कीं जरूर ती माहिती असूनही तें नीटपणीं तडीस जाण्याची मुष्कील. तर अशा कामामध्यें तिला कसें काय यश येईल ह्याचा विचार वाचकांनींच करावा. मनोवृत्ति ह्मणजे काय, त्या एकामागून एक कशा निर्माण होतात, त्यांचीं कामें कोणतीं, त्यांचा कोठपर्यंत उपयोग होतो, व त्या कोणत्या थरास गेल्या ह्मणजे वाईट, वगैरेचें ज्ञान तिला नसतें. तिची अशी समजूत असते कीं, कांहीं मनोवृत्ति सर्वांशीं चां-

गल्या व कांहीं सर्वांशीं वाईट; परंतु असा प्रकार बिलकुल नाहीं. ह्या-प्रमाणें मनोधर्माच्या स्वरूपाचें ज्ञान नसल्यामुळें अर्थात् आपले शिक्षणानें मुलांचे मनावर काय परिणाम होतील, हें तिला कळत नाहीं; तर अशा आईच्या शिक्षणापासून अनर्थ न व्हावे, तर दुसरें व्हावें तरी काय? निरनिराळ्या मानसिक प्रवृत्तींचें स्वरूप काय, त्या कशा उत्पन्न होतात व त्यांचीं फळें काय याचें ज्ञान नसल्यानें तिच्या शिक्षणापासून कांहीं उपयोग न होतां उलट त्यापासून अपाय मात्र होतो. ह्यामुळें तिचें शिक्षण मुळींच नसतें तर बरें झालें असतें असें म्हणणें भाग पडतें. मुलें जीं कृत्यें नेहमीं करावयाचींच व जीं त्यांच्या हिताचींच असतात अशा कृत्यांस ती आड येते; अशानें नेहमीं मुलें चिडखोर निपजून त्यांचें नुकसान होतें; व पुढें मायलेकरांचीं परस्परांविषयीं मनें बिघडून त्यांच्यामध्यें वितुष्ट येतें. जीं कृत्यें मुलांनीं करावीं असें तिच्या मनांत असेल तीं कृत्यें त्यांस कांहीं दहशत घालून, लालुच दाखवून, किंवा त्यांच्या मनांत वाहवा म्हणून घेण्याची इच्छा जागृत करून त्यांजकडून ती करून घेते.ह्याप्रमाणें आंतील मतलब कांहींही असो, वागणें बाह्यात्कारी चांगलें असलें म्हणजे झालें, असा तिचा समज असल्यामुळें मुलेंही पुढें तेंच शिकून ढोंगी, खोटसाळ, भित्रीं, आणि आ-पलपोटीं निपजतात; त्यांच्या आंगीं पापभीरुपणा व सौजन्य हीं कशीं तीं राहतच नाहींत. इकडे ती मुलांस नेहमीं खरें बोलावें असें सांगत असते, व न बोललास तर जी शिक्षा करीन म्हणून तोंडानें म्हणते ती शिक्षा कधी-ही अमलांत आणीत नाहीं, हाच तिचा कित्ता वळवून मुलें इकडे खोटें बोलावयास शिकत असतात. नेहमीं आत्मसंयमन करावें असा मोठ्या थाटानें मुलांस उपदेश करीत असते व अगदीं क्षुल्लक कारणावरून तिच्या आंगाचा अगदीं तिळपापड होतो, हें मुलें नेहमीं पाहतच असतात. ज्याप्र-माणें मोठेपणीं जगांतील व्यवहारामध्यें बरे वाईट कृत्यांचे बरे वाईट परिणाम जसे व्हावयाचे तसे होऊं देणें हाच शिक्षणाचा उत्तम क्रम होय, त्याप्रमाणेंच लहानपणीं मुलें चांगल्या मार्गास लागावीं म्हणून त्यांच्या-वर जी आपण शिस्त ठेवितों तीमध्यें ही मुख्यत्वेंकरून हाच क्रम असला पाहिजे, व हाच त्यांच्यावर उत्तम प्रकारचा धाक होय, ही गोष्ट आईच्या स्वप्नींही नसते. ह्याप्रमाणें तिचे विचार कार्यकारण-

भाव मनांत आणून ठरलेले नसल्यामुळें आणि मुलांच्या मनाच्या भिन्न भिन्न स्थितींस अनुसरून त्या धोरणानें त्यांच्याशीं वर्तन ठेवण्याचें तिच्या आंगीं सामर्थ्य नसल्यामुळें तिचा धाक मनास येईल तसा, आज असा उद्यां तसा, ह्या प्रकारचा असतो व त्यापासून मुलें बिघडण्याचा संभव असतो. परंतु जसजशी मुलांची समजूत वाढत जाते तसतसा त्यांच्या मनाचा कल एकंदर मनुष्यजातीच्या वळणावर विशेष जात असतो; ह्यामुळें त्यांवर किरकोळ गोष्टींचे परिणाम फारसे घडून येत नाहींत व आईच्या शिक्षणापासून मुलें जितकीं बिघडावींशीं वाटतात तितकीं बिघडत नाहींत.

आतां मुलांच्या बुद्धीची वाढ चांगली व्हावी ह्मणून त्यासंबंधानें लोक काय व्यवस्था ठेवितात, तें पाहूं या. यांत तरी वरीलप्रमाणेंच घोटाळा नाहीं काय? बुद्धीच्या संबंधानें सर्व गोष्टी नियमित असतात व बुद्धीची सुधारणा कांहीं नियमांस अनुसरूनच होते, असें मानलें तर या नियमांचें ज्ञान असल्याखेरीज मुलांच्या विद्येची व्यवस्था आपणांस नीट रीतीनें ठेवितां येणार नाहीं हें स्पष्ट आहे. मुलांस विचार करावयास किंवा नवीन गोष्टींचें ज्ञान संपादन करावयास शिकविण्याची रीति कशी असली पाहिजे हें समजल्याशिवाय आपणांस तें काम नीटपणें करितां येईल असें समजणें ह्मणजे वेडेपणा होय; परंतु आमच्या शाळांमध्यें व घरीं हा वेडेपणाचाच प्रकार अगदीं धडधडीत सुरू आहे. यास्तव आह्मी असें ह्मणतों कीं, आमच्यामध्यें हल्लीं सुरू असलेला शिक्षणक्रम फारच गैर आहे. आईबापांची गोष्ट राहूं द्या, परंतु पुष्कळ विद्वान् ह्मणविणाऱ्या शिक्षकांसही मन ह्मणजे काय, मुख्य मानसिक शक्ति कोणत्या, त्यांचे गुणधर्म काय आहेत, वगैरे गोष्टींचें ज्ञान अगदीं नसतें असें ह्मटलें तरी चालेल. अशी जर स्थिति आहे तर सध्यां सुरू असलेली शिक्षणपद्धति दूषितच असली पाहिजे हें उघड आहे. तीमध्यें मुलांस काय शिकवावें आणि तें कसें शिकवावें ह्या दोन्ही गोष्टींच्या संबंधानें अत्यंत शोचनीय दोष दृष्टोत्पत्तीस येतात. हल्लीं मुलांस जरूर त्या गोष्टी कोणी शिकवीत नाहींत, भलत्याच गोष्टी भलत्याच क्रमानें त्यांच्या डोक्यांत कोंदितात, असाच प्रकार आपले नजरेस येतो. पुस्तकांपासून संपादिलेलें ज्ञान हीच काय ती विद्या असा आई-

वाचनालय, बालार

बापांचा समज असल्यामुळें मुलांच्या हातीं लहानपणींच आईबापें पुस्तकें देऊन त्यांच्या सर्व विद्येचा विघाड करितात. ज्ञान मिळविण्याचीं साक्षात् साधनें नसतील, तरच पुस्तकांचा उपयोग करावयाचा, ज्ञान संपादनाच्या कामीं स्वतांचे हात टेंकल्यासारखे झाल्यावर दुसऱ्याची मदत घ्यावयाची आणि म्हणूनच पुस्तकें हीं ज्ञान संपादन करण्याचीं गौण साधनें होत, इत्यादि गोष्टी शिक्षकाच्या मनांत नीटपणीं ठरलेल्या नसल्यामुळें त्यांची इच्छा मुलांनीं नेहमीं स्वतांच्या हातांनीं न जेवतां लोकांच्या हातांनींच जेवावें अशासारखी असते. लहानपणीं मुलांस आपोआप जें ज्ञान प्राप्त होत असतें तेंच ज्ञान अत्यंत महत्वाचें होय. शिवाय मुलांच्या आंगीं लहानपणीं जी अनावर शोधकबुद्धि दिसून येते तिजकडे दुर्लक्ष होत गेल्यामुळें तिची वाढ खुंटते, तर तसें होऊं न देतां तिचा पूर्णपणें विकास होऊं देण्यास आपण झटलें पाहिजे. ह्या आणि अशाच दुसऱ्या गोष्टी त्यांच्या लक्षांत न आल्यामुळें मुलांस लहानपणीं ज्या गोष्टी समजत नाहींत, किंवा ज्या गोष्टींकडे त्यांचा कल नसतो, अशा गोष्टी त्यांच्या नजरेपुढें आणण्याचा व मनांत भरविण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. प्रत्यक्षज्ञानापेक्षां प्रतिबिंबितज्ञानाच्या ते विशेष भजनीं लागून घर, दार, परसूं, परडें, ह्यांतील वस्तूंचें ज्ञान मुलांस पूर्णपणें झाल्यानंतर ह्यापलीकडील ज्ञान संपादण्याचीं साधनें जीं पुस्तकें तीं मुलांच्या हातीं द्यावयाचीं, व तोंपर्यंत मुलांची व पुस्तकांची ओळख होतांच कामा नये हें त्यांस समजत नाहीं. प्रत्यक्ष अनुभवानें मिळविलेलें ज्ञान अनुभवपरंपरेनें मिळविलेल्या ज्ञानापेक्षां जास्त योग्यतेचें आहे, एवढ्याकरितांच असें करावयाचें असें कोणी समजूं नये. तर आपला एकंदर वस्तूंविषयींचा पूर्वीचा अनुभव जसा असेल, त्याचप्रमाणानें पुस्तकांतील तद्दाचक शब्दांच्या सांकेतिक अर्थाचा यथार्थ बोध आपणांस व्हावयाचा, म्हणूनही आपणांस हा क्रम ठेवणें इष्ट आहे. दुसरें असें आहे कीं, हा ज्ञानसंपादन करण्याचा ठरींव क्रम आपण फार लवकर सुरू करितों, व पुढें तो चालला असतां ज्या नियमांस अनुसरून मानसिक शक्ति वृद्धिंगत होतात, त्या नियमांकडे आपलें थोडेंच लक्ष असतें. मूर्त विषयांचें ज्ञान प्रथम व अमूर्त विषयांचें ज्ञान मागाहून हाच क्रम ज्ञानसंपादन करण्यामध्यें असला

पाहिजे. परंतु इकडे कोणी लक्ष देत नाहीं. पहा, व्याकरण हा अत्यंत अमूर्त आणि गहन विषय आहे, तर ह्याचा अभ्यास जाणतेपणींच झाला पाहिजे; परंतु मुलांचा व्याकरणाचा घोष अगदीं लहानपणापासून सुरू होतो. तसेंच मुलांस लहानपणीं भूगोलविद्या ज्या क्रमानें शिकवितात, तो क्रमही बऱ्याच अंशीं चुकीचा आहे. निरनिराळ्या खंडांचे व देशांचे राजकीय व्यवस्थेकरितां जे विभाग केले आहेत, त्यांचीं नांवें वगैरे शुष्क गोष्टी मुलांस अगदीं लहानपणींच शिकवूं लागतात, परंतु त्या त्यांस अगदीं कंटाळवाण्या वाटून त्यांकडे त्यांचें लक्ष लागत नाहीं. वास्तविक रीतीनें ह्या गोष्टींचा अभ्यास जरा जाणतेपणीं सामाजिक विषयांच्या अभ्यासाबरोबर सुरू झाला पाहिजे. बरें, पृथ्वीचें स्वरूप, आकार, वगैरे ज्या गोष्टी मुलांस समजण्यासारख्या व ज्यांत त्यांचा बराच भरही असतो त्या गोष्टी कोणी त्यांस फारशा शिकवीत नाहीं. ह्याप्रमाणें जे विषय मुलांना शिकवितात त्यांमध्यें योग्य क्रम नसतो. प्रत्यक्ष प्रमाणें, व्याख्या, आणि नियम हीं, सृष्टिक्रमामध्यें ज्याप्रमाणें प्रत्येकवस्तुविषयक अवलोकन झाल्यानंतर सहजीं व्यक्त होतात, त्याप्रमाणें आमच्या शिक्षणामध्यें ही तीं तशींच व्यक्त झालीं पाहिजेत. परंतु अशा प्रकारच्या सर्व गोष्टी ग्रंथारंभीं घालण्याचा पाठ आहे. ह्याप्रमाणें ह्या पोपटपंची शिक्षणक्रमानें आमचा सर्वथैव घोटाळा करून टाकला आहे. मुलांचीं ज्ञानेंद्रियें लहानपणीं कुंठित झाल्यामुळें पुढें तीं अगदीं मंद होतात. पुस्तकांमध्यें त्यांचें मन अगदीं जुलमानें जखडून टाकलेलें असतें; विषय समजण्याची योग्यता अंगीं आल्याशिवाय त्यांस ते विषय शिकविणें, आणि ज्या गोष्टींवरून आपण सर्वसाधारण नियम बसवितों, त्या गोष्टी त्यांस समजावून दिल्याखेरीज एकदम ते नियम त्यांस सांगून देणें, ह्या दोन्ही गोष्टींमुळें त्यांच्या बुद्धीची अगदीं गडबड उडून जाते. स्वतां विचार व शोध करून ज्ञान संपादन करण्याचें त्यांस माहीत नसल्यामुळें, विद्यार्थी म्हणजे दुसऱ्याच्या विचारांचें केवळ एक सांडवण बनतो. मानसिक शक्तींवर लहानपणींच अभ्यासाचा विशेष भार पडल्यामुळें त्या अगदीं चुरून जातात. अशी स्थिति असल्यामुळें पुष्कळ मुलें व्हावीं तितकीं हुशार व विद्वान् होत नाहींत. एकदां त्यांच्या परीक्षा आटोपल्या म्हणजे वाचनसुद्धां आटोपलेंच. संपादन

केलेल्या ज्ञानामध्यें कांहीं व्यवस्था नसल्यामुळें त्यांतील बहुतेक लवकरच लयास जातें, व बाकी कांहीं राहतें तें उगाच जीव भरून असतें नसतें. कारण व्यवहारामध्यें ज्ञानाचा कसा उपयोग करावा हें त्यांस माहीत नसतें. सूक्ष्मरीतीनें शोध करण्याची, किंवा स्वतंत्र रीतीनें विचार करण्याची शक्ति त्यांच्या आंगीं थोडीच राहते. बरें, इतकें असूनही पहावयाला गेलें, तर शिकविलेल्या ज्ञानापैकीं पुष्कळ ज्ञानाचा व्यवहारामध्यें उपयोग बेतावाताचाच होतो. सारांश अत्यंत महत्त्वाचें आणि उपयुक्त असें ज्ञान मुलांच्या शिक्षणक्रमांतून गाळलेलेंच असतें, असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

अशी मुलांच्या शिक्षणाची स्थिति आहे, व ती तशीच असावयाची हें आईबापांच्या स्थितीवरून अनुमानानेंही समजण्यासारखें आहे. मुलें सशक्त नीतिमान् आणि बुद्धिमान् व्हावीं ह्मणून त्यांस आह्मी जें शिक्षण देतों, त्यांत फारच मोठे दोष आहेत. व अशी स्थिति असण्यास पुष्कळ अंशीं आईबापच कारण आहेत; कारण शिक्षण योग्य रीतीनें वठण्यास जें ज्ञान अवश्य लागतें, त्या ज्ञानाचा त्यांच्या अंगीं लेशही नसतो. एखादा बिकट प्रश्न सोडविण्यास जे नियम लागतात, ते नियम ज्याच्या कधीं अवलोकनांत नाहींत, असा मनुष्य जर तो प्रश्न सोडविण्यास लागला, तर त्याच्यानें तो प्रश्न सुटेल काय? घर बांधणें, गलबत किंवा वाफेची गाडी चालविणें, इत्यादि सर्व कामांमध्यें बरेच दिवस उमेदवारी करावी लागते. तर आतां असें कां ह्मणावयाचें कीं मनुष्याचें शरीर आणि मन ह्यांचा विकास करण्याचें काम इतकें सोपें आहे कीं, कोणताही मनुष्य पूर्वी कांहीं तयारी केल्याशिवाय त्या संबंधाची सर्व तजवीज आणि देखरेख ठेवूं शकेल? असें जर आपणांस म्हणतां येत नाहीं, आणि जर हें काम सृष्टीमधील सर्व कामांमध्यें एक शिवाय करून अत्यंत भानगडीचें आहे, आणि ह्मणून त्यासंबंधाची व्यवस्था ठेवणें हें जर अत्यंत दुर्घट आहे, तर अशा कामासाठीं पूर्वी कांहीं तयारी न करणें ह्मणजे अगदीं वेडेपणा नव्हे काय? कुशलतेच्या कामाविषयीं एकवेळ हयगय झाली तर चालेल, परंतु ह्या अगदीं अवश्य शिक्षणाची हयगय होतांच कामानये. बापानें अविचारानें कांहीं दुराग्रही मतांचा स्वीकार केल्यामुळें एकदां त्याचें आणि मुलांचें वांकडें येऊन ते त्याच्या त्रासानें त्याचें अगदीं ऐकत नाहींतसे झाले,

आणि त्यांची अगदीं दशा झाली झणजे बापासच दुःख होऊन असें वाटेल कीं, आपण रघूचे सर्ग वाचण्याऐवजीं स्वभावशास्त्राचा अभ्यास केला असता तर बरें झालें असतें. एखादी आई आपला मुलगा विषम-ज्वरानें गमावल्यामुळें रडत बसली असतां, जसें तिलाही वाटत होतें, तसेंच एखाद्या स्पष्टवक्त्या वैद्यानें येऊन सांगितलें कीं, बाई, तुझ्या मुलाची प्रकृति जर फार अभ्यास करून क्षीण झालेली नसती, तर कांहीं औषधी उपचार चालला असता, तर अशा प्रसंगीं ती अगदीं दुःखानें आणि अनुतापानें गांजून गेली असतां आपणांस संस्कृत शाकुंतल नाटक समजतें एवढ्यानें तिचें समाधान होणार आहे काय ?

ह्यावरून ध्यानांत येईल कीं, आमच्या तिसऱ्या वर्गातील कृत्यांची आपणांस बरोबर रीतीनें व्यवस्था ठेवितां यावी, झणून आपणांस जीवन-शास्त्र अवगत असलें पाहिजे;तसेंच मुलांचें पालन पोषण नीट करितां यावें झणून प्राणिगुणधर्मशास्त्रांतील मुख्य मुख्य गोष्टी आणि मानसशास्त्रांतील मूलतत्त्वें, ह्यांचीही कांहीं माहिती आपणांस असणें अवश्य आहे. आह्मांलाही वाटतें कीं, हें वाचतांना पुष्कळांस हंसूं येईल; आणि ह्या शास्त्रांचें पूर्ण ज्ञान सर्व आईबापांस असलें पाहिजे, असें जर आह्मी झणूं, तर आमचें झणणें खरोखर हंसूं येण्यासारखेंच होईल. परंतु आमचें झणणें असें नाहीं. त्यांस वरील शास्त्रांच्या संबंधानें मुख्य मुख्य गोष्टी, आणि त्या समजावून देण्याकरितां कांहीं उदाहरणें माहीत असलीं झणजे पुरे आहे. ह्या गोष्टी अशाच कां असाव्या, हें जरी त्यांस समजलें नाहीं तरी चालेल, तरी त्या तशाच असल्या पाहिजेत इतकें तरी समजणें अवश्य आहे आणि इतकें समजून घेण्यास वेळही लागणार नाहीं. वरील गोष्ट कशी ही असो इतक्या गोष्टी-विषयीं आपणांस ना झणतांच येतनाहीं;—मुलांचें शरीर आणि मन ह्यांची सुधारणा कांहीं नियमांस अनुसरून होत असते; हे नियम कांहीं अंशीं तरी आईबापें न पाळितील तर मरण खात्रीनें यावयाचें; तीं जर हे नियम पुष्कळअंशीं पाळणार नाहींत, तर मुलांच्या शरीराच्या आणि मनाच्या स्थितीमध्यें पुष्कळ दोष राहतील; आणि जर त्यांनीं हे नियम पूर्णपणें पाळिले, तरच मुलांचें शरीर आणि मन हीं उत्तम दशेप्रत जाऊन पोहोंचतील. तर ज्यांना पुढें मुलेंबाळें होण्याचा संभव आहे त्या-

सर्वांनीं हे नियम शिकण्याकडे कांहीं लक्ष दिलें पाहिजे कीं नको ह्याचा आतां विचार तुह्मींच करावा.

येथपर्यंत आईबापांच्या कर्तव्यांचा विचार झाला. आतां आह्मी सार्वजनिक कर्तव्यांकडे वळतों. आतां आपणांस हीं कृत्यें करितां येण्यास कोणतें ज्ञान अवश्य आहे ह्याचा प्रथम विचार केला पाहिजे. ह्या ज्ञानाची आवश्यकता लोकांच्या अगदीं लक्षांत येत नाहीं असें ह्मणतां येत नाहीं. कारण हल्लीं आमच्या शाळांत सुरू असलेल्या इयत्तांमध्यें सार्वजनिक आणि राजकीय कृत्यांकडे ज्यांचा संबंध पोंहोचतो, असे नांव घ्यावयाला तरी कांहीं विषय आहेत; अशाप्रकारचा मुख्य विषय ह्मटला ह्मणजे इतिहास होय.

परंतु इतिहास ह्मणून जें शाळांत शिकवितात, त्याचा वस्तुतः कांहीं उपयोग नाहीं असें आह्मीं पूर्वी ह्मटलेंच आहे. शाळांमध्यें सुरू असलेल्या इतिहासाविषयीं तर बहुत करून बोलावयासच नको, परंतु जाणते लोकांकरितां फार श्रम घेऊन लिहिलेल्या इतिहासाच्या पुस्तकांमध्येंही राजकीय प्रकरणांचीं खरीं तत्वें लक्षांत आणून देण्यासारख्या थोडयाच गोष्टी असतात. मुलें शाळांत शिकतात काय तीं राजांचीं चरित्रें, तर त्यांपासून समाजसंस्थाशास्त्राचें ज्ञान होणार तें कसें? दरबारामध्यें अशा खटपटी चालल्या होत्या, असे कट सुरू होते, अमकयानें राज्य बळकाविलें, त्यांत अमुक अमुक मनुष्य होते, वगैरे चटसारी माहिती असल्यानें एकंदर राष्ट्राच्या उत्कर्षाचीं कारणें आह्मांस समजतील काय? इतिहासामध्यें राज्यपदाकरितां भांडणें लागल्याचें आह्मीं वाचतों व त्यामुळें उभयपक्षीं मोठी जंगी तयारी होऊन मोठी लढाई झाल्याचेंही आमच्या वाचनांत येतच आहे; तींत मुख्य सेनापति अमुक होते, त्यांच्या हाताखालीं अमुक प्रसिद्ध सरदार होते; त्यांच्याजवळ इतकें पायदळ, इतके घोडेस्वार, व इतक्या तोफा होत्या; त्यांनीं अशा अशा रीतीनें आपली फौज उभी केली होती; अशा प्रकारच्या युक्ति लढविल्या, तशाप्रकारें हल्ला केला, अशा प्रकारें त्यांस पळ काढावा लागला, अमुक वाजतां त्यांच्यावर असे प्रसंग आले, अमुक वाजतां त्यांचा जय झाला; एका झटापटीमध्यें हा सरदार पडला, दुसरीमध्यें त्या पलटणीची कत्तल उडाली; केव्हां ह्यांचा केव्हां त्यांचा पाडाव होतां होतां सरतेशेवटीं अमुक पक्षास

संगणकीकृत

जय मिळाला; प्रत्येक पक्षाचे इतके लोक पडले, इतके जखमी झाले, इतके विजयी पक्षानें कैद करून नेले; अशा प्रकारचें लांबलचक वर्णन आह्मी इतिहासामध्यें नेहमीं वाचीत असतों. परंतु आतां असें सांगा कीं सार्वजनिक कामांमध्यें आपण कसें वागलें पाहिजे हें ह्यावरून तुह्मांस समजेल काय? समजा कीं प्रसिद्ध पंधरा लढायाच वाचून तुह्मी राहिलां नाहीं, तर इतर सर्व बारिकसारिक लढायांचीं वर्णनें ही तुह्मीं अगदीं लक्षपूर्वक वाचिलीं, तर त्याच्या योगानें तुह्मांस राष्ट्रीयसभेच्या सभासदांची निवड करितांना अधिक शहाणपण येईल का? आतां तुह्मी ह्मणाल कीं, ह्या गमतीदार गोष्टी आहेत. खरोखर त्या गमतीदार आहेत खऱ्या, त्यांपैकीं ज्या अंशतः किंवा सर्वांशीं खोट्या नाहींत त्या तरी निदान गमतीच्या खऱ्या, आणि पुष्कळांस त्या तशाच वाटत असतील. परंतु त्या एवढ्यावरून महत्त्वाच्या आहेत असें मात्र समजतां कामा नये. अगदीं क्षुल्लक गोष्टींसही आह्मी जाणून बुजून कांहीं हेतूनें किंवा चुकीनें पुष्कळ वेळां महत्त्व देतों, ज्याला फुल झाडांचें वेड आहे, तो मनुष्य एखाद्या आवडत्या फुलझाडाचा कांदा त्यास अव्वाच्यासव्वा किंमत आली तरी देणार नाहीं. कोणी एखाद्या चिनी मातीच्या जुन्या ओबडधोबड भांड्यावरच खुलून जातो. श्री. नारायणराव पेशवे यांचा सुमेरसिंगानें ज्या तरवारीनें वध केला ती तरवार किंवा तिचा एखादा तुकडा शेंकडों रुपये देऊनही विकत घेणारे लोक मिळतील. परंतु ह्या प्रकारच्या आवडीवरून त्या पदार्थांची खरी किंमत काढितां येईल काय? आणि जर येणार नाहीं, तर इतिहासांतील कांहीं गोष्टी कित्येकांस आवडतात, एवढ्यावरूनच त्या महत्त्वाच्या ठरत नाहींत, असें आपणांस कबूल करावें लागतें. इतर गोष्टींची किंमत ज्याप्रमाणें त्यांचा उपयोग मनांत आणून ठरवितों, त्याप्रमाणें ह्या गोष्टींचीही किंमत त्यांचा उपयोग मनांत आणूनच ठरविली पाहिजे. दोहींकडे एकच कसोटी असली पाहिजे. जर तुह्मांस कोणी तुमच्या शेजाऱ्याची कुत्री व्याली ह्मणून खबर दिली, तर तुह्मी ह्मणाल कीं, ह्या बातमीचा आह्मांस उपयोग काय? आतां पाहिलें तर गोष्ट घडलेली खरी; तरी ती निरर्थकच समजावयाची; तिचा व्यवहारांतील कृत्यांशीं कांहीं संबंध नाहीं, किंवा तीपासून जगामध्यें आपण कृतकृत्य कसे होऊं हें ज्ञान प्राप्त होण्यासारखें नाहीं. हीच कसोटी

इतिहासांतील गोष्टींस लावा, ह्मणजे आम्ही ह्मणतों तें खरें असें तुमचें-तुह्मांलाही वाटेल. इतिहासांत, सांगितलेल्या गोष्टींचा कार्यकारणभाव दाखवून त्यांची अन्योन्यसंबंधिता व्यक्त केलेली नसते, आणि ह्मणून त्यांवरून कांहीं सिद्धांत ठरवितां येत नाहींत, व जगामध्यें आपलें वर्तन कसें असावें अशाविषयीं नियम ठरवितांना त्यांचा कांहीं उपयोग होत नाहीं. परंतु आपण हरएक गोष्टींच्या संबंधानें जी माहिती मिळवितों तिचा मुख्य उपयोग हाच कीं, तीपासून आपणांस व्यवहारांत उपयोग करण्यासारखा एखादा सिद्धांत ठरवितां यावा. इतिहासांतील गोष्टी कर्मणुकीकरितां ह्मणून पाहिजे तर खुशाल वाचा. परंतु त्यांपासून कांहीं ज्ञानप्राप्ति होईल अशी मात्र व्यर्थ आशा बाळगूं नका.

इतिहासाच्या पुस्तकामध्यें ज्याला खरोखर इतिहास असें ह्मणतां येईल असें बहुतकरून गाळलेलेंच असतें. अगदीं अलीकडे अलीकडे इतिहासकर्त्यांनीं खरी उपयुक्त माहिती देण्याची सुरवात केली आहे. प्राचीनकाळीं राजा ह्मणजे काय तें सर्व दैवत, प्रजा ह्मणजे कांहीं नाहीं अशीच बहुतकरून लोकांमध्यें समजूत असे. त्याचप्रमाणें प्राचीन इतिहासांमध्येंही सर्व जागा राजांच्या कृत्यांच्या हकीगतीनें भरलेली असे. एकंदर राष्ट्राविषयीं कोठें कोनाकोपऱ्यांत थोडें बहुत सांगितलें असलें तर न कळे. परंतु अलीकडे राजांच्या कल्याणापेक्षां प्रजेच्या कल्याणाकडे लोकांचें लक्ष विशेष जात आहे, आणि इतिहासकर्तेही एकंदर जनसमूहाच्या भरभराटीविषयीं हकीगत देऊं लागले आहेत. जनसमूहाची स्थिति जशी बदलत आली तशी ती माहीत असणें हेंच आपणांस विशेष अगत्याचें आहे. ज्या गोष्टींवरून एखादें राष्ट्र कसें बनत गेलें, त्याची कशी जुळवाजुळव झाली हें आह्मांस समजेल त्याच गोष्टींची आह्मांस जरूर आहे. ह्या गोष्टींमध्यें त्या राष्ट्राची राज्यव्यवस्था कोणत्या प्रकारची होती हें अलबत आलेंच पाहिजे; त्यांतील कामदारांविषयीं चर्चा जितकी थोडी असेल तितकें बरें. राज्याची घटना, त्यांतील नियम, व्यवस्था, खोट्या समजूती आणि घोंटाळे ह्याविषयीं मात्र त्यांत भरपूर माहिती असली पाहिजे. मुख्य ठिकाणचें बादशाही सरकार, त्याची व्यवस्था आणि कामगारांचीं कृत्यें एवढेंच समजून पुरें होत नाहीं, तर ठिकठिकाणच्या स्थानिकसरकारांची व त्यांच्या शाखांची व

पोटशाखांची आह्मांस बरोबर माहिती असली पाहिजे. तसेंच धर्मसंबंधी कारभार कसकसा चालला होता ह्याविषयींही अगदीं अशी वरीलप्रमाणेंच माहिती असली पाहिजे. मुख्य धर्माधिकारी कोण, त्यांचा अधिकार काय होता, त्यांच्या हातांत सत्ता किती होती, धर्मसंबंधीं सर्व व्यवस्था कशी होती व सरकारचा धर्मामध्यें किती संबंध असे वगैरे सर्व गोष्टींचें वर्णन असलें पाहिजे. ह्या बरोबरच लोकांचे धर्मसंबंधी विचार, पंथ, आणि विधि सांगितले पाहिजेत; ह्मणजे लोक आपणांस कोणत्या धर्माचे किंवा पंथाचे ह्मणवीत एवढें सांगितलें ह्मणजे झालें असें नाहीं, तर त्यांचीं खरीं मतें काय होतीं, व त्याप्रमाणें ते कितपत चालत होते वगैरे सर्व कांहीं सांगुन दिलें पाहिजे. मान मरातब देण्याची व रामराम सलाम वगैरे करण्याच्या रीति, पत्रें वगैरे लिहिण्याचे माने व ह्यावरून भिन्न भिन्न वर्गांच्या लोकांमध्यें वर्चस्व कोणाचें कोणावर होतें हें जसजसें दिसून येईल तसतसें आह्मांस कळवून दिलें पाहिजे. लोकांच्या घरांतील व बाहेरील रीतिभाती ही आपणांस समजल्या पाहिजेत व ह्यांमध्यें स्त्री पुरुषांचा व आईबापांचा आणि मुलांचा संबंध कसा काय होता हेंही आलें पाहिजे. लोकांमध्यें सुरू असलेल्या प्रसिद्ध पौराणिक कथा, मंत्र तंत्र वगैरे व वेडगळ समजुती असतील त्या दाखवून दिल्या पाहिजेत; नंतर देशांतील कारखान्यांचेंही वर्णन आलें पाहिजे; श्रमविभागाकडे लोकांचें कितपत लक्ष होतें हेंही त्यांत असलेंच पाहिजे. व्यापाराची व्यवस्था काय जातींप्रमाणें किंवा स्वतंत्र मंडळ्या स्थापून किंवा दुसऱ्या कांहीं रीतीनें चालत असे; कारखानदार आणि काम करणारे लोक ह्यांचा परस्पर कसा संबंध होता; माल आणण्या नेण्याचीं काय साधनें होतीं, लोकांमध्यें दळणवळण परस्पर कोणत्या प्रकारें रहात असे, इत्यादि गोष्टींचीही माहिती क्रमाक्रमानें दिलीच पाहिजे. हें सांगतां सांगतां कलाकौशल्याकडे वळून माल कोणत्या रीतीनें व कोणत्या प्रतीचा तयार होत असे ह्याचाही उल्लेख झाला पाहिजे. लोकांमध्यें ज्ञानाचा प्रसार किती झाला होता, कोणती विद्या किती शिकवीत असत, शास्त्रीय विषयांमध्यें लोकांची मजल कोठपर्यंत ठेपली होती, आणि लोकांच्या विचारांचा कल मुख्यत्वेंकरून कोणीकडे होता, वगैरे सर्व वृत्तांत आला पाहिजे. कौशल्याच्या, कल्पनेच्या, व आरामाच्या गोष्टीं-

कडे म्हणजे घरें बांधणें, कातींव व खोदींव काम करणें, चित्रें काढणें, गाणें, बजावणें, कविता कल्पित कादंबऱ्या वगैरे लिहिणें, व पोशाख करणें, इकडे लोकांचा कसा काय कल होता ह्याचाही इतिहासामध्यें खुलासा झाला पाहिजे. अन्न, घरदार, खेळकर्मणुकीचे प्रकार, वगैरेचा लोक काय बेत ठेवीत हें थोडक्यांत सांगून लोकांच्या नेहमींच्या आयुष्यक्रमणाचें वर्णन करण्यास इतिहासकर्त्यानें विसरतां कामा नये. तसेंच शेवटीं कायदे कानू, लोकांच्या चाली, ह्मणी, व व्यवहार ह्यांवरून नीतीविषयीं सर्व जातींच्या लोकांचे विचार काय होते व ते व्यवहारामध्यें कसेकाय नीतीनें वागत ह्याविषयीं जसें दिसून येईल तसें सांगून वरील लिहिलेल्या सर्व गोष्टींचा परस्परसंबंध दाखविला पाहिजे. ही सर्व हकीगत स्पष्ट आणि पूर्ण असून होईल तितकें करून थोडक्यांत दिली पाहिजे. सर्व गोष्टी एके जागीं आणून अशा क्रमानें दिल्या पाहिजेत कीं, त्या सर्व एकदम लक्षांत येतील. त्यांमधील परस्पर सापेक्षत्व व त्यांचें वास्तविक ऐक्य हीं व्यक्त झालीं पाहिजेत; वाचणारांच्या मनांत त्यांचा संबंध सहजीं येऊन लोकस्थितीमध्यें अमुक प्रकार असले ह्मणजे त्यांबरोबर दुसरे अमुक असावयाचे हें त्यांना समजलें पाहिजे. वेळोवेळच्या लोकस्थितीचें वर्णन असें असलें पाहिजे कीं, त्यावरून लोकांचीं मतें, चाली, रीति, रिवाज वगैरे कसे बदलत गेले हें स्पष्ट झालें पाहिजे. पूर्वीच्या जनसमूहाची घटना आणि तदनुरूप लोकांचे व्यवसाय व ते पुढें जनसमूहाबरोबर कसे बदलत गेले हेंही सर्व इतिहासामध्यें दिसून आलें पाहिजे. सार्वजनिक कामांत आपलें कसें वर्तन असलें पाहिजे हें ठरविण्याच्या कामीं अशाच माहितीचा उपयोग व्हावयाचा. ज्या इतिहासामध्यें एकंदर लोकस्थितीचें वर्णन येईल, अशाच इतिहासाची आपणांस व्यवहारामध्यें जरूर आहे. इतिहासकर्त्याच्या हातून होण्यासारखें मोठें काम हें आहे कीं, त्यानें एकंदर राष्ट्राचें असें वर्णन करावें कीं त्यावरून आपणांस निरनिराळ्या वेळच्या लोकस्थितींची आणि राष्ट्रांची तुलना करितां यावी, आणि एकंदर जनसमूहाचीं कामें कोणत्या नियमांस अनुसरून चालतात हें आपणांस निश्चितपणें सांगतां यावें.

परंतु असें पहा कीं, आपण इतिहासांतील खऱ्या ज्ञानाचा बराच

संचय केला, तथापि त्याची जर आपणाजवळ किल्ली नाहीं, तर त्या चा तादृश उपयोग होत नाहीं. ही किल्ली म्हणजे शास्त्रीय विषयांचें ज्ञान. जीवनशास्त्र आणि मानसशास्त्र यांतील मुख्य नियम जर आपणांस माहीत नसतील, तर जनसमूहाच्या गोष्टी आपणांस कारणें देऊन समजावून देतां येणार नाहींत. ज्या मानानें आपणांस अजमासानें किंवा स्थूळ मानानें मनुष्यस्वभावाविषयीं कांहीं गोष्टींचा तर्क करितां येत असेल, त्याच मानानें जनसमूहासंबंधीं अगदीं सुलभ गोष्टींचेंही ज्ञान व्हावयाचें. उदाहरणार्थ पुरवठा आणि खप ह्यांमधील प्रमाण, मनुष्यें अमुक स्थितिमध्यें कशीं वागतील हें समजल्याखेरीज आपणांस समजणार नाहीं. आतां जर समाजसंस्थाशास्त्राच्या अगदीं ठळक ठळक गोष्टींचें ज्ञान होण्यासही अमुक स्थितीमध्यें मनुष्यांचे विचार कोणत्या प्रकारचे असतात, व तीं त्या स्थितीमध्यें कशीं वागतात, ह्याविषयीं आपणांस थोडें बहुत ज्ञान असणें जरूर आहे, तरतें शास्त्र पूर्णपणें समजण्यास मनुष्याच्या मानसिक आणि शारीर शक्तींचें ज्ञान पूर्णपणें असलेंच पाहिजे हें सांगावयास नको. आतां वरील गोष्टींचा विशिष्टउदाहरणद्वारा विचार न करितां केवळ तत्त्वदृष्ट्या विचार केला, तर आह्मी म्हणतों या गोष्टीची सत्यता अगदीं स्वतःसिद्ध आहे असें आढळून येईल. पहा, जनसमूह मनुष्यव्यक्ति मिळून झालेला आहे; जनसमूहामध्यें जें जें घडून येतें तें तें व्यक्तिमात्राच्या कृत्यांनीं घडून येतें, आणि म्हणून जनसमूहाच्या सर्व गोष्टींचें बीज व्यक्तिमात्रांच्या कृत्यांवरूनच लक्षांत यावयाचें. परंतु व्यक्तिमात्रांचीं कृत्यें, त्यांचा स्वभाव ज्या तत्त्वांस अनुसरून असतो त्या तत्त्वांवर अवलंबून असतात, आणि म्हणून तीं कृत्यें समजण्यास तीं तत्त्वें माहीत असलींच पाहिजेत. आतां मनुष्य स्वभावाच्या ह्या तत्त्वांच्या मुळाशींच जर गेलें, तर असें आढळून येईल कीं, त्यांचा शरीर आणि मन ह्यांच्या धर्मांशीं संबंध आहे. ह्यावरून एवढें स्पष्ट होतें कीं जीवनशास्त्र आणि मानसशास्त्र ह्यांची समाजसंस्थाशास्त्र समजण्यास अत्यंत आवश्यकता आहे. आतां हाच सिद्धांत ह्याच्यापेक्षांही सरळ रीतीनें सांगतां येईल. असें पहा कीं जनसमूहाच्या गोष्टी म्हणजे जीवित्वाच्या गोष्टी होत.—त्या जीवित्वाचा अत्यंत संकीर्ण असा प्रादुर्भाव होत. ह्यास्तव जनसमुहाच्या गोष्टी जीवनाच्या नियमांसच अनुसरून चालल्या पाहिजेत;

१८९९

अर्थात् त्यांचें ज्ञान होण्यास जीवनाचे नियम आपणांस अवगत झालेच पाहिजेत. ह्यावरून पाहतां मानवी कृत्यांच्या चवथ्या वर्गांतील कृत्यांची व्यवस्था करितां येण्यासाठीं पूर्वीप्रमाणेंच आपणांस शास्त्रीयविषयांचे ज्ञानाची जरूरी आहे. आपणांस नेहमीं शाळांतून जें शिक्षण मिळतें त्याचा सार्वजनिक कामामध्यें थोडाच उपयोग होतो. आपण जो इतिहास वाचितों, त्यापैकीं थोड्याचाच व्यवहारांत उपयोग होण्यासारखा आहे, आणि तेवढ्या थोड्याचाही योग्य रीतीनें उपयोग करण्याचें आपल्या अंगीं सामर्थ्य नसतें. आपलें इतिहासाचें ज्ञान इतकें कोतें आणि विसंगत असतें कीं, त्यापासून आपणांस एखाद्या विवक्षित कालाच्या लोकस्थितीचा लवमात्रही बोध होत नाहीं, मग त्यापासून त्या लोकस्थितीच्या संबंधानें व्यापक नियम काढितां येण्याची तर वार्ताच नको. शिवाय आपणांस जीवनशास्त्रादिसेंद्रियपदार्थविषयकशास्त्रांतील ढळक ढळक गोष्टींचेंही ज्ञान नसल्यामुळें आपणांस ह्या वरील व्यापक नियमांचा ते अवगत असले तरी ही तादृश उपयोग करून घेतां येणार नाहीं.

आतां आपणांस मानवी कृत्यांच्या शेवटच्या वर्गाविषयीं विचार कर्तव्य आहे. ह्या वर्गांत फुरसतीच्या वेळांतील आरामाचीं व कर्मणुकेचीं कृत्यें येतात. आत्मरक्षण, उदरनिर्वाह, मुलांसंबंधीं आपलीं कर्तव्यकर्में, आणि राजकीय, व सार्वजनिक कामें, यांचें येथपर्यंत विवेचन झालें. ह्यांत न येणाऱ्या किरकोळ गोष्टी ह्मणजे सृष्टपदार्थांचा उपभोग, ग्रंथावलोकन, कलाकौशल्य, वगैरे गोष्टी आपणांस उत्तम प्रकारें करितां येण्यास कोणत्या तऱ्हेचें शिक्षण असलें पाहिजे, हें आतां पहावयाचें आहे. ज्या गोष्टींचा आपल्या हिताशीं अगदीं निकट संबंध आहे, त्याचें प्रथमतः विवेचन करून नंतर आतां आम्ही वरील गोष्टींचें प्रतिपादन करण्यास लागत आहों हें खरें आहे; आणि या गोष्टी कमी महत्वाच्या आहेत हेंही खरें, तथापि एवढ्यावरून आम्हीं त्या निरुपयोगी समजतों असें मात्र कोणी मानूं नये. अशी कोणाची समजूत असेल, तर ती मोठी चुकीची होय. सुंदर व मनोरम गोष्टींची आवड व त्यांपासून होणारें सुख या गोष्टींचा उपयोग नाहीं असें आमचें बिलकूल मत नाहीं. चित्रलेखन, प्रतिमाकरण, संगीत, कवित्व, आणि प्रत्येक सृष्ट पदार्थाच्या नैसर्गिक सौंदर्यापासून होणारें समाधान हीं नसतील तर आयुष्यामधील अर्धा आनंद गेलाच

संचय केला, तथापि त्याची जर आपणाजवळ किल्ली नाहीं, तर त्या चा तादृश उपयोग होत नाहीं. ही किल्ली म्हणजे शास्त्रीय विषयांचें ज्ञान. जीवनशास्त्र आणि मानसशास्त्र यांतील मुख्य नियम जर आपणांस माहीत नसतील, तर जनसमूहाच्या गोष्टी आपणांस कारणें देऊन समजावून देतां येणार नाहींत. ज्या मानानें आपणांस अजमासानें किंवा स्थूळ मानानें मनुष्यस्वभावाविषयीं कांहीं गोष्टींचा तर्क करितां येत असेल, त्याच मानानें जनसमूहासंबंधीं अगदीं सुलभ गोष्टींचेंही ज्ञान व्हावयाचें. उदाहरणार्थ पुरवठा आणि खप ह्यांमधील प्रमाण, मनुष्यें अमुक स्थितिमध्यें कशीं वागतील हें समजल्याखेरीज आपणांस समजणार नाहीं. आतां जर समाजसंस्थाशास्त्राच्या अगदीं ठळक ठळक गोष्टींचें ज्ञान होण्यासही अमुक स्थितीमध्यें मनुष्यांचे विचार कोणत्या प्रकारचे असतात, व तीं त्या स्थितीमध्यें कशीं वागतात, ह्याविषयीं आपणांस थोडें बहुत ज्ञान असणें जरूर आहे, तरतें शास्त्र पूर्णपणें समजण्यास मनुष्याच्या मानसिक आणि शारीर शक्तींचें ज्ञान पूर्णपणें असलेंच पाहिजे हें सांगावयास नको. आतां वरील गोष्टींचा विशिष्टउदाहरणद्वारा विचार न करितां केवळ तत्वदृष्ट्या विचार केला, तर आम्ही म्हणतों या गोष्टीची सत्यता अगदीं स्वतःसिद्ध आहे असें आढळून येईल. पहा, जनसमूह मनुष्यव्यक्ति मिळून झालेला आहे; जनसमूहामध्यें जें जें घडून येतें तें तें व्यक्तिमात्राच्या कृत्यांनीं घडून येतें, आणि म्हणून जनसमूहाच्या सर्व गोष्टींचें बीज व्यक्तिमात्रांच्या कृत्यांवरूनच लक्षांत यावयाचें. परंतु व्यक्तिमात्रांचीं कृत्यें, त्यांचा स्वभाव ज्या तत्वांस अनुसरून असतो त्या तत्वांवर अवलंबून असतात, आणि म्हणून तीं कृत्यें समजण्यास तीं तत्वें माहीत असलींच पाहिजेत. आतां मनुष्य स्वभावाच्या ह्या तत्वांच्या मुळाशींच जर गेलें, तर असें आढळून येईल कीं, त्यांचा शरीर आणि मन ह्यांच्या धर्मांशीं संबंध आहे. ह्यावरून एवढें स्पष्ट होतें कीं जीवनशास्त्र आणि मानसशास्त्र ह्यांची समाजसंस्थाशास्त्र समजण्यास अत्यंत आवश्यकता आहे. आतां हाच सिद्धांत ह्याच्यापेक्षांही सरळ रीतीनें सांगतां येईल. असें पहा कीं जनसमूहाच्या गोष्टी म्हणजे जीवित्वाच्या गोष्टी होत.—त्या जीवित्वाचा अत्यंत संकीर्ण असा प्रादुर्भाव होत. ह्यास्तव जनसमुहाच्या गोष्टी जीवनाच्या नियमांसच अनुसरून चालल्या पाहिजेत;

अर्थात् त्यांचें ज्ञान होण्यास जीवनाचे नियम आपणांस अवगत झालेच पाहिजेत. ह्यावरून पाहतां मानवी कृत्यांच्या व्यवस्था वर्गातील कृत्यांची व्यवस्था करितां येण्यासाठीं पूर्वीप्रमाणेंच आपणांस शास्त्रीयविषयांचे ज्ञानाची जरूरी आहे. आपणांस नेहमीं शाळांतून जें शिक्षण मिळतें त्याचा सार्वजनिक कामामध्यें थोडाच उपयोग होतो. आपण जो इतिहास वाचितों, त्यापैकीं थोड्याचाच व्यवहारांत उपयोग होण्यासारखा आहे, आणि तेवढ्या थोड्याचाही योग्य रीतीनें उपयोग करण्याचें आपल्या अंगीं सामर्थ्य नसतें. आपलें इतिहासाचें ज्ञान इतकें कोतें आणि विसंगत असतें कीं, त्यापासून आपणांस एखाद्या विवक्षित कालाच्या लोकस्थितीचा लवमात्रही बोध होत नाहीं, मग त्यापासून त्या लोकस्थितीच्या संबंधानें व्यापक नियम काढितां येण्याची तर वार्ताच नको. शिवाय आपणांस जीवनशास्त्रादिसेंद्रियपदार्थविषयकशास्त्रांतील ढळक ढळक गोष्टींचेंही ज्ञान नसल्यामुळें आपणांस ह्या वरील व्यापक नियमांचा ते अवगत असले तरी ही तादृश उपयोग करून घेतां येणार नाहीं.

आतां आपणांस मानवी कृत्यांच्या शेवटच्या वर्गाविषयीं विचार कर्तव्य आहे. ह्या वर्गांत फुरसतीच्या वेळांतील आरामाचीं व कर्मणुकेचीं कृत्यें येतात. आत्मरक्षण, उदरनिर्वाह, मुलांसंबंधीं आपलीं कर्तव्यकर्में, आणि राजकीय, व सार्वजनिक कामें, यांचें येथपर्यंत विवेचन झालें. ह्यांत न येणाऱ्या किरकोळ गोष्टी ह्मणजे सृष्टपदार्थांचा उपभोग, ग्रंथावलोकन, कलाकौशल्य, वगैरे गोष्टी आपणांस उत्तम प्रकारें करितां येण्यास कोणत्या तऱ्हेचें शिक्षण असलें पाहिजे, हें आतां पहावयाचें आहे. ज्या गोष्टींचा आपल्या हिताशीं अगदीं निकट संबंध आहे, त्याचें प्रथमतः विवेचन करून नंतर आतां आह्मी वरील गोष्टींचें प्रतिपादन करण्यास लागत आहों हें खरें आहे; आणि या गोष्टी कमी महत्वाच्या आहेत हेंही खरें, तथापि एवढ्यावरून आह्मीं त्या निरुपयोगी समजतों असें मात्र कोणी मानूं नये. अशी कोणाची समजूत असेल, तर ती मोठी चुकीची होय. सुंदर व मनोरम गोष्टींची आवड व त्यांपासून होणारें सुख या गोष्टींचा उपयोग नाहीं असें आमचें बिलकूल मत नाहीं. चित्रलेखन, प्रतिमाकरण, संगीत, कवित्व, आणि प्रत्येक सृष्ट पदार्थाच्या नैसर्गिक सौंदर्यापासून होणारें समाधान हीं नसतील तर आयुष्यामधील अर्धा आनंद गेलाच

ह्मणावयाचा. आपल्या अंगीं रसिकता आणणें व काव्यसंगीतादिरसास्वादनानें आपलें मनोरंजन करून घेणें हें आह्मी कमी योग्यतेचें तर समजत नाहींच; परंतु उलट आह्मांस आणखी असेंही वाटतें कीं, आतां ह्यापुढें अशाच प्रकारच्या गोष्टींमध्यें हल्लींपेक्षां आपला विशेष वेळ जाणार आहे. सृष्टींतील पंचमहाभूतें आपल्या अगदीं ताब्यांत येऊन त्यांचा आपणास पाहिजे तसा उपयोग करितां येऊं लागला; आवश्यक पदार्थ उत्पन्न करण्याचीं साधनें अगदीं पूर्ण दशेस येऊन पोहोंचलीं; सर्व कामें अगदीं होईल तितक्या थोडक्या श्रमानें होऊं लागलीं; शिक्षणाचा वातवेत वसून आपणांस निर्वाहादिविषयक विशेष महत्वाचे व्यवसाय बऱ्याच जलदीनें करितां येऊं लागले; ह्मणजे आपणांस वरीच फुरसुत मिळूं लागेल, आणि अशी फुरसूत मिळूं लागली ह्मणजे मग कलाकौशल्य व सृष्टपदार्थांचें सौंदर्य यांपासून आपलें मनोरंजन करून घेण्याकडे आपली प्रवृत्ति स्वाभाविकच विशेष होणार.

आतां मनोरंजनाच्या गोष्टी केल्यानें आपल्या सुखास वरीच भर पडते, ह्मणून त्या आपल्या सुखास अगदीं जरूर आहेत असें आमचें मत आहे असें मात्र कोणी समजूं नये. ह्या गोष्टी जरी कितीही महत्वाच्या असल्या, तरी ज्या गोष्टींचा आमच्या नेहमींच्या कर्तव्यांशीं अगदीं जवळचा संबंध आहे, त्या गोष्टी करून झाल्यानंतरच यांकडे लक्ष देणें रास्त होईल असें आह्मी समजतों. स्वकीय आणि सार्वजनिक कामांची व्यवस्था बरोबर ठेवतां येण्यास जीं कृत्यें आवश्यक तीं झालीं, ह्मणजे, नंतर ग्रंथावलोन, कलाकौशल्य, व इतर आरामाच्या गोष्टी यांचें अस्तित्व शक्य होणार असें आह्मीं पूर्वी सांगितलेंच आहे. ज्या कृत्यांवर एखाद्या गोष्टीचें अस्तित्व अवलंबून असतें, तीं कृत्यें त्या गोष्टीच्या आधीं झालीं पाहिजेत हें उघड आहे. जो गृहस्थ फुलांचा फार शोकी आहे, तो आपल्या बागामध्यें केवळ फुलांकरितां फुलझाडें लावितो, आणि त्या झाडांच्या मुळांकडे आणि पानांकडे त्याचें लक्ष असतें ह्याचें मुख्य कारण, तीं पुष्पोद्गमाचीं साधनें होत हेंच होय. आतां पुष्पोत्पत्ति हीच कायती शेवटची साधावयाची गोष्ट, आणि ह्मणून इतर सर्व गोष्टी ह्मणजे मुळें आणि पानें हीं त्यास कमी महत्वाचीं वाटावीं; तथापि मुळें आणि पानें हींच वास्तविक जास्त महत्वाचीं आहेत एवढें त्यास पक्कें माहीत

असतें. रोप्याची वाढ चांगली व्हावी ह्मणून तो त्यास अगदीं जपत असतो; आणि फुलांकरितां आतुर होऊन रोप्याकडे दुर्लक्ष केलें तर वेडेपणा होईल हें तो समजतो. हीच गोष्ट इकडे लागू पडते. शिल्पशास्त्र, प्रतिमाकरण, चित्रलेखन, गानवादन, आणि कवित्व हीं सुसंस्कृतजीवलोकरूपी वृक्षाचीं पुष्पें होत. ह्या पुष्पांची योग्यता त्याचें उत्पत्तिस्थान जो सुसंस्कृत-जीवलोकरूपी वृक्ष त्याच्या योग्यतेपेक्षांही जास्त आहे असें जरी घटका-भर ह्मटलें, तरी सुसंस्कृतजीवलोकरूपी वृक्षाच्या वाढीकडेच आपणांस प्रथम लक्ष दिलें पाहिजे; आणि ह्मणूनच आयुष्यक्रमण सुसंस्कृत होण्या-करितां जरूर तें शिक्षण अत्यंत महत्वाचें होय.

ह्यावरून आमच्या शिक्षणक्रमांतील दोष स्पष्टपणें दिसून येतील. आमचें शिक्षण फुलांसाठीं मूळ रोप्याची हयगय करितें.तें शोभेच्या नादीं लागून त-त्त्वमसि विसरतें;त्यापासून आपणांस आत्मरक्षणाचें ज्ञान मिळत नाहीं;त्यामध्यें उदरनिर्वाहाचे ज्ञानाचें उगीच दिग्दर्शन मात्र होतें, त्या संबंधाचें बहुतेक ज्ञान आपणांस मिळेल तसें पुढेंच मिळवावें लागतें; मुलाबाळांचे पालनपो-षणासंबंधीं त्यामध्यें अक्षरही नसतें; त्यामध्यें सार्वजनिक आणि राज-कीय कामास उपयोगी पडण्यासारख्या पुष्कळ गोष्टी तें आपणाकडून देत असतें परंतु यांतील बहुतेक असंबद्ध असतात, व बाकींच्याची किल्ली आपणांस माहीत नसते. त्यामध्यें थाट, टापटीप, भपका ह्यांविषयींमात्र भरपूर माहिती असते. चालू असलेल्या भाषा चांगल्या येत असणें, ह्मणजे आपल्या अंगांत एक मोठा गुणच आहे असें समजण्यास हरकत नाहीं. कारण निरनिराळ्या भाषांतील पुस्तकें वाचून, निरनिराळ्या लोकां-बरोबर बोलून, निरनिरळ्या देशांत प्रवास करून अंगांत एकप्रकारची हुशारी येते. परंतु अत्यंत आवश्यक ज्ञानाकडे दुर्लक्ष करून ही हुशारी संपादन करणें वाजवी होईल काय? प्राचीन भाषांचा अभ्यास केल्यानें आपली भाषासरणि शुद्ध आणि प्रौढ होते असें मानलें, तरी शुद्ध आणि प्रौढ भाषा लिहितां येणें आणि मुलांबाळांचें पालनपोषण आणि विद्या-भ्यास ह्यांविषयीं काय धोरण ठेविलें पाहिजे हें माहीत असणें हीं दोन्हीं सा-रख्याच महत्वाचीं, असें आपणांस ह्मणतां येईल काय? ग्रन्थावशिष्ट भाषां-तील काव्यें वाचल्यानें आपल्या अंगीं रसिकता येते असें कबूल केलें, तरी अंगीं रसिकता असणें आणि आरोग्यरक्षणाचे नियम माहीत असणें

ह्या दोन्ही गोष्टी सारख्याच महत्वाच्या, असें आपणांस मानतां येईल काय? ग्रंथावलोकन, गानादिकला, वगैरे सर्व आलंकारिक गोष्टी सुधारणारूपी वृक्षाचीं पुष्पें होत. आणि ह्मणून त्या सुधारणारूपी वृक्षास आधारभूत जें शिक्षण आणि जी कसरत त्यांपेक्षां हीं सर्व अर्थात् कमी योग्यतेचीं ठरतात. यास्तव आमचें असें ह्मणणें आहे कीं, ज्याप्रमाणें आह्मी वरील सर्व गोष्टी फुरसुतीच्या वेळांत करितों, त्याचप्रमाणें विशेष महत्वाच्या गोष्टी आधीं शिकून फुरसुतीच्या वेळांतच ह्या गोष्टी शिकल्या पाहिजेत.

ह्याप्रमाणें आरामाच्या आणि मनोरंजनाच्या गोष्टींची खरी योग्यता लक्षांत आणिली ह्मणजे आमचें असें मत ठरतें कीं, या गोष्टी शिकविण्याची सुरवात इतर विद्याभ्यासावरोबरच केली पाहिजे; मात्र इतकेंच कीं, आपला मुख्य अभ्यास हा नव्हे, हें प्रत्येकानें नीटपणीं ध्यानांत ठेवणें जरूर आहे. आतां ह्या गोष्टी शिकण्यास कोणत्या प्रकारचें ज्ञान असलें पाहिजे, हें आपणांस पाहणें आहे. ह्या प्रश्नाचें उत्तर आह्मी पूर्वीपासून देत आलों तेंच आहे. प्रत्येक कला शिखरास पोंचण्यास शास्त्रीय ज्ञान असलें पाहिजे असें ह्मणणें कित्येकांस चमत्कारिकसें दिसेल, परंतु खरा प्रकार अगदीं तसाच आहे. कोणत्याही कलेचीं अगदीं मासलेवाईक आणि उत्तम कामें तयार व्हावयाचीं किंवा तीं पाहून आनंद व्हावयाचा, हें त्या कारागिराच्या किंवा परीक्षकाच्या अंगीं शास्त्रीय ज्ञान असल्याखेरीज व्हावयाचें नाहीं. लोक 'शास्त्र' ह्या शब्दाचा जो आकुंचित अर्थ समजतात त्या अर्थानें पाहूं गेलें, तर मोठ्या नांवाजलेल्या कारागिरांसही तसें शास्त्र येत नसेल. परंतु हे कारागीर लोक मोठे शोधक असतात, आणि केवळ अजमासावरच त्यांच्या पुष्कळ गोष्टी बसलेल्या असतात. कोणत्याही शास्त्राच्या बाल्यावस्थेमध्यें त्या शास्त्राचें ज्ञान अशाच प्रकारचें असावयाचें. आतां हे कारागीर लोक कच्चे राहतात ह्याचें कारण त्यांच्या जवळ अशाप्रकारें बसलेल्या गोष्टींचा सांठा अगदीं तुटपुंजीचा असून तोही दुरुस्त आणि व्यवस्थित नसतो. कलांनीं उत्पन्न झालेले पदार्थ बाह्यसृष्टींतील किंवा अंतःसृष्टींतील आपल्या प्रतिनिधींशीं अंशमात्रें करून तरी सादृश्य पावतात ही गोष्ट मनांत आणिली ह्मणजे ह्या सर्व कलांच्या मुळाशीं शास्त्र आहे, असें आपणांस एकदम कबूल करावें लागतें. त्या पदार्थांचें रूप ज्या मानानें अंतःसृष्टींतील किंवा बाह्यसृष्टींतील त्यांच्या

... वाचनालय, सातारें.

रूपाशीं मिळत असेल त्याच मानानें ते चांगले ठरावयाचे; व असें त्यांचें रूप जुळून येण्याकरितां कारागिरांस अंतर्बाह्यसृष्टींतील नियमांचें ज्ञान असलें पाहिजे. हा सिद्धांत अनुमानानें तर निघतोच, परंतु शिवाय अनुभवा अंतींही तो अगदीं खरा ठरतो ही गोष्ट आम्ही आतां थोडक्यांतच दाखवून देऊं.

प्रतिमाकरणकला शिकूं इच्छिणाऱ्या मुलांस आपल्या शरीराच्या सांगाड्यांतील अस्थि व स्नायु ह्यांचा विस्तार, त्यांचे सांधे, आणि चलनवलन वगैरे सर्व गोष्टींची माहिती करून घेतली पाहिजे. हा शास्त्रीय ज्ञानाचाच भाग आहे. ज्या मूर्तिकारांस हें ज्ञान नसतें त्यांचे हातून जे प्रमाद होतात, ते न व्हावे म्हणून हें ज्ञान प्रत्येक मूर्तिकारास असणें अवश्य आहे. यंत्रशास्त्राच्या मूलतत्त्वांचेंही ज्ञान त्यांस असलें पाहिजे. हें ज्ञान नसल्यामुळें त्यांच्या हातून घोडयाएवढया चुका होतात. एक उदाहरण घ्या; पुतळा नीट उभा राहण्यास त्याच्या गुरुत्वमध्यापासून काढलेली लंबरेषा बैठकीच्या आंत पडली पाहिजे; आणि ह्मणूनच मनुष्य सहज चैनीनें उभा राहिला असतां एक पाय ताठ करितो व दुसरा जरा ढिला सोडतो; असें केल्यानें ती लंबरेषा ताठ पायाच्या आंत पडते. परंतु ज्या मूर्तिकारास समतोलनाचें हें इंगित माहीत नसतें तो वरील स्थितीमध्यें एखादा पुतळा तयार करावयाचा असला ह्मणजे अशा रीतीनें तयार करितो कीं, ती लंबरेषा पायांच्या मधोमध पडते, व त्यामुळें तो पुतळा नीटपणें उभा रहात नाहीं.

चित्रलेखनकलेमध्यें तर शास्त्रीय विषयाचे ज्ञानाची आवश्यकता अगदीं स्पष्ट रीतीनें दिसून येते. आतां हें ज्ञान अगदीं शास्त्रीयरीत्या असलें पाहिजे असें आमचें ह्मणणें नाहीं; परंतु त्यांतील निदान स्थूळ स्थूळ गोष्टी तरी माहीत असल्याच पाहिजेत. चिनी चित्रें ओबड धोबड दिसतात ह्याचें कारण पाहूं गेलें तर असें आहे कीं, ते लोक देखाव्याचे नियमांकडे दुर्लक्ष करितात, रेखागणिताचा उपयोग त्यांस कळत नसतो, व अंतराच्या मानानें प्रकाश व छाया यांमध्यें कसे फरक पडत जातात हें त्यांस समजत नाहीं. ह्याशिवाय दुसरें कांहीं कारण असेलसें दिसत नाहीं. मुलांचीं चित्रें बिघडतात ह्मणजे काय? त्यांच्या चित्रांमध्यें हुबेहुबपणा नसतो; व ह्याचें मुख्यत्वेंकरून कारण असें आहे कीं, निरनिराळ्या स्थितींमध्यें पदार्थांचे देखावे कसे बदलतात हें त्यांस सम-

जत नाहीं. विद्यार्थ्यांस ही कला शिकण्याकरितां जीं पुस्तकें वाचावीं लागतात किंवा जीं व्याख्यानें ऐकावीं लागतात, त्यांत काय असतें हें जर मनांत आणिलें, 'रस्कीन' नामक एका युरोपियन विद्वान् ग्रंथकाराचे ह्याविषयीं काय विचार आहेत हें जर पाहिलें, किंवा प्रसिद्ध 'राफेल' नांवाचा चितारी उत्पन्न होण्यापूर्वी युरोपामध्यें चित्रलेखनकला कोणत्या स्थितीमध्यें होती ह्याविषयीं जर विचार केला, तर असें समजून येईल कीं, ह्यामध्यें सुधारणा, ह्मणजे सृष्टींतील निरनिराळ्या गोष्टींचे परिणाम कसे प्रादुर्भूत होतात ह्या ज्ञानाची वृद्धि होत जाणें होय. शास्त्रीय ज्ञान नसल्यानें मोठ्या मोठ्या दीर्घ शोधांमध्येंही चुका झाल्याखेरीज राहावयाच्या नाहींत. निरनिराळ्या वस्तु निरनिराळ्या स्थितींमध्यें कशा दिसतात हें माहीत असल्याशिवाय त्या स्थितींमध्यें त्या तशा दाखवितां येणार नाहींत ही गोष्ट प्रत्येक चिताऱ्यास मान्य होईल; आणि अमुक वस्तु अमुक स्थितीमध्यें कशी दिसते हें माहीत असणें ह्मणजे तद्विषयकशास्त्र माहीत असणेंच होय. 'ल्यूईस' साहेब मोठा काळजीनें चित्रें काढणारा खरा, परंतु त्यानेंच जाळीदार खिडकीची छाया समोरच्या भिंतीवर अगदीं स्पष्ट रेषांनीं दाखविली आहे; आतां जर त्याला अपूर्ण छाया ह्मणजे काय हें माहीत असतें तर तो असें करिता ना. 'रासेटी' साहेबानें एका केसाळ पृष्ठभागावर विशेष प्रकाशामध्यें इंद्रधनुष्याच्या रंगांप्रमाणें रंग पाहिले. आतां हे रंग त्याच्या दृष्टीस पडले ते केवळ त्या केसाळ पृष्ठभागावरील केसांमधून प्रकाश वक्रीभवन पावून गेल्यामुळें होत. परंतु हें शास्त्रीय ज्ञान त्यास नसल्यामुळें त्यानें हे इंद्रधनुष्याचे रंग ज्या ठिकाणीं दिसण्याचा संभव नाहीं अशा ठिकाणीं चुकीनें दाखविले आहेत.

संगीतकलेलाही शास्त्रीयज्ञानाची मदत पाहिजे असें सांगितलें, तर तुम्हांस अधिकच आश्चर्य वाटेल; परंतु तें वाटण्याचें कारण नाहीं. कारण मनोविकार प्रदर्शित करणारे जे स्वाभाविक उद्गार असतात त्याच उद्गारांचा पूर्ण उत्कर्ष ह्मणजे संगीत होय. आणि ह्मणूनच ह्या स्वाभाविक उद्गारांच्या नियमांस ज्या मानानें संगीत अनुसरून असेल, त्या मानानें तें बरें वाईट ठरावयाचें. मनोविकारांचे भेद व त्यांचें न्यूनाधिक्य यांच्या मानानें उद्गारांच्या ध्वनीमध्यें जें भिन्नत्व असतें तेंच संगीताचें बीज आहे. सुरांमध्यें जें उच्चनीचत्व असतें तें कसेंतरी

असतें असें नाहीं; त्यास कांहीं व्यापक नियम आहेत; तें प्राण्याच्या सजीव स्थितींतील व्यापारांस अनुसरून असतें; आणि ह्मणूनच त्यावरून मनोवृत्ति व्यक्त केल्या जातात. ह्या सर्व गोष्टींची सत्यता दाखवितां येईल. आतां हीं सर्व तंत्रें संभाळितां आलीं तरच गाण्यांतील सर्व ताना व आलाप आपणास बरोबर साधणार आहेत. आह्मी काय ह्मणतों हें उदाहरण देऊन स्पष्ट करून दाखविणें कठीण आहे. परंतु आपण बसतां उठतां जीं हलकट गाणीं व पवाडे ऐकितों, व ज्यांनीं आपले कान अगदीं किटून जातात, तीं सर्व शास्त्रीयरीत्या असावीं तशीं गाणीं नसतात एवढेंच आह्मीं येथें सांगतों. त्यांमध्यें जे विषय असतात ते संगीतामध्यें येण्यास अगदीं अयोग्य असतात. कारण त्यांमध्यें कांहीं रस नसतो; कोडें विषय रसाळ असतात, परंतु विषयानुरूप चाली नसतात; याप्रमाणें त्यांमध्यें शास्त्रीय नियमांचा अगदीं भंग झालेला असतो. आह्मी अशा प्रकारचीं गाणीं वाईट ह्मणतों, कारण तीं यथार्थ नसतात. आणि तीं यथार्थ नसतात असें ह्मणणें ह्मणजे तीं शास्त्रीय नियमांस अनुसरून नसतात असेंच ह्मणण्यासारखें आहे.

कवितेमध्येंतरी असेंच आहे. संगीताप्रमाणेंच कवितेमध्येंही मनामध्यें कोणताही मनोविकार प्रबळ झाल्यानें जे स्वाभाविक उद्गार निघतात त्यांवरच सर्व कांहीं अवलंबून असतें. कवितेमधील स्वरसंवाद, तींतील पूर्ण व असंख्य रूपकें, अतिशयोक्ति व विलक्षण विपर्यास हीं सर्व मनोवृत्ति क्षुब्ध झाल्यानें भाषणाचें जें विशेष स्वरूप दिसून येतें त्याचेंच उत्कटतेनें आविष्करण करण्याचीं साधनें होत. ह्यास्तव कविता चांगली साधण्यास कवीचें लक्ष क्षुब्ध भाषणामध्यें ज्ञानतंतूंचे व्यापार कसे चालतात इकडे असलें पाहिजे. भाषणाचे भाग जुळून त्यांत अधिकोक्ति आणितांना कवीनें आपल्या साधनांचा उपयोग प्रमाणानें आणि नियमानेंच केला पाहिजे; ह्मणजे जेथें मनोभाव जोराचा नसेल तेथें त्यानें कवित्व अगदीं बेतानें आणिलें पाहिजे; जसा जसा मनोभाव प्रबळ असेल तसतसें कवित्वही चढाविलें पाहिजे; व जेथें तो मनोभाव अगदीं शिखरास पोंचेल तेथेंच सर्व कवित्व ओतलें पाहिजे. ज्या काव्यामध्यें ह्या नियमांचा पूर्णपणें भंग होतो तीं शब्दकाव्यें किंवा नीचकाव्यें होत. उपदेशपर कवितेमध्यें हे नियम पूर्ण रीतीनें पाळिले जात नाहींत; व

एकंदर काव्यांमध्यें पुष्कळ काव्यें नीरस निपजतात ह्याचें तरी कारण कवि हे नियम बहुतकरून पूर्ण रीतीनें पाळीत नाहींत हेंच होय.

कोणत्याही कारागिरास आपलें काम बरोबर उतरण्यास त्याच्या कलेचा जो विषय असेल त्या विषयाच्या गुणधर्मांचीच माहिती असली ह्मणजे झालें असें नाहीं; तर आपल्या कृतींतील निरनिराळ्या खुब्या पाहून किंवा ऐकून लोकांचें मनावर काय परिणाम होतील हेंही त्यास माहीत असलें पाहिजे; ह्मणजे त्यास मानसशास्त्राचें ज्ञान असलें पाहिजे. आतां ज्या लोकांपुढें आपली कृति जावयाची त्या लोकांचे मनावर तीपासून काय परिणाम होतील हें अर्थात् त्यांच्या स्वभावांवर अवलंबून राहील. ज्या अर्थी सर्व लोकांचे स्वभाव कांहीं अंशीं तरी परस्परांशीं मिळाले पाहिजेत, त्या अर्थी तितक्या अंशांपुरते आपणांस असे कांहीं व्यापक नियम काढितां येतील कीं, जे कोणतीही कृति मासलेवाईक ठरण्यास प्रत्येक कारागिरानें अवश्य पाळलेच पाहिजेत. शिवाय ते पूर्णपणें समजण्यास व त्यांचा उपयोगही करितां येण्यास ते मनाच्या धर्मास कसे अनुसरून असतात हेंही त्यास समजलें पाहिजे. चित्राची कृति बरोबर उतरली आहे कीं नाहीं असें विचारणें ह्मणजे तें पाहून पाहणाराची मनोवृत्ति कशी काय होईल असेंच खरोखर विचारणें आहे. एखाद्या नाटकाची रचना चांगली झाली आहे कीं नाहीं असें विचारणें ह्मणजे त्यांतील कथानकाची रचना लोकांचें एकाग्रतेनें लक्ष लागेल अशी झाली आहे किंवा नाहीं, व त्यांत मनास उद्वेग आणणारा असा एखाद्याच रसाचा अतिरेक झाला आहे किंवा काय असेंच विचारणें आहे. तसेंच काव्याचे किंवा कल्पित कादंबरीचे मुख्य मुख्य भागांची किंवा वाक्यांतील शब्दांची जुळणी अशी खुबीदार असली पाहिजे कीं, तिच्या योगानें वाचकांचे बुद्धीस व मनोवृत्तींस ताण न बसतां मनास आनंद व्हावा; व तसा होत असेल तरच ती जुळणी चांगली असें समजावयाचें. प्रत्येक कारागीर आपलें कसब शिकत असतांना व पुढें कांहीं कांहीं धोरणें बसवून देवितो व त्यांसच अनुसरून नेहमीं त्याचें काम चालत असतें. आतां ह्या धोरणांच्या मुळांशीं पाहूं गेलें तर मानसशास्त्रच आहे. तर या मानसशास्त्राचीं तत्वें व तदन्तर्गत गोष्टी जेव्हां कारागिरांस समजत असतील तेव्हांच त्या तत्वांस व त्या गोष्टींस धरून त्यांस आपलें काम चालवितां येईल.

आम्ही असें म्हणत नाहीं कीं हें शास्त्रीय ज्ञान असलें म्हणजे मनुष्य कारागीर बनतोच बनतो. बाह्यसृष्टींतील पदार्थांचे मुख्य नियम व मनाचे मुख्य धर्म हे त्याला माहीत असलेच पाहिजेत असें आमचें म्हणणें आहे खरें, तथापि आम्ही आणखी असें म्हणतों कीं, हें ज्ञान असलें तरी त्यास आपल्या धंद्यासंबंधाचें उपजत ज्ञानही असलें पाहिजेच. कवीलाच काय पण प्रत्येक कसबांतील कारागिरालाही मूळचा अंकुर असलाच पाहिजे. आमचें इतकेंच म्हणणें आहे कीं, केवळ मूळच्याच अंकुरानें चालावयाचें नाहीं, त्यास शास्त्रीय ज्ञानाची मदत पाहिजे. केवळ प्रतिभेनें बरेंच काम होईल, परंतु सर्वच होणार नाहीं. उपजत ज्ञान आणि शास्त्रीय ज्ञान ह्यांची सांगड जमली तरच कसबाची कमाल व्हावयाची.

कारागिरीचे मासले उत्तम उतरण्यास व त्यांची परीक्षा होऊन आनंद होण्यास शास्त्रीय ज्ञान पाहिजे असें आम्ही पूर्वी म्हटलेंच आहे. मुलांपेक्षां जाणत्या मनुष्याच्या अंगीं चित्रांतील खुब्या जाणण्याची योग्यता जास्त असते ह्याचें कारण काय ? कारण मिळून इतकेंच कीं, चित्रामध्यें व्यक्त झालेल्या सृष्टींतील पदार्थांचीं मर्में त्यांस अधिक चांगलीं कळत असतात. विद्वान् गृहस्थ अक्षरशून्य मनुष्यापेक्षां उत्तम काव्यामध्यें जास्त रमून जातो, ह्याचें तरी कारण हेंच आहे कीं, त्यास सृष्टींतील पदार्थ व व्यवहार ह्यांची विशेष माहिती असल्यामुळें अडाणी मनुष्यास न समजण्यासारख्या व त्यास समजण्यासारख्या त्या काव्यामध्यें पुष्कळ गोष्टी असतात. आतां कसबाची सामान्यतः पारख करण्यास जर ह्याप्रमाणें त्या संबंधाच्या गोष्टींचें थोडें बहुत ज्ञान पाहिजे हें उघड आहे, तर त्या कसबाची पूर्ण पारख होण्यास त्या वस्तूंचें ज्ञान पूर्ण पाहिजे हें सांगावयास नकोच.वास्तविक प्रकार असा आहे कीं,एखाद्या कसबामध्यें जसजशा जास्त खुब्या दिसून येतात, तसतसा पाहणाराच्या मनास जास्त आनंद होतो. आतां ह्या खुब्या ज्यांस समजत नाहींत त्यांस अर्थात् हा आनंदही व्हावयाचा नाहीं. कारागीर आपल्या कसबामध्यें जितक्या जितक्या निरनिराळ्या खुब्या दाखवितो, तितक्या तितक्या तो आपल्या मनाच्या निरनिराळ्या शक्ति जागृत करितो, तितके तितके तो आपणांस जास्त विचार सुचवितो, व तितकें तितकें तो आपणांस जास्त समाधान देतो, असें सम-

जलें पाहिजे; परंतु हें समाधान करून घेण्याकरितां प्रेक्षकांच्या, श्रोत्यांच्या किंवा वाचकांच्या लक्षांत तीं मर्में मात्र आलीं पाहिजेत; आणि हीं मर्में समजणें म्हणजे तेवढें शास्त्र माहीत असण्यासारखें आहे.

आणखी दुसरी सांगण्यासारखी विशेष गोष्ट ही आहे कीं, शिल्प, चित्र, संगीत व कविता इत्यादि कलांच्या मुळाशीं शास्त्रीय ज्ञान आहे, म्हणूनच तें महत्वाचें आहे असें नाहीं, तर स्वतः शास्त्रीय ज्ञानामध्यें ही एक प्रकारची विलक्षण मौज आहे. लोकांची अशी समजूत आहे कीं, शास्त्रीय ज्ञान आणि कवित्व ह्यांचा परस्पर विरोध आहे. परंतु हा केवळ भ्रम आहे. आतां हें खरें आहे कीं, ज्ञान आणि मनोभाव ह्या दोन्ही मानसिक स्थिति आहेत, आणि म्हणून त्यांपैकीं एका स्थितीमध्यें आपलें मन असलें म्हणजे त्याच वेळेस तें दुसऱ्या स्थितींत असणार नाहीं. मन अगदीं विचारामध्यें निमग्न झालें म्हणजे आपले मनोभाव बंद पडतात, व तेंच मन मनोभावांमध्यें गढून गेलें म्हणजे आपला विचार अगदीं बंद पडतो; व अशा अर्थानें पाहूं गेलें तर सर्वच क्रियांचा परस्परांशीं विरोध आहे हें ही खरें. परंतु शास्त्रीय गोष्टींमध्यें कांहीं मौज नाहीं, किंवा शास्त्रीय ज्ञान संपादन केल्यानें आपली कल्पनाशक्ति व सृष्टींतील रमणीय गोष्टींच्या संबंधानें आपली रसिकता हीं कमी होतात हें मात्र आह्मांस अगदीं खरें वाटत नाहीं. उलट आह्मी असें म्हणतों कीं, शास्त्रानभिज्ञ मनुष्यास जेथें अगदीं शून्यसें वाटेल तेंच स्थान आपणांस शास्त्रीय ज्ञानाचे योगानें अगदीं नंदनवन होऊन जाईल. शास्त्रीय विषयांमध्यें ज्याचे अव्याहत शोध सुरू आहेत त्याचे मनाची स्थिति पाहिली तर असें दिसून येतें कीं, त्यास त्याचे विषयांपासून कांहीं विलक्षणच आनंद होतो. भूगर्भशास्त्रावरील 'ह्यूमिलर' साहेबांचे ग्रंथांचें जर एकनिष्ठपणें अध्ययन कराल, किंवा 'ल्युईस' साहेबांचें "समुद्रकांठचे उद्योग" हें पुस्तक जर वाचाल, तर तुमचें तुह्मांस वाटेल कीं शास्त्रीय ज्ञानाचे योगानें रसिकता कमी होत नाहीं तर वृद्धिंगतच होते. 'गीथ' नामक विख्यात जर्मन विद्वानाचें चरित्र जर मनांत आणाल, तर कवित्व आणि शास्त्रज्ञत्व हीं दोन्ही एकाच मनुष्याचे अंगीं सारख्याच उत्कटतेनें कशीं असूं शकतील हें तुमच्या स्पष्टपणें ध्यानांत येईल. सृष्ट पदार्थांचें जसजसें आपण जास्त अवलोकन करूं, तसतसें त्यावरील आपलें प्रेम व श्रद्धा कमी होते असें मानणें म्हणजे आपणांकडे खरोखर

मूर्खत्व व कांहींसें नास्तिकत्वही येत नाहीं काय ! एखाद्या अडाणी मनुष्यानें पाण्याचा एक थेंब पाहिला, तर त्याचे मनांत काय विचार यावयाचे आहेत ! तो ह्मणेल हा पाण्याचा थेंब आहे. ह्या पलीकडे कांहीं नाहीं. बरें तोच जर एखाद्या पदार्थविज्ञानशास्त्रज्ञानें पाहिला, तर त्याचे मनांत एकदम येईल कीं, हा पाण्याचा थेंब दोन वायुरूप द्रव्यांचा एका प्रकारच्या विलक्षण आकर्षणानें संयोग होऊन बनला आहे, व तें आकर्षण काढून घेतलें, तर एकदम विद्युत्तेज प्रकट होईल.आतां तुह्मीच सांगा कीं, तो पाण्याचा थेंब पाहून जास्त आनंद होईल कोणाला ? आपल्या केवळ चर्मचक्षूंनीं बर्फाचा तुकडा पाहणाऱ्या मूढापेक्षां सूक्ष्मदर्शक यंत्रांतून तोच तुकडा पाहणारास त्यावरील नानातऱ्हेचे रंग व सुबक आकृति पाहून कांहीं विशेष प्रकारचा आनंद होणार नाहीं काय ? एखादा गोलाकार खडक व त्यावरील समान्तर रेषा पाहून त्यावरून दहा लक्ष वर्षांच्या पूर्वी बर्फाचे पर्वत कोसळले होते असें ठेपून सांगणाऱ्या भूगर्भशास्त्रवेत्त्यास जो अत्यानंद होईल तो एखाद्या सामान्य माणसास होईल काय ? वास्तविकच आहे, ज्यास शास्त्रीय विद्येचा गंधही नाहीं त्यास सृष्टींमध्यें ज्या हजारों रमणीय वस्तु आहेत त्या पाहून प्रेम व समाधान कोठून होणार ! ज्यानें लहानपणीं वनस्पति व जीवजंतु ह्यांचा अभ्यास केला नसेल त्यास त्यांच्या नवीन जाति शोधून काढण्याकरितां गल्लया धुंडून लांब लांब कुंपणांतून हिंडण्यांत मौज वाटेल काय ? ज्यानें पृथ्वीच्या पोटांतून द्रव्यें उकरून काढण्याचा कधीं ही प्रयत्न केला नसेल, त्यास अशा प्रकारचीं द्रव्यें ज्या ठिकाणांतून खणून काढिलीं असतील, तीं ठिकाणें पाहून काय मौज वाटते, ह्याचा तर्क तरी करितां येईल काय ! लोकांनीं नेहमीं क्षुल्लक गोष्टींचे नादीं भरून जगन्नियंत्या परमेश्वरानें विश्वनिर्मितीमध्यें अगाध चातुर्यानें दाखविलेल्या दिव्य व अपूर्व चमत्कारांकडे दुर्लक्ष करावें हें पाहून कोणाला खेद होणार नाहीं ! लोकांनीं एखादी स्काटलंद देशची मेरीराणीसारखी राणी घेऊन तिच्या बंडाविषयीं शुष्क चर्चा करीत बसावें, माघा सारख्या एखाद्या संस्कृत काव्यामधील एखादा श्लोक घेऊन आपल्या विद्वत्तेचा कीस काढीत बसावें, आणि त्यांनीं ईश्वरकरांगुलीनें भूपृष्ठावर लिखित जें महाकाव्य त्याचा धिक्कार करावा हें खरोखर अत्यंत निंद्य नव्हे काय ?

ह्यावरून आतां इतकें सिद्ध झालें कीं, मानवीकृत्यांपैकीं शेवटचे वर्गांतील कृत्येंही नीटपणीं साधण्यास शास्त्रीयज्ञान हेंच योग्य साधन होय. आम्हीं पूर्वी असेंही दाखवून दिलें आहे कीं, मनोरंजनाच्या बहुतेक सर्व कलांस शास्त्रीय तत्वांचा मूळ आधार आहे, व हीं तत्वें नीटपणें मनांत ठसलीं, तरच त्या कलांमध्यें आपणांस प्रावीण्य प्राप्त होईल. कोणत्याही कसबाची पूर्णपणें परीक्षा करण्यास व त्यापासून आनंद होण्यास आपणांस पदार्थांचे घटकावयवांचें ज्ञान म्हणजे शास्त्रीय ज्ञान पाहिजे. सर्व प्रकारच्या कलांस व कवितादि सरस गोष्टींस शास्त्रीय ज्ञानाची मदत पाहिजे हें तर आम्हीं सिद्ध केलेंच आहे, परंतु नीट विचार केल्यावर असेंही दिसून येतें कीं, स्वतः शास्त्रीय विद्येमध्येंच एक प्रकारची विलक्षण सरसता आहे.

येथपर्यंत व्यवहारांत होणाऱ्या उपयोगाच्या संबंधानें निरनिराळ्या ज्ञानाच्या योग्यतेविषयीं प्रतिपादन झालें. आतां हरएक प्रकारचें ज्ञान संपादन केल्यापासून आपल्या मनास व बुद्धीस कोणते प्रकारची कसरत होते हें पाहून, त्या संबंधानें ज्ञानाची अन्यसापेक्ष योग्यता आपणांत ठरविणें आहे. हें काम आम्हांस कांहींसें आटपतें धरलें पाहिजे. आतां या संबंधानें एवढें बरें आहे कीं, या विषयीं आम्हांस विशेष चर्चा करीत बसण्याचें कारण उरलें नाहीं. कारण आमचें पहिलें काम झालें तेव्हांच दुसरें झाल्यासारखें आहे. हरएक व्यवहार योग्य रीतीनें चालवितां येण्यास जरूर तें ज्ञान संपादन करण्यासाठीं जो अभ्यास करावा लागतो, त्याच्याच योगानें आपल्या मानसिकशक्ति सुधारत जातात याविषयीं कांडीमात्र संशय नाहीं. ज्ञान संपादन करण्यास अभ्यास एका प्रकारचा व मानसिक शक्ति सुधारण्यास अभ्यास दुसऱ्या प्रकारचा, असें जर असतें, तर त्याच्यायोगानें एकंदर सृष्टींतील सरळ नियमांस बट्टा आला असता. या जगामध्यें जिकडे तिकडे असें आढळून येतें कीं, जें ज्या शक्तीचें काम असेल, तेंच काम करून त्या शक्तीच्या ठायीं तें काम करण्याची जास्त योग्यता येते, त्याकरितां स्वतंत्र धडे घेऊन अभ्यास करीत बसण्याचें कारण नाहीं. अमेरिकेंतील ताम्रवर्ण इंडियन मनुष्य पारधीच्या प्राण्यांचा पाठलाग करूनच उत्तम पारधी बनतो. तो आपले नेहमींच्या धंद्याच्या योगानेंच, तालीम करून राहावें त्यापेक्षांही आपलें शरीर जास्त स्वाधीन ठेवितो. आपले शत्रु व भक्ष्य पकडण्याच्या पुष्कळ दिवसांच्या सरावानें

त्याच्या अंगीं अशी कांहीं विलक्षण चलाखी येते कीं, तशी चलाखी मुद्दाम आणून ही यावयाची नाहीं. पहा अगदीं रानांत राहणाऱ्या पारध्यापासून तों मामलेदार कचेरींतील नगदी कारकुनापर्यंत सर्वथैव एक स्थिति आहे. जे प्राणी धरावयाचे किंवा ज्या प्राण्यापासून दूर रहावयाचें, अशा प्राण्यांस पुष्कळ अंतरावरून ओळखून ओळखून पारध्याची नजर इतकी लांबवर पोंहचूं शकते कीं, तिच्यापुढें दुर्बीण म्हणजे कांहींच नाहीं. नगदी कारकून नेहमींच्या सवयीनें दहा दहा सदरांच्या बेरजा एकदम घेऊं शकतो. यावरून आपणांस उदरनिर्वाहार्थ जे धंदे नेहमीं करावे लागतात, तेच करून आपल्या अंगीं ते धंदे करण्याची उत्तम शिताफी येते हे उघड होत आहे. हाच नियम सर्व शिक्षणास लागू पडेल, असें आम्ही खात्रीनें सांगतों. आपणांस नेहमीं व्यवहारामध्यें उपयोगी पडण्यासारखें शिक्षण संपादण्यास जे आपण उपाय योजतों, त्यांच्याच योगानें आपल्या मनाला व शरीरालाही एक प्रकारची कसरत होत असते. आतां याप्रमाणें जें आम्ही म्हणतों त्यास आधार काय आहे हें पाहूं.

आमच्याशिक्षणक्रमामध्यें भाषांचे अभ्यासास जें एवढें महत्व दिलें आहे, त्याचें असें एक कारण सांगतात कीं त्या अभ्यासाच्या योगानें स्मरणशक्ति वाढते. लोक असें समजतात कीं, शब्द घोकल्यानें स्मरणशक्ति वाढते, तशी दुसऱ्या कोणत्याही अभ्यासानें वाढावयाची नाहीं; परंतु असा प्रकार बिलकुल नाहीं अशी आमची खात्री आहे. शास्त्रीय विषयांच्या अभ्यासामध्यें स्मरणशक्तीची फारच जरुरी आहे. व त्यांच्या अभ्यासानें ती वाढण्याचा फारच संभव आहे. ग्रहमालिकेंतील सर्व ग्रहांची जेवढी माहिती झालेली आहे, तेवढी ध्यानांत ठेवणें म्हणजे कांहीं लहानसान काम नाहीं. आकाशगंगेची रचना व तिच्या संबंधानें जें सर्व माहीत आहे तें ध्यानांत ठेवणें म्हणजे तर बोलावयासच नको. रसायन शास्त्रामध्यें नवीन शोध होत गेल्यानें मिश्र द्रव्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत चाललीच आहे; त्या सर्वांचीं नांवें पाठशालांतील कांहीं थोड्या अध्यापकांस माहीत असलीं तर नकळे; व या प्रत्येक मिश्र द्रव्याची घटना, त्यांचे घटकावयव, व त्यांचे वजनांचें मान वगैरे सर्व कांहीं ध्यानांत ठेवण्यास रसायनशास्त्राचा सर्व जन्मभर अभ्यास केला तरी पुरेल कीं काय

याविषयीं संशयच आहे. पृथ्वीचा पृष्ठभाग, तिचे निरनिराळे थर, आणि पोटांतील सर्व द्रव्यें ह्या सर्वांचें ज्ञान मिळविण्यास भूगर्भशास्त्राचा अभ्यास करणारास वर्षांचीं वर्षें काढावीं लागतात. पदार्थविज्ञानशास्त्रांच्या ध्वनि, उष्णता, प्रकाश, आणि विद्युत् इत्यादि प्रकरणांतील असंख्य गोष्टी ध्यानांत ठेवावयाच्या झटलें झणजे त्या शिकूं इच्छिणारास धडकीच भरावयाची. आतां सेंद्रियविषयक शास्त्रांकडे वळलें तर, तिकडे तरी स्मरणशक्तीचें मोठेंच काम आहे. शारीरशास्त्रामध्यें बारीक सारीक गोष्टींचा एवढा मोठा भरणा आहे कीं, त्या सर्व नीटपणें ध्यानांत ठेवण्यास शास्त्रविद्या शिकूं इच्छिणाराला त्या सातसातदां घोकाव्या लागतात. वनस्पतिशास्त्रवेत्त्यास तरी तीन लक्ष वीस हजार वनस्पतींची झडती द्यावयाची असते; आणि शारीरशास्त्रवेत्त्यास तर वीस लक्ष प्राण्यांची व्यवस्था लावावी लागते. ह्याप्रमाणें शास्त्रीय विषयांचे संबंधानें इतक्या भाराभर गोष्टी पहावयाच्या असतात कीं, त्यांचें पूर्ण आकलन होऊन त्यांजवर विचार करितां येण्यास शास्त्रेच्छू लोकांस श्रमविभागाशिवाय गत्यंतर नाहीं. कोणत्या तरी एका शास्त्राचा एखाद्यानें पूर्णतेनें व्यासंग करावयाचा, तज्जातीय इतर शास्त्रांचें सामान्यतः ज्ञान करून घ्यावयाचें व फार झालें तर भिन्नजातीय कांहीं शास्त्रांचीं मूलतत्वें अवगत करून घ्यावयाचीं याप्रमाणें या शास्त्रीय विषयांच्या व्यासंगाची सांप्रतची व्यवस्था आहे. सारांश शास्त्रीय विद्येचा अगदीं चालचलाऊ अभ्यास केला तरी त्यामध्यें स्मरण शक्तीस इतकें जबर काम पडतें कीं, ती खात्रीनें वाढलीच पाहिजे. निदान ही शक्ति वाढण्यास जितका भाषेच्या अभ्यासाचा उपयोग होतो, तितका तरी शास्त्रीय विषयांच्या अभ्यासाचाही होईल, असें झणण्यास मुळींच हरकत नाहीं.

परंतु आतां असें पहा कीं, केवळ स्मरणशक्ति वाढण्यास शास्त्रीय विषयांच्या अभ्यासाचा भाषांच्या अभ्यासाइतकाच उपयोग होतो, जास्त होत नाहीं, असें जरी मानिलें, तरी शास्त्रीय विषयांच्या अभ्यासानें जी आपल्या स्मरणशक्तीची सुधारणा होते, ती कांहीं विशेष प्रकारची असते इतकेंतरी आपणांस कबूल केलेंच पाहिजे. भाषा शिकतांना निरनिराळ्या कल्पनांमधील जो परस्पर संबंध ध्यानांत ठेवावयाचा असतो तसा संबंध जगांत वस्तुस्थितीमध्यें केवळ यदृच्छेनें असतो, लोक मानितात झणून असतो, निश्चितपणें असलाच पाहिजे असें नाहीं. परंतु शास्त्र शिकतांना

निरनिराळ्या कल्पनांमधील जो परस्पर संबंध ध्यानांत ठेवावयाचा असतो तसा संबंध जगांत वस्तुस्थितीमध्यें नित्यतेनें व निश्चितपणें असतो. तो केवळ यदृच्छात्मक नसतो तर कार्यकारणभावात्मक असतो.

एका अर्थी पाहूं गेलें, तर शब्द आणि शब्दार्थ यांमधील संबंध स्वाभाविक आहे, व या संबंधाची पीठिका अगदीं मुळापर्यंत जरी नेतां आली नाहीं, तरी बरीच लांब पर्यंत नेतां येते. ही पीठिका नियमांत अनुसरून लावावयाची असते; व ह्या नियमांनीं एक भाषाविज्ञान ह्मणून स्वतंत्र शास्त्र बनलें आहे. परंतु नेहमीं लोक ज्या रीतीनें भाषांचा अभ्यास करितात, ती रीत पाहिली ह्मणजे असें दिसून येतें कीं, शब्द व शब्दार्थ यांचा संबंध बहुतकरून त्यांच्या मनांत नसतो, त्यांचे त्यांस नियमही समजत नाहींत, व यामुळें ते असें समजतात, कीं, हा संबंध केवळ अनित्य आहे नित्य नव्हे. परंतु शास्त्रीय गोष्टींमध्यें जो संबंध असतो तो कार्यकारणभावसंबंध असतो, व तो नीटपण लक्षांत आणून दिल्यास समजण्यासारखाही आहे. शब्द व शब्दार्थ यांमधील संबंध लक्षांत येण्यास बुद्धीचें काम अगदीं नाहीं ह्मटलें तरी चालेल, परंतु शास्त्रीय गोष्टींमधील संबंध लक्षांत येण्यास बुद्धीखेरीज चालतच नाहीं. ह्मणजे भाषेचा अभ्यास करण्यास नुसती स्मरणशक्ति असली म्हणजे पुरे; परंतु शास्त्राचा अभ्यास करण्यास बुद्धि व स्मरणशक्ति ह्या दोन्ही शक्तींचा उपयोग करावा लागतो.

दुसरें असें आहे कीं शास्त्राचे अभ्यासानें मनास चांगला व्यासंग घडून आपली विचारशक्ति वाढते; व ह्या करितांही आह्मांस भाषेपेक्षां शास्त्रास जास्त महत्व दिलें पाहिजे. रॉयल इन्स्टीट्यूशन विद्यालयांत एकदां फॅराडे नामक अध्यापकानें "मानसिकशिक्षण" ह्या विषयावर व्याख्यान दिलें, त्यांत त्यानें बोलतां बोलतां असें सांगितलें कीं 'आपल्या बुद्धीमध्यें विचारशून्यता हा एक मोठा दोष आहे.' त्यांच्या ह्मणण्याचें अगदीं अक्षरशः भाषान्तर खालीं लिहिल्याप्रमाणें आहे. " विचारशक्ति वाढविण्याच्या कामीं लोक अज्ञानी आहेत, इतकेंच नव्हे तर आपण असे अज्ञानी आहों, ही गोष्टही त्यांच्या लक्षांत येत नाहीं; आणि शास्त्राचे अभ्यासाचा अभाव हेंच ह्या अज्ञान स्थितीचें कारण आहे. " त्यांचें हें ह्मणणें अगदीं यथार्थच आहे. आपण जे पदार्थ, ज्या गोष्टी व त्यांचेच जे परिणाम नेहमीं पाहतों, त्यांचें यथार्थ

ज्ञान होण्याची शक्यता त्यांचा परस्पर संबंध नीटपणीं कळला तरच आहे. शब्दाचे कितीही अर्थ आपणास आले, तरी त्यांच्या योगानें कार्यें आणि कार्यें त्यांविषयीं बरोबर अनुमानें आपणांस करितां येणार नाहींत. कांहीं गोष्टी गृहीत घेऊन त्यांपासून सिद्धांत काढावयाचा व त्या सिद्धांताच्या खरेपणाचा सहजीं येईल तो अनुभव घेऊन किंवा स्वतां मुद्दाम प्रतीति पाहून त्यास ताडावयाची वहिवाट ठेविली, तरच यथार्थ ज्ञान मिळविण्याचें सामर्थ्य आपल्या अंगांत येतें. शास्त्राचा अभ्यास करितांना आपणांस हीच संवय ठेवावी लागते. हा त्याचे अभ्यासापासून आपणांस एक मोठाच लाभ होय.

शास्त्राचा अभ्यास आह्मी उत्तम म्हणतों, याचें कारण त्याच्या योगानें आपली विचारशक्ति वाढते एवढेंच नाहीं, तर शास्त्रीय अभ्यासानें आपणांस सदाचारासंही वळण लागतें. भाषांचे अभ्यासानें जें कांहीं होतें तें एवढेंच;—"बाबा वाक्यं प्रमाणम्" हें वचन आपणांस कळूं लागून, त्यावर आपली पूर्ण श्रद्धा बसते. गुरु किंवा कोशकार अमुक शब्दांचा अमुक अर्थ म्हणतात, असा असा व्याकरणाचा नियम आहे, इत्यादि गोष्टी विद्यार्थ्यानें वेदवाक्येंच म्हणून ग्रहण केल्या पाहिजेत. जें जें कोणी सांगेल, तें तें अगदीं हूं चूं केल्याशिवाय ऐकावयाचें अशी त्याचे मनाची प्रवृत्ति होते, व त्या सर्वाचा असा परिणाम होतो कीं, पूर्वापार चालत आलेल्या सर्व गोष्टी त्यास अगदीं प्रमाणभूत वाटूं लागतात. बरें, आतां शास्त्रांचे अभ्यासाचा प्रकार पाहिला तर त्याच्या योगानें मनास अगदीं निराळ्या प्रकारचा बाणा येतो. शास्त्राचे अभ्यासामध्यें बहुतेक गोष्टी आपल्या बुद्धीवरच सोंपविलेल्या असतात. शास्त्रीय गोष्टींची सत्यता केवळ वचनावरून धरावयाची नाहीं. खुशाल पाहिजे त्यानें त्याची प्रतीति घेऊन पाहावी; फार तर काय, कधीं कधीं विद्यार्थ्यास स्वतः विचार करूनच सिद्धांत काढावे लागतात. क्षणोक्षणीं त्यास विचारशक्तीचा उपयोग करावा लागतो. कोणतीही गोष्ट तिच्या सत्यतेचा प्रत्यक्ष अनुभव आल्याखेरीज त्यास खरी मानण्यास कोणी सांगत नाहीं. त्याचीं अनुमानें यथार्थ असलीं म्हणजे निरंतर सृष्टिक्रमामध्यें त्यांस प्रत्यंतर मिळत जावयाचेंच.आणि असें झालें म्हणजे त्याच्या स्वतःच्या मानसिक शक्तींवरील भरंवसा वाढत जातो; व नेहमीं असें होत गेल्यानें स्वातंत्र्यशक्तीस अंकुर फुटून ती

वाचनालय, सावरा.

नेहमीं वृद्धिंगत होत जाते. आणि खरोखर स्वातंत्र्यशक्ति किती महत्वाची आहे हें सांगावयास नकोच, तिची किंमत करावी तितकी थोडीच आहे. शास्त्राचे अभ्यासानें स्वातंत्र्यप्राप्ति हाच कायतो फायदा होतो, असें कोणीं समजूं नये. स्वतःच्या बुद्धीच्या जोरावर करावा तसा सदोदित शास्त्रीय गोष्टींचा अभ्यास केला, तर आपल्या निश्चयबुद्धीस व एकनिष्ठतेसच नेहमीं चलन मिळत जातें. 'टिंडल' नामक अर्वाचीन विद्वच्छिरोमणि व्यक्तिपरीक्षापूर्वक जात्यनुमानाविषयीं एके ठिकाणीं असें ह्मणतो; "ह्या प्रकारच्या अनुमानास अव्याहत दीर्घ प्रयत्न व सृष्टीमध्यें जें जें व्यक्त होईल त्याचा आदरपूर्वक एकनिष्ठतेनें स्वीकार, या दोन गोष्टींची अत्यंत आवश्यकता आहे. ह्यांत यश येण्यास मुख्य शर्त ही आहे कीं आपलीं पूर्वीचीं मतें आपणांस कितीही प्रिय असोत, त्यांचा जर सत्याशीं विरोध येईल, तर त्यांचा त्याग करण्यास व नवीन खऱ्या मतांचें ग्रहण करण्यास आपली मनापासून तयारी असली पाहिजे. स्वमतोत्सर्गवृद्धीमध्यें मनाचें एक प्रकारचें औदार्य दिसून येतें, व तिचा जगतामध्यें बहुतांशीं जरी लोपच आहे, तरी जो शास्त्राभ्यासाचा एकनिष्ठ भक्त आहे त्याच्या मनामध्यें ती वारंवार प्रकट होत असते.

आणखी एक गोष्ट सांगून हें प्रकरण आटोपतें घेतलें पाहिजे. आह्मी शास्त्रीय अभ्यासास एवढें जें उच्च पद देतों, त्याचें आणखी एक कारण आहे. आपल्या नेहमींच्या विद्याभ्यासापेक्षां शास्त्रीय विषयाचे अभ्यासानें आपली धर्मावर जास्त श्रद्धा बसते. आतां हें वाचून पुष्कळांस खरोखर आश्चर्य वाटेल, परंतु तसें आश्चर्य वाटण्याचें कांहीं एक कारण नाहीं. येथें आह्मी शास्त्र आणि धर्म ह्यांचा नेहमींचा अगदीं आकुंचित अर्थ घेत नाहीं हें उघड आहे. ह्या शब्दांचा अर्थ अगदीं उदात्त आणि व्यापकदृष्ट्याच घेतला पाहिजे. धर्म ह्मणून जे कांहीं वेडगळ प्रकार सुरू असतात त्यांचा आणि खऱ्या शास्त्राचा विरोध असलाच पाहिजे. परंतु ह्या वेडगळ प्रकारांच्या गंजाखालीं धर्माचीं जीं खरीं गूढ तत्वें लोपलेलीं असतात त्यांच्याशीं शास्त्रीय तत्वांचें सर्वांशीं ऐक्यच आहे. हल्लीं लोकांमध्यें ज्याला शास्त्राभ्यास ह्मणून ह्मणतात त्यामध्यें नास्तिकपणाचा कांहीं भाग आहे खरा, परंतु बाह्य गोष्टी सुटून अगाधतत्वांशीं ज्या

शास्त्राची तल्लीनता झाली आहे, त्या खऱ्या शास्त्रामध्यें हा प्रकार यत्किंचितही असावयाचा नाहीं.

'हक्स्ले' नामक शास्त्र-विशारदानें नुकतेंच आपल्या एका व्याख्यानमालिकेचा उपसंहार करतांना शास्त्र व धर्म ह्यांच्या परस्परसंबंधाविषयीं असें ह्मटलें आहे कीं, शास्त्र आणि धर्म हीं जुळीं भावंडें आहेत. त्यांचा परस्परवियोग झाला, तर उभयतांची प्राण-हानि व्हावयाची. शास्त्राचा अभ्यास करितांना मनाची ज्या मानानें धार्मिक वृत्ति असेल, त्या मानानें त्या अभ्यासाचा उत्कर्ष व्हावयाचा; व धर्मास ऊर्जित दशा प्राप्त होण्यास त्यास शास्त्राच्या अगाध मूलतत्वांचा दृढ आधार असलाच पाहिजे. तत्ववेत्त्यांचे दिव्य शोध हे केवळ त्यांच्या बुद्धिप्रभावाचीं फळें नव्हत, तर ते त्यांच्या बुद्धीच्या अपूर्व धार्मिक वृत्तीमुळें त्यांच्या हातून झालेलीं महत्कृत्यें होत, असेंच समजलें पाहिजे. तत्वज्ञानी पुरुषांची सत्यप्रीति, सहिष्णुता, एकनिष्ठता व मनोनिग्रह हेच गुण पाहून त्यांस विद्यावधूनें माळ घातलेली असते. केवळ त्यांची कुशाग्रबुद्धिमत्ता पाहून नव्हे.

लोक ह्मणतात तशी शास्त्राभ्यासानें धर्महानि होत नाहीं इतकेंच नव्हे, तर शास्त्राचा अभ्यास न केल्यानेंच धर्महानि होते. सभोंवतालच्या सृष्टीचें अवलोकन न केल्यानें धर्म लयास जात चालला आहे. एक साधें उदाहरण घेऊन पहा. समजा कीं एखाद्या ग्रंथकर्त्याची जिकडे तिकडे प्रशंसा चालली आहे; त्याचे ग्रंथांमधील शहाणपण, विद्वत्ता, व सौरस्य यांचा एकसारखा स्तोत्रपाठ चालला आहे; आतां मात्र एवढेंच कीं ज्यांनीं हा स्तुतीचा घोष चालविला आहे, त्यांनीं त्याच्या ग्रंथांचें काय तें बाह्यांग पाहिलें आहे; त्यांनीं ते ग्रंथ कधीं उघडले नाहींत व अर्थात् वाचून समजून घेण्याचा प्रयत्नही केला नाहीं. आतां अशा मनुष्यांनीं केलेल्या स्तुतिपाठाची आपण काय किंमत मानावी? त्याचा खरेपणाबद्दल आपणास काय वाटावें? सर्व विश्व आणि त्यांचें आदिकारण ह्यांविषयीं मनुष्यांची प्रवृत्ति अगदीं अशीच आहे. आतां हेंच उदाहरण अशा महत् गोष्टींस लावणें योग्य होणार नाहीं हें आह्मी समजतों; परंतु निर्वाहास्तव लावणें जरूर आहे. सर्व सृष्टि अपूर्व चमत्कारांनीं भरलेली आहे असा घोष मात्र नेहमीं चालतो, परंतु त्या चमत्कारांचें कधी लक्षपूर्वक कोणीही

अवलोकन करीत नाहीं इतकेंच नाहीं, परंतु जे करितात त्यांचा वारंवार उपहास करून त्यांचा ह्या कामीं जो वेळ जातो तो अगदीं व्यर्थ जातो असेंही ह्मणण्यास कित्येक चुकत नाहींत. फारतर काय, ह्या गोष्टींमध्यें मन घालून जे कोणी त्यांचा लक्षपूर्वक अभ्यास करितात, त्यांचा ते धिक्कारही करितात. यास्तव आह्मी पुन्हां एकवार असें ह्मणतों कीं, शास्त्रीय विषयांचे अभ्यासानें नव्हे, तर अनभ्यासानें धर्महानि होते. शास्त्रादर ह्मणजे जगन्नियंत्या परमेश्वराची एक पूजात्र होय. सृष्टपदार्थांच्या महत्त्वाचें ज्ञान झालें ह्मणजे अर्थात् त्यांच्या आदिकारणाविषयीं मनामध्यें पूज्यभाव उत्पन्न झालाच पाहिजे. ही पूजा ह्मणजे केवळ तोंडानें चाललेला स्तुतिघोष नव्हे; तर अंग झिजवून केलेली उपासना होय. ती केवळ दांभिक भक्ति नव्हे, तर काल, विचार, व श्रम ह्यांच्या दक्षिणाप्रदानानें विश्वरूप परमात्म्याच्या प्रीत्यर्थ केलेला महायाग होय.

खरें शास्त्र धर्मबुद्धिप्रवर्तक आहे असें जें आह्मी ह्मणतों तें एवढ्याबरूनच नव्हे. तर सृष्टींतील सर्व वस्तूंच्या रीतिस्थितीमध्यें जी एकरूपता दृष्टीस पडते, तिजवर शास्त्राभ्यासानें आपला भाव बसल्यानें तिच्याविषयीं आपल्या मनांत पूज्यबुद्धि उत्पन्न होऊन, आपली धार्मिकबुद्धि वृद्धिंगत होते; शास्त्राभ्यासानें अनुभव जसजसा वाढत जातो तसतसा सृष्टींतील शाश्वतसंबंधांविषयीं आपली जास्त खातरी होत जाते; कार्य आणि कारण यांचा अन्योन्य नित्यसंबंध आपणांस कळूं लागतो; व जगामधील शुभाशुभ फलें अपरिहार्य आहेत ह्याचेंही ज्ञान आपणांस होऊं लागतें. पूर्वापार चालत आलेल्या समजूतीप्रमाणें ऐहिक कृत्यांपासून होणाऱ्या शुभाशुभ परिणामांविषयीं प्राकृत लोकांची भलतीच कल्पना होऊन गेलेली आहे, आणि त्यांस असें वाटतें कीं आपण कसेही वागलों, तरी आपणांस दुःख टाळून सुखप्राप्ति करून घेतां येईल; परंतु शास्त्रवेत्ता पुरुष असें मानतो कीं, प्रत्यक्ष वस्तुस्थितीमध्यें सुखदुःख हीं ब्रह्मलिखित आहेत, आणि वस्तुस्थितीच्या नियमांचा भंग झाला असतां, त्यापासून होणारे अशुभ परिणाम कधींही टळावयाचे नाहींत; आपणांस जे नियम पाळावे लागतात, ते निष्ठुर आहेत खरे, तथापि ते आपणांस हितावह आहेत हें त्यांच्या लक्षांत पूर्णपणें यावयाचें; आणि त्या नियमांचे आधारें वागलें असतां सहजीं जगाची स्थिति दिवसानुदिवस सुधारत जाऊन

त्यांत सुखाची वृद्धीच होत जाईल हेंही त्यास व्यक्त होतें. ह्यास्तव तो त्या नियमांचें दृढावलंबन करितो व त्यांची कोणी अवहेलना केल्यावें पाहून त्यास क्रोध येतो; तसेंच वस्तुस्थितीमध्यें शाश्वत नियम आहेत व ते पाळणें अत्यंत आवश्यक आहे असें तो नेहमीं प्रतिपादन करीत असतो, आणि यायोगें आपल्या अंगीं खरी धार्मिकता प्रकट करितो.

आतां शास्त्राभ्यासामध्यें येणारें धर्माचें आणखी एक तत्व आहे तें सांगून हें प्रकरण पुरें करूं. शास्त्राभ्यासानेंच खरें आत्मज्ञान होऊन या अतर्क्य जगत्तत्वांशीं आपला काय संबंध आहे हें आपणांस समजूं लागतें; ह्याच्या योगानें सर्व ज्ञेय गोष्टींचें ज्ञान आपणांस होतें, व मानवी ज्ञानाची मर्यादा आपणास समजते. विश्वाच्या आदिकारणाचें ज्ञान अनधिगम्य आहे असें शास्त्र आपणास केवळ स्वाधिकारबलानें सांगत नाहीं, तर तें मानवीज्ञानाच्या मर्यादेपर्यंत आह्मांस युक्तियुक्तीनें आणून वरील तत्व आमचे हृदयामध्यें प्रत्यक्षतेनें ठसवून देतें. शास्त्राचे अभ्यासानें अपरिच्छेद्य तत्वांशीं प्रसंग येऊन मानवी बुद्धीचें क्षुद्रत्व जसें आपल्या मनामध्यें बिंबतें तसें दुसरें कशानेंही बिंबत नाहीं. लौकिकसंप्रदाय व पंडितंमन्य लोकांचीं प्रमाणभूत वाक्यें ह्यांच्याशीं शास्त्रज्ञ पुरुषांचें वर्तन उद्धत असेल, परंतु ज्या अभेद्य आवरणानें अनादिशक्तीचें निगूहन झालें आहे त्या आवरणाशीं यांचें वर्तन अगदीं नम्रतेचें असतें. हाच खरा अभिमान व हीच खरी नम्रता होय. केवळ अंतरांचें गणित करणारे, मिश्रपदार्थांचें पृथक्करण करणारे, किंवा सृष्टपदार्थांचें वर्गीकरण करणारे, अशा नामधारी शास्त्रज्ञ लोकांची गोट राहूं द्या; परंतु जे लोक तत्वसोपानपरंपरेवर क्रमाक्रमानें आरोहण करून शेवटीं परमतत्वास जाऊन पोंचतात, तेच शास्त्राचे खरे निःसीम भक्त होत; आणि जें अनादि ब्रह्म सत्, चित् आणि प्रकृति या तीन रूपांनीं या विश्वांत प्रकट होत आहे तें केवळ मनुष्याच्या ज्ञानासच काय, परंतु कल्पनेसही अगम्य आहे हें एक फक्त त्यांसच कळून येईल.

ह्यावरून आमचा असा निर्णय ठरतो कीं व्यवहारामध्यें आपलें वर्तन कसें ठेवावें हें समजण्यास व मानसिक शक्तीस चलन मिळून त्या सुधारण्यास शास्त्राभ्यासच अत्यंत उपयुक्त आहे. शब्दांचा अर्थ समजून घेण्यापेक्षां प्रत्यक्ष वस्तुंचा अर्थ समजून घेणें सर्व प्रकारें चांगलें. आ-

पल्या बुद्धीचा विकास होण्यास, आपणास नीतीचें वळण लागण्यास किंवा आपल्या मनाची धार्मिक वृत्ति होण्यास सिद्धांतकौमुदी किंवा अमरकोश यांचीं पारायणें करीत बसण्यापेक्षां आपण ज्या गोष्टी नेहमीं पाहातों व ऐकितों, त्यांचेंच लक्षपूर्वक अवलोकन व अध्ययन करणें निःसंशय अधिक श्रेयस्कर होय.

तर ह्याप्रमाणें "जगांत अत्यंत उपयुक्त ज्ञान कोणतें?" ह्या आपल्या मूळच्या प्रश्नास चोहींकडून एकच ह्मणजे 'शास्त्रीयज्ञान' हेंच उत्तर मिळतें, हाच सिद्धांत काढलेल्या सर्व मुद्यांस लागू आहे. प्रत्यक्ष आत्मरक्षणास किंवा प्राण व आरोग्य यांचे रक्षणास सर्वांशीं शास्त्रीय ज्ञानाचीच जरूरी आहे; आपला नेहमींचा चरितार्थ चालण्यास ह्मणजे अप्रत्यक्ष आत्मरक्षणास शास्त्राभ्यासाशिवाय गत्यंतर नाहीं; मुलांबाळांसंबंधीं आपलें कर्तव्य समजण्यास तरी शास्त्राचेंच ज्ञान पाहिजे; लोकांची व राष्ट्रांची प्राचीन व अर्वाचीन स्थिति ताडून पाहून राजकीय व सार्वजनिक कामांची व्यवस्था आपणांस नीटपणें साधण्यास सर्व गुरुकिल्ली शास्त्रीयज्ञानच होय. सर्व प्रकारच्या कारागिरीचे पदार्थ उत्तम तयार होण्यास व त्यांची यथार्थ परीक्षा होऊन खरें मनरंजन होण्यास तरी शास्त्रीय ज्ञानाची आवश्यकता आहे. बरें बुद्धि सुधारण्यास आणि नीतीचें वळण लागण्यास व मनाची धार्मिकवृत्ति होण्यासही पाहूं गेलें, तर शास्त्राध्ययनासारखें दुसरें साधन नाहीं. ह्याप्रमाणें प्रारंभीं जें काम आपणांस भानगडीचेंसें वाटलें होतें, तें जसजसा आपण त्याविषयीं विचार करीत गेलों तसतसें एकंदरीनें बरेंच सोपें आहे असें आपल्या अनुभवास आलें. निरनिराळ्या व्यवसायांचें महत्व मनांत आणून ते ते व्यवसाय उत्तम रीतीनें साधण्यास कोणत्या कोणत्या विषयांचा किती अभ्यास केला पाहिजे हें ठरवीत बसण्याचें आतां कारण राहिलें नाहीं; कारण व्यापक दृष्ट्या ज्याला आपण शास्त्र समजतों त्याचें एक अध्ययन झालें ह्मणजे त्याच्या योगानें सर्व व्यवसायांची तयारी उत्तम प्रकारची होते, असें आतां सिद्ध झालें आहे. लौकिक दृष्टीनें महत्त्वाचें ज्ञान कोणतें व खऱ्या महत्त्वाचें ज्ञान कोणतें वगैरे गोष्टी पाहून निरनिराळ्या ज्ञानाची व्यवस्था करीत बसण्याची आतां आवश्यकता राहिली नाहीं; कारण इतर सर्व गोष्टींनीं ज्या ज्ञानाची योग्यता जास्त, तेंच ज्ञान वस्तुतः ही जास्त

योग्यतेचें ठरतें; त्याची योग्यता लोकमतावर कधींही अवलंबून नसते; तर ज्या प्रमाणें मनुष्य मात्राचा एकंदर जगाशीं संबंध अगदीं निश्चित व स्थिर आहे, त्याच प्रमाणें या ज्ञानाची योग्यता अगदीं निश्चित व स्थिर आहे हें आतां पूर्णपणें आपल्या लक्षांत आलें आहे. ज्या अर्थी शास्त्राचे सिद्धांत अगदीं नित्य व अपरिहार्य आहेत, त्याअर्थी कोणत्याही कालीं सर्व मनुष्य जातीचा एकंदर शास्त्राशीं संबंध असावयाचाच. असें आहे तर, शरीर, मन व लोकस्थिति हीं व्यवस्थित राहण्यास अत्यंत उपयुक्त व अत्यंत महत्त्वाचें जें जीवनशास्त्र तें, व त्याची पूर्णपणें ओळख होण्यासाठीं इतर सर्व शास्त्रें, यांचें ज्ञान मनुष्यमात्रास असणें हें आज व कोट्यावधि वर्षानंतरही अत्यंत आवश्यक आहे हें सांगावयास पाहिजे काय ?

परंतु ज्या शतकाबद्दल ज्ञानप्रसाराच्या संबंधानें लोकांस मोठी घमेंडी झाली आहे, त्याच शतकामध्यें ह्या अत्यंत उपयोगाच्या विषयाकडे लोकांचें लक्ष अगदीं कमी आहे, हा चमत्कार नव्हे काय ? आमच्याकडे तर किंबहुना या ज्ञानाच्या अस्तित्वाचीही कल्पना लोकांस नाहीं असं झटलं तरी चालेल. परंतु युरोपांतही अजून या ज्ञानाचा व्हावा तसा आदर होत नाहीं. या संबंधानें हरबर्ट स्पेन्सर याप्रमाणें झणतातः—"शास्त्र नसतें, तर ही आपली हल्लींची सुधारणा झालीच नसती असें जरी खरें आहे, तरी हल्लींच्या लोकानुमतें सुधारलेल्या शिक्षणपद्धतीमध्यें ह्या शास्त्रीय ज्ञानाचें अंग उगीच अंशतः तरी दिसून येतें काय? जेथें केवळ हजारों लोकांचें पोट भरत होतें, तेथेंच आतां शास्त्रीय ज्ञानाच्या प्रसारानें कोट्यावधि मनुष्यांचें पोट भरत आहे; तथापि ह्या कोट्यावधि लोकांपैकीं दहा पांच हजार तरी जें ज्ञान आज त्यांच्या प्रत्यक्ष जीवेताचें बीज आहे तें ज्ञान काय आहे हें पाहूं बरें, असें उगीच झणतात तरी काय? सृष्टींतील सर्व वस्तूंचे अन्योन्यसंबंध व धर्म ह्यांचें ज्ञान होत गेल्यानें जेथें केवळ पूर्वी भटकणाऱ्या लोकांच्या टोळ्या होत्या, तेथें आतां अगदीं भरवस्तीचीं राष्ट्रें नांदत आहेत; व त्यांतील असंख्य प्रजा, त्यांच्या वस्त्रहीन पूर्वजांनीं ज्या सोई व जीं सुखें पूर्वी कधीं ऐकिलीं नव्हतीं, अशा सर्व सोयींचा व सुखांचा साक्षात् उपभोग घेऊन आनंदामध्यें दिवस काढीत आहेत. तथापि अशा शास्त्रीय ज्ञानास अगदीं श्रेष्ठ प्रतीच्या पाठशालांमधूनसुद्धां आतां कोठें उगीच

जुलुमाचा रामराम होत चालला आहे ! सर्व सृष्टपदार्थांची एकंदर एकरूपता व त्यांमधील नित्य व अविकार्य संबंध ह्यांचा परिचय झाल्यामुळें, व सृष्टीसंबंधीं कायमचे अनपवाद असे नियम बसून गेल्यामुळें आपण आतां ज्ञानरूपी कुठारानें मिथ्याधर्मबंध खडाखड तोडीत चाललों आहों. शास्त्रीय ज्ञानाचा प्रसार झाला नसता तर अद्यापिही आपली जडमूर्ति व पशु ह्यांची पूजा सुटली नसती; व शतावधि प्राणी बळी देऊन अघोर नरयज्ञादिविधींनीं राक्षसी दैवतांचीं आराधना करण्याचा क्रम तसाच सुरू असता. ज्या शास्त्राभ्यासाच्या योगानें आपलें अशा प्रकारचें सर्व नीच अज्ञान जाऊन सृष्टीचें भव्य सौंदर्य व्यक्त होत आहे, त्याच शास्त्राभ्यासाची हेलना व्हावी व त्यावर धर्मोपदेशकांचा कटाक्ष असावा, हें केवढें आश्चर्य आहे ! सारांश ह्या शास्त्रविद्येच्या सांप्रतच्या स्थितीस आपण जी एक नावडत्या राणीची गोष्ट ऐकितों, ती सर्वांशीं लागू पडते. शास्त्रविद्येची स्थिति त्या नावडत्या राणीच्या स्थितीसारखी आहे. ती नेहमीं कोनाकोपऱ्यामध्यें असल्यामुळें तिचे गुण कोणाच्या लक्षांत येत नाहींत. सर्व काम तेवढें तिच्यावर लादलेलें असतें; तिची कर्तबगारी, शहाणपण व एकनिष्ठप्रेम हीं सर्व संसारसुखाचीं वास्तविक साधनें आहेत. ती आपल्या पतीच्या सेवेमध्यें नेहमीं तत्पर असून तिचें कधीं नांवही निघत नाहीं. तिच्या नखरेबाज सवती नेहमीं चट्टीपट्टी करून मोठ्या थाटानें इकडून तिकडे मिरवत असतात. हेंच साम्य अगदीं अखेरपर्यंत दाखवितां येतें. आतां सर्व विपरीत होऊन जाण्याचा समय नजीक ठेपला आहे. यापुढें शास्त्रविद्येच्या सवती ज्या इतर विद्या त्यांस कोणी फारसें विचारणार नाहीं, आणि शास्त्रविद्येचें खरें स्वरूप व योग्यता ह्यांची यथार्थ परीक्षा होऊन तिचा जयजयकार होईल, आणि असें होण्याचा काल समीप आला आहे."

भाग १ ला समाप्त.



भाग २ रा.

मानसिक शिक्षण.

आजपर्यंत ज्या निरनिराळ्या शिक्षणपद्धति होऊन गेल्या, त्यांपैकीं प्रत्येकीचा त्या त्या वेळच्या लोकस्थितीशीं संबंध असला पाहिजे, ही गोष्ट अगदीं उघड आहे. कोणत्याही कालच्या लौकिक राजकीय व धर्म संबंधी गोष्टींविषयीं विचार केला तर असें दिसून येतें कीं, तत्कालीन लोकांच्या मानसिक स्थितीस अनुलक्षूनच त्या असल्या पाहिजेत; व ह्याप्रकारें त्या सर्वांचें बीज एकच असल्यामुळें साधारण एखाद्या कुटुंबांतील माणसांमध्यें जें साम्य दिसून येतें, तें साम्य त्या सर्व गोष्टींमध्येंही दिसून आल्याशिवाय कधीं रहावयाचें नाहीं. धर्माध्यक्ष सांगेल तो धर्म, शास्त्री-बुवा सांगतील तो धर्मशास्त्राचा अर्थ, त्यांमध्यें कधींही चुक ह्मावयाची नाहीं, व त्याबद्दल कधीं कोणी हूं चूं करावयाचें नाहीं, अशी धर्माची स्थिति असली ह्मणजे शाळांमध्येंही गुरुजी करतील तो अर्थ, पंतोजी ह्मणेल ती पूर्वदिशा, असाच क्रम सुरू असावयाचा ह्यांत कांहीं विशेष नाहीं. परंतु ही स्थिति जाऊन सर्व जाणत्या मनुष्यांस धर्मप्रकरणांत मन घालून स्वतः विचार करण्याचा अधिकार प्राप्त होऊं लागला, व त्याचप्रमाणें कोणत्याही विषयाच्या संबंधानें बुद्धि चालवून सारासार विवेक करण्याचा प्रघात लोकांमध्यें बराच पडूं लागला, ह्मणजे अशा वेळेस शाळांमधीलही पूर्वीची शिक्षणपद्धति बंद पडून, मुलांस प्रत्येक गोष्ट समजावून देण्याचा प्रकार सुरू व्हावा हें अगदीं स्वाभाविकच आहे. ज्या वेळेस सरकार जुलमी असतें, कायदेकानू कडक असतात, सर्व राज्यव्यवस्था दहशतीच्या जोरावर चालत असते, लहानसान अपराधांस सुद्धां देहांत प्रायश्चित्त देण्याचा तडाका सुरू असतो; ह्मणजे ज्यावेळेस राज्यस्थिति याप्रमाणें सक्तीची असते, त्या वेळेस शाळांमधूनही अशाच प्रकारची कडक शिक्षा सुरू असावी, मुलांस हजारों नियम घालून दिलेले असून ते मोडल्यास तडाके मिळावे, आणि एकछत्री बादशाही अंमल असून, फटके, छड्या, घोडी, कोंडून ठेवणें-

इत्यादि शिक्षा सुरू असाव्या हें योग्यच आहे. परंतु तेच आपणांस राजकीय हक्क मिळत गेले, स्वातंत्र्यापहारक कायदे बंद होऊन फौजदारी कायदा सुधारला, म्हणजे त्या बरोबरच शाळांमधूनही सुधारणा होत जाऊन शिक्षणपद्धति सौम्य होत जाते, व मुलांच्या मनावरील प्रतिबंध पुष्कळ कमी होऊन त्यांस शिक्षा केल्याशिवाय इतर उपायांनीं शिस्त लावण्याचा क्रम सुरू होत जातो. ज्या वेळेस तापसवृत्ति धारण करून लोक दुःखसहिष्णुता हेंच सर्व धर्माचें व संसाराचें परमतत्त्व मानीत असतात, व सर्वसंगपरित्याग ह्या सारखा दुसरा सदाचार नाहीं असें समजत असतात, त्या वेळेस जी शिक्षणपद्धति मुलांच्या सर्व इच्छांस आड येऊन "खबरदार असें करालतर" ह्या शब्दांनीं त्यांचे सर्व उल्हासवृत्तीचे अंकुर खुंटून ती समूळ नष्ट करून टाकिते, तीच शिक्षणपद्धति त्यांस सहजीं पसंत पडावयाची. परंतु आपल्या सुखासाठीं झटणें यांत कांहीं वावगें नाहीं असें लोक समजूं लागले आणि आपणांस काम थोडें पडूं लागून वेळ घालविण्याचीं नानातऱ्हेचीं कर्मणुकेचीं साधनें निघूं लागलीं म्हणजे मुलांस बऱ्याच अंशीं त्यांच्या इच्छांप्रमाणें वागूं देणें हेंच रास्त आहे व मुलांच्या मनाचे कल जितके आपण निंद्य समजतों तितके वस्तुतः नाहींत, असें आईबापांस व शिक्षकांस वाटूं लागणें साहजिकच आहे. व्यापारास उत्तेजन येण्याकरितां मनोतीसारखे उपाय असणें जरूर आहे, तसेंच प्रतिबंधात्मक उपायांचीही आवश्यकता आहे; कलाकौशल्यांचा उत्कर्ष होण्यास जिनसांच्या जाती, नमुना, व किंमत यांविषयीं निर्बंध असला पाहिजे; व त्याचप्रमाणें पैशाची किंमतही कायद्यानें बांधून टाकिली पाहिजे; अशी लोकांची समजूत असली म्हणजे त्या बरोबरच मुलांच्या मनांचें शिक्षणही अगदीं यंत्रांत घातल्या सारखें नमुन्याबरहुकूम उतरून देतां येईल; त्यांच्या मानसिकशक्ति उत्पन्न करणें केवळ गुरूच्या हातीं आहे; आणि मन म्हणजे केवळ ज्ञानसंचय करून ठेवण्याचें एक स्थान आहे, त्या ठिकाणीं गुरूच्या मनास मानेल तसें सुंदर ज्ञानमंदिर उठवून देतां येईल, असे त्यांचे विचार असणें यांत कांहीं आश्चर्य वाटण्याजोगें नाहीं. परंतु लोकांस उद्यमस्वातंत्र्याची इष्टता कळूं लागली; सर्व गोष्टी स्वाभाविक रीतीनें चालूं दिल्या तर त्यांमध्यें घोटाळा न होतां बऱ्याच सुयंत्र रीतीनें चाल-

तात; श्रम, व्यापार, शेती, नौकागमन, इत्यादि गोष्टींत नियम असण्यापेक्षां नियम नसण्यापासून जास्त फायदा आहे हें लोकांस समजूं लागलें; व कोणतीही राज्यपद्धति हितकर होण्यास ती आपोआप वाढत गेली पाहिजे, तिचें कलम करून चालावयाचें नाहीं, हें लोकांचे मनावर बिंबूं लागलें; ह्मणजे त्याबरोबरच लोकांस सहजीं हेंही समजूं लागेल कीं, मनाचा स्वाभाविक रीत्या विकास पावण्याकडे कल आहे, व त्यामध्यें व्यत्यय आणिला, तर मात्र त्यापासून आपली हानि होईल; तसेंच मानसिक शक्ति नैसर्गिक रीतीनें विकास पावत असतां तिस बलात्कारानें कृत्रिम मार्गाकडे वळविण्याचा यत्न केला, तर तिचा अर्थात् ह्रास होईल; सारांश अर्थशास्त्राप्रमाणें मानसशास्त्रामध्येंही खपाप्रमाणें पुरवठा हा नियम आहेच, आणि आपलें अकल्याण न व्हावें अशी इच्छा असेल तर आपणांस येथेंही तो नियम पाळणें आवश्यक आहे; सारांश कोणताही काल घ्या, तत्कालीन सामाजिक स्थिति व शिक्षणपद्धति यांमध्यें सादृश्य असावयाचेंच. कोणताही देश घ्या, त्या देशांत ज्या कालच्या लोकस्थितींत अत्यंत दृढ असा दुराग्रह, कडक कायदे, असंख्य प्रतिबंध, कडकडीत तापसवृत्ति, व मनुष्याच्या कर्तुमकर्तुं शक्तीविषयीं प्रबल श्रद्धा या गोष्टी दिसून येतात, त्या कालच्या शिक्षणपद्धतींतही याच गोष्टींचें प्राबल्य आहे असें आढळून येईल; व ज्या कालीं याहून भिन्न अशी लोकस्थिति असेल, त्या कालची शिक्षणपद्धतिही तदनुसार भिन्नच असेल.

वर सांगितलेल्या साम्याशिवाय कोणतीही लोकस्थिति आणि तत्कालीन शिक्षणपद्धति यांमध्यें आणखीही साम्य आहे. या दोहोंत वेळोवेळीं जे फरक होतात ते ज्या रीतीनें होतात ती रीति आणि ते होऊन झालेलीं स्थित्यंतरें, या दोहोंतही साम्य असतें. हें साम्य कसें असतें हें ऐतिहासिक उदाहरणांवरून सुलभ रीतीनें स्पष्ट करून दाखवितां येईल. आमच्या देशाचा विश्वसनीय असा इतिहास सांप्रत उपलब्ध असता, तर वरील गोष्ट वाचकांचे मनांवर उत्तम रीतीनें बिंबवून देण्यास परिचित गोष्टींच्या साहाय्यानें आह्मांस फार सुलभ झालें असतें. परंतु दिलगिरीची गोष्ट ही आहे कीं, आमच्या देशाचा विश्वसनीय असा इतिहास सांप्रत उपलब्ध नाहीं. यामुळें निरुपायास्तव वरील सिद्धांताच्या समर्थनार्थ परकीय देशाच्या इतिहासाकडे आपण घटकाभर वळूं.

यूरोपामध्यें कांहीं शतकांपूर्वी धर्म, राजनीति, व शिक्षण ह्यांविषयीं लोकांचीं मतें अगदीं एकसारखीं होतीं. पूर्वी तिकडील सर्व लोकांस धर्माचे कामांत धर्माधिकारी (पोप) सांगेल तें, राजकीय कामांत राजा सांगेल तें, व विद्येच्या कामांत आरिस्टाटल सांगेल तें, अगदीं शिरसावंद्य असे. बरें ह्या तिन्हींमध्यें जो पुढें एकसारखा विलक्षण फरक पडत गेला त्यालाही अगदीं एकच कारण आहे. यूरोपामध्यें व्यक्तिस्वातंत्र्याचा जो उदय झाला त्याच्याच योगानें प्राटेस्टंट मताची स्थापना झाली, आणि पुढेंही त्याच्याच योगानें आजपर्यंत धर्मामध्यें नवीन नवीन असंख्य पंथ निघत आले आहेत. ज्या स्वातंत्र्येच्छेच्या योगानें राजकीय प्रकरणांमध्यें वाद सुरू होऊन लोकांमध्यें मूळ दोन पक्ष उपस्थित झाले, तीच स्वातंत्र्येच्छा दिवसानुदिवस वाढत जाऊन, त्या मूळच्या दोन पक्षांमध्येंच आज असंख्य भेद उत्पन्न झाले आहेत. ज्या स्वातंत्र्येच्छेनें बेकन नामक विख्यात तत्ववेत्त्यास आरिस्टाटलमतानुयायी पंडितांवर शस्त्र धरण्यास लाविलें, तीच स्वातंत्र्येच्छा उत्तरोत्तर वृद्धिंगत होऊन आज यूरोपामध्यें न्याय व तत्वज्ञान ह्या संबंधानें असलेल्या विलक्षण मतवैचित्र्यास कारणीभूत झाली आहे. आणि त्याचप्रमाणें शिक्षणाविषयीं आज जीं अनेक भिन्न भिन्न मतें दृष्टिगोचर होत आहेत, व ज्या नवीन असंख्य पद्धति निघूं लागल्या आहेत, त्या सर्वांचें बीज हीच स्वातंत्र्येच्छा होय. शिवाय या सर्व गोष्टी एकाच अंतर्गत कारणाचीं कार्यें आहेत, त्याअर्थी त्या बहुतेक अंशीं समकालीनच असल्या पाहिजेत. पोप, अरिस्टाटल, राजा व शालागुरु ह्या सर्वांच्या महत्त्वाचा ऱ्हास एकाच कारणाचा प्रभाव होय. आणि हें सर्व स्थित्यंतर कसें होत गेलें, व त्यानंतर लोकांमध्यें कोणतीं नवीन नवीन मतें व संप्रदाय उपस्थित झाले, हें पाहूं गेलें ह्मणजे आपल्या सहजीं लक्षांत येतें कीं, हा सर्व स्वातंत्र्येच्छेचाच खेळ आहे.

मुलांस शिकविण्याच्या नेहमीं निरनिराळ्या पुष्कळ पद्धति निघत आहेत, हें पाहून पुष्कळ लोकांस वाईट वाटेल हें अगदीं खरें आहे. परंतु खऱ्या खऱ्या विचारी मनुष्यास असें आढळून येईल कीं, आपणास सरते शेवटीं अगदीं खरी अशी शिक्षण पद्धति काढितां येण्यास, ह्या निरनिराळ्या शिक्षण पद्धतीच साधनीभूत होणाऱ्या आहेत. धर्मसंबंधी प्रकरणांमध्यें असा मतभेद होणें इष्ट असो अगर नसो, शिक्षणाच्या

कामीं जर असा मतभेद होत गेला, तर आपलें काम वांटलें जाऊन खरी शिक्षणपद्धति शोधून काढण्यास आपणांस पुष्कळ सोपें पडेल यांत संशय नाहीं. कल्पना करा कीं, सांप्रत सुरू असलेल्या शिक्षणपद्धतींतच खरी शिक्षणपद्धति आहे, परंतु ती आपणांस माहीत मात्र नाहीं, तर तदनुसार वर्तन न झाल्यामुळें आपलें नुकसान होईल हें खरें; परंतु जोंपर्यंत खरी शिक्षणपद्धति आपणांस सांपडावयाची आहे, तोंपर्यंत तरी असा मतभेद असणें इष्ट आहे. कारण असा मतभेद असला म्हणजे खरी शिक्षणपद्धति शोधून काढण्यासाठीं लोकांचे निरानिराळे उद्योग निरानिराळ्या रीतींनीं सुरू असतात; आणि अशी स्थिति असली म्हणजे आपली तयारी सहजीं इतकी उत्तम होऊन जाते कीं, तशी तयारी करू झटलें तरी सुद्धां होणार नाहीं. प्रत्येकास कांहीं तरी नेहमीं नवीन गोष्ट सुचत असते; कदाचित् तिचा खऱ्या शिक्षणपद्धतीशीं थोडा बहुत तरी संबंध असण्याचा संभव असतो; प्रत्येकास आपण काढलेली कृति खरी असें वाटत असून निरनिराळ्या साधनांनीं तिची सत्यता सिद्ध करून दाखविण्यास तो झटत असतो; व तो एकदां खरीशी ठरली म्हणजे तिचा प्रसार करण्यास अत्यंत उद्युक्त असतो; तसेंच प्रत्येकजण इतरांवर घसरून त्यांच्या मतांचें खंडन करूं लागला, म्हणजे अगदीं मागें पुढें पहात नाहीं; ह्याप्रमाणें पूर्वपक्ष व उत्तरपक्ष यांची भवति नभवति चालून व सत्यासत्यतेचा निर्णय होऊन, हळू हळू खरा मार्ग बाहेर पडल्याशिवाय राहत नाहीं. कोणी एखाद्यानें खऱ्या शिक्षणपद्धतीचा जो भाग शोधून काढिला असेल, त्याच्या सत्यतेचा लोकांस वारंवार अनुभव येत जाऊन, तो त्यांस मान्य झालाच पाहिजे. सत्याबरोबर जो त्यानें असत्याचा भाग आणिला असेल तो अनुभवाअंतीं खोटा ठरून त्याची दुर्दशा होऊन गेलीच पाहिजे. ह्याप्रमाणें सत्यांशांचें एकीकरण होऊन असत्यांशांचा लोप होत गेला, म्हणजे शेवटीं सर्वांशीं खरें व परिपूर्ण असेंच मत प्रचारांत आलें पाहिजे. प्रत्येक सिद्धांतास तीन स्थितींतून जावें लागतें. (१) त्यांतील पहिली स्थिति, म्हणजे त्याविषयीं अज्ञानी लोकांची एकवाक्यता. (२) दुसरी स्थिति म्हणजे त्याविषयीं ज्यांचा शोध सुरू असतो अशा लोकांमधील मतभेद. (३) आणि तिसरी स्थिति म्हणजे त्याविषयीं विद्वानांची एकवाक्यता. ह्या तीन स्थितींपैकीं दुसरी

स्थिति तिसऱ्या स्थितीचें उत्पत्तिस्थान होय. ह्या तीन स्थितींमध्यें केवळ पौर्वापर्यसंबंध आहे इतकेंच नव्हे, तर त्यांमध्यें कार्यकारणभावही आहे. ह्यास्तव शिक्षणपद्धतीबद्दल चालू असलेला हल्लींचा वाद कधीं एकदां संपेल असें जरी आपणांस झालें असलें, आणि त्या वादापासून उत्पन्न होणारीं अरिष्टें कितीही खेदकारक असलीं, तरी आपण असें समजलें पाहिजे कीं, ह्या स्थित्यंतरांमधून जाणें अपरिहार्य व आवश्यक आहे, व ह्याचा अंतीं परिणाम हितकर होईलच होईल.

येथें ह्या शिक्षणपद्धतीच्या संबंधानें युरोपियन लोकांचे जे उद्योग सुरू आहेत त्यांपासून त्यांना काय फलप्राप्ति झाली आहे, ह्याविषयीं थोडक्यांत विचार करणें इष्ट आहे. ह्याविषयीं आज सतत पन्नास वर्षें जी चर्चा चालली आहे, व निरनिराळ्या पद्धति ताडून त्यांचा अनुभव घेण्याचा जो क्रम सुरू आहे, त्यापासून कांहींच लाभ झाला नसेल काय? कित्येक जुन्या पद्धति रद्दीमध्यें पडल्या असतील;कांहीं नवीन सुरू झाल्या असतील; आणि पुष्कळ रद्दीमध्यें पडण्याच्या किंवा सुरू होण्याच्या बेतांत असतील. ह्या सर्व घडामोडीमध्यें पाहूंच गेलें, तर आजपर्यंत झालेल्या सर्व मतांतरांत एक प्रकारचें सादृश्य दिसून येतें, व त्या सर्वांची कोणत्या तरी एका दिशेकडे प्रवृत्ति आहे असें आढळून येतें; आणि ह्या रीतीनें हल्लीं आपण कोठें आहों, व कोणीकडे जात आहों, ह्याविषयीं आपणांस कांहीं सुगावा लागेल, व पुढें मुकामास पोंहोंचण्यास कोणत्या मार्गानें गेलें पाहिजे, ह्याविषयींही कांहीं पत्ता लागण्याचा संभव आहे. तर मग आतां पूर्वीच्या आणि हल्लींच्या शिक्षणपद्धतीमध्यें जे काय विशेष फरक असतील, ते सांगून टाकिले ह्मणजे विषयाचें पूर्ण निरूपण करण्यास ठीक पडेल.

एका चुकीची दुरुस्ती झाली, ह्मणजे तिच्या उलट दुसऱ्या चुकीचा थोडा वेळ तरी अंमल झालाच पाहिजे. शिक्षण पद्धतीच्या संबंधानें तर हा प्रकार घडून आलाच आहे. पूर्वी लोकांचें लक्ष केवळ शरीर सुधारण्याकडे असे; पुढें असा वेळ आला कीं, त्यांस आपली बुद्धी सुधारणें ह्यांतच काय तें सर्व आहे, असें वाटूं लागलें. तेव्हां तर मुलें दोन तीन वर्षांचीं झाली नाहींत तोंच त्यांच्या गळ्यांत पुस्तकें बांधीत असत, आणि एक विद्या झाली ह्मणजे सर्व कांहीं झालें असें लोक समजत असत; अशी एकदां उलट चुकीची भरत येऊन बसली ह्मणजे पुढें

लोकांचे डोळे उघडून त्यांस ह्या दोन्ही स्थिति एकत्र केल्यानें काय होतें तें पहावें असें सहजीं वाटूं लागतें. ह्याप्रमाणें दोन्ही स्थिति एकत्र केल्यानंतर त्यांचें त्यांस कठूं लागतें कीं खरा प्रकार कोठें तरी ह्या दोन स्थितींच्यामध्यें असला पाहिजे. असाच क्रम होत जाऊन आतां लोकांची अशी खात्री होत आहे कीं, शरीर आणि मन ह्या दोहोंकडे जर आपण लक्ष पुरविलें, तरच आपलें सर्व कर्तव्य झालें असें मानितां येईल. शिक्षणामध्यें आतां जुलुमाचा प्रकार पुष्कळ अंशीं मागें पडत चालला आहे, आणि अकालीं मुलांचे अंगीं मारून मुटकून आणलेली विद्वत्ता आतां कोणासही पसंत पडत नाहीं. शरीरप्रकृति चांगली असणें हें संसारांतील सर्व सुखास अत्यंत आवश्यक आहे. बुद्धि उत्तम असून आंगांत कांहीं ताकद नसेल तर तिचा कांहीं उपयोग होत नाहीं;ह्मणून पहिल्याच्या भरीस सर्वस्वीं दुसरें घालणें ह्मणजे वेंडेपणा होय. लहानपणीं मुलें मोठीं होतकरू दिसतात, परंतु पुढें अशा वेडेपणामुळें त्यांच्या हांतून कांहीं होत नाहीं अशीं उदाहरणें आह्मी नेहमीं पाहातों. ह्याप्रमाणें, कालक्षेप करण्यांत तरी शहाणपण लागतें, असें जें लोक ह्मणत असतात, तें शिक्षणाच्या संबंधानें खरें आहे हें आपणांस आतां कळूं लागलें आहे.

सर्व कांहीं गुंडिका करून तोंडपाठ करून टाकण्याचा क्रम पूर्वी जारी सुरू होता; परंतु त्यांत कांहीं अर्थ नाहीं, असें आतां लोकांस वाटूं लागलें आहे. अलीकडील विद्वानांचें असें मत आहे कीं, श्री–श्री–श्री–ग–ग–ग करून मुलांस मुळाक्षरें शिकवीत बसणें अगदीं वेडेपणा होय. आतां यूरोपांत पुष्कळ ठिकाणीं मुलांस अंक, पाढे वगैरे कोणी तोंडपाठ शिकवीत नाहींत, तर त्यांची त्यांस एकदां मोडणी नीटपणीं समजावून देतात ह्मणजे झालें. पूर्वीच्या शाळांमधून जो नवीन भाषा शिकविण्याचा टराविक प्रकार सुरू होता तो आतां बंद पडत चालला आहे. मुलें आपल्या जन्मभाषेचें ज्ञान कसें संपादन करितात, हें मनांत आणून त्या धरतीवर आतां लोक नवीन भाषांचा अभ्यास करितात. ब्याटरसी येथील ट्रेनिंग स्कुलाच्या वार्षिक रिपोर्टामध्यें असें ह्मटलें आहे " येथें आरंभीं सर्व वर्षभर शिकविण्याचें काम तोंडींच चालतें, व मुलांची समजूत पाडण्याकरितां सृष्टींतील प्रत्यक्ष पदार्थ दाखविण्याचा परिपाठ सुरू आहे. " आणि असेंच जिकडे तिकडे असलें पाहिजे. ह्या तोंडपाठ कर-

ह्याच्या चालीनें प्रत्यक्ष पदार्थांपेक्षां त्यांच्या संज्ञा व प्रतिनिधि जे तद्वाचक शब्द हेच विशेष महत्वाचे होऊन बसले होते, व ह्याप्रमाणेंच त्या वेळच्या इतर सर्व रीतिभातींचा प्रकार होता. अर्थ अगदीं न समजला तरी केवळ शब्द बराबर ह्मणतां आले ह्मणजे तो विद्वान् समजावयाचा, अशी स्थिति असल्यामुळें केवळ अक्षरांचें माहात्म्य वाढून, आंतलें सार तें कोणासही समजत नसे. परंतु पुढें लोकांच्या लक्षांत येऊं लागलें कीं, अशी स्थिति प्राप्त झाली ही केवळ काकतालीयन्यायानें नव्हे, तर निवळ आपल्या कृतीचें हें फळ आहे; व असेंच चोंहीकडे समजावें. वस्तूंच्या संज्ञांकडे लक्ष जात चाललें ह्मणजे तितकें प्रत्यक्ष वस्तूंकडे दुर्लक्ष झालेंच पाहिजे. प्रसिद्ध मांटेन नांवाचा फ्रेंच विद्वान् ह्मणत असे कीं " कोणतीही गोष्ट आपणांस तोंडपाठ ह्मणतां आली ह्मणजे तिचें आपणांस ज्ञान झालें असें नाहीं. "

ह्या पाठ करण्याच्या चालीबरोबर जवळ जवळ तिच्या सारखीच अशी जी मुलांस कांहीं नियम घालून देऊन शिकविण्याची चाल तीही माजी पडत चालली आहे. सांप्रतची रीति अशी आहे कीं, मुलांस प्रथमतः विशेष गोष्टींची ओळख करून देऊन नंतर सामान्य सिद्धांत सांगावयाचा. ह्या रीतीविषयीं ब्याटरसी येथील शाळेच्या वार्षिक रिपोर्टामध्यें असें ह्मटलें आहे. " ह्या वरील रीतीच्या अगदीं विरुद्ध जी मुलांस प्रथमच नियम सांगून देण्याची रीति ती जरी हल्लीं जिकडे तिकडे सुरू आहे, तथापि अनुभवाअंतीं व्यक्तिविषयक ज्ञान झाल्यानंतर जातिविषयक नियम सांगून द्यावयाचे हीच रीत खरी, असें आतां कळून आलें आहे. नियमांच्या रीतीस आतां कोणी मानीत नाहीं. ह्याचें कारण ती स्थूल मानानें बसविलेली व अशास्त्र आहे. त्या रीतीनें संपादन केलेलें ज्ञान खरें ज्ञान नव्हे, केवळ ज्ञानाभास होय. मुलांस एखाद्या सिद्धांताची उपपत्ति न सांगतां नुसता सिद्धांत एकदम सांगून देण्याचा क्रम ठेविल्यानें तीं पुढें थिजून मड्ड निपजतात. नियमांचा आपणांस नेहमीं उपयोग झाला पाहिजे अशी आपली इच्छा असेल तर ते नियम आपण स्वतांच काढिले पाहिजेत. लवकर येईल तें लवकर जाईल हें तत्व द्रव्य आणि ज्ञान ह्या दोहोंस सारखेंच लागू पडतें. विशेष गोष्टी व त्यांपासून निघणारे नियम हीं दोन्ही केवळ

नगर वाचनालय, सातारा.

परस्पर असंबद्ध रीतीनें मनांत सांठवून ठेविलीं, आणि ते नियम त्या गोष्टीं-पासून कसे निघाले हें लक्षांत ठेविलें नाहीं, तर ते नियम आपण हळू हळू विसरत जातों. बरें ह्या नियमांवरून जीं तत्वें व्यक्त होतात तीं एकदां उमजलीं ह्मणजे तीं कधींही जावयाचीं नाहींत. नियमांच्या रीतीनें शिकवि-लेला मुलगा एकदां नियमांच्या पलीकडे गेला ह्मणजे अफाट सागरामध्यें आपण वाहत आहों असें त्यास वाटतें; परंतु ज्या मुलास एकदां तत्वें सांगून दिलीं आहेत, तो मुलगा एखाद्या नवीन प्रश्नाचें उत्तर खाडदिशीं देतो, जणू काय तो प्रश्न त्याच्या पूर्वी माहितींतलाच होता. केवळ निय-मांचा संग्रह करणें ह्मणजे एखाद्या मोडक्या घड्याळाच्या अस्ताव्यस्त झालेल्या सामानाचा संग्रह करण्यासारखें आहे; व तत्वांचा संग्रह करणें ह्मणजे तेंच सामान जेथच्या तेथें व्यवस्थेनें लावून दिलेल्या एखाद्या दुरुस्त घड्याळाचा संग्रह करणें होय. ह्या दोहोंपैकीं दुसऱ्यापासून त्याचे भाग नीटपणें ध्यानांत राहातात एवढाच कायतो फायदा आहे असें नाहीं, तर त्याचे योगानें आपणांस एखाद्या विषयाची मीमांसा करण्यास, नवीन शोध करण्यास, व स्वतंत्र रीतीनें विचार करण्यास फार सुलभ जातें; हा एक त्यापासून विशेष लाभ समजला पाहिजे. पहिल्या पद्धतीचा स्वीकार केल्यानें ह्या आपण दोन्ही लाभांस अंतरतों. ही केवळ उपमा आहे असें कोणीं समजूं नये; अगदीं खरोखर अक्षरशः अशी स्थिति आहे. आपलें व्यक्तिविषयक ज्ञान एकत्र करून त्यावरून जातिविषयक नियम बांधणें, यालाच ज्ञानसंस्था किंवा ज्ञानविन्यास ह्मणतात. मग ही संस्था स्वतांच्या समजुतीकरितां केलेली असो, किंवा दुसऱ्यास शिकवि-ण्याकरितां केलेली असो, ती जितकी परिपूर्ण साधेल तितकी कर्त्याच्या मनाची ग्रहणशक्ति विशेष समजावयाची.

तत्वें न सांगतां नुसते नियम सांगून देण्याची रीत जशी वेडगळ आहे तशीच दुसरी एक रीत आहे. ती वस्तु आणि वस्तुधर्म ह्यांचें पृथक्करण केवळ धर्मांचें ज्ञान करून देणें ही होय. प्रत्यक्ष वस्तूंचा परिचय असल्या करून खेरीज त्यांच्या धर्मांचें ज्ञान करून देण्याचा प्रयत्न करणें व्यर्थ आहे. धर्मांचें ज्ञान करून दण्यास धर्मींचें ज्ञान आधीं करून दिलेंच पाहिजे, तरच धर्मांचें यथार्थ ज्ञान होणें शक्य आहे. सारांश नुसते नियम न सांगतां तत्वांची ओळख करून देणें व धर्मींचें कथन न करितां केवळ धर्मांचें ज्ञान करून

देणें हाच क्रम श्रेयस्कर होय. ह्या दोन्ही रीति जवळ जवळ एकाच प्रकारच्या आहेत; व ह्या प्रचारांत आल्यापासून जे विषय पूर्वी मुलांस लहानपणीं शिकवीत असत, त्यांपैकीं कांहीं विषय आतां जाणतेपणीं शिकविण्याचा परिपाठ पडत चालला आहे. ह्यास उदाहरण. मुलांस लहानपणींच व्याकरण शिकविण्याची जी अगदीं मूर्खपणाची चाल ती आतां यूरोपांत अगदीं बंद पडत चालली आहे. ह्याविषयीं एम्. मार्सेलचें असें ह्मणणें आहे कीं, व्याकरण हें भाषेचें ज्ञान करून देण्याचें साधन नव्हे, तर भाषेचें ज्ञान परिपूर्ण झाल्यावर तें नीट नेटकें करून त्यास सफाई आणण्याचें हत्यार होय असें खात्रीनें ह्मणतां येईल. तसेंच वाईझ साहेब असें ह्मणतात कीं "व्याकरणशास्त्र आणि वाक्यरचनाशास्त्र ह्मणजे सूत्रांचा आणि नियमांचा समूह होय. भाषेचे नियम हे भाषेच्या संप्रदायावरूनच बांधले जातात. हे नियम ह्मणजे व्यक्तिशः गोष्टी घेऊन, त्यांचें परिलोचन करून व तुलना करून, त्यांजपासून जातिविषयक काढलेलीं अनुमानें होत. सारांश व्याकरण ह्मणजे भाषाविज्ञान किंवा भाषाशास्त्र होय. एक मनुष्य घ्या, किंवा निरनिराळ्या राष्ट्रांतील मनुष्यसमूह घ्या, सृष्टिक्रम झटला ह्मणजे ज्याला शास्त्र ह्मणून ह्मणतात त्याचा लाभ त्यास प्रथमतः असें कधींही व्हावयाचें नाहीं. व्याकरण किंवा छंदःशास्त्र याची लोकांस कल्पनाही येण्यापूर्वी भाषा बोलण्याचा व कविता करण्याचा क्रम सुरू असतो. अरिस्टाटल तर्कशास्त्रावर ग्रंथ करीपर्यंत लोक तर्क चालविण्याचे राहिले नव्हते. एकंदरींत ज्या अर्थी व्याकरणाची उत्पत्ति भाषेनंतरची आहे, त्या अर्थी तें भाषेनंतरच शिकविलें पाहिजे. आणि सर्व मनुष्यजातीची आणि व्यक्तिमात्राची सुधारणा एकाच धर्तीवर होत गेली पाहिजे, ही गोष्ट ज्यांस मान्य आहे त्यांस आमचें हें ह्मणणें मान्य झालेंच पाहिजे.

असो. सारांश भाषेच्या अगोदर किंवा भाषेबरोबर व्याकरण शिकविणें हें मुलांस अहितकारक आहे व ही पद्धति सृष्टिक्रमाविरुद्ध होय. या तत्वाची यथार्थता आतां कळूं लागून त्याप्रमाणें शिक्षणाचा क्रम युरोपांत सुरू होत आहे. परंतु चमत्कार हा कीं, आमच्याकडे या तत्वानुसार शिक्षणक्रम प्रचारांत होता तो मुद्दाम बंद करून तद्विरुद्धक्रमाचें लोक अवलंबन करीत आहेत. पूर्वी आमच्यामध्यें संस्कृत शिकविण्याची जी पद्धति होती तीच खरी, असें या तत्वावरून ठरत आहे. प्रथमतः का-

व्याचे कांहीं सर्ग शिकवून रूपावली, समासचक्र वगैरेच्या साहाय्यानें कांहीं नामांचीं रूपें व समास यांची ओळख करून देऊन, विद्यार्थ्यांची भाषेमध्यें थोडीशी गति होऊन, भाषा संप्रदायाचा त्याजला थोडाबहुत परिचय झाल्यानंतर, कौमुदीच्या पाठांस आरंभ होत असे. ही पद्धति सर्वांशीं वरील तत्वास अनुसरून आहे. परंतु स्वकीय असल्यामुळें स्वराज्याबरोबर हिचा लय झाला. आमच्या इकडे परकीय सत्ता स्थापित झाली, त्यावेळीं भाषेच्या अगोदर किंवा भाषेबरोबर व्याकरण शिकविण्याची चुकाची चाल युरोपांत सुरू होतीच, व ती अद्यापिहि सर्वांशीं तिकडे बंद झालेली नाहीं. ही चुकीची चाल इतर परकीय चालींबरोबर परकीय सत्तेच्या छायेखालीं इकडे आली. आणि परकीय सत्ता स्थापित झाल्यानंतर अनुकरणप्रवृत्ति उच्छृंखल होऊन या चुकीच्या पद्धतीचा मोठ्या आदरानें अंगीकार झाला, आणि जुन्या शिक्षणक्रमाला रजा मिळाली. आतां एक गोष्ट मात्र सुदैवाची आहे ती ही कीं ही पद्धति चुकीची आहे असें आतां इंग्लंडांत वाटूं लागलें आहे, आणि इंग्लंडांत तिच्या सदोषतेचा उद्गार एकदां निघाला झणजे तो उद्गार आमच्या इकडे वेदवाक्य होण्यास फारसा विलंब लागावयाचा नाहीं.

यूरोपांत हल्लीं पुष्कळ प्राचीन चालींचा ऱ्हास होत चालला आहे, आणि त्यांच्या ठिकाणीं नवीन नवीन श्रेयस्कर चाली प्रचारांत येत आहेत. त्यांपैकीं अत्यंत महत्वाची झटलीं झणजे मुलांस प्रत्येक गोष्टीचें योग्य रीतीनें अवलोकन करावयास शिकविण्याची चाल होय. अज्ञानांधकारांत युगांचीं युगें लोटल्यावर, आतां कोठें लोकांच्या लक्षांत येऊं लागत आहे कीं, लहानपणीं मुलांस हें पहा, तें पहा, असा जो स्वाभाविक नाद असतो त्यांत कांहीं अर्थ आहे व त्यापासून कांहीं उपयोगही आहे. मुलांच्या ज्या कृत्यांस आपण व्यर्थ धडपड, खेळ किंवा वेळेनुसार दांडगाई असें झणूं, त्या कृत्यांच्या योगानें पुढील सर्व विद्येच्या पायास जरूर तें ज्ञान तीं मिळवितात, असें लोक अलीकडे झणूं लागले आहेत. आणि यावरूनच मुलांस प्रत्यक्ष वस्तू दाखवून त्यांविषयींचें शिक्षण देण्याचा क्रम आतां यूरोपांत शाळांमधून सुरू झाला आहे. ही कल्पना फारच उत्तम आहे, परंतु तिचा ज्या रीतीनें उपयोग व्हावा त्या रीतीनें अद्यापि होऊं लागला नाहीं. इंग्लंडांतील बेकन नामक विख्यात विद्वान् झणत असे कीं, सर्व शास्त्रांचें पदार्थविज्ञानशास्त्र हें उत्पत्तिस्थान होय; व झा त्या-

च्या ह्मणण्यास आतां ही रीति सुरू झाल्यापासून सार्थकता येत आहे. सृष्ट-पदार्थांच्या दृश्य व स्पृश्य धर्मांची बरोबर माहिती असल्याखेरीज त्यांविषयींच्या कल्पना व अनुमानें चुकीचीं असावयाचीं, व आपण जे प्रयोग करूं, त्यांपासून कांहीं निष्पन्न व्हावयाचें नाहीं. ज्ञानेंद्रियांस योग्य शिक्षण मिळालें नाहीं, तर आपलें पुढील सर्व शिक्षण शिथिल, अव्यक्त व अपूर्ण असें होतें; व ही स्थिति पुढें सुधारेल अशी आशाही नको. विचार करून पाहिलें तर असें दिसून येतें कीं, कोणतेंही मोठें काम तडीस नेण्यास प्रत्येक गोष्टीचें लक्षपूर्वक आणि पूर्णपणें अवलोकन करण्याची संवय आपल्या अंगांत असलीच पाहिजे. कारागीर, सृष्ट पदार्थांचे शोध करणारे, आणि शास्त्रज्ञ पुरुष ह्यांनाच कायती ह्या गुणाची आवश्यकता आहे असें नाहीं; वैद्याचेंही रोगाचें निदान करितांना ह्या गुणाशिवाय चालत नाहीं, आणि यंत्रकारास व घरें वगैरे बांधणारे कारागिरांस तर हा गुण अंगीं येण्याकरितां सुतारशाळेमध्यें ठो ठो करीत कांहीं वर्षें घालवीं लागतात. त्याचप्रमाणें तत्त्वज्ञानी घ्या, कवि घ्या, प्रत्येकास ह्या गुणाची आवश्यकता आहे. सृष्टपदार्थांमधील जे परस्पर संबंध इतर लोकांच्या लक्षांतून अजिबात गेलेले असतात ते सूक्ष्मतेनें जे अवलोकन करितात तेच तत्त्ववेत्त्यांच्या वर्गांत येतात. तसेंच सृष्टिक्रमाचें लक्षपूर्वक अवलोकन करून त्यांतल्या खुबीदार गोष्टी लक्षांत ठेवून त्या काव्यामध्यें जे उतरून देतात तेच कवि गणले जातात. इतर लोकांची स्थिति अशी असते कीं, त्यांस या गोष्टी समजून दिल्यानंतर मात्र दिसतात, परंतु पूर्वी त्या त्यांच्या स्वप्नांतही आलेल्या नसतात. आमचें फिरून फिरून एवढेंच ह्मणणें आहे कीं, प्रत्येक गोष्टीचा ग्रह मनावर स्पष्टतेनें व पूर्णतेनें उडला पाहिजे. कच्च्या आणि डळमळीत पायावर मजबूत व टोलेजंग असें ज्ञानमंदिर कधींही उभारितां येणार नाहीं. यूरोपांत मुलांस सृष्टीतील गोष्टी पदार्थांच्या धर्मांच्या योगानें समजून देण्याची चाल प्रचारांतून जात चालली आहे, व तिच्या ऐवजीं त्या प्रत्यक्ष पदार्थांच्या योगानें समजून देण्याची चाल आतां पडत चालली आहे. ज्याप्रमाणें वस्त्राचें पोत, पदार्थांची रुचि आणि रंग हीं साक्षात् अंतर्ज्ञानानें शिकलीं जातात, त्याप्रमाणेंच निश्चित शास्त्रांचीं मूलतत्त्वें हल्लीं यरोपांत साक्षात् अंतर्ज्ञानानें शिकलीं जात आहेत. मुलांस बोटें मोडून मिळवण्या वगैरे शिकविण्याची पद्धति, व प्रसिद्ध गणिती

डीमार्गन याची दशांश अपूर्णांक मांडण्याची रीति, यांवरून हें कसें हें चांगलें लक्षांत येईल. एम्. मारसेल यानें कोष्टकें पाठ करविण्याची पूर्वीची रीत बंद करून पौंड, औंस, ग्यालन, यार्ड, आणि फुट यांचीं प्रत्यक्ष वजनें आणि मापें दाखवून त्यांमधील परस्पर प्रमाण प्रत्यक्ष अनुभवानें विद्यार्थ्यांस काढावयास लावण्याची जी रीति सुरू केली आहे ती अगदीं यथार्थ आहे. तसेंच भूगोलविद्या आणि भूमितिशास्त्र हीं शिकवितांना गोलाचा आणि प्रत्यक्ष लांकडांच्या आकृतींचा उपयोग लोक करूं लागले आहेत, हें तरी वरील उद्देश साधण्यासाठींच होय. ह्या सर्व रीतींचें इंगित असें आहे कीं, त्यांच्या योगानें मुलांच्या मनावर, सर्व मनुष्यजातींच्या मनावर सहजीं जो संस्कार होत गेला आहे, तोच संस्कार होतो. प्रत्यक्ष पदार्थांचे अवलोकनानेंच संख्या, आकार आणि अंतर ह्यांविषयींचे सर्व सिद्धांत निघाले आहेत; आणि हे मुलांस प्रत्यक्ष पदार्थ दाखवून शिकविणें ह्मणजे ज्याप्रमाणें एकंदर मनुष्यजाति हे सिद्धांत शिकली, त्याप्रमाणेंच त्यांस शिकूं देणें होय. कदाचित् हळू हळू आपल्या असेंही लक्षांत येईल कीं, मुलांस ह्या खेरीज दुसऱ्या कोणत्याही रीतीनें ह्या गोष्टी शिकतां येणार नाहींत; कारण ह्या गोष्टी त्यांच्याकडून जर आपण निवळ तोंडपाठ करविल्या, तर त्यांच्या मनामध्यें त्या भरण्यास ज्या गोष्टी आपणांस साक्षात् अंतर्ज्ञानानें कळत आहेत त्याच गोष्टींचें ह्या तोंडपाठ केलेल्या गोष्टींमध्यें केवळ शब्दांनीं वर्णन केलेलें आहे, असें तरी त्यांस समजलें पाहिजे.

ह्याप्रमाणें पूर्वीच्या शिक्षणपद्धतीमध्यें अनेक फेरफार झाले आहेत व तज्ज्ञांत विशेष सांगण्यासारखी गोष्ट अशी आहे कीं, हल्लीं लोकांस दिवसानुदिवस असें वाटूं लागलें आहे कीं, मुलांस ज्ञानसंपादन करणें ह्मणजे ओझें वाटूं नये कर्मणूकच वाटावी. ह्याचें बीज पाहूं गेलें तर हें आहे कीं मुलांस वयाच्या मानानें ज्या ज्या विषयांमध्यें मन घालावेसें वाटतें ते ते विषय त्या त्या वेळीं शिकविले असतां मुलांची बुद्धि वाढत जाते, व ह्याच्या उलट केलें तर उलट होतें ही गोष्ट अंशतः तरी लोकांच्या लक्षांत येऊं लागली आहे. आतां लोक असें समजूं लागले आहेत कीं, अमुक प्रकारचें ज्ञान आपणांस असावें असें मुलांस वाटूं लागलें ह्मणजे त्यांची बुद्धि त्या ज्ञानाचें ग्रहण करण्यास समर्थ झाली आणि त्या ज्ञानाची मुलांचे बुद्धीची वाढ होण्यास आवश्यकता आहे; आणि ह्याच्या उलट जें

ज्ञान त्यांस शिकूं नयेसें वाटतें तें ज्ञान शिकण्यास मुलांची बुद्धि अद्यापि योग्य झाली नाहीं, अथवा तें ज्ञान त्यांस शिकविलें असतां ह्याचा परिपाक व्हावयाचा नाहीं. ह्याचकरितां मुलांस जे विषय लहानपणीं शिकवावयाचे ते त्यांनां आवडीनें शिकावे व विद्येमध्यें त्यांचें मन लागावें ह्मणून लोकांचे हल्लीं सतत यत्न सुरू असतात; एवढ्याचकरितां खेळाच्या उपयोगावर व्याख्यान देत बसावयाचें, लहानपणीं मुलांस ओंव्या शिकविणें आणि मुलांबाळांस भूताखेतांच्या गोष्टी सांगणें, ह्यांत तरी पहावयास गेलें तर मतलब हाच आहे. ह्याप्रमाणें मुलांचा कल पाहून त्याप्रमाणें आतां लोक बहुधां त्यांच्या शिक्षणाचा बातबेत ठेवूं लागले आहेत. मुलांस असें शिकविणें आवडतें किंवा तसें शिकविणें आवडतें, ह्यांत त्यांची गति चालते किंवा नाहीं, असे प्रश्न आपण नेहमीं विचारीत असतों त्याचा तरी मुद्दा हाच. एम्. मार्सेल साहेबांचें असें मत आहे कीं, मुलांस नानाप्रकारचे विषय शिकावेसे वाटतात, तसे त्यास शिकूं द्यावे व त्यांचे मनाची तृप्ति होऊन त्यांची सुधारणा होईल असें नेहमीं करीत असावें. तसेंच ते आणखी असेंही ह्मणतात कीं, मुलांस धड्याचा कंटाळा येण्याचें लक्षण दिसण्यापूर्वीच नेहमीं धडे आटपावे; व पुढें जाणतेपणींही हाच क्रम असूं द्यावा. शाळेमध्यें मधून थोडथोडी सुट्टी, शेतांमध्यें वगैरे फिरणें, कविता ह्मणणें, इत्यादि गोष्टींवरून आह्मी ह्मणतों तशीच हल्लीं यूरोपांत लोकांचे मनाची प्रवृत्ति झाली आहे असें दिसून येईल. तिकडे तापसवृत्ति आतां एकंदर व्यवहारामधून आणि शाळांमधूनही एकदमच नाहींशी होत चालली आहे. लोकांस कशानें सुख होईल हें पाहून, ज्याप्रमाणें हल्लीं कायदे कानु करण्याची सरकारची प्रवृत्ति होत चालली आहे, त्याचप्रमाणें मुलांवर घरीं आणि शाळांत शिस्त ठेवावयाची, ती सुद्धां पुष्कळ अंशीं त्यांस कशानें सुख होईल, हें पाहूनच लोक आतां ठेवूं लागले आहेत. हें यूरोपांतील स्थितीविषयीं झालें. पण आमच्याकडे अद्यापि पुष्कळच सुधारणा व्हावयास पाहिजे आहे, व ती याच धर्तीवर झाली पाहिजे.

याप्रमाणें यूरोपांत अलीकडे ज्या सर्व सुधारणा होत गेल्या आहेत, त्यांचा साधारण रोख लोकांचें वर्तन एकंदर सृष्टिक्रमास अनुसरून ठेवण्याकडे विशेषेंकरून आहे, असें आपणांस दिसून येतें. सृष्टिक्रमा-

विरुद्ध अकालीं बलात्कारानें मुलांस शिकाविण्याची चाल आतां लोकांनीं सोडून दिली आहे; आणि आतां मुलांस हात, पाय, कान, डोळे, इत्यादिकांचा उपयोग करितां यावा, व त्यांस एका प्रकारची कसरत व्हावी ह्मणून प्रथमतः अगदीं त्यांस मोकळें सोडितात. धडे केवळ तोंडपाठ करणें आतां माजी पडून मुलांस जें कांहीं शिकवावयाचें तें प्रथमतः तोंडीं सांगून नंतर प्रत्यक्ष पदार्थ दाखवून शिकाविण्याची पद्धत आतां पडत चालली आहे. प्रत्येक व्यक्तीचें ज्ञान झाल्याशिवाय सर्वसाधारण नियम मुलांस सांगत नाहींत, ह्मणजे नियमांची रीत सोडून त्यांस आतां तत्त्वांच्या रीतीनें जें कांहीं शिकवावयाचें तें शिकवितात. प्रत्यक्ष पदार्थ व प्रत्यक्ष आकृति दाखवून शिकविण्याची पद्धत आतां पडत चालली आहे. कोणत्याही शास्त्राचीं मूलतत्त्वें एकदम शब्दांनीं सांगून न देतां तीं हळू हळू पदार्थ दाखवून मुलांच्या मनांत भरविण्याचा परिपाठ आतां पडत चालला आहे. या सर्व गोष्टी मनांत आणिल्या ह्मणजे आह्मी काय ह्मणतों हें सहजीं लक्षांत येण्यासारखें आहे. यूरोपांत लोक हरप्रयत्न करून शिकविण्याचे विषय प्रथमतः शिकणारास आवडतसे करून ज्ञान संपादण्याचा मार्ग सुखावह करण्यासाठीं हल्लीं किती झटतात हें मनांत आणिलें ह्मणजे आमचे सिद्धांताच्या खरेपणाविषयीं लोकांस संशयच राहणार नाहीं. प्राणिमात्रास जरूर तीं कृत्यें केल्यानें एका प्रकारचें समाधान होत असतें, आणि त्या समाधानावर नजर देऊनच प्राणिमात्र तीं कृत्यें करण्यास प्रोत्साहित होत असतात; हा केवळ सृष्टिक्रमच आहे. मुलांच्या संबंधानेंही हाच प्रकार आहे. गळ्यांतील मणी चावून आणि खेळणीं वगैरे फोडून त्यांचे तुकडे करून टाकून व अशाच प्रकारचे दुसरे व्यापार करून लहानपणीं मुलें पदार्थांच्या गुणधर्मांचें ज्ञान संपादन करीत असतात. हें ज्ञान संपादन होणें मुलांस फार अगत्याचें आहे; आणि ह्मणून सृष्टिचालकाची अशी कांहीं व्यवस्था आहे कीं, मणी चावणें वगैरे कृत्यांपासून मुलांस एक प्रकारचा आनंद होतो, आणि ह्याच आनंदाची आशा तीं कृत्यें करण्याविषयीं मुलांस प्रोत्साहन देते. ह्यावरून हें आतां उघड झालें कीं मुलांस शिकवावयाचे विषय व ते शिकविण्याची पद्धति हीं दोन्ही होतील तितकीं मनोरंजक करण्यांत लोक केवळ ईश्वराच्या संकेतास व जीवनशास्त्राच्या नियमांस

अनुसरतात यांपेक्षां जास्त कांहीं नाहीं. हें यूरोपांतील स्थितीविषयीं झालें, व याच तत्वांच्या अनुरोधानें आमच्या इकडे सुधारणा होणें जरूर आहे.

कांहीं वर्षांपूर्वी पेस्टलोझी ह्मणून एक प्रसिद्ध विद्वान् होऊन गेला, तो ह्मणत असे कीं, आपल्या मानसिक शक्ति ज्याप्रमाणें वृद्धिंगत होत जातात त्या प्रमाणेंच अनुक्रम आणि पद्धति या दोहोंच्याही संबंधानें आपल्या शिक्षणाचा बेत ठेविला पाहिजे. त्याचें असें मत होतें कीं आपल्या मानसिक शक्ति कांहीं नियमानेंच सुधारत जातात तशा त्या सुधारत जात असतां त्यांपैकीं प्रत्येकीस कांहीं विशेष प्रकारचें ज्ञान लागत असतें, आणि तो नियम व तें ज्ञान हें शोधून काढणें आपल्याकडे आहे. याच तत्वास अनुसरून शिक्षणाची व्यवस्था ठेवण्याकडे आपल्या मनाची अलीकडे प्रवृत्ति होत चालली आहे,आह्मी ह्मणतों त्या सर्व सुधारणा करणें ह्मणजे ह्याच व्यापक तत्वाचें अंशतः अवलंबन करणें होय. शिक्षकांस आतां ह्या तत्वाची ओळख पटत चालली आहे. आणि सर्व शाळाखात्यांतील पुस्तकांमध्येंही ह्याच मताचा स्वीकार झाला पाहिजे असे आतां स्पष्ट लेख यऊं लागले आहेत. मार्सेल साहेबाचें असें मत आहे कीं, सृष्टिक्रम सर्व शिक्षणपद्धतीचें बीज होय.वाईज साहेब असें ह्मणतो कीं मुलांस स्वतां ज्ञान संपादन करण्यास शिकविणें हेंच शिक्षणाचें सर्व इंगित आहे. शास्त्रीय विषयाचे अभ्यासानें सर्व सृष्टपदार्थांची घटना आणि ठेवण ह्याचा आपणास जसजसा जास्त परिचय होत चालला आहे तसतशी त्या पदार्थांची स्वायत्तता आपणास जास्त व्यक्त होत चालली आहे. शास्त्रीय विषयांचा विशेष अभ्यास केल्यानें आतां आपणास असेंही समजूं लागलें आहे कीं, प्राणिमात्रांचा नेहमींचा जीवनक्रम आपण जशाचा तसा चालूं दिला पाहिजे, त्यांत ढवळाढवळ करितां कामा नये. आपण नेहमीं जे औषधिउपचार करितों त्यांच्या संबंधानेंच पहाना. पूर्वीच्या सर्व असुरी उपायांच्या ऐवजीं सौम्य उपचारांची योजना करावी हेंच आतां लोकांस पसंत पडूं लागलें आहे, किंबहुना खाण्यापिण्याचा बातवेत नीट ठेविला तरी पुरे असेंही लोक समजतात. मुलांस विशेष प्रकारचा आकार प्राप्त व्हावा, ह्मणून उत्तर अमेरिकेंतील लोक त्यांचीं अंगें चामडयाच्या पट्ट्यानें बांधितात तशीं बांधण्याची कांहीं जरूरी नाहीं असें आतां लोकांस वाटूं लागलें आहे. तुरुंगामध्येंही आतां आमच्या स्पष्टपणें नजरेस येतें कीं, कैदींची

सुधारणा व्हावी या उद्देशानें शहाणपणाच्या झणून कितीही युक्ति शोधून काढल्या, तरी त्यांस खपावयास लावून स्वतःच्या श्रमानें त्यांस पोटास मिळविण्यास लावणें हा जो नेहमींचा त्यांस सुधारण्याचा स्वाभाविक मार्ग, त्याच्यासारखी दुसरी युक्ति नाहीं. विद्येच्या संबंधानें तरी असेंच आहे. बुद्धि ज्याप्रमाणें सहजीं विकास पावत जाते तदनुरूप शिक्षणाचा बेत ठेविला तरच तें शिक्षण फलदायक होईल असें आतां आमच्या चांगलें अनुभवास येत चाललें आहे.

यावरून पाहतां सर्व शिक्षणाचें सार मिळून हेंच ठरतें कीं, मुलांच्या बुद्धीची वाढ होत चालली असतां,त्यांच्या मानसिक शक्तींचें सामर्थ्य मनांत आणून, त्यांस जे विषय शिकवावयाचे ते योग्य क्रमानें शिकविले पाहिजेत. ही गोष्ट इतकी उघड आहे कीं, ती एकदां सांगितली झणजे पुरे. ती केवळ स्वतःसिद्ध आहे असेंच वाटूं लागतें. आतां या गोष्टीकडे झणजे लोकांचें अगदीं दुर्लक्षच होत गेलें आहे असेंही केवळ झणतां येत नाहीं. शाळांमध्यें शिक्षक तर ह्या तत्त्वास अंशतः तरी अनुसरत आलेच आहेत. कारण ते तसें न करितें तर त्यांस सर्व शिक्षणच बंद ठेवावें लागलें असतें. ते तरी मुलांस बेरीज आल्याशिवाय त्रैराशिक शिकवीत नसत, त्यांचे मोडें अक्षर वळल्याशिवाय त्यांस बाकि अक्षर लिहावयास लावीत नसत, व त्यास भूमितीचें ज्ञान झाल्याशिवाय त्यांच्याकडून शंकुच्छेदगणिताचा अभ्यास करवीत नसत. परंतु पूर्वीच्या शिक्षणपद्धतीमध्यें दोष होता तो असा कीं, शिक्षक सामान्येंकरून जें तत्व खरें मानीत असत, तें तत्व बारीकसारीक किरकोळ गोष्टींच्या संबंधानें अमलांत आणीत नसत. परंतु खरा प्रकार असा आहे कीं,हें वरील शिक्षणाचें मुख्य तत्व सर्वत्र सारखेंलागू पडतें.दोन पदार्थ एकत्र असणें किंवा दूर असणें झणजे काय हें मुलांस समजूं लागल्यापासून पृथ्वी हा एक जमीन आणि पाणी मिळून झालेला गोल आहे, तिजवर पर्वत, वनें, नद्या, आणि शहरें आहेत, ती आपल्या आंसाभोंवती फिरून सूर्याभोंवतीही मोठ्या वेगानें फिरत असते,अशी तिजविषयीं त्यांचे मनांत खरी कल्पना येण्यास जर वर्षांच्या वर्षें जावीं लागतात; जर त्यांस एका गोष्टीची कल्पना आली झणजे पुढील दुसऱ्या गोष्टीची कल्पना हळूहळू येत जाते असें आहे;व जर ह्यांमधील सर्व गोष्टी अनुक्रमें उत्तरोत्तर जास्त व्यापक आणि जास्त संकीर्ण असतात ही गोष्ट खरी आहे; तर त्यांस ज्या

गोष्टी समजावयाच्या त्या एक सारख्या क्रमानेंच समजल्या पाहिजेत ही गोष्ट अगदीं उघड नाहीं काय? प्रत्येक व्यापक गोष्ट पुष्कळ विशेष गोष्टी मिळून झालेली असते; व ह्या विशेष गोष्टी समजल्या तरच ती व्यापक गोष्ट कळणार आहे हें कोणास सांगितलें पाहिजे काय? तसेंच व्यापक गोष्टी तदन्तर्गत गोष्टी सांगण्यापूर्वी सांगणें म्हणजे एखाद्या श्रेणीचें पहिलें पद न सांगतां अगोदर शेवटचें पद सांगण्यासारखें नव्हे काय? कोणत्याही विषयाचा अभ्यास चालला असतां आपल्या असें अनुभवास येतें कीं, त्या संबंधानें आपणांस ज्या गोष्टी शिकावयाच्या त्यांपैकीं जी गोष्ट आपण शिकलों तिजपेक्षां पुढील गोष्ट अधिक बिकट असते. तर ह्या सर्व गोष्टींची व्यवस्था लावून बिकटपणाच्या मानानें त्या शिकण्याचा क्रम आपणांस देखितां आला म्हणजे त्या गोष्टी शिकण्याचें आपले अंगीं सामर्थ्य आलें असें समजावें; व हें काम खरोखर नीटपणें साधण्यास ह्या गोष्टी त्यांच्या मूळच्या नेहमींच्या क्रमानेंच आपणांस शिकल्या पाहिजेत. त्यांचा मूळचा नेहमींचा क्रम आपणांस सोडितां नये. हा क्रम सोडिला तर त्या गोष्टींविषयीं आपणांस कंटाळा येऊन आपलें तिकडे मन लागत नाहींसें होतें. शिवाय मधील खिंडारें भरून काढण्याचें विद्यार्थ्याच्या अंगीं सामर्थ्य नसल्यामुळें ह्या गोष्टी तो शिकला आणि न शिकला सारखेंच असें होऊन जातें, व पुढें त्या गोष्टींचा किंबहुना मुळींच उपयोग होत नाहीं.

आतां यावरून कोणी असा प्रश्न करील कीं उगीच एखादी शिक्षणपद्धति शोधून काढण्याची खटपट पाहिजे कशाला? जर शरीराप्रमाणें मनाचाही नियमित रीतीनें उत्कर्ष होत जाऊन तें पक्वदशेस आपोआप येऊन पोहोचतें; मनाच्या पोषणासाठीं जे विषय शिकले पाहिजेत ते शिकण्याची इच्छा आपणांस जर योग्यवेळीं होत असते; कोणते विषयावर केव्हां परिश्रम केले पाहिजेत हें बरोबर रीतीनें कळण्याचा जर याप्रमाणें मार्ग आहे; तर मग मुलांच्या शिक्षणामध्यें आपण होऊन हात घालण्याचें काय कारण आहे? मुलांचा विद्याभ्यास अगदीं सृष्टिक्रमाप्रमाणें कां चालूं न द्यावा? मुलांनीं वाटेल त्या रीतीनें ज्ञान संपादन करावें, असें म्हणून आपण स्वस्थ कां बसूं नये? याप्रमाणें आपलें वर्तन सर्वत्र सारखें कां असूं नये? खरोखर वरील प्रश्न सकृद्दर्शनीं कांहींसा घोटाळ्याचा दिसतो, परंतु त्याचें

उत्तर अगदीं सरळ आहे. प्रश्नकर्त्ता मोठ्या झोंकांत आमच्या प्रतिपादनावरून मुलांस शिक्षणाच्या क्रमामध्यें अगदीं मोकळें सोडावें असेंच सिद्ध होतें असें गृहीत धरून चालला आहेसें दिसतें; आणि एवढी गोष्ट गृहीत धरून चाललें ह्मणजे आमच्या प्रतिपादनानें आमचे दांत आमच्या घशांत घातल्यासारखें होईल खरें. परंतु नीट विचार करून पाहिलें तर आमच्या प्रतिपादनावरून अशा प्रकारचा घोटाळा बिलकूल होत नाहीं असें स्पष्ट दिसून येईल. सृष्टींतील पदार्थांकडे पाहिलें तर आपणांस काय दिसून येतें? प्राणी आणि वनस्पति ह्यांविषयीं साधारण असा नियम आहे कीं, त्यांची आंतील रचना जितकी अधिक भानगडीची असेल तितकें त्यांस आपल्या उत्पत्तिस्थानावर पोषणासाठीं आणि रक्षणासाठीं जास्त कालपर्यंत अवलंबून रहावें लागतें. ज्या वनस्पतींस फुलें येत नाहींत अशा वनस्पतींस बियांऐवजीं एक प्रकारचे बारीक दाणे येत असतात, त्यांस स्पोर अशी संज्ञा आहे, व ते ताबडतोब तयार होऊन खालीं पडून त्यांपासून नवीन वनस्पति उत्पन्न होतात. आतां ज्या वनस्पतींस फुलें येतात, त्यांच्या फुलांपासून तयार होणाऱ्या बियांची स्थिति कशी आहे ती पाहा;तें बीं प्रथमतः फुलांतील अनेक आच्छादनांमध्यें वेष्टिलेलें असून त्यांतून एकदां नवीन वनस्पतींचा मोड बाहेर येऊन त्याची वाढ चालली असतां त्याचे पोषणासाठीं अनेक प्रकारची पुष्कळ सामग्री लागते. ह्या दोन प्रकारच्या वनस्पतींतील भेद मनांत आणिला ह्मणजे वृक्षादिकांस हा नियम कसा लागू पडतो तें समजतें. प्राण्यादिकांस तर हा नियम अगदीं सूक्ष्म जीवजंतूंपासून तों मनुष्यकोटीपर्यंत कांहीं कमजास्ती प्रकारानें सारखा लागू पडतो. मोनॅट नांवाच्या क्षुद्र प्राण्याचीं आपोआप दोन अर्धे होतात; त्यांतील प्रत्येक अर्धास निराळें झाल्याबरोबर अखंड प्राण्याचे आंगीं जें सामर्थ्य असतें तें येतें. आतां मनुष्यकोटीमध्यें मुलास बहुत काल गर्भवासांत काढावा लागून पुढें त्याचें पोषणही बरेच दिवसपर्यंत आंगचे दुधावरच चालतें; त्यास पुढें अन्न घालावयाचें तेंही युक्तियुक्तीनें घालावें लागतें; जरा मोठें होऊन तें स्वतः खाऊं लागलें तरी अन्न, वस्त्र, व जागा, यांची तजवीज करून द्यावी लागतेच; व वयास पंधरा वीस वर्षें होत तोंपर्यंत आपला पूर्णपणें निर्वाह करण्याचें त्याचे आंगीं सामर्थ्य येत नाहीं. हाच नियम जसा शरीरास तसा मनासही लागू पडतो. प्रत्येक

श्रेष्ठ जातीच्या प्राण्यास आणि विशेषेंकरून मनुष्यास लहानपणीं मानसिक पोषणासाठीं जाणत्याची मदत व्यावीच लागते. तान्हें मुलाचे आंगीं इकडे तिकडे फिरण्याचें सामर्थ्य नसल्यामुळें त्यास ज्याप्रमाणें स्वतः पोटास अन्नसामग्री पैदा करतां येत नाहीं, त्याचप्रमाणें आपली मानसिक शक्ति चालविण्याचीं साधनेंही पैदा करितां येत नाहींत. त्यास ज्याप्रमाणें स्वतःचें अन्न तयार करितां येत नाहीं, त्याचप्रमाणें मानसिकशक्ति वृद्धिंगत होण्यास निरनिराळे विषयांची योग्य प्रकारची जुळणीही करितां येत नाहीं. ज्या भाषेच्या द्वारानें त्यास मोठमोठ्या गोष्टींचें ज्ञान होतें ती भाषा तें केवळ सभोंवतालच्या लोकांपासूनच शिकत असतें. आईबाप आणि दाई यांजकडून जर योग्य रीतीनें मदत मिळाली नाहीं, तर मुलाचे बुद्धीची वाढ कशी खुंटून जाते हें समजण्यास भिल्ल, कोळी इत्यादि रानटी लोकांच्या मुलांचेंच उदाहरण द्यावें लागणें झालें. मुलांस ज्या गोष्टी शिकवावयाच्या त्या योग्य असून त्यांची जुळणीही योग्य असली पाहिजे, व त्या एकाचवेळीं फार न शिकवितां अवकाशा अवकाशानेंच शिकविल्या पाहिजेत. मुलांचें शरीर सुधारण्यास ज्याप्रमाणें आपणास उपाय योजून उद्योग करितां येतो त्याचप्रमाणें त्यांची बुद्धि सुधारण्याच्या कामींही आपणांस पाहिजे तितका उद्योग करितां येईल. शरीर आणि मन ह्यांच्या संबंधानें आईबापांचें मुख्य कर्तव्य कर्म झटलें झणजे हें आहे कीं, त्यांनीं त्याचा उत्कर्ष होण्यास जरूर तीं साधनें आहेत कीं नाहींत हें पाहिलें पाहिजे. ज्याप्रमाणें अन्न, वस्त्र व राहाण्यास जागा ह्यांचा पुरवठा केल्यानें शरीरावयव व आंतडीं ह्यांची वाढ योग्य क्रमानें किंवा योग्य रीतीनें होण्यास हरकत येत नाहीं, त्याचप्रमाणें ध्वनि ऐकवून त्याप्रमाणें मुलांकडून ध्वनि काढविणें, पदार्थांचें निरीक्षण करून देणें, वाचावयास पुस्तकें देणें, सोडविण्यास प्रश्न देणें इत्यादि गोष्टी करून मनाचा ज्या रीतीनें उत्कर्ष व्हावा तसा त्या रीतीनें उत्कर्ष होण्यास हरकत तर येत नाहींच, किंबहुना हें काम या योगानें विशेष सुलभ होईल. इतकेंच मात्र कीं, ह्या कामांत कोणत्याही प्रकारची सक्ती उपयोगाची नाहीं. ह्यावरून जीं मतें आह्मीं प्रदर्शित केलीं आहेत त्यांवरून कांहीं लोक झणतात तसें शिक्षण सोडून दिलें पाहिजे असें होत नाहीं,

तर शिक्षणपद्धतीच्या संबंधानें प्रयत्न चालविण्यास आपणांस पाहिजे तितकी मोकळीक आहे असेंच सिद्ध होतें.

या संबंधानें व्यापक गोष्टींविषयीं आपले विचार सांगून आतां आह्मी कांहीं विशेष गोष्टींचा विचार करण्यास लागतों. प्रत्यक्ष व्यवहारामध्यें या पेस्टलोझ्झीच्या शिक्षणपद्धतीपासून वाटला होता तितका फायदा झाला आहे असें आमच्यानें ह्मणवत नाहीं. मुलांना त्याच्या पद्धतीनें अभ्यास करण्यास लाविलें तर त्यांमध्यें त्यांस मौज न वाटतां उलट कंटाळाच येतो असें आमच्या ऐकिवांत आहे; शिवाय आह्मांस जी माहती मिळाली आहे तिजवरून असें दिसून येतें कीं, पेस्टलोझ्झीच्या पद्धतीप्रमाणें जेथें शिकणें चाललें आहे अशा शाळांमधून तयार झालेल्या प्रसिद्ध विद्वांनांची संख्या विशेष मोठी आहे असेंहो नाहीं. इतर शाळांच्या सरासरीबरोबर तरी ती संख्या येईल कीं काय याविषयींही आम्हांस संशयच आहे. बरें यांत कांहीं नवल वाटण्यासारखें नाहीं. कोणतीही युक्ति सफळ होण्यास तिचा उपयोग मोठ्या शहाणपणानें आणि विचारानेंच केला पाहिजे. अगदीं उत्तम हत्यारें घेऊनही अडाणी कारागीर कामाचा बिघाडच करितो हें कोणास सांगितलें पाहिजे असें नाहीं. त्याचप्रमाणें अडाणी शिक्षकाच्या हातून उत्तम शिक्षणपद्धतीच्या योगानेंही सर्व शिक्षणाचा बिघाडच व्हावयाचा.खरोखर ह्मणाल तर उत्तम शिक्षणपद्धतिच कांहीं अंशीं त्याच्या फाजितीस कारण होते. वरील उदाहरणांत तरी उत्तम हत्यार असणेंहें एक काम बिघडण्यास कारणच होतें.शिक्षणपद्धति साधी,एकसारखी, आणि एखाद्या यंत्राप्रमाणें अगदीं सरळ जाणारी अशी जर असेल, तर तिचा उपयोग अगदीं साधारण मनुष्यही करूं शकेल; व तिजपासून जो थोडाबहुत फायदा व्हावयाचा तोही त्यास होईल. परंतु जी शिक्षणपद्धति अगदीं परिपूर्ण आहे, जिच्यामध्यें मनाच्या निरनिराळ्या शक्तींसाठीं निरनिराळ्या प्रकारच्या योजना आहेत, व जीमध्यें प्रत्येक विषय शिकाविण्याचा कांहीं तरी स्वतंत्र मार्ग आहे, अशा शिक्षणपद्धतीचा योग्य रीतीनें उपयोग करण्यास शिक्षकाच्या आंगीं जें सामर्थ्य पाहिजे तें थोडयाच शिक्षकांच्या आगीं असतें. मुलांकडून केवळ अक्षरें काढविणें आणि ह्मणविणें, तसेंच त्यांस वाचणी सांगून त्यांस पाढे वगैरे शिकविणें हें काम गांवडी पंतोजीही करूं शकतो. परंतु अक्षरांचीं नावें न

सांगतां त्यांच्या उच्चारावरून त्यांस शुद्ध लिहिणें शिकविणें, किंवा अंकांची पट करून लेखांची मोडणी सांगून देणें, ह्यास कांहीं बुद्धीचें भांडवलच लागत असतें; व सर्व विषय ह्याचप्रमाणें योग्य रीतीनें शिकवावयाचे झटले झणजे आपल्या आंगीं विचारशक्ति, कल्पनाशक्ति, आणि त्याचप्रमाणें विद्यार्थ्याचे कल जाणण्याचें आणि विषयाचें जसें पाहिजे तसें उद्‌घाटन करण्याचें सामर्थ्य इत्यादि गुण बरेच भरपूर असले पाहिजेत. परंतु पंतोजीचे धंद्यास मान नाहीं अशी जोंपर्यंत स्थिति आहे तोंपर्यंत त्यांच्या आंगीं हे गुण सांपडण्याची आशाच करावयास नको. खरें शिक्षण खऱ्या विद्वानापासूनच मिळण्याची शक्यता आहे. तर कार्यकारणभाव मनांत आणून, शोधून काढलेली ही शिक्षणपद्धति हल्लीं कितपत चालेल याचा वाचकांनींच विचार करावा. सांप्रतकालीं मानसशास्त्राचा अभ्यास एकंदरींनें आह्मांमध्यें फारच अल्प आहे, व शिक्षकांस तर त्याचा मुळींच गंधही नाहीं, तर अशा कालीं त्या शास्त्राच्या आधारानें ठरविलेली शिक्षणपद्धति चालणार ती कशी ?

शिवाय या कामीं अडथळे येऊन आशाभंग होण्यास आणखीही कारणें झालीं आहेत. पेस्टलोझीच्या नांवावर विकणाऱ्या सर्व शिक्षणपद्धतींचें आणि त्याच्या वास्तविक झणण्याचें सार एकच आहे असें लोक मानीत आले आहेत. कांहीं विशेष शिक्षणपद्धतींच्या योगानें जें घडून यावें अशी लोकांस आशा होती तें घडून आलें नाहीं झणून ज्या मूलतत्वांच्या नांवानें त्या शिक्षणपद्धति मोडत असत त्यालाच लोकांनीं दोष दिला आहे. नांवाप्रमाणें त्या शिक्षणपद्धति आहेत किंवा नाहींत हें पहाण्याचा कोणीच प्रयत्न केला नाहीं. खरें तत्व काय आहे हें मनांत न आणितां नेहमींप्रमाणें बाह्यस्वरूपाकडे लक्ष देऊन कांहीं विशेष कृतींनीं जे घोंटाळे आले त्यांबद्दल लोकांनीं मूलतत्वांसच दोष दिला आहे. वाफेचें यंत्र करण्याचा पहिला प्रयत्न फसला झणून त्यावरून एकदम वाफेच्या शक्तीचा यांत्रिक कामीं उपयोग करितां येणार नाहीं असें अनुमान करण्यासारखेंच हें आहे. पेस्टलोझीचीं मूळचीं मतें बरोबर होतीं झणून त्याच्या योजनाही बरोबर होत्या असें मानितां येणार नाहीं, ही गोष्ट नेहमीं लक्षांत ठेविली पाहिजे. त्याची वाहावा करणारी जेही मंडळीही असें सांगते कीं, पेस्टलोझीस प्रसंगविशेषीं एकाप्रकारची

उपर वाचनालय, सातारा.

स्फूर्ति होऊन त्यास मोठ्या शहाणपणाच्या कल्पना सुचत असत; सर्व गोष्टींचें नीटपणें मनन करून काढलेले त्याचे विचार नसत. तो पहिल्यानें स्टॅन्फ्रझ येथें मोठ्या लौकिकास चढला; त्यावेळेस त्याच्या जवळ पुस्तकें किंवा शिकविण्याचीं नेहमींचीं साधनंही नव्हतीं. असें सांगतात कीं त्यावेळेस त्यानें सर्व लक्ष मुलांस क्षणोक्षणीं कोणत्या प्रकारचें शिक्षण पाहिजे, व त्यांना पूर्वी जें ज्ञान प्राप्त झालेलें असेल त्याचा आणि या शिक्षणाचा मेळ बसवून देण्याची उत्तम रीति कोणती, हें शोधून काढण्याकडेच विशेषेंकरून लागलें होतें; त्यास मुलाचे कल्याणाची इतकी कळकळ असे कीं, मुलांस कोणत्या गोष्टी शिकविल्या पाहिजेत, व त्यांना कोणत्या गोष्टी कठीण जातात हें त्यास तावडतोब कळत असे; व त्याचे आंगीं जें सामर्थ्य आलें होतें तें बहुतेक याचमुळें असें ह्मणण्यास हरकत नाहीं. त्यानें ह्मणजे शांतपणें विचार करून शिकविण्याच्या कांहीं नवीन रीति शोधून काढल्या होत्या असें नाहीं. वेळोवेळीं ज्या गोष्टी त्यास कळून येत असत त्यांची योग्य प्रकारें संस्था करून तें ज्ञान वाढविण्याचें त्याच्या आंगीं सामर्थ्य नव्हतें; हें काम त्यास आपल्या हाताखालच्या शिक्षकांवरच सोंपवावें लागत असे. या वरील सर्व गोष्टींचा असा परिणाम झाला कीं त्यानें आणि त्याच्या शिष्यांनीं काढलेल्या प्रत्येक युक्तीमध्यें अपुरेपणा वगैरे पुष्कळ दोष राहून, त्यांचा परस्परांशीं अगदीं मेळ नाहीं अशी स्थिति होऊन गेली. त्याच्या "मदर्स म्यान्युअल" नांवाच्या पुस्तकामध्यें मुलास लहानपणीं शिकविण्यासारख्या ह्मणून ज्या गोष्टी दिल्या आहेत त्यांचा क्रम असा आहे; अगदीं प्रारंभीं शरीराच्या निरनिराळ्या भागांचीं नांवें दिलीं आहेत; नंतर अमक्याजवळ अमुक अशीं त्यांचीं स्थानें वर्णिलीं आहेत; आणि शेवटीं त्यांचे परस्पर संबंध सांगितले आहेत. आतां हा क्रम मानसिक शक्ति वृद्धिंगत होण्याची जी रीति आहे त्या रीतीस अगदीं अनुसरून नाहीं असें सिद्ध करून देतां येईल. वाक्यांमध्यें येणाऱ्या शब्दांचे अर्थ पाठ करवून जन्मभाषा शिकवावी असें तो ह्मणतो, परंतु तसें करण्याची कांहीं जरूरी नाहीं. त्याच्या योगानें विद्यार्थ्यांचा वेळ व श्रम फुकट जाऊन, त्यांच्या सर्व उल्हासवृत्तीचा भंग होतो. तो भूगोल विद्येचे जे धडे द्यावे असें ह्मणतो, ते तर त्याच्या ह्मणून गाजलेल्या मतास अगदींच विरुद्ध आहेत. आतां

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

ह्याच्या कांहीं योजना मूळच्या निर्दोष आहेत, परंतु त्यांपैकीं कित्येक अपऱ्या आहेत व कित्येकांचा जुन्या शिक्षणपद्धतीचा कांहीं अंश त्यांमध्यें मिसळून बिघाड झाला आहे. ह्यास्तव पेस्टलोझी ह्यानें आपल्या नांवानें ह्मणून जें मुख्य मत सुरू केलें तें एकंदरीनें खरें असें जरी आमचें ह्मणणं आहे, तरी आह्मांस असें वाटतें कीं, निरनिराळ्या कामीं तो जे विशेष उपाय सांगतो तेच उपाय विचार केल्याशिवाय एकदम सुरू केले तर मोठा अनर्थ होईल. एखादें मोठें महत्त्वाचें मत पूर्वापार चालत आलेलें असलें ह्मणजे तत्संबंधी सर्व विधि व कृति आपणांस शिरसावंद्य असाव्या अशी आपल्या मनाची नेहमींची प्रवृत्तिच आहे; एखाद्या सिद्ध पुरुषाच्या चरणीं आपली बुद्धि सर्वस्वीं अर्पण करून त्याचें वचन अक्षरशः खरें मानावें, त्यावर डोळे मिटून भाव ठेवावा, व खऱ्या तत्त्वास विसरून बाह्य कवचाचे नादीं भरावें असाच आपल्या मनाचा बहुतकरून कल असतो. ह्यांस्तव पेस्टलोझी यांचे शिक्षणपद्धतीचें मूलतत्त्व आणि ती प्रचारांत आणण्याकरितां त्यानें काढलेल्या नाना तऱ्हेच्या योजना ह्यांमध्यें महदंतर आहे असें आम्हांस पुन्हां पुन्हां सांगितलें पाहिजे. आणि शिवाय असेंही सुचविलें पाहिजे कीं तें तत्त्व अगदीं खरें आहे असें जरी मनांत आणिलें, तरी त्याच्या तत्संबंधीं योजना खात्रीनें त्या तत्त्वापासून फारच भिन्न आहेत. खरोखर आपणांस हल्लीं निरनिराळ्या विषयांचें जें ज्ञान झालेलें आहे त्याची जर स्थिति मनांत आणिली, तर खरी स्थिति अशीच आहे अशी आपली बालंबाल खात्री होईल. आपल्या मानसिक शक्ति ज्या क्रमानें आणि ज्या रीतीनें सुधारत जातात त्या क्रमास आणि त्या रीतीस अनुसरूनच शिक्षणपद्धतीचें स्वरूप व तत्संबंधीं सर्व व्यवस्था असाव्या अशी जर आपली इच्छा असेल, तर मानसिक शक्ति कशा सुधारत जातात ह्याविषयीं अगोदर आपणांस बरीच माहिती असली पाहिजे. ह्या संबंधानें हल्लीं आपणांस उगीच थोड्याशा अटकळी करितां येतात, परंतु एवढ्यानें कांहीं होणें नाहीं. आपल्या ज्या अटकळी आहेत त्यांविषयीं आणखी शोध करून सर्व कच्ची माहिती मिळविली पाहिजे व निरनिराळ्या विषयांवर प्रसंगीं उपयोगी पडण्यासारखे आपणांस अनेक सिद्धांत काढून ठेविले पाहिजेत; व असें असेल तरच ज्या शास्त्रावर शिक्षणाचा पाया रचावयाचा तें शास्त्र आपणांस अवगत आहे असें

समजतां येईल. आपल्या मानसिक शक्ति कोणत्या प्रकारानें कोणत्या क्रमानें व्यक्त होत जातात हें एकदां आपणांस निश्चयानें समजलें, ह्मणजे नंतर प्रत्येक शक्तीचा उपयोग करण्याच्या जितक्या रीति असतील त्यांपैकीं ज्या रीतीकडे तिचा स्वाभाविक कल असेल त्या रीतीनें तिचा उपयोग करण्यास लागणें हें काम मात्र आपलें आहे. ह्यावरून पाहतां आपल्या अगदीं सुधारलेल्या ह्मणून ज्या शिक्षणपद्धति आहेत त्या खऱ्या आहेत किंवा खऱ्या शिक्षणपद्धतीजवळ जवळ तरी आहेत, असें आपणांस समजतां येत नाहीं हें अगदीं उघड आहे.

पेस्टलोझीचें तत्व आणि त्याचा प्रचारांत असलेला शिक्षणसंप्रदाय ह्यांमधील वरील फरक लक्षांत ठेविला आणि वर सांगितलेल्या कारणांवरून त्याचा शिक्षणसंप्रदाय कसा चुकीचाच असला पाहिजे हें समजलें, ह्मणजे त्याच्या शिक्षणसंप्रदायाविषयीं जी कांहींनीं ओरड केली आहे तिचें खरें स्वरूप काय आहे हें व पेस्टलोझीच्या ह्मणण्याप्रमाणें शिक्षणपद्धति अद्यापि कोठेंही प्रचारांत आलेली नाहीं, हें वाचकांच्या चांगलें लक्षांत येईल. आतां जें आह्मीं सांगितलें, त्यावरून कोणी कदाचित् असें ह्मणेल कीं, हल्लींच्या काळामध्यें अशी शिक्षणपद्धति सांपडणें अशक्यच आहे, आपणांस ह्या संबंधाची सर्व तयारी अगदीं प्रारंभापासून केली पाहिजे; तर त्यावर आमचें असें ह्मणणें आहे कीं, मानसशास्त्र ह्मणून स्वतंत्र शास्त्र बनेपर्यंत ज्या शिक्षणपद्धतीचें मूलतत्व खरें असून तत्संबंधीं योजनाही अगदीं ठीक आहेत अशी शिक्षणपद्धति काढणें जरी अशक्य आहे तरी कांहीं ठोकळ नियमांच्या आधारानें केवळ अजमासावरच जवळ जवळ तशा प्रकारची एखादी शिक्षणपद्धति आपणांस काढितां येईल. हा पुढील उद्योग कसा चालवावा ह्याविषयींचे नियम आतां आह्मी सागतों. ह्यांपैकीं कांहींचें आह्मीं पूर्वीच दिग्दर्शन केलें आहे, तथापि येथें ते पुन्हा नीट क्रमानें सांगणें श्रेयस्कर होईल.

(१) शिकवितांना सोपे विषय आधीं शिकवून नंतर कठीण विषय शिकविले पाहिजेत. या नियमाप्रमाणें अंशतः लोक वागत आलेच आहेत. आतां त्यांचें हें वर्तन हा नियम समजून होतें किंवा या नियमाविरुद्ध ते कधीं गेले नाहींत असें आमचें ह्मणणें नाहीं. मनास पक्कदशा

प्राप्त होत जाते हें उघड आहे, आणि ह्मणून ज्या वस्तूंस अशी पक्वदशा प्राप्त होते त्या वस्तुप्रमाणें मनाचेंही एकरूपत्व जाऊन त्यास वैचित्र्य प्राप्त झालेंच पाहिजे. आतां ज्या अर्थी खरी शिक्षणपद्धति ह्मणजे या वरील मानसिक क्रमाची बाह्य प्रतिमा होय,त्याअर्थी तीमध्येंही हा क्रम दिसून आलाच पाहिजे.शिवाय खऱ्या शिक्षणपद्धतीचा असाच अर्थ धरून चालले,ह्मणजे वरील नियमास जास्त व्यापकता येते. कारण त्या नियमाचें सार असें आहे कीं, सोपें आधीं आणि कठीण मग. हा क्रम दरएक स्वतंत्र विषय शिकवितांना ठेविला ह्मणजे झालें असें नाहीं, तर एकंदर ज्ञानाच्या संबंधानेंही असाच क्रम आपणांस ठेविला पाहिजे अगदीं पहिल्यानें मनाच्या अगदीं थोड्याच शक्तींचा व्यापार सुरू होतो व पुढें पुढें मानसिक शक्ति जसजशा जास्त होत जातात तसतसा त्यांचाही व्यापार सुरू होतो. याचप्रमाणें आमच्या शिक्षणामध्येंही प्रारंभीं अगदीं थोडेच विषय असले पाहिजेत व ते हळू हळू वाढवीत जाऊन सरतेशेवटीं मात्र सर्व विषय एकदम आले पाहिजत. निरानिराळे विषय शिकवितांनाच मात्र आधीं सोपें आणि मागाहून कठीण हा क्रम ठेविला ह्मणजे झालें असें नाहीं तर एकंदर शिक्षणामध्येंही हा क्रम असला पाहिजे.

(२) इतर सर्व पदार्थांच्या वाढीप्रमाणेंच मनाची वाढ ह्मणजे त्याची अव्यक्त स्थिति जाऊन त्यास व्यक्त स्थिति प्राप्त होणेंच होय. आपला मेंदु, इतर सर्व इंद्रियांप्रमाणें, आपण वयांत येण्याच्या सुमारासच परिपक्व होतो. त्याची रचना ज्या मानानें अपुरी असेल त्या मानानें त्याचे व्यापारही अपुरेच असावयाचे; ह्मणून ज्याप्रमाणें मूल पहिल्यानें खाणाखुणा करूं लागलें किंवा बोलूं लागलें, ह्मणजे त्याच्या खाणाखुणा किंवा बोलणें स्पष्ट असत नाहींत त्याचप्रमाणें त्याचें पहिलें ज्ञान किंवा विचार स्पष्ट असत नाहींत. ज्या मनुष्याची नजर नीट बसली नाहीं त्याला पहिल्यानें प्रकाश व काळोख ह्यांमधीलच कायतो भेद कळतो; बरें त्याची तीच नजर बसत चालली, ह्मणजे त्याला सर्व प्रकारचे रंग, त्यांचा कमजास्तीपणा व पदार्थांच्या निरनिराळ्या आकृति अगदीं बरोबर रीतीनें कळूं लागतात. बुद्धीचें आणि तदन्तर्गत प्रत्येक शक्तीचें अगदीं असेंच आहे. त्यांस पहिल्यानें पदार्थांचे आणि क्रियांचे ढळक ढळक भेद कळूं लागून,पुढें क्रमा-

क्रमानें तत्संबंधी सूक्ष्म गोष्टी अगदीं पूर्णपणें व स्पष्टपणें समजूं लागतात. तर ह्या साधारण नियमास आपली शिक्षणपद्धति आणि तत्संबंधी सर्व योजना अनुसरून असल्या पाहिजेत. अपक्व मनामध्यें पक्व विचारांचा प्रवेश होणें अशक्यच आहे, आणि यदाकदाचित् तसा प्रवेश होणें शक्य असलें तथापि तसें होऊं देणें इष्ट होणार नाहीं- मुलांस लहान वयामध्यें पक्व विचार शब्दद्वारा आपणांस शिकवितां येतील; आणि ज्या शिक्षकांची असें करण्याची चाल आहे, ते असें समजतात कीं, हे शब्द बरोबर तोंडपाठ झाले, ह्मणजे त्या शब्दांनीं सांगितलेलें ज्ञान मुलांस झाल्याप्रमाणेंच आहे. परंतु विद्यार्थ्यांस जर उगीच उलट सुलट चार प्रश्न केले, तरच खरी स्थिति अगदीं उलट आहे असें आपणांस कळून येईल. खरोखर असें दिसून येतें कीं, अर्थाकडे किंबहुना मुळींच लक्ष न देतां शब्द उगीच तोंडपाठ केले आहेत, किंवा कदाचित् अर्थाचें थोडें बहुत ज्ञान झालें असल्यास तें फारच कच्चें आहे. पुष्कळदां अनुभव घेऊन आपले विचार अगदीं ठरीव होऊन गेले; ज्या वस्तु व ज्या क्रिया आपण पूर्वी एकच समजत होतों, त्या नेहमीं पाहण्यांत येऊन, त्यांमधील सूक्ष्म भेद आपणांस समजूं लागले; अमुक गोष्टी समकालींच घडून याव्याच्या, अमुक गोष्टी घडून आल्या तरच अमुक गोष्टी घडून याव्याच्या असें वारंवार पाहण्यांत आलेल्या उदाहरणांवरून त्यांचे वर्ग ठरवितां आले; आणि निरनिराळ्या जातींच्या संबंधाच्या परस्पर मर्यादा लक्ष्यांत येऊन त्यांमधील भेद आपणांस अगदीं बरोबर रीतीनें समजूं लागले; इतक्या गोष्टी आपणांस समजून आल्या ह्मणजे मात्र आपणांस श्रेष्ठ प्रतीच्या ज्ञानाची अगदीं बरोबर कल्पना आली असें समजावयाचें. यास्तव शिक्षणाच्या प्रारंभीं ज्या गोष्टी शिकवावयाच्या त्या अपुऱ्याच असल्या पाहिजेत असें मानून आपणांस स्वस्थ बसलें पाहिजे. पुढें मात्र त्या गोष्टी अनुभवास येतील अशी व्यवस्था ठेवून तें हळूहळू पुरें करण्यास झटलें पाहिजे. मोठ्या मोठ्या चुकांची दुरुस्ती झाल्यानंतर बारीकसारीक चुकांची दुरुस्ती झाली पाहिजे. व याप्रमाणें एकदां मुलांचे विचार पूर्ण झाल्यानंतर लागलेच शास्त्रीय नियमही त्यांत शिकविले पाहिजेत.

(३) आमच्या शिक्षणामध्यें मूर्तगोष्टींचें ज्ञान आधीं आणि अमूर्त

गोष्टींचें ज्ञान मागाहून हाच क्रम असला पाहिजे, असें सांगणें म्हणजे पूर्वी सांगितलेल्या पहिल्या नियमाची अंशतः पुनरुक्ति करण्यासारखेंच आहे असें कोणास वाटेल; परंतु हा नियम असा आहे कीं, तो सांगितलाच पाहिजे; मग कठीण कोणतें व सोपें कोणतें हें आपणांस कांहीं गोष्टींमध्यें कळून यावें एवढाच जरी त्यामध्यें उद्देश असला तरी हरकत नाहीं. कारण दुर्दैवानें हल्लीं या संबंधानें लोकांची फार गैर समजूत होत चालली आहे. व्यक्तिसमूहास लागू पडणारे जे साधारण नियम मनुष्यांनीं काढिले आहेत व ज्या प्रत्येकाच्या योगानें पुष्कळ गोष्टी एकाच गोष्टीमध्यें येऊन गेल्यामुळें त्या समजण्यास व ध्यानांत ठेवण्यास त्यांस सोपें जातें, ते नियम मुलांस समजले तर त्यांस सुद्धां त्या गोष्टी समजून ध्यानांत ठेवण्यास सोपें जाईल असें लोक समजतात. साधारण नियम सोपा म्हणजे त्यामध्यें येणाऱ्या विशेष गोष्टींच्या समूहापेक्षां सोपा; परंतु प्रत्येक विशेष गोष्टीपेक्षां तो कठीणच आहे; व ह्या विशेष गोष्टींपैकीं बऱ्याच गोष्टींचें ज्ञान झालें तरच मात्र व्यापक नियमांच्या योगानें स्मरणशक्तीचें ओझें कमी होऊन बुद्धीस मदत होणार आहे. परंतु ज्याला या विशेष गोष्टी समजल्या नसतील त्याला साधारण नियम म्हणजे एक गूढच होऊन जाईल. ह्या गोष्टी त्यांचे लक्ष्यांत येत नाहींत. विषय सुलभ करून देण्याच्या ह्या दोन रीति न समजून मूलतत्त्वांस हात घालून शिक्षक फसत आले आहेत. त्यांच्या कृतीचा मूळच्या नियमाशीं दिसण्यामध्यें जरी विरोध नसला तरी वस्तुतः विरोध असलाच पाहिजे. ह्या नियमाचा असा अर्थ आहे कीं, मनास मूलतत्त्वें शिकवावयाचीं तीं त्या तत्त्वांचीं प्रत्यक्ष उदाहरणें घेऊनच शिकविलीं पाहिजेत; म्हणजे विशेष किंवा मूर्त गोष्टींवरूनच साधारण किंवा अमूर्त गोष्टींचें ज्ञान करून दिलें पाहिजे.

(४) इतिहासावरून ज्या रीतीनें आणि ज्या क्रमानें मनुष्य जातींमध्यें ज्ञान प्रसार झाला असें दिसून येतें, त्याच रीतीनें आणि त्याच क्रमानें मुलाला ज्ञानप्राप्ति झाली पाहिजे; म्हणजे व्यक्तीमध्यें आणि जातीमध्यें ज्ञानप्राप्तीची सरणि एकच असली पाहिजे. वास्तविक रीतीनें पाहिलें तर ह्या नियमाचा गर्भित रीतीनें पूर्वीच उल्लेख झाला आहे. ज्या अर्थी ह्या दोन्ही रीतींमध्यें परिणतिवादाचें तत्त्व सारखेंच दिसून येतें, त्याअर्थी त्या वादाचे वर सांगितलेले साधारण नियम दोन्ही रीतींस सारखेच लागू पडतात

व ह्मणून त्यादोन्हीमध्यें परस्पर एकप्रकारचें साम्य दिसून येतें व तें साम्य असें आहे कीं त्यापासून आपला मार्ग अमुक असें आपणांस निश्चयपणें समजतें. ह्या वरील तत्वाचा लाभ आपणांस एम् कोंट नांवाच्या प्रसिद्ध तत्ववेत्त्यानें करून दिला हें खचीत; आणि त्याच्या पायाचें सर्वस्वीं ग्रहण न करितां एवढ्याच तत्वाचें ग्रहण करण्यास हरकत नाहीं; अगदीं एखादी स्वतंत्र कोटी लढविल्या खेरीजही ह्या तत्वाच्या सत्यतेचीं दोन कारणें देतां येतात; व तीं कारणें अशीं आहेत कीं, त्यांतील प्रत्येकाच्या योगानें अगदीं स्वतंत्र रीतीनें हें तत्व स्थापित करितां येतें .त्यांतील एक कारण आपणांमध्यें वंशपरंपरानुगत जें नियमानें सादृश्य दिसून येतें त्याचाच जरा दूरपर्यंत विचार केला ह्मणजे लक्षांत येण्यासारखें आहे. आपल्या आणि पूर्वजांच्या चेहऱ्यामध्यें व स्वभावामध्यें साम्य असतें हें आह्मी नेहमीं पाहतों; वेड वगैरे कांहीं मनास होणारे विकार एकाच घराण्यांतील पुरुषांस क्रमानें एकाच वयामध्यें होतात हेंही आपणांस माहीत आहेच. आतां ह्या व्यक्तिवाचक उदाहरणांमध्यें असें एक घडून येतें कीं, गतपूर्वजांमध्यें दिसून येणारे विशेष प्रकार व व हल्लींच्या कित्येक जिवंत असणाऱ्यांमध्यें दिसून येणारे विशेष प्रकार यांचें संमेलन होऊन गेल्यामुळें वरील साम्य जसें ढळढळीत दिसून यावें तसें दिसून येत नाहीं.यास्तव हीं उदाहरणें सोडून जर निरनिराळ्या देशांतील लोकांमध्यें जे विशेष फरक दिसून येतात त्यांविषयीं आपण विचार केला, तर असें आढळून येईल कीं, ते फरक अगदीं वर्षानुवर्ष जशाचे तसे कायम राहतात. आतां या निरनिराळ्या देशांतील लोकांचें मूळ उत्पत्तिस्थान एकच होतें असें जर आह्मी समजतों तर त्यांची स्थिति बदलण्यास कांहीं विशेष कारणें घडून येऊन त्यांचे परिणाम जमत जमत पुढील वंशजांवर परंपरेनें होत जाऊन त्यांमध्यें विशेष भेद बनले असावे हें अगदीं उघड आहे. वरें निरनिराळ्या देशांतील लोकांमधील हे फरक त्यांच्या अगदीं हाडीं खिळून गेल्यामुळें असें होतें कीं, फ्रेंच मूल दुसऱ्या एखाद्या देशांतील लोकांमध्यें नेऊन ठेविलें व अगदीं त्यांमध्यें त्याचें पालनपोषण केलें तरी मोठेपणीं त्याच्या आंगीं फ्रेंच मनुष्याचे आंगीं जे विशेष गूण असावयाचे ते आल्याखेरीज कदापि राहाणार नाहींत. आतां हीच गोष्ट एकंदर स्वभाव व बुद्धि यांस लागू पडते असें जर आहे, व एकंदर मनुष्यजातीनें

निरनिराळ्या विषयांचा अभ्यास कांहीं विशेषक्रमानेंच केला आहे असें ही जर खरें आहे, तर प्रत्येक मुलाचे अंगीं तेच विषय त्याच क्रमानें शिकण्याची योग्यता येईल हें सांगावयास नको. आतां ह्या विशेष क्रमामध्यें वस्तुतः कांहीं अर्थ नाहीं असें जरी मानलें तरी सर्व मनुष्यजातीनें जो मार्ग आक्रमिला असेल त्याच मार्गाचें मुलांकडून अवलंबन करविल्यानें विद्येचें काम सुलभ होणार आहे. परंतु ह्या विशेष क्रमामध्यें अर्थ नाहीं असें म्हणेल कोण? आणि म्हणूनच एकंदर मनुष्यजातीचा आणि प्रत्येक व्यक्तिमात्राचा ज्ञानसंपादन करण्याचा मार्ग एकच असला पाहिजे असें जें आम्ही म्हणतों त्यास वरील हें एक अगदीं सबळ कारण आहे. इतिहासांतील मुख्य मुख्य गोष्टी ज्या अनुक्रमानें घडून आल्या तो अनुक्रम तसाच असला पाहिजे, व तो तसाच असण्यास जीं कारणें आहेत, तीं मनुष्य जातीस आणि मुलांस सारखींच लागू पडतात, हें सिद्ध करून देतां येईल. ह्यांतील प्रत्येक कारण विस्तारानें न सांगतां आतां आम्ही इतकेंच सांगतों कीं, एकंदर मनुष्यजातीचें मन ह्या सृष्टींतील देखावे पाहून ते समजून घेण्याचे प्रयत्नास लागलें; असें करतांना त्यास अनंत गोष्टी परस्परांशीं ताडून पाहाव्या लागल्या, पुष्कळ गोष्टींचें मनन करावें लागलें, कित्येक गोष्टींचा प्रत्यक्ष अनुभव घ्यावा लागला, व कांहीं गोष्टी करितांना तर नानाविध क्लृप्तींची योजना करावी लागली, व अशा रीतीनें मनास जें हल्लीं प्रत्येक विषयाचें ज्ञान प्राप्त झालें आहे तें कांहीं नियमित मार्गानेंच प्राप्त झालें आहे. तर मग मन आणि सृष्टि यांमधील संबंध असा आहे कीं, तें ज्ञान त्यास दुसऱ्या कोणत्याही रीतीनें प्राप्त व्हावयाचेंच नाहीं असें मानणें सयुक्तिक दिसत नाहीं काय? व तसेंच मुलाचें मन आणि सृष्टि यांमध्येंही जर तोच संबंध आहे तर मग मुलासही त्या ज्ञानाची प्राप्ति त्याच मार्गानें झाली पाहिजे, असें अनुमान करणें यांत तरी चूक ती कोणती? म्हणून आमचें असें म्हणणें आहे कीं, मनुष्यजातीमध्यें ज्ञानाचा प्रसार कसा होत गेला याचा शोध केला तर योग्य शिक्षणपद्धति शोधून काढण्याचें काम पुष्कळ सुलभ होईल.

(५) असा शोध करितां करितां आपणांस असा एक सिद्धांत कळून येतो कीं, प्रत्येक विषयामध्यें स्थूल ज्ञानावरूनच आपणांस शास्त्रीय ज्ञानाकडे वळलें पाहिजे. आपणांमध्यें ज्ञानाचा फैलावा होत गेला त्याचा

प्रकार पाहूं गेलें तर, प्रत्येक शास्त्राचा उदय त्या त्या कलेपासून झाला आहे असेंच दिसून येतें. सर्व मनुष्यजातीस आणि प्रत्येक मनुष्यमात्रास कोणत्याही गोष्टीचें आंतील गूढतत्व समजून घेण्यास त्या प्रत्यक्ष गोष्टीचा अभ्यास करणें अगदीं भाग आहे; आणि ह्यामुळेच कोणतेंही शास्त्र प्रचारांत येणें झटलें झणजे त्या संबंधाच्या पुष्कळ गोष्टी पूर्वीच प्रचारांत आल्या पाहिजेत; त्यांचा आपण अनुभव घेत गेलें पाहिजे, व ठोकळ मानानेंच त्याविषयीं आपणांस पुष्कळ नियम करून ठेविले पाहिजेत. शास्त्र झणजे व्यवस्थित ज्ञान होय. पूर्वी कांहीं ज्ञानाचा संचय असला तरच त्याची व्यवस्था करितां येईल; झणून प्रत्येक विषयाची सुरुवात केवळ अनुभवलेल्या स्थूल गोष्टींवरूनच झाली पाहिजे; पुष्कळ शोध करून एकदां पुष्कळशी माहिती मिळवून ठेवावी आणि नंतर त्यांत आपली बुद्धि चालविण्यास लागावें. ह्यास उदाहरण आधीं भाषा शिकवून नंतर व्याकरण शिकविण्याची चाल किंवा आधीं चित्रें काढावयास शिकवून नंतर पदार्थांच्या अंतराच्या मानानें त्यांचे देखावे कसे बदलतात व ते चित्रांमध्यें कसे दाखवावे हें शिकविण्याची नेहमींची वहिवाट हें होय. पुढेंपुढें आणखीही उदाहरणें येतील.

(६) वरील मुख्य तत्वावरूनच दुसरी एक गोष्ट सहजीं लक्षांत येण्यासारखी आहे, ती अशी कीं मुलांचा विद्याभ्यास चालला असतां त्यांची सुधारणा त्यांचेच हातून होईल असा क्रम होईल तितकें करून आपण ठेविला पाहिजे; व खरोखर ही गोष्ट अशी आहे कीं, ती केलीच पाहिजे असा आग्रह धरणेंही गैर होणार नाहीं. मुलांकडून शोध करविले पाहिजेत व त्यांच्याकडून स्वतः तर्क चालवून अनुमानेंही काढविलीं पाहिजेत. कोणतीही गोष्ट त्यांस आपण आयती सांगून न देतां त्यांस होईल तितकें करून सर्व गोष्टींची ओळख स्वतःच करून घेण्याची गोडी लाविली पाहिजे. मनुष्यजातीची सुधारणा केवळ स्वशिक्षणानेंच झाली आहे. स्वतःच्या जोरावर नांवा लौकिकास चढलेल्या मनुष्यांचीं जीं उदाहरणें आम्ही नेहमीं पाहतों, त्यांवरून असें सिद्ध होतें कीं, आपलें शिक्षण उत्तम तऱ्हेचें व्हावें अशी जर आपली इच्छा असेल, तर आपल्या मनाचीही सुधारणा कांहीं अंशीं अशाच प्रकारें झाली पाहिजे. ज्यांचा विद्याभ्यास केवळ शाळांतील नेहमींच्या कवायतीवर, ज्यांची अशी समजूत झाली

कीं विद्या झाली तर अशाच रीतीनें व्हावयाची, त्यांस मुलांचें गुरुत्व मुलांस देणें हें अशक्यच वाटावयाचें. परंतु लहानपणीं सभोंवतालच्या सृष्ट पदार्थांचें अतिशय महत्त्वाचें ज्ञान जें मुलें संपादितात, त्यामध्यें त्यांस कोणाची मदत नसते ह्या गोष्टीचा जर ते विचार करितील; मुलें जन्मभाषा स्वतःच बोलूं लागतात ही गोष्ट जर त्यांच्या स्मरणांत असेल; शाळेशीं ज्याचा अगदीं संबंध नाहीं असें ज्ञान व व्यावहारिक गोष्टींचा अनुभव प्रत्येक मुलगा कसा मिळवीत असतो हें जर ते पाहतील; अगदीं ज्याची कोणी कधीं वास्तपुस्त घेतली नाहीं अशा एखाद्या मुंबई सारख्या शहरांतील मुलाची बुद्धि ज्या कामांत तो भरी भरला असेल त्या कामांत किती उत्तम प्रकारें चालते इकडे जर त्यांचें लक्ष पोहोंचेल; आणि तसेंच किती लोक ह्या आपल्या वेडगळ शिक्षणपद्धतीच्या भानगडींतून व इतर शेंकडों अडचणींतून कोणाच्या मदतीवांचून केवळ स्वतःच्या परिश्रमानें कसे पार पडले आहेत हें जर ते मनांत आणितील; तर त्यांस असें आढळून येईल कीं, एखाद्या साधारण बुद्धीच्या विद्यार्थ्यास विषय कोणत्या क्रमानें व कोणत्या प्रकारानें शिकले पाहिजेत,हें एकदां सांगून दिलें कीं, तो पुढें येणाऱ्या शंकांची निवृत्ति आपली आपणच करूं शकेल, असें अनुमान करणें अप्रयोजक होणार नाहीं. कित्येक गोष्टींचें लक्षपूर्वक अवलोकन करून त्यांविषयीं मुलें आपल्या मनांत कसे नेहमीं शोध व तर्क चालवीत असतात,हें ज्यानें पाहिलें असेल,किंवा त्यांस समजण्यासारख्या ज्या गोष्टी असतील त्यांविषयीं शहाणपणानें बोलतांना त्यांस ज्यानें ऐकिलें असेल, त्यास खात्रीनें असें वाटेल कीं, याच शक्तीचा उपयोग जर त्यांजकडून त्यांस समजण्यासारखे जे विषय असतील, ते शिकण्यामध्यें नीट रीतीनें करविला, तर त्यांस ते विषय दुसऱ्यांचे मदतीशिवायही लवकर शिकतां येतील. त्यांस नेहमीं जें सांगावें लागतें याचें कारण आपला मूर्खपणा होय, मुलांचा मूर्खपणा नव्हे. ज्या गोष्टींमध्यें त्यांस मौज वाटते, व ज्या गोष्टी तीं नेहमीं जारीनें समजून घेत असतात, त्या गोष्टी त्यांस आपण शिकूं देत नाहीं;आणि ज्या गोष्टी समजण्याला फार बिकट असतात, व ह्मणून ज्या शिकण्याची त्यांस गोडी लागत नाहीं, अशा गोष्टी त्यांस आपण शिकवूं लागतों. ह्या गोष्टी तीं खुशीनें शिकत नाहींतसें झालें, ह्मणजे शिक्षेच्या व दहशतीच्या जोरावर

त्या गोष्टी त्यांच्या मनांत आपण जबरीनें कोंदीत असतों. ह्याप्रमाणें ज्या गोष्टी शिकण्याचें त्यांचे मनांत फार असतें, त्या गोष्टी आपण त्यांस शिकूं देत नाहीं, व ज्या गोष्टी त्यांस समजण्यासारख्या नसतात, अशा गोष्टी त्यांचें मनामध्यें जबरीनें भरवितों; व असें करून त्यांच्या मानसिक शक्ति आपण क्षीण करून टाकितों, व त्यांचे मनांत एकंदर ज्ञानाविषयीं तिटकारा उत्पन्न करितों. मुलें एकदां अशीं आळशी व जड झालीं, व त्यांस पुढेंही भलभलते विषय शिकवीत गेलें, ह्मणजे त्यांस समजून दिल्याखेरीज कांहींच समजत नाहींसें होतें; आह्मीं सांगावें, आणि त्यांनीं ऐकावें, अशीच केवळ स्थिति होऊन जाते; आणि असें झालें ह्मणजे आपण असें समजूं लागतों कीं, मुलांकडून अशाच रीतीनें विद्या करविली पाहिजे. याप्रमाणें आपल्या शिक्षणपद्धतीच्या योगानें मुलांस अजागळ करून, मुलें अजागळ ह्मणून आपली शिक्षणपद्धति अशी, असें आपण ह्मणूं लागतों. खरोखर आमची शिक्षणपद्धति गांवडी पतोजीचा अनुभव सांगून कधीं खोटी ठरावयाची नाहीं, हें ज्यास समजलें, त्यास असेंही आढळून येईल कीं, आपली एकंदर शिक्षणपद्धति सृष्टिक्रमाच्या धरतीवर ठेवण्यास कांहीं हरकत नाहीं; ज्याप्रमाणें मन लहानपणीं आपोआप सुधारत जातें, तसेंच तें पुढें पुढें ही सुधारत जाऊं दिलें पाहिजे; व असें करीत गेलें,तरच मुलांच्या बुद्धीची वाढ पूर्ण होऊन त्यांचे अंगांत यावी तितकी हुशारी येईल.

(७) कोणत्याही शिक्षणपद्धतीची परीक्षा करावयाची असल्यास उत्तम कसोटी लावावयाची झटली ह्मणजे पुढील प्रश्न विचारला पाहिजे. "तिच्या योगानें विद्यार्थ्यास आनंद वाटतो काय?" अमुक क्रम किंवा रीति अमुक क्रमापेक्षां किंवा रीतीपेक्षां पूर्वी सांगितलेल्या नियमांस जास्त अनुसरून आहे कीं नाहीं ह्याविषयीं संशय आल्यास खुशाल ह्या कसोटीचा उपयोग करून पहावा. हातीं घेतलेली शिक्षणपद्धति तत्वदृष्ट्या जरी उत्तम दिसत असली, तरी तीपासून शिकणारास मुळींच आनंद वाटत नाहीं, किंवा दुसऱ्या एखाद्या शिक्षणपद्धती पासून होणाऱ्या आनंदापेक्षां कमी आनंद वाटतो असें असेल तर, ती शिक्षणपद्धति आपणांस सोडून दिली पाहिजे;कारण तिच्या त्याज्यतेविषयींचीं आपलीं सर्व कारणें मुलांच्या बुद्धीच्या स्वाभाविक कलांपुढें अगदीं रद्द

आहेत. नेहमींच्या स्थितीमध्यें जी गोष्ट आपल्या शरीरप्रकृतीस चांगली, ती गोष्ट करितांना आपणांस सुख वाटतें, व जी गोष्ट करितांना आपणांस सुख वाटत नाहीं, ती गोष्ट आपल्या शरीरप्रकृतीस चांगली नव्हे, असा साधारण नियम आहे, व हा नियम आपल्या ज्ञानेंद्रियांच्या संबंधानेंही खरा आहे, असें मानण्यास हरकत नाहीं. आपल्या मनोवृत्तींस जरी हा नियम थोड्याच अंशीं लागू पडतो, तथापि तो बुद्धीस किंवा निदान बुद्धीचे जे भाग मुलांच्या अंगीं दिसून येतात, त्या भागांस तरी पूर्णपणें लागू पडतो, ही गोष्ट बहुतांशीं खरी आहे. मला अमुक विषय शिकावयाचा कंटाळा आहे, असें ह्मणून मुलें बहुतकरून नेहमीं शिक्षकांस त्रास देत असतात, परंतु असें समजावें कीं, हा कंटाळा त्यांचें अंगीं जन्मतः नसतो, परंतु त्यांच्या वेडगळ शिक्षणानें तो आलेला असतो. फेलनबर्ग असें ह्मणतो कीं, " अनुभवावरून मी असें सांगतों कीं, मुलें जास्याच फार चंचल असतात, आणि ह्मणून त्यांचें आणि आळसाचें इतकें वांकडें असतें कीं, त्यांचे अंगीं आळस असतो, हें गैर शिक्षणाचेंच फळ असलें पाहिजे; तसें नसेल तर त्यांच्या शरीरप्रकृतीमध्येंच कांहीं तरी बहुतकरून गोम असली पाहिजे. " मुलें जास्या चंचळ असतात याचा अर्थ इतकाच कीं, मानसिकशक्तींचा योग्य उपयोग केल्यानें होणारें सुख प्राप्त करून घेण्यासाठीं त्यांचा प्रयत्न सुरू असतो, यापलीकडे कांहीं नाहीं. आतां अशा कांहीं विशेष प्रकारच्या मानसिकशक्ति आहेत कीं, ज्यांचा विकास एकंदर मनुष्यजातीमध्येंच अद्यापि फारसा झाला नाहीं, व ज्या केवळ मोठमोठ्या विद्वानांच्या अंगीं मात्र कांहींशा जन्मतःच दिसून येतात. या शक्तींचा मात्र उपयोग व्हावा तितका झाल्याचें दिसून येत नाहीं, ही गोष्ट खरी आहे. परंतु या शक्ति पुष्कळ शक्तींच्या मिश्रणानें झाल्या असल्यामुळें, नेहमींच्या शिक्षणामध्यें त्यांचें कारण अगदीं शेवटीं पडतें; ह्मणजे मुलें मोठीं होऊन, त्यांस दूरचे लाभावर दृष्टि देतां येऊं लागून, पुढें होणाऱ्या सुखासाठीं तात्कालिक दुःख सहन करण्याची त्यांच्या अंगीं योग्यता येईपर्यंत, या शक्तीचा उपयोग करण्याची त्यांस गरजच पडत नाहीं. तथापि ह्यापेक्षां कमी प्रतीच्या मानसिक शक्तींस उत्तेजन देणारें नेहमींचें साधन ह्मटलें ह्मणजे, त्यांचा व्यापार सुरू झाला ह्मणजे, होणारें सुख हेंच होय; आणि सर्व व्यवस्था नीट असेल तर, एवढेंच साधन पुरे आहे. दुसरें

एखादें साधन शोधण्याचा प्रसंग आला कीं बेधडक असें समजावें कीं आपण भलत्याच मार्गास लागलों. अनुभवावरून दिवसानुदिवस आपली अशी खात्री होत चालली आहे कीं, जिच्या योगानें मुलांस कमेणूक किंवहुना आनंदही होईल, अशी शिक्षणपद्धति आपणांस नेहमीं हटकून काढितां येईल; व हीच शिक्षणपद्धति खरी, असें इतर सर्व प्रमाणांवरून सिद्धही करून देतां येईल. शिक्षणसंबंधाचे हे नियम अशाच तत्वरूपानें सांगितले, तर पुष्कळांचे मनांत त्यांचें महत्व येणार नाहीं, ह्मणून त्यांचा उपयोग कसा करावा, हें दाखवून द्यावें व त्यासंबंधानें आणखीही विशेष सूचना कराव्या ह्या हेतूनें शिक्षणाविषयीं तत्वदृष्ट्या विचार करण्याचें सोडून आचारदृष्ट्या विचार करण्याचें मनांत आणिलें आहे.

पेस्टलोझीचें असें मत होतें कीं, कोणत्यातरी प्रकारें मुलांचे शिक्षणास आरंभ तीं पाळण्यांत आहेत तोंच झाला पाहिजे, व या मताच्या सत्यतेविषयीं लोकांची तेव्हांपासून खात्रीही होत चालली आहे. ज्यानें मुलें मोठे डोळे करून सभोंवतालच्या पदार्थांकडे कशीं टक लावून पाहात असतात यांचें लक्षपूर्वक अवलोकन केलें असेल, त्यास असें आढळून येईल कीं, त्यांच्या विद्येची सुरुवात अगदीं अशा अल्पवयांमध्यें होते; मग ती सुरू करण्याचें आपल्या मनांत असो अगर नसो. जी वस्तु हातीं लागेल ती बोटांनीं धरून तोंडांत घालणें, तोंड उघडें ठेवून प्रत्येक ध्वनि ऐकणें, अशा कृत्यांस सुरुवात करितां करितां नवीन ताऱ्यांचा शोध लावणें, वायुभारमापक यंत्रासारखी यंत्रांची युक्ति काढणें, उत्तम तसबिरी काढणें, सतार सारंगी वगैरे उत्तम वाद्यें शोधून काढून संगीत नाटकांचे उत्तम प्रयोग करून दाखविणें, अशा महत्कृत्यांपर्यंत त्यांची मजल येऊन ठेपते. ज्याअर्थी मानसिक शक्तींचे व्यापार ह्याप्रमाणें अगदीं पहिल्यापासूनच सुरू होतात, व ते तसे झालेच पाहिजेत, त्याअर्थी आपणांस आतां येवढेंच पाहाणें आहे कीं, त्यांचा व्यापार सुरू होण्यास लागणारी सामग्री आपण पुरवावी किंवा कसें. आमच्या मतें सर्व सामग्रीचा पुरवठा आपणासच केला पाहिजे. यद्यपि पेस्टलोझीचीं तत्वें आम्हांस कबूल असलीं, तरी त्याच्या योजना आह्मांस कबूल आहेत असें नाहीं; व असेंच आह्मीं पूर्वीही ह्मटलें आहे. ह्यासंबंधानें एक उदाहरण घेऊन पाहा; शुद्ध लिहिणें कसें शिकवावें

याविषयीं सांगत असतां तो असें ह्मणतो; " यास्तव आपल्या वर्ण मालिकेमध्यें आपल्या भाषेंतील सर्व ध्वनि दाखविणारे वर्ण आले पाहिजेत. हे ध्वनि मुलास अगदीं लहानपणीं घरीं शिकविले पाहिजेत. जें मूल हे ध्वनि शिकत असेल, त्यानें त्यांचा उच्चार अगदीं पाळण्यांतील मुलापुढें करीत असलें पाहिजे; त्र असें करीत गेल्यानें ते वारंवार कानीं पडून त्याच्या मनांत पूर्णपणें बिंबून जातील. " तो " मदर्स मान्युअल " नांवाच्या पुस्तकामध्यें मुलांस लहानपणीं कोणत्या प्रकारचें शिक्षण असलें पाहिजे, याविषयीं कांहीं सूचना करीत असतां असें ह्मणतो कीं मुलांस पहिल्यानें शरीराचे अवयवांचीं नांवें, त्यांची संख्या, त्यांचे संबंध व धर्म, आणि त्यांचे व एकंदर शरीराचे उपयोग वगैरे शिकविले पाहिजेत. या दोन्ही गोष्टींवरून असें स्पष्टपणें दिसून येतें कीं, पेस्टलोझीस लहानपणीं मनाची वाढ कशी होत जाते याची माहिती फारच अपुरी असल्यामुळें त्याचे हातून योग्य उपायांची योजना झाली नाहीं. आतां मानसशास्त्र आपणांस काय उपाय सांगतें तें पाहूं.

मुलांच्या मनावर अगदीं लहानपणीं होणारे ग्रह, पदार्थांचा मऊपणा किंवा कठीणपणा तसेंच प्रकाश ध्वनि वगैरेच्या योगानें भासमान होणारें जें अविभाज्य इंद्रियज्ञान, त्यापासून होतात. मिश्रमनोवृत्ति, तज्जनक मिश्रमनोवृत्तींच्या पूर्वी असूं शकणार नाहींत हें उघड आहे. प्रकाशाचें न्यूनाधिक्य व त्याचे धर्म, तसेंच पदार्थांचें मार्दव व काठिन्य यांचा कमजास्तपणा, यांचा थोडाबहुत परिचय झाल्याशिवाय आकृतीची कल्पना कधींही यावयाची नाहीं. प्रकाशाच्या जातींवरून आपणांस दृश्य आकार समजतो; स्पृश्य आकार समजण्यास पदार्थांच्या मार्दवाचे व काठिन्याचे प्रकार आपणांस आधीं समजून आले पाहिजेत, व तसेंच निरनिराळे ध्वनि अवगत असल्याशिवाय त्यांच्या संधीनें होणाऱ्या स्पष्ट वर्णोच्चारांची ओळख आपणांस व्हावयाची नाहीं, वगैरे गोष्टी लोकांस पुष्कळ दिवस माहीत आहेतच. हाच प्रकार सर्वत्र लागू असला पाहिजे. याप्रमाणें शुद्ध ज्ञानावरून मिश्र ज्ञान होत जावें, असा जर ज्ञानाभिवृद्धीचा धडधडीत नियमच आहे, तर त्याच नियमान्वयें प्रकाशाचें न्यूनाधिक्य व जाति, ध्वनीचे निरनिराळे प्रकार व त्यांचें उच्चनीचत्व आणि तसेंच पदार्थांचें काठिन्य व मार्दव वगैरे सर्व गोष्टी कळून

येण्यासारखा पदार्थाचा भरपूर पुरवठा मुलांस नेहमीं करीत गेलें पाहिजे ह्याप्रमाणें अनुमानावरून असा सिद्धांत ठरतो; व हा आनुमानिक सिद्धांत खरा, असें मुलांच्या लहानपणच्या स्वाभाविक कलांवरूनही चांगलें सिद्ध करून देतां येतें. पहा प्रत्येक मुलास आपलीं खेळणीं चावून, व भावाच्या डगल्याच्या चकचकीत बुताम्यांस हात लावून किंवा आपल्या बापाच्या मिशांचे लांब लांब कल्ले ओढून किती आनंद होतो! तसेंच एखादी चित्रविचित्र रंगीत वस्तू पाहिली कीं, तिकडे तें एकसारखें टक लावीत असतें व त्याच नादांमध्यें गर्क होऊन जातें! त्या वस्तूच्या केवळ रंगास भुलून त्याला बोलतां येत असलें तर तिला तें "मोज" ह्मणूं लागतें! दाई लाडकें लाडकें त्याच्याशीं बोलूं लागली ह्मणजे किंवा एखादा नवीन मनुष्य येऊन त्यास जरा इकडे तिकडे बोटानें चपूं लागला ह्मणजे तें आपलें तोंड उघडें करून कसें हंसूं लागतें!! खरोखर ही एक आनंदाची गोष्ट आहे कीं, मुलाच्या विद्येसाठीं जरूर त्या गोष्टी लहानपणीं त्याचें पालनपोषण चालले असतां आपल्या हातून सहजीं घडून येतात. तथापि पुष्कळ गोष्टी कराव्याच्या राहतात, आणि पहिल्यानें जरी त्यांचें महत्त्व आपल्या लक्षांत येत नाहीं, तथापि त्या महत्त्वाच्या आहेत, व त्या होऊन गेल्या पाहिजेत, ह्यांत काडीमात्र संशय नाहीं. मानसिक शक्ति विकास पावत असतांना त्यांचे स्वाभाविक व्यापार एकदां सुरू झाले ह्मणजे त्यावेळेस मनावर जे संस्कार होतात, ते इतर प्रसंगांपेक्षां अधिक स्पष्टतेनें होतात. शिवाय ज्याअर्थीं या सर्व साध्या गोष्टींचें ज्ञान आपणास करून घ्यावयाचें असतेंच, व तें केव्हांही करून घेतलें तरी त्यास वेळ हा लागावयाचाच, त्याअर्थीं लहानपणीं बुद्धीचे इतर सर्व व्यापार बंद असतांनाच त्या गोष्टींचा निःशेषतेनें परिचय करून घेतल्यानें आपला वेळाकडून फायदा होणार आहे. बरें मुलांस वरील गोष्टींचें ज्ञान संपादन करून घेण्याचा मोठा हव्यास असतो, तर त्या ज्ञानाचा एकदां चांगला सांठा होऊन, त्यांचें एकसारखें समाधान होत गेलें ह्मणजे त्यापासून त्यांची प्रकृति व स्वभाव हीं सुधारत जातात, ही गोष्टही लक्षांत ठेवण्यासारखीच आहे. या अगदीं साध्या साध्या गोष्टींची मुलांस ओळख करून द्यावयासाठीं ज्या योजना कराव्याच्या ह्या कोणत्या रीतीनें केल्या पाहिजेत, अशाविषयीं कांहीं सूचना करावयास येथें जागा असती तर बरें झालें असतें. आह्मी तूर्त येथें इतकेंच सांगतों कीं,

वरील उद्योगास लागतांना अव्यक्त स्थिति जाऊन व्यक्त स्थिति प्राप्त होणें हें परिणतिवादाचें मुख्य तत्व लक्षांत आणिलें पाहिजे, आणि मानसिक शक्ति विकास पावत असतां ज्या गोष्टींमध्यें विशेष फरक असेल, त्या गोष्टींची प्रथम ओळख करून दिली पाहिजे, असें जें आपणांस या तत्त्वावरून सहजीं अनुमान करितां येतें, त्याच अनुमानाच्या धोरणानें आपलें सर्व काम चालविलें पाहिजे; ह्मणजे ज्याचा आवाज विशेष उच्च किंवा विशेष नीच असेल असे ध्वनि, अगदीं निरनिराळे रंग, आणि हातास विशेष कठीण किंवा विशेष मऊ, विशेष खडबडीत किंवा विशेष सफाईदार, लागतील असे अगदीं भिन्न पदार्थ, ह्यांच्याशींच मुलांची पहिल्यानें गांठ घालून दिली पाहिजे; व असें होतां होतां मग क्रमानें ज्यांच्यामध्यें जास्त सादृश्य असेल, अशा गोष्टी त्यांच्यापुढें आणीत गेलें पाहिज.

ह्याप्रमाणें मुलांचे ज्ञानेंद्रियास जें प्रथम शिक्षण मिळावयाचें तें मिळाल्यानंतर लागलेंच मुलांस पदार्थ प्रत्यक्ष दाखवून, त्यांचे गुणधर्म समजून देण्याचे मार्गास लोक लागतात तें अगदीं यथार्थच आहे. परंतु याविषयीं आमचें असें ह्मणणें आहे कीं, हें शिकविण्याची जी रीति प्रचारांत सुरू आहे, ती रीति बरोबर नाहीं; कारण अगदीं लहान मुलांस किंवा जाणत्या माणसास कोणत्याही प्रकारचें ज्ञान प्राप्त होत असतां किंवा एकंदर मनुष्यजातीच्या ज्ञानाचा प्रसार चालला असतां, जो सृष्टिक्रम दिसून येतो, त्याच्याशीं ह्या रीतीचा अगदीं विरोध आहे. एम् मार्सेल साहेबाचें असें ह्मणणें आहे कीं, मुलांस प्रत्येक पदार्थाचे भाग कसे जोडलेले आहेत, हें प्रत्यक्ष दाखवून दिलें पाहिजे; आणि या संबंधानें जीं कित्येक पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत,त्या प्रत्येकामध्यें ज्या ज्या वस्तूचें ज्ञान मुलांस करून द्यावयाचें असेल, त्या त्या वस्तूविषयीं मुलांस कोणत्या कोणत्या गोष्टी सांगितल्या पाहिजेत, यांच्या यादीच प्रसिद्ध झाल्या आहेत. आतां मुलास वाचा फुटण्यापूर्वी जें ज्ञान प्राप्त होत असतें तें केवळ स्वतः तें प्राप्त करून घेतें हें समजण्यास त्याच्या लहानपणीं चाललेल्या कृत्यांकडे उगीच जरा लक्ष्य दिलें तरी पुरे आहे. अमुक पदार्थ जड आहेत, अमुक पदार्थ कठीण आहेत, अमुक मनुष्याचा वर्ण व आकार अमुक प्रकारचा आहे, अमुक प्रकारचे प्राणी अमुक प्रकारचे शब्द करितात, इत्यादि

सर्व गोष्टी मुलें स्वतःच शिकतात. बरें मोठेपणीं आपणांस शिक्षकांचीही मदत नसते, आणि तेव्हांतर आपली वागणूक कशी असली पाहिजे हें, सर्व गोष्टी लक्षांत आणून आपलें आपणच ठरवितों. आणि हें काम साधावें तसें बरोबररीतीनें साधेल तरच सर्व व्यवहार योग्य रीतीनें तडीस जातील. ह्याप्रमाणें मनुष्यजातीची सुधारणा ज्या क्रमानें होत गेल्याचें दिसून येतें, त्याच क्रमाचें अनुकरण बालपणामध्यें आणि मोठेपणामध्यें होत असतें असें जर आहे,तर मग बालपण आणि मोठेपण यांच्या दरम्यानच्या वयामध्यें त्या क्रमाच्या उलट क्रम सुरू असावा, आणि तो पुन्हां पदार्थांचे गुण धर्म शिकणें अशा अगदीं साध्या कामामध्यें, हें चमत्कारिक दिसत नाहीं काय? ह्यावरून सतत एकसारखाच क्रम असावा, असेंच उलट सिद्ध होत नाहीं काय? सृष्टिक्रमही ह्याच क्रमाचें अवलंबन केलें पाहिजे, असें आपणांस पुन्हां पुन्हां नेहमीं सांगत आहे; आतां हें समजण्याची आपल्या अंगीं अक्कल असली पाहिजे व तसें आपण नम्रभावानें केलें पाहिजे ही गोष्ट स्वतंत्र आहे. आपलें मन ज्या गोष्टीकडे लागलें आहे त्याच गोष्टीकडे जवळच्या माणसाचेंही लक्ष लागावें अशी मुलांची उत्कट इच्छा असते. तुम्ही मांडीवर एखादें मूल घेऊन बसलां असतां, उगीच लक्ष देऊन पहा कीं, कसें तें मूल आपल्या हातांतलें खेळणें तुमच्या पुढें पुढें करीत असतें, कीं, एकदां तुम्हीं तिकडे पहावें. एखादें मूल आपलें ओलें बोट मेजावरून फिरवीत असतां जो कर्कश आवाज होतो, तो तुम्हीं ऐकावा ह्मणून वरचेवर तें तुमच्याकडे कसें पाहत असतें! ह्मणजे हा नवीन आवाज तुम्ही ऐका असेंच तें आपल्याकडून होईल तितकें करून स्पष्टपणें ह्मणत असतें असेंच समजावयाचें नाहीं काय? मुलें जरा मोठीं झाल्यावर आई पुढें "आई, ही बघ कशी मौज आहे ती, आई हें बघ कायतें, आई तें बघ कायतें" असें करीत कशीं येत असतात हें तुम्हीं कधीं पाहिलें आहे? आणि त्या मूर्ख आईनें उगीच मला त्रास देऊं नको असें त्यांस झटलें नाहीं तर तीं नेहमीं असेंच करीत जातील. समजा कीं, तीं मुलें दाईबरोबर बाहेर गलीं; तर त्यांतील प्रत्येक एखादें हातीं लागलें असेल तें नवीन फूल घेऊन तें तिच्या पुढें कसें चागलें आहे हें दाखविण्याकरितां धांवत येत असतें व ती "चां-

गलें आहे हो बाळा" असें म्हणेपर्यंत तिची पिच्छा सोडीत नाहीं. एखाद्या मुलानें कांहीं एखादी नवीन गोष्ट पाहिली, तर तिजविषयीं लोकांस मोठ्या प्रेमानें सांगण्याची त्याची किती धांदल उडते; कोणी नीट लक्ष लावून ऐकणारा मात्र त्यास मिळाला पाहिजे. यावरून काय नियम बांधावयाचा हें अगदीं उघड होत नाहीं काय ? मनाच्या स्वाभाविक कलांस अनुरूपनच आपली पद्धति असली पाहिजे असें ह्यावरून स्पष्ट होत नाहीं काय? आपण सृष्टिक्रम संभाळून ज्या कांहीं व्यवस्था करावयाच्या त्या केल्या पाहिजेत; प्रत्येक पदार्थाविषयीं मूल आपणांस जें सांगेल, तें आपण ऐकिलें पाहिजे; जें जें त्यांस सुचेल तें तें त्यांजपासून आपण काढून घेतलें पाहिजे; त्याच्या ध्यानांत ज्या गोष्टी आल्या नसतील, त्या पुन्हां कधीं प्रसंग आला तर त्यास समजाव्या, ह्मणून त्या आपण त्यांच्या लक्षांत आणून दिल्या पाहिजेत; आणि याप्रमाणें हळू हळू त्यांच्यापुढें नवीन नवीन गोष्टी आणून किंवा त्यांविषयीं त्यांच्या जवळ बोलून त्यांना पूर्ण माहिती होईल असें करून दिलें पाहिजे. एखादी शहाणी आई ह्या क्रमाचें अवलंबन करून, आपलें काम कसें चालविते तें पहा. रंग, रुचि, आकार, काठिन्य, मार्दव इत्यादि साध्या साध्या धर्माचें मुलास ती हळू हळू ज्ञान करून देत असते. ह्या कामामध्यें मुलाकडूनही तिला उत्सुकतेनें मदत मिळत असते. अमुक तांबडें, अमुक पांढरें, असें एकदां त्यास समजून देण्याचा मात्र उशीर कीं, लागलेंच तें त्या त्या वस्तु आणून, तीस तें हें पहा तांबडें, हें पहा कसें टणक आहे तें! असें ह्मणूं लागतें. ज्या ज्या नवीन वस्तु तें तिच्यापुढें आणितें, त्यांचे कांहीं ज्यास्त धर्म तिला सांगावयाचे असले, तर ती त्यास पूर्वी जे धर्म माहीत असतील, त्याजला जोडूनच सांगते व असें केल्यानें दुसऱ्याचें अनुकरण करण्याचा जो मुलांचा स्वभाव असतो, त्यास भर पडून, ते सर्व गुणधर्म त्यास एकामागून एक पाठ ह्मणतां येऊं लागतात; जे धर्म त्यास माहीत झालेले आहेत, त्यांतील एक दोन धर्म तें सांगावयास चुकतें; असें हळू हळू घडूं लागलें, ह्मणजे अमुक वस्तूंविषयीं तुला कांहीं जास्त माहीत आहे कीं नाहीं असे प्रश्न विचारण्याची रीति ती सुरू करिते. प्रश्न विचारल्यानंतर पहिल्यानें त्याला बहुतकरून समजत नाहीं; तसेंच त्याला कांहीं वेळ गोंधळांत टेवून, त्यास तें सांगतां येत नाहीं ह्मणून थोडासा वेळ हंसून त्याला ती तें सांगते. असें कांहीं वेळ

घडून आलें ह्मणजे, काय असतें तें त्याचें त्यालाच कळूं लागतें. मूल जें सांगेल त्यापेक्षां आपणांस कांहीं अमुक वस्तूविषयीं ज्यास्त माहिती आहे असें जर तिनें ह्मटलें, तर मुलाला लागलेंच चढीस भरल्यासारखें होतें. त्या वस्तुकडे तें लक्ष लावून पाहूं लागतें, जें कांहीं त्यानें ऐकिलें असेल, त्या सर्वाचें तें मनन करूं लागतें, व उत्तर साधारण सोपेंच असल्यामुळें तें त्याच्या एकदम लक्षांतही येतें. असें झालें ह्मणजे त्याला मोठा आनंद होतो, आणि आईलाही मोठें समाधान वाटतें. आपल्या अंगांत बुद्धि आहे असें समजलें ह्मणजे, मुलांस सहजीं बरें वाटतें तसें त्यालाही बरें वाटूं लागतें, व आणखी असेच प्रश्न जिज्ञासेनें त्याच्या मनांत येऊन, आईस सांगण्या करितां अशाच कांहीं जास्त गोष्टी शोधून काढण्याच्या प्रयत्नास तें लागतें. ह्याप्रमाणें मुलाची बुद्धि वाढत चालली ह्मणजे ती आई पदार्थाचे आणखी जास्त धर्म त्यास सांगूं लागते. कठीण आणि मृदु हें समजूं लागलें, ह्मणजे ती खडबडीत व गुळगुळीत ह्मणजे काय हें त्यांस सांगूं लागतें. रंग समजला ह्मणजे झिलई ह्मणजे काय हें त्यास समजून देऊं लागते. ह्याप्रमाणें ती त्यास साध्या साध्या गोष्टींवरून क्रमशः कठीण गोष्टींचें ज्ञान करून देऊं लागते; मुलाची जसजशी बुद्धि वाढत जाते, तसतसे ती आपले प्रश्न कठीण करीत जातें, आणि नेहमीं याप्रमाणें त्याचे मनास आणि स्मरणशक्तीस जास्ती जास्ती ताण पडे असें ती करीत असते. त्यांतच त्याला मौज वाटावी ह्मणून त्याला समजण्यासारख्या कांहीं नवीन गोष्टी मधून मधून आणिते, आणि तसेंच त्याला सांगतां येतील असे बातावेगाचे प्रश्न विचारून त्याला नेहमीं उत्तेजन देत असते. हें ती करीत असली, ह्मणजे अगदीं लहानपणीं जो स्वतः सिद्ध क्रम सुरू असतो, त्याच क्रमाचें ती अनुकरण करून, मूल स्वतः शिकत असतां त्याच्या स्वाभाविक कलांस अनुसरून जरूर वाटेल ती त्यास मदत करीत असते असेंच समजलें पाहिजे. खरोखर आईचें हें करणें मुलाला वस्तूंचें पूर्णपणें निरीक्षण करण्याची संवय लावण्यास फारच उत्तम होय. मुलास अशा रीतीनें शिकविण्यामध्यें त्याला वरील प्रकारची संवय लागावी असाच आमचा धडधडीत उद्देश असतो; मुलाला ही गोष्ट सांगणें आणि ती गोष्ट दाखविणें, ह्मणजे त्यास निरीक्षणाची संवय लावणें नव्हे, तर त्यास दुसऱ्याच्या अनुभवांचें सांठवण

करणें होय. अशा रीतीनें मुलाचें स्वशिक्षणाचें सामर्थ्य न वाढतां, कमीच होत जातें. स्वतःचे उद्योगानें कोणतीही गोष्ट समजून जो त्यास आनंद व्हावयाचा, त्यास तें मुकतें. आणि हें अत्यंत रमणीय ज्ञान अगदीं उरींव रीतीनें प्राप्त होत गेल्यानें प्रत्यक्ष पदार्थाचें निरीक्षण करण्यामध्यें कांहीं विशेष नाहीं, असें त्यास वाटून या रीतीचा त्यास तिटकाराही येऊं लागतो. आतां याच्या उलट वर सांगितलेल्या रीतीनें मुलास शिकविणें म्हणजे बुद्धीला बुद्धीचें खाद्य पुरविणें होय. कोणतेंही ज्ञान प्राप्त करून घेण्याची इच्छा एकदां मनामध्यें जागृत झाली म्हणजे, तें ज्ञान प्राप्त करून घेण्याचा मार्ग सुखावह असावा व आपणाला कांहीं सहाध्यायि असावे असें सहजीं वाटूं लागतें. तर या इच्छांचा मिलाफ घालून दिल्यानें विद्यार्थ्याचें लक्ष अभ्यासाकडे खात्रीनें नीटपणीं लागावयाचेंच; व अशा रीतीनें त्यास जें ज्ञान प्राप्त होतें तें अगदीं यथार्थ व परिपूर्ण असतें; याप्रमाणें मनास पहिल्यापासून स्वतःचे परिश्रमावर अवलंबून असण्याची संवय लावून दिली पाहिजे, कारण शेवटीं मनास स्वतःचे परिश्रमावरच अवलंबून राहावयाचें असतें.

मुलांस प्रत्यक्ष पदार्थ दाखवून त्यांचें ज्ञान करून देण्याची जी रीति सांप्रत कोठें कोठें सुरू असल्याचें दृष्टोत्पत्तीस येतें, ती रीती पहिल्यानें अगदीं बदलून टाकिली पाहिजे; तीमध्यें आणखी जास्त पदार्थांचा समावेश होऊन, तिचा उपयोगही अधिक कालपर्यंत करीत गेलें पाहिजे. मुलांस घरांतलें तेवढे पदार्थ दाखविले म्हणजे झालें असें नाहीं; त्यांस शेतें, कुंपणी, खाणी, आणि दर्याकिनारा वगैरे सर्व ठिकाणचे पदार्थ दाखविले पाहिजेत. तसेंच हें काम मुलें अगदीं लहान आहेत तोंच बंद करितां कामा नये; पुढें जाणतेपणींही तें तसेंच सुरू ठेविलें पाहिजे. व असें चालतां चालतां शेवटीं त्याच्या योगानें एखादा सृष्ट पदार्थवेत्ता किंवा कोणी शास्त्रज्ञ पुरुष जे शोध लाविती ते शोध लावण्याची योग्यता त्यांच्या अंगीं सहजीं आली पाहिजे. ह्या कामामध्यें तरी आपणांस सृष्टीक्रमाचेंच अवलंबन करावयाचें असतें. नवीं फुलें, गारगोट्या, आणि शिंपा जमवून, किंवा नवीन नवीन किडे पाहून, मुलांस जो आनंद होतो तो त्यांचा त्यांसच घेऊक, व ह्याच गोष्टींमध्यें आपण मन घालून त्यांस उत्तेजन देत गेलों, तर तीं पदार्थांचे गुण, धर्म, व रचना ह्यांविषयीं जितकी माहिती आपण

करून द्यावी तितकी करून घेण्यास अगदीं तयार असतात, असेंही आपल्या लक्षांत आल्याखेरीज रहावयाचें नाहीं. प्रत्येक वनस्पतिशास्त्रवेत्त्यास, रानावनांतून हिंडतांना जर मुलें बरोबर असलीं, तर तीं किती प्रेमानें आपल्या कामामध्यें मदत करण्यास तयार असतात, नवीन नवीन वनस्पति कशा भराभर शोधून काढीत असतात, त्या आपण पाहत असतां तिकडे त्यांचें कसें एकसारखें लक्ष लागलेलें असतें व आपणांस तीं अगदीं प्रभावर प्रश्न विचारून कसें पुरेसें करितात इत्यादि गोष्टींचा अनुभव असतोच असतो. सृष्टिक्रमाचें खरें तत्व जाणणारा व आपणांस अगदीं सृष्टिक्रमाचा दास ह्मणविणारा जो बेकन त्याच्या पंथाचा जो खरा अनुयायी असेल, त्याच्या लक्षांत येईल कीं, सृष्टिक्रम सांगतो त्या पंथाचें अवलंबन आपण नम्रभावानें केलेंच पाहिजे. ह्या प्रमाणें मुलांस निरिंद्रिय पदार्थांचें साध्या गुणधर्माचें ज्ञान झालें, ह्मणजे अशाच रीतीनें नेहमीं हिंडतां फिरतां ज्या वस्तु त्यांच्या पहाण्यांत येतील, त्यांची त्यांस पूर्ण माहिती करून दिली पाहिजे; हे करितांना तरी अगदीं सरळ सरळ गोष्टी असतील त्यांचीच त्यास आधीं माहिती करून दिली पाहिजे. वनस्पतींविषयीं मुलांस माहिती देत असतांना त्यांस फुलांच्या पांकळ्यांची संख्या, त्यांचा आकार, आणि रंग, तसेंच पानांचा आणि त्यांच्या देंठाचा आकार वगैरे गोष्टींची ओळख करून दिली पाहिजे. कृमिकीटकांविषयीं सांगत असतांना त्यांस त्यांचे पंख, पाय, व स्पर्शज्ञान करून घेण्याचे त्यांचे कल्ले यांची संख्या व रंग यांची प्रथमतः माहिती करून दिली पाहिजे. ह्या वरील सर्व गोष्टी त्यांस पूर्णपणें कळून, कायमच्या त्यांच्या लक्षांत राहिल्यासारख्या झाल्या, ह्मणजे हळू हळू त्यांस पुढच्या जास्त गोष्टी सांगत जावें. नंतर त्यांस फुलांचे केसर व गर्भतंतु यांची संख्या, फुलांचे आकार, दुभागलेले किंवा वर्तुळाकार असतील तसेच, पानाचे निरनिराळे प्रकार, त्यांची रचना, समोरासमोर किंवा एक टाकून एक जशी असेल तशी, त्यांस देंठ आहे कीं नाहीं, तीं गुळगुळीत आहेत किंवा केसाळ आहेत, तीं करवती कांटी आहेत किंवा त्यांच्या कांठास दांते आहेत, किंवा त्यांचे कांठ नियमित रीतीनें कापलेले आहेत वगैरे वनस्पतींच्या संबंधाच्या सर्व गोष्टी त्यांस समजून द्याव्या; तसेंच शरीराचे भाग, पोटांतील पडदे, पंखांच्या खाणाखुणा व लहानसा अवयवांचे आकार वगैरे कृमिकिटकां-

विषयीं चट सारी माहिती त्यांस करून दिली पाहिजे. सारांश आपला क्रम नेहमीं असा असला पाहिजे कीं, त्याच्या योगानें मुलांच्या मनांत सतत अशी इच्छा जागृत राहावी कीं जी जी वस्तु आपण पाहतों, तिच्या तिच्या संबंधानें सर्व कांहीं आपणांस सांगतां आलें पाहिजे. नंतर तीं बरींच जाणतीं झाल्यावर, ज्या वनस्पतींविषयीं त्यांस इतकी माहिती झाली आहे, व ह्मणूनच ज्या त्याच्या अगदीं आवडत्या होऊन गेल्या आहेत त्या वनस्पतींचें रक्षण कसें करावें, हें त्यांस शिकविलें, तर तीं आपलीं फार आभारी होतील; व तसेंच सुरवंट वगैरे कीटकांचें कसें रूपांतर होत जातें, हें पाहण्यास जीं यंत्रें लागतात,तीं जर आपण त्यांस दिलीं, तर त्यांस आपणावर मोठेच उपकार केले असें वाटेल. ह्या दुसऱ्या प्रकारच्या कृतीनें मुलांस मोठा आनंद होतो, असें इंग्लंडांतील विद्वान् पुरुषांच्या अनुभवास आलें असून, त्यांचें ह्या संबंधानें असें ह्मणणें आहे कीं, ह्या सर्व गोष्टींची प्रतीति मुलें मोठ्या आवडीनें वर्षांच्या वर्षें घेत असतात; व त्यांतच जर कृमिकीटकांच्या माहितीचा संग्रह करून ठेवण्याचा क्रम ठेवीत गेलें, तर मुलांस शनवारीं संध्याकाळीं, इकडे तिकडे फिरून जी गंमत वाटते तीस पुष्कळच भर पडल्यासारखें होतें, व असा क्रम ठेवीत गेल्यानें प्राणिधर्मशास्त्राचा अभ्यास सुरू करण्यास पुष्कळच सोईवार पडतें.

पुष्कळ लोक असें करीत बसणें ह्मणजे वेळ आणि श्रम फुकट घालविणें आहे, आणि ह्या पेक्षां मुलांकडून पुस्तत्यां काढविणें किंवा आणे पैचीं कोष्टकें पाठ करविणें व अशा रीतीनें त्यांस व्यवहारांत लागणाऱ्या गोष्टींचें ज्ञान करून देणें, हें फार बरें असें ह्मणतील हें आह्मी अगदीं पूर्णपणें समजून आहों. विद्या व उपयुक्तता यांच्या संबंधानें लोकांचे अद्यापिही असे कोते विचार असावेत ही मोठी दुःखाची गोष्ट आहे. मुलांच्या ज्ञानेंद्रियांस योग्य प्रकारचें शिक्षण मिळून तीं सुधारलीं पाहिजेत व तीं तशीं सुधारण्यास वरील कृतींचा किती उपयोग होतो वगैरे गोष्टी जरी तूर्त बाजूस ठेविल्या, तरी त्या कृतींपासून जें ज्ञान होतें त्या ज्ञानासाठींच वरील कृतींची योजना करणें इष्ट आहे, असें ह्मणण्यास आह्मांस मुळींच शंका वाटत नाहीं. जर लोकांना शहरवासी शेट होऊन बसावयाचें असेल, जमा खर्चाच्या चोपड्या घेऊन नेहमीं "एक नी दोन तीन" करीत बसावयाचें असेल, आपल्या धंद्यापलीकडे कांहीं पहावयाचेंच नाहीं

असा जर त्यांचा बाणाच असेल, किंवा एखाद्या खेड्यापाड्यांतील चंदुलालाप्रमाणें आपल्या ऊंसाच्या बागेंत बसून विड्या ओढणें व सुरापान करणें ह्यांत काय ती मौज आहे असें मानून घेणें जर त्यांस बरें दिसत असेल, किंवा एखादा पाटीलबुवा होऊन रानें ह्मणजे शिकार करण्याची जागा, आपोआप उगवणाऱ्या वनस्पति ह्मणजे उपटून टाकण्याचें रान असेच मानीत बसावयाचें असेल, किंवा सर्व प्राण्यांचे, पारधीचीं जनावरें, शेतकीजीं जनावरें, व कोडमंगी असेच तीन वर्ग करीत बसावयाचें असेल, तर मात्र खरोखर नापीक जमीन लागवडीस आणणें किंवा अन्नसामग्रीची चांगली बेगमी करून ठेवणें, यांत ज्याचा कांहीं साक्षात् उपयोग होत नाहीं, असें कांहीं त्यास शिकण्याची अगदीं जरूरी नाहीं हें खरें. परंतु पेटाकरितां केवळ हमालासारखें सतत खपणें ह्याशिवाय कांहीं दुसरें आपलें ह्या जगामध्यें कर्तव्य असेल, सृष्टींतील पदार्थांपासून द्रव्यप्राप्ति करून घेणें ह्या खेरीज जर त्यांचे कांहीं दुसरे उपयोग असतील, विषयसुखाचीं साधनें प्राप्त करून घेऊन त्यांच्या सेवनामध्यें कालक्रमण करणें ह्या शिवाय दुसऱ्या योग्य कामाकडे आपल्या शक्तींचा उपयोग करणें जर शक्य असेल, काव्य, कलाकौशल्यें, शास्त्रीयविषय आणि तत्वज्ञान ह्यांपासून होणाऱ्या आनंदामध्यें जर कांहीं अर्थ असेल, तर सृष्टींतील नानाविध चमत्कारांचें अवलोकन करून त्यांच्या विषयीं विचार करण्याकडे जो मुलांचा स्वाभाविक कल असतो, त्या कलास उत्तेजन देणें खरोखर अत्यंत इष्ट व आवश्यक आहे, असें मानणें चुकीचें होईल काय? परंतु जे लोक ह्या जगामध्यें येऊन तें जग कोणत्या प्रकारचें आहे किंवा त्यामध्यें काय आहे ह्या विषयीं विचार न करितां केवळ क्षुल्लक स्वार्थाकडे दृष्टि देऊन तें सोडून जातात, त्या लोकांची मोठी चुकी होते असें सिद्ध करून देतां येईल. असें पहा, जीविताच्या नियमांचें ज्ञान इतर सर्व ज्ञानांमध्यें अत्यंत महत्वाचें आहे, हें हळू हळू प्रत्येकाच्या लक्षांत आलेंच पाहिजे; बरें हे जीविताचे नियम शारीरिक आणि मानसिक कृत्यांसच व्यापून राहतात असें नाहीं, तर घरदार, रस्त्यांतील व्यवहार, व्यापार, राज्यप्रकरण, नीति वगैरे गोष्टींशीं त्यांचा गर्भित रीतीनें संबंध पोंहोचतो; आणि ह्मणून हे जीविताचे नियम समजल्याखेरीज स्वकीय किंवा सार्वजनिक कामामध्यें आपणांस आपली वर्तणूक बरोबर रीतीनें ठेवितां

येणार नाहीं. सरतेशेवटीं आपल्या हेंही लक्षांत येईल कीं, सर्व सेन्द्रिय-सृष्टपदार्थांसही वस्तुतः हेच जीविताचे नियम लागू आहेत, व अगदीं साध्या साध्या गोष्टींशीं ह्यांचा संबंध कसा पोंचतो, ह्याचें ज्ञान आधीं प्राप्त करून घेतल्याखेरीज विशेष भानगडीच्या गोष्टींस ते कोणत्या रीतीनें लागू पडतात, हें आपणांस नीटपणें समजणार नाहीं. बरें ही गोष्ट लक्षांत आल्यावर आपल्या हेंही लक्षांत आलें पाहिजे कीं, ज्याअर्थीं मुलांस घराबाहेरील गोष्टींची माहिती मिळविण्याची मोठी उत्सुकता असते, त्याअर्थीं ती माहिती मिळविण्याच्या कामांत त्यांस मदत केल्यानें, व लहानपणीं असाच क्रम चालविण्याची त्यांस संवय लावून उत्तेजन दिल्यानें पुढील सर्व अभ्यास शिस्तवार रीतीनें चालविण्यास जरूर ती माहिती कांहीं अंशीं मिळवून दिल्यासारखीच होते, व पुढें त्यांस आपले सर्व व्यवहार बरोबर रीतीनें चालवितां येण्यांस जे शास्त्राचे विशेष नियम अवगत असले पाहिजेत, त्यांचेंही ज्ञान त्यांत ह्याच माहितीच्या योगानें पाहिजे तसें सहजीं होतें.

मुलांचा विद्याभ्यास चालला असतां, त्यांच्याकडून चित्रकलेचाही थोडथोडा अभ्यास करविला पाहिजे, असें आतां दिवसानुदिवस लोकांच्या मनांत बरेंच वागूं लागलें आहे, ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे; कारण मनास कोणत्या रीतीचें शिक्षण असलें पाहिजे, हें आतां लोकांस समजूं लागलें आहे, असें ज्या गोष्टींवरून आपण मानितों, त्या गोष्टींपैकींच ही एक गोष्ट आहे असें ह्मणण्यास कांहींएक हरकत नाहीं. सृष्टिक्रम ज्या क्रमाचें अवलंबन करण्यास आपणांस नेहमीं सांगत असतो, त्याच क्रमाचें अवलंबन आतां शिक्षक करूं लागले आहेत, हें ही येथें एकवार सांगितलें पाहिजे. मुलें नुसत्या स्लेटपाटीवर किंवा कागद व शिशाची पेन्सील त्यांस मिळाल्यास शिशाच्या पेन्सिलीनें कागदावर, सभोंवतालच्या लोकांचीं, घरांचीं, झाडांचीं, किंवा प्राण्यांचीं कशीं आपण होऊन चित्रें काढीत असतात, हें नेहमीं सर्वांच्या पाहण्यांत आहेच. त्यांस एखाद्या चित्रांच्या पुस्तकांतील कोणी चित्रें दाखविलीं, तर मोठीच मौज वाटते; आणि लोकांचें अनुकरण करण्याकडे त्यांचा विशेष कल असल्यामुळें त्यांच्याही मनांत स्वतः चित्रें काढण्याची सहजीं इच्छा उत्पन्न होते. ह्याप्रमाणें ज्या ज्या चमत्कारिक वस्तु तीं पाहतात त्यांचीं चित्रें काढण्याचा तीं प्रयत्न करीत गेल्यामुळें, त्यांचे ज्ञानेन्द्रियांस सहजीं जास्त जास्त शिक्षण मिळत असतें; व अशा

प्रकारें कोणत्याही गोष्टीकडे पूर्णपणें लक्ष लावून तिचें यथार्थ निरीक्षण करण्याचें सामर्थ्य त्यांचे आंगीं येतें. ह्याप्रमाणें पदार्थांचे इंद्रियद्वारा कळून येणारे धर्म आपण कसे शोधून काढीत आहों, ही गोष्ट आमच्या नजरेस आणून आणि स्वतां चित्रें काढण्याच्या कामास लागून, त्यांस ज्या शिक्षणाची मुख्यत्वें करून गरज असते, तेंच शिक्षण तीं आह्मांजवळ मागत असतात असेंच ह्मणावयाचें नाहीं काय ?

ज्याप्रमाणें आतां शिक्षक सृष्टिक्रमाच्या सूचनांस अनुसरून मुलांकडून त्यांचा विद्याभ्यास चालला असतां चित्रकलेचा अभ्यास करवूं लागले आहेत, त्याचप्रमाणें ते जर चित्रकला शिकाविण्याच्या कामींही सृष्टिक्रमाच्या सूचनांस अनुसरूं लागतील, तर त्यापासून पुष्कळ फायदा होईल असें आह्मांस वाटतें. मुलें प्रथमतः कशाचीं चित्रें काढूं लागतात? मोठमोठ्या वस्तु, चित्र विचित्र रंगाचे पदार्थ, ज्या वस्तूंपासून त्यांस कांहीं आनंद झाला असेल अशा वस्तू, ज्या मानवी प्राण्यांपासून तीं आपले सर्व मनोविकार शिकतात ते मानवी प्राणी, गाई कुत्रे ज्यांचे निरनिराळे उपयोग पाहून जीं त्यांस आवडूं लागतात, जीं घरें तीं नेहमीं पाहतात, व ज्यांचा आकार आणि निरनिराळे भाग पाहून त्यांस अचंबा वाटतो अशीं घरें, वगैरे वस्तूंचीच मुलें प्रथमतः चित्रें काढूं लागतात. बरें ह्या चित्रकलेंतील कोणती कृति करितांना त्यांस विशेष आनंद वाटतो? अर्थात् रंग देण्याची; रंग देण्यास दुसरें कांहीं नच मिळेल, तर नुसता कागद आणि शिशाची पेन्सिलही त्यांस पुरते. परंतु रंगाची पेटी, आणि रंग देण्याचें कलम, हीं मिळालीं तर मग मात्र त्यांच्या आनंदास पारावारच नाहीं. लागलेंच त्यांस आकृतीच्या रेषा मारणें ह्मणजे रंग देण्यापेक्षां कमी महत्वाचें काम असें वाटूं लागतें; आणि पुढें रंग द्यावयाचा असतो ह्मणूनच तीं मर्यादेच्या रेषा मारण्याचें काम करितात. आतां जे शिक्षक पहिल्यानें मुलांस केवळ रेषांच्या योगानें आकृति काढण्यास लावून नंतर रंग भराविण्यास शिकवितात, त्यांस वरील प्रकार चमत्कारिक दिसेल खरा; परंतु आमची अशी समजूत आहे कीं हाच मार्ग खरा आहे. मुलांस आकाराच्या पूर्वी रंग कळूं लागतात ही गोष्ट मानसशास्त्राच्या नियमास अनुसरूनच आहे. असें आह्मीं पूर्वीच सांगितलें आहे. तर मुलांस आकार काढण्यास शिकविण्याचे पूर्वी रंग भरण्यास

शिकविलें पाहिजे. चित्रें काढविण्याचीं तीं प्रत्यक्ष वस्तु दाखवून ह्यांप्रमाणें काढविलीं पाहिजेत, वगैरे गोष्टी आपण पहिल्यापासून लक्षांत ठेविल्या पाहिजेत. मुलांसच काय, परंतु बहुतेक जाणते मनुष्यांस सुद्धां उत्तम रंग पाहून किती आनंद होतो ही गोष्ट सर्वांस माहीतच आहे; आणि ह्मणून कठीण आणि दिसण्यांतही चांगल्या नाहींत, अशा आकृति मुलांस काढण्यास शिकविण्याचें असल्यास, त्या आकृतींस पुढें रंग भरावयाचा आहे हीच गोष्ट उत्तेजनार्थ ह्मणून त्यांस आधीं सांगून दिली पाहिजे; पहिल्यानें रेषा काढतांना त्यांस कंटाळा न यावा ह्मणून ह्यानंतर रंग भरण्याचें मौजेचें काम यावयाचें आहे अशी त्यांस आधींच आशा लावून दिली पाहिजे. ह्याप्रमाणें ज्या वस्तु दिसण्यांत मोठ्या नोजेच्या असतात, त्या वस्तूंचीं चित्रें काढण्याचा जो मुलांचा उद्योग सुरू असतो त्यास उत्तेजनच देत गेलें पाहिजे; पुढें एकदां त्यांचा हात बसत चालला, ह्मणजे साध्या आणि नेहमींच्या पाहण्यांतल्या वस्तूंचींही चित्रें तीं आपणच होऊन मोठ्या हौसेनें काढूं लागतील; आणि असें चालतां चालतां प्रत्यक्ष वस्तूंमध्यें आणि त्यांच्या चित्रांमध्यें हळू हळू बरेंच साम्य येत जाईल. मुलें पहिल्यानें चित्रें काढावयास लागलीं ह्मणजे तीं फारच अस्पष्ट असून त्यांत मुळींच हुबेहुबपणा नसतो हें खरें, परंतु ही गोष्ट परिणतिवादाच्या एका नियमास अनुसरूनच आहे, आणि ह्मणून एवढ्यावरूनच त्यांच्या त्या पहिल्या चित्रांकडे दुर्लक्ष करितां कामा नये. त्या चित्रांचा आकार ओबड धोबड असला आणि त्यांवर रंगांचीं पुटें बसून तीं बिघडलीं असलीं तरी हरकत नाहीं; कारण ह्यावेळीं मुलांचीं चित्रें चांगलीं उतरलीं आहेत किंवा नाहींत हें आपणांस पहावयाचें नसतें, तर मुलांचा हात व नजर बसत चालली आहेत किंवा नाहींत एवढेंच पहावयाचें असतें. मुलांस प्रथमतः आपलीं बोटें आपल्या स्वाधीन ठेवतां येऊन हुबेहुबपणा ह्मणजे काय याची कल्पना आली ह्मणजे पुरे आहे व ही गोष्ट साधण्यास वर लिहिलेली पद्धतच उत्तम होय; कारण हेंच करण्याकडे मुलांचा स्वाभाविकपणें कल असतो, व त्यांत त्यांना आनंदही वाटतो. मुलें अगदीं लहान असतांना त्यांस शिस्तवार रीतीनें चित्रें काढण्यास शिकवितां यावयाचें नाहीं हें खरें; परंतु एवढ्यावरूनच तीं आपण होऊन जर चित्रें काढावयास लागलीं तर त्यांस आपण "खबरदार चित्रें काढाल तर"

असें ह्मणावें किंवा त्यांस कोणत्याही प्रकारची मदत करूं नये हें कधीं वाजवी होणार नाहीं. उलट याप्रमाणें तीं आपल्या ज्ञानेन्द्रियांचा आणि आपल्या हातांचा योग्य रीतीनें कसा उपयोग करून घ्यावा, हें शिकत आहेत असें समजून, त्यांस शाबासकी देऊन त्यांस नीट मार्गास लावून देणें हेंच आपलें कर्तव्य आहे असें आह्मांस वाटतें. कांहीं स्वस्त अशा लांकडी आकृति जर त्यांस रंगविण्यास देत गेलें, किंवा साध्या नकाशावर देशांच्या मर्यादेचे रंग वगैरे जर त्यांच्याकडून भरवीत गेलें, तर त्यांस सहजीं रंगाचें ज्ञान होऊन जाईल तें जाईलच, आणि शिवाय त्यांस पदार्थांचे व देशांचे आकारांची व रंग भरतांना कलम कसें सारखें चाललें पाहिजे वगैरेचीही थोडीबहुत माहिती सहजीं करून देतां येईल. मुलांस कशीं बशीं तरी चित्रें काढण्याचा जो स्वाभाविक नाद असतो त्यास आड न येतां जर तो तसाच चालूं दिला, तर पुढें तीं चित्रकला शिकण्यासारखीं मोठीं झालीं, ह्मणजे त्यांच्या आंगीं आधींचीच कांहीं तयारी आहे असें तुह्मांस आढळून येईल; परंतु वर सांगितल्याप्रमाणें जर आपण बंदोबस्त ठेविला नाहीं, तर त्यांच्या आंगांत ही तयारी कधींही यावयाची नाहीं व अशा रीतीनें वेळाकडून तोटा होऊन गुरु आणि विद्यार्थी या उभयतांस विनाकारण त्रास मात्र पडेल.

आह्मीं जें वर सांगितलें आहे त्यावरून प्रत्येकाच्या सहजीं लक्ष्यांत येईल कीं, चित्राचे नमुने घेऊन त्यांवरून चित्रें काढण्याची चाल आह्मांस बिलकूल पसंत नाहीं. तसेंच कित्येक शिक्षक सरळ, वक्र, मिश्ररेषा ह्यांच्या व्याख्या सांगून त्या काढण्यास मुलांस अगदीं पहिल्यानेंच शिस्तवार रीतीनें शिकवूं लागतात ही तरी चाल अत्यंत अप्रयोजक आहे असें आह्मी समजतों. इंग्लंडमध्यें कलाशिक्षणाच्या संबंधानें जी एक पुस्तकमाला प्रसिद्ध झाली आहे तींत चित्रकलेस कसा प्रारंभ करावा अशाविषयीं जें एक पुस्तक आहे त्यांत जे नियम घालून दिले आहेत, ते तर अगदीं गैर आहेत असें आह्मांस वाटतें. कलाशिक्षणावर ह्मणून प्रसिद्ध केलेल्या स्वतंत्र पुस्तकांची अशी स्थिति असावी ही खरोखर मोठ्या दिलगिरीची गोष्ट आहे. ह्या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत असें सांगितलें आहे कीं, पुस्तक करण्याचा उद्देश विद्यार्थ्यांस सुलभ आणि शास्त्रीयरीत्या चित्रकलेमध्यें शिक्षण मिळावें असा आहे; व हा उद्देश साधण्यासाठीं प्रथमतःच त्यामध्यें कांहीं गोष्टींच्या

व्याख्या दिल्या आहेत त्या अशाः-" एका बिंदूपासून दुसऱ्या बिंदूपर्यंत काढलेली वारीक खुणा तीस साधी रेषा झणावें. रेषांचे त्यांच्या स्वरूपावरून दोन वर्ग केले आहेत. अ आणि ब या दोन बिंदूंमधील अगदीं कमींत कमी अंतर दाखविणारी जी खुणा तीस सरळ रेषा झणावें. ज्या खुणा क ड या दोन बिंदूंमधील अगदीं कमींतकमी जें अंतर असेल तें दाखवीत नाहींत त्या वक्ररेषा होत." अशाच प्रकारें क्षितिजसमसूत्र रेषा, लंबरेषा, तिर्कस रेषा, निरनिराळ्या जातींचे कोन, आणि रेषा व कोन ह्यांच्या योगानें होणाऱ्या निरनिराळ्या आकृति ह्यांच्या व्याख्या दिल्या आहेत; झणजे हें पुस्तक आकृतींचें एक व्याकरणशास्त्रच आहे; व त्यांत कांहीं पाठही दाखल केले आहेत. ह्याप्रमाणें मूलतत्त्वांचें निवळ पृथक्करण करून विषय शिकविण्यास प्रारंभ करण्याची रीति, जी भाषा शिकविण्याचे कामांत अगदीं निरुपयोगी ठरली आहे, तिचाच चित्रकला शिकविण्याचे कामीं उपयोग करावयाचा आहे असेंच झणाना! अनिश्चित गोष्टी आधीं न शिकतां निश्चित गोष्टीच आधीं शिकल्या पाहिजेत; धर्मांचें ज्ञान होण्यापूर्वी धर्मांचें ज्ञान आधीं झालें पाहिजे; अनुभवजन्य ज्ञान होण्यापूर्वी शास्त्रीयरीत्या सर्व सिद्धांत आपणांस समजले पाहिजेत. झणजे ह्या पद्धतीचा नेहमींच्या खऱ्या पद्धतीशीं अगदीं व्युत्क्रमभाव आहे हें सांगावयास नकोच. कोणतीही भाषा शिकविण्यास प्रारंभ करण्यापूर्वी शब्दांच्या जाति आणि त्यांचीं लक्षणें हीं मुलांकडून आधीं धोकविलीं पाहिजेत असें कित्येक लोक झणतात; परंतु ह्या रीतीविषयीं एकानें असें झटलें आहे कीं चालावयास शिकविण्यापूर्वी आधीं पायांच्या शिरा, आणि धमन्या, वगैरेची शिस्तवार माहिती करून देणें ह्यामध्यें जितका अर्थ आहे तितकाच ह्या वरील रीतीमध्यें आहे, आणि चित्रकला शिकण्या पूर्वी वस्तूंचा आकार ज्या रेषांनीं होत असेल त्या रेषांचीं नांवें आणि लक्षणें आधीं सांगून देणें, ह्या रीतीमध्यें तरी कांहीं जास्त अर्थ असेलसें दिसत नाहीं. ह्या विशेष भानगडी कंटाळवाण्या आहेत, आणि त्यांची कांहीं जरूरीही दिसत नाहीं. ह्या भानगडीच्या योगानें प्रारंभींच या अभ्यासाची गोडी नाहींशी होते. बरें शिवाय ज्या गोष्टी केवळ संवयीनें आपोआप येण्यासारख्या आहेत, त्या मुद्दाम शिकण्यासाठीं हें सर्व करावयाचें. ज्याप्रमाणें मुलांस प्रचारांतील शब्दांचे अर्थ लोकांचें बोलणें वगैरे ऐकून सहजीं समजूं लागतात, त्यांस कधीं कोश चाळावयाचें

प्रयोजन पडत नाहीं, त्याचप्रमाणें पदार्थ, तसबिरी, चित्रें वगैरेविषयीं लोकांचीं बोलणीं ऐकूनच हे सर्व शास्त्रीयशब्द त्यांस भ्रम व त्रास न पडतां सहजीं कळूं लागतील. बरें हेच शब्द पहिल्यानेंच शिकणें ह्मणजे त्यांत कांहीं गूढ आहे असें त्यांस वाटूं लागतें, व तें शिकण्याचा त्यांस कंटाळाही येतो.

शिक्षण कसें असलें पाहिजे अशाविषयीं जे पूर्वी साधारण नियम घालून दिले आहेत, त्यांस अनुसरून चालावयाचें असेल तर मुलांस चित्रकला शिकाविण्याचा प्रारंभ त्यांचे लहान पणींचे चित्रें काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत तोंच केला पाहिजे. मुलें लहानपणीं चित्रें काढूं लागलीं ह्मणजे त्यांस उत्तेजन दिलें पाहिजे असें आह्मीं पूर्वी ह्मटलेंच आहे. तीं आपण होऊन चित्रें काढावयास लागलीं, सवयीनें त्यांचा हात कांहींसा बसल्यासारखा झाला, व त्यांस प्रमाण ह्मणजे काय हें साधारणपणें कळूं लागलें, ह्मणजे मूर्त पदार्थांचीं प्रकाशामध्यें तीन परिमाणें दिसून येतात अशी त्यांस ढोकळ मानानें एक कल्पना करितां येईल. नंतर मूर्त पदार्थ कागदावर काढून दाखविण्याचे त्यांचे प्रयत्न वारंवार फसत गेले, आपणांस काय शिकावयाचें आहे हें त्यांस साधारणपणें समजूं लागलें, व तें शिकण्याची त्यांच्या मनांत एकदां इच्छा जागृत झाली, ह्मणजे यथादर्शनचित्रलेखनविद्या शास्त्रीयरीतीनें शिकवितांना ज्या यंत्रांचा कधीं कधीं उपयोग करितात, त्याच यंत्रांच्या साहाय्यानें त्यांस त्या विद्येचें ढोकळ मानानें ज्ञान करून देण्यास फार सुलभ जाईल. हें वाचून पुष्कळांस अचंबा वाटेल हें खरें, परंतु वरील कृति साधारण समजुतीच्या मुलांस कळण्यासारखी अहून ती त्यांस मोठ्या गमतीची वाटण्याजोगी आहे असा आमचा अनुभव आहे. एक कांबेची तबकडी मेजावर लंबरेषेनें उभी राही अशी घेऊन मुलांपुढें ठेवावी व तिच्या दुसऱ्या बाजूस एखादें पुस्तक किंवा असाच एखादा साधा मूर्त पदार्थ ठेवावा, नंतर नजर न फिरवितां त्यांस त्या पदार्थाचे कोपरे आपल्या नजरेस न पडावे ह्मणून त्या तबकडीवर त्या पदार्थाचे कोन दिसत असतील त्या ठिकाणीं शाईचे-ठिपके मारण्यास सांगावें. नंतर त्यांस ते ठिपके रेषांनीं सांधण्यास सांगावें; असें केल्या नंतर त्यांस असें दिसून येईल कीं, आपण काढलेल्या रेषांच्या योगानें तो पदार्थ आपणांस दिसत नाहींसा होतो किंवा त्या आ-

पण काढलेल्या रेषाच त्या पदार्थाच्या आकृतिरेषा होत. मग त्या तबकडीच्या दुसऱ्या बाजूस एक कागद धरून त्यांस पाहण्यास सांगावें, म्हणजे त्यांस असें दिसून येईल कीं, आपण काढलेल्या रेषांनीं तो पदार्थ आपल्यास ज्या प्रमाणें दिसतो त्याप्रमाणें दाखविला जातो;नंतर त्यांच्या असेंही लक्षांत येईल कीं, त्या रेषा त्या पदार्थासारख्या केवळ दिसतात इतकेंच नव्हे, तर आपण त्या पदार्थाच्या आकृतीच्या रेषांस जमत अशाच रीतीनें काढलेल्या असल्यामळें त्यांनीं तो पदार्थ दाखविलाच पाहिजे. मग कागद एकीकडे करून त्यांस आपली खात्रीही करून घेतां येईल कीं, त्या रेषा त्या पदार्थाच्या मर्यादेच्या रेषांशीं खरोखरच जमतात. ह्याप्रकारें नवीन व चमत्कारिक ज्ञान झालेंसें वाटतें; व ह्याच्या योगानें एका पातळीमध्यें अमुक लांबीच्या रेषा अमुक दिशांनीं काढिल्या असतां, त्यांच्या योगानें दुसऱ्या पातळीमधील अमुक लांबीच्या किंवा अमुक दिशांनीं काढिलेल्या रेषा दाखवितां येतात या गोष्टीचा त्यांस प्रत्यक्ष अनुभव येतो; पुढें त्या पदार्थाचें हळु हळु स्थित्यन्तर करीत गेलें तर कांहीं रेषा कशा कमी कमी होत जाऊन दिसेनाशा होतात व कांहीं कशा वाढत जाऊन दृश्य होत जातात हेंही त्यांच्या अनुभवास आणून देतां देईल; तसेंच समांतर रेषांचें एककेन्द्राभिसारित्व वगैरे यथादर्शनचित्रलेखनविद्येच्या मुख्य मुख्य गोष्टी ह्याचप्रमाणें त्यांस प्रत्यक्ष अनुभवानें सिद्ध करून दाखवितां येतील. सर्व कांहीं स्वतःआपणच करावयाचें अशी त्यांस संवय असली, तर त्यांस एकदां सुचवून दिलें कीं, कोणताही पदार्थ केवळ नजरेनेंच पाहून त्याच्या आकृतीच्या रेषा ते कागदावर मोठ्या आनंदानें काढूं लागतील; नंतर आतांच कांचेच्या तबकडीवर काढलेल्या आकृतीप्रमाणें होईल तितकें करून दुसऱ्याच्या मदतीशिवाय आपण दुसरी आकृति काढावी अशी त्यांस सहजीं ईर्ष्या आल्याखेरीज राहवयाचीच नाहीं. ह्याप्रमाणें दुसऱ्यानें काढलेल्या चित्रांचे नमुने घेऊन केवळ अडाणी रीतीनें चित्रें काढण्याच्या ऐवजीं साध्या, मनोवेधक, व फार गूढ नसून जींत बुद्धीचा उपयोग करण्याचें कारण पडतें अशा रीतीनें मूर्त पदार्थांचे देखावे रेषांनीं कसे दाखवितां येतात हें त्यांस समजूं लागून ते स्वतः काढून दाखविण्याचें सामर्थ्य त्यांचे आंगीं हळूहळू येत जातें. या रीतीपासून दुसरेही अनेक फायदे आहेत. विद्यार्थ्यांस

या एवढ्या लहान वयामध्यें चित्र ह्मणजे डोळा आणि पदार्थ ह्यांमधील पातळीमध्यें ते पदार्थ आणले असतां ते कसे दिसतात हें रेषांनीं काढून दाखविणें होय हें यथार्थ ज्ञान थोड्या श्रमानें होतें. व पुढें विद्यार्थी यथादर्शनचित्रलेखनविद्येचा शास्त्रीय रीतीनें अभ्यास करण्याच्या बेतांत येतो तों आधींच त्यास त्या शास्त्राचीं मूलतत्वें पूर्णपणें माहीत असतात.

भूमितिशास्त्राच्या मूलतत्वांची माहिती करून देण्यास योग्य रीति कोणती हें वाईझ साहेबांच्या एका प्रसिद्ध ग्रंथामध्यें एका ठिकाणीं फार उत्तम रीतीनें सांगितलें आहे. ह्मणून तो उतारा येथें दिल्याशिवाय आमच्यानें राहवत नाहीं;—"मुलांस अंकगणिताचा अभ्यास चालला असतां घन आकृतींचा उपयोग करण्याची संवय असतेच. तर भूमितिशास्त्राचीं मूलतत्वें त्यांस शिकवितांनाही घन आकृतीचाच आपण उपयोग करावा. नेहमींच्या पद्धतीस सोडून मी तर घन आकृतींवरून त्यांस भूमिति शिकविण्याची सुरवात करीन. असें केल्यानें भलत्या भलत्या व्याख्या देण्याचें व बिंदु रेषा व पातळी ह्यांविषयीं कांहीं तरी गूढ रीतीनें लटपट करून सांगून देण्याचें कारण पडत नाहीं. घन आकृतींमध्यें भूमितिशास्त्राचीं मुख्य तत्वें दिसून येतात. त्यांमध्यें बिंदु, सरळ रेषा, समांतर रेषा, कोन, समांतरभुजचौकोन वगैरे सर्व कांहीं प्रकार दिसून येतात. ह्या घन आकृतींचे पुष्कळ तुकडेही करून दाखवितां येतात. विद्यार्थ्यास ह्या तुकड्यांची अंकगणितामध्यें ओळख झालेली असतेच. आतां तो त्यांचे निरनिराळे भागांची तुलना करून त्यांमधील परस्पर प्रमाणें समजून घेण्याच्या प्रयत्नास लागतो. या नंतर तो गोलाकृतींकडे वळतो व नंतर त्यास त्यांवरून वर्तुळ व एकंदर वक्ररेषा यांची थोडी थोडी कल्पना येत जाते. याप्रमाणें घन आकृतींची थोडीशी ओळख झाली ह्मणजे त्यांनें पातळींची माहिती मिळविण्यास लागावें, ब हें अगदीं सुलभ रीतीनें करितां येईल. घन आकृतींचे पातळ तुकडे कापावे व ते कागदावर मांडावे, नंतर जितके तुकडे केले असतील तितके त्यास तेथें काटकोन चौकोन दिसून येतील. असेंच इतर आकृतींच्या संबंधानेंही करितां येईल. ह्याप्रमाणें त्यास पातळ्या कशा उत्पन्न होतात हें कळून येईल, आणि कित्येक भरींव आकृतींपासून त्यास सहज रीतीनें पातळ्या काढितां येतील. गोलांचीही अशाच प्रकारें व्यवस्था करून दाखवितां

येईल, आणि प्रत्येक भरींव आकृतीपासून त्यास सहज रीतीनें पातळ्या काढितां येतील. इतकें झालें झणजे त्यास भूमितीचीं मुळाक्षरें समजून त्यास तीं वाचतां येऊं लागलीं असें समजावें. नतर विद्यार्थी तीं मुळाक्षरें काढावयास शिकूं लागतो. ह्या पातळ्या कागदावर ठेवून त्यांच्या भोंवतीं पेन्सिल फिरविण्याची कृति अगदीं सोपी आहे, आणि झणून ह्याच कृतीचा पहिल्यानें उपयोग करविला पाहिजे. असें बरेच वेळां केल्या नंतर पातळी जरा दूर धरून ती पाहून त्याप्रमाणेंआकृति काढण्यास त्यास सांगावें व पुढेंही असाच क्रम ठेवावा.

ह्याप्रमाणें वाईझ साहेबांनीं सांगितलेल्या रीतीनें भूमितीच्या मूलतत्वांची माहिती झाल्यावर पुढें काढलेल्या आकृति कशा काय बरोबर उतरल्या आहेत हें नजरेनें पाहण्याची वहिवाट सुरू करावी; अशा रीतानें त्या आकृति आपणांस अगदीं बरोबर काढितां याव्या अशी इच्छा मनांमध्यें जागृत केली जाऊन हें साधण्यास काय अडचणी येतात हेंही विद्यार्थ्याच्या चांगल्या रीतीनें लक्षांत आणून देतां येईल. घरांचे पाये, जामनी ह्यांचीं बरोबर मापें घेण्याच्या ज्या कारागीर वगैरे लोकांच्या रीति आहेत त्यांपासूनच भूमितीची उत्पत्ति असली पाहिजे याविषयीं बिलकुल संशय नाहीं. आणि "भूमिति" या शब्दावरून तरी असेंच दिसतें. भूमितीचे सिद्धांतही सिद्ध करून ठेविले यांत तरी त्यांचा साक्षात् ताबडतोब उपयोग व्हावा एवढाच हेतु दिसतो. तर जे सिद्धांत मुलांस शिकवावयाचे तेही तशा प्रकारच्या गोष्टींचा संबंध आणून शिकविले पाहिजेत. सोंगट्यांच्या पटाचीं घरें पाडणें, रंग भरण्यासाठीं तऱ्हेतऱ्हेच्या आकृति काढणें व अशाच प्रकारचीं नानातऱ्हांचीं उपयुक्त कामें शिक्षकांनीं आपल्या कल्पनेनें काढून विद्यार्थ्यास एखाद्या घर बांधण्यास शिकणाऱ्या मनुष्याप्रमाणें त्यामध्यें बराच वेळ गुंतवून मेहनत करविण्यास लाविलें तर त्यापासून उपयोग झाल्याखेरीज रहावयाचा नाहीं. नंतर त्यास अनुभवाअंतीं असें कळून येईल कीं, केवळ आपल्या इंद्रियांच्या साहाय्यानें आपले इष्ट हेतु साधणें कठीण आहे. त्याच्या इंद्रियांस हें महत्वाचें शिक्षण मिळून कंपासाचा उपयोग करण्यासारखा तो झाला व नजरेनें काढिलेलीं अनुमानें त्यास ताडून पाहतां येऊं लागलीं तरी सुद्धां त्यास तीं अनुमानें जवळ जवळ बरोबर आहेत इतकेंच कायतें समज-

तें. तीं अगदीं बरोबर कशीं करावीं या अडचणीमध्यें तो अजूनही असतोच. या स्थितीमध्यें त्यास बराच वेळ अडूं द्यावें. कारण एक तर तो आधीं ह्यापुढील खुब्या समजण्यासारखा जाणता नसतो. आणि दुसरें अशा प्रकारचीं कांहीं योग्य साधनें पाहिजे आहेत, ही गोष्ट त्याच्या मनामध्यें नीटपणें बागूं लागणें इष्ट आहे. जर ज्ञानप्राप्त करून घेण्याचा मार्ग दिवसेंदिवस सुखावह होणें इष्ट असेल, आणि एकंदर जनसमूहाच्या बाल्यावस्थेमध्यें ज्ञानाचा प्रसार चालला असतां किंवा प्रत्येक मुलाचा लहानपणीं विद्याभ्यास चालला असतां शास्त्रीयविषयास महत्व द्यावयाचें तें केवळ त्यापासून कलाकौशल्याच्या उत्कर्षास उपयोग होतो म्हणूनच हें जर खरें असेल, तर भूमितीपासून ज्या कृत्यांस उपयोग होतो तीं कृत्यें करण्यामध्यें भूमिती शिकावयास लागण्यापूर्वी बराच वेळ घालविला पाहिजे हें उघड आहे. असें पहा कीं या कामामध्यें तरी सृष्टिक्रमच आपला गुरु होतो. मुलांस लहानपणीं कागदाचीं चित्रें कापणें, बांधकाम किंवा असेंच कांहीं काम करणें ह्यांचा फार नाद असतो; आतां हींच कामें करण्यास त्यांस आपण उत्तेजन देत गेलों व हीं कृत्यें कशीं करावीं हें त्यांस आपण सांगत गेलों, तर तीं शास्त्रीयविषयांचीं मूलतत्वें समजून घेण्याच्या मार्गास लागून हस्तकौशल्याचा गुण जो पुष्कळांचे अंगांत नसतो तो त्यांचे अंगीं वास करावयास लागेल.

विद्यार्थ्याची निरीक्षणशक्ति आणि कल्पनाशक्ति पाहिजे तशी चालते असें झालें, म्हणजे मुलांस प्रयोगरूपानें भूमिती शिकविण्यास लागावें. आरंभीं भूमितीचे प्रश्न त्यांस शास्त्रीयरीतीनें सिद्ध करण्यास न शिकवितां ते कांहीं विशेष कृतींनीं सोडविण्यास शिकविले पाहिजे. कोणतीही नवीन गोष्ट मुलांस शिकवावयास लागावयाचें म्हणजे त्या संबंधानें शास्त्रीयरीतीनें नियम घालून त्यांस अनुसरून प्रारंभ करण्यापेक्षां सांधि साधेल तेव्हां सहजीं ती थोडथोडी शिकविण्यास सुरवात करणें चांगलें; आणि प्रयोगरूपानें भूमिती शिकविण्यास सुरुवात करावयाची ती अशाच रीतीनें कारागिरीच्या कामाचा संबंध आणून केली पाहिजे. विद्यार्थ्यांस एक जाड कागदाचा तुकडा व एक भरीव समभुजत्रिकोनाकृति देऊन, त्यांस त्या कागदाचे तुकड्याचा एक दिलेल्या आकृतीप्रमाणें आकार बनविण्यास सांगावें. हें काम तो मोठ्या आनंदानें करण्यास लागेल,

आणि ह्मणून येथून प्रारंभ केला असतां, फार चागलें. हें तों करीत असतां त्यास असें आढळून येतें कीं, या कामासाठीं आपणांस निरनिराळे चार समभुजत्रिकोण विशेष दिशा साधून काढिले पाहिजेत. हें बरोबर रीतीनें काढण्याची त्यास योग्य रीति अवगत नसल्यामुळें त्याचे त्रिकोन जागच्या जागीं घातल्यावर त्याच्या बाजू परस्परांशीं मिळत नाहींत आणि त्याचें कोनही शिरोभागीं मिळावे तसे मिळून येत नाहींत, असें त्यास आढळून येतें, यावेळीं त्यास आपण असें दाखवावें कीं, एक वर्तुळाची जोडी काढली असतां या त्रिकोनांपैकीं प्रत्येक त्रिकोन एकदम अगदीं बरोबर रीतीनें रेखल्यासारखा आपणांस काढितां येतो; व आपणांस पाहिल्यानें तो काढितां येत नव्हता हें त्याच्या लक्षांत येऊन झालेलें ज्ञान मोठ्या महत्वाचें आहे असें त्यास वाटूं लागतें. याप्रमाणें एकदां त्यास भूमितीची रीति समजून देण्यासाठीं पहिला प्रश्न सोडवितांना मात्र मदत करावी; व पुढील सर्व प्रश्न त्यास येतील तसे स्वतः च सोडविण्यास लावावें. दिलेली सरळ रेषा दुभागणें, लंब काढणें, चौरस काढणें, दिलेल्या रेषेशीं समांतर रेषा काढणें, समषट्कोनाकृति काढणें वगैरे प्रश्न अगदीं त्यास थोड्या श्रमानें सोडवितां येतील. ह्यानंतर त्यास पुढें हळू हळू कठीण कठीण प्रश्न सोडविण्यास द्यावे. त्यास एखादा योग्य रस्ता लावून देणारा असला, तर तो ह्या सर्वांतून अगदीं दुसऱ्याच्या मदतीशिवाय खात्रीनें पार पडेल. खरोखर ज्यांचा विद्याभ्यास पूर्वीच्या शिक्षणपद्धतीप्रमाणें झाला असेल, त्यांस आमचें ह्मणणें खरें वाटावयाचें नाहीं. परंतु आह्मी ह्मणतों तें उगीच ह्मणत नाहीं; अशा संबंधाचीं आमच्या जवळ थोडीं थोडकीं उदाहरणें नाहींत; व आहेत तीं केवळ विशेष स्थितीसच लागू असणारीं आहेत असेंही नाहीं; आह्मीं मुलांचा असा एक वर्ग पाहिला आहे कीं, ज्यांना अशा प्रकारचे प्रश्न सोडविण्याची मोठी मौज वाटावी आणि आठवड्यामध्यें ज्या दिवशीं सिद्धांताचा धडा असेल त्याच दिवसाची त्यांनीं वाट पहात बसावें.नुकतेंच आह्मीं असें ऐकिलें आहे कीं, इंग्लंडांत एका मुलींच्या शाळेंतील कांहीं मुली घरीं भूमितीचे प्रश्न सोडवीत बसतात; व दुसऱ्या एका शाळेंत तर त्या इतकेंच करून राहत नाहींत, तर त्यांपैकीं एक मुलगी सुटीच्या दिवसांतही घरीं असे प्रश्न सोडविण्यास मागत असते. हीं दोन्हीं उदाहरणें येथील

प्रत्यक्ष गुरूंच्या मुखांतून पुष्कळांनीं ऐकिलीं आहेत. आपलें आपणांस शिकतां येतें व असें शिकल्यासून विशेष फायदाही आहे, ह्याविषयींचीं वरील चांगलीं ढळढळीत उदाहरणें आहेत. भूमितीचा विषय नेहमीं शिकवितात त्याच रीतीनें शिकविला असतां, तो अगदीं शुष्क आणि कंटाळवाणाही वाटतो. तोच विषय सृष्टिक्रम सांगतो त्या रीतीनें शिकाविला असतां फार गमतीदार होऊन जातो व त्यापासून आपणांस मोठा फायदाही होऊन जातो. अशा रीतीनें आपणांस भूमितीचें ज्ञान होतें तें होतेंच, परंतु शिवाय त्यापासून पुष्कळदां मनाचा बाणाही अगदीं बदलून जातो. शाळेंतील नेहमीं चाललेली कवाईत, गूढ व भानगडीचे नियम, कंटाळवाणे व घोकून घोकून पाठ करण्याचे धडे, इत्यादींच्या योगानें ज्यांची बुद्धि अगदीं मंद होऊन गेली आहे, त्यांस अशा रीतीनें केवळ ऐकण्याचे धनी होऊं न देतां, स्वतां विचार करून शोध चालविण्यास लाविलें तर त्यांच्या बुद्धीस एका प्रकारची विलक्षण स्फूर्ति प्राप्त होते. ह्या प्रमाणें मुलांस थोडेसें उत्तेजन मिळून वाईट शिक्षणाच्या योगानें त्यांचा झालेला हिरमोड जात चालला, आणि बुद्धि कशी चालते हें पाहण्याच्या प्रयत्नास तीं एकदां लागलीं ह्मणजे त्यांच्या मनाची वृत्ति पालटून जाऊन, त्यांचा सर्व स्वभाव अगदीं बदलून जातो. नंतर त्यांचा दुबळेपणा जाऊन आपल्या अंगीं कांहीं ताकद आहे असें त्यास वाटूं लागतें. त्यांच्या चाललेल्या प्रयत्नांमध्यें त्यांस हळू हळू यश येंत चाललें ह्मणजे त्यांच्या अंगांतील निराशेचा संचार नाहींसा होतो; नंतर तीं दुसरे आणखी प्रश्न आपण असेच खात्रीनें सोडवूं अशा उत्साहानें सोडविण्यास लागतात.

इंग्लंडांतील रायल इन्स्टिटयूशनमध्यें प्रसिद्ध विद्वान् टिन्डाल साहेब "पदार्थविज्ञानशास्त्राच्या अभ्यासाचें महत्व" या विषयावर व्याख्यान देत असतां, त्यानें आमच्या ह्मणण्यास चांगलें पुष्टीकरण येण्यासारखें बरेंच भाषण केलें. त्याच्या भाषणांतील आलेल्या गोष्टींचा त्यानें स्वतः अनुभव घेतला असल्यामुळें त्याच्या व्याख्यानाचा तेवढ्यापुरता उतारा घेतल्याशिवाय आमच्यानें राहवत नाहीं; तो असें ह्मणतो कीं, "एकदां मला एका वर्गास गणित शिकवावें लागत असे. तेव्हां माझ्या असें अनुभवास आलें कीं, युक्लीडचे सिद्धांत आणि प्राचीन भूमिति ह्यांचा अभ्यास मुलांकडून स्वतांची बुद्धि चालविण्याचें त्यांस भाग पडावें अशा

रीतीनें चालविला झणजे त्यांत त्यांचें चांगलें मन लागत असे. परंतु नेहमींची माझी अशी चाल असे कीं, पुस्तकांत आलेल्या ठरींव गोष्टींशीं मुलांचा संबंध न आणितां पुस्तकांत नाहींत असे नवीन प्रश्न स्वतां बुद्धि चालवून त्यांस सोडविण्यास लावावे. नेहमींचा मार्ग सुटल्यामुळें या नवीन रीतीचा त्यांस कांहींसा पहिल्यानें तिटकाराही आला; मुलांस आपण अगदीं नवीन मंडळींत गेलों आहों असें वाटत असे, परंतु पुढें एका मुलाच्याही मनांत हा तिटकारा राहिला नाहीं. जेव्हां ते अगदीं निराश होत, तेव्हां न्यूटन, इतर मनुष्य आणि मी ह्यांच्यामध्यें जो फरक दिसतो त्याचें मुख्यत्वेंकरून कारण माझा दीर्घ उद्योग हा होय, असें झणत असे, किंवा मिरावो नामक फ्रेंच तत्ववेत्ता आपल्या चाकरानें अमुक एक गोष्ट अशक्य आहे असें झटलें कीं, त्यास सांगत असे कीं, तो अजागळ शब्द पुन्हां कधीं मुखावाटे काढूं नको, ह्या व अशा इतर गोष्टी सांगून त्यांस मी उत्तेजन देत असें, व याप्रकारें त्यांस धीर दिला झणजे हंसून ते पुन्हां आपल्या कामास लागत. अजूनही त्यांच्या मनांत कांहीं थोडी कसर राहिलेली असे, परंतु त्यांच्या मुद्रेवरून पुन्हां प्रयत्न करावा इतका त्यांचा निर्धार झाल्यासारखें दिसून येत असे; आणि सरतेशेवटीं त्यांचा मुद्रा प्रफुल्लित होऊन त्यांनीं असें झणतांना मीं ऐकावें "हां समजलों", व त्यांस पुढें एवढा मोठा आनंद व्हावा कीं, त्याच्यापुढें न्यूटन यास गुरुत्वाकर्षणाच्या नियमाचा शोध लावल्यापासून झालेला आनंद कांहींच नाहीं. याप्रकारें आपल्यास बुद्धि आहे असें त्यांच्या मनांत एकदां वागूं लागल्यापासून मोठाच उपयोग झाला; मुलांच्या मनास उत्साह प्राप्त झाल्यामुळें वर्गाची सुधारणा अगदीं आश्चर्य करण्यासारखी होऊन गेली. मी वारंवार असें करीत असें कीं, मुलांस वाटेल तर त्यांनीं पुस्तकांतील सिद्धांत शिकावे, किंवा पुस्तकांत नाहींत असे सिद्धांत आपली बुद्धि चालवून त्यांनीं सोडवावे. परंतु एकही मुलगा पुस्तकांतील सिद्धांत सोडविण्याचें पसंत करीत नसे. जेव्हा जेव्हां मदतीची जरूर आहे असें मला वाटत असे तेव्हां तेव्हां मदत करण्यास मी तयार आहें असें झणें, परंतु मी कांहीं सुचवूं लागलों झणजे हटकून त्यांनीं नको नको असें झणावें.स्वतःची बुद्धि चालवून प्रश्न सोडविले असतां जो आनंद होतो,त्याची त्यांस गोडी लागली असल्यामुळें आपल्या बुद्धीनेंच प्रश्न सोड-

विण्यास त्यांनीं मागावे. त्यांनीं भिंतीवर, खेळाच्या जागीं, किंवा लांकडावर कोरून काढलेल्या आकृति, व दुसऱ्या अशाच त्यांस त्या विषयामध्यें अतिशय गोडी लागली आहे असें दाखविणाऱ्या अनेक गोष्टी मीं स्वतः पाहिल्या आहेत. मी ह्मणाल तर शिकविण्याच्या कामांत अगदीं नवखा होतों. मला या कामाचा अनुभव नव्हताच. ज्याला जर्मनलोक पंतोजीपणा ह्मणतात त्याविषयींचे नियम मला मुळींच माहीत नव्हते. परंतु मीं भाषणाच्या आरंभीं सांगितलेल्या तत्वांस अनुसरून भूमिति ही एक शिक्षणाचें साधन आहे, स्वतंत्र शिक्षणविषय नव्हे असें समजून आपला क्रम चालविला. मला त्या कामामध्यें यश आलें; आणि वर सांगितल्याप्रमाणें शिक्षणाचा क्रम ठेविल्यानें बुद्धीस उत्साह प्राप्त होऊन तिची वाढ किती जोराची होत जाते तें पाहून पुष्कळ वेळां मीं तासच्या तास अत्यानंदाच्या लहरीमध्यें घालविले आहेत."

प्रयोगरूपानें भूमिती शिकविण्याचें काम इतर विषयांबरोबरच पुष्कळ वर्षे चालूं द्यावें. त्यामध्यें सोडविण्याचे पुष्कळ प्रश्न असतातच व ह्मणून तसें करण्यास फारशी पंचाईतही पडावयाची नाहीं. प्रारंभीं ज्याप्रमाणें प्रत्यक्ष आकृति घेऊन आपण शिकविण्याचें काम चालवितों त्याचप्रमाणें पुढेंही तसाच क्रम चालविला असतां फार बरें. घनाविषयीं माहिती झाल्यानंतर अष्टसमभुजत्रिकोन, द्वादशसमपंचकोन वगैरे अधिक कठीण कठीण भरीव आकृति घेत जाव्या. आतां एकाच जाड्या कागदाच्या अशा आकृति करावयाच्या झटलें, तर अंगामध्यें मात्र पुष्कळच कुशलता असली पाहिजे. वरील आकृति बरोबरपणें साधल्यानंतर स्फटिकमण्याच्या नाना प्रकारच्या आकृति दिसून येतात, तिकडे आपण वळावें; उदाहरणार्थ, आपण कोन छाटलेली एक घनाकृति घ्यावी; त्यानंतर भरींव कोन आणि बाजूचे कोन छाटलेले आहेत अशी दुसरी एक घनाकृति घ्यावी; आणि त्याचप्रमाणें अष्टसमभुजत्रिकोन व दुसऱ्या अनेक भरींव आकृति, व वरच्या प्रमाणें कोन वगैरे छाटून त्यांपासून ज्या तऱ्हेतऱ्हेच्या आकृति होतात त्या सर्व एका मागून एक घेत जाव्या. ह्याप्रमाणें धातूंचे आणि क्षारांचे निरनिराळ्या आकाराचे तुकडे घेऊन ते आकार कागदाचे तुकड्यांनीं बनवीत गेल्यानें खनिजपदार्थशास्त्राच्याही मुख्य मुख्य गोष्टी आपणांस सहजीं कळूं लागतील.

अशा प्रकारच्या शिक्षणामध्यें बराच काळ गेल्यानंतर, शास्त्रीयरीत्या भूमिति शिकविण्यास मुळींच पंचाईत पडावयाची नाहीं हें सांगावयास नको. आकृति आणि प्रमाण यांमधील संबंधांविषयीं विचार करण्याची विद्यार्थ्यांस संवय असल्यामुळें, आणि अमुक अमुक कृति केल्यानें अमुक अमुक प्रकार घडून येतात, अशी त्यांस साधारण कल्पना असल्यामुळें त्यांस असें वाटूं लागतें कीं, युक्लीडचे सिद्धांत हे आपले नेहमींचे प्रश्न सोडविण्याचे कामीं उपयोग पडण्यासारखीं पाहिजे होतीं तीं साधनेंच आहेत. नंतर त्यांच्या बुद्धीस योग्य शिक्षण मिळाल्यामुळें ते ते सिद्धांत अनुक्रमें एका मागून एक शिकत जातात, व त्यांचा त्यांस उपयोगही कळूं लागतो. कधीं कधीं त्यांस आपण ज्या कृतींचा उपयोग करीत आहों, त्यांपैकीं कांहीं कृति अगदीं खऱ्या आहेत असें सिद्ध झालेलें पाहून मोठें समाधान होतें. ह्याप्रमाणें ज्यांची पूर्वीची तयारी नसते, त्यांस जो विषय अगदीं शुष्क वाटावयाचा, तोच विषय ते मोठ्या आनंदानें शिकत असतात. आतां इतकेंच सांगावयाचें राहिलें आहे कीं, असाच क्रम चालविल्यानें विद्यार्थ्यांच्या बुद्धीमध्यें विचार करून अगदीं नवीन सिद्धांत शोधून काढण्याचा जो अत्यंत महत्वाचा उद्योग तो उद्योग चालविण्याचें सामर्थ्य लवकरच आल्याशिवाय राहावयाचें नाहीं. चेंबरच्या ग्रंथांतील पुस्तकांच्या शेवटीं जे प्रश्न दिले आहेत, ते सोडविण्याचें त्यांच्या अंगीं सामर्थ्य येतें; आणि हे प्रश्न सोडविल्यानें त्यांचे बुद्धीची सुधारणा होत जाऊन त्यांचे नीतिसंबंधींही विचार सुधारत जातील.

यासंबंधानें आणखी असेंच कांहीं सांगत बसणें ह्मणजे शिक्षणावर एक लांबलचक निबंध लिहीत बसल्या सारखें होईल; परंतु तसें करीत बसण्याचा आमचा बेत नाहीं. लहानपणीं मुलांचे ज्ञानेंद्रियांस कोणत्या प्रकारचें शिक्षण असलें पाहिजे, प्रत्यक्ष पदार्थ दाखवून त्यांचे गुण आणि धर्म त्यांस कसे समजून द्यावे, चित्रकला आणि भूमिति ह्यांचें ज्ञान मुलांस कोणत्या प्रकारें करून द्यावें वगैरे गोष्टींविषयीं जें कांहीं आह्मीं सांगितलें तें सर्व पूर्वी सांगितलेल्या विशेष नियमांस अनुसरून शिक्षणपद्धति असणें ह्मणजे काय, हें केवळ नीटपणें लक्षांत आणून देण्यासाठींच होय. आह्मांस असें वाटतें कीं, विचार केला तर त्यामध्यें तरी सोप्या आणि अव्यक्त गोष्टींचें ज्ञानावरूनच कठीण आणि व्यक्त गोष्टींचें ज्ञान

करून देणें, धर्माच्या ज्ञानावरून धर्माचें ज्ञान करून देणें, व अनुभव-जन्य ज्ञानावरून शास्त्रीयज्ञान करून देणें असाच क्रम ठेविला आहे असें दिसून येईल. तसेंच एकदर लोकांमध्यें विद्येचा प्रसार ज्या रीतीनें होत जातो त्याच रीतीनें प्रत्येक व्यक्तिमात्रासही विद्या प्राप्त झाली पाहिजे; आपल्या शिक्षणपद्धतीमध्यें होतां होईल तितकें करून स्वशिक्षणाचाच भाग विशेष असून, ती सुखावह असली पाहिजे, वगैरे ज्या आणखी शर्ती आहेत, त्याही ह्यामध्यें भरून आल्या आहेत असेंही आढळून येईल. एकाच प्रकारच्या शिक्षणपद्धतीनें वरील सर्व शर्ती पुऱ्या केल्या जातात, ह्यावरून ती शिक्षणपद्धति व त्या शर्ती अगदीं योग्य आहेत अशा दोन्ही गोष्टी सिद्ध होतात. शिक्षणपद्धतीमध्यें अलीकडे ज्या सुधारणा होत आहेत, त्यांचा एकंदर कल पाहिला तर वरील शिक्षणपद्धति खरी असेंच सिद्ध होतें; हल्लीं शिक्षणपद्धतीमध्यें ज्या सुधारणा होत आहेत त्या अंशतः सृष्टिक्रमास अनुसरूनच आहेत; आणि आमची शिक्षणपद्धति तर सर्वस्वींच सृष्टिक्रमाचें अनुकरण करिते. वर सांगितलेल्या नियमांस अनुसरणें, मुलांची बुद्धि विकास पावत असतां त्यांचे जे कल दिसून येतात ते लक्षांत आणून ज्या गोष्टी करण्याकडे त्यांचें मन धांव घेत असेल त्या गोष्टी करण्यास त्यांस उत्तेजन देणें, सहजीं जे मनाचे व्यापार सुरू असतात त्यांस भर देऊन ते तसेंच चालू देणें, व सृष्टिक्रमानेंच ज्या सुधारणा होत असतात त्यांसच हातभार लावून त्या तशाच होऊं देणें इत्यादि गोष्टी आमच्या शिक्षणपद्धतीमध्यें पूर्णपणें दिसून येतात, आणि ह्यामुळेंच आमच्या शिक्षणपद्धतीचें आणि सृष्टिक्रमाचें वस्तुतः ऐक्य आहे असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. वरील सर्व गोष्टी मनांत आणिल्या ह्मणजे वर सांगितलेल्या शिक्षणपद्धतीचें खऱ्या शिक्षणपद्धतीशीं पुष्कळच साम्य आहे, असें मानण्यास भरपूर कारणें आहेत असें दिसून येईल.

पूर्वी जे आपण साधारण व्यापक नियम सांगून दिले त्यांपैकीं दोन नियम अत्यंत महत्वाचे असून ते पाळण्याविषयीं लोक फारच हयगय करितात. यास्तव हे नियम मनांत चांगले ठसावे ह्मणून त्यांविषयीं कांहीं थोडेंसें जास्त सांगणें जरूर दिसतें तें सांगून हा भाग आतां पुराच करूं. ते नियम कोणते ह्मणाल तर लहानपणीं, तरुण वयामध्यें, किंवा

जाणतेपणीं स्वशिक्षणाचा क्रम सुरू असला पाहिजे हा एक, आणि ह्याच्याच जोडीचा दुसरा नियम म्हणजे अभ्यास चालला असतां वस्तुतः मनाची वृत्ति सदोदीत आनंदित असावी. मानसशास्त्राच्या नियमांप्रमाणें सोप्या गोष्टींवरून कठीण गोष्टींचें, अव्यक्त गोष्टींवरून व्यक्त गोष्टींचें, धर्मीवरून धर्मांचें, ज्ञान करून देणें हाच क्रम असणें जरूर आहे, असें जर मानिलें, तर ज्ञान स्वतः संपादिलें पाहिजे व तें संपादीत असतां मनाची वृत्ति आनंदित असली पाहिजे, याच दोन गोष्टी मानसशास्त्राच्या नियमांप्रमाणें कृति चालली आहे किंवा नाहीं हें ताडून पाहण्याचीं साधनें होत. पहिल्या गोष्टीमध्यें मनाची वाढ ज्या नियमांनीं होते त्या नियमांचा, व दुसरीमध्यें मनाच्या वाढीस अनुकूळ अशा ज्या कृति आहेत त्यांचा, समावेश होतो. कारण आपल्या शिक्षणपद्धतीमध्यें जे विषय शिकवावयाचे त्यांचा क्रम जर असा ठेविला कीं ते विषय विद्यार्थ्यास एकामागून एक दुसऱ्याच्या मदतीवांचून शिकतां यावे तर तो क्रम मानसिकशक्ति ज्या क्रमानें विकास पावतात त्या क्रमास अनुसरून असला पाहिजे हें उघड आहे; आणि तसेंच हे विषय एकामागून एक क्रमानें शिकत असतां जर त्यास खरा आनंद होत असेल तर त्याच्या मानसिकशक्तींस विशेष ताण बसल्याखेरीज ते विषय त्यास शिकतां येतात हेंही उघडच आहे.

परंतु आपल्या बुद्धीची वाढ सहजींच होत जावी असा शिक्षणाचा बेत ठेविल्यानें, आपणांस जे विषय शिकावयाचे ते आपण योग्य क्रमानें शिकत जातों, एवढाच फायदा होतो असें नाहीं. तर त्यापासून आणखी दुसरेही फायदे आहेत. प्रथमतः त्याचे योगानें आपल्या मनावर जे संस्कार होतात ते स्पष्ट असून कधीं न जाण्यासारखे असतात. जें ज्ञान विद्यार्थ्यानें स्वतां मिळविलें असेल किंवा जो प्रश्न त्यानें स्वतः सोडविला असेल तें ज्ञान किंवा तो प्रश्न त्यानें स्वपराक्रमानें जिंकून आपलासा करून घेतलेला असतो, व ह्यामुळें तो जसा अगदीं वज्रलेप होऊन जातो, तसा दुसरा कोणत्याही रीतीनें व्हावयाचा नाहीं. कोणतीही गोष्ट स्वपराक्रमानें आपलीशी करून घेण्यास मनास पहिल्यानें पडलेले श्रम, बुद्धीची झालेली एकाग्रता, व ती गोष्ट आपलीशी झाल्यावर होणारा आनंद, यांच्या योगानें त्याच्या स्मृतिपटावर ती गोष्ट अगदीं नोंदून ठेविल्यासारखी हो-

ऊन जातें. बरें तींच गोष्ट शिक्षकाच्या तोंडून ऐकून किंवा शाळेंतील पुस्तकांमध्यें वाचून तो शिकला असला, तर तिच्या संबंधाचें त्याचें ज्ञान वर सांगितल्याप्रमाणें अगदीं पक्कें असें कधीं व्हावयाचें नाहीं. ती गोष्ट त्यास स्वतांच्या प्रयत्नानें जरी न समजली, तरी ती स्वतः समजून घेण्यासाठीं त्याच्या मानसिकशक्तींस जें ताण पडलेलें असतें, त्याच्या योगानें, शेवटीं जेव्हां ती गोष्ट त्यास समजून द्यावी, तेव्हां ती त्याच्या लक्षांत इतकी चांगली राहाते कीं तशी त्याच्याकडून आवृत्तीचीं एक दोन सप्तकें करवूनही ती रहाणार नाहीं. शिवाय असें पहा कीं, अशा प्रकारचें शिक्षण सुरू ठेवावयाचें झटलें झणजे जें ज्ञान आपण संपादन करीत जातों तें ज्ञान आपणांस नेहमीं व्यवस्थित ठेविलेंच पाहिजे; कारण खऱ्या रीतीनें ज्या गोष्टी आपण शिकतों व जीं अनुमानें आपण काढितों, त्या गोष्टी व तीं अनुमानें अशीं असतात कीं, त्यांच्याच आधारानें आपणांस अनुक्रमें पुढील सर्व अनुमानें काढावयाचीं असतात; झणजे तीं पुढील सर्व प्रश्न सोडविण्यास साधनीभूत होतात.विद्यार्थ्यानें काल जो प्रश्न सोडविला असेल त्याची मदत आजचा प्रश्न सोडविण्यामध्यें त्यास झाल्याशिवाय कधीं राहावयाचीच नाहीं. झाप्रमाणें जें ज्ञान आपण संपादिलें तें ज्ञान संपादल्याबरोबरच आपल्या मानसिकशक्तीचा एक भाग होऊन जातें, आणि त्याचा आपणास एकंदर विचार करण्याच्या कामामध्यें उपयोग होतो. बरें तेंच ज्ञान जर आपण घोकून शिकलों असलों तर तें ज्ञान स्मृतिपटावर केवळ लिहून ठेविल्या सारखें होऊन जातें. शिवाय आणखी एक गोष्ट लक्षांत ठेवण्या सारखी आहे ती अशीं कीं, असें नेहमीं स्वतां शिकत गेल्यानें आपणांस कांहीं विशेष गुणांचा लाभ होत जातो. प्रसंग पडला असतां अंगीं धैर्य आणणें, मनाची नेहमीं एकाग्रता राखणें, आपले प्रयत्न निष्फळ होत गेले तरी त्या कामीं सतत दीर्घ उद्योग सुरू ठेवणें, झाच गुणांचा विशेषेंकरून आपणांस पुढें संसारांत उपयोग होतो; आणि आझी झणतों त्याप्रमाणें मनाचें खाद्य मनास मिळविण्यास लाविल्यानें विशेषेंकरून हेच गुण आपल्या अंगामध्यें येतात. अशा रीतीनें शिक्षणाचा बेत ठेवणें कांहीं कठीण नाहीं अशाविषयीं हर्बर्ट स्पेन्सर आपला स्वतःचाच अनुभव सांगतात. ते असें झणतात कीं, मी लहानपणीं यथादर्शनचित्रलिखितविद्येमधील कांहीं बिकट प्रश्न अशाच रीतीनें सोड-

विले आहेत. शिवाय अनेक प्रसिद्ध विद्यागुरूंचींही अशींच मतें आहेत असें त्यानीं लिहून ठेविलेल्या वचनांवरून सिद्ध होत आहे. फेलेनबर्ग असें म्हणतो कीं, "विद्यार्थ्यानें दुसऱ्याच्या मदतीशिवाय स्वतंत्र रीतीनें चालविलेल्या उद्योगाची किंमत आपणांस गुरू म्हणविणाऱ्या पुष्कळ लोकांच्या बडबडीपेक्षां व लुब्रेपणापेक्षां फारच जास्त आहे". होरेसमन यांचें असें म्हणणें आहे कीं, "दुर्दैवेंकरून आपल्या प्रस्तुतच्या शिक्षणक्रमामध्यें मुलांस शिकण्याचा रस्ता लावून देण्यापेक्षां त्यास एकदम अमुक म्हणून सांगून देण्याचा भाग जास्त आहे." मार्सेलसाहेब तरी असेंच म्हणतो कीं, "विद्यार्थी स्वतः बुद्धी चालवून जें शिकतो, तें जें त्यास सांगावें त्याच्यापेक्षां त्याच्या ध्यानांत अधीक चांगलें रहातें."

या वरील गोष्टीच्या जोडीची दुसरी गोष्ट म्हटली म्हणजे आपली शिक्षणपद्धति अशी असावी कीं, शिकणें चाललें असतां मनाची वृत्ति सतत आनंदमय राहिली पाहिजे, व तीपासूनही आपणांस असेच अनेक लाभ होतात. पुढें होणाऱ्या फलांवर दृष्टि दिली तर अभ्यासाचे श्रम आपण आनंदानें घेऊं. परंतु तसें उपयोगाचें नाहीं; अभ्यासाची रीतिच अशी असली पाहिजे कीं तीमुळें अभ्यास करितांनाच आनंद वाटला पाहिजे. या अटीस अनुसरून आपली शिक्षणपद्धति ठेविली तर मानसशक्तीची जी स्वाभाविक वाढ चालत असते तीस आपल्या हातून हरकत होण्याचा संभव नाहींसा होतो, आणि शिवाय त्यापासून आपणांस प्रत्यक्षही मोठे लाभ होतात. आपणांस अगदीं कडकडीत यति बनून त्यासारखें सद्वर्तन (किंवा त्यास दुर्वर्तनही म्हटलें असतां चालेल) ठेवावयाचें असेल तर गोष्ट निराळी; परंतु तसें नसेल तर नेहमींच्या स्थितीमध्यें आपली लहानपणची आनंदवृत्ति कायम ठेवण्यास म्हटणें यांत कांहीं गैर दिसत नाहीं. याविषयीं आम्ही इतकेंच सांगून पुरें करितों कीं, मन ज्या वेळेस उदासीन किंवा कंटाळलेलें असेल, त्यावेळेस बुद्धीचा व्यापार सुरू ठेवण्यापेक्षां मन आनंदामध्यें असतां बुद्धीचा व्यापार सुरू ठेवणें फार चांगलें. ज्या गोष्टी आपण आनंदानें वाचितों, ऐकितों, किंवा पहातों, त्या, ज्या गोष्टी आपण मन उद्विग्न असतां वाचतों, ऐकतों किंवा पहातों, त्यांपेक्षां आपल्या ध्यानांत जास्त चांगल्या राहतात ही गोष्ट प्रत्येकास माहीत आहेच. पहिल्या स्थितीमध्यें आपल्या मानसिकशक्ति,

वाचनालय, सातारा.

विषय शिकावयाचा त्यामध्यें अगदीं गर्क होऊन जातात, दुसऱ्या स्थितीमध्यें त्या तशा गर्क होऊन जात नाहींत, आणि ह्मणून आपलें लक्ष इतर जास्त मनोवेधक गोष्टींकडे जातें; व ह्यामुळें पहिल्या स्थितीमध्यें मनावर जे संस्कार होतात ते चिरस्थायी असतात, आणि दुसऱ्या स्थितीमध्यें होणारे संस्कार केवळ तात्कालिक असतात. शिवाय कोणत्याही विषयामध्यें लक्ष लागत नाहींसें होऊन विद्यार्थी सतत उदासीन राहत गेला, ह्मणजे आपली ही खोडी एकदां जाईल कशी अशी त्याच्या मनांत भीति उत्पन्न होते; व अशी स्थिति झाली ह्मणजे त्याचें मन अगदीं उद्विग्न होऊन जातें, आणि ज्या विषयाचा त्याला तिटकारा असतो, अशा विषयामध्यें आपलें मन घालणें ह्मणजे त्यास अगदीं कठीण वाटूं लागतें. ह्यास्तव इतर सर्व गोष्टी अनुकूल असूनही आपलें शिक्षण बरें किंवा वाईट होणें हें आपलें शिकण्याचें काम आनंदानें किंवा त्रासानें जसें चाललें असेल त्यावरच अवलंबून राहील हें अगदीं उघड आहे.

शिवाय आपले नेहमींचे धंडे ज्याप्रमाणें आपण आनंदानें किंवा त्रासानें शिकत असूं, त्याप्रमाणें आपला स्वभावही बदलत जातो ह्या गोष्टीचाही विचार केला पाहिजे. एक मुलगा आपले धंडे मोठ्या आनंदानें शिकत असतो, व दुसरा ते मोठ्या त्रासानें शिकत असतो. दुसऱ्यास चाललेल्या विषयामध्यें आपली बुद्धि चालत नाहीं, गुरू नेहमीं तोंड वाईट करून आपणांस नेहमीं शिक्षेची भीति घालीत असतो इत्यादि गोष्टींमुळें नेहमीं खट्टू असावें लागतें. आतां या दोन मुलांचीं तोंडें व नेहमींची चालचर्या पाहून प्रत्येकास असें आढळून येईल कीं, पहिल्या मुलाचा स्वभाव सुधारत चालला आहे व दुसऱ्याचा बिघडत चालला आहे. यश आणि अपयश ह्यांपासून मनावर काय परिणाम होतात, व मनाचा शरीराशीं किती निकट संबंध आहे हें ज्यास माहीत असेल त्यास असें आढळून येईल कीं पहिल्या मुलाचा स्वभाव आणि शरीरप्रकृति हीं सुधारत जातात व दुसऱ्याच्या मनामध्यें नेहमींची उदासीनता, व भित्रेपणा उत्पन्न होण्याची व शरीरप्रकृतीसही कायमचा धक्का बसण्याची भीति असते. ह्याशिवाय दुसरी कांहींशी निराळी, पण बऱ्याच महत्वाची एक गोष्ट घडून येते. ती अशी कीं गुरूच्या शिकविण्यापासून ज्याप्रमाणें आनंद किंवा त्रास होत असेल त्याप्रमाणें इतर सर्व गोष्टी अगदीं सारख्या असूनही गुरू आणि शिष्य यां-

विले आहेत. शिवाय अनेक प्रसिद्ध विद्यागुरूंचींही अशींच मतें आहेत असें त्यानीं लिहून ठेविलेल्या वचनांवरून सिद्ध होत आहे. फेलेनबर्ग असें म्हणतो कीं, "विद्यार्थ्यानें दुसऱ्याच्या मदतीशिवाय स्वतंत्र रीतीनें चालविलेल्या उद्योगाची किंमत आपणांस गुरू म्हणविणाऱ्या पुष्कळ लोकांच्या बडबडीपेक्षां व लुब्रेपणापेक्षां फारच जास्त आहे". हेरेसमन यांचें असें म्हणणें आहे कीं, "दुर्दैवेंकरून आपल्या प्रस्तुतच्या शिक्षणक्रमामध्यें मुलांस शिकण्याचा रस्ता लावून देण्यापेक्षां त्यास एकदम अमुक म्हणून सांगून देण्याचा भाग जास्त आहे." मार्सेलसाहेब तरी असेंच म्हणतो कीं, "विद्यार्थी स्वतः बुद्धी चालवून जें शिकतो, तें जें त्यास सांगावें त्याच्यापेक्षां त्याच्या ध्यानांत अधीक चांगलें रहातें."

या वरील गोष्टीच्या जोडीची दुसरी गोष्ट म्हटली म्हणजे आपली शिक्षणपद्धति अशी असावी कीं, शिकणें चाललें असतां मनाची वृत्ति सतत आनंदमय राहिली पाहिजे, व तीपासूनही आपणांस असेच अनेक लाभ होतात. पुढें होणाऱ्या फलांवर दृष्टि दिली तर अभ्यासाचे श्रम आपण आनंदानें घेऊं. परंतु तसें उपयोगाचें नाहीं; अभ्यासाची रीतिच अशी असली पाहिजे कीं तीमुळें अभ्यास करितांनाच आनंद वाटला पाहिजे. या अटीस अनुसरून आपली शिक्षणपद्धति ठेविली तर मानसशक्तीची जी स्वाभाविक वाढ चालत असते तीस आपल्या हातून हरकत होण्याचा संभव नाहींसा होतो, आणि शिवाय त्यापासून आपणांस प्रत्यक्षही मोठे लाभ होतात. आपणांस अगदीं कडकडीत यति बनून त्यासारखें सद्वर्तन (किंवा त्यास दुर्वर्तनही म्हटलें असतां चालेल) ठेवावयाचें असेल तर गोष्ट निराळी; परंतु तसें नसेल तर नेहमींच्या स्थितीमध्यें आपली लहानपणची आनंदवृत्ति कायम ठेवण्यास म्हटणें यांत कांहीं गैर दिसत नाहीं. याविषयीं आम्ही इतकेंच सांगून पुरें करितों कीं, मन ज्या वेळेस उदासीन किंवा कंटाळलेलें असेल, त्यावेळेस बुद्धीचा व्यापार सुरू ठेवण्यापेक्षां मन आनंदामध्यें असतां बुद्धीचा व्यापार सुरू ठेवणें फार चांगलें. ज्या गोष्टी आपण आनंदानें वाचितों, ऐकितों, किंवा पहातों, त्या, ज्या गोष्टी आपण मन उद्विग्न असतां वाचतों, ऐकतों किंवा पहातों, त्यांपेक्षां आपल्या ध्यानांत जास्त चांगल्या राहतात ही गोष्ट प्रत्येकास माहीत आहेच. पहिल्या स्थितीमध्यें आपल्या मानसिकशक्ति,

 सार्वजनिक वाचनालय, सातारा.

विषय शिकावयाचा त्यामध्यें अगदीं गर्क होऊन जातात, दुसऱ्या स्थितीमध्यें त्या तशा गर्क होऊन जात नाहींत, आणि ह्मणून आपलें लक्ष इतर जास्त मनोवेधक गोष्टींकडे जातें; व ह्यामुळें पहिल्या स्थितीमध्यें मनावर जे संस्कार होतात ते चिरस्थायी असतात, आणि दुसऱ्या स्थितीमध्यें होणारे संस्कार केवळ तात्कालिक असतात. शिवाय कोणत्याही विषयामध्यें लक्ष लागत नाहींसें होऊन विद्यार्थी सतत उदासीन राहत गेला, ह्मणजे आपली ही खोडी एकदां जाईल कशी अशी त्याच्या मनांत भीति उत्पन्न होते; व अशी स्थिति झाली ह्मणजे त्याचें मन अगदीं उद्विग्न होऊन जातें, आणि ज्या विषयाचा त्याला तिटकारा असतो, अशा विषयामध्यें आपलें मन घालणें ह्मणजे त्यास अगदीं कठीण वाटूं लागतें. ह्यास्तव इतर सर्व गोष्टी अनुकूल असूनही आपलें शिक्षण बरें किंवा वाईट होणें हें आपलें शिकण्याचें काम आनंदानें किंवा त्रासानें जसें चाललें असेल त्यावरच अवलंबून राहील हें अगदीं उघड आहे.

शिवाय आपले नेहमींचे धंदे ज्याप्रमाणें आपण आनंदानें किंवा त्रासानें शिकत असूं, त्याप्रमाणें आपला स्वभावही बदलत जातो ह्या गोष्टीचाही विचार केला पाहिजे. एक मुलगा आपले धंदे मोठ्या आनंदानें शिकत असतो, व दुसरा ते मोठ्या त्रासानें शिकत असतो. दुसऱ्यास चाललेल्या विषयामध्यें आपली बुद्धि चालत नाहीं, गुरू नेहमीं तोंड वाईट करून आपणांस नेहमीं शिक्षेची भीति घालीत असतो इत्यादि गोष्टींमुळें नेहमीं खट्टू असावें लागतें. आतां या दोन मुलांचीं तोंडें व नेहमींची चालचर्या पाहून प्रत्येकास असें आढळून येईल कीं, पहिल्या मुलाचा स्वभाव सुधारत चालला आहे व दुसऱ्याचा बिघडत चालला आहे. यश आणि अपयश ह्यांपासून मनावर काय परिणाम होतात, व मनाचा शरीराशीं किती निकट संबंध आहे हें ज्यास माहीत असेल त्यास असें आढळून येईल कीं पहिल्या मुलाचा स्वभाव आणि शरीरप्रकृति हीं सुधारत जातात व दुसऱ्याच्या मनामध्यें नेहमींची उदासीनता, व भित्रेपणा उत्पन्न होण्याची व शरीरप्रकृतीसही कायमचा धक्का बसण्याची भीति असते. ह्याशिवाय दुसरी कांहींशी निराळी, पण बऱ्याच महत्त्वाची एक गोष्ट घडून येते. ती अशी कीं गुरूच्या शिकविण्यापासून ज्याप्रमाणें आनंद किंवा त्रास होत असेल त्याप्रमाणें इतर सर्व गोष्टी अगदीं सारख्या असूनही गुरू आणि शिष्य यां-

मध्यें प्रेमभाव किंवा वैरभाव राहावयाचा, आणि तसेंच गुरूचें शिष्यावर असणारें वजनही त्याच मानानें कमीजास्ती असावयाचें. जो नेहमीं आपणास त्रास देतो त्याजविषयीं मनामध्यें कधीं प्रेम रहावयाचे नाहीं, आणि जर कोणी नेहमीं आपणांस एकसारखा त्रासच देत चालला तर त्याविषयीं आपल्या मनामध्यें कायमचा द्वेषभाव उत्पन्न झाल्याशिवाय कधींही राहणार नाहीं हें खचड आहे. आतां याच्या उलट जो आपले इष्ट हेतु साधण्यास नेहमीं मदत करीत असतो, जो एखादी गोष्ट स्वतःशोधून काढल्यापासून होणाऱ्या आनंदाचा लाभ आपणांस नेहमीं करून देतो, आणि जो आपणांस कांहीं समजेनासें झालें तर मदत करून तें आपणांस समजून देतो, व तें समजलें झणजे आपणाबरोबर आनंद करूं लागतो;असा मनुष्य आपणांस आवडल्याखेरीज राहावयाचा नाहीं; फार तर काय त्याची वर्तणूक नेहमीं अशीच राहील तर आपण त्यास अगदीं जीव कीं प्राणही करूं. मुलांस जो गुरू आपला मित्र आहे असें वाटतें त्याचा दाब, त्यांच्यावर जो गुरू त्यांस आपला वैरी आहे असें वाटतें किंवा ज्याविषयीं त्यांच्या मनांत स्नेहभाव नसतो त्याचा त्यांच्यावर जो दाब असतो, त्यापेक्षां किती जास्त असतो ही गोष्ट मनांत आणिली झणजे ज्ञानाचा मार्ग सुखावह केल्यानें जे आपणांस अप्रत्यक्ष लाभ होतात तेही त्यापासून प्रत्यक्ष होणाऱ्या लाभांपेक्षां कमी महत्वाचे नाहींत असेंआपल्या लक्ष्यांत आल्याखेरीज रहाणार नाहीं. आम्ही जी शिक्षणपद्धति सुरू करावी असें झणतों ती सुरू करितां येईल कीं नाहीं असा ज्यांस संशय असेल त्यांस आमचें असें उत्तर आहे कीं केवळ त्या पद्धतीचें तत्वावरून ती शिक्षणपद्धति खरी ठरते असें नाहीं तर ती अनुभवावरूनही खरी ठरते. पेस्टलोझीनंतर पुष्कळ विख्यात गुरूंनीं वरील शिक्षणपद्धतीच्या खरेपणाविषयीं दिलेलीं मतें आम्हीं पूर्वी सादर केलींच आहेत, व त्यांतच आणखी एक प्रसिद्ध अध्यापक पिलन्स याचें मत येथें सादर करितों. तो असें झणत असे कीं "मुलांस ज्या रीतीनें शिकविलें पाहिजे त्या रीतीनें शिकाविलें तर खेळतांना जो आनंद होत असतो त्यापेक्षां कमी तर नाहीं, परंतु उलट जास्तच आनंद त्यास शाळेंत असतांना होत जाईल; त्यांच्या हातापायांच्या शिरांस योग्य व्यायाम मिळून त्यांस मोकळें वाढल्यानें जें सुख वाटतें, त्यापेक्षां त्यांच्या मानसिक शक्तींस योग्य प्रकारें शिक्षण मिळून त्यांचे व्यापार सुरळीतपणें चालल्यानें त्यांस जास्त सुख वाटेल."

आपली शाळेंतील अभ्यास करण्याची रीति ज्या मानानें सुखावह असेल त्याच मानानें पुढें आपणांस शाळा सुटल्यावर अभ्यासाची गोडी रहावयाची हें उघड आहे. ही गोष्ट येथें सांगण्याचें कारण एवढेंच कीं तीवरून शिक्षणामध्यें स्वशिक्षणाचा क्रम विशेष असला पाहिजे, व शिक्षणपद्धति नेहमीं सुखावहच असली पाहिजे असें जें आम्ही ह्मणतों त्याचें एक सबळ कारण चांगलें लक्षांत येण्यासारखें आहे. अभ्यास करण्यापासून आपणांस त्रास होत असला ह्मणजे आईबाप आणि शिक्षक यांचा दाब एकदां आपल्यावरील नाहींसा झाला कीं अभ्यास करण्याचें सोडून देण्याकडे आपल्या मनाची प्रवृत्ति झालीच पाहिजे. बरें अभ्यास करण्यापासून आपणांस आनंद होत असेल तर दुसऱ्याची देखरेख असून जो आपला स्वशिक्षणाचा क्रम सुरू असतो, तोच क्रम दुसऱ्याची देखरेख नसतांनाही आपण पुढें चालवावा अशी आपल्या मनाची प्रवृत्ति झाल्याखेरीज कधीं रहावयाची नाहीं. मनामध्यें जे विचार येतात ते कांहीं नियमानेंच येतात ही गोष्ट जर खरी असेल, ज्या स्थलांवरून व ज्या गोष्टींवरून आपल्या मनांत दुःखाचे विचार येतात त्यास्थलांचा व त्या गोष्टींचा जर आपण तिरस्कार करितों, व ज्या स्थलांवरून व ज्या गोष्टींवरून आपले मनांत सुखाचे विचार येतात त्यास्थलांचे व त्या गोष्टींचे विचार मनांत आले असतां जर आपणांस आनंदच होतो, तर आपला शाळेंतील ज्ञान संपादण्याचा मार्ग ज्या प्रमाणें दुःखावह किंवा सुखावह असेल त्याच प्रमाणें आपणांस पुढें ज्ञानसंपादन करणें दुःखावह किंवा सुखावह होणार आहे हें उघड आहे. ज्या मनुष्यास लहानपणीं आपले धडे शिकण्यामध्यें मौज वाटत नाहीं, जो शिक्षेच्या भीतीस्तव आपले धडे शिकत असतो, व ज्यास स्वतः विचार करण्याची कधीं संवय नाहीं, त्या मनुष्याच्या हातून पुढें अभ्यास व्हावयाचा नाहीं. परंतु ज्यांचें शिकणें योग्य वेळीं सहज रीतीनें होत गेलें असेल, व ज्यांस शिकलेल्या गोष्टी मनोवेधक वाटत असून त्या आपण स्वतः विचार करून शोधून काढलेल्या आहेत असें स्मरण झाल्यानें आनंद होत असेल, ते लोक लहानपणीं सुरू झालेला स्वशिक्षणाचा क्रम तसाच पुढें चालवितील ह्यांत काडीमात्र संशय नाहीं.

भाग २ रा समाप्त.

भाग ३ रा.

नीतिविषयक शिक्षण.

आमच्या शिक्षणक्रमांत जी मोठी उणीव आहे तिची कोणीच दाद घेत नाहींत. मुलांस कोणते विषय शिकवावे, आणि ते कसे शिकवावे या संबंधानें शिक्षणपद्धतीमध्यें बारीक सारीक गोष्टींत सुद्धां सुधारणा करण्याचें काम इतक्या जारीनें चालू आहे; तरी सर्वांत अतिशय जरूर जी गोष्ट तिची अजून जरूरीही लोकांच्या लक्षांत आलेली नाहीं. संसारांतील कृत्यें करण्याची योग्यता मुलांचे अंगीं आणून देणें हाच उद्देश आईबापें आणि शिक्षक यांचे मनांत असला पाहिजे हें आतां सर्व लोक कबूल करितात. त्याचप्रमाणें शिकवावयाच्या गोष्टींच्या महत्वाचा विचार करणें झाल्यास अगर त्या गोष्टी शिकविण्याची पद्धत कितपत चांगली आहे हें पाहणें झाल्यास त्या गोष्टी किंवा ती पद्धत वर सांगितलेला उद्देश संपादन करण्यास कितपत उपयोगी पडते हेंच पाहतात. केवळ संस्कृतादि प्राचीन भाषांचे अभ्यास मुलांकडून न करवितां ज्यामध्यें अर्वाचीन भाषांचा अभ्यास येईल अशा प्रकारचा शिक्षणक्रम सुरू ठेवावा असें जे ह्मणतात, तेंही याच मुद्यावर; शास्त्रीय विषयांचा अभ्यास वृद्धिंगत करणें आवश्यक आहे असें ह्मणतात त्याचेंही बीज हेंच आहे. परंतु मुलगे व मुली ह्यांस जनसमाजांत कसें वागावें, हें शिकविण्याविषयीं जशी कांहीं काळजी घेतली जाते तशी पितृत्वाची योग्यता त्यांचे अंगीं आणण्याकरितां काळजी घेतली जात नाहीं,हा मात्र चमत्कार आहे.उपजीविका करितांयेण्यास पूर्वीची जंगी तयारी पाहिजे हें लोकांस समजतें. परंतु मुलांचें संगोपन करितां येण्यास कोणत्याही प्रकारच्या तयारीची जरूरी नाहीं असा त्यांचा आग्रह झालेला दिसतो. ज्या ज्ञानाचा मुख्य उपयोग ह्मटला ह्मणजे एवढाच कीं, त्याचे योगानें आपली शिष्ट व संभावित लोकांमध्यें गणना होऊं लागते, तें ज्ञान संपादन करण्यामध्यें सुद्धां आपण मुलांचीं वर्षानवर्षें जाऊ देतों. परंतु अतिशय जोखमाची जी जबाबदारी

तिच्यासंबंधानें तयारी करण्यांत आपला एक तास ही खर्च होऊं नये हें मात्र फार विलक्षण दिसतें. ती जबाबदारी कोणती म्हणाल तर कुटुंब-व्यवस्था. आतां हें काम करण्याची पाळी कधीं कोणावर आली तर आली असें तरी आहे काय? असें नाहीं इतकेंच नाहीं, तर दहांपैकीं नवांवर ती हटकून आलीच पाहिजे. बरें हें काम म्हणजे सोपें तरी आहे? खचितच नाहीं. वयांत आलेल्या प्रत्येक मनुष्याला जीं जीं म्हणून कामें करावीं लागतात त्या सर्वांत हें अतिशय कठीण होय. बरें पितृत्वाचीं कर्तव्यें करण्याची योग्यता शिकविल्याशिवाय मनुष्यास आपोआप येईल, असें तरी म्हणतां येईल काय? अर्थात् नाहीं. शिकविल्याशिवाय स्वतःच हें काम करितां येईल ही कल्पनासुद्धां अजून कोणाच्या मनांत आली नाहीं; एवढेंच नव्हे, तर हा विषय इतका भानगडीचा आहे कीं, त्यामध्यें स्वशिक्षणाचा उपयोग होण्याचा फारच थोडा संभव आहे. यास्तव शिकविण्याच्या विषयक्रमामधून शिक्षणकला काढून टाकावी असें कोणी म्हणेल तर त्यास एकही सयुक्तिक कारण देतां येणार नाहीं हें उघडच आहे. आईबापांच्या सुखाच्या संबंधानें म्हणा, किंवा मुलांचा आणि दूरदूरच्या वंशजांचा स्वभाव आणि वर्तन या संबंधानें म्हणा, इतकें आम्हांला कबूल केलेंच पाहिजे कीं, मुलांस शारीरिक, मानसिक आणि नीतिविषयक शिक्षण कसें द्यावें या गोष्टीचें ज्ञान आपणांस असणें अत्यंत महत्वाचें होय; व तें प्रत्येक स्त्रीच्या आणि पुरुषाच्या अभ्यासक्रमामध्यें अगदीं शेवटीं आलें पाहिजे. प्रजोत्पादनयोग्यता ही जशी शारीरिकपरिपक्वतेची सूचक आहे, त्याचप्रमाणें त्या प्रजेचें संगोपन करण्याचें सामर्थ्य हें मानसिक परिपक्वतेचें सूचक होय. यास्तव ज्यामध्यें इतर सर्व विषयांचा अंतर्भाव होतो, आणि म्हणून जो शिक्षणक्रमामध्यें सर्वांचे शेवटीं आला पाहिजे असा विषय कोणता म्हणाल तर शिक्षणाची उपपत्ति व तें देण्याची पद्धति हा होय.

अशाप्रकारची सिद्धता नसल्यामुळें मुलांचें संगोपन आणि विशेषतः त्यांचें नीतिविषक शिक्षण यांची अत्यंत शोचनीय स्थिति असल्याचें दृष्टोत्पत्तीस येतें. आईबापें या गोष्टीविषयीं बिलकुल विचारच करीत नाहींत, किंवा त्यांनीं विचार केलाच तर त्यांचे विचार अज्ञानमूलक आणि परस्परविरुद्ध असे असतात. बहुतेक आईबापांची व विशेषेंकरून सर्व आया-

ची अशी तऱ्हा असते कीं, प्रत्येक वेळीं त्यांचें आपल्या मुलांशीं वर्तन त्यावेळेस जो मनोविकार प्रबल असेल तदनुसार असतें. विचार करून मुलांस अत्यंत हितावह काय होईल, याविषयीं सिद्धांत ठरवून तदनुरूप त्यांचें वर्तन कधींही नसून, त्यावेळीं कल्याणकारक किंवा अपायकारक अशी जी कोणतीही मनोवृत्ति उच्छृंखल होऊन गेलेली असेल तदनुसारच असतें.आणि मग अर्थातच जसजशी ती मनोवृत्ति बदलेल तसतसें त्यांचें वर्तनही बदलतें; अथवा या त्यांच्या मनोवृत्तिप्रेरित अशा वर्तनांत कांहीं नियमित विचार आणि सिद्धांत यांचें अंग असलेंच तर ते प्राचीन कालापासून पिढ्यान् पिढ्या चालत आलेले असे असतात, किंवा बाल्यावस्थेंत मनावर घडलेल्या संस्कारांपासून उत्पन्न झालेले असतात, किंवा घरांत ठेविलेल्या दाया आणि चाकरलोक यांजपासून प्राप्त झालेले असतात. सारांश हे विचार तत्कालीनज्ञानाचा परिणाम असून अज्ञानजन्य असतात. आत्मनियमाच्या संबंधानें मत आणि वर्तन, यांमध्यें किती घोंटाळा आहे या विषयीं रिचर नामक ग्रंथकार असें ह्मणतो—"साधारण लोकांचे मनांतील परस्परविरुद्ध असे विचार नीतिशिक्षणास उपयोगी पडावे ह्मणून जर एकत्र केले, तर त्यांची खालीं लिहिल्याप्रमाणें स्थिति आहे असें आढळून येईल.—कित्येक लोक असें ह्मणतात कीं, आपण किंवा शिक्षकांकडून मुलांस केवळ शुद्ध नीतीचींच पुस्तकें वाचून दाखविलीं पाहिजेत; तेच लोक दुसऱ्या वेळीं असें ह्मणतात कीं मुलांस स्वहितास अनुकूल अशा नीतीचें शिक्षण दिलें पाहिजे;तेच लोक तिसऱ्या वेळीं आपल्या मुलास असें ह्मणतात कीं, मी कसा वागत आहें हें तुझ्या लक्षांत येत नाहीं? चवथ्या वेळेस त्यांचेच उद्गार असे निघतात कीं, तूं अजून लहान आहेस आणि हें फक्त मोठ्या मनुष्याचे उपयोगी आहे; पांचव्या वेळीं त्यांचें बोलणें पाहूं गेलें तर असें असतें कीं, मुख्य गोष्ट ह्मटली ह्मणजे ही कीं, जगांत तुझी भरभराट व्हावी आणि राष्ट्रामध्यें तुला कांहीं महत्व असावें; सहाव्या वेळेस त्यांचा उपदेश पाहिला तर असा असतो कीं, मनुष्याची योग्यता क्षणिक व अशाश्वत गोष्टींवर अवलंबून नसून शाश्वत चिरस्थायी अशा गोष्टींवर अवलंबून असते; सातवे वेळेस तेच असें ह्मणतात कीं, तुझे संबंधानें कितीही अन्याय झाला तरी तो पोटांत घालून नेहमीं दयाभूत रहा; आठवे वेळेस त्यांचे बोलणें असें असतें कीं जर कोणी तुझा अवमान करील

तर तो तूं कधींही सहन करूं नको, अभिमानानें व धैर्यानें त्या अवमानाचा परिहार कर; नवव्या वेळेस त्यांचें सांगणें असतें कीं बाबा गडबड करूं नये; दहाव्या वेळेस तेच लोक मुलास असें म्हणतात कीं, अजागळासारखा स्वस्थ बसूं नको, कांहींतरी अंगीं चळवळ असूंदे; अकराव्या वेळेस तेच असें सांगतात कीं, मुलांस श्रेयस्कर गोष्ट म्हटली म्हणजे आईबापांचे अर्जित राहणें हेंच होय. बाराव्या वेळेस विद्या कर हाच त्यांचा मुलांस उपदेश असतो. याप्रमाणें प्रत्येक तासातासास आपले विचार फिरवून लोक आपले मतांचे पोकळपणावर व एकदेशीपणावर आच्छादन घालूं पाहत असतात. हें पुरुषांच्या स्थितीविषयीं झालें; स्त्रियांची स्थिति तर याहूनही शोचनीय आहे. त्यांचे उपदेश एकाच वेळीं परस्परविरुद्ध असे असतात.

अशाप्रकारची स्थिति म्हणजे ताबडतोब बदलतां येईल असें नाहीं. कित्येक पिढ्यांनंतर ती कदाचित् कांहीं बदलली तर नकळे. राष्ट्रीयसभेसारख्या राष्ट्रीयगोष्टी व शिक्षणपद्धति यांचा अगदीं सारखा प्रकार आहे. त्यांचें ताबडतोब पाहिजे तेव्हां कलम करतां येणार नाहीं. क्रमाक्रमानेंच त्या वृद्धिंगत झाल्या पाहिजेत. अल्प काळामध्यें त्यांची वृद्धिही अल्प व विशेष लक्षांत न येण्याजोगीच असली पाहिजे. कोणतीही सुधारणा हळू हळू व क्रमाक्रमानें होत जाते हें जरी खरें आहे तरी ती होण्यास उपायांची योजना पाहिजेच; व वादविवाद हा अनेक उपायांपैकीं एक उपायच आहे.

सर्व मुलें उपजतच चांगलीं असतात हा लार्ड पामर्स्टनचा सिद्धांत आह्मांस कबूल नाहीं. याच्या उलट सिद्धांत जरी विशेष टिकण्यासारिखा नाहीं तरी तो आह्मांस एकंदरीनें जास्त संमत आहे. शिवाय मुलें जशीं असावीं तशीं उत्तम प्रकारच्या शिक्षणानें करितां येतील असें कित्येकांचें मत आहे, तेंही आह्मांस कबूल नाहीं; उलटी अशी आमची खात्री आहे कीं उत्तम शिक्षणानें मनुष्यस्वभावांतील दोष फार झाले तर कमी करितां येतील, परंतु सर्वांशीं काढून टाकितां येणार नाहींत. अत्युत्कृष्ट शिक्षणपद्धतीनें मनुष्याचा स्वभाव जसा असावा तसा सर्वोत्कृष्ट बनवितां येईल, ही कल्पना शेली नामक कवीनें आपल्या काव्यामध्यें मानवी स्थितीविषयीं जें सांगितलें आहे, त्याच्या सारखीच आहे. तो असें म्हणतो कीं मनुष्य आपल्या जुन्या वेडया समजुतींस व मतांस जर

सर्वांशीं रजा देतील तर जगांतील सर्व दुःखें एकदम नाहींशीं होतील. सारांश मनुष्यस्वभावाचा ज्यांनीं शांतपणें विचार केला आहे, अशा लोकांस या वरील दोहों पैकीं कोणतेंही मत पसंत पडावयाचें नाहीं.

तथापि अशा प्रकारच्या मतांचा कांहीं अंशीं तरी आदर केलाच पाहिजे. कोणत्याही गोष्टीविषयीं अत्युत्कट औत्सुक्य असणें, किंबहुना तें औत्सुक्य उन्मादकोटीप्रत जाणें हें फारउपयोगाचें किंवा आवश्यक आहे असेंही झटलें तरी चालेल. एखादा मुत्सद्दी एखादी राजकीय सुधारणा करण्याच्या कामीं मोठ्या उत्सुकतेनें जो परिश्रम व जो स्वार्थत्याग करितो तो, ज्या सुधारणेकरितां आपण इतके झटत आहों तीच कायती एक ह्या जगांतील अत्यंत आवश्यक गोष्ट अशी जर त्याची समजूत नसेल, तर त्याच्या हातून कधींही होणार नाहीं. सुरापान हेंच सर्व सामाजिक दुःखांचें मूळ अशी जर सुरापाननिषेधकांची समजूत नसेल तर त्यांच्या हातून सुरापाननिषेधाच्या कामीं इतकी खटपट होणार नाहीं. कोणत्याही सार्वजनिक हिताच्या कृत्यांत व त्याप्रमाणेंच इतर गोष्टींतही श्रमविभागापासून फारच फायदा आहे, आणि जर श्रमविभाग पाहिजे तर सार्वजनिक हित करणारे निरनिराळे लोक आपापल्या कामांचे दास होऊन राहिले पाहिजेत; ह्मणजे अर्थात् आपापल्या कामांचे उपयुक्ततेविषयीं त्यांची विलक्षण श्रद्धा असली पाहिजे. ह्मणून मानसिक आणि नीतिशिक्षण हेंच मनुष्यस्वभावांतील सर्व रोगांवर त्रैलोक्यचिंतामणि अशी ज्यांची समजूत आहे, त्यांच्या ह्या भ्रांतिमूलक कल्पनांचाही उपयोग नाहीं असें नाहीं, आणि आपआपल्या उद्योगाच्या सिद्धीविषयीं त्यांची जी बळकट श्रद्धा असते ती कांहीं केल्या ढळत नाहीं हाही ईश्वराचा जगावर उपकारच समजावयाचा.

आतां एखाद्या उत्कृष्ट नीतिशिक्षणपद्धतीचे योगानें मुलांस सदाचाराचें पाहिजे तसें वळण लाविता येईल व त्या पद्धतीचीं तत्वें आईबापांचे मनांत भरवून देतां येतील असें जरी घटकाभर धरिलें, तरी इष्ट हेतु सिद्धीस जाण्याची मारामारच पडणार. कारण ती पद्धति सिद्धीस नेऊं असें ह्मणणें ह्मणजे कोणाच्याही अंगीं आढळून न येणारे असे बुद्धि, चांगुलपणा, व मनोनियमादि गुण आईबापांच्या अंगीं आहेत अशी कल्पना प्रथमतः केली पाहिजे. कुटुंबव्यवस्थेविषयीं

विचार करूं लागलें ह्मणजे लोक जी मोठी चुकी करितात ती ही कीं तिजमधील सर्व दोषांचें व अडचणींचें खापर, आईबापांचे वर्तनाचा तिळभर विचार न करितां, मुलांच्याच डोक्यावर फोडितात. कुटुंबव्यवस्था घ्या, किंवा राष्ट्रव्यवस्था घ्या, लोकांचा साधारण समज असा होऊन गेलेला आहे कीं ज्यांना वागवून घ्यावयाचें ते कायते वाईट, वागवून घेणारे ते चांगलेच. परंतु शिक्षणाच्या तत्वांचा विचार करूं गेलें असतां असें दिसून येतें कीं मुलांच्या संबंधानें आईबापांची स्थिति वर सांगितल्याहून अगदीं भिन्न आहे. व्यवहारामध्यें ज्या लोकांशीं आपला संबंध येतो, व जगामध्यें जे लोक आपणांस आढळतात, त्यांच्या अंगीं पुष्कळ दोष आहेत असा आपला अनुभव आहे. दररोज लोकांविषयीं ज्या शेंकडों बीभत्स गोष्टी कानीं येतात, स्नेह्यास्नेह्यांमध्यें कलह होऊन द्वेष पडल्याचें जें आपण ऐकितों, एखाद्या सावकाराचें दिवाळें निघाल्यानंतर ज्या गोष्टी उघडकीस येतात, कोर्टातील फिर्यादींमध्यें जे प्रकार दृष्टोत्पत्तीस येतात, किंवा पोलीसरिपोर्टांवरून ज्या हकीकती कळतात, त्या गोष्टी, ते प्रकार, व त्या हकीकती जगामध्यें आपलपोटेपणा, अप्रामाणिकपणा व पशुतुल्य आचरण यांचा किती फैलाव आहे याचें हुबेहुब चित्र आपल्या पुढें नेहमीं ठेवीत आहेत. तरी ज्या वेळेस आपण कुटुंबव्यवस्थेविषयीं व मुलांच्या खोड्यांविषयीं विचार करितों, त्यावेळेस मुलांच्या व मुलींच्या शिक्षणाच्या संबंधानें हेच दोषी लोक अगदीं निर्दोषी आहेत हें गृहीत धरूनच आपण पुढें चालतों; हा समज इतका चुकीचा आहे कीं घरांतील तंट्याबखेड्यांबद्दल प्रायः मुलांना दोष देतात तो न देतां त्यांचें कारण आईबापांचें गैरवर्तनच होय असें निःशंकपणें ह्मटल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं. ज्यांचेठायीं प्रेमाचें व आत्मसंयमनाचें विशेष प्राबल्य आहे अशा लोकांबद्दल हें आमचें ह्मणणें नाहीं व आमच्या वाचकांपैकीं पुष्कळ अशाच प्रकारचे असतील अशी आमची आशाही आहे. आमचें हें ह्मणणें अशिक्षित जो जनसमूह त्यासच लागू आहे. मूल पिईनासें झालें ह्मणजे त्यास रागानें हापटून देणारी जी आई तिच्यापासून त्या मुलास कितपतसें शिक्षण मिळणार? अशा प्रकारची एखादीतरी आई बहुधा प्रत्येकाच्या पाहण्यांत असलीच पाहिजे. मुलाचा हात खिडकीमध्यें सांपडून त्यानें किंकाळी

फोडल्यामुळें तिकडे लक्ष गेल्यानंतर त्याचा हात खिडकींतून न सोडवितां अगोदर मारझोड करावयास जो बाप लागतो त्या बापाचे समागमानें त्या मुलाचे ठायीं न्यायबुद्धीचा विकास कितपत होण्याचा संभव आहे? आणि असे बाप पुष्कळांच्या पाहण्यांतही असतील. याहीपेक्षां विशेष मूर्खपणाचें उदाहरण घेऊं. आणि तें तरी नेहमीं सर्वांच्या पाहण्यांत येण्यासारखेंच आहे. मुलानें खेळतांना आपला पाय मोडून घेतल्याचें ऐकिल्यावर त्यास घरीं आणून एखादा बाप त्याची प्रथमतः लत्ताप्रहारांनीं यथेच्छ संभावना करितो असेंही कधीं कधीं आढळतें, तर अशा बापाच्या शिक्षणापासून तें मूल सुधारण्याची कितपतशी अशा असणार? आतां हीं उदाहरणें फार विरळ आहेत. विचारशून्य पशूचे अंगीं जी एक प्रकारची बुद्धि आहे व जिच्या योगानें आपल्यापैकीं अशक्त व दुखापत झालेल्या प्राण्याचा नाश करण्यास पशु प्रवृत्त होतात ती बुद्धि अंशरूपानें ज्यांच्याठायीं असतें अशा मनुष्यांचे संबंधानें हीं उदाहरणें आहेत हें खरें. तथापि पुष्कळांचे घरांत असा प्रकार आपणांस नेहमीं आढळून येतो. दुखण्याबिखण्यामुळें मूल किरकिर करूं लागलें ह्मणजे आईनें त्याच्या थोबाडींत मारल्याचीं उदाहरणें शेंकडोंवेळां आमच्या वाचकांनीं पाहिलीं नसतील-काय? पडलेल्या लहान मुलाला एखादी अविचारी आई उचलून घेऊं लागली ह्मणजे तिच्या तोंडांतून निघणारे मेल्या, रांडेच्या, असे तीक्ष्ण शब्द ऐकून तिचा तो क्रोधावेश असंख्य भावी कलहांचें बीज आहे असें आमच्या वाचकांच्या ध्यानांत पुष्कळवेळां आलें नसेल काय? बैस उगाच असें मुलाला बाप दटावून कठोर शब्दांनीं सांगत असतां ते कठोर शब्द बापाच्या आंगच्या प्रेमाच्या कमतरतेची साक्ष देत नाहींत काय? शिवाय त्यापासून दुसरे तोटे होतात. जरूर नसतांना मुलाला दटावून उगीच बस ह्मणून सांगितलें असतां मुलगा चपळ असल्यास त्याचे मनास त्रास झाल्यावांचून राहत नाहीं. आगगाडींतून जात असतांना खिडकींतून बाहेर पाहूं नको असें सांगितल्यानें साधारण बुद्धीच्या मुलाचीसुद्धां त्याच्या जिज्ञासेच्या संबंधानें फार हानि होते. अशा प्रकारचे जिज्ञासेच्या प्रतिबंधाचे प्रकार पदोपदीं आढळतात. हा प्रतिबंध असणें ह्मणजे बापाच्या अंगीं मुलाविषयीं प्रेम कमी असें होत नाहीं काय? सारांश नीति-

संगणकीकृत

शिक्षणामध्यें ज्या अडचणी येतात, त्यांचें कारण उभयपक्षीं आहे. अर्थात् त्याचें कारण कांहीं अंशीं मुलांचे दोष व कांहीं अंशीं आईबापांचे दोष होत. आतां आजाचे गुण बापाच्या अंगांत बापाचे गुण मुलाच्या अंगांत मुलाचे नातवाच्या अंगांत अशा प्रकारें मागच्या पिढींतले गुण पुढच्या पिढींत उतरतात हें वंशपरंपरागतगुणदोषादिसंक्रमण जर सृष्टींतील एक तत्व आहे, तें जर प्रत्येक तत्ववेत्त्यास संमत आहे व ह्याची सत्यता जर आपण नेहमीं रोजच्या भाषणामध्येंही कबूल करितों, तर सरासरीनें पाहतां मुलांच्या अंगचे दोष हे केवळ त्यांच्या आईबापांच्या अंगचे दोषांचें प्रतिबिंबच होय असें तुम्हीं कबूल केलें पाहिजे. सरासरीनें पाहतां असें ह्मणण्याचें कारण हें कीं, दूरदूरच्या वंशजांच्या संबंधानें या तत्वापासून होणाऱ्या परिणामांत दुसऱ्या अनेक कारणांनीं फरक पडतो. व ह्मणून दूरदूरचे पूर्वज व वंशज ह्यांमध्यें दिसून येणारें सादृश्य बारीकसारीक गोष्टींविषयीं नसून स्थूल मानानें मुख्य गोष्टींविषयींच असतें. ह्याप्रमाणें एकंदरीनें पाहतां जर हें गुणदोषसंक्रमण सर्व संमत आहे, तर मुलांच्या अंगचा जो दुःस्वभाव त्याच प्रकारचा दुःस्वभाव अर्थात् आईबापांच्याही अंगीं असला पाहिजे. कारण आईबापांच्या अंगीं होता ह्मणूनच तो मुलांच्या अंगीं आला. आतां तो लोकांचे दृष्टोत्पत्तीस येत नसेल किंवा कदाचित् दुसऱ्या मनोविकारांमुळें त्याचा जोर चालत नसेल, तरी तो त्यांचे अंगीं आहेच आहे. यावरून तर आतां उघड झालें कीं, सर्वांना लागू पडेल अशी सर्वांशीं निर्दोषी व सर्वोत्कृष्ट शिक्षणपद्धति शोधून काढणें ह्मणजे सशाचें शिंग शोधून काढणें होय. कारण मुळीं आईबापच असावे तितके चांगले नाहींत.

शिवाय इष्ट हेतु एकदम सिद्धीस नेण्यास साधनें आहेत अशी जरी कल्पना केली, आणि त्या साधनांचा योग्य उपयोग करण्याकरितां जरूर तितकें प्रेम व आत्मसंयमन, आईबापांचे अंगीं आहे असें जरी धरिलें, तरी कित्येक लोक असें ह्मणतील कीं, बाकीच्या इतर गोष्टींत सुधारणा झाल्याशिवाय केवळ कुटुंबव्यवस्थेतच सुधारणा करण्यांत अर्थ नाहीं. शिक्षण देण्यांत आमचा मुख्य उद्देश पाहूं गेलें तर हाच दिसून येतो कीं, मुलांचें वर्तन सुधारावें व त्यांत जगामध्यें उत्तम रीतीनें राहतां यावें; आणि जगांत उत्तम

रीतीनें राहणें म्हणजे धनसंचयच आम्ही समजत नाहीं,तर कुटुंबाचें पोषण आणि मुलांबाळांचें संगोपन करण्यास जरूर अशा साधनांचें संपादन करणें असें आम्ही समजतों. या साधनांचें संपादन करणें म्हटलें म्हणजे हल्लीं ज्या स्थितीमध्यें जग आहे त्याच स्थितीला योग्य असा मनुष्य तयार झाला पाहिजे असें होत नाहीं काय?तसेंच कोणत्याही एखाद्या शिक्षणपद्धतीच्या योगानें मनुष्य जर अत्युत्तम व्हावा तसा बनलाच, तर जगाच्या सांप्रतच्या स्थितीला तो योग्य होईल कीं काय ही तरी एक शंकाच नाहीं काय? अशा शिक्षणाच्या योगानें लवमात्र अन्यायानेंही पायाचा जाळ मस्तकाला जाऊन पोंचेल,अशी विलक्षण तीक्ष्ण न्यायबुद्धि होऊन हरिश्चन्द्रानें आक्रमिलेला परम दुष्कर व आचरण्यास फारच कठीण असा नीतिमार्ग त्याच्या हृदयावर प्रतिबिंबित होऊन त्या योगानें हल्लींच्या स्थितींत जगांतील वस्ती त्यास असह्य, किंबहुना अशक्यही होईल असेंही कदाचित् उलटें म्हणतां येणार नाहीं काय? अशा शिक्षणाचा परिणाम व्यक्तिविशेषाच्या संबंधानें कितीही इष्ट होवो, परंतु आधुनिक जनसमाज आणि भावी संतति यांचा विचार केला असतां हें शिक्षण अपायकारकच होण्याचा संभव नाहीं काय? एकंदरीनें पाहतां साधारण मनुष्यजातीच्या स्वभावाचें चांगुलपणाचें जें मान असतें, त्या मानानें राष्ट्रांतील किंवा कुटुंबांतील व्यवस्थेचे चांगुलपणाबद्दल आपण निर्णय करितों या म्हणण्यांत बरेंच तथ्य आहे; व हें लोकांचा साधारण स्वभाव पाहून त्यावरूनच दोन्ही गोष्टींत ठरविलें आहे. यावरून साहजिक असें अनुमान होतें कीं, दोन्ही गोष्टींत मनुष्याचा साधारणस्वभाव जर सुधारत गेला, तर त्या दोन्ही गोष्टींच्या संबंधानें एकंदर व्यवस्थाही सुधारत गेलीच पाहिजे. मनुष्यस्वभाव पूर्वी सुधारल्याखेरीज शिक्षणपद्धतीची सुधारणा होणें नाहीं; ती जर शक्य असती तर जगांत सुखापेक्षां दुःखच अधिक झालें असतें. मुलांना शिक्षकांकडून किंवा आईबापांकडून जें हल्लीं कडक शिक्षण मिळतें तें जगांत मनुष्य त्रागूं लागल्यावर मानभंगादि येणारे प्रसंग सहन करण्यासारखी सहनशीलता त्यांच्या अंगीं आणण्याकरितां आज तयारीच आहे असें म्हटलें तरी चालेल. आणखी असें म्हणतां येईल कीं, आईबापें आणि शिक्षक यांस मुलांना पूर्ण न्यायानें आणि पूर्ण प्रेमानें जर वागवितां आलें असतें, तर प्रौढ वयांत मानवजातीच्या आपलपोटे-

पणामुळें मनुष्यास जीं दुःखें सोसावीं लागतात तीं उलटीं अधिक तीव्र व दुःसह झालीं असतीं. आपल्या विश्वविद्यालयांमधून जें मुलांस शिक्षण मिळतें त्याची सयुक्तिकता दाखविण्यास अशाच प्रकारचीं कारणें लोक पुढें आणितात. ते असें ह्मणतात कीं, शाळा हें एक लहानसें जग आहे. त्यामध्यें हालअपेष्टा भोगिली ह्मणजे मनुष्य खऱ्या जगांतील हालविपत्ति भोगण्यास तयार होतो. आतां हीं कारणें ह्मणजे अगदीं पोकळ आहेत असें जरी ह्मणतां येणार नाहीं, तथापि तीं अपुरतीं आहेत यांत संशय नाहीं. कारण प्रौढ वयांत जगामध्यें जें शिक्षण मिळतें त्यापेक्षां गृहशिक्षण व शालाशिक्षण हीं जरी अत्युत्तम नकोत तरी तीं कांहींशीं तरी चांगलीं पाहिजेत. परंतु आमच्या प्रसिद्ध शालांची स्थिति पहा. जगांत प्रौढवयांत मिळणाऱ्या शिक्षणापेक्षां या शाळांतून मिळणारें शिक्षण फारच अन्यायाचें व फारच निर्दयतेचें आहे. प्रत्येक प्रकारचें शिक्षण मनुष्याच्या सुधारणेस अनुकूल असें असलें पाहिजे. परंतु आमच्या शाळांतील शिक्षणाची तऱ्हा पाहिली ह्मणजे हम् करे सो कायदा व सर्व व्यवहार मारझोड करून चालावयाचे अशी आहे व अशा प्रकारें आपलीं मुलें सांप्रत जी आपल्या समाजाची स्थिति आहे त्याहून निकृष्ट स्थितीस योग्य अशीं होऊन जुलमी एकछत्री राज्यामध्यें राहण्याची योग्यता त्यांचे अगीं चांगली येईल. आमचे कायदेकौन्सिलांत भरलेली बहुतेक मंडळी अशाच प्रकारच्या शाळांतून तयार झालेली असते; तेव्हां अशा कवायतीनें तयार झालेल्या लोकांची राष्ट्रीय सुधारणेला कितपत मदत होईल याचा विचार वाचकांनींच करावा.

परंतु हें पांडित्य वाहत वाहत भलतीकडेसच जाऊं पाहत नाहीं काय? जी गोष्ट सिद्ध करावयाची होती तिच्या पलीकडे हें प्रतिपादन जात नाहीं काय? असें कोणी एखादा विचारील. तो असें ह्मणेल कीं, मुलांना तीं जशीं असावीं तशीं जिच्या योगानें एकदम करितां येतील अशी नीतिशिक्षणाची एकही पद्धति नाहीं, व जरी असली तरी त्या पद्धतीचा योग्य उपयोग करण्यासारखीं हल्लीं आईबापें नाहींत, शिवाय जरी त्या पद्धतीचा योग्य उपयोग होईल असें धरिलें तरी त्या पद्धतीचे परिणाम सांप्रतच्या सामाजिक स्थितीला प्रतिकूल व अपायकारक होणार, असें जर आहे,—तर चालू असलेल्या शिक्षणपद्धतींत सुधारणा करणें हें शक्य नाहीं व

इष्टही नाहीं असं होत नाहीं काय? नाहीं; यापासून एवढंच होतें कीं, कुटुंबव्यवस्थेंतील सुधारणा इतर गोष्टींतील सुधारणेबरोबरच चालली पाहिजे. शिवाय शिक्षणपद्धति हप्त्याहप्त्याशिवाय एकदम सुधारतां येणार नाहीं, व सुधारणें इष्टही होणार नाहीं. आणखी यावरून असें होतें कीं तत्वदृष्ट्या घालून दिलेले नीतिमार्ग व्यवहारामध्यें आणिल्यावर कोणत्याही एखाद्या काळीं मनुष्यस्वभावाची जी स्थिति असेल त्या स्थित्यनुसार त्यांमध्यें अवश्य फेरबदल झालाच पाहिजे. मुलें आईबाप व एकंदर जनसमाज यांमध्यें जे कांहीं दोष असतील त्या दोषांचे मानानें त्यांमध्यें कमजास्त फरक पडलाच पाहिजे, आणि एकंदर मनुष्यस्वभाव जसजसा सुधारत जाईल तसतसाच त्या नीतिमार्गांचा अव्याहत प्रसार होण्याची आशा; एरवीं नाहीं.

पुन्हां आमचा प्रतिपक्षी असें म्हणूं शकेल कीं, ठीक आहे, तर मग कांहीं झालें तरी एवढें उघड आहे कीं, अमुक गृहशिक्षण सर्वांत उत्तम अशी गृहशिक्षणासंबंधी इयत्ता ठरविण्यांत कांहीं हांशील नाहीं; आमच्या स्थितीच्या मानानें अधिक चांगली अशी शिक्षणपद्धति भगीरथप्रयत्नानें शोधून काढणें यांत कांहीं फायदा नाहीं. परंतु यावरही आमचें म्हणणें असें आहे कीं, राजकीयव्यवस्थेप्रमाणेंच कुटुंबव्यवस्थेचा प्रकार आहे. तत्वदृष्टीनें घालून दिलेला अत्युत्तम नीतिमार्ग जरी आज आचरण्यास कठीण झाला तरी तो मार्ग कोणता हें समजणें अत्यंत आवश्यक होय. कारण खरा मार्ग एकदां समजला म्हणजे ज्या ज्या सुधारणा आम्ही करूं त्या त्या सत्यापासून दूर न जातां सत्याकडेसच वळत जातील. सर्वांत उत्तम मार्ग कोणता हें एकदां ठरलें म्हणजे हळू हळू त्या मार्गास पोहोंचण्याचे प्रयत्न क्रमाक्रमानें होत जातील. उत्तम कोणतें तें ठरविलें म्हणजे त्यापासून अनिष्ट परिणाम होतील अशी भीति बाळगण्याचें कारण नाहीं. एकंदरीनें पाहतां मनुष्यजातीचे हाडीं खिळलेलें जें गतानुगतिकत्व आहे तें इतकें जबरदस्त बळकट आहे कीं, मनुष्य सुधारणेच्या कामांत धांव घेऊं लागला असतां तें त्याला अटकावून ठेवील. जगांतील स्थिति अशी आहे कीं, कोणतेंही नवीन मत निघालें असतां त्या मतास अनुकूल अशी मनुष्याच्या मनाची स्थिति होईपर्यंत मनुष्याच्यानें त्या मताचा अंगीकार करवतच नाहीं. मनुष्य बोलण्यामध्यें

त्याचा अंगीकार करील, परंतु खरा अंगीकार त्याच्यानें होणार नाहीं; आणि एखाद्या मताच्या सत्यतेबद्दल खात्री झाली तरी तदनुसार वर्तन होण्यास इतकीं शेंकडों विघ्नें येतात कीं, परोपकारपरायण सद्गृहस्थांची तर काय, परंतु तत्ववेत्त्यांचीही शांतवृत्ति त्यापुढें हात टेंकिते. यास्तव आपण हें नेहमीं लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, बालशिक्षणाची एखादी नवीन पद्धति शोधून काढून त्याप्रमाणें आपण वर्तण्यास लागलों असतां आपण भरकटून जाऊं अशी जर कित्येकांस भीति असेल तर ती अगदीं निराधार आहे. कारण त्या पद्धत्यनुसार वर्तन ठेवितांना ज्या शेंकडों अडचणी आपणांस येणार, त्या अडचणीच आपणांस सहजी ताळ्यावर आणितील.

इतक्या गोष्टी उपोद्घातरूपानें सांगितल्यानंतर आतां आपण नीतिशिक्षणाचा खरा उद्देश व त्याची खरी पद्धति यांविषयीं विचार करूं. प्रथमतः कांहीं पृष्ठें सर्वव्यापक तत्वांचा विचार करण्यांत जातील. तें प्रतिपादन आटपेपर्यंत आमचे वाचकांनीं शांतवृत्तीचें अवलंबन करावें अशी आमची त्यांस प्रार्थना आहे. तें प्रतिपादन आटपल्यानंतर मग कुटुंबव्यवस्थेंत घटकेघटकेस येणाऱ्या अडचणींच्या प्रसंगीं आईबापांचें वर्तन कोणत्या प्रकारचें असलें पाहिजे हें आह्मीं व्यवहारांतील उदाहरणें घेऊन स्पष्ट करून दाखवूं.

जेव्हां एखादें मूल पडतें किंवा खांबाबिंबाला डोकें आपटून त्यास टेंगूळ येतें, तेव्हां मुलाला इजा होते, आणि त्या इजेची आठवण इतकी पक्की राहते कीं तेंच मूल दुसऱ्या खेपेस सावधगिरीनें वागतें; आणि अशाच प्रकारचा अनुभव तीनचारदां आला ह्मणजे शेवटीं मुलाचे शारीरिक व्यापार सुरळीतपणें चालूं लागतात. एखादे वेळेस मुलानें तापलेली पळी जर हातांत धरिली किंवा दिव्याचे ज्योतीवर जर आपलें बोट धरिलें, किंवा आधणाचें पाणी जर अंगावर ओतून घेतलें, तर तें मूल हटकून भाजल्याशिवाय राहणार नाहीं. ह्मणजे त्याची आठवण बरेच दिवस राहणार आणि असाच प्रकार पांच चार वेळां झाला ह्मणजे मनावर इतका पक्का ग्रह बसतो कीं, विस्तवांत हात गेला तर भाजावयाचाच. कठीण वस्तूंवर आपटलें असतां टेंगूळ यावयाचें इत्यादि जे शारीरिक धर्म किंवा शारीरिक व्यवस्थेचे नियम त्यांकडे तें

आपोआप दुर्लक्ष करीनासें होतें. आतां या व अशा गोष्टींनीं नीतिशिक्षणाची खरी उपपत्ति काय व खरी पद्धति कोणती हें ईश्वर आपणांस फार सोप्या रीतीनें व्यक्त करून दाखवितो. आतां नेहमीं बोलण्यामध्यें येत असणाऱ्या ज्या उपपत्ति व पद्धति त्यांसारखीच ही उपपत्ति व पद्धति आहे असें वर वर विचार करणाऱ्या लोकांस कदाचित् वाटेल; परंतु त्यांपेक्षां ही अगदीं भिन्न आहे असें आपल्यास विचाराअंतीं कळून येईल.

आतां प्रथमतः पहिली लक्षांत ठेवण्याजोगी गोष्ट ही आहे कीं, अपराध व त्याचे परिणाम यांचें मूलरूप मुलांच्या शरीराचे संबंधानें होणाऱ्या चुका व त्यामुळें नंतर झालेली शिक्षा यांत स्पष्टपणें दिसून येतें. शरीरसंबंधी चुका झाली असतां त्याची शिक्षा आपणांस होते याचा अर्थ इतकाच कीं, आपलेकडून अपराध झाला ह्मणजे त्याचे परिणाम आपणांस भोगावे लागतात. ज्या कृत्यांचे परिणाम केवळ शारीरिकच आहेत, अशा कृत्यांच्या संबंधानें सत् आणि असत् हे शब्द बहुधां लावीत नाहींत असा व्यवहार आहे खरा, तथापि जो या गोष्टींचा विचार करील त्यास असें आढळेल कीं, हे शब्द अशा प्रकारच्या कृत्यांसही लागू करण्यास कांहींएक हरकत नाहीं. कोणतेंही तत्व घेऊन नीतिशास्त्राचा विचार केला तरी असें वाटतें कीं, ज्या कृत्याचे परिणाम प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष एकंदरीनें पाहतां सुखावह आहेत, तेंच कृत्य सत् किंवा चांगलें व ज्याचा परिणाम असुखावह आहे तेंच असत् किंवा वाईट. सारांश वर्तनाचें चांगलेंपण किंवा वाईटपण ह्याच बीज झटलें ह्मणजे तज्जन्य सुखदुःख हेंच होय. सुरापानाचा आपण निषेध करितों ह्मणजे तें आपणास असत् किंवा वाईट वाटतें. कारण त्यापासून त्याची संतति व त्याजवर अवलंबून असणारे इतर लोक यांस शारीरिक क्षीणता व दुसरे कित्येक अनिष्ट परिणाम भोगावे लागतात; चोरीपासून चोरास व चोरीस गेलेल्या वस्तूच्या मालकास आनंदच होत जाता तर चोरीची पातकांमध्यें गणना झाली नसती. भूतदयेचे कृत्यापासून जगांत विपत्ति वाढते असें जर असतें, तर आपण अशीं कृत्यें निंद्य मानिलीं असतीं; त्यांस भूतदयेचीं कृत्यें ही संज्ञाच दिली नसती. कोणत्याही साधारण एखाद्या वर्तमानपत्रांतील निबंध घ्या; किंवा लोकांचीं आपसांत जीं सामाजिक विषयांवर बोलणीं चालणीं होतात, तीं ऐका; किंवा कायदेकौन्सिलानें पसंत केलेला एखादा

कायदा पाहा; अथवा राजकीय गोष्टींबद्दल ज्या खटपटी होतात त्या खटपटींचा विचार करा; किंवा सार्वजनिक हितावद्दल जी कित्येकवेळां चळवळ होते तिकडे लक्ष द्या; किंवा व्यक्तिविशेषांचींही कृत्यें अवलोकन करा; तुम्हांस निःसंशय असें दिसून येईल कीं, ह्या गोष्टींपैकीं कोणतीही गोष्ट चांगली किंवा वाईट, हें ठरवितांना लोक तिजपासून सुख होईल किंवा दुःख होईल हेंच नेहमीं पाहतात. आणि सर्व आनुषंगिक गोष्टी एकीकडे ठेवून सूक्ष्म विचार केला असतां सत् व असत् यांचें खरें बीज ह्मणजे सुखोत्पादकता व असुखोत्पादकता हेंच होय असें जर स्पष्ट दिसून येतें, तर शारीरिक व्यापारांचे संबंधानें मात्र तज्जन्य सुखोत्पादक किंवा असुखोत्पादक परिणामानुसार सत् आणि असत् हे शब्द लावावयाचे नाहींत हें ह्मणणें कसें शोभेल ? अर्थात् त्यांसही हे शब्द लाविले पाहिजेत हें उघड आहे.

आतां दुसरी गोष्ट लक्षांत ठेवण्याजोगी ह्मणजे शरीराचे संबंधानें होणाऱ्या चुका ह्मणजे शारीरिक प्रमाद ज्या शिक्षेच्या भीतीनें आपण न करण्याची खबरदारी ठेवितों, त्या शिक्षेचें स्वरूप ही होय. दुसरा चांगला शब्द सांपडत नसल्यामुळें आह्मांस शिक्षा या शब्दाचाच प्रयोग करणें भाग आहे. परंतु शिक्षा हा शब्द येथें अन्वर्थक नाहीं; वास्तविक रीतीनें पाहतां ही शिक्षा ह्मणजे उगाच कृत्रिम रीतीनें दिलेलें शारीरिक दुःख नव्हे, तर शारीरिक कल्याणास अपायकारक अशीं जीं कृत्यें त्यांचा निग्रह करण्याचें हें एक साधन आहे; आणि हें साधन इतकें अवश्य आहे कीं, तें नसेल तर अनेक शारीरिक व्यथांनीं जीवित केव्हांच नाशाप्रत पावेल. शिवाय या निग्रहसाधनाचें किंवा शिक्षेचें आणखी एक विशेष स्वरूप असें आहे कीं, ज्या कृत्यांबद्दल ही शिक्षा असते, त्या कृत्यांचा ती केवळ अनिवार्य परिणाम होय. ह्यापेक्षां तींत कांहीं ज्यास्ती नसतें.

तिसरी गोष्ट लक्षांत ठेवण्याजोगी ही कीं, ही शिक्षा किंवा हे दुःखकारक परिणाम अपराधांच्या मानानें कमी किंवा जास्त असतात. क्षुल्लक चुकी असेल तर तिजपासून होणारें दुःखही क्षुल्लकच असतें. मोठी चुकी असेल तर दुःखही मोठें असतें. मूल उंबरठ्यावरून पडलें ह्मणजे त्यास उगीच जरूर तितक्यापेक्षां जास्त दुःख व्हावें व त्या दुःखामुळें तें जितक्या सावधगिरीनें वागेल त्यापेक्षां जास्ती सावधगिरीनें व काळजीनें त्यानें वागावें, असा ईश्वराचा संकेत नाहीं. रोज नवीन नवीन अनुभव त्यास

येऊन आपल्या हातून लहान मोठ्या चुका कशा होतात, हें त्यास कळून तदनुसार त्यानें आपलें वर्तन ठेवावें असाच ईश्वरी संकेत आहे.

आतां शेवटची गोष्ट लक्षांत ठेवावयाची ती मुलांच्या अपराधांचे साहजिक परिणामांचें स्वरूप ही होय. त्या परिणामांचा प्रकार असा असतो. एखाद्या मुलानें कांहीं एक अपराध केला म्हणजे त्याचा जो परिणाम होतो, तोच परिणाम पुन्हां पूर्वीचा अपराध केला असतां होतो, त्यामध्यें फेरबदल होत नाहीं. म्हणजे हे परिणाम अविकार्य असतात. अपराध झाला असतां त्याचे परिणाम आडून आडून परोक्षरीतीनें होत नाहींत, प्रत्यक्ष रीतीनें होतात, म्हणजे हे परिणाम प्रत्यक्ष असतात. अपराध झाला असतां परिणाम अनिश्चितपणें किंवा विलंबानें होत नाहींत; म्हणजे ते परिणाम ताबडतोब होणारे निश्चित व अविलंबित असे असतात. व त्याचप्रमाणें हे परिणाम आज घडले उद्यां नाहींत; एखादे वेळेस झाले, दुसरे वेळेस चुकले; असें कधींही होत नाहीं. म्हणजे ते कधींही टाळले जात नाहींत. अर्थात् ते अनिवार्य असतात. सारांश हे परिणाम अविकार्य, प्रत्यक्ष, अविलंबित व अनिवार्य असे असतात. व हे परिणाम म्हणजे नुसती धमकी नव्हे, तर त्यांचा व्यापार किंवा त्यांची क्रिया गोंगाट केल्याशिवाय निमुटपणें, परंतु अव्याहत सुरू असते. उदाहरणार्थ पहा, एखाद्या मुलाचें बोट जर सुईनें भोंसकलें तर तर लागलेंच त्यास दुःख होतें. पुन्हां जर सुई बोटांत भोंसकली, तर तोच परिणाम. याप्रमाणें 'यावच्चंद्रदिवाकरौ' चालणार. तात्पर्य मुलांचे सृष्टींतील जड पदार्थांशीं जे झगुन व्यापार होतात, त्यांमध्यें विलक्षण प्रकारची अविकार्यता किंवा स्थैर्य दृष्टीस पडतें. त्या जड पदार्थांचे अंगीं दयामाया नाहीं. ते तुमच्या सबबीकडे लक्ष देत नाहींत. त्यांनीं जें केलें त्यावर फिर्याद नाहीं. अशा प्रकारची कडक, परंतु परिणामीं कल्याणकारक स्थिति जड पदार्थांचे ठायीं जेव्हां मूल अवलोकन करितें, तेव्हां त्या संबंधानें चुका न होऊं देण्याविषयीं तें अर्थात् फारच खबरदारी घेऊं लागतें.

बाल्यावस्थेप्रमाणें प्रौढ दशेंतही या गोष्टींचा असाच प्रकार आहे हें लक्षांत आलें म्हणजे त्यांचें महत्व विशेष ध्यानांत येण्याजोगें आहे. कृत्यांच्या नैसर्गिक परिणामांचें अनुभवसिद्ध संपादित केलेलें ज्ञान हेंच स-

नुष्याला म्हणजे स्त्रिया व पुरुष या दोहोंसही त्यांच्या प्रौढा वस्थेंत कुमार्गापासून सन्मार्गाकडे लावणारें असतें. गृह-शिक्षण किंवा शालाशिक्षण संपलें म्हणजे मग अर्थात् हें करूं नको, तें करूं नको, असा वेळोवेळीं उपदेश करणारे आईबाप व शिक्षक यांचें सान्निध्य सुटलेंच; मग ज्या प्रकारच्या शिक्षणाचे योगानें लहान मुलास बाल्यावस्थेतील आपले व्यापारांचे संबंधानें ज्ञान होऊन तें आत्मकल्या-णास अनुकूल असें आपलें वर्तन ठेवूं लागतें, त्याचप्रकारचे शिक्षणाचा उपयोग होऊं लागतो. एखादा मनुष्य जगांत वागूं लागल्यावर आपला वेळ आळसांत घालवून आपल्यावर सोंपविलेलें काम जर अडाणीपणानें किंवा स्तिमितपणानें करूं लागला, तर हळू हळू नैसर्गिक परिणाम होतोच होतो. त्याजपासून तें काम काढून घेतात; आणि मग त्यास कांहीं वेळ-पर्यंत तरी त्यामुळें आलेल्या दारिद्र्याचीं दुःखें भोगावीं लागतात. ज्याचीं कामें कधींही नियमित वेळीं व्हावयाचीं नाहींत असा एखादा अनि-यमित मनुष्य असला म्हणजे त्यानें एखाद्या कामाकरितां किंवा एखा-दी चैन मारण्याकरितां किंवा गमतीकरितां अमुक ठिकाणीं अमुक वेळीं जावयाचें असें ठरविलें असलें, तरी त्याची ती वेळ चुकावयाचीच; आणि त्याचें तें काम किंवा ती मौज याला तो मुकावयाचाच. असें झालें म्हणजे त्याचा नैसर्गिक परिणाम अवश्य झाल्याखेरीज राहावयाचा नाहींच. तो नैसर्गिक परिणाम कोणता तर हा कीं त्याची जिकडे तिकडे गैरसोय व्हावयाची, मिळावयाचें असेल तें मिळावयाचें नाहीं, व जवळ असेल तेंही जावयाचें. एखादा व्यापारी अतिशय महागरा असला म्हणजे अ-र्थात् त्याची गिऱ्हाइकी कमी होते म्हणजे मग त्याचा लोभ कमी झालाच, लटपट उडवणाऱ्या वैद्याचा धंदा कमी पडूं लागला म्हणजे रोग्यांची काळ-जी तो आपोआप विशेष घेऊं लागतो. भोळसर सावकार व उतावळे अ-विचारी सट्ट्यांचे व्यापारी यांस त्यांच्या त्या भोळसरपणामुळें व उतावीळ-पणामुळें अडचणी येत गेल्या, म्हणजे आपले धंद्यामध्यें विशेष दक्षतेनें, व विचारानें वागलें पाहिजे हें आपोआप त्यांस कळतें. याप्रमाणें सर्व धंद्यांची स्थिति आहे. "लहान मूल भाजलें कीं विस्तवाला भ्यावयास लागतें" असें पु-ष्कळांच्या बोलण्यांतही येतें. हा तरी वर सांगितलेल्या गोष्टींचाच गर्भित रीतीनें उल्लेख आहे, व यावरून मनुष्य जगांत वागूं लागल्यावर त्यास

जें शिक्षण मिळतें तें, व मुलास बाल्यावस्थेंत ईश्वर जें शिक्षण देतो तें, या दोन शिक्षणांत सर्वांशीं साम्य आहे हें सर्व लोक पूर्णपणें कबूल करितात असें होतें; इतकेंच नाहीं, तर हेंच शिक्षण सर्वांत अत्युत्तम व श्रेयस्कर अशी त्यांची खात्रीही झालेली दिसते. शिवाय या झालेल्या खात्रीचा उल्लेख झणजे नेहमीं गर्भितच रूपानें होतो असें नाहीं, तर कित्येक वेळां स्पष्ट रीतीनेंही होतो. चांगला चरत्ररीत इंगा फिरेपर्यंत पूर्वी लागलेलें दुर्व्यसन सोडून देण्याची आपणांस बुद्धि झाली नाहीं असें पुष्कळांनीं कबूल केलेलें आमच्या वाचकांपैकीं प्रत्येकास माहीत असेल. अमुक उधळ्या किंवा खटपटी मनुष्यावर टीका होऊं लागली, लोक त्यास सांगून सांगून थकले, व शेवटीं अनुभवरूपी अंजनानेंच त्याचे डोळे उघडले, असें पुष्कळ लोकांना बोलतांना आमच्या वाचकांनीं ऐकिलें असेल. अनुभवरूपी अंजन झणजे काय? अनिवार्य परिणाम भोगावयाला लागणें. शिवाय नैसर्गिक परिणाम भोगावयाला लावणें हें अत्युत्कृष्ट शासन इतकेंच नव्हे, तर मनुष्यानें शोधून काढलेल्या कोणत्याही शासनाच्या योगानें याची बरोबरी करवणार नाहीं, असें आम्ही बेधडक झणूं शकतों. व हें इतकें उघड आहे कीं, यास सिद्धतेची बिलकुल जरूरी नाहीं. तथापि जरूरी असेलच तर निरनिराळ्या देशांतले आमचे नाना प्रकारचे फौजदारी कायदे त्यांचा इष्ट हेतु सिद्धीस न गेल्यामुळें कसे निष्फळ झाले आहेत, हें पहावें झणजे झालें. निरनिराळ्या शिक्षांची योजना करून आजपर्यंत कोट्यावधि फौजदारी कायदे या जगावर लोकांनीं काढिले आहेत. परंतु त्यांपैकीं एकातरी कायद्याच्या योगानें तो कायदा काढणाऱ्याच्या मनांत त्याच्या उपयुक्ततेबद्दल असलेली आशा सफळ झाली आहे काय? कृत्रिम शासनांचे योगानें आजपर्यंत कोंडेही सुधारणा झालेली नाहीं इतकेंच नव्हे, तर कित्येकांच्या योगानें उलटे गुन्हे वाढले आहेत; व झणून ईश्वर ज्या शिक्षणपद्धतीचा उपयोग करितो, तिजलाच अनुसरून जेथें कैदीवर शिस्त सुरू आहे असे तुरुंग प्रचारांत आले व त्यांचा बराच उपयोगही झाला. या ठिकाणीं अपराधाचे नैसर्गिक परिणाम भोगावयाला लावण्यापेक्षां ज्यास्त कांहींएक शासन करीत नाहींत. एखाद्यानें अपराध केला झणजे इतर लोकांस उपद्रव होऊं नये, झणून जरूर तितकेंच त्याचें स्वातंत्र्य कमी करितात. व याप्रमाणें जरूर ति-

तक्याच प्रतिबंधांत त्यास ठेवून, तो प्रतिबंध आहे तोंपर्यंत स्वतां-च्या परिश्रमानें आपला उदरनिर्वाह करण्यास त्यास लाविलात. सा-रांश यावरून दोन गोष्टी सिद्ध झाल्या. त्यांपैकीं पहिली ही कीं, ज्या शिक्षणानुसार मनुष्य बाल्यावस्थेंतील आपले व्यापार सुरळीत चाल-विते, तेंच शिक्षण कमजास्त सुधारलें जाऊन प्रौढ वयांतही मनुष्यमा-त्राचें संनियमन करितें; व दुसरी गोष्ट ही कीं, प्रौढ वयांत लोकांचे संनियमनार्थ ठरविलेली शिक्षणपद्धति कोणत्याही मनुष्यानें काढलेली असो; ती वर सांगितलेल्या पद्धतीहून जितकी जितकी भिन्न असेल, तितकी तितकी निष्फळ व्हावयाचीच; व त्या पद्धतीशीं ती जितकी जितकी जुळून असेल, तितकी तितकी सफल झाल्यावांचून राहावयाची नाहीं.

तर आतां ह्यावरून नीतिशिक्षण कसें असावें, हें आपणांस समजलें नाहीं काय? ज्या पद्धतीचे परिणाम बाल्यावस्थेंत व प्रौढावस्थेंत इतके कल्याणकारक आहेत असें आपणांस दिसून येतें, ती स्थिति बाल्यावस्था व प्रौढावस्था यांचे मधील स्थितींतही मनुष्यास कल्याणकारक होईल असें साहजिक अनुमान होत नाहीं काय? ज्या पद्धतीचा उपयोग पहिल्या व शेवटच्या स्थितींत होतो, तीच पद्धति मधल्या स्थितींत मात्र उपयोगी पड-णार नाहीं असें कोणास सांगितलें तर तें त्यास खरें वाटेल काय? ईश्वर सृष्टींतील जड पदार्थांचे संबंधानें मनुष्यांस ज्या रीतीनें शिक्षण देतो, त्याच रीतीचा कित्ता मनुष्यांनींही आपले मुलांचे शिक्षणाचे बाबतींत वळ-विला पाहिजे असें जर आहे, तर आईबापांनीं नेहमीं आपले मुलांस त्यांचे वर्तनाचे योग्य परिणाम भोगावयास लाविले पाहिजेत, हें उघड होत नाहीं काय? मात्र हे परिणाम योग्य रीतीनेंच भोगावयास लाविले पाहिजेत; ह्मणजे अपराध झाला असतां त्याचे जे परिणाम व्हावयाचे ते तसेच होऊं दिले पाहिजेत, त्यांचे आड येतां कामानये; त्याचप्रमाणें ते अस-तील त्यापेक्षां जास्त कडक करतां कामानये; योग्य परिणाम तेच भो-गावयास लाविले पाहिजेत, त्यांच्या ऐवजीं दुसरे कृत्रिम परिणाम भो-गावयास लावितां कामानये. या सर्व गोष्टी इतक्या उघड आहेत कीं, आमच्या वाचकांपैकीं प्रत्येक त्यांची सत्यता एकदम कबूल करील.

आतां पुष्कळ लोक कदाचित् असें ह्मणतील कीं, हल्लींही पुष्कळ आई-बाप ह्याप्रमाणें वागतात. शंभरांपैकीं नव्वद आईबापें आपल्या मुलांस

श्री समर्थ ग्रंथमाला, सातारा.

जी शिक्षा करितात, ती मुलांच्या अपराधाचा योग्य परिणामच असते. बापाला राग येऊन मुलाचे अपराधाबद्दल त्यास त्यानें शिव्या दिल्या, किंवा मारिलें, ह्मणजे त्याच्या योगानें मुलाचे शरीरास किंवा मनास दुःख होतें, ह्याचातरी अर्थ मूल आपल्या दुर्वर्तनाचा नैसर्गिक परिणाम भोगितें, असाच नव्हे काय? हें बोलणें जरी पुष्कळअंशीं चुकीचें आहे, तरी त्यांत कांहीं अंशीं सत्यताही आहे. आईबापांना आलेला राग, हाही मुलाच्या अपराधाचा योग्य परिणाम आहे, हें निर्विवाद होय. व त्या रागाच्या प्रादुर्भावामुळें मुलाचे अपराधही कमी होतात, ह्यांत संशय नाहीं कित्येक रागीट लोक मुलाचे हातून अपराध झाला ह्मणजे त्यास शिव्या देतात, किंवा दटावतात, किंवा प्रत्यक्ष मारही देतात, ह्या सर्व गोष्टी बापाकडून होतात खऱ्या, तथापि मुलाचे अपराध हेंही त्यांचें कारण असतें म्हणजे अर्थात् त्या सर्व गोष्टी मुलाच्या अपराधांचे एक प्रकारचे नैसर्गिक परिणाम होत. असें जर आहे, तर अशा प्रकारची शासनपद्धतिही ग्राह्य असली पाहिजे. परंतु ह्यावर आमचें असें म्हणणें आहे कीं, अशा प्रकारची ही पद्धति ग्राह्य आहे, तथापि सर्व काळीं व सर्व स्थळीं मात्र नाहीं. तिची ग्राह्यता व्यापक नसून एकदेशीय आहे. अडाणी व ज्यांस आत्मसंयमन ह्मणजे काय हें माहीत नाहीं, अशा अशिक्षित लोकांच्या त्यांच्याच सारख्या उच्छृंखल मुलांस हीच पद्धति योग्य आहे, व उच्छृंखल लोक ज्या समाजांत आहेत, त्या समाजांत ह्याच शासनपद्धतीचा उपयोग होणार हें आह्मांस सर्वांशीं कबूल आहे. आह्मी वर सांगितलेंच आहे कीं, राजकीय व इतर गोष्टींप्रमाणेंच शिक्षणपद्धतीचे चांगलेवाईटपणाचा निर्णय करणें झाल्यास तो निर्णय तत्कालीन साधारण मनुष्यस्वभावाची स्थिति पाहून तदनुसारच आपण करितों. अशिक्षित लोकांचे अशिक्षित मुलांचें संनियमन अशा दांडगाईच्याच रीतींनीं होण्याचा संभव; व ह्या रीतींचा उपयोग अशा प्रकारचे लोक सांगितल्याशिवाय आपोआपच करितात. शिवाय ह्या मुलांस प्रौढ वयांत तरी अशिक्षित समाजांतच वागावयाचें असतें. आणि तशा प्रकारच्या वर्तनास तयारीही तशाच प्रकारची पाहिजे; व त्याच्या तयारीस मारझोडीचेंच शिक्षण उत्तम असें ह्मटलें तरी चालेल. आतां सुशिक्षित लोकांची स्थिति मात्र याहून अगदीं उलट

आहे. त्यांनाही राग येतो. परंतु ते त्या रागाचें आविष्करण दांडगाईनें व मारझोडीनें न करितां आपल्या सुशिक्षितपणामुळें साहजिकच शांत व सौम्य रीतीनें करितात; आणि अशा प्रकारचें सौम्य वर्तनच त्यांच्या सुशिक्षित मुलांस बस होतें.तर एकंदरींत ह्यावरून इतकें झालें कीं,जेव्हां जेव्हां आईबाप आपल्या मुलांवर रागावतात, तेव्हां तेव्हां तरी आमचे नैसर्गिक परिणामाचें जें तत्व आहे, त्या तत्वानुसारच तीं कमजास्त प्रकारें वागतात. सारांश गृहशिक्षणपद्धतीचा विचार केला असतां असें दिसून येतें कीं, तिची साहजिक प्रवृत्ति खऱ्या स्थितीप्रत जाऊन पोहोंचण्याकडेसच आहे.

परंतु या संबंधानें दोन गोष्टी फार महत्वाच्या आहेत.त्यांचा विचार येथें केला पाहिजे. त्यांपैकीं पहिली गोष्ट ही कीं, ज्या समाजाची स्थिति दिवसदिवस बदलणारी आहे अशा समाजांत नेहमीं प्राचीन मतें व चाली ह्यांचा अर्वाचीन मतें व चाली ह्यांच्याशीं एकसारखा सामना सुरू असतो. अशी स्थिति असली ह्मणजे अर्थात् कोणत्याही एखाद्या काला चालू असलेली शिक्षणपद्धति तत्कालीन सामाजिक स्थितीशा पुष्कळ अंशीं न जमणारी अशी असण्याचा संभव असतो. शिक्षणाविषयीं प्रचारांत असलेले सिद्धांत त्या कालीं निघालेले नसून पूर्वीच्या कालीं निघालेले असतात, व ह्मणून ते गतकालीन सामाजिक स्थितीसच योग्य असतात. परंतु पुष्कळ लोक आपल्या मुलांशीं त्या सिद्धांतांनुसार वर्तन ठेवितात, व यामुळें त्यांनीं आपल्या मुलांस केलेल्या शासनापासून त्यांचे मनास त्रास झाल्यावांचून राहत नाहीं; असें झालें ह्मणजे तें शासन मुलांच्या अपराधाचा नैसर्गिक परिणाम असें कधींतरी ह्मणतां येईल काय? शिवाय कित्येक लोकांची तर अशी तऱ्हा आहे कीं,ते आपलीं मुलें तावडतोब सर्वोत्कृष्ट होतील अशा आशेनें त्यांच्याशीं आपलें वर्तन वरच्याहून अगदीं उलट अशा रीतीचें ठेवितात. दुसरी गोष्ट अशी आहे कीं, आईबापांचा संतोष किंवा असंतोष याचा अनुभव हेंच श्रेयस्कर शिक्षण नव्हे. अत्युत्तम शिक्षण ह्मणजे,हें करूं नको, तें करूं नको, हें चांगलें केलें,तें वाईट केलें,असें सांगण्यास आईबाप जवळ नसतांना आपल्या वर्तनाचे जे परिणाम होतात, त्यांचा अनुभव हेंच होय. खरोखर कल्याणकारक व आपली सुधारणा करणारे परिणाम कोणते म्हणाल तर जगांतील आपले वर्तनापासून आपोआप घडून येणारे

तेच होत; आईबापांनीं आपणच होऊन ईश्वराचे मुखत्यार बनून घडवून आणिलेल ते नव्हत. ह्या वर सांगितलेल्या दोन परिणामांमधील भेद, आतां आह्मी कांहीं उदाहरणें घेऊन,स्पष्टकरून दाखवितों. या उदाहरणांच्या योगानें आह्मी नैसर्गिक परिणाम आणि कृत्रिम परिणाम ह्मणून जें कांहीं ह्मणत आहों त्याचा अर्थ काय आहे हें व्यक्त होऊन, शिवाय कित्येक प्रसंगीं मुलांचे संबंधानें संसारांत आईबापांचें वर्तन कसें असावें हें जें पूर्वी आह्मीं तत्वदृष्ट्या सांगितलें आहे तें या उदाहरणांवरून कांहीं अंशीं व्यवहारदृष्ट्याही स्पष्ट होईल.

प्रत्येक मनुष्याच्या घरीं मुलें असलीं ह्मणजे त्यांचीं कांहींतरी खेळणीं असतात. खेळणीं बाहेर काढून मुलें तीं जमिनीवर इकडे तिकडे उडवून टाकावयाचींच. घरच्या शेतांतून हरभऱ्याचे टाळे वगैरे घरीं आले ह्मणजे तीं त्यांचा नासधूस करून ते उडविल्याशिवाय राहावयाचीं नाहींतच. बाहुल्याबिवल्या असल्या ह्मणजे त्यांच्या अंगावर घालावयाच्या चिंध्या आणि मण्यांचे किंवा खोट्या मोत्यांचे दागिने हे सर्व ओटीभर व्हावयाचेच. असें झालें ह्मणजे अस्ताव्यस्त पडलेल्या जिनसा उचलून ठेवण्याचें काम ज्याच्यावर वास्तविक पडावें त्याच्यावर न पडतां, भलत्यावरच पडतें. मूल खालीं ओटीवर वगैरे खेळत असलें ह्मणजे हें काम घरच्या मोलकरणीच्या किंवा गडग्याच्या डोक्यीवर बसतें; माडीवर दिवाणखान्यांत खेळत असलें ह्मणजे घरचा कारकून नाहीं तर थोरलें भावंड वेडींस सांपडतें; आणि खऱ्या अपराध्याला मोठी शिक्षा झटली ह्मणजे एखाद दुसरा रागाचा शब्द एवढीच. आतां कित्येक समंजस लोक आहेत, ते मात्र अशावेळीं योग्य रीतीनें वागतात. ज्या मुलानें जिनसा इकडे तिकडे विसकटून टाकिल्या असतील, त्यालाच ते उचलावयास लावितात; परंतु असे समंजस लोक प्रायः थोडेच असें ह्मणण्यास हरकत नाहीं. पुष्कळ लोकांची तऱ्हा वर सांगितल्याप्रमाणेंच असते. परंतु ही पुष्कळ लोकांची तऱ्हा अगदीं चुकीची नव्हे काय? जिनसा पुन्हा व्यवस्थेनें लावून ठेवण्याची मेहनत हाच न्या वस्तु अस्ताव्यस्त केल्याचा परिणाम होय. प्रत्येक व्यापाऱ्याला आपल्या दुकानाच्या संबंधानें, व प्रत्येक स्त्रीला आपल्या घराच्या संबंधानें, या गोष्टीचा अनुभव येत आहे. आतां शिक्षण

ह्मणजे प्रौढ वयांत जीं कामें करावीं लागतात त्यां संबंधानें तयारी असें जर आहे, तर प्रत्येक मुलालाही आरंभापासून या गोष्टीचा अनुभव असला पाहिजे हें उघड आहे. हें नैसर्गिक शासन भोगण्याचें हट्टी स्वभावामुळें मूल जर नाकबूल करील, (व पहिल्यापासून शिक्षण जर वाईट तऱ्हेचें असेल, तर मुलाच्या अंगीं हट्ट असण्याचा संभव आहे) तर त्या हट्टीपणाचाही नैसर्गिकपरिणाम त्यास भोगावयास लावणें,हीच त्यावर उत्तम तोड होय.मूल इकडे तिकडे जिनसा विसकटून टाकिल्यावर पुन्हां व्यवस्थेनें लावून ठेवण्यास जर नाकबूल करील, व त्यामुळें तें काम करण्याची मेहनत दुसऱ्या कोणावर पडेल, तर असा प्रकार पुन्हां करण्याची त्यास कधींही संधि देऊं नये ह्मणजे झालें. पुन्हां मूल खेळणीं मागूं लागलें ह्मणजे त्याच्या आईनें त्यास लखलखीत असें सांगावें कीं—मागल्या खेपेस तूं आपलीं खेळणीं जमिनीवर इकडे तिकडे विसकटून टाकिलीं होतीं, आणि तुझ्या ताईला तीं उचलून ठेवावीं लागलीं; तूं खेळणीं विसकटून टाकिलीं ह्मणजे ताईनें उचलून ठेवावीं एवढेंच काम तिला नाहीं, आणि मला तें काम करण्यास फुरसत नाहीं, बरें खेळ झाल्यावर तूं तर तीं उचलून ठेवावयाचा नाहींसच, तेव्हां तुला कांहीं तीं मिळावयाचीं नाहींत. मुलाच्या मागील अपराधाचा हा अगदीं नैसर्गिक परिणाम होय; त्यांत कमी किंवा जास्ती कांहीं एक नाहीं. आणि यांचें हें असें स्वरूप मुलालाही समजलें पाहिजे. शिवाय ही शिक्षा अशा वेळेस होते कीं त्यावेळीं मुलाला तिचें खरें स्वरूप कळलेंच पाहिजे. खेळावें असें मनांत येऊन भावी आनंदावद्दल कल्पना त्याच्या मनांत येते न येते तोंच त्या इच्छेचा सर्वस्वी मोड होतो; असें झालें ह्मणजे आपल्या इच्छेचा ज्याच्या योगानें मोड झाला त्या कारणाचा इतका बळकट ग्रह मनावर होऊन जातो कीं त्याचा त्याच्या भावी वर्तनावर चांगला परिणाम झाल्याशिवाय राहत नाहीं. असें पांचचारदां झालें ह्मणजे मुलानें आपली पहिली खोडी टाकून दिलीच असें समजावें. शिवाय या शिक्षणानें मूल आणखी एक अत्यंत महत्वाची गोष्ट लहानपणींच शिकून जातें. ती गोष्ट अशी कीं या आमच्या जगांत खरें सुख श्रमसाध्यच आहे; व ही गोष्ट त्यास जितकी लवकर समजेल तितकें चांगलें.

आतां दुसरें उदाहरण घेऊं. एक मुलगा होता, त्याची अशी कांहीं

खोड होती कीं घरांत जेवणाची वेळ झाली झणजे त्या वेळेस हा कांहीं तरी दुसरें कामें करीत बसावयाचा. नेहमीं जेवणाच्या वेळेस त्याच्या नांवानें हाकाहाक होत असे. येतों येतों असें झणून याला आपला एक दोन घटका उशीर व्हावयाचाच. असें झालें झणजे त्याच्या आईनें चरफडावें, घरांत बायकांनीं कुरकुरावें, व जेवणाऱ्या मंडळींनीं खोळंबावें, असा प्रकार नेहमीं चालत असे. मुलाच्या आईला लोकांनीं पुष्कळ वेळां सांगितलें कीं एकदोनदां हाका मारून मुलगा नाहीं आला, झणजे तुझी खुशाल बसत जा, व मुलगा पाडीमागून आला झणजे त्याच्याकरितां कोणी थांबूं नये व त्यानें त्यालाच वाढून घ्यावयास लावावें, व शेणउष्टेंही त्याच्याचकडून करवावें; याप्रमाणें झालें व अन्न निवाल्यामुळें दोन चार दिवस खरपुड्या खाव्या लागल्या झणजे तो जेवायला वेळच्यावेळीं आपोआप येऊं लागेल. परंतु याप्रमाणें तिनें कधीं केलें नाहीं; व यामुळें मुलगाही ताळ्यावर आला नाहीं. आतां असें पहा कीं, या जगांत मनुष्य चलाख नसला झणजे त्याचें कांहीं तरी नुकसान झाल्यावांचून राहत नाहीं. एखादेवेळेस आगबोट किंवा आगगाडी चुकते, किंवा बाजारांत एखादा चांगला माल आलेला असला झणजे हा तेथें जाण्याच्यापूर्वीच तो खपून जातो, किंवा एखादें संगीत नाटक असलें झणजे हा तेथें जाण्यापूर्वीच नाटक गृहांतील जागा भरून जातें. सारांश प्रत्येक मनुष्य कबूल करील कीं, लोक आपणांस उशीर होऊं नये झणून आपलीं कामें झटझट करितात याचें कारण स्तिमितपणानें होणाऱ्या नुकसानाची भीति हेंच होय. असें जर आहे तर या भीतीचा परिणाम मुलावरही होण्यास काय अडचण आहे? वरच्या उदाहरणांत मुलगा जर वेळेवर जेवावयास येत नाहीं, तर त्याचा नैसर्गिक परिणाम मंडळीबरोबर जेवण्यांत जी एक प्रकारची मौज असते त्या मौजेला मुकणें, अन्न निवाल्यामुळें खरपुड्या खावयास लागणें, व रोज उष्टाचा त्रास पडणें, हाच होय. आणि या परिणामाचा चारपांचदां अनुभव आला, व या सर्व त्रासाचें कारण आपला स्तिमितपणा असें त्या मुलास भासलें झणजे सुधारणा होण्यास कितीसा उशीर? निदान एवढें तरी खचित कीं, आईच्या पोकळ चरफडण्यापेक्षां हा उपाय शंभरपटीनें चांगला आहे. त्या चरफडण्यानें सुधारणा होण्याची तर आशाच नको, परंतु उलटा मुलगा निगरगट्ट मात्र होण्याचा संभव.

त्याचप्रमाणें मुलें निष्काळजीपणामुळें त्यांस दिलेली वस्तु जेव्हां सांडतात, किंवा तिची मोडतोड करितात, तेव्हां त्याबद्दल नैसर्गिक शिक्षा झटली झणजे ती वस्तु सांडल्यानें, किंवा तिची मोडतोड झाल्यानें, होणारी गैरसोय हीच होय. व हीच शिक्षा भोगल्यानें प्रौढ वयांतही मनुष्यें आपल्या चीजवस्तूंची विशेष काळजी घेऊं लागतात. सांडलेल्या वस्तूची उणीव व तिजबद्दल दुसरी मिळवून आणण्याचा खर्च, या गोष्टींनींच प्रौढ वयांत पुरुष व स्त्रिया आपली चीजवस्त जपून संभाळून ठेविली पाहिजे हें शिकतात; आणि ह्या गोष्टींचे संबंधानें मुलांचेंही शिक्षण त्यांच्या प्रमाणेंच असलें पाहिजे. आतां येथें एवढें मात्र सांगितलें पाहिजे कीं अगदीं लहानपणीं ज्यावेळीं मुलांची जड पदार्थांच्या आंगचे धर्म समजून घेण्याची क्रिया चालत असते, त्यावेळीं मुलांचे हातांत खेळण्याकरितां वस्तु दिली असतां मुलें ती ओढूनतोडून फोडून टाकितात, हें त्यांचे करणें त्यांच्या त्या ज्ञानसंपादनक्रियेस अनुकूल व आवश्यक असतें व त्यावेळीं त्यांस, निष्काळजीपणा झणजे काय, हें समजत नसतें. अशावेळच्या त्यांच्या स्थितीस अनुलक्षून आमचें हें वरील बोलणें नाहीं; तर ज्या काळीं मुलांस आपलें दुसऱ्याचें हें कळत असतें, व आपलें जें असेल तें संभाळून ठेवण्यापासून काय फायदा हेंही समजण्याची त्यांत थोडी शक्ति आलेली असते, त्या कालच्या त्यांच्या स्थितीसच अनुलक्षून आहे. एखाद्या मुलाला लेखण्या वगैरे करण्याकरितां बापानें दिलेला चाकू त्यानें भलत्याच कशावर तरी चालवून तो मोडून टाकिला किंवा सांडिला, तर बाप अविचारी असल्यामुळें किंवा मुलगा विशेष लाडका असल्यामुळें बाजारांतून लागलाच त्यास दुसरा चाकू आणून देतो; असें झाल्यानें मुलास जी एक महत्वाची गोष्ट कळावयाची असते, तीस हरकत येत नाहीं काय? अशा वेळीं वास्तविक झटलें झणजे बापानें मुलास असें सांगितलें पाहिजे कीं, बाबा, चाकूला पैसे पडतात, पैसे मिळविण्यास श्रम करावे लागतात, आणि वरचेवर तूं जर आपले चाकू मोडूं किंवा सांडूं लागलास, तर माझ्यानें तुला नवीन नवीन चाकू कसे देववतील ? इतकें सांगून मुलगा आपल्या चीजवस्तेची विशेष काळजी घेऊं लागला, असें आढळून येईपर्यंत त्यास दुसरा चाकू आणून देऊं नये. अशाच प्रकारच्या शिक्षणानें उधळ्या मनुष्यासही ताळ्यावर आणतां येईल.

हीं वर सांगितलेलीं उदाहरणं अगदीं रोजच्या वहिवाटींतलीं असून अगदीं साधीं आहेत; यावरून आतां नैसर्गिक परिणाम आणि कृत्रिम परिणाम यांमध्यें भेद काय आहे, हें स्पष्ट होईल. वरील उदाहरणांनीं ज्या तत्त्वाचें आह्मीं निरूपण केलं, तें तत्त्व विशेष भानगडीच्या प्रसंगीं ही लागूं कसें पडतें, हे आपण आतां पाहूं. परंतु त्यापूर्वी बालाशिक्षणाचे संबंधानें हल्लीं जें तत्त्व (परंतु ह्याला तत्त्व हें नांव देतां येणार नाहीं) किंवा दोनचार गोष्टावरून बसविलेला जो संप्रदाय प्रचारांत सुरू आहे, त्यापेक्षां आमचं वरील तत्त्व कोणकोणत्या बाबतींत विशेष फायदेशीर आहे, याचा विचार करूं.

पहिला फायदा हा कीं, आमचें वरील तत्त्व पूर्णपणें अमलांत आल्यानें, कार्यकारणभावाचें यथ्य ज्ञान मुलांस होत जाईल, आणि त्या तत्त्वाचा अव्याहत अनुभव बरेच दिवस येत गेला ह्मणजे कार्यकारणभावाविषयीं मनांत बसलेला कल्पना पूर्णत्वाप्रत जाऊन दृढ व व्यक्त अशी होईल. अमुक कृत्याचा परिणाम चांगला, अमुक कृत्याचा वाईट, हें मनुष्यास स्वतःच्या विचारानें समजलेलं असलें ह्मणजे त्या योगानें त्याचं वर्तन चांगलं असण्याचा जितका संभव असतो, तितका या गोष्टी केवळ "बाबावाक्यं प्रमाणं" या न्यायानें त्याच्या मनांत बागल्यानें नसतो. अव्यवस्थेमळे व्यवस्थची मेहनत पडते असं मुलाला एकदां कळून आलें, किंवा त्याच्या सिनामनपणामुळें त्याचा एखादी मौज बुडाली, किंवा निष्काळजीपणामुळें एखाद्या प्रिय वस्तला तो मुकला. ह्मणजे त्यास तीव्र दुःख होतें इतकंच नाहीं, तर त्या बरोबर कार्यकारणभावाचेंही ज्ञान त्यास प्राप्त होतें. आणि या दोन्ही गोष्टांची स्थिति प्रौढावस्थेप्रमाणेंच बाल्यावस्थेंत असते. आतां जर मुलाला अशा वेळीं नुसत्या शिव्याच दिल्या, किंवा दुसरं एखादं कृत्रिम शासन केलं, तर तें शासन निरुपयोगी होतें इतकंच नाहीं, तर सदसत्कृत्यांच्या स्वरूपाचें जें ज्ञान त्याला एरवीं झालें असतें, त्या ज्ञानास तो सर्वांशीं मुकतो. कृत्रिम बाक्षसें आणि कृत्रिम शिक्षा यांची पद्धत्ति जी प्रचारांत आहे, तिजमधील मोठा दोष हा आहे कीं अपराधाच्या नैसर्गिक परिणामांऐवजा भलत्याच शिक्षेचा उपयोग केल्यानें जगांत उत्तम रीतीचें वर्तन कोणतें हें मुलांस बरोबर न समजून त्याविषयीं भलभलत्याच समजुती त्यांच्या डोक्यांत भरून जातात. हा दोष अली-

कडेच कळूं लागला असें नाहीं, तर बुद्धिमान् लोकांच्या नजरेस तो पुष्कळ दिवसांचे पूर्वीच आलेला होता. अगदीं लहानपणीं व तसेंच समजूं लागल्यावरही अमुक गोष्ट करूं नको असें सांगितलें असतां ती गोष्ट केली ह्मणजे तिचा परिणाम आईबापांचा किंवा शिक्षकांचा राग, असाच मुलांचा एक सारखा अनुभव असल्यामुळें, अर्थात् ती गोष्ट आणि तो राग यांमध्यें कार्यकारणभाव आहे अशीच कल्पना त्यांचे मनांत दृढ होऊन जाते, व ह्मणूनच जेव्हां आईबाप आणि शिक्षक यांचा दाब सुटतो, व त्यांचे रागाची भीति नाहींशी होते, तेव्हां दुष्कृत्यें करण्याचीही भीति बरेच अंशीं कमी होते; व मग दुष्कृत्यांचे प्रतिबंधक जे त्यांचे नैसर्गिक परिणाम ते जगांत अडचणी व दुःखें भोगूनच शिकावे लागतात. ह्या चुकीच्या पद्धतीचे परिणाम कसे होतात हें ज्यानें स्वतः पाहिलें आहे, अशा एका मनुष्यानें लिहिलें आहे कीं, ज्या मुलांची एकदांची शाळा सुटते व विशेषेंकरून ज्यांवर त्यांच्या आईबापांचा दाब नसतो, अशीं मुलें शाळेंतील दाबापासून मोकळीं होतांच अगदीं भरकटून बेफाम होऊन जातात; कोणतें कृत्य करूं, कोणतें न करूं, याचा त्यांस विधिनिषेध नाहींसा होतो. अमुक गोष्ट चांगली कां,अमुक गोष्ट वाईट कां, हें त्यांस बिलकूल समजत नसतें. त्यांच्या स्वभावांत तत्त्व ह्मणून कांहींच नसतें, व जगाचा त्यांच्यावर चांगला इंगा फिरेपर्यंत त्यांच्याशीं कोणत्याही प्रकारचा व्यवहार ठेवणें धोक्याचें असतें.

ह्या नैसर्गिक शिक्षणपद्धतीपासून दुसरा फायदा असा आहे कीं, तिच्या योगानें नेहमीं केवळ न्यायच होत असतो; आणि हें त्या पद्धतीचें स्वरूप मुलांचे लक्षांत आल्यावांचून रहावयाचें नाहीं. आपल्या दुर्वर्तनापासून साहाजिक जेवढा परिणाम होतो तेवढाच ज्यास भोगावा लागतो, अशा मनुष्यास आपल्यास नाहक दुःख झालें व आपल्या संबंधानें अन्याय झाला असें वाटणार नाहीं. परंतु ज्याला त्या ऐवजीं एखादी कृत्रिमशिक्षा भोगावी लागेल, त्याला तसें वाटण्याचा संभव आहे. आणि हा प्रकार जसा प्रौढावस्थेच्या संबंधानें आहे, तसाच बाल्यावस्थेच्या संबंधांतही आहे. उदाहरणार्थ असें समजा कीं. एक मुलगा आपल्या कपड्याविषयीं अगदीं निष्काळजी आहे. झाडामाडांतून किंवा कांट्याकुट्यांतून तो आपला पंचा कधींही आंवरून घेत नाहीं, व पंचा मळेलबिळेल याची

तर त्यास क्षितिच नसते. आतां या त्याच्या निष्काळजीपणाबद्दल जर त्याला मारझोड केली, किंवा खोलींत कोंडून ठेविलें, तर अलबत आपल्या संबंधानें हा अन्याय झाला, असें त्यास वाटण्याचा संभव आहे; व झालेल्या चुकीबद्दल पश्चात्तापाचे विचार मनांत न येतां आपल्या संबंधानें झालेल्या अन्यायाबद्दलच विचार त्याचे मनांत घोळत असण्याचा संभव आहे. परंत त्यालाच जर झालल्या चुकीची दुरुस्ती करावयास लाविलें, झणजे धोतर मळलें तर त्यालाच तें धुवावयास लाविलें, किंवा फाटलें तर त्यालाच तें जसें येईल तसेंच शिवावयास लाविलें, तर झालेल्या त्रासाचें कारण आपणच आहों, असें त्यास वाटणार नाहीं काय? ही शिक्षा तो भोगीत असतां ती व तिचें कारण यां मधील संबंध एक सारखा त्याचे मनांत घोळणार नाहीं काय? आणि शिवाय या त्रासामुळें जरी तो मनांत चरफडला तरी झालेलें सर्व न्यायाचेंच आहे, असें थोडेंबहुत तरी त्याच्या मनांत आल्याशिवाय राहील काय? आतां अशाप्रकारच्या शिक्षेचे बरेच प्रसंग येऊनही मुलगा जर सुधारला नाहीं, कपडे भराभर मळविण्याचा किंवा फाडण्याचा त्याचा क्रम जर तसाच चालला, तर याच शिक्षणपद्धतीचें अवलंबन करून एक वर्षानें किंवा सहा सहा महिन्यांनीं नवीन कपडे द्यावयाचे अशा प्रकारची जी कांहीं बापाची नेहमींची वाहिवाट असेल त्याच वाहिवाटीप्रमाणें तितके दिवस जाईपर्यंत बापानें नवीन कपडे आणून द्यावयाचे नाहींत इतकें झालें झणजे झालें. असें झालें झणजे तेच मळके व फाटके कपडे मुलास वापरावे लागतील, आणि इतक्यांत एखादा सण असला, किंवा कोठें तरी एखादा समारंभ असला, व त्या ठिकाणीं त्याचे कपडे मळके व फाटके असल्यामुळें त्याचें जाणें बंद झालें, झणजे अर्थात् कपडे मळविल्यापासून खरोखर केवढी गैरसोय आहे हें त्यास उत्तम रीतीनें समजेल; व त्या गैरसोयीचे कारणाबद्दल त्याचे मनांत विचार येऊन या सर्व गोष्टींचें कारण आपलाच निष्काळजीपणा, हें त्याचे लक्षांत येईल. व असें झाल्यावर आपल्या संबंधानें अन्याय झाला, असें त्यास बिलकुल वाटणार नाहीं. परंतु जर ह्याच्या उलट स्थिति असली, झणजे जर अपराध व शिक्षा यांमध्यें लक्षांत येण्याजोगा कांहीं एक संबंध नसला, तर मात्र त्यास तसें वाटण्याचा संभव आहे.

शिवाय प्रचारांत असलेल्या शिक्षणपद्धतीचे योगानें मुलें व त्यांचे आईबाप यांमध्यें बहुतकरून धुसपुस व बेबनाव असतो. परंतु आमच्या शिक्षणपद्धतीचे योगानें तसा प्रकार होण्याचा संभव नाहीं. मुलांस त्यांचे अपराधांचे नैसर्गिक परिणाम भोगूं न देतां आईबाप त्यांस दुसरीच कांहीं तरी शिक्षा करितात, व त्या योगानें ते दोन चुक्या करून दुप्पट घोटाळा करितात. मुलांचे वर्तनाचे संबंधानें खंडीभर नियम करून ठेवितात, व ते नियम मुलांनीं मोडिले ह्मणजे त्यांत आपला मान व आपलें महत्व कमी झालें अशी त्यांची समजूत असते, व यामुळें या नियमांचें उल्लंघन ह्मणजे आपल्या संबंधानें अपराध झाला असें त्यांस वाटून त्याबद्दल आपणांस राग येणें अगदीं रास्त आहे असें ते समतात, ही पहिली चूक; आणि दुसरी चूक तर अगदीं वेडगळपणाचीच आहे; ती ही कीं, मुलानें एखादा अपराध केला, व त्यामुळें नुकसान झालें ह्मणजे तें नुकसान भरून काढण्याचे श्रम व त्रास, वास्तविक जो अपराधी असेल, त्याला न पाडितां तो सर्व त्रास स्वतः आपण घेतात, व मग मात्र मनांत विनाकारण चरफडत बसतात. आतां या पद्धतीनें मुलांची काय स्थिति होते ती पाहूं. कृत्यांच्या नैसर्गिक परिणामानें झालेली जी शिक्षा ती कोणी मनुष्यानें किंवा दुसऱ्या एखाद्या व्यक्तीनें केलेली नसते; ती करणारा अमुक असें दिसत नसतें; ती करणारा हा असें सांगतां येत नाहीं; तिची कृति दृष्टिगोचर किंवा दृश्य नसते; तिचें उत्पत्तिस्थान मूर्त व दृश्य असें नसतें; तें केवळ अमूर्त असेंच असतें, व यामुळें शिक्षेपासून जरी मुलाच्या मनास त्रास झाला तरी तो अल्प व क्षणिक असा असतो. परंतु जर आईबापांनीं एखादें कृत्रिम शासन केलें तर त्याचा अगदीं उलट परिणाम होतो. तें शासन आईबापांनीं आपण होऊन केलेलें असतें, व तें शासन करणारा हा असें मुलांस कळत असतें; त्यामुळें मुलांचे मनांत त्या शासनकर्त्याविषयीं पुष्कळ द्वेषबुद्धि उत्पन्न होऊन ती बराच वेळ मनांतून जात नाहीं. आतां या वेडगळ पद्धतीचें अगदीं मुलाच्या बाल्यावस्थेपासून जर अवलंबन केलें, तर त्याचे परिणाम किती भयंकर होतील हें वाचकांचे सहजीं ध्यानांत येईल. अशी कल्पना करा कीं मुलांचे अज्ञानामुळें व अडाणीपणामुळें त्यांस झालेलें शारीरिक दुःख आईबापांना कोणत्या तरी उपायांनीं आपणावर घेतां

येतें, व असें समजा कीं मुलांस झालेलें दुःख आपणावर घेऊन ते त्यांचा अपराध त्यांस समजावा ह्मणून त्यांस दुसरी कोणती तरी इजा करितात. ह्मणजे उदाहरणार्थ असें समजा कीं आधणाच्या भांड्याला हात लावूं नको असें सांगितलें असतांही मुलाचे हातून भांडें उलथून आधणाचें पाणी त्याचे पायावर पडलें, आणि नंतर आईनें आधणाचे पाण्यानें मुलाला बसलेला चरका आपल्यावर घेऊन त्या ऐवजीं मुलाला एक थापट मारिली, तर अशाप्रकारचे स्थितीपासून जगांत किती बरें घोटाळा होईल? हल्लीं वर कल्पना केल्याप्रमाणें दुःखाची अदलाबदल करितां येत नाहीं, तरी मुलांनीं शरीराला एखादी दुखापत करून घेतली, ह्मणजे आईबाप त्यांचे आंगावर दांत ओठ खाऊन धांवून जातात; व एखादे वेळेस मारावयासही कमी करीत नाहींत इतका त्यांस राग येतो; व असें झालें ह्मणजे मुलांनाही आईबापांचा राग येतो. असें जर आहे तर वर कल्पिलेल्या रोज होणाऱ्या दुखापतीमुळें मुलें व आईबाप यांमध्यें परस्परांविषयीं द्वेषबुद्धि व क्रोधबुद्धि अत्यंत वाढत जाऊन एकमेकांविषयीं वैमनस्य एकमेकांच्या अगदीं हाडीं खिळून जाणार नाहीं काय? ह्या सर्व गोष्टींची आह्मांस कल्पनाच केली पाहिजे, कारण त्या व्यवहारामध्यें प्रत्यक्ष घडून येण्याचा मुळीं संभवच नाहीं. मुलें मोठीं झाल्यावर तर त्यांच्याशीं आईबापांचें वर्तन अगदीं अशाचप्रकारचें असतें असें आपल्या धडधडीत अनुभवास येतें. जो बाप आपल्या मुलास त्यानें आपल्या धाकट्या भावाची पाटी मुद्दाम दांडगाईनें किंवा निष्काळजीपणामुळें फोडिली ह्मणून मारितो, व लागलीच दुसरी पाटी विकत आणितो, त्याचें वर्तन वरच्याप्रमाणेंच नव्हे काय? खऱ्या अपराध्यास ताडनरूपी कृत्रिम शिक्षा करून दुसरी पाटी आणणें ही जी नैसर्गिक शिक्षा ती तो स्वतःलाच करून घेत नाहीं काय? व असें झालें ह्मणजे मुलाला भलतीच शिक्षा झाल्यानें व बापाला विनाकारण शिक्षा झाल्यानें एकमेकांचीं मनें एकमेकांविषयीं उगाच बिघडून जात नाहींत काय? मुलाला केवळ झालेलें नुकसान भरून द्यावयासच बाप जर लागेल, तर मुलाचे मनांत राग अगदीं कमी येण्याचा संभव आहे. बाप जर मुलास सांगेल कीं, नवी पाटी विकत घेण्याचा दंड तुलाच दिला पाहिजे, आणि असें सांगून त्याला वर्षास नवीन कपडे करावयास जो खर्च लागतो त्यांतून नवीन पाटीच्या किंमतीइतके पैसे कमी केले,

आणि एखाददुसरा कपडा कमी दिला, किंवा नवीन एखादी टोपी विकत घेऊन दिली नाहीं, व त्यामुळें त्याला जुनीच टोपी आणखी एक वर्ष वापरावी लागली, ह्मणजे कृत्रिमशासनपद्धतीमुळें बापाच्या व मुलाच्या मनांत जो एकमेकांविषयीं राग येतो तशा प्रकारचा राग येण्याचा किती बरें कमी संभव आहे ? शिवाय नवीन टोपी न मिळाल्यामुळें जुनीच टोपी आणखी एक वर्ष वापरावी लागली, ह्मणजे यांत आपल्या कृत्यांचा अत्यत श्रेयस्कर व न्याय्य असा नैसर्गिक परिणामच तो भोगितो असें होत नाहीं काय ? सारांश नैसर्गिका शिक्षणपद्धतीचे योगानें स्वभाव रागीट व खुनशी होण्याचें भय अगदीं कमी असतें; आणि हें स्वाभाविकच आहे, कारण हें शासन ह्मणजे केवळ न्याय्य असून तें मागें सांगितल्याप्रमाणें मूर्त व दृश्य आईबापांकडून न होतां अमूर्त व अदृश्य अशा वस्तुस्थितीकडूनच केलें जातें.

यावरूनच आणखी एक गोष्ट अशी निघते कीं या पद्धतीचे योगानें मुलें व आईबाप यांमध्यें विशेष स्नेहभाव राहून, आईबापांचें वजनही मुलांवर विशेष राहील. मोठा मनुष्य घ्या, किंवा लहान मूल घ्या, कोणत्याही कारणानें असो व कोणत्याही संबंधानें असो, मुळीं त्याच्या मनांत राग येणें यापासून त्याची हानि झालीच पाहिजे; व त्यांत आईबापांच्या मनांत मुलांबद्दल व मुलांच्या मनांत आईबापांबद्दल राग येणें हें तर अत्यंत हानिकर होय. कारण त्या योगानें मुलांचे शिक्षणास अत्यंत आवश्यक असा जो आईबापांचा वचक त्याचें बीज जें अन्योन्यप्रेमबंधन तें शिथिल होऊन जातें. जे जे पदार्थ आपण जगामध्यें पाहतों, त्या त्या पदार्थांचा आपले मनावर एक प्रकारचा ठसा, किंवा संस्कार उठत असतो; व कित्येक पदार्थ असे असतात कीं, त्यांच मनावर उठलेले संस्कार ज्या कोणत्याही वेळीं जागृत होतात त्यावेळीं त्यांबरोबरच दुसऱ्या अनेक पदार्थांचे मनावर उठलेले संस्कारही जागृत होतात. हें जें सस्कारसाहचर्य तें ज्या नियमानुसार असतें त्या नियमावरून हें उघड होतें कीं, मनुष्य लहान किंवा मोठा असो, ज्या वस्तूंच्या संस्कारांचें नित्यसाहचर्य दुःखशोकादिमनोविकारांशीं आहे असें त्याचे अनुभवास येतें, त्याच वस्तु त्यास अप्रिय होतात; अथवा एखादे वस्तवर जर पूर्वीपासून प्रेम असलें, तर त्या संबंधानें तज्जन्य प्रत्यक्ष व आनुषंगिक जे दुःखदायक संस्कार होतील ते ज्या मानानें कम-

जास्त असतील, त्या मानानें तें प्रेम कमी होतें; किंवा प्रेम जाऊन त्या ऐवजीं द्वेषही उत्पन्न होतो. आईबापांना राग येऊन त्यांनीं जर मुलांस शिव्या दिल्या व मारझोड केली, तर त्यापासून कांहीं दिवसांनीं मुलांच्या मनांतील आईबापांबद्दल असलेला प्रेमभाव नाहींसा होऊन, तीं त्यांचा द्वेष करूं लागतील, यांत संशय नाहीं. तसेंच नेहमीं मूल धुसपुसलेलें व खुनशी पाहून,आईबापांचेही मनांतील त्याविषयींचा प्रेमभाव निःसंशय कमी होईल, किंबहुना सर्वांशींही नाहींसा होईल. यामुळेंच पुष्कळ कुटुंबांत आईबाप व मुलें यांमध्यें प्रत्यक्ष द्वेषच नसला तरी प्रेमाचा अभाव असतो; व त्यांतही विशेषेंकरून बाप व मुलें यांमध्यें हा प्रकार फार आढळतो. कारण प्रायः घरीं शिक्षा करण्याचें काम बापावरच असतें. पुष्कळ लोकांचे तोंडून आपण जें ऐकितों, कीं हीं आमचीं मुलें ह्मणजे आमचे मागें साडेसाती आहे, त्याचेंही कारण हेंच. यावरून सर्वांचें लक्षांत येईल कीं, आईबाप व मुलें यांमधील हा बेबनाव, नीतिशिक्षणास अत्यंत अपायकारक आहे. व ह्मणून आईबापांनीं मुलांशीं प्रत्यक्षविरोधाचा प्रसंग कांहीं झालें तरी आणूं नये. व अशा वर्तनास उत्तम साधन ह्मटलें ह्मणजे नैसर्गिकपरिणामात्मकशिक्षणपद्धतीचें अवलंबन हेंच होय. कारण मागें सांगितलेंच आहे कीं, या पद्धतीचे योगानें शिक्षा करण्याचें काम आईबापांवर पडत नसल्यामुळें, आईबाप व मुलें ह्यांमध्यें धुसपुस किंवा बेबनाव, कांहीं एक उत्पन्न होत नाहीं.

एकंदरीनें आपणांस इतकें कळलें कीं, नैसर्गिकपरिणामात्मकनीतिशिक्षणपद्धति जशी बाल्यावस्थेंत व प्रौढावस्थेंत ईश्वरी संकेतानें सुरू असते, तशीच मधल्या शैशव व यौवन ह्या दोन अवस्थांमध्येंही सुरू ठेवण्यास हरकत नाहीं. या पद्धतीपासून मुख्य फायदे चार आहेत. पहिला फायदा हा कीं, तिच्या योगानें सदसत्कृत्यांच्या स्वरूपाचें यथार्थ ज्ञान, त्यांच्या शुभाशुभ परिणामांचे प्रत्यक्ष अनुभवावरून उत्पन्न होतें. दुसरा फायदा हा कीं, मुलांस आपल्या अपराधाच्या दुःखकारक परिणामांपेक्षां कांहीं एक जास्त भोगायाला न लावल्यामुळें त्यांस झालेल्या शासनाची न्याय्यता बरेच अंशीं स्पष्टपणें त्यांचे लक्षांत येतें. तिसरा फायदा हा कीं, शासनाची न्याय्यता मुलांचे लक्षात आल्यामुळें, व शिवाय शासन होतें तें कोणत्याही व्यक्तिमात्राकडून

न होतां सृष्टिनियमानुसार वस्तूंची जी क्रिया होत असते, त्या क्रियेचेच योगानें होत गेल्यामुळें मुलांचा स्वभाव खुनशी वगैरे होऊन बिघडत नाहीं; व त्याप्रमाणेंच आईबापांनाही प्रत्यक्ष शिक्षा करण्याचें काम न पडतां, त्यांजकडे केवळ नैसर्गिकपरिणाम भोगूं देण्याचें निमूटपणाचें काम असल्यामुळें त्यांचेही मनाची शांतवृत्ति जात नाहीं. चौथा फायदा असा कीं, आईबाप व मुलें यांचीं मनें एकमेकांविषयीं त्रासून जाण्याचा प्रसंगच न आल्यामुळें परस्परांमध्यें सुखोत्पत्तीस विशेष अनुकूल असा संबंध उत्पन्न होऊन, त्यांचे मनांत परस्परांविषयीं आदरबुद्धिही वृद्धिंगत होण्याचा संभव असतो.

आतां कोणी एखादा असें विचारील कीं, हें बारीकसारीक अपराधांच्या संबंधानें झालें; परंतु विशेष मोठ्या गुन्ह्यांच्या संबंधानें काय करावयाचें? जर मुलानें एखादी वस्तु चोरिली किंवा तो खोटें बोलला, किंवा त्यानें आपल्या धाकट्या भावाशीं किंवा बहिणीशीं मस्ती करून दुखापत केली, तर मग ह्या तुमच्या पद्धतीप्रमाणें वर्तन ठेवावयाचें तें कसें? या प्रश्नाचें उत्तर देण्यापूर्वी दोनचार प्रत्यक्ष घडलेल्या गोष्टी आह्मांस माहीत आहेत त्या येथें सांगून त्यांचें तात्पर्य काय आहे तें पाहूं.

एक गृहस्थ आपल्या मेहुण्याच्या घरीं राहत असे. त्याच्या मेहुण्याला एक मुलगा व एक मुलगी अशीं दोन मुलें होतीं. त्यांचे शिक्षणाचें काम ह्यानें पतकरिलें होतें. त्यानें शिक्षणाचा क्रम वर सांगितलेल्या आमच्या पद्धतीप्रमाणें ठेविला होता. विचार करून ह्या पद्धतीची उपयुक्तता त्याचे मनावर ठसली होती असें नाहीं. परंतु ही पद्धति चांगली असा त्याच्या मनाचा स्वाभाविकच कल झालेला होता. या दोन मुलांस तो घरांत असला ह्मणजे शिकवीत असे, व बाहेर निघाला ह्मणजे आपल्या बरोबर नेत असे. तो फिरावयाला निघाला ह्मणजे नेहमीं तीं त्याच्या बरोबर जात. तो कितीएकवेळां, त्यास वनस्पतिशास्त्राचा नाद असल्यामुळें, निरनिराळ्या वनस्पतींचें ज्ञानकरून घेण्याकरितां, बाहेर जात असे.तेव्हांही तीं मुलें त्याजबरोबर असत,व मोठ्या उत्सुकतेनें निरनिराळ्या झाडाच्या डाहळ्या तीं त्याजवळ आणून देत; व तो अमुक एक झाड कोणत्या जातीचें आहे, हें ओळखण्याकरितां त्यांनीं आणलेल्या त्या झाडाच्या डाहळ्यांची परीक्षा करीत उभा राहिला, ह्मणजे तींही निमूटपणें त्या-

जवळ उभीं राहून, तो जें काय करी तें पाहत असत. ह्याप्रमाणें नेहमीं तीं ह्याच्या जवळ असून एकीकडे त्यांचें शिकणें व एकीकडे त्यांची कर्मणूक चालत असे. सारांश एकंदरीस त्यांना तो बापासारखा झाला होता. खऱ्या आईबापांपेक्षां त्याजवरच त्यांचें विशेष प्रेम बसलें होतें. अशाप्रकारच्या आपल्या वर्तनक्रमापासून त्या मुलांवर कसकसे परिणाम होत गेले हें त्या गृहस्थानें आह्मांस सांगितलें. त्यानें पुष्कळ गोष्टी सांगितल्या त्यांपैका आह्मी एक येथें सांगतों. एके दिवशीं संध्याकाळीं तो गृहस्थ घरीं असतां त्यास एका वस्तूची गरज लागली. ती वस्तु दुसऱ्या खोलींत होती, त्यानें ती आपल्या भाच्यास आणण्यास सांगितलें. मुलगा खेळाच्या अगदीं रंगांत असल्यामुळें तेथून उठण्याची चोळाचोळ करूं लागला, किंवा आणीत नाहीं असेंही त्यानें सांगितलें असेल, त्या वेळेस बरोबर काय झालें तें आतां लक्षांत नाहीं. या गृहस्थास मुलांवर जुलूम करणें कधींच आवडत नसे, ह्मणून त्यानें कांहीं एक न बोलतां ती वस्तु स्वतः आणिली. फक्त मुलाच्या अशा वर्तनानें आपणांस किती त्रास झाला एवढें आपल्या मुद्रेवरून दाखविलें. पुढें रात्रीं नित्याप्रमाणें कांहीं तरी गमतीचा खेळ खेळण्याकरितां मुलगा आपल्या मामाकडे गेला. त्या वेळेस त्यानें गंभीर मुद्रेनें आपली नाखुषी दाखविली. मुलाच्या संध्याकाळच्या वर्तनानें त्याच्या मनांत त्याविषयीं जितकें स्वाभाविक औदासिन्य उत्पन्न झालेलें होतें, तितकेंच त्यानें दाखविलें, व अशा प्रकारें मुलाच्या वर्तनाचे नैसर्गिक परिणाम त्यास भोगावयास लाविलें. दुसऱ्या दिवशीं सकाळीं निजून उठण्याच्या रोजच्या वेळेस त्या गृहस्थास खोलीच्या दाराच्या बाहेर रोजचा मुलगा नसून दुसरा कोणी हाका मारितो आहे असें त्यास वाटलें, आणि पाहतो तों आपला भाचा तोंड धुण्याकरितां हातांत ऊन पाणी घेऊन आंत आला, असें त्यास आढळलें. दुसरें कांहीं हवें लागल्यास तेंही आपण आणून द्यावें अशा हेतूनें खोलींत इकडे तिकडे पाहिल्यानंतर तो मुलगा एकदम ह्मणाला, हो खरेंच तुमचा तोंड पुसावयाचा रुमाल तुह्मांला पाहिजे असेल, व असें ह्मणून लगलाच तो आणण्याकरितां माडीखालीं धांवत गेला. या व अशा दुसऱ्या पुष्कळ प्रकारांनीं आपल्या दुर्वर्तनाबद्दल आपणास पश्चात्ताप झाला आहे असें त्या मुलानें दाखविलें. नित्यापेक्षां मामाचीं जास्ती कामें करून त्यानें

नाकारिलेल्या कामाबद्दल फेड फेली. त्याचे मनांत सर्व नीच किंवा अश्लाघ्य विकारांचा अपकर्ष होऊन उच्च किंवा श्लाघ्य विकारांचा उत्कर्ष झाला; व या उत्कर्षानें त्यास समाधानही वाटलें. याप्रमाणें त्यानें मांमाचें गेलेलें प्रेम संपादन केलें, आणि तें नाहींसें झालें तर आपणांस किती दुःख होतें ह्याचा त्यास प्रत्यक्ष अनुभव आल्यामुळें, त्या प्रेमाचें त्यास पूर्वापेक्षां विशेष महत्व वाटूं लागलें.

हल्लीं या गृहस्थासही मुलें झालीं आहेत. त्यांचे संबंधानें तो याच शिक्षणपद्धतीचा उपयोग करीत असतो, व या पद्धतीचे योगानें सर्व कांहीं सुरळीत चालतें असा त्याचा अनुभव आहे. आपल्या मुलांशीं तो त्यांचा जिवश्चकंठश्च मित्र या नात्यानें वागतो. संध्याकाळ केव्हां होईल असें त्या मुलांस झालेलें असतें. कारण त्या वेळेस तो घरीं यावयाचा असतो. रविवार ह्मणजे त्यांस सणाचा दिवस वाटतो. कारण त्या दिवशीं तो सर्व दिवसभर घरीं त्यांचे जवळच असतो. याप्रमाणें मुलांचा त्यावर पूर्ण विश्वास व प्रेम बसल्यामुळें त्यांजवर आपला दाब बसविण्याला आपला संतोष किंवा असंतोष दाखविणें यापलीकडे त्यास कांहीं एक करावें लागत नाहीं. एखादे दिवशीं बाहेरून घरीं आल्यावर एखाद्या मुलानें कांहीं खोड्या केल्या असें जर त्यास कळलें, तर मुलाच्या खोड्या ऐकून त्याजविषयीं स्वाभाविक जितकी अप्रीति मनांत उत्पन्न होईल तितकीच तो त्यास दाखवितो; व एवढीच शिक्षा बस होते असें त्याचे अनुभवास आलें आहे. रोजच्या सारखें प्रेम दाखविलें नाहीं ह्मणजे तेवढ्यानेंच मारल्यापेक्षां जास्त दुःख मुलास होऊन तो रडूं लागतो; आणि आपण नीट वागलों नाहीं तर आपल्या वरचें बापाचें प्रेम कमी होईल ही भीति बाप बाहेर गेला ह्मणजे नेहमीं त्याच्या मनांत असते; आणि ह्मणून बाप घरीं येण्याचे पूर्वी दिवसास मुलें वरचेवर आईला विचारीत असतात कीं, आमचेकडून कांहीं अपराध झालेला नाहीं ना? व बाबा घरीं आला म्हणजे आमचेबद्दल त्यास कांहीं वाईट कळावयाचें नाहींना? या गृहस्थाचा सर्वांत अगदीं वडील मुलगा पांच वर्षांचा आहे. तो जात्या हुशार व चंचल आहे, व लहान मुलांच्या व विशेषेंकरून सुदृढ प्रकृतीच्या मुलांच्या आंगीं याला खेंच, त्याला लोट, याला मार, त्याला चिमटे घे, याला ओढ, त्याला ढकल, असा एक प्रकारचा स्वा-

भाविक व्रात्यपणा असतो, त्याप्रमाणें या मुलानें आई कोठें बा. हेर गेली आहे असें पाहून कांहीं दांडगाई केली. धाकट्या भावाचे कातरीनें केंस कापले, आणि बापाच्या आरशाच्या पेटींत चाकू होता तो बाहेर काढून त्याच्याशीं खेळून आपला हात कापून घेतला. बाप घरीं परत आल्यावर त्यास ही सर्व हकीकत कळली. मुलाला त्यानें कांहीं एक मार झोड वैगेरे केली नाहीं. फक्त त्या रात्रीं व दुसरे दिवशीं सुद्धां सकाळीं कामकाजाला बाहेर जाईपर्यंत मुलाजवळ अबोला धरिला. यापेक्षां जास्ती कांहीं केंलें नाहीं. या त्याच्या अबोल्यानें तावडतोब तर गुण आलाच. परंतु पुढें सुद्धां त्याचा इतका कांहीं चांगला परिणाम झाला कीं, कांहीं दिवस गेल्यानंतर पुन्हां एके दिवशीं आई कोठें बाहेर जाऊं लागली, तेव्हां तो मुलगा बाहेर जाऊं नको, अशी तिची फार विनवणी करूं लागला; व चौकशी अंतीं असें कळलें कीं आई बाहेर गेली तर पुन्हां मागच्या सारखा व्रात्यपणा कदाचित् आपल्या हातून होईल अशी त्यास भीति पडली होती.

मोठमोठ्या अपराधांचे संबंधानें आमची पद्धति कशी उपयोगी पडणार, या वरील प्रश्नाचें उत्तर देण्यापूर्वी आह्मीं ही गोष्ट येथें सांगितली. यांत मुलें व आईबाप यांमध्यें नेहमीं कोणत्या प्रकारचा संबंध असला पाहिजे हेंच दाखविण्याचा आमचा हेतु होता. हा संबंध कोणत्या प्रकारचा असला पाहिजे हें सांगणें फार महत्वाचें आहे. कारण या संबंधाचे अस्तित्वावर मोठमोठ्या अपराधांचें संनियमन अवलंबून असतें. आतां आमच्या पद्धतीप्रमाणें एकसारखें वर्तन ठेविलें असतां, मुलें व आईबाप यांमध्यें अशा प्रकारचा संबंध साहजिक उत्पन्न होईल, एवढें दाखविलें ह्मणजे झालें. पूर्वी आह्मीं हें दाखविलेंच आहे कीं आईबापांनीं मुलांस फक्त त्यांचे दुर्वर्तनाचे दुःखकर परिणाम भोगावयास लाविलें ह्मणजे त्यांचा मुलाशीं प्रत्यक्ष विरोध कधींही येत नाहीं; व यामुळें मुलांचे मनांत आईबापांबद्दल द्वेषभावही उत्पन्न व्हावयाचा नाहीं. आतां फक्त एवढें दाखविलें ह्मणजे बस आहे कीं आमच्या पद्धतीप्रमाणें अव्याहत वर्तन ठेविल्यानें आईबाप व मुलें यांमध्यें द्वेषभाव असणार नाहीं इतकेंच नाहीं, तर त्यांमध्यें विशेष स्नेहभावही उत्पन्न होईल.

हल्लींची स्थिति पाहिली तर अशी आहे कीं, आईबापांविषयीं मुलांचे मनांत एकाच कालीं शत्रुमित्रभाव असतो. मुलांस आईबापांचें जें प्रत्यक्ष वर्तन दिसतें, तदनुसारच त्यांचे ग्रह त्यांविषयीं होतात. व त्यांचें वर्तन पाहिलें तर एकदां लाडीगोडी, एकदां दटावणें, एकदां पाठ थोपटणें, एकदां शिव्या देणें, एकदां कुरवाळणें, एकदां मारणें, अशाच प्रकारचें असतें. अशा वर्तनामुळें अर्थात् आईबापांविषयीं त्यांचे ग्रह परस्पर-विरुद्ध असे होतात. आईला बहुतकरून असें वाटतें कीं, बाळा तुझ्या-वर माझी फार ममता आहे असें आपले मुलास सांगितलें ह्मणजे पुरे, व हें सांगितलें ह्मणजे तें खरें मानणें हें त्याचें कर्तव्य आहे अशी तिची पूर्वीपासूनच समजूत असल्यामुळें ती असें अनुमान करिते कीं, तो तें खरें मानीलच. "हें सर्व तुझ्या कल्याणासाठीं आहे, तुला दुःख कशानें होईल हें तुजपेक्षां मला जास्ती समजतें तुझें तुला तें समजण्यासारखें तुझें वय अजून झालें नाहीं. परंतु तूं मोठा झाल्यावर मी आज करितें हेंच चांगलें, असें तुला समजून येईल. आणि मग तूं माझे उपकार मानशील." अशा प्रकारचीं आईचीं बोलणीं नेहमीं चाललीं आहेत; परंतु मुलाची स्थिति पाहिली तर नेहमीं त्याचे मनाला कांहींना कांहींतरी त्रासच होत आहे. हें करूं नको, तें करूं नको, असें आई नेहमीं त्याचे इच्छेविरूद्ध त्यास सांगत असते; आपले सुखासाठीं सर्व चाललें आहे असे शब्द मात्र तो ऐकितो परंतु त्याच शब्दांबरोबर होणारीं जीं कृत्यें त्यांपासून त्यास दुःखच होत असतें. पुढें तुला समजेल, पुढें तुला सुख होईल, हें जें काय आई ह्मणत असते, त्याचा अर्थ काय, व तें सुख कसें होणार, हें कळण्यापुरती त्यास समजूत आलेली नसते. प्रत्यक्ष त्या वेळेस जे परिणाम त्याला भासत असतात, त्यांवरून तो आपले ग्रह बसवीत जातो; व हे परिणाम बिलकुल सुखकारक नाहींत, असें जेव्हां त्यास आढळतें, तेव्हां अर्थात् माझी तुझ्यावर ममता आहे, या आईच्या बोलण्यांत कांहीं अर्थ नाहीं असें त्यास वाटूं लागतें; आणि यापेक्षां कांहीं निराळें त्यास वाटावें, असें ह्मणणें मूर्खपणाचें नव्हे काय? मुलाचे मनांत जे विचार चालावयाचे, न तो ज्या गोष्टी धडधडीत डोळ्यांसमोर पाहत असेल, त्यांवरूनच चा-लावयाचे नाहींत काय? ह्मणजे पुढें असलेला पुरावा पाहूनच त्यानें नि-

र्णय करावयाचा नाहीं काय? व असें आहे तर आईच्या ममतेच्या बोलण्यांत कांहींएक हांशील नाहीं असा जो निर्णय तो आपले मनांत ठरवितो, तो निर्णय त्याजपुढें असलेल्या पुराव्याप्रमाणें अगदीं बरोबर नाहीं काय? त्याच्या त्या आईला जर या प्रकारच्या स्थितींत ठेविलें, तर तिचेही ग्रह निःसंशय या प्रकारचे होतील. तिच्या ओळखीच्या माणसांपैकीं जर तिला एखादा असा मनुष्य आढळला कीं, तो नेहमीं आपले इच्छेचे विरुद्ध वागत असतो; नेहमीं आपली निर्भर्त्सना करितो, व कधीं कधीं प्रत्यक्ष दुःखही देतो. परंतु त्याच वेळेस एकीकडे केवळ तुझ्या कल्याणासाठीं मी सतत झुरत आहें असें मात्र म्हणत असतो, तर त्याचें म्हणणें वरकरणीचें आहे असें तीस खात्रीनें वाटेल. असें जर आहे तर आपल्या मुलाला मात्र असें वाटणार नाहीं, अशी कल्पना तिनें कां बरें करावी?

परंतु आमची पद्धति जर अव्याहत सुरू ठेविली तर किती निराळ्या प्रकारचे परिणाम होतील ते पाहा. आईनें स्वतःच शिक्षा न करितां जर केवळ मित्राचे नात्यानें आपलें वर्तन ठेविलें—बाबा असें करूं नको, करशील तर तुला अमुक अमुक दुःख होईल, इतकें जर ती मुलास वेळचे वेळीं सुचवीत गेली, तर त्यापासून किती बरें हित होईल? एक उदाहरण घेऊन पाहूं; व लहानपणापासून आमची पद्धति कोणत्या रीतीनें अमलांत आणतां येईल हें स्पष्टपणें लक्षांत यावें म्हणून जें उदाहरण अगदीं साधें व लहानवयामध्यें घडून येणारें असेल तेंच घेऊं. हें पहा, तें पहा,असें करण्याची मुलांना नेहमीं संवय असते, हें सर्वांना माहीत आहे.व ही त्यांची मनाची स्वभावजन्यप्रवृत्ति सृष्टींतील पदार्थांचें लक्षपूर्वक प्रत्यक्ष अवलोकन करून प्रयोगपूर्वक निरनिराळ्या गोष्टींचे शोध करण्याचा जो प्रकार आहे, त्या प्रकारास अनुसरूनच असते. कल्पना करा कीं एखादा मुलगा हीच प्रवृत्ति त्याचे मनांत जागृत होऊन,कागद दिव्यावर धरून,कसा काय जळतो तें पाहत आहे. आतां अशावेळीं आसपासच्या वस्तूंना आग बीग लावील, किंवा आपलें तरी आंगबींग भाजून घेईल, म्हणून साधारण अविचारी आई, ठेव तो कागद एकीकडे, म्हणून त्यास सांगेल. आणि मुलानें ऐकिलें नाहीं, तर त्याच्या हातांतून कागद खसदिशीं ओढून घेईल. परंतु जर सुदैवानें त्याची आई जराशी विचारी असेल, आणि कागद कसा काय जळतो हें पाहण्यांत जी त्यास मौज वाटते, ती मौज अत्युप-

युक्त जिज्ञासेचाच परिणाम होय असें जर तिला माहीत असेल, व अशा-वेळीं जर आपण ह्या जिज्ञासेच्या आड आलें तर त्याचा परिणाम काय होईल हें लक्षांत येण्यापुरतें जर तिच्या आंगीं शहाणपण असेल, तर अशावेळीं तिचें वर्तन वरच्याहून अगदीं भिन्न असणार नाहीं काय ? ती आपले मनांत याप्रमाणें विचार करील—जर आतां मी ह्याला कागद जाळण्याचें बंद केलें तर ह्यामुळें कागद जाळण्यानें त्यास जें कांहीं ज्ञान प्राप्त होणार, त्यास हरकत होईल. आतां एवढे खरें कीं, कागद ओढून घेतला ह्मणजे मग त्याचें आंगबींग भाजण्याची अगदीं भीति नाहीं. परंतु यापासून होणार काय ? आज नाहीं तर केव्हांतरी पुढें एखादोदिवशीं त्याचें आंग भाजण्याचा प्रसंग येणारच. असें जर आहे तर प्रत्यक्ष अनुभवावरून विस्तवाचे धर्म काय आहेत,हें त्यास कळणें त्याच्या जीवितरक्षणास अत्यंत अवश्य होय. आज जरी मीं यास आंगबींग भाजून घेईल ह्मणून कागद जाळण्याचें बंद केलें तरी कोणी प्रतिबंध करावयास जवळ नाहीं, अशा-वेळीं केव्हांतरी हा पुन्हां असें करणारच. असें जर आहे तर मी आतां जवळ आहे. अशा वेळींच त्यास हें करूं देणें विशेष श्रेयस्कर होईल. कारण जर भाजला बिजलाच, तर मी येथें असल्यामुळें त्यास विशेष इजा तरी होऊं देणार नाहीं. शिवाय कागद जाळण्यांत जी त्यास मौज वाटत आहे, तिजपासून दुसरे कोणास इजानाहीं, व उलट ज्ञानप्राप्ति हा तिजपासून एक फायदाच आहे, तर त्यास बंद केलें ह्मणजे या मौजेच्या आड आल्याप्रमाणें झालेंच, व मग अर्थात् मजविषयीं त्याचे मनांत वाईट कां येणार नाहीं? इजा होऊं नये ह्मणून मी यास बंद करणार, परंतु ती इजा ह्मणजे कोणती आणि काय हे यास कांहीं एक माहीत नाहीं. इच्छे-चा मोड झाला ह्मणजे त्यापासून होणारें जें दुःख तें मात्र यास भासत राहील, व त्या दुःखाचें कारण मी एवढेंमात्र तो धरून बसेल. ज्या दुःखाची अजून त्यास कल्पना नाहीं, व ह्मणून जें दुःख असें त्यास वाटत नाहीं, तें होऊं नये ह्मणून, जें त्यास विशेष कठीण भासेल असें दुसरें दुःख त्यास करणें, ह्यांत काय अर्थ ? ही आपणास दुःख देणारी आहे अशी कल्पना मात्र उलटी आपणाविषयीं त्याचे मनांत बसून जाईल. याकरितां उत्तम मार्ग झटला ह्मणजे एवढाच कीं, बाबा, यापासून कदाचित् भाजून तुला इजा होईल एवढें त्यास वेळींच सुचवावें, आणि नंतर जवळ

उभें राहून काय काय होतें तें निमूटपणें पाहावें आणि कदाचित् भाजून बिजून मोठी दुखापत होईल तेवढी मात्र न होऊं देण्याकरितां खबरदारी ठेवावी झणजे झालें. याप्रमाणें आपले मनांत विचार करून, नंतर ती आई आपले मुलास असें झणेल कीं बाबा, कदाचित् अज्ञानें तूं आपणास भाजून घेशील. आतां कल्पना करा कीं मुलगा बहुतकरून हें ऐकणार नाहींच व तें न ऐकून त्यानें आपला हात भाजून घेतला, तर त्याचे काय काय परिणाम होतील? पहिला परिणाम हा कीं जें ज्ञान त्यास केव्हां तरी झालेंच पाहिजे, तें ज्ञान आज त्यास प्राप्त झालें, व हें ज्ञान इतकें अवश्यक आहे कीं तें जितकें लवकर होईल तितकें पाहिजेच. दुसरी गोष्ट अशी कीं आईनें हें करूं नको झणून जें पूर्वी सांगितलें त्यांत तिचा उद्देश आपले कल्याणाचा होता हें त्यास कळलें, शिवाय एकंदर आईला आपले कल्याणाविषयीं किती कळकळ आहे हें ही यावरून त्याच्या ध्यानांत येईल; व या योगानें आई जें सांगते, तेंच बरोबर असतें व तिची आपल्यावर खरोखर ममता आहे, हेंही त्यास समजून येईल; व असें झालें झणजे अर्थात् त्याचे मनांत तिजविषयीं विशेष प्रेमबुद्धि खात्रीनें उत्पन्न होणार.

आतां हें आह्मीं सांगितलें पाहिजे असें नाहीं कीं ज्याठिकाणीं हात-पाय मोडण्याची किंवा फारच मोठी दुखापत होण्याची भीति आहे, त्या ठिकाणीं मुलास एकदमच बंद केलें पाहिजे, त्यावेळेस जबरदस्ती सुद्धां करण्याची पाळी आली तरी केली पाहिजे. परंतु असें प्रसंग थोडे. हे प्रसंग खेरीजकरून इतर प्रसंगीं ज्याठिकाणीं केवळ अल्प इजा होईल असें वाटत आहे त्याठिकाणीं मुलास प्रतिबंध न करितां, असें केलें तर तुला अमुक इजा होईल, एवढेंच फक्त सुचवून उगीच राहावें असें आमचें मत आहे, व असें वागल्यानें हल्लींपेक्षां मुलें व आईबाप यांमध्यें विशेष प्रेम राहील यांत संशय नाहीं. याव अशा इतर प्रसंगीं नैसर्गिकपरिणामात्मकशिक्षणपद्धतीचाच जर उपयोग होत गेला, झणजे मुलें घरांत किंवा बाहेर खेळत असतां, व हें पहा तें पहा असें करीत असतां, आपणांस इजा करून घेतील असा संभव असतो, अशावेळीं ज्या मानानें दुखापत होईल असें वाटत असेल, त्या मानानें कमजास्त असें करूं नको इतकाच उपदेश करून, आईबाप त्यास प्रतिबंध न करितांतीं जें काय करीत असतील तेंतसेंच त्यांस

जर करूं देतील, तर खरोखर त्यांचे मनांत आईबापांचे प्रेमाविषयीं विशेष श्रद्धा उत्पन्न होऊन, जें जें आईबाप सांगतील, त्याप्रमाणें आपण वागत गेलों तरच त्यांत आपलें विशेष हित आहे असें त्यांस वाटत जाईल. आह्मीं पूर्वी सांगितलेंच आहे कीं, या पद्धतीच्या योगानें आईबापांना, मुलांस प्रत्यक्ष शासन केल्यामुळें त्यांच्या मनांत आपल्याविषयीं जी अप्रीति बहुतकरून उत्पन्न होत असते, ती सहजीं टाळितां येते. परंतु त्याहीपेक्षां विशेष गोष्ट आतां सिद्ध झाली ती ही कीं, हें करूं नको, तें करूं नको असा वरचेवर मुलांस प्रतिबंध केल्यानें मुलांचे मनांत आईबापांविषयीं अप्रीति उत्पन्न होत असते ती अप्रीति आमचे पद्धतीस अनुसरून वर्तन ठेविलें असतां उत्पन्न होणार नाहीं, इतकेंच नाहीं, तर आमचे पद्धतीच्या योगानें ज्या गोष्टींमुळें प्रायः मुलें व आईबाप यांमध्यें बेबनाव उत्पन्न होत असतो, त्याच गोष्टी परस्परांमध्यें प्रेमभाव उत्पन्न करून तो वृद्धिंगत करण्यासही कारणीभूत होतात. आईबापांचे शब्द मात्र प्रेमसूचक, परंतु त्यांचें वर्तन निदान मुलाचे बुद्धीनें तरी उलट अप्रेमसूचक, हा जो सांप्रत चालू असलेल्या शिक्षणपद्धतीचा प्रकार आहे, तो प्रकार आमचे पद्धतीचा नसून आमचे पद्धतीचे योगानें मुलांस आईबापांचे प्रेमाविषयीं नेहमीं प्रत्यक्ष अनुभवच येत जाईल. असें झाल्यानें आईबापांवर मुलांचा पूर्ण विश्वास बसून त्यांजविषयीं त्यांचे मनांत पराकाष्ठेची प्रेमबुद्धि उत्पन्न होईल, व ही अशी प्रेमबुद्धि व हा असा विश्वास दुसऱ्या कोणत्याही पद्धतीनें उत्पन्न होणार नाहीं अशी आमची खात्री आहे.

याप्रमाणें आमचे पद्धतीस अनुसरून एकसारखें वर्तन ठेविल्यानें आईबाप व मुलें यांमध्यें विशेष प्रेमसंबंध उत्पन्न होईल इतकें दाखविल्यानंतर आतां मोठमोठया गुन्ह्यांच्या संबंधानें आमची पद्धति कशी अमलांत आणावयाची हा जो पूर्वीचा प्रश्न त्याकडे आपण वळूं.

अगोदर प्रथमतः ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, आमची पद्धति मुळापासून सुरू असली झणजे हे मोठमोठे गुन्हे हल्लीं मुलांचे हातून जितके होतात तितके होणारच नाहींत; व कदाचित् झाले तरी हल्लीसारखें त्यांचें स्वरूप असणार नाहीं. मुलांचें परस्परांशीं जें दुर्वर्तन दिसून येतें, त्याचें कारण पहिल्यापासून मुलांचें शिक्षण वाईट तऱ्हेचें असलें

ह्मणजे त्यामुळें त्यांचा स्वभाव एक प्रकारानें बिघडून जातो हेंच होय. वरचेवर आईबापांनीं मारझोड किंवा दुसरी कोणतीही शिक्षा केल्यानें त्यांविषयीं मुलांचे मनांत द्वेष उत्पन्न होऊन तीं त्यांस नकोतशीं वाटतात, व असें झालें ह्मणजे परस्परांमधील प्रेम नाहींसें व्हावयाचेंच. व एकदां प्रेम नाहींसें झालें, ह्मणजे अर्थात् तें प्रेम मुलांच्या ज्या अपराधांस प्रतिबंधक असतें, तें अपराध व्हावयास लागणें हें अगदीं साहजिक आहे. एकाच कुटुंबांतील मुलांचें एकमेकांशीं जें दुर्वर्तन दिसून येतें,तें बहुतकरून आईबापांचें त्यांच्याशीं जें वर्तन असतें,त्याचा परिणाम होय;ह्मणजे त्या दुर्वर्तनाचीं कारणें अंशतः प्रत्यक्ष पाहिलेलें आईबापांचें वर्तन, व अंशतः त्यांनीं दिलेला मार व शिव्या यांमुळें मुलांना आलेला राग, व त्याबद्दल वडयाचें तेल वांग्यावर या न्यायानें सूड घेण्याची त्यांच्या मनांत उत्पन्न होणारी बुद्धि, हीं असतात. यावरून हें निर्विवाद आहे कीं, जर आमच्या शिक्षणपद्धतीच्या योगानें मुलांचे मनांत प्रेमबुद्धीचा विशेष उदय होऊन, त्यांचे ठायीं परस्परांच्या हितसंपादनाची प्रवृत्ति विशेष जागृत होण्याचा संभव आहे तर, ती पद्धति सुरू केली असतां मुलांचें एकमेकांशीं होणारें दुर्वर्तन आपोआप बंद होईल; किंवा निदान हल्लींसारखें तरी असणार नाहीं व ज्या कारणांनीं हें दुर्वर्तन कमी होत जाईल त्याच कारणांनीं चोरी किंवा खोटें बोलणें यासारखे निंद्य अपराधही कमी होत जातील. मुलें व आईबाप यांमधील अप्रेम हेंच अशा प्रकारच्या अपराधांचें बीज आहे. मनुष्याला उच्चप्रतीचें सुख मिळेनासें झालें ह्मणजे तो लागलाच नीचप्रतीच्या सुखाकडे वळतो, हें एक मनुष्य स्वभावाचें मोठें तत्व आहे, व हें जगाच्या राहाटीचें लक्षपूर्वक अवलोकन करणारे जे लोक आहेत त्यांच्या सहजीं ध्यानांत येण्याजोगें आहे. दुसऱ्यांस दुःख झालें तर आपणांस दुःख, दुसऱ्यांस सुख झालें तरच आपणांस सुख, ही जी सर्वोत्कृष्ट स्थिति ती अन्योन्यप्रेमाशिवाय व्हावयाची नाहीं; व या स्थितींत होणारें जें अन्योन्यसुख तें अगदीं निरुपम आहे. हें अन्योन्यप्रेमसुख ज्यास नसतें, तो अर्थात् स्वार्थसुखच शोधूं लागतो; व ह्मणून जर मुलें व आईबाप यांमध्यें विशेष प्रेमभाव असेल, तर केवळ स्वार्थबुद्धि ज्यांचें बीज आहे असे अपराध बरेच कमी झाल्यावांचून रहावयाचे नाहींत.

तथापि जर असे अपराध झालेच, व अत्युत्तम शिक्षण असलें तरीसुद्धां थोडेबहुत असले अपराध व्हावयाचेच, तर त्यालासुद्धां उपाय झटला झणजे नैसर्गिकपरिणामात्मकशिक्षणपद्धत्यनुसार वर्तन हाच.आणि वर सांगितल्याप्रमाणें मुलांचा आईबापांवर जर पूर्ण विश्वास असून परस्परांमध्यें प्रेमभाव असेल तर या पद्धतीनेंगुण आलाच पाहिजे. आतां उदाहरण घेऊन पाहूं. चोरीचेंच पहाना. चोरीचे नैसर्गिकपरिणाम किंवा प्रायश्चित्ताचे प्रकार दोन आहेत; प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष. प्रत्यक्ष परिणाम झणजे सरळ न्यायानें जे आपणांस दिसतात तेच, झणजे चोरलेली वस्तु मालकास परत देणें. खरा न्यायी जो राजा आहे, तो एखाद्यानें एखादें असत्कृत्य केलें असतां त्याचें निरसन त्याजकडून सत्कृत्यानें करवील व पापाचें निरसन पुण्यानेंच करवील, दुराचरणाचें निरसन सदाचरणानेंच करवील. सर्व आईबापांनींही नेहमीं याचप्रमाणें न्यायानेंच वागण्याचा प्रयत्न केला पाहिजे झणजे अर्थात् मुलानें चोरी केली असतां चोरीचें निरसन मालकास चोरलेली वस्तु परत देववून किंवा ती वस्तु गेली असली तर तिचा मोबदला देववूनच केलें पाहिजे. आतां मूल मोबदला काय देणार असें कोणी विचारील, तर त्याला ही तोड आहे कीं, मुलाचे जे कांहीं सुखाचे पदार्थ असतील त्यांपैकीं एखादा पदार्थ कमी करून त्याची किंमत मालकास द्यावी. म्हणजे मुलाला दिपवाळींत कांहीं फटाक्यांला झणून पैसे देण्याचा जर प्रघात असेल, किंवा शिमग्यांत साखरेच्या गांड्या देण्याची वहिवाट असेल, तर चोरलेल्या वस्तूची किंमत भरून येईपर्यंत फटाक्यांला पैसे, किंवा साखरेच्या गांड्या, देऊं नये, झणजे झालें. निदान अंगरखा, टोपी, जोडा, ह्या तरी जिनसा आहेतच. चोरलेल्या वस्तूची जितकी किंमत असेल, त्या मानानें एक दोन सालें जोडा घेऊन दिला नाहीं झणजे बस आहे. आतां चोरीचा अप्रत्यक्ष आणि विशेष मोठा परिणाम झटला झणजे आईबापांचा असंतोष, व हा जे झणून सुधारलेले लोक आहेत व ज्यांस चोरी झणजे पातक असें वाटत असतें त्या लोकांमध्यें अवश्य व्हावयाचाच. परंतु कोणी असें झणेल कीं, आईबापांचे असंतोषाचा प्रादुर्भाव शब्द किंवा ताडन अशा कोणत्यातरी रूपानें हल्लीं चालला च आहे, तेव्हां चोरीचा प्रत्यक्ष परिणाम झणून जो वर सांगितला त्यांत

नवीन काय आहे ? होय. ह्यांत कांहीं नवीन नाहीं खरें. आह्मीं पूर्वीच असें कबूल केलें आहे कीं कांहीं कांहीं बाबतींत, व कांहीं एक प्रकारांनीं आमची पद्धति हल्लींही अमलांत आहेच. दुसरें असेंही पूर्वी आह्मीं दाखविलें आहे कीं, एकंदर हल्लीं चालू असलेल्या शिक्षणपद्धतीचा स्वाभाविक कल खऱ्या पद्धतीप्रत जाऊन पोंचण्याकडे आहे. शिवाय मार्गें येऊन गेलें आहे, तरी पुन्हा एकवार आह्मी असें सांगतों कीं, सृष्टींतील वस्तुस्थितिच अशी आहे कीं, या असंतोषाचा प्रादुर्भाव कालमानास अनुसरून जशी जरूरी असेल, त्याप्रमाणेंच सौम्य किंवा उग्र रीतीनें होत जातो. कोणी अडाणी आणि अशिक्षित असला ह्मणजे त्याचा असंतोषही उग्र रीतीनेंच प्रदर्शित होतो; तोच सुधारलेल्या लोकांमध्यें सौम्य रीतीनें दिसतो, व सुधारलेल्या लोकांचीं मुलेंहीं सुधारलेलींच असल्यामुळें, त्यांस तो सौम्य रीतीनें प्रदर्शित झालेला असंतोषच बस होतो. परंतु या ठिकाणीं आह्मांस जी मुख्य गोष्ट सांगावयाची आहे ती ही कीं, ज्या मानानें मुलें व आईबाप यांमध्यें अधिक प्रेमभाव असेल, त्या मानानेंच या मोठमोठ्या अपराधांपासून आईबापांस झालेला असंतोष प्रदर्शित झाला असतां, तो हे अपराध कमी करण्याचे कामीं अधिक उपयोगी पडेल. आईबाप व मुलें यांमध्यें जर प्रेम असेल तर आईबापांस वाईट वाटलेलें पाहून मुलांसही दुःख झालेंच पाहिजे. आतां तें प्रेम जसें अधिक असेल तसें आईबापांच्या वाईट वाटण्यानें ह्मणजे असंतोषानें मुलांसही अधिक दुःख होईल. असें जर आहे तर मुलांच्या मोठमोठ्या अपराधांपासून झालेला असंतोष आईबापांनीं विशेष दाखविला, ह्मणजे तीच उत्तम शिक्षा मुलांना झाली असें ह्मणण्यास हरकत नाहीं. सारांश आईबाप व मुलें यांमध्यें विशेष प्रेमभाव असणें जरूर आहे; व तो प्रेमभाव आमची पद्धति मुळापासून एकसारखी अमलांत असली ह्मणजे अवश्य उत्पन्न झाला पाहिजे, हें पूर्वी दाखविलेंच आहे. तर यावरून शेवटीं इतकें ठरलें कीं, इतर बाबतींत आमच्या पद्धतीचा अव्याहत क्रम सुरू असला ह्मणजे, या बाबतींतही तिचा उपयोग झाल्याशिवाय राहणार नाहीं; व या आमच्या ह्मणण्याची यथार्थता कोणास प्रत्यक्ष पाहणें असल्यास त्यानें एक घटकाभर जगाकडे नजर फेंकावी ह्मणजे झालें.

प्रत्येक मनुष्यास ही गोष्ट माहीत असेल कीं आपल्या हातून एखाद्याचा अपमान झाला ह्मणजे आपल्यास जें दुःख होतें, तें त्याजबद्दल आपले मनांत जितकें प्रेम असेल त्यामानानें कमजास्त असतें; त्याबद्दल विशेष प्रेम असेल तर विशेष दुःख होतें; कमी असेल तर दुःखही कमी होतें. आतां त्यांत पैशाच्या किंवा इतर संबंधानें नफा नुकसानीची बाब असली ह्मणजे असा प्रकार होणार नाहीं, ही गोष्ट पृथक् आहे. परंतु याशिवायकरून बाकी गोष्टींमध्यें हा प्रकार नेहमीं घडतो हें प्रत्येक मनुष्यास कबूल करावें लागेल. शिवाय याचाही अनुभव पुष्कळांस आलेला असेल कीं, अपमान झालेला मनुष्य आपला शत्रु असला ह्मणजे त्यास दुःख दिल्याबद्दल खेद न वाटतां उलटा एक प्रकारचा मनांत आनंदच वाटत असतो. हेंही पुष्कळांचे लक्षांत असेल कीं अगदीं परकी मनुष्याचे मनांत आपल्याबद्दल किंतु आला आहे असें आपणांस समजलें, तर आपण त्याविषयीं अगदीं बेफिकीर असतों; परंतु ज्याच्याशीं आपला विशेष स्नेह आहे, त्या मनुष्याच्या मनांत आपल्याबद्दल काळेंबेरें आलें आहे असें समजल्यानें आपल्या जिवाला फार हुटहुट लागते. तसेंच ज्याच्याबद्दल आपले मनांत मोठी पूज्यबुद्धि असते व ज्यावर आपलें परम प्रेम असतें, असा स्नेही आपल्यावर रागावला ह्मणजे त्या योगानें आपल्यास पराकाष्ठेचें दुःख होऊन कित्येक दिवसपर्यंत आपल्या जिवाला चैन नसतें. असें जर आहे तर याचप्रमाणें आईबापांच्या असंतोषाचा मुलांवर होणारा परिणाम परस्परांमध्यें पूर्वीचा जसा संबंध असेल तदनुरूपच असला पाहिजे. आतां मुलें व आईबाप यांमध्यें जर वैमनस्य असेल, तर मुलांच्या हातून अपराध झाला ह्मणजे त्यांना भीति काय ती आपल्याला मार बसेल एवढीच. ही त्यांची भीति कायती आपल्या पुरतीच, आणि तो मार एकदां बसून गेला ह्मणजे त्याचा परिणाम आईबापांबद्दल विशेष अप्रीति व विशेष द्वेष ह्यांचा प्रादुर्भाव व तो झाला ह्मणजे अर्थात् पूर्वीचें वैमनस्य अधीकच होणार. आतां ह्याच्या उलट स्थिति असली ह्मणजे काय परिणाम होतो तो पाहूं. आईबापांच्या एकसारख्या स्नेहयुक्त वर्तनानें ज्या मुलाचे मनांत त्यांविषयीं अत्यंत प्रेम उत्पन्न झालेलें आहे, अशा मुलानें आपल्या अपराधामुळें आईबापांस झालेला असंतोष पाहिला ह्मणजे पुढें तशा प्रकारचा अपराध न करण्याविषयीं तो सावध-

गिरी ठेवितो, इतकेंच नाहीं, तर त्याचे मनावर याहीपेक्षां विशेष भेयस्करं असा परिणाम घडतो. आपल्या अपराधामुळें आपणास अत्यंत प्रिय असा जो आपला स्नेही बाप, त्यास असंतोष झाल्यानें त्याच्या प्रीतीस आपण क्षणभर तरी मुकलों, असें वाटून त्यास पराकाष्ठेचें मानसिक दुःख होतें, व प्रायः अशा प्रसंगीं आईबाप मारझोड करून मुलांस जें शारीरिक दुःख देतात, त्याच्या जागीं हें मानसिक दुःख त्यांस होऊन तें त्याच्यापेक्षां नाहीं तरी निदान त्याच्या इतकें तरी तीव्र आहे असें त्यांस वाटत असतें; व शारीरिक दुःखानें जितकी सुधारणा होण्याचा संभव असतो त्यापेक्षां जास्ती सुधारणा या मानसिक दुःखानें होते. शिवाय मारझोडीच्या पद्धतीनें मुलांचे मनांत भीति व सूड घेण्याची बुद्धि उत्पन्न होते. परंतु आमच्या या पद्धतीनें आईबापांस दुःख झाल्याबद्दल मुलांस खेद होतो, त्यांचे दुःखाचें कारण आपण आहों असें वाटून त्यांचें मन त्यांस खाऊं लागतें व कांहीं तरी करून तें पूर्वीचें प्रेम पुनरपि संपादन करावें, अशी त्यांस इच्छा उत्पन्न होते. आपलपोटेपणा किंवा ज्यांमध्यें आपण केवळ आपलें सुखच पाहतों, असे जे स्वसुखैकविषयक विचार, त्यांचें प्राबल्य हेंच सर्व अपराधांचें बीज होय. अशा विचारांचा उदय न होतां ज्यांमध्यें आपण दुसऱ्याच्याही सुखाकडे पाहतों व ज्यांचे योगानें आपण अपराध करीनासे होतों, अशा परहितपरायण विचारांचेंच प्राबल्य आमचे पद्धतीच्या योगानें मुलांच्या मनांत होत जातें.सारांश नैसर्गिकपरिणामात्मकशिक्षणपद्धति क्षुल्लक किंवा मोठे, कोणत्याही प्रकारच्या अपराधांच्या संबंधानें लागू पडणारी आहे. शिवाय या पद्धत्यनुसार सतत वर्तन ठेविल्यानें मुलांचे अपराध नुसते कमी होतील, इतकेंच नाहीं, तर कालेंकरून त्यांचा सर्वांशींही लोप होईल.

सारांश तात्पर्य इतकेंच कीं निष्ठुरतेपासून निष्ठुरता उत्पन्न होते; व सौम्यपणापासून सौम्यपणा उत्पन्न होतो; द्वेषामुळें द्वेष वाढतो, व प्रीतीमुळें प्रीति वाढते. मुलांस जर निष्ठुरतेनें वागविलें, तर तींही निष्ठुर व्हावयाचींच; व जर प्रेमबुद्धीनें वागविलें, तर त्यांचेही ठिकाणीं प्रेमाचा उदय झाल्यावांचून राहावयाचा नाहीं. राजकीय व्यवस्था घ्या, किंवा कुटुंबव्यवस्था घ्या, त्यांत निष्ठुर जुलमी कायदे असले ह्मणजे जरी ते कायदे गुन्हे बंद

करण्यासाठीं केलेले असतात, तरी पुष्कळ अंशीं त्या कायद्यांमुळेंच गुन्हे वाढत असतात. परंतु तेच कायदे सौम्य असले ह्मणजे आपोआप कलहांचें बीज मोडत जातें, व मनाची स्थितिही एक प्रकारें सुधारत जाऊन अपराध करण्याची प्रवृत्ति दिवसेंदिवस कमी होत जाते. पुष्कळ वर्षांपूर्वी शिक्षेचे संबंधानें जॉनलॉक नामक प्रसिद्ध तत्ववेत्त्यानें असें ह्मटलें आहे कीं, कडक शिक्षा केल्यानें तादृश फायदा तर होत नाहींच, परंतु उलटें नुकसान मात्र फार होतें. पाहूंच गेले तर आपणांस असें आढळेल कीं ज्या मुलांस लहानपणीं पुष्कळ मार बसलेला आहे, तीं मोठेपणीं बहुतकरून चांगलीं निपजलेलीं नाहींत. हें ह्मणणें सर्वस्वीं खरें आहे; व या मताचे पुष्टीकरणार्थ पांटीव्हेली तुरुंगावरील धर्माधिकारी रॉजर्स याचा अनुभव या ठिकाणीं सांगणें इष्ट आहे. त्याचे अनुभवास असें आलें आहे कीं, ज्या मनुष्यानें लहानपणीं फटके खाल्ले आहेत, असेच मनुष्य वारंवार गुन्हे करून पुन्हां पुन्हां तुरुंगांत आलेले आहेत. याच्या उलट मुलांस प्रेमपूर्वक वागविल्यानें कसे चांगले परिणाम होतात, याविषयीं स्वतांच्या अनुभवाचें एक उत्कृष्ट उदाहरण मूळ ग्रंथांत हरबर्ट स्पेन्सर यांनीं दिलेलें आहे. ते असे सांगतात कीं, परवां आह्मी पारिस शहरांत एका बाईकडे उतरलों होतों, तेथें आमच्या असें नजरेस आलें कीं तिचा धाकटा मुलगा अतिशय दांडगा व उच्छृंखल असून, तो शाळेंत किंवा घरीं कोणाचेंच ऐकत नसे. त्या मुलाच्या संबंधानें ती असें ह्मणाली कीं याच्या पुढें आमचा कांहीं इलाज चालत नाहीं; सर्व उपाय करून आह्मी थकलों; कांहीं केल्यानें हा सुधारत नाहीं. आतां याचा थोरला भाऊ असाच दांडगा होता, व तो ज्या उपायानें सुधारला त्या उपायानें कांहीं झालें तर पहावें. कदाचित् त्या उपायानें हा सुधारला तर सुधारेल; व तो उपाय ह्मणजे याला इंग्लंडांत कोणत्या तरी शाळेंत ठेवणें. ह्या थोरल्या मुलास पारिसमधील झाडून सर्व शाळांतून घालून पाहिलें, परंतु गुण आला नाहीं, तेव्हां शेवटीं निराश होऊन कोणीं याला इंग्लंडास पाठवावें ह्मणून सांगितलें; त्याप्रमाणें त्यास तेथें पाठविलें. तेथें मात्र तो सुधारला. तेथून घरीं परत आल्यावर पाहिलें तर त्याच्या अगांत पूर्वीचें कांहीं एक वारें नाहीं. तो पूर्वी जितका वाईट होता, तितका नंतर चांगला झाला. आणि ही जी त्याच्यामध्यें विलक्षण

सुधारणा झाली, तिचें कारण त्या आईच्या मतें इंग्लंडांतील विशेष सौम्य रीतीची शिक्षणपद्धति होय.

ह्याप्रमाणें मूलतत्वांचें विवरण करून आतां ह्यापुढें त्या तत्वांपासून निघणारीं आचरण्यास योग्य अशीं थोडींशीं वचनें व नियम सांगणें इष्ट होईल. आतां हें काम थोडक्यांत व्हावें ह्मणून तीं वचनें व ते नियम आह्मी केवळ विधिरूपानें सांगणार.

मुलांचे अगीं सुनीतीचा भाग विशेष आढळून येईल अशी तुह्मीं आशाच बाळगूं नये. लहानपणीं प्रत्येक सुशिक्षित मनुष्याचा स्वभाव ज्या रानटी पूर्वजांपासून त्याची उत्पत्ति झाली आहे, त्या रानटी पूर्वजांच्या स्वभावासारखा असतो. ज्याप्रमाणें मुलाचें चपटें नाक, त्याच्यापुढें आलेल्या व पसरट नाकपुड्या, मोठे ओठ, रुंदट डोळे, इत्यादि अवयव कांहीं कालपर्यंत रानटी मनुष्याच्या अवयवांसारखे असतात, त्याचप्रमाणें त्याचे स्वाभाविक कलही कांहीं कालपर्यंत रानटी मनुष्याच्या कलांप्रमाणेंच असतात. ह्यामुळेंच चोरी करणें, खोटें बोलणें, इत्यादि गोष्टींकडेच मुलांचा लहानपणीं विशेष कल असतो; व हा कल ज्याप्रमाणें त्यांचे अवयव आपोआप सुधारत जातात, त्याप्रमाणें शिक्षणाशिवायच सुधारत जातो. लोक असें ह्मणतात कीं, मुलांचीं मनें शुद्ध असतात; परंतु ह्याचा अर्थ इतकाच समजावयाचा कीं, मुलें समजून उमजून कधीं वाईट गोष्टी करीत नाहींत; परंतु त्यांच्या मनाचे कल वस्तुतः नेहमीं वाईटच असतात; व हें आपणांस मुलांचें लहानपणचें घरांतील वर्तन उगीच क्षणभर लक्ष लावून पाहिलें ह्मणजे सहजीं कळून येईल. शाळेमध्यें मुलांवर कोणाचा दाब नसतो, तेव्हां त्यांचें परस्परांशीं वर्तन पशुतुल्य असतें तसें वर्तन आपणास जाणत्या लोकांमध्यें कधींच दिसून येत नाहीं. अगदीं लहान वयामध्येंच जर मुलांस मोकळें सोडिलें, तर तीं दुर्वर्तनामध्यें कदाचित् पशूंलाही मागें टाकितील.

मुलांस अगदीं उच्चप्रतीचें नीतिशिक्षण द्यावयाचें मनांत आणितां कामा नये;तसेंच त्यांनीं आपलें आचरण चांगलें ठेवावें ह्मणून त्यांस विशेष लालूच किंवा धाकही दाखवितां कामा नये. ज्याप्रमाणें बुद्धीस अकालीं पक्व दशा प्राप्त झाली असतां वाईट परिणाम होतात, त्याचप्रमाणें नीतिसंबंधानें तशीच पक्व दशा प्राप्त झाली असतां तसेच वाईट परिणाम होतात, ही गोष्ट

सर्वांनीं लक्षांत ठेविली पाहिजे. आपले श्रेष्ठ प्रतीचे मनोभाव, आपल्या श्रेष्ठप्रतीच्या मानसिक शक्तींप्रमाणें बरेच मिश्र असतात; आणि ह्मणून त्या दोन्हींचाही विकास होण्यास बराच विलंब लागतो. ज्याप्रमाणें मानसिकशक्तींस अकालीं मुद्दाम आणलेल्या तरतरीनें अपाय होतो, त्याचप्रमाणें अंगीं अकालीं मुद्दाम आणलेल्या सदाचरणाच्या बाण्यानें आपल्या पुढील नीतीसही अपायच होतो. ह्यामुळेंच ज्या मुलांचें आचरण लहानपणीं आपणांस अगदीं उत्तम प्रकारचें वाटतें तींच मुलें पुढें प्रायः हळूहळू बिघडत जाऊन, शेवटीं त्यांचें आचरण अगदीं साधारण मनुष्यापेक्षांही कमी प्रतीचें होतें. तसेंच जाणतेपणीं ज्या लोकांचें आचरण अगदीं उत्तम प्रतीचें असतें, ते लोक बहुतकरून लहानपणच्या आचरणावरून असे निपजतील असें बिलकूल वाटत नसतें. ह्याप्रमाणें जगांत विपरीत उदाहरणें घडून आलेलीं आपण पाहतों; व त्यांचें कारण माहीत नसल्यामुळें त्यांचा आपणांस चमत्कारही वाटतो.

ह्यास्तव जे उपाय योजावयाचे, त्यांपासून होणारें फल जरी बातबेतावेंच असलें, तरी तेवढ्यांतच तुह्मांस तृप्त राहिलें पाहिजे. आपली बुद्धि आणि सदसद्विचारशक्ति या क्रमशः सुधारत जाऊन त्यांचा शेवटीं उत्कर्ष होतो ही गोष्ट जर नेहमीं मनामध्यें बागविली, तर मुलांच्या अंगीं क्षणोक्षणीं जे दोष दिसून येतात, त्यांचा तुह्मांस राग येणार नाहीं; व त्यांस दटावणें, दाबदपटशा देणें, इकडे जो तुमचा विशेष कल असतो, तो खात्रीनें कमी होईल. अशा कृतींनीं मुलें उत्तम सदाचरणी होतील, अशी आशा बाळगणें ह्मणजे वेडेपणा होय. आह्मी तर उलट असें समजतों कीं, त्या कृतींच्या योगानें आपण घरामध्यें केवळ दीर्घ कलहांचें बीजच घालीत असतों.

आह्मी जी शिक्षणपद्धति सुरू करावी असें ह्मणतों ती शिक्षणपद्धति लोकांनीं एकदां सुरू केली ह्मणजे ते सहजींच आपल्या मुलांस हरएक गोष्टीमध्यें सौम्य रीतीनें वागवूं लागतील. मुलांच्या कृतींचे नैसर्गिक परिणाम त्यांस भोगावयास लावून जर लोक स्वस्थ राहतील, तर मुलांवर अतिशय दाब ठेवण्याची जी पुष्कळ आईबापें चुकी करितात, ती सहसा त्यांच्या हातून व्हावयाची नाहीं. मुलांस स्वतःच्या कृत्यांचे परिणाम भोगावयास लावणें, याशिवाय त्यांस शिस्त लावण्याकरितां कांहीं कडक उपाय योजतां

कामा नये. जर योजाल तर मुलांच्या अंगीं असलेले गुणांची माती होण्याचा संभव आहे; ह्मणजे त्याच्या योगानें मुलगा गरीब असला तर त्याच्या अंगीं केवळ दिखाऊ चांगुलपणा येईल; व मुलगा पाणीदार असला तर त्याच्या अंगीं नीतीस अपायकारक अशी द्वेषबुद्धि उत्पन्न होईल.

मुलांस त्यांच्या कृत्यांचे नैसर्गिक परिणाम भोगावयास लावण्याचा निर्धार केल्यानें आपणांसही एक प्रकारचें मनोनिग्रहाचें शिक्षण मिळत असतें; व तें मिळणें इष्टही आहे. बहुतेक सर्व लोकांची नीतिशिक्षण देण्याची पद्धति ह्मटली ह्मणजे राग आल्याबरोबर जसें वाटतें तसें एकदम करावयाचें; ह्या पलीकडे कांहीं नाहीं. मुलांनीं कांहीं लहानसा अपराध (आधीं वस्तुतः तो बहुतकरून अपराधही नसतो) केला असतां त्यांस शिव्या देणें, त्यांच्या तोंडांत देणें वगैरे शिक्षा आई करीत असते. परंतु हें सर्व तिच्या मनोवृत्ति क्षुब्ध होऊन अनिवार ह्माल्या ह्मणजे तिजला त्या करावयास लावितात, व ह्मणूनच ती तें करते, त्यापासून मुलांस कांहीं फायदा व्हावा ह्मणून नव्हे. मुलानें अपराध केल्याबरोबर त्याचे नैसर्गिक परिणाम काय आहेत, व ते त्यास भोगावयास कोणत्या प्रकारें लाविले पाहिजेत इत्यादिगोष्टींचा विचारकरून जर ती काय करणें तें करील,तर तिला विचार व आत्मसंयमन करण्यास कांहीं थोडासा तरी वेळ सांपडेल. अपराध ह्माल्याबरोबर तत्क्षणीं आलेला राग इतका कडक असतो कीं त्याच्या योगानें आपणांस मागें पुढें कांहींच दिसेनासें होतें; ह्मणून तो राग शांत होईपर्यंत आपण कांहींच करूं नये; जरा राग शांत ह्माल्यानंतर जें करणें तें केलें ह्मणजे आपल्या हातून सहसा गैर गोष्ट घडून यावयाची नाहीं.

परंतु आपणास कांहींसा रागही आलाच पाहिजे. कारण आपलें वर्तन केवळ निर्जीव तरवारी सारखें असून चालावयाचें नाहीं. मुलांच्या कृत्यांचे जे नैसर्गिक परिणाम त्यांस भोगावे लागतात, त्यांशिवाय तुह्मांस येणारा राग किंवा होणारें समाधान हेंही त्यांच्या कृत्यांच्या नैसर्गिक परिणामांतच येत असून त्यांस ताळ्यावर आणण्या करितां निर्दिष्ट साधनांपैकीं एक साधन आहे, ही गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे. ईश्वरानें जीं साधनें योजिलीं आहेत, तीं टाकून त्यांच्या ऐवजीं आईबापांचा राग व तज्जन्य कृत्रिम शासनें,यांचा उपयोग करणें ही चुकी आहे. व या चुकीवि

बयाचें आमचा कायतो वाद आहे. नैसर्गिक शासनांच्या स्थानीं या कृत्रिम शासनांची योजना करितां कामानये, असें जरी खरें आहे, तरी ह्यांचें एक प्रकारचें साहचर्य असूं नये, असें आमचें बिलकूल ह्मणणें नाहीं. मुख्य शासनांचा सर्व अधिकार गौणशासनांनीं सर्वस्वी आपणांकडे हिसकावून घेऊं नये असें जरी आहे, तरी गौणशासनांनीं मुख्य शासनांस बेतानें साहाय्य करण्यास हरकत नाहीं. तुमचें दुःख किंवा तुमचा राग वर्तनानें किंवा शब्दांनीं विचार करून योग्य वाटल्यास प्रदर्शीत केलाच पाहिजे. तुमची मनोवृत्ति कोणत्या प्रकारची असावी, व ती कोणत्या थरास जावी हें सांगत बसणें निरर्थक आहे; कारण तें तुमच्या स्वभावावरच अवलंबून असावयाचें. तथापि ज्या प्रकारची मनोवृत्ति असली पाहिजे, असें तुह्मांस वाटत असेल, तशाच प्रकारची मनोवृत्ति ठेवण्यास तुह्मांस वाटल्यास प्रयत्न करावा. तुमचा राग किती असावा व तो किती काळपर्यंत राहावा या दोन्ही गोष्टींचा निर्णय करितांना ही किंवा ती कोटिच धरून बसण्याविषयीं सावधगिरी ठेविली पाहिजे. एक तर एका हातानें मारावयाचें व दुसऱ्या हातानें कुरवाळावयाचें, असें जें आईचें साधारणपणें आह्मी नेहमीं अधीरपणाचें वर्तन पाहतों, तशा प्रकारचें वर्तन असतांच कामानये. तसेंच दुसरें तुमची अप्रीतिही पुष्कळ वेळ राहतां कामानये. कारण त्याच्या योगानें मुलांस तुमच्या प्रीतीशिवाय आपलें चालतें, असें वाटून तुमचें त्यांच्यावरील वजन नाहींसें होईल. मुलांच्या कृत्यांच्या योगानें अगदीं उत्तम स्वभावाच्या आईबापांची ज्या प्रकारची मनोवृत्ति होईल, तशाच प्रकारची तुमची मनोवृत्ति ठेवण्यास तुह्मीं होतां होईल तितकें करून झटलें पाहिजे.

हुकुम फर्मावयाचे तेही होतां होईल तितकें करून कमीच असावे. दुसरीं सर्व साधनें अगदीं निरर्थकशीं वाटलीं किंवा थकलीं, ह्मणजेच हुकूम करावा. रिचर असें ह्मणतो कीं, बहुतेक सर्व हुकुम करितांना मुलांच्या कल्याणापेक्षां आईबाप आपल्या वैचस्वासच विशेष जपत असतात. ज्याप्रमाणें अगदीं प्राचीन काळच्या लोकसमाजामध्यें कायदा मोडला असतां शिक्षा होत असे ती केवळ कायदा मोडणें हें वस्तुतः अन्यायाचें आहे ह्मणून नव्हे, तर कायदा मोडल्यानें राजाज्ञेचा अवमान होतो, किंवा राजाविरुद्ध बंड केल्यासारखें होतें ह्मणून, त्याचप्रमाणें पुष्कळ

कुटुंबांमध्यें मुलांच्या अपराधांकरितां ज्या शिक्षा होतात, त्या अपराध निंद्य वाटतात म्हणून नव्हत, तर त्या अवज्ञेच्या रागामुळेंच होत असतात. घरांत नेहमीं चाललेलीं " तूं माझें ऐकत नाहींस काय ? तुला मी तें करावयास लावीनच. तुला आतांशा कोणी हडपता नाहीं असें वाटावयास लागलें आहे वाटतें," वगैरे बोलणीं ऐकलीं व ते शब्द, व तो स्वर, आणि तो बोलण्याचा तोरा वगैरे सर्व कांहीं मनांत आणलें म्हणजे त्यावरून मुलांच्या कल्याणापेक्षां त्यांस आपल्या कह्यांत आणण्याकडेच आईबापांचें विशेष लक्ष असतें असें दिसून येईल. एखाद्या जुलमी राजाचा आपला हुकूम तोडणाऱ्या प्रजाजनास शिक्षा करण्याचा निश्चय झाला असतां जी त्याच्या मनाची स्थिति होते तशाच प्रकारची त्यावेळीं तरी त्यांच्या मनाची स्थिति असते असें म्हणण्यास हरकत नाहीं. तथापि ज्या आईबापांस न्यायान्याय कळतो, त्या आईबापांस एखाद्या न्यायी व दयाळू कायदे करणाराप्रमाणें जुलूम करून नव्हे, तर जुलूम बंद करूनच आनंद वाटतो; मुलांचा वर्तनक्रम व्यवस्थित राखण्यास इतर साधनें चालण्यासारखीं असलीं तर चांगलीं आईबापें कायदा कधीं अमलांत आणणार नाहींत; व कायद्याचा उपयोग करण्याचें जेव्हां भाग पडेल, तेव्हां त्यांस वाईटही वाटेल. रिचर असें म्हणतो कीं, जींत विशेष जुलूम नाहीं, तीच राजनीति उत्तम; व हीच गोष्ट शिक्षणासही लागू पडते. ज्या आईबापांस वर्चस्व संपादण्यापेक्षां आपलें कर्तव्यकर्म करणें हेंच विशेष वाटत असतें, तीं आईबापें आपण होऊनच या वचनास अनुसरून साधेल तितकें शिक्षणाचें काम मुलांचें मुलांवर संपवितील; व सर्व उपाय हरले म्हणजे 'हम् करेसो कायदा' या तत्वाचा उपयोग करितील.

परंतु तुम्हांस हुकूम करण्याचा प्रसंग आलाच तर तो हुकूम तुम्ही खाडदिशीं करीत जा, व तो नेहमीं अमलांत आणीत चला. प्रसंगविशेषीं हुकुम केल्याखेरीज चालत नाहीं असें झालेंच, तर हुकूम सोडावा. परंतु एकदां हुकूम सुटला म्हणजे मात्र त्यापासून ढळतां कामाच नये. आपण काय करीत आहों, त्याचे परिणाम काय होतील, व म्हणतों तसें करण्याचा आपल्या अंगीं पूर्ण दृढनिश्चय आहे कीं नाहीं इत्यादि गोष्टींचा पूर्ण विचार करून मग कोणता तो नियम करावा; व एकदां नियम केला म्हणजे मात्र कांहीं झालें तरी तो अमलांत आणलाच पाहिजे. निर्जीव सृष्टपदार्थांप्रमा-

णेंच तुमचें शासन अगदीं अपरिहार्य असलें पाहिजे. प्रथमतः निखाऱ्यास हात लावल्याबरोबर मुलाचा हात भाजतो, दुसऱ्यानें हात लावल्याबरोबर दुसऱ्यानें भाजतो, तिसऱ्यानें लाविला कीं तिसऱ्यानें भाजतो, व असें प्रत्येक वेळ होत गेल्यानें मूल लवकरच निखाऱ्यास हात लावूं नये, ही गोष्ट शिकतें. असाच जर तुमच्या शासनामध्येंही मेळ राहत गेला, तुमच्या सांगण्याप्रमाणेंच जर मुलांच्या कृत्यांचे परिणाम एकसारखे घडून येत गेले, तर तें मूल तुमच्या नियमांसही अगदीं सृष्टिनियमांप्रमाणेंच मान देऊं लागेल. व असा एकदां तुमचा वचक बसून गेला, ह्मणजे तुमच्या घरांतील अनंत विघ्नें सहजीं टाळलीं जातील. शिक्षणामध्यें जे दोष दिसून येतात, त्यांपैकीं कशांत कांहीं मेळ नसणें, हा एक मोठाच दोष होय. ज्याप्रमाणें लोकसमाजांमध्यें न्यायाचें काम ढिलाईनें चालत असलें ह्मणजे अपराधांची संख्या वाढत जाते, त्याचप्रमाणें कुटुंबामध्यें शिक्षेचें काम भीत भीत किंवा अनियमितपणें चालत असलें, तर अपराधांची संख्या जास्त वाढतच जाते. एखादी वेडगळ आई मुलास नेहमीं शिक्षेची भीति घालिते, परंतु ती अमलांत कधीं काळींच आणिते; तडाक्या सरसे नियम करून टाकिते, व मागाहून पस्ताव्यांत पडते, लहर लागेल त्याप्रमाणें एकाच अपराधास कधीं कडक शिक्षा करते, कधीं तिकडे अगदीं कानाडोळाच करिते; अशा प्रकारची आई खरोखर आपल्यास आणि मुलांस पुढें होणाऱ्या दुःखांच्या उत्पत्तीचें बीजच घालीत असते; अशाप्रकारच्या कृतींनीं मुलांस आई ह्मणजे कांहीं नाहींसें वाटूं लागतें; व त्यांस मन स्वाधीन नसणें ह्मणजे काय, ह्याचें एक ती उदाहरणच होऊन जाते. अपराध करूनही आपणांस शिक्षा टाळतां येते असें पाहून त्यांना अधिकच अपराध करावेसे वाटतात; घरांमध्यें असंख्य कलागती माजून आईबापांचा व मुलांचा स्वभाव नेहमीं बिघडत असतो; मुलांच्या अंगीं नीतितत्वाचें वारें ही राहात नाहीं; पुढें प्रौढ वयामध्यें त्यांस क्लेश भोगावे लागतात; व त्यांस पुन्हां नीतीच्या मार्गास लावणें ह्मणजे अगदीं दुष्कर होऊन जातें; ह्या सर्व अनर्थांचें ती एक आईच कारण होय. घरची शिक्षा सुधारलेल्या प्रकारची असून ही जर तिजमध्यें कांहीं मेळ नसेल तर तिचा कांहीं उपयोग नाहीं. तिच्यापेक्षां शिस्त जरा अडाणी प्रकारची असून जर तिजमध्यें सतत मेळ

रहात गेला, तर तिचाच जास्त उपयोग होईल. पुन्हां आह्मी एकवार असें सांगतों कीं, जुलमी उपाय योजण्याचें होतां होईल तितकें करून टाळावें. व ते योजलेच पाहिजेत असें तुह्मांस दिसेल तर मात्र तो क्रम सतत मनापासून चालविल्याशिवाय राहूं नका.

मुलांचा वर्तनक्रम दुसऱ्यांनीं व्यवस्थित ठेवावयाचा नाहीं तर तो त्यांचा त्यांस ठेवितां आला पाहिजे हाच शिक्षणाचा मुख्य उद्देश आहे ही गोष्ट ध्यानांत ठेवा.तुमच्या मुलांच्या नशिबीं जर दास्यांतच दिवस काढावयाचे असते, तर त्यांस दास्याचीच सवय जितकी करून द्यावी तितकी थोडी असेंच आह्मीं झटलें असतें. परंतु आतां आपणांस दयाळू इंग्लिश सरकारच्या कृपेनें स्थानिक स्वराज्यासारखे हक्क मिळून दिवसानुदिवस स्वातंत्र्याचा लाभ व्हावयाचा आहे, आपला नेहमींचा वर्तनक्रम व्यवस्थित ठेवण्यास आंतां दुसरें कोणी नसावयाचें, तो आपला आपणच ठेविला पाहिजे, अशी जर स्थिति आहे तर मुलें आईबापांच्या देखरेखी खालीं असतांना त्यांस आपली व्यवस्था आपण कशी ठेवावी हें आईबाप जितकें शिकवितील तितकें थोडेंच;व ह्यामुळेंच कृत्यांच्या नैसर्गिक परिणामांनीं शिक्षण देण्याची ही पद्धति विशेषें करून आपल्या सध्याच्या सामाजिक स्थितीस फार योग्य आहे. ज्यावेळेस खोती, पाटिलकी सारखे प्रकार सुरू असून प्रत्येक रयतेस, आपल्या वरिष्ठाच्या रागाची भीति बाळगावी लागत असे, त्यावेळेस आईबापांचा राग हेंच सर्व शिक्षणांचें तत्व असणें योग्य होतें. परंतु आतां रयतेस मुख्य सरकाराखेरीज दुसरे कोणाची भीति बाळगण्याचें विशेष कारण नाहींसें झालें आहे, आतां स्वतःच्या वर्तनाचे वस्तुस्थितीस अनुसरून जे बरे वाईट परिणाम व्हावयाचे तेच काय ते त्यांस विशेषें करून भोगावयाचे असतात; तर अशा वेळीं मुलांस लहानपणापासूनच दर एक कृत्याचे बरे वाईट परिणाम प्रत्यक्ष अनुभवानें शिकत गेलें पाहिजे; व ह्मणूनच कृत्यांचें भावी परिणाम लक्षांत आणून तदनुसार वर्तन ठेवण्याचें त्यांच्या आंगीं सामर्थ्य आल्याबरोबर आईबापांची शिस्त बंद होऊन वर्तनक्रमासंबंधीं सर्व काम मुलांवरच पडलें पाहिजे या गोष्टीकडे तुमचें लक्ष असूंद्या. मुलांच्या अगदीं लहानपणीं आपणांस 'हम् करेसो कायदा' या तत्वाचें बरेंच अनुकरण करणें भाग आहे.

एखादें तीन वर्षांचें मूल उघडलेल्या चाकूशीं खेळत असतां त्यास त्याच्या कृत्यापासून होणारे परिणामांनीं शिक्षण देण्याकरितां तसेंच खेळूं देतां उपयोगी नाहीं. कारण त्यापासून होणारे परिणाम फारच भयंकर आहेत. परंतु जसजशी मुलांची बुद्धि वाढत जाते तसतसें त्यांच्या कामांत पडून आपला अधिकार चालविण्याचें काम कमी करितां येईल, व तसें करीत गेलेंच पाहिजे; व शेवटीं तीं अगदीं वयांत आलीं झणजे आपला सर्वही अधिकार सोडून दिला पाहिजे. कोणतेंही स्थित्यंतर होणें झणजे एकंदरीनें काम कठीणच आहे; तशांत घरचा दाब सुटून जगामध्यें आपल्यावर कोणत्याही प्रकारचा दाब नसणें, हें स्थित्यंतर फारच कठीण होय; आणि झणूनच आझी झणतों तशीच शिक्षणपद्धति असणें अगत्याचें आहे. आमच्या शिक्षणपद्धतीचे योगानें मुलांस लहानपणापासून आत्मनियमनाची संवय लागून ती हळू हळू वाढत जात असते, व शेवटीं त्यांस अगदीं स्वतंत्र रीतीनें आत्मनियमन करतां येऊं लागतें; व अशा रीतीनें लहानपणचें सर्व बाह्यनियमन जाऊन त्याच्या ऐवजीं वयांत आल्यावर आत्मनियमन सुरू होणें, ह्या आकस्मिक आणि भयंकर स्थित्यंतराची जरूरीच राहत नाहीं. इतिहासावरून इंग्लंड वगैरे देशांतील राज्यव्यवस्थेमध्यें झालेले फेरफार ज्याप्रमाणें दिसून येतात तशाच प्रकारचे फेरफार तुमच्या गृहशिक्षणामध्येंही दिसून आले पाहिजेत; झणजे पहिल्यानें जेव्हां दुसऱ्याचें नियमन असणें जरूर आहे, तेव्हां आईबापांनीं एकछत्री अंमल चालवावा, नंतर ज्याप्रमाणें पुढें प्रजेस थोडथोडी मोकळीक मिळत गेली पाहिजे तसतशी मुलांसही थोडथोडी मोकळिक दिली पाहिजे. नंतर हीच मोकळीक थोडथोडी वाढवीत जाऊन अगदीं शेवटीं आईबापांनीं आपल्या सर्व अधिकाराचा राजीनामा देऊन सर्व व्यवस्था मुलांवरच संपविली पाहिजे.

मुलांच्या अंगीं हट्ट दिसून आला, तर त्यापासून वाईट वाटूं देऊ नका. हल्लीं शिक्षणपद्धतीमध्यें विशेषेंकरून जुलुमाचा प्रकार कमी झाल्यामुळें मुलांमध्येंही स्वातंत्र्याचा अंकूर दिसून आलाच पाहिजे. कारण एकपक्षीं स्वातंत्र्य असावें अशाविषयीं जितकी जास्त उचल होईल, तितकें दुसऱ्या पक्षीं जुलुमाचें मान कमी आलेंच पाहिजे. ह्या दोन्ही प्रवृत्तींवरून आझी जी शिक्षण पद्धति असावीशी झणतों तदनुसारच लो-

कांचें वर्तन हळूहळू होत चाललें आहे असें दिसतें. आतां मुलें ह्या नैसर्गिक परिणामांच्या अनुभवानें आत्मनियमन करण्यास हळू हळू लागतील. हल्लींच्या सुधारलेल्या सामाजिक स्थितीमध्यें तरी ह्या दोन्ही प्रवृत्ति दिसून येतातच. इंग्लंडांतील मुलांमध्यें स्वातंत्र्याची गोडी आहे म्हणूनच इंग्लंडांतील जाणते लोकांमध्यें तरी स्वातंत्र्याची गोडी आहे. ही गोडी लहानपणीं नसेल तर मोठेपणीं यावयाची नाहीं. जर्मन शिक्षक लोक असें म्हणतात कीं, आम्ही बारा जर्मन मुलांस संभाळूं, परंतु एक इंग्लिश मुलास संभाळण्याचें काम आमच्या हातून व्हावयाचें नाहीं. इंग्लिशलोकांनीं आपलीं मुलें जर्मन मुलांप्रमाणें गरीब असावीं, त्यांस राजकीय स्वातंत्र्याची गोडी नसावी, व त्यांनीं जर्मन लोकांप्रमाणें अगदीं दास्यांत असावें अशी इच्छा करावी काय? किंवा इंग्लिशलोकांच्या मुलांमध्यें जे स्वातंत्र्याचे अंकुर दिसून येतात ते तसेच राहूं देऊन आपल्या सर्व पद्धति तदनुसार बदलाव्या?

आतां शेवटीं ही गोष्ट पक्की लक्षांत ठेवा कीं, योग्य शिक्षण देणें हें काम साधें आणि सोपें नाहीं, भानगडीचें आणि विलक्षण कठीण आहे. किंबहुना प्रौढवयांत मनुष्याचे अंगावर जीं जीं कामें पडतात त्या सर्वांत यासारखें दुसरें कोणतेंही काम बिकट नाहीं असें झटलें तरी चालेल. दांडगाईचें आणि लहरी असें गृहशिक्षण अगदीं अशिक्षित आणि निकृष्ट अशा बुद्धीचे लोकांसही सुखसाध्य आहे. अपराध झाला असतां मारझोड कशी करावी व शिव्या कशा द्याव्या हें अगदीं अडाणी रानटी मनुष्याला किंवा मुर्ख धनगराला सुद्धां कोणी सांगितल्याशिवाय आपोआप कळतें, फारतर काय पशूंनाहीं या शिक्षणपद्धतीचा उपयोग करितां येतो. एखाद्या कुत्रीला तिचें पोर फारच लुचून त्रास देऊं लागलें म्हणजे ती त्याचे अंगावर गुरगुरून त्यास चावल्यासारखें करिते. यांत तरी ती या वर सांगितलेल्याच पद्धतीचा उपयोग करीत नाहीं काय? सारांश विचारशून्य पशूंनाही ही पद्धति साध्य आहे. म्हणजे अर्थात् ही पद्धति अडाणी व जींत विचाराचें बिलकुल अंग नाहीं अशीच आहे हें उघड होतें. परंतु युक्तीची, शहाणपणाची आणि सुधारलेली अशी जी शिक्षण पद्धति तिचा उपयोग करून तिजपासून होणारें अत्युत्तम फल प्राप्त व्हावें अशी जर तुमची इच्छा असेल तर त्या पद्धतीस आवश्यक अशीच आपले मनाची

स्थिति तुम्हीं ठेविली पाहिजे. विचार, युक्ति किंवा धोरण, शांति आणि आत्मसंयमन ह्या चार गोष्टींचें निदान अंशतः तरी तुमचे मनांत वास्तव्य झालें पाहिजे. प्रौढ वयांत कोणत्या कृत्याचा कोणता परिणाम होतो, हें प्रथमतः तुम्हीं विचारपूर्वक पाहिलें पाहिजे; व नंतर तीं कृत्यें मुलांच्या हातून झालीं असतां त्यांजवर तेच परिणाम घडतील अशी युक्ति योजली पाहिजे. मुलांनीं एखादें कृत्य केलें असतां त्यामध्यें त्यांचा काय उद्देश आहे हें पाहणें नेहमीं अगदीं जरूर आहे. खरोखर चांगलीं कृत्यें कोणतीं व नीचमनोवृत्तीपासून झालेलीं परंतु दिसण्यांत मात्र चांगलीं अशीं कृत्यें कोणतीं, याचाही निवाडा नेहमीं केला पाहिजे. कित्येक प्रसगीं मुलें कांहीं न करितां स्तब्ध राहिलीं म्हणजे हा त्यांचा अपराध अशी कित्येकांची समजूत असते. किंवा मुलांनीं एखादें कृत्य केलें म्हणजे खरोखर असतो त्यांपेक्षां त्यांत त्यांचा जास्तीच उद्देश आहे, असें कित्येक वेळां लोक समजतात, ही अगदीं मोठी भयंकर चुकी आहे. तर अशी चुकी-ही आपले हातून न होऊं देण्याविषयीं सावधगिरी ठेविली पाहिजे–तुम्ही ज्या पद्धतीप्रमाणें आपलें वर्तन ठेवूं पहात असाल त्या पद्धतींत निरनिराळ्या मुलांच्या निरनिराळ्या स्वभावानुरूप कमजास्त फरक केला पाहिजे–व त्याचप्रमाणें जसजसा मुलांच्या मनाचा विकास होत जाऊन त्यांच्या स्वभावांत फरक पडत जाईल, तसतसा तुम्हींही आपले वर्तनक्रमांत फरक केला पाहिजे–"पी हळद आणि हो गोरी" अशांतला हा प्रकार नसल्यामुळें कित्येक दिवसपर्यंत मुलांचे ठायीं कांहीं सुधारणा झाली आहे असें तुमचे दृष्टोत्पत्तीस येणार नाहीं–परंतु तेवढ्यावरूनच ही पद्धति निरर्थक आहे असें मनांत न आणितां चाललेला आपला वर्तनक्रम तुम्हीं तसाच अव्याहत चालविला पाहिजे. विशेषेंकरून पूर्वी ज्या मुलाचें शिक्षण वाईट तऱ्हेचें होत आलेलें आहे, अशा मुलाचे ठायीं जरी तुमची पद्धति उत्तम असली, तरी तादृश सुधारणा होण्यास बराच काळ गेला पाहिजे. व अशा ठिकाणीं तुम्हांस पुष्कळच सहनशीलतेचें अवलंबन करावें लागेल. कारण मुळापासून मनाची स्थिति चांगली चालत आलेली असली तरी सुद्धां जें सोपें नाहीं, तें पहिल्यापासून वाईट स्थितिच असली म्हणजे अर्थात् दुप्पट कठीण व्हावयाचें. शिवाय केवळ मुलांचेच उद्देश काय आहेत एवढेंच तुम्हांस पहावयाचें आहे असें नाहीं,

तर तुह्मीं आपल्या स्वतःच्याही उद्देशांविषयीं विचार केला पाहिजे. आपले ठिकाणीं उत्पन्न झालेल्या मनोवृत्तींपैकीं शुद्ध पितृवात्सल्यानें प्रोत्साहित कोणत्या व स्वार्थपरता, सुखेच्छा, अधिकारतृष्णा यांनीं प्रोत्साहित कोणत्या याचा पूर्णपणें तुह्मीं निर्णय केला पाहिजे, आणि नंतर याहीपेक्षां कठीण काम तुह्मांस करण्याचें आहे तें हें कीं आपल्या नीच मनोवृत्ति उमगून काढून त्यांचें सनियमन केलें पाहिजे. सारांश मुलांस शिक्षण देत असतां त्यांत त्याच वेळीं आपलें-ही उच्च प्रकारचें शिक्षण तुह्मांस चालविलें पाहिजे. बुद्धीच्या साहाय्यानें आपल्या मुलांच्या, आपल्या स्वतःच्या, व साधारण जगाच्या व्यापारांचें लक्षपूर्वक अवलोकन करून व मनुष्यस्वभाव आणि त्याचे धर्म यांचें ज्ञान प्राप्त करून घेऊन त्या ज्ञानाचा एकदरींत श्रेयस्कर होईल असा उपयोग केला पाहिजे; व आपल्या सदसद्विचारशक्तीच्या साहाय्यानें आपल्या नीचमनोवृत्तींचें संनियमन करून उच्चमनोवृत्ति नेहमीं जागृत राहतील असेंच केलें पाहिजें. प्रत्येक स्त्री आणि पुरुषें यांच्या मानसिक विकासाची अत्युच्च कोटि पितृत्वाचीं कर्तव्यें योग्य रीतीनें बजावल्याशिवाय कधीं ही प्राप्त व्हावयाची नाहीं. पितृत्वांतील कर्तव्यांचें योग्य संपादन हेंच एक त्या कोटीच्या प्राप्तीचें साधन होय ही गोष्ट अद्यापि लोकांच्या लक्षांत आलेली नाहीं; व ही गोष्ट एकदां लक्षांत आली ह्मणजे ह्मा सृष्टींतील व्यवस्था किती अवर्णनीय आहे हेंही कळून येईल; कारण या व्यवस्थेच्या योगानें मनुष्याच्या ठायीं प्रेमवात्सल्यादिमनोविकारांचें विलक्षण प्राबल्य उत्पन्न होऊन पितृत्वांसंबंधी कर्तव्यें योग्य रीतीनें बजावलीं जातात. ह्मणजे जें शिक्षण आपणास अत्यंत आवश्यक व ज्याची एरवीं आपण हयगय केली असती अशा शिक्षणाचा अभ्यास मनुष्याचे हातून केवळ या विकारांचे प्राबल्यामुळेंच होत असतो.

शिक्षणपद्धति वास्तविक कशी असावी याविषयीं आह्मीं जे हे विचार प्रदर्शित केले, त्या विचारांनुसार वर्तन ठेवणें कित्येकांस दुःसाध्य किंबहुना असाध्य वाटून, या विचारांचे सत्यतेबद्दल त्यांचे मनांत शंका उत्पन्न होण्याचा संभव आहे. तथापि या विचारांत शिक्षणाच्या अत्युच्च व पूर्ण कोटीचा उल्लेख आलेला आहे. त्यावरून त्यांच्या सत्यतेबद्दल कांहीं लोकांची तरी खात्री होईल असें आह्मांस वाटतें. जे लोक उतावीळ प्रेम-

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

शून्य व कोत्या दृष्टीचे आहेत त्यांस आमचे पद्धतीप्रमाणें वर्तन ठेवणें सर्वांशीं अशक्य आहे. ज्या लोकांचे मनांत बुद्धि आणि सदसद्विचारशक्ति यांचा विशेष विकास झालेला आहे, ज्यांची सुशीलता उच्च कोटीप्रत जाऊन पोंचली आहे, अशाच लोकांस आमचे पद्धत्यनुसार वर्तन ठेवणें शक्य आहे असें जर आहे तर ही आमची पद्धति विशेष सुशिक्षित व सुधारलेल्या जनसमाजासच उपयोगी हें आमचे वाचकांचे सहजीं ध्यानांत येईल. शिवाय हेंही त्यांचे लक्षांत येईल कीं, जरी ह्या पद्धतीचे योगानें प्रथमतः विशेष श्रम पडतात व आपणांस कित्येक प्रसंगीं स्वार्थत्यागही करावा लागतो, तरी परिणामीं अत्यंत शाश्वत सुखाचीच प्राप्ति आपणांस होते. शिक्षणपद्धति वाईट असल्यानें आईबाप व मुलें ह्या दोघांवरही अनिष्ट परिणाम घडून दुप्पट अकल्याण होतें. परंतु तीच पद्धति चांगली असली म्हणजे तिजपासून दुप्पट कल्याण होतें, तिच्या योगानें जो शिक्षण देणारा तो, व ज्यास शिक्षण द्यावयाचें तो, ह्या दोघांचीही सुधारणा होत जाते.

शिक्षणमीमांसा हा ग्रंथ [illegible]
[illegible] वा. ज.

भाग ३ रा समाप्त.



भाग ४ था.

वेर वाचनालय, सातारा.

शारीरिक शिक्षण.

एखाद्या सभ्य श्रीमंत गृहस्थाचे घरीं जेवणखाण आटोपल्यावर गप्पा चालल्या असतांना म्हणा, अथवा एखाद्या शेतकऱ्याचें नेहमींचें बाजारचें काम आटोपल्यावर म्हणा, किंवा एखादे उठण्या बसण्याचे चावडींत पान तंबाखू चघळून झाल्यावर म्हणा, साधारण चाल अशी असते कीं, राजकीय प्रकरणांवर चकाट्या पिटून झाल्यावर पुढें लागल्याच गुराढोरांच्या गोष्टी निघावयाच्या; व त्यांमध्यें साधारण सर्व लोकांचें सारखेंच लक्ष लागत असल्यामुळें त्यांचा कोणास फारसा कंटाळाही येत नाहीं. एखादा शिकारी शिकार करून घरीं परत आला म्हणजे घोडा कसा बाळगावा, घोड्याची कोणती जात शिकारीस चांगली, व त्याच्या आंगीं कोणते गुण विशेष असले पाहिजेत, शिकारीच्या कामीं कोणते कुत्रे चांगले, व त्यांची कशी निगा ठेविली पाहिजे, अशाविषयीं तो चार शब्द बोलल्याशिवाय रहावयाचा नाहीं. तसेंच देवळांतून परत जात असतांना म्हातारे कोतारे लोक झालेल्या कथेस किंवा पुराणास बरेंवाईट म्हटल्यानंतर पीक, हवापाणी वगैरे विषयीं थोडें बहुत बोलल्यानंतर कोणता चारा गुरांढोरांस चांगला अशाविषयीं बोलणें सुरू करण्यास कधीं चुकावयाचे नाहींत. सोम्या आणि गोम्या धनगरांचें आपल्या धन्याच्या मेंढवाड्याविषयीं कांहीं थोडेंसें बोलणें झाल्यानंतर त्याच्या गुरांमेंढरांची आपण कशी व्यवस्था ठेवितों व त्यापासून काय बरें वाईट होतें, अशाविषयींचें बोलणें चालवावयाला ते कधीं विसरावयाचे नाहींत. कुत्रे, घोडे, गुरेंढोरें आणि त्यांचे वाडे याची कशी व्यवस्था ठेविली पाहिजे अशाविषयीं केवळ खेड्यापाड्यांतीलच लोक घर सांगितल्याप्रमाणें मोठ्या आनंदानें बोलत असतात असें नाहीं, तर निरनिराळेप्रकारचे कारागीर, जे कुत्रे बाळगितात, श्रीमंत लोकांचे चैनी मुलगे ज्यांना शिकारीचा नाद असतो, व दुसरे उतार वयाचे लोक जे वर्तमानपत्रांत किंवा मासिकपुस्तकांत शेतकीच्या संबंधानें वाचून गप्पा मारीत बसतात असे सर्व लोक घेतले म्हणजे

शहरामध्येंही वरील प्रकारचे लोकांचा बराच भरणा असतो, असें दिसून येतें. एकंदर देशांतील जर सर्व लोक घेतले तर त्यांतील पुष्कळांना कोणतें तरी एखादें जनावर नुसतें बाळगण्याचा किंवा तें बाळगून त्यास कांहीं चमत्कारिक खेळ शिकविण्याचा नाद असतो असें प्रत्येकास आढळून येईल.

परंतु ह्याप्रमाणें गुरांढोरांच्या संबंधानें इतकी आवड व कळकळ दाखविणाऱ्या लोकांमध्येंच दुपारचें जेवण झाल्यानंतर किंवा दुसऱ्या एखाद्या अशाचवेळीं बोलणेंचालणें चाललें असतां त्यामध्यें मुलांचें पालनपोषण कसें केलें पाहिजे अशाविषयीं एक शब्द तरी ऐकूं यावयाचा आहे काय? एखादे खेड्यांतील शेती लोक स्वतः वाड्यांत जाऊन गुरांढोरांचे खाण्यापिण्याचा बेत कसा आहे हें पाहिल्यानंतर व लहान वासरांचा कसा बंदोबस्त ठेविला पाहिजे अशाविषयीं गड्यामाणसांस ताकीद दिल्यानंतर मुलांबाळांस खाणेंपिणें केव्हां कसें काय मिळतें, तीं ज्या खोलींत असतात तेथें मोकळी स्वच्छ हवा येते किंवा नाहीं, वगैरे गोष्टींची चौकशी करतो असें कधीं तरी घडून येतें काय? एखाद्या विद्वान् व शिकलेल्या गृहस्थाच्या पुस्तकांच्या कपाटामध्यें शेतकी, पारध वगैरे विषयांवर पाहूंच लागलें तर एखादें तरी पुस्तक सांपडेल, व तें त्यानें कदाचित् वाचलेलेंही असेल परंतु मुलें तान्ही असतांनां किंवा तीं जरा मोठीं झाल्यावर त्यांची कशी जतन केली पाहिजे अशाविषयीं एकतरी पुस्तक त्यानें वाचलेलें असतें काय? गुरांस पेंड चांगली मानते, त्यांस कडबा पेंढा वगैरे तसाच सगळा खावयास घातला तर चांगला किंवा कापून बारीक करून घातला तर चांगला, त्यांस एकाच प्रकारचा अतिशय चारा घातला तर त्यापासून काय अपाय होतात वगैरे गोष्टींची चांगली माहिती एखाद्या खेडेगांवचे पाटलास व शेतकऱ्यास असते, परंतु त्यांपैकीं शेंकडा किती जणांस आपलीं मुलें जसजशीं वाढत जातात तसतसें त्यांस कोणत्या प्रकारचें अन्न खावयास घातलें पाहिजे हें माहित असतें? आपापल्या धंद्यामध्यें त्यांचें लक्ष विशेष असतें ह्मणून त्यांचे हातून असा वेडेपणा होतो असें कोणी ह्मणेल, परंतु हें ह्मणणें खरें ठरेलसें दिसत नाहीं. कारण इतर सर्व प्रकारच्या लोकांचीही अशीच चूक होते, हें आह्मी नेहमीं पाहतों. एखाद्या शहरांतील जर वीस

लोक घेतले तर त्यांपैकीं अगदीं थोडे जणांसच घोड्यास खाणें घातल्याबरोबर कामास लावूं नये ही गोष्ट माहित नाहीं असें आढळून येईल. बरें ह्याच वीस जणांसे मुलेंबाळें अहित असें मानूं. त्यांपैकीं एकही असा सांपडावयाचा नाहीं कीं ज्यानें आपल्या मुलांचें जेवण झाल्यापासून तों तीं पुन्हा अभ्यासास लागत तोंपर्यंत जो वेळ जातो तो पुरेसा आहे कीं नाहीं ह्याविषयीं कधीं विचार केला असेल. खरोखर कोणाही मनुष्यास दोन उलटसुलट प्रश्न केल तर बहुतकरून असें आढळून येईल कीं तो मनामध्यें असें समजत असतो कीं मुलांची जतन वगैरे करणें हें आपलें काम नव्हे. तो केलेल्या प्रश्नांस बहुधा असा जबाब देईल कीं "मी हीं सर्व कामें बायकांवर सोंपवितों". आणि तो हें बहुतकरून अशा ऐटींत सांगतो कीं त्यावरून ऐकणारास असें वाटावें कीं, असलीं कामें पुरुषास योग्य नाहींत, तीं बायकांसच योग्य होत, असें तो समजतो.

शिकलेल्या लोकांनीं गुराढोरांची जतन उत्तमप्रकारची करून त्यांस चांगलें सशक्त करण्याच्या कामामध्यें आपलें मन घालून वेळ खर्चीत बसावें, आणि मनुष्यासारख्या प्राण्याची लहानपणीं जतन करून त्यास सशक्त करण्याचें काम आपल्यास अगदीं योग्य नव्हे असें त्यांनीं मानावें, ही गोष्ट मोठी चमत्कारिक दिसते. आतां सर्व लोकांचेंच असें मत आहे ह्मणून ही गोष्ट जितकी चमत्कारिक दिसावी तितकी दिसत नाहीं ही गोष्ट निराळी. मुलांचें जेवणखाण, त्यांचे कपडेलत्ते, खेळ, व्यायाम वगैरेची व्यवस्था ठेवण्यास उत्तम माणसें ह्मटली ह्मणजे आई; व ती जर घरची सुखी असली तर तिच्या मदतीस एक दाई. ती आई निदान आमच्यामध्यें तरी बहुधा अक्षरशून्य असून तिला मुलांचें पालन पोषण कसें करावें याचें ज्ञान बिलकूल नसतें. दाईविषयीं तर बोलावयासच नको; तिचे विचार वेडगळ व जुन्या पद्धतीचेच असावयाचे. इकडे बाप पुस्तकें, वर्तमानपत्रें वाचीत असतो, शेतकी संबंधाच्या सभांस जात असतो, वादविवाद करून नाना तऱ्हेच्या गोष्टींचा स्वतां अनुभव घेत असतो, परंतु तो कधीं मुलांबाळांच्या पालनपोषणाच्या संबंधानें विचार करील तर शपथ; अतिशय श्रम घेऊन शर्यतीसाठीं घोडे तयार करण्याचें काम किंवा झोंब्यांसाठीं रेडे माजविण्याचें काम किंवा टकरांसाठीं एडके तयार कर-

ण्याचें काम मोठमोठ्या शहरांमध्यें जारीनें चाललेलें आह्मी वारंवार पाहतों, परंतु कसरतीमध्यें बक्षीस मिळविण्यासाठीं तालीम करून तयार झालेला एखादा मल्ल आपल्या कधीं फारसा पाहण्यांत येतो काय ? "गल्हिव्हरचे प्रवास" या नांवाच्या कल्पित कांदबरीमध्यें लापुटन लोकांचीं जीं वेडगळ कृत्यें सांगितलीं आहेत, त्यांतच जर ते आपल्या मुलाबाळांची जतन न करितां नेहमीं कुत्रीं, माजरें ह्यांच्या पिलांची जतन करण्याच्या कामामध्यें गुंतलेले असत असें सांगून दिलें असतें, तर तें तेथें फारच उत्तम प्रकारें शोभून गेलें असतें.

वरील गोष्ट खचितच दुर्लक्ष करण्याजोगी नव्हे. आपले डायीं असा विपरीत भाव आहे हें पाहून आपणांस नुसतें हसूं येतें, परंतु त्यापासून होणारे परिणाम खरोखर फार भयंकर आहेत. एक मार्मिक ग्रंथकर्ता असें ह्मणतो कीं, संसारांतील सर्व कामें उत्तम प्रकारें चालण्यास पहिल्यानें आपली शरीरप्रकृति उत्तम असली पाहिजे; तसेंच कोणत्याही देशांतील लोक शरीरप्रकृतीनें सुदृढ असणें हें त्या देशाच्या अभ्युदयाचें आदिकारण होय. लढाईमध्यें जय होणें हें पुष्कळ अंशीं शिपायांच्या शक्तीवर व धट्टेकट्टेपणावर अवलंबून असतें, ही तर गोष्ट सिद्धच आहे; परंतु देशाचा व्यापार उत्तम प्रकारें चालणें : हेंही कांहीं अंशीं व्यापाराचे जिन्नस उत्पन्न करणारे लोकांचे अंगीं श्रम करण्याची ताकद असणें ह्यावरच अवलंबून आहे. आतां ह्या गोष्टीच्या संबंधानें आपली स्थिति हल्लीं अनेक कारणांनीं अगदीं निकृष्ट होऊन गेली आहे. परंतु ह्यापुढें तर आपणांस वरील प्रत्येक कामामध्यें अतिशयच जिकीर पडण्याचीं चिन्हें दिसत आहेत. हल्लींच्या दिवसांमध्यें प्रत्येक गोष्टीच्या संबंधानें लोकांची आपसामध्यें इतकी चढाओढ लागली आहे कीं, तिच्यायोगानें ह्यांच्या प्रकृतीस इजा झाल्याशिवाय रहावयाची नाहीं. हजारों लोक ह्यांना जो त्रास पडतो त्याच्या योगानें अगदीं टेकीस येतात. आतां ही जिकीर अशीच वाढत गेली तर जे अगदीं चांगले मजबूत व धट्टेकट्टे आहेत अशांच्या प्रकृतीसही अपाय होण्याचा संभव आहे. ह्यास्तव आतां मुलांस लहानपणीं असें शिक्षण मिळालें पाहिजे कीं त्याच्यायोगानें जगामधील आपलें कर्तव्य बजावण्यासारखी हुशारी व टक्केटोणपे खाण्यासारखी ताकद त्यांच्या अंगीं सहजीं यावी.

ही एक सुदैवाची गोष्ट समजली पाहिजे कीं हल्लीं या गोष्टीकडे लोकांचें लक्ष लागत चाललें आहे. मुलांस अतिशय अभ्यास करण्यास लावणें गैर आहे अशा अर्थाचे हल्लीं प्रसिद्ध होत असलेल्या कांहीं ग्रंथांत स्पष्ट लेख येऊं लागले आहेत; आतां त्यांमध्यें कदाचित् थोडीशी अधिकोक्ति असेल, परंतु असल्या लेखांमध्यें बहुधा ती असावयाचीच. वर्तमानपत्रांतूनही शारीरिक शिक्षणाकडे लोकांचें लक्ष लागण्यासारखे निबंध व पत्रें प्रसिद्ध होऊं लागलीं आहेत. आणि अलीकडे "बलवर्धक" किंवा अशाच अर्थाच्या नांवाच्या सभाही कोठें कोठें स्थापन झाल्याअसून त्यांमध्यें मुलाबाळांची शरीरप्रकृति चांगली राहण्यास काय केलें पाहिजे ह्याविषयीं विचार होऊं लागला आहे, व ह्यावरून हल्लीं लोक ज्या रीतीनें मुलाबाळांची जतन करितात त्या रीतीनें त्यांची शरीरप्रकृति रहावी तशी राहात नाहीं ही गोष्ट बऱ्याच लोकांच्या लक्षांत येऊन चुकली आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. आतां इतकेंच मात्र कीं लोकांमध्यें ह्याविषयींच्या संबंधानें जी चळवळ दिसून येत आहे ती उत्तरोत्तर जास्त होत जाऊन सर्वांनीं आपल्या मुलाबाळांची स्थिति सुधारण्यास मनापासून झटलें पाहिजे.

मुलांचें पालनपोषण व विद्याभ्यास यांची व्यवस्था हल्लीं आपणांस शास्त्रीय विषयाचे अभ्यासानें ज्या गोष्टी कळून आल्या आहेत त्यांच्या धोरणानें ठेविली पाहिजे. व हल्लीं आपणांस विशेषेंकरून त्याच गोष्टींची जरूर आहे. रसायनशास्त्राचे अभ्यासाचा फैलावा झाल्यानें गुरांढोरांस जें सुख होत आहे, त्या सुखाचा लाभ मुलांस करून देण्यास आतां विलंब करतां कामा नये. घोडे शिकविणें व मेंढे पोसणें यांत कांहीं अर्थ नाहीं असें आमचें ह्मणणें नाहीं. परंतु आमचें इतकेंच ह्मणणें आहे कीं, ज्या अर्थी स्त्रिया आणि पुरुष यांची वाढ चांगली होऊन तीं प्रकृतीनें सुदृढ असणें ही गोष्ट कांहीं अंशीं तरी इष्ट आहे त्याअर्थी विचार व अनुभव या दोन्हींवरून ज्या गोष्टी खऱ्या अशा ठरतात त्या आपणांस अव्वलपासून अखेरपर्यंत सुरू केल्या पाहिजेत. आमचें हें वरील ह्मणणें ऐकून पुष्कळांस अचंबा वाटेल किंबहुना रागही येईल. परंतु पश्वादिप्राण्यांचे इंद्रियव्यापार ज्या नियमांस अनुसरून चालतात त्याच नियमांस अनुसरून मनुष्याचेही इंद्रियव्यापार चालतात ही गोष्ट अगदीं निर्विवाद आहे व तीं

आपणांस कबूलही केली पाहिजे.शारीरशास्त्रवेत्ते,प्राणिशास्त्रवेत्ते व रसायन शास्त्रवेत्ते धडधडीत असें सांगतात कीं, पश्वादिप्राण्यांच्या व मनुष्यांच्या जीवनव्यापाराच्या संबंधाच्या मुख्य मुख्य गोष्टी अगदीं एकसारख्या आहेत. ही गोष्ट जर आपल्या मनामध्यें नीटपणें बिंबावी तशी बिंबली तर तिचा उपयोगही झाल्याखेरीज रहावयाचा नाहीं. पश्वादिप्राण्यांविषयीं पुष्कळ गोष्टी सहजीं अवलोकनांत आल्यानें अथवा प्रयोगद्वारा त्यांचें ज्ञान झाल्यानें जे सर्वसाधारण नियम बांधतां येतात ते नियम मनुष्यमात्रासही लागू आहेत. जीवनशास्त्र अद्यापि बाल्यदशेमध्यें आहे खरें तरी सेंद्रियपदार्थांस लागू असणारे सर्वसाधारण नियम आतां माहीत झाले आहेत; व त्यांत मनुष्य मात्राचे स्थितीस लागू असणारेही नियम येतातच. आतां इतकेंच मात्र कीं या नियमांस अनुसरून मुलें लहान असतांना आणि पुढें जाणतीं झाल्यानंतर त्यांचे शरीररक्षणाचा बेत ठेविला पाहिजे या विषयीं अद्यापि कोणीं विचार केला नाहीं तो केला पाहिजे; व या गोष्टीचेंच विवेचन करण्याच्या प्रयत्नास आतां आम्ही लागतों.

या जगाची रहाटी अशी आहे कीं कोणत्याही प्रकारची स्थिति एकदां अगदीं कळसास जाऊन पोंचली म्हणजे तिच्या मागून तिच्या अगदीं उलट स्थिति असेल तिचा फैलाव होऊं लागतो व तीही अगदीं सरते शेवटीं कळसास जाऊन पोहोंचते. असें पहा कीं देशामध्यें एकदां राज्यक्रांति होऊन गेली म्हणजे नंतर कोणी तरी जुलमी बादशाहाच्या हातीं देशाचें आधिपत्य जाऊन त्याचा जुलमी अम्मल सुरू होतो; कांहीं शतकांमध्यें नवें तितकें चांगलें असे लोकांस वाटतें व ते अगदीं प्रत्येक गोष्टीमध्यें सुधारणा करण्यास झटत असतात, बरें पुढें कांहीं शतकेंपर्यंत असें चालतें कीं लोकांस जुनें तेवढें आवडूं लागतें व ते सर्व प्रकारच्या सुधारणा अगदीं बंद करून टाकतात; कांहीं दिवसपर्यंत लोक खाणेंपिणें ऐषआराम चैन इत्यादि गोष्टींच्याच भरीस भरलेले असतात. पुढें ही स्थिति बदलून त्यांस सर्वसंगपरित्याग करून तापसवृत्ति धारण करावी असें वाटूं लागतें; व्यापारामध्यें तरी कोणत्यातरी एका प्रकारच्या व्यापाराची एकदां तेजी एकदां मंदी असा प्रकार असतोच; शोकी लोकांमध्यें आज ह्या प्रकारची चैन तर उद्यां तिच्या उलट अगदीं दुसऱ्या प्रकारची

चैन, असाच क्रम सुरू असतो; हाच प्रकार आमच्या खाण्यापिण्याच्या रिवाजामध्येंही दिसून येईल. तर मग अर्थात् मुलाबाळांच्या खाण्यापिण्याच्या संबंधानें तरी या व्यतिरिक्त दुसरा कोणता प्रकार दिसून येणार ? जाणते लोकांच्या खाण्यापिण्यामध्यें जसजसा फेरफार होत जातो तसतसा मुलांबाळांच्याही खाण्यापिण्यामध्यें फेरफार होत गेल्याचें दिसून आलेंच पाहिजे. कांहीं लोकांची अशी समजूत असते कीं, मुलें जितकें जास्त खातील तितकें चांगलें; व हल्लींही अगदीं खेड्यापाड्यांमधून शेतकरी वगैरे लोकांमध्यें असे कांहीं लोक आढळून येतील कीं जे आपल्या मुलांस अगदीं ओ येईतों खाण्यापिण्याची संवय लावितात. परंतु सुधारलेल्या लोकांचा तर ह्याच्या उलट अगदीं अल्पाहाराकडेच कल असतो. ते आपल्या मुलांबाळांस कधीं जास्त खाऊं न देतां नेहमीं त्यांस कमीच खाऊं घालितात.आणि जे लोक खाण्यापिण्यामध्यें अधाशीपणा करतात, त्या लोकांचा ते तिरस्कार करितात. परंतु त्यांत खुबी एवढीच असते कीं, अधाशीपणाविषयीं त्यांनां अगदीं मनापासून तिटकारा येतो असें, ते आपल्या मुलाबाळांच्या खाण्यापिण्याविषयीं जो बेतबात ठेवितात त्यावरून जसें अगदीं स्पष्ट दिसून येतें तसें ते आपल्या स्वतःच्या खाण्यापिण्याचा जो बातबेत ठेवितात त्यावरून दिसून येत नाहीं; कारण त्यांचें हें तापसवृत्तीचें ढोंग स्वतःनां एकदां क्षुधा लागली ह्मणजे चालविण्याचें कठीण पडतें; परंतु तेंच मुलांनीं इतकेंच खावें असे नियम करितांना सहज अगदीं पूर्णपणें चालवितां येतें.

मुलांना जास्त खाऊं घालणें किंवा कमी खाऊं घालणें हीं दोन्ही वाईटच, असें सांगणें ह्मणजे जें सर्वांस चांगलें माहीत आहे तेंच सांगण्यासारखें आहे. परंतु आह्मी असें ह्मणतों कीं, त्या दोहोंपैकीं कमी खाऊं घालणें हें तर फारच वाईट होय. ज्याचें ह्मणणें अगदीं प्रमाण मानलें पाहिजे असा एक ग्रंथकर्ता असें ह्मणतो कीं कमी खाल्यापासून प्रकृतीस होणारे अपाय भयंकर असतात व त्यांस उपायही जडच करावे लागतात; परंतु जास्त खाल्यापासून प्रकृतीस होणारे अपाय फारसे कठीण नसतात व ते सहजीं बरे होण्यासारखे असतात. शिवाय दुसऱ्या कोणीं आपल्या खाण्यापिण्याच्या बेतांत ढवळाढवळ केल्याखेरीज कोणीं अगदीं ओ येईतों खाल्याचें उदाहरण फारसें दिसून येत नाहीं. आ-

ईबापाची चूक झाली तर गोष्ट निराळी, नाहीं तर मुलें बहुतकरून जात्या अधाशी व खादाड नसतात. आपल्या मुलांचें खाणेंपिणें थोडेंसें हात राखून असणें जरूर आहे असें पुष्कळांस वाटतें. ह्याचें कारण इतकेंच कीं ते जगांतील स्थितीचें पूर्णपणें अवलोकन करीत नाहींत किंवा जगांतील स्थिति पाहूनही त्यांचें असें मत असेल तर ते विचारशून्यच समजले पाहिजेत. राष्ट्रामध्यें ज्याप्रमाणें फार कायदे असणें उपयोगी नाहीं त्याचप्रमाणें मुलांच्या खाण्यापिण्याच्या संबंधानें फार नियम असणें उपयोगीं नाहीं; त्यांत मुलांस इतकेंच अन्न खाऊं घालावयाचें असा नियम करून ठेवणें हें तर फारच वाईट होय.

तर मग काय मुलांस अगदीं ओ येईतों खाऊं द्यावें व त्यांस गोडगोड पदार्थ अतिरिक्त खाऊं घालून त्यांस आजारी पडूं द्यावें? बरें अशी त्यांस सदर परवानगी दिली तर तीं अतिशय खाऊन आपणांस आजारी पाडून घतल्याशिवाय राहतील काय? अशा रीतीनें प्रश्न केला तर त्यास पाहूं गेलें तर एकच उत्तर दिसतें; परंतु अशा प्रकारचा प्रश्न विचारणें ह्मणजे ज्या गोष्टीबद्दल मुख्य वाद ती गोष्ट गृहीतच धरल्यासारखी होते. आमचें असें ह्मणणें आहे कीं ज्याप्रमाणें पशुपक्षी, तान्हीं मुलें, आजारी माणसें, निरनिराळ्या देशांतील व हवेंतील लोक, व ज्यांची प्रकृति अगदीं निकोप आहे अशीं सर्व जाणतीं मनुष्यें या सर्वांस खाण्याची इच्छा आहे तोंपर्यंत खाऊ दिल्यानें अगदीं अपाय होत नाहीं, त्याप्रमाणें मुलांसही लहानपणीं खाण्याची इच्छा आहे तोंपर्यंत खाऊं दिल्यानें कांहीं अपाय होणार नाहीं असें अनुमान करण्यास कांहीं हरकत नाहीं. लहान मुलांच्या संबंधानेंच मात्र त्यांस वाटेल तितकें खाऊं देणें उपयोगी नाहीं असें मानणें खरोखर फारच चमत्कारिक होणार आहे.

हें उत्तर वाचून कांहींच्या मनोवृत्ति अगदीं खवळून जातील. कारण त्यांस असें वाटतें कीं याच्या उलट धडधडीत आपणांस उदाहरणें दाखवून देतां येतात; व हीं उदाहरणें येथें लागू पडत नाहींत असें आह्मांस ह्मणतां येणार नाहीं. परंतु दोन्ही गोष्टी खऱ्या आहेत. कारण असें पहा कीं, अशा मनुष्यांच्या मनांत उदाहरणें असतात तीं बहुतकरून मुलांस वर सांगितल्याप्रमाणें खाण्यापिण्याची बंदी करणें इष्ट आहे असें त्यांस वाटत असून तशी बंदी करीत गेल्या-

मुळेंच बहुधां घडून आलेलीं असतात. तापसवृत्ति धारण करण्यास लागल्यानें मनाची वृत्ति एकदम कशी विपरीत होऊन अगदीं कसा उलट प्रकार घडून येतो अशाविषयींचीं हीं उदाहरणें होत. ज्या मुलांवर लहानपणीं मोठी जबर शिस्त असते, तीं मुलें मोठेपणीं फार फाजीलपणा करावयाचीं असें जे लोक बहुधा ह्मणतात, तें खरें आहे असें आपणांस या वरील उदाहरणावरून थोडक्यांत दिसून येतें. रोमन क्याथलिक लोकांच्या मठांमधून गोसावणींची एकदम तापसवृत्ति सुटून त्यांच्या हातून जीं वारंवार घोर कृत्यें घडून येत असत तशा मासल्याचींच हीं उदाहरणें होत. आपल्या इच्छा फार दिवस दाबून ठेवल्यावर त्या पुढें अगदीं कशा बेफाम होऊन जातात हेंच वरील उदाहरणावरून दिसून येतें. मुलांचे साधारण नेहमीं कल काय असतात, व त्यांस विशेषेंकरून कोणत्या गोष्टी आवडतात व त्यांस आपण कोणत्या रीतीनें वागवितों ह्याविषयीं विचार करा. बहुतेक सर्व मूलांस गोड पदार्थ विशेष आवडतात;व त्या संबंधानें शंभरांतील नव्याण्णव लोकांस असें वाटतें कीं, हें केवळ जिव्हालौल्य आहे; व इतर सर्व इंद्रियवासनांप्रमाणें ह्या वासनेचेंही नियमन केलें पाहिजे. परंतु प्राणिशास्त्राचा जे अभ्यास करीत असतात, व ज्यांचा नेहमीं नवीन नवीन शोध सुरू असल्यामुळें सृष्टिक्रमावर प्रत्यहीं विशेष भाव बसत असतो, त्यांस ही जी गोड पदार्थांची मुलांस विशेष आवड असते तींत लोक समजतात त्यापेक्षां कांहीं तरी विशेष असलें पाहिजे असें वाटतें; व शोधाअंतीं तो तर्क खराही ठरतो. त्यांस असें आढळून येतें कीं, शरीरांतील जीवनव्यापार चालण्यास साखरेचा मोठा उपयोग होतो. शर्करात्मक आणि मेदवर्धक पदार्थ ह्यांचा सरतेशेवटीं शरीरामध्यें आक्सिजन वायूशीं संयोग होत असतो;व हा संयोग होत असतांना त्याबरोबर शरीरामध्यें उष्णता उत्पन्न होते. इतर सर्व पदार्थ जे आपण खातों त्यांचें रूपान्तर होऊन साखर झाली, ह्मणजे त्यापासून उष्णता उत्पन्न होतें,व हें रूपांतर आपल्या शरीरामध्येंच होत असतें. अन्नपचन चाललें असतां, अन्नद्रव्यांतील पिष्टमय भागाचीच साखर होते असें नाहीं, तर एम् क्लाडो बर्नार्ड साहेबांनीं असें सिद्ध करून दाखविलें आहे कीं, अन्नद्रव्यांतील इतर घटकावयवांचीही यकृद्रूपी यंत्रामध्यें साखर बनत असते.

शरीरपोषणास साखरेची इतकी जरूरी आहे कीं, ज्या पदार्थांमध्यें नायट्रोजन् वायु असतो त्यापदार्थापासूनही, इतर पदार्थ मिळण्यासारखे नसतील तर, या रीतीनें साखर उत्पन्न होते. आतां शरीरामध्यें उष्णता उत्पन्न करणाऱ्या या अन्नाची मुलांस विशेष गोडी असते,व ज्या पदार्थांचा आक्सिजन् वायुशीं संयोग होत असतां त्यांमधून अतिशय उष्णता बाहेर पडते असे जे मेदवर्धक पदार्थ ते मुलांस विशेषेंकरून आवडत नाहींत, या दोन्ही गोष्टी मनांत आणिल्या ह्मणजे असें दिसून येतें कीं,एका प्रकारचे पदार्थ कमी खाल्यामुळें उष्णतेमध्यें येणारा तोटा दुसरे प्रकारचे पदार्थ जास्त खाल्यामुळें भरून येतो.मुलांच्या शरीरांतील यंत्रांस साखरेची विशेष जरूरी असते, कारण मेदवर्धकपदार्थ त्यांच्या अवसानाच्या बाहेर होतात. शिवाय मुलांस वनस्पति व फळें तर जीव कीं प्राण असतात; जर त्यांस चांगलीं फळें खावयास नच मिळालीं तर तीं हिरवीं व आंबटचिंबट अशीं रानफळेंही खाण्याला चुकावयाचीं नाहींत. हे वनस्पतिकोटींतील अम्ल पदार्थ व खनिज पदार्थ पौष्टिक असतात व ते बाताबेतानें घेतले, तर ते शरीरप्रकृतीस हितकारकच होतात. शिवाय ते नैसर्गिकस्थितींतच घेत गेलें, तर त्यांपासून आणखीही फायदे होतात. डाक्टर आन्द्रू क्रांबी असें ह्मणतात कीं, पिकलेलीं फळें इंग्लंडापेक्षां सर्व युरोप खंडामध्यें फार खातात, व कोठा साफ नसेल तर तीं मुद्दाम खातात. तर मग मुलांचे आंगचे कल व आह्मीं त्यांचें पालन पोषण करतों तें यांमध्यें किती मेळ आहे तो पहा. मुलांस दोन पदार्थांची उत्कट इच्छा असते; व ह्या इच्छेवरून बहुधा त्यांच्या शरीररक्षणास कोणत्या गोष्टींची जरूर आहे हेंच व्यक्त होत असतें. परंतु हे पदार्थ त्यांच्या खाण्यापिण्यामध्यें येत नाहींत इतकेंच नाहीं तर बहुधां सर्व लोक त्यांस ते पदार्थ खाण्याची बंदीच करितात. सकाळीं तूप, भात, वरण, भाजी, भाकर आणि ताकभात. आणि संध्याकाळीं पुनः ताकभात किंवा भाकर ह्मणका असेंच बहुधां अगदीं पिळपिळीत अन्न मुलांस खाऊं घालण्याची जिकडे तिकडे वहिवाट आहे. मुलांस पाहिजेत ते पदार्थ देण्याची जरूरी नाहीं, व दिले तर त्यांपासून अपाय व्हावयाचा अशीच बहुतेक लोकांची समजूत असते. बरं ह्याचा परिणाम काय होतो ? सणावारीं एकदां पक्कान्ना-

वर त्यांचा हात पडला, किंवा खाऊस वगैरे पैसे मिळून एकदां मिठाई-वाल्याचे दुकानीं त्यांचे पाय लागले, किंवा फिरतां फिरतां एखादी फळबाग सहजीं त्यांचा तडाक्यांत सांपडली तर तीं मागचें सर्व उट्टें भरून काढण्यास मागें पुढें पाहत नाहींत. अशा प्रकारचे पदार्थ खाण्याची पूर्वी बंदी असल्यामुळें व पुढेंही हा दिवस गेला कीं बरेच दिवस उपासमार सुरू व्हावयाची अशी त्यांची खातरी असल्यामुळें त्यांचे पोटांत खा खा उठते व किती खावें हा त्यांस विचार रहात नाहीं. मग अशा अतिरिक्त खाण्याचे परिणाम दृष्टोत्पत्तीस आले ह्मणजे लोक असें ह्मणूं लागतात कीं, मुलांस मन मानेल तसें खाऊं देतां कामा नये; व ह्मणूनच पुढें बंदी करणें रास्त आहे असें ते मानतात. परंतु हें त्यांचें मन मानेलतसें खाणें पूर्वी आपण केलेल्या बंदीचाच परिणाम असतो, हें त्यांच्या लक्षांत येत नाहीं; आमचें ह्मणणें असें आहे कीं, हल्लीं प्रचारांत असलेली चाल चांगली आहे असें सिद्ध करण्यास लोक जीं कारणें लढवितात, तीं चुकीचीं आहेत. आह्मी असें सांगतों कीं, मुलांस शरीररक्षणार्थ गोड गोड पदार्थ खाऊं घातले पाहिजेत, व ते त्यांस आपणच देत गेलों तर सांधि सांपडली कीं हल्लींच्याप्रमाणें तीं कधींही त्यांवर हात मारावयाचीं नाहींत. डाक्टर क्रॉम्बीसाहेबांचें असें मत आहे कीं, मुलांस जर मध्यें केव्हांही न देतां जेवतांनाच फळें वगैरे खाऊं दिलीं तर त्यांचे मनांत कडू व घाणेरडीं फळें खाण्याचें कधींही यावयाचें नाहीं. व इतर सर्व गोष्टींविषयींही असेंच आहे.

मुलांची ज्या पदार्थांवर इच्छा जाते ते पदार्थ त्यांस लागतील तितके खाऊ देण्यास जीं शास्त्रीय कारणें आहेत, तीं अगदीं सयुक्तिक आहेत व ते त्यांस तसे खाऊं न देण्याविषयीं जीं कारणें लोक सांगतात, त्यांमध्यें कांहीं जीव नाहीं इतकेंच केवळ नव्हे, तर मुलांच्या इच्छेशिवाय आपणांस या संबंधानें खात्रीलायक दुसरा मार्गच मिळावयाचा नाहीं. या संबंधानें आईबापांचें मन आधारभूत धरतां येईल असें मानतात, त्यांत तरी कांहीं अर्थ आहे काय? जेव्हां बाळ्या मला आणखी पाहिजे असें ह्मणतो, तेव्हां आई किंवा दाई नको असें ह्मणते, त्यास कांहीं आधार आहे काय? त्यांना असें वाटतें कीं, त्यानें पुरेसें खाल्लें आहे. परंतु तिला असें वाटण्याला कांहीं कारणें आहेत काय? तीं मुलाच्या पोटांत शिरते

काय ? किंवा त्याच्या शरीरपोषणास काय काय लागतें हें समजण्याची तिच्याजवळ कांहीं गुप्त विद्या असते काय ? असें जर कांहीं नाहीं, तर तिचें मत खरें कशावरून समजावयाचें ? क्षुधा कमी जास्ती होण्यास अनंत भानगडीचीं कारणें असतात हें तिला समजू नये काय ? हवेमध्यें सर्दी किंवा विद्युत् ह्यांचें ज्याप्रमाणें कमी जास्ती मान असेल, त्याप्रमाणें क्षुधेमध्यें पुष्कळ फेरफार पडतो; तसेंच व्यायाम, पूर्वीच्या जेवणाचेवेळीं खालेलें अन्न, त्याचा प्रकार व मान, व त्याचें पचन होण्यास लागलेला कमी जास्ती वेळ इत्यादि गोष्टींच्या योगानेंही क्षुधेमध्यें फरक पडतो. व इतकीं कारणें एकेजागीं मिळून त्यांचा काय परिणाम व्हावा हें तिला कसें समजावें ? एक आह्मीं पांच वर्षांचे वयाचा मुलगा पाहिला. तो आपल्या वयाच्या इतर मुलांपेक्षां उंच असून त्यामानानें चांगला सशक्त, पाणीदार, आणि तरतरीत दिसे. त्याच्या बापास असें ह्मणतांना आह्मीं ऐकिलें आहे कीं, "ह्या मुलास किती अन्न खाऊं घालावें अशाविषयीं कांहीं आपल्याला नियम बांधून देतां येणार नाहीं; इतकें पुरे असें ह्मणणें ह्मणजे केवळ अजमास आहे; आणि तो अजमास खरा असेल किंवा खोटाही असेल. अशा अजमासावर माझा भरंवसा नसल्यामुळें मीं त्यास त्याला वाटेल तितकें खाऊं देतों." आणि खरोखर परिणाम मनांत आणिले, तर ह्या बापाचें वागणें अगदीं शहाणपणाचें आहे असें प्रत्येकास कबूल केलेंच पाहिजे. खरोखर मुलांच्या कोठ्याविषयीं आपल्यामतें अगदीं मोडे खातरीचे नियम बांधून देणाऱ्या मंडळीस प्राणिधर्मशास्त्र कांहीं समजत नाहीं असेंच समजावयाचें; ह्या लोकांस या संबंधानें कांहीं थोडें बहुत ज्ञान असतें, तर त्यांची घमेंडी कांहींतरी कमी झाली असती. "अज्ञानाच्या मदापुढें ज्ञानाचा मद पाहूं गेलें तर कांहींच नाहीं." नेहमीं चालत असलेल्या वस्तुस्थितीवर किती भरंवसा ठेवावा, व मनुष्याच्या मतांवर किती भरंवसा ठेवावा हें समजण्याची कोणाची इच्छा असेल, तर अनुभविक वैद्याचे उपचार किती सावधगिरीचे असतात, व ज्यास कांहीं अनुभव नसतो अशा वैद्याचे उपचार कसे फाजीलपणाचे असतात, ह्याविषयीं त्यानें विचारकरून पहावा. किंवा सर जॉन फार्बिस साहेबांचें "सृष्टिक्रम आणि मानवी उपचार यांची रोगनिर्मूलनार्थ उपयुक्तता" ह्या नांवाचें पुस्तक नीटपणें वाचून

पहावें; त्यास असें आढळून येईल कीं, जीवनक्रियांचे नियमांचें ज्ञान जसें जसें आपणास अधिक होत जातें, तसतसा आपला आपल्यावरचा भरंवसा उडून सृष्टिक्रमावरच आपला भरवसा जास्त जास्त बसत जातो.

मुलांस अन्न किती खाऊं घालतात ह्या गोष्टीचा येथपर्यंत विचार झाला. आतां त्यांस अन्न खाऊं घालतात, तें कोणत्याप्रकारचें असतें ह्याविषयीं विचार केला, तर आपणांस असें आढळून येईल कीं, या संबंधानें तापसवृत्तीचाच फैलावा आहे. मुलांचें खाणें नियमित असून तेंही हलकें असलें पाहिजे असें लोक समजतात. त्यांचें साधारण असें मत आहे कीं, मुलांस जडान्न मिळून दाखवितांच कामा नये. मध्यम स्थितींतील लोकांचा खर्च बातावेतानेंच असला पाहिजे व हेंच त्यांचें असें मत होण्याचें कारण आहे. कोणत्याही प्रकारची इच्छा उत्पन्न झाली ह्मणजे ती तृप्त करून घेण्याच्या साधनांची कल्पना मागाहून सुचते. ज्या आईबापांस फारसें जडान्न विकत घेण्याचें सामर्थ्य नाहीं, तीं मुलांनीं तें खाण्यास मागितलें तर "लहान मुलांस व मुलींस तें उपयोगाचें नाहीं" असेंच सांगतात; आणि प्रथमतःच अशी सबब सांगून दिली ह्मणजे त्यांस पुढें फार सोईवार पडतें खरें; परंतु असें बरेचवेळां होत गेलें ह्मणजे तें एक कायमचें मतच बनून जातें. आतां ज्या लोकांना खर्चाचा विधिनिषेध नसतो, त्यांचेंही कारणांकारणांनीं असेंच मत होऊन जातें. पुष्कळांचें अशा प्रकारचें वर्तन पाहून त्यांसही तसेंच वर्तन ठेवावेसें वाटूं लागतें; बरें त्यांचे घरीं दाई व इतर चाकरमाणसें असतात तीं घरचीं गरीबच असतात, आणि अशा कामांत त्यांचें वजन सहजीं पडण्यासारखें असतें; व शिवाय सभोंवतालच्या लोकांचे ते खाण्याचे अधाशीपणाचे प्रकार ऐकून व पाहून त्यांचें मन स्वाभाविक कमी खाण्याकडे वळून जातें.

बरें एकंदर लोकांचें जें असें मत होऊन जातें, त्यास कांहीं आधार आहे कीं काय हें पाहूं गेलें तर तसा अधार मुळींच आढळून येत नाहीं असें ह्मटलें तरी चालेल. ज्याप्रमाणें पूर्वी लहान मुलांस चिरगुटामध्यें गुंडाळून ठेविलें पाहिजे असें लोकांचें हजारों वर्षेपर्यंत एक आग्रहाचें मत होऊन गेलें होतें, त्याचप्रमाणें हेंही एक आग्रहाचें मत आहे; व ह्या मताचा त्याच्या सत्यासत्येतचा विचार झाल्याखेरीज लोकांमध्यें उगीच फैलावा झाला आहे. अगदीं लहान मुलांचे कोठ्यांतील स्नायु नाजूक असून त्यांस

फारशी मजबुतीही आलेली नसते हें खरें आहे, व जडान्नाचा पोटामध्यें पचून रस तयार होण्यास तेथें बराच वेळ घर्षणक्रिया सुरू असावी लागते, हेंही खरें आहे; आणि ह्मणून अगदीं लहान मुलांचे कोट्यास कोणत्याही प्रकारचें जडान्न न सोसण्याचा संभव आहे. परंतु त्या जडान्नांतील पचण्यास कठीण भाग काढून टाकिला ह्मणजे ही हरकत दूर होण्यासारखी आहे. तसेंच मुलें दोन तीन वर्षांचीं झालीं व त्यांच्या स्नायूंस बरीच मजबुती आली ह्मणजे तर वरील हरकत राहतच नाहीं. ह्याप्रमाणें वरील आग्रहाचें मत अगदीं लहान मुलांसच कायतें कांहीं अंशीं लागू आहे असें समजावयाचें; तें मत खरें मानण्यास जीं कारणें आहेत, तीं जरा जाणत्या मुलांस तर लागू पडतच नाहींत; व तसेंच हें मत खोटें मानण्यास तर उलट भरपूर व सबळ कारणें आहेत; असें असतांनाही जाणत्या मुलांसुद्धां वरील मताच्या अनुरोधानें लोक वागवितात. शास्त्रीयरीत्या विचार करून ठरविलेले सिद्धांत ह्या मताचे अगदीं विरुद्ध आहेत. आह्मीं कांहीं प्रसिद्ध वैद्यांस व पुष्कळ नामांकित प्राणिधर्मशास्त्रवेत्त्यांस ही गोष्ट विचारली आहे, त्या सर्वांचें सारखें असें मत पडतें कीं, मुलांस जाणत्या मनुष्यांस जें अन्न खाऊं घालतात त्यापेक्षां कमी पौष्टिक अन्न देऊन चालावयाचेंच नाहीं; कदाचित् त्यांस जास्त पौष्टिक अन्न दिलें तरीही एक वेळ चालण्यासारखें आहे.

असा निर्णय ठरविण्यास स्पष्ट आधार आहेत व ते कसे हेंही अगदीं साध्या रीतीनें सिद्ध करून देतां येतें. जाणत्या मनुष्याच्या आणि लहान मुलाच्या चाललेल्या जीवनक्रिया यांची तुलना करून पाहिल्याबरोबर आपल्याला असें दिसून येईल कीं, जाणत्या मनुष्यापेक्षां मुलासच पौष्टिकअन्नाची विशेष जरूरी आहे.मनुष्यास अन्नाची जरूरी पडते, याचीं कारणें काय आहेत ? नेहमीं त्याचें शरीर थोडेंबहुत तरी झिजत असतें. शारीर श्रमानें त्यांचे स्नायु, मानसिक श्रमानें त्याचे ज्ञानतंतु, आणि जीवनक्रियांच्या योगानें त्याचीं अंतर्गात्रें एकसारखीं झिजत असतात. ह्याप्रमाणें शरीरांतील जितका मिळून अंश झिजून जातो, तितका पुनः भरून आला पाहिजे. तसेंच शरीरांतील बरीच उष्णता नेहमीं बाहेर पडून अंतरावरील पदार्थांशीं संयोग पावत असतेच. आतां एकंदर जीवनव्यापार चालू राहण्याकरितां जरूर तितकी उष्णता शरीरामध्यें असलीच पाहिजे; व ह्मणून वरील खप

शरीरामध्यें नवीन उष्णता उत्पन्न होऊन भरून आलाच पाहिजे; व ह्या साठींच शरीराचे कांहीं घटकावयव आक्सिजनवायूशीं नेहमीं संयोग पावून रूपांतर पावत असतात. ह्याप्रमाणें एक दिवसामध्यें होणारी शरीराची झीज भरून काढणें आणि एक दिवसामध्यें जितक्या उष्णतेचा खप होतो, तितकी उष्णता उत्पन्न करण्यासाठीं लागणाऱ्या द्रव्याचा पुरवठा करणें ह्या दोन कामांसाठीं जाणते मनुष्यास अन्न पाहिजे. आतां मुलांचे स्थितीविषयीं विचार करून पहा. नेहमींच्या व्यापारांनीं त्यांचेही शरीराचा भाग झिजत चाललाच असतो; आणि त्यांची नेहमींची एकसारखी चालेलली चळवळ मनांत आणिली ह्मणजे त्यांचे आकाराचे मानानें तोही जाणत्या मनुष्याइतका झिजून जाण्याचा संभव आहे, हें लक्षांत आल्याखेरीज रहावयाचेंच नाहीं; त्याचेही शरीरांतील उष्णता बाहेर पडून अंतरावरील पदार्थांशीं मिसळत असतेच. आणि ज्याअर्थीं जाणते मनुष्याच्या शरीराचे भागापेक्षां विस्ताराच्या मानानें त्याचे शरीराचा जास्त भाग उघडा राहतो, त्याअर्थीं त्याचे शरीरांतील उष्णता जास्त जलदीनें नाहींशी होत असते; आणि ह्मणूनच आंगामध्यें उष्णता उत्पन्न करणारें अन्न त्याच्या प्रमाणानुरूप जाणत्या मनुष्यापेक्षां त्यास अधिक दिलें पाहिजे. तर मग जाणत्या मनुष्याचे जितके जीवनव्यापार सुरू असतात, तितकेच मुलाचेही सुरू असतात, असें जरी मानलें, तरी सुद्धां मुलांस त्याच्या प्रमाणानुरूप जाणत्या मनुष्यापेक्षां कांहींतरी पौष्टिक अन्नाचा जास्त पुरवठा केला पाहिजे, हें उघड आहे. परंतु शरीर दुरुस्त स्थितींत ठेवणें आणि त्यांतील उष्णता राखणें ह्यांशिवाय मुलांस शरीराचा कांहीं भाग नवीन करावयाचा असतो, ह्मणजे मुलास वाढावयाचें असतें. नेहमीं चालेलली शरीराची झीज आणि त्यांतील उष्णतेचा खप भरून आला ह्मणजे जें राहतें त्याचा व्यय शरीराच्या वाढीकडे होतो; असें जास्त अन्न शिल्लक राहत गेलें, तरच त्याच्या योगानें नेहमींची वाढ सुरू असण्याचा संभव आहे; आणि अशी शिल्लक नसूनही जी कधीं कधीं वाढ होते ती शरीर दुरुस्त स्थितींत नसतांना झालेली वाढ होय, व अर्थात् ती वाढ खुरटलेली असावयाची. आतां यंत्रशास्त्राचा एक असा नियम आहे कीं, यंत्र जितकें लहान असेल तितका त्याच्या गतीस घर्षणादि गोष्टींपासून होणारा प्रतिबंध कमी होतो. हा नियम फारच भानगडीचा आहे, व त्याची सिद्धता येथ

थोडक्यांत करून देतां येणार नाहीं. तथापि ह्या नियमाच्या आधारानें मुलांच्या गात्रांची नेहमींच्या व्यवसायांनीं होणारी झीज जाणत्या मनुष्याच्या गात्रांच्या झिजीपेक्षां कमी होते आणि ह्मणून मुलांची खाण्यापिण्याच्या संबंधानें कितीही हेळसांड झाली तरी त्यांच्या शरीरामध्यें अन्नाचा रस कांहीं तरी शिल्लक राहात गेलाच पाहिजे असें जरी खरें आहे, तरी त्यावर आमचें असें ह्मणणें आहे कीं मुलांची अन्नपाण्याच्या संबंधानें हयगय झाल्यानें अन्नाची शिल्लक एरवीं राहील त्यापेक्षां निःसंशय कमी राहणार, आणि मग त्यांची वाढ खुंटत जाऊन त्यांचा बांधाही व्हावा तसा सुदृढ होण्याचा संभवं नाहीं. मुलांस लहानपणीं जशी ताबडतोब व जबर भूक लागते,तशी मोठे मनुष्यास लागते किंवा कसें या गोष्टीचा विचार केला कीं वाढत्या गात्रांसच खाण्याची अतिशय आवश्यकता आहे हें आपल्यास सहजीं करून येईल, व याविषयीं लागल्यास जास्तही आधार देतां येईल. असें पहा कीं गलबतें फुटून किंवा दुसरा कांहीं अनर्थ घडून उपासमारीचा प्रसंग येऊन डेपला कीं मुलेंच पहिल्यानें पटापट प्राण सोडतात.

याप्रमाणें मुलांसच अन्नाची विशेष जरूरी आहे ही गोष्ट आपणांस कबूल झालीच पाहिजे व ती कबूल झाली ह्मणजे आपणांस दुसऱ्या एका गोष्टीचा विचार कर्तव्य आहे. ती ही कीं हा हेतु साधण्यास मुलांस आपण ज्यास हलकें अन्न ह्मणतों तें पुष्कळ घालावें किंवा ज्यास पौष्टिक अन्न ह्मणतों तें बेताबेतानें घालावें?एक तोळा पोळीमध्यें जितकें सत्व असतें तितकेंच सत्व निघण्यास भाताचें जास्त वजन घेतलें पाहिजे. आणि बटाट्यापासून तर तितकेंच सत्व काढण्यास भातापेक्षांही त्याचें वजन जास्त घेतलें पाहिजे. व अशाच प्रकारें इतर पदार्थांविषयींही सांगतां येईल. आपला कार्यभाग साधण्यास जसजसें अन्न कमी पौष्टिक असेल, तसतसें तें जास्त दिलें गेलें पाहिजे. तर मग मुलास वाढीसाठीं जास्त अन्नाची गरज असते ती गरज आपण जाणते माणसास जें पौष्टिक अन्न देतों तेंच अन्न त्यास त्या प्रमाणानें देऊन पुरवावी, किंवा हें चांगलें अन्न तीं जितकें खातात तितकेंच त्यांच्या मानानें त्यांचे कोठ्यास पचविण्यास भारी पडतें ही गोष्ट मनांत न आणितां हलकें अन्नच त्यांस पुष्कळपणीं खावयास घालून त्यांचे कोठ्यास तें पचविण्यास जास्त कठीण पडेलसें करावें?

या प्रश्नाचें उत्तर सहजीं देतां येण्यासारखें आहे; पचविण्याचे श्रम जितके कमी पडतील तितकी आंगामध्यें शरीराची वाढ होण्यास व इतर सर्व व्यापार चालण्यास ताकद जास्त राहील. कोटा व आंतडीं यांचें काम बरोबर चालण्यास आंगातील रक्ताचा व ज्ञानतंतुगत शक्तीचा बराच व्यय व्हावा लागतो. यथेच्छ जेवण झाल्यानंतर जें साधारण मांद्य येतें, त्यावरून प्रत्येक जाणत्या मनुष्याच्या लक्षांत आलें पाहिजे कीं, आपल्या शरीरांत असलेला रक्ताचा सर्व पुरवठा आणि ज्ञानतंतुगत शक्ति शरीरांतील दुसरे भागाकडची कमी होऊन कोठ्याकडे जात असते. पौष्टिक अन्न बाताबेतानें खाल्लें असतां त्याचा शरीरपोषणास जरूर तितका रस बनतांना आपल्या गात्रांस जें काम पडतें त्यापेक्षां तितकाच रस निःसत्व अन्न पुष्कळ खाऊन त्यापासून बनतांना त्यांस जास्त काम पडतें. हें जास्त काम म्हणजे तितका तोटाच होय; व कमी शक्तीचीं, किंवा खुरट्या वाढीचीं किंवा ज्यांचे आंगांत हे दोन्ही दोष आहेत अशीं मुलें निपजतात हें या तोट्याचेंच फळ होय. ह्यावरून सिद्धांत असा ठरतो कीं होईल तितकें करून जें अन्न पौष्टिक असून पचण्यास-अगदीं सोपें असेल तेंच अन्न मुलांस खाऊं घातलें पाहिजे.

लहान मुलांस केवळ धान्य, कंद, फळें, मुळें वगैरे घालून त्यांचें पोषण होतें असें म्हटलें तरी चालेल हें खरें आहे. श्रीमंत लोकांमध्यें साधारणपणें मांस किंवा इतर पौष्टिक अन्न ज्यांस थोडेंच मिळतें, अशींही मुलें शोधूं गेलें असतां कांहीं सांपडनात; व तीं चांगलीं वाढत असतात व बरींच गलेलठ्ठही दिसतात. काबाडकष्ट करणारे लोकांचे मुलांस तर मांस किंवा दुसरें कांहीं पौष्टिक अन्न क्वचित्च खावयास मिळतें, परंतु त्यांचीही वाढ पुरी होऊन तीं पुढें बरींच धट्टीकट्टीं निपजतात. या बाह्यात्कारीं विरुद्ध दिसणाऱ्या गोष्टींस लोक जितकें वजन देतात तितकें देतां कामा-नये. प्रथमतः जीं मुलें लहानपणीं भात आणि ताकाचें पाणी खाऊन वाढतात त्यांची वाढ अखेरीस उत्तम प्रतीची होते असें मानतां येत नाहीं. दुसरें आपणांस शरीराचा केवळ आकारच पहावयाचा नाहीं तर शरीरामधील गुणही पाहिले पाहिजेत. नुसत्या मऊ चरबीनें भरलेलें शिथिल शरीर व कसदार मांसानें भरलेलें घट्ट शरीर हीं दोन्हीं साधारणपणें दिसण्यामध्यें सारखींच दिसतात. ज्या मुलाचें शरीर भरून बांध्यास वळण मिळालें

आहे असें मूल, वें ज्याचें शरीर केवळ पोंकळ चरबीन भरलेलें असून लठ्ठ दिसत आहे असें मूल हीं दोन्हीं वरवर पाहणारास सारखींच दिसतील. परंतु त्यांस कांहीं शक्तीचें काम करावयास सांगितलें कीं तात्काळ त्यांमधील खरा भेद दृष्टोत्पत्तीस येईल. मोठ्या माणसाच्या आंगीं लठ्ठपणा ह्मणजे बहुतकरून अशक्तपणाचेंच लक्षण समजावयाचें. तालीम केल्यानें मनुष्याचें वजन कमी होतें हें आह्मी पाहतों; आणि ह्मणूनच ह्या हलक्या अन्नावर वाढलेल्या मुलांच्या देखाव्यावर जाऊन उपयोगाचें नाहीं. तिसरें असें आहे कीं, आकाराशिवाय आपणांस ताकदही पाहिली पाहिजे. ह्यासंबंधानें दुध व गहूं खाणारे किंवा मांस खाणारे लोक आणि ताकभात खाणारे लोक ह्यांच्या मुलांमध्यें मोठाच फरक आहे. एखाद्या श्रीमंत गृहस्थाच्या पौष्टिक अन्नावर वाढलेल्या मुलांपेक्षां गरीब मुलाच्या शरीराची आणि मनाची तरतरी फारच कमी असते.

निरनिराळ्या जातींचे पशु, किंवा निरनिराळ्या जातींचे लोक, यांची तुलना केली किंवा एकाच जातीचे पशु किंवा एकाच जातीचे लोक घेऊन त्यांस निरनिराळीं खाणीं घालून जर त्यांची तुलना करून पाहिली, तर आंगांतील ताकदीचें मान अन्नाच्या पौष्टिकपणावर अवलंबून असतें ह्या गोष्टीस एक अधिक स्पष्ट प्रमाण आढळून येईल.

गवतासारखें अगदीं पिळपिळीत खाणें खाऊन असणाऱ्या गाईचेंच उदाहरण घ्या; तीस पुष्कळ गवत खावें लागतें व तें पचविण्यास आंतील यंत्रें भक्कम असलीं पाहिजेत; एकंदर शरीराचे मानानें तिचे अवयव लहान असल्यामुळें त्याचा त्यांस भार होतो. अशा जड शरीरासह तिला इकडे तिकडे फिरावयाचें असल्यामुळें, व जें अन्न पचवावयाचें तेंही पुष्कळ असल्यामुळें या कामाकडे तिच्या आंगांतील शक्तीचा विशेष खर्च होतो; ह्याप्रमाणें आंगांत अगदीं थोडी शक्ति शिल्लक राहिल्यामुळें ती मंद होऊन जाते. आतां गाईशीं घोड्याची तुलना करा. घोड्याचे शरीराचा बांधा बहुतेक गाईच्या बांध्यासारखाच असतो; परंतु त्याला जास्त भरींव अन्न खावयास मिळतें. त्याचें शरीर व विशेषेंकरून कोड्याकडील भाग इतर अवयवांच्या मानानें तितका मोठा नसतो; व ह्मणून त्यास गात्रांचें तितकें जड ओझें हिंडवावयाचें नसतें. यापासून होतें काय कीं त्याच्या आंगांत

वाचनालय, वाचनालय.

चालण्याचा जास्त दम राहतो व आंगामध्येंही बरीच तरतरी राहते. तसेंच चारा वगैरे खाऊन असणाऱ्या मेंढ्यांचें मांस व जडपणा, व मांस किंवा भाकरबिकर खाऊन असणाऱ्या कुत्र्यांची तरतरी हीं मनांत आणिलीं ह्मणजे हाच फरक विशेष ठळक रीतीनें दिसून येईल. बरें ज्या बागामध्यें कांहीं पशु वगैरे ठेविले आहेत अशा बागांतून फिरून यावें आणि आपापल्या पिंजऱ्यामधून मांसाहारी प्राणी कशा घिरट्या घालीत एकसारखे इकडून तिकडे फिरत असतातहें मनांत आणावें;आणि नंतर झाडपाल्यावर उपजीविका करणाऱ्या पशूंच्या आंगीं ही विशेष तरतरी नेहमीं नसते ह्याचें उगीच स्मरण करावें, ह्मणजे तरतरी आणि जडान्न ह्यांचा कार्यकारणभाव आपणांस कळून येईल.

शरीरांच्या रचना निरनिराळ्या प्रकारच्या असल्यामुळें वरील फरक दिसून येतात असें कित्येक लोक ह्मणतील; परंतु तसें नाहीं. तर प्राण्यांच्या स्थितीच्या मानानें ते जीं निरनिराळीं अन्नें खातात त्यांमुळेंच केवळ वरील फरक दिसून येतात. ह्यास प्रमाण—एकाच जातीच्या प्राण्यांच्या निरनिराळ्या प्रतींमध्यें हे फरक दिसून येतात. उदाहरणार्थ; मोठ्या पोटाचा, सुस्त, आणि आंगांत कांहीं पाणी नाहीं असा ओझ्याचा घोडा, आणि लहान कुशीचा व भरताकृतीचा शिकारी किंवा शर्यतीचा घोडा ह्यांची तुलना करून पहा आणि मग मनांत आणा कीं, एकाचें खाणें दुसऱ्याच्या खाण्यापेक्षां किती पौष्टिक असतें.किंवा मनुष्यजातीचेंच उदाहरण घ्याना;आस्ट्रेलियामधील लोक व इतर रानटी लोक कंद,फळें,मुळें आणि कृमिकीटक,किंवा अशाचप्रकारचें हलकें अन्न खाऊन आपली उपजीविका करितात. ते लोक इतर लोकांच्या मानानें खुरटे असतात, व त्यांचे स्नायु मृदु असून त्यांची वाढ पूर्ण झालेली नसते व त्यांचीं पोटेंही मोठींच असतात; आणि या लोकांच्यानें एखादें एकसारखें मेहनतीचें काम करण्यामध्यें किंवा लढाईमध्यें युरोपियन लोकांशीं बरोबरी करवत नाहीं. काफर, उत्तर अमेरिकेंतील इंदियन लोक, पाटागोनिया येथील लोक व असेंच दुसरे रानटी लोक हे चांगले उंच,सशक्त, व चलाख असतात; आणि पहाल तर त्यांचा मांस खाण्याचा तडाका सुरू असतोच.आमच्या हिंदुस्थानदेशांतलींच उदाहरणें घेऊन पहाना; इतर हिंदुलोकांपेक्षां पुरभय्ये, रजपूत वगैरे लोकांचें खाणें अधिक जड असतें, व त्यामुळें ते लोक अधिक जोरदार असतात. तसेंच भातखाऊ बाणकोट्यां-

पेक्षां बाजरीची भाकर व तिखटाचा गोळा खाणारे देशुरी लोक अधिक बळकट असतात. मुंबईशहरामध्यें भाताची रास उठविणारे कोंकणी बाल्ये आंगामध्यें ताकद नसल्यामुळें शेटच्या घरची नोकरी मोठ्या आनंदानें करितात; परंतु अधिक जोरदार अन्न खाणारे तेच देशावरील मराठे वगैरे लोक आंगामध्यें ताकद असल्यामुळें प्राण गेला तरी ते कोणाचे घरची नोकरी करण्यास कबूल व्हावयाचे नाहींत. ते बंदरावर उन्हांत हमाली करून खुशाल आपलें पोट भरितात. ह्यावरून जसें ज्याचें खाणें तशी त्याच्या आंगांत ताकद ही गोष्ट स्पष्ट होते. शिवाय एकंदर जगाचा इतिहास पाहिला तरी सुद्धां असेंच दिसून येतें कीं, ज्या लोकांचें खाणें चांगलें पौष्टिक असतें त्याच लोकांच्या आंगांत शक्ति असते, व तेच वर्चस्वास चढतात.

एकाच प्राण्याचें अन्न ज्या मानानें कमजास्त पौष्टिक असतें त्याच मानानें त्याच्या आंगीं काम करण्याचें सामर्थ्यही कमजास्त असतें असें अनुभवास येतें हें मनांत आणिलें ह्मणजे वरील ह्मणण्यास विशेषच जोर येतो. ही गोष्ट घोड्याच्या संबंधानें अगदीं खरी ठरते असा लोकांचा अनुभव आहे. इंग्लंदा मध्यें शेतकीच्या व पारधीच्या कामीं घोड्यांचा उपयोग फार करितात. तिकडील लोकांचा असा अनुभव आहें कीं चरणाऱ्या घोड्याची चरबी मात्र वाढत असते, परंतु शक्ति कमी होत असते, असें त्यास श्रमाच्या कामांस लावल्याबरोबर लागलेंच दिसून येतें. घोड्यास चरावयास बाहेर सोडल्यानें त्याच्या आंगांतील स्नायूंचा जोर कमी होतो; एखादा बैल बाजारांत विकण्यासाठीं तयार करावयाचा असल्यास गवत घालणें अगदीं उत्तम, परंतु तेंच गवत शिकारी घोड्यास उपयोगाचें नाहीं; उन्हाळ्यामध्यें शेतांत कामास लाविल्यानंतर शिकारी घोड्यांस कांहीं महिनेपर्यंत तबेल्यामध्येंच खाणें घालून बाळगावें लागतें; व अशी व्यवस्था ठेविली तरच त्यांच्या आंगीं शिकारी कुत्र्यांबरोबर धांवण्याचें सामर्थ्य येतें; व त्यांची स्थिति पुढें अगदीं चांगली होण्यास पुढील वसंतऋतु यावा लागतो. ॲपरली नामक एक शोधक विद्वान असें ह्मणतो कीं, शिकारी घोड्यांस चरण्याकरितां उन्हाळ्यामध्यें कधींच बाहेर सोडतां कामानये; व सोईच्या आणि विशेष प्रसंगाखेरीज त्यांस आधीं मुळीं बाहेरच काढतां कामानये. सारांश शिकारी घोड्यांस कधींच हलकें खाणें खाऊ

घालूं नये; आंगामध्यें पुष्कळ ताकद आणि कंटकपणा येण्यास नेहमीं त्यांचें खाणें कसदार असलें पाहिजे हें अगदीं अक्षरशः खरें आहे. शिवाय याच गृहस्थानें असें सिद्ध करून दाखविलें आहे कीं मध्यम प्रतीच्या घोड्यास उत्तम प्रतीचें खाणें घातलें तर तो कामामध्यें अगदीं नेहमींचें साधें खाणें खाणाऱ्या पहिल्या प्रतीच्या घोड्याची बरोबरी करील. वरील प्रमाणें तर आहेतच; परंतु शिवाय तिकडे सर्वांच्या पाहण्यांतली एक साधारण अशी गोष्ट आहे कीं घोड्यास नेहमींपेक्षां जास्त काम पडेल असें असल्यास त्यास नेहमींचें जव वगैरे धान्य न देतां बीन नांवाचें धान्य खाऊं घालतात; कारण त्यामध्यें नायट्रोजन विशेष असल्यामुळें आंगांत मांसवृद्धि विशेष होते. हा इंग्लिश लोकांचा अनुभव झाला, व तो आमच्या अनुभवास जुळूनच आहे. घोड्यास जास्त काम पडावयाचें असल्यास त्याचें खाणें वाढवितात ही गोष्ट आपण नेहमीं पाहतों.

ह्या संबंधानें आणखी एक गोष्ट सांगून आतां हें प्रकरण आम्ही पुरें करितों. मनुष्यमात्राची स्थिति पाहिली तर ह्या गोष्टीची सत्यता वरच्याप्रमाणेंच स्पष्टपणें किंवा अधिक स्पष्टपणेंही दिसून येईल. तालीम करून शक्तीचीं मोठमोठीं कामें करणाऱ्या लोकांविषयीं आम्ही कांहीं ह्मणत नाहीं; त्यांचें खाणें तर वरील तत्वास पूर्णपणें अनुसरून असतेंच, लोखंडी सडका बांधण्यांचें मक्त्यानें काम करणारे लोक किंवा त्यांनीं लावलेले मजूर ह्यांच्या अनुभवास काय येतें तें सांगतों. युरोप खंडांतील नुसता गव्हांचा आटा खाऊन असणाऱ्या मजुरांपेक्षां इंग्लंडांतील विशेषेंकरून मांस खाणाऱ्या मजुराच्या अंगीं काम करण्याची फारच जास्त ताकद असते या गोष्टीविषयीं तिकडील लोकांस आतां संशयच राहिलेला नाहीं; फारतर काय, फ्रान्स वगैरे यूरोपखंडांतील देशांमधील लोखंडी सडकांचीं कामें करणारे इंग्लंडांतील कंत्राटदारलोक आपल्याबरोबर इंग्लंडांतील मजूर नेतात; व असें केल्यानें आपला फायदा आहे असें त्यांच्या दिवसानुदिवस अनुभवास येत चाललें आहे. हा त्यांच्या भिन्नजातित्वाचा गुण नव्हे तर त्यांच्या निरनिराळ्या खाण्याचा गुण होय असें आतां स्पष्टपणें सिद्ध झालें आहे. कारण फ्रान्सदेशांतील मजुरांचा

जेव्हां खाण्यापिण्याचा बेत त्यांच्या जोडीच्या इंग्लंडांतील मजुरांप्रमाणें असतो, तेव्हां तेही कामामध्यें त्यांची बरोबरी करितात.

ह्या वर दिलेल्या प्रमाणांनीं मुलांचें पालनपोषण कसें करावें ह्याविषयीं जें आमचें मत आहे त्यास पुष्टीकरण येत नाहीं काय? जड किंवा हलकें कोणतेंही अन्न खाल्लें तरी व्हावयाची तितकी वाढ किंवा पुष्टता होतेच असें जरी मानलें तरी हलके अन्नावरच बनलेल्या शरीरामध्यें कांहीं अर्थ नसतो असें त्यावरून सहजीं सिद्ध होत नाहीं काय? वाढ आणि ताकद या दोन्ही गोष्टी साधावयाच्या असतील तर खाणें उत्तमच पाहिजे ही गोष्ट यावरून ठरली जात नाहीं काय? ज्या मुलास शारीरिक किंवा मानसिक श्रम फारसे करावयाचे नसतात त्या मुलाचें साधें खाणें खाऊन बरेंच चालण्यासारखें आहे; परंतु ज्या मुलास वाढ साधून शारीरिक व मानसिक श्रमानें होणारी शरीराची झीज भरून काढावयाची असेल त्या मुलाचें खाणें पौष्टिकच असलें पाहिजे. जें आपलें सकृद्दर्शनींच मत होतें त्या मताचें वरील प्रमाणांवरून दृढीकरण होत नाहीं काय? व तसेंच ह्यावरून सहजीं असें मानतां येत नाहीं काय कीं, असें उत्तम अन्न त्यांस न दिलें तर वाढीस व शारीरिक आणि मानसिक शक्तींस ह्यापासून अपायच व्हावयाचा? ज्याला मिळून बुद्धि आहे त्याला ह्या गोष्टींविषयीं संशयच यावयाचा नाहीं. कांहीं पदार्थ खर्च केल्याखेरीज यांत्रिक शक्ति उत्पन्न करितां येईल असें मानून अखंड गति उत्पन्न करण्याचा ज्यांचा बेत होता त्यांची ज्या प्रकारची चूक होत असे, त्याच प्रकारची आमच्या मताप्रमाणें ज्यांचें मत नसेल त्यांची चूक होते असें समजावें.

ह्याप्रमाणें अन्नाविषयींचा विचार करितांना आणखी एक विशेष अगत्याच्या गोष्टीविषयींही चार शब्द लिहिणें इष्ट आहे. ती गोष्ट ही कीं जें अन्न आपण खातों त्यामध्यें नेहमीं बदल करीत गेलें पाहिजे. ह्या संबंधानें मुलांच्या खाण्यापिण्याच्या बेतामध्यें नेहमीं मोठी चूक होत असते. पलटणींतील शिपायांच्या नशीबीं ज्याप्रमाणें वीसवर्षं जुना नासका कुजका आटा खाऊन काढावयाचीं असतात त्याप्रमाणेंच जरी मुलांची स्थिति नसली, तरी त्यांसबुद्धां बहुतकरून एकाच प्रकारचें अन्न खाऊन दिवस काढावे लागतात. त्यांची स्थिति कांहींशी बरी असते व त्यांस त्या

स्थितीमध्यें फारसे दिवस काढावयाचे नसतात हें जरी खरें आहे, तरी हा प्रकार एकंदरीनें आरोग्यरक्षणाचे नियमांस अगदीं विरुद्ध आहे हें उघड आहे. दोनप्रहरच्या जेवणाचे वेळीं त्यांस जें अन्न मिळतें त्यामध्यें बरेच प्रकार असतात, व त्यामध्यें कधीं कधीं पालटही होत असतो. परंतु सकाळच्या जेवणास भात, भाकर किंवा तांदुळाची पेज ह्याखेरीज दुसरें कांहीं असावयाचें नाहीं; व असें अगदीं आठवडयांचे आठवडे व महिन्यांचे महिने, किंवा वर्षांचीं वर्षेंही एकसारखें चालावयाचें. अशाच प्रकारचे कांहीं ठरींव अन्नाशीं आणखी एकवार गांठ पडून त्यांचा दिवस जातो.

हा क्रम प्राणिधर्मशास्त्राचे नियमांस अगदीं विरुद्ध आहे. वारंवार एकाच प्रकारचें अन्न खाऊन येणारा वीट, व जिव्हेस कधीं चाखावयास मिळालें नाहीं अशा प्रकारचें अन्न खाऊन होणारें समाधान ह्यांमध्यें कांहीं अर्थ नाहीं असें लोक उगीच कारणाशिवाय मानतात तें मानोत; परंतु त्यापासून तोंडपालट करण्याची इच्छा जागृत होते; व खरोखर ही इच्छा असणें अगदीं इष्टच आहे. सर्व जीवनक्रिया यथास्थितपणें चालण्यास ज्या प्रकारच्या अन्नाचे अंश असले पाहिजेत, ते सर्व पाहिजेत तितके व पाहिजेत तसे एकाच प्रकारच्या खाण्यापासून मिळण्याचा संभव नाहीं ह्या गोष्टीची लोकांनीं अनेकवेळां प्रतीति घेतली आहे, व ती आतां अगदीं खरी ठरली आहे. तर ह्या अन्नाच्या अंशांचा योग्य पुरवठा होण्यासाठीं आपलें खाणें वारंवार पालटीत गेलें पाहिजे. प्राणिधर्मशास्त्रवेत्त्यांस आणखी अशी एक गोष्ट कळून आली आहे कीं आपणास जें खाणें विशेष आवडतें तें खाल्यानें होणारें समाधान ह्मणजे आपणास प्राप्त होणारा एक प्रकारचा उत्साहच होय; व ह्या उत्साहानें रक्ताशयाचा व्यापार जोरानें चालून रुधिराभिसरण मोठ्या वेगानें होऊं लागतें व पुढें अन्नाचें पचनही सहजीं सुलभ होतें. ह्या वरील सर्व गोष्टी गुरेंढोरें पाळण्याच्या ज्या हल्लींच्या वहिवाटी आहेत त्यांस जुळून आहेत. गुरांढोरांचें खाणें बदलीत गेलें पाहिजे असें मुळीं लोकांचें ह्मणणेंच आहे.

परंतु वेळोवेळीं आपल्या खाण्यामध्यें बदल करीत गेलें ह्मणजे झालें असेंही नाहीं; तर ज्या कारणास्तव असा बदल करणें इष्ट आहे

त्याच कारणास्तव प्रत्येक जेवणाच्या वेळीं अन्नामध्यें प्रकारही असणें अगदीं इष्ट आहे. त्यापासून अन्नाच्या अंशांचा मिलाफ चांगला होतो व आंगामध्यें चांगला उत्साह येतो हें मागें सांगितल्याप्रमाणें फायदे आहेतच. यांची कोणी उदाहरणें विचारतील तर आधीं आपणास एक फ्रेंच लोकांच्या जेवणाचें उदाहरण देतां येईलच. फ्रेंच लोक दुपारच्या वेळीं अगदीं रगडून खातात; परंतु एक आहे; त्यांच्या खाण्यामध्यें पुष्कळ प्रकार असतात, आणि त्यामुळें असें होतें कीं त्यांच्या कोठ्यास तें पचविण्याचें बरेंच हलकें पडतें. एकाच प्रकारचें तितकेंच अन्न जरी चांगलें शिजविलेलें असलें तरी तें तितक्या सहज रीतीनें पचवितां येईल असें बहुतकरून म्हणतां येणार नाहीं. कोणास आणखी उदाहरणें पाहिजे असतील तर तीं त्यांस प्राण्यांचें पोषण कसें करावें ह्याविषयीं जीं हल्लीं पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत त्यांपैकीं प्रत्येकामध्यें आढळून येतील. प्राण्यांच्याहिदर एक वेळच्या खाण्यामध्यें जर प्रकार असतील तर तें खाणें उत्तम प्रकारें त्यांच्या आंगीं लागतें. पुष्कळ शास्त्रज्ञ लोकांच्या अनुभवावरून आह्मांस अशीं खात्रीलायक प्रमाणें मिळतात कीं, कोठ्यांमधील व्यापार सुरळीतपणें चालण्यास अन्नामध्यें निरनिराळ्या प्रकारचे परमाणु असतील तर चांगलें, किंवहुना असे परमाणु असणें आवश्यकही आहे.

मुलांच्या खाण्यापिण्याचा बेत वेळोवेळीं बदलीत जाणें व त्यांच्या प्रत्येक जेवणामध्यें बरेच प्रकार ठेवीत जाणें म्हणजे एक मोठा त्रासच होऊन जाईल असें जर कोणी म्हणतील (आणि पुष्कळ लोक असें म्हणतील असा संभवही आहे),तर त्यावर आमचें असें म्हणणें आहे कीं मुलांचें मन सुधारण्याकरितां कितीही श्रम पडले तरी त्यांचें आपणास कांहीं वाटत नाहीं, आणि त्यांचे पुढील सर्व व्यवहार उत्तम प्रकारें चालण्यास त्यांची शरीरप्रकृति सुदृढ असणें हें जर विशेष अगत्याचें आहे, तर या संबंधानें आपणास जे श्रम पडतील ते आपणास श्रमसे वाटावे काय ? शिवाय झोंबी लावण्याकरितां रेडे वगैरे जनावरें माजाविण्याचे कामीं जे श्रम पडतात ते आपण आनंदानें करीत असावें, व मुलांच्या पालनपोषणाचे श्रम मात्र आपणास श्रमसे वाटावे ही तरी गोष्ट चमत्कारिक व दिलगिरीची नव्हे काय ?

वर घालून दिलेल्या नियमांप्रमाणें वागण्याचें ज्यांचे मनांत असेल त्यांच्यासाठीं सूचनेकरितां ह्मणून आणखी दहा पांच ओळी खर्च केल्या पाहिजेत. वर अन्नामध्यें बदल करीत जावें असें आह्मीं ह्मटलें खरें, परंतु तो बदल तरी एकदम करितां कामा नये; कारण एक सारखें हलकें अन्न खाऊन गात्रें इतकीं क्षीण होऊन जातात कीं, त्यांच्यामध्यें जडअन्न पचविण्याचें सामर्थ्यच राहत नाहीं. हलकें अन्न खाणें हेंच आधीं अजीर्णाचें कारण आहे व तें जनावरांच्या संबंधानेंही खरें आहे. ह्यास्तव जनावरांस लोणी काढून घेतलेलें दूध किंवा ताक किंवा असाच कांहीं दुसरा हलका पदार्थ खाऊं घालीत गेलें, तर त्यांस त्यापासून अजीर्णाची बाधा जडते. जर गात्रें क्षीण झालीं असतील तर त्यांचा जडान्नाशीं प्रसंग हळू हळू बेतानेंच आणिला पाहिजे. जसजशी गात्रांची शक्ति वाढत जाईल तसतसें अधिक जडान्न सुरू करण्यास हरकत नाहीं. शिवाय कोणी चांगलें पौष्टिक अन्न घेऊन तें त्या मानानें थोडें देण्याचा बेत ठेवितील, तर तसेंही उपयोगाचें नाहीं. खरें जेवण ह्मटलें ह्मणजे पोटभर अन्न पोटांत गेलेंच पाहिजे; जेवतांना पोटभर अन्न खाल्लें नाहीं तर तें जेवणच नव्हे असेंही ह्मटलें तरी चालेल. चांगलें खाणें न खाणाऱ्या रानटी लोकांच्या पचनेंद्रियापेक्षां चांगलें खाणें खाणाऱ्या सुशिक्षित लोकांचीं पचनेंद्रियें जरी आकारानें लहान असलीं, व तीं पुढें आणखीही लहान होण्याचा जरी संभव असला तरी त्यांची हल्लींची पचनशक्ति मनांत आणून तीवरून त्यांचें आकारमान ठरविलें पाहिजे. या दोन गोष्टींकडे अगदीं योग्य लक्ष देऊन आमचे सिद्धांत असे ठरतात कीं, (१) मुलांचें अन्न चांगलें पौष्टिक असावें; (२) प्रत्येक जेवणामध्यें कांहीं पर असून एकंदर जेवणाचाही बेत वेळोवेळीं बदलीत गेलें पाहिजे; (३) जेवण अगदीं पोटभर असलें पाहिजे.

मुलांच्या खाण्यापिण्याप्रमाणें त्यांच्या कपड्यालत्त्यांविषयीं लोक आपला हात आंखडूनच धरितात हें तरी अयोग्यच आहे; त्यांस वल्कलधारी तापसीच बनविण्याचा त्यांचा बेत दिसतो. लोकांची हल्लीं अशी कांहीं एक चमत्कारिक समजूत होऊन गेली आहे कीं आपणांस निरनिराळ्या गोष्टींच्या संबंधानें ज्या कांहीं इच्छा होतात त्यांकडे दुर्लक्षच करीत गेलें पाहिजे. आतां ही त्यांची समजूत विचारपूर्वक झालेली असते किंवा ते

तिच्या विरुद्ध कधीं वागतच नाहींत असें आमचें ह्मणणें नाहीं. या समजुतीच्या मुळाशींच गेलें तर त्यांचें इतकेंच मत आहे असें दिसून येईल कीं, ह्या ज्या आपणांस इच्छा होतात त्या त्यांप्रमाणें आपण वागावें ह्मणून होतात असें नाहीं, तर त्या होतात त्या आपणांस उलट घोटाळ्यांत घालण्याकरितांच होतात. परंतु असें मानणें ह्मणजे मोठीच चुकी आहे. जगन्नियंत्या परमेश्वरानें जी आपली एकंदर शरीरसंबंधी व्यवस्था ठेविली आहे, तीमध्यें खरोखर त्याचें अपार दयाशीलत्वच दिसून येतें. आपणांस जीं नेहमीं दुखणींबाणीं येतात त्यांचें कारण आपणांस ज्या इच्छा होतात त्यांप्रमाणें आपण वागतों हे नव्हे, तर त्यांप्रमाणें आपण वागत नाहीं हें होय. भूक लागली असतां खाणें हें वाईट नाहीं, तर भूक नसतांना खाणें हेंच वाईट आहे; तहान लागली असतां पाणी पिणें गैर नव्हे, तर तहान भागल्यानंतरही आणखी पाणी पिणें गैर होय. ज्या मोकळ्या स्वच्छ हवेमध्यें गेल्यानें आपणांस आनंद होतो ती मोकळी हवा आंत घेतल्यानें आपणांस अपाय होत नाहीं, तर आंतलीं फुप्फुसें नको नको ह्मणत असतांनाही घाणेरडी हवा आंत घेणें यापासूनच अपाय होतो. नेहमीं इकडे तिकडे फिरून कांहीं तरी व्यायाम करावा अशी जी आपल्या मनाची स्वाभाविक प्रवृत्ति असते, व जी लहानपणीं तर विशेष उत्कंठेनें दिसून येते, तिला अनुसरून व्यायाम केल्यानें आपलें अहित होत नाहीं, तर स्वभावतःच जी गोष्ट करण्याकडे आपल्या मनाचा नेहमीं कल असतो ती आग्रहानें न केल्यामुळेंच आपलें नेहमीं अहित होतें. मानसिक श्रम सहज रीतीनें चालले आहेत व त्यांपासून आपणांस जोंपर्यंत आनंद होत आहे तोंपर्यंत ते चालविण्यास कांहीं हरकत नाहीं; परंतु तेच पुढें कपाळ तापून दुखावयास लागलें असतांनाही चालविले तर त्यापासून कधींही हित व्हावयाचें नाहीं. शारीरिक श्रम करितांना जोंपर्यंत आपणांस आनंद होत आहे किंवा थकल्यासारखें वाटत नाहीं, तोंपर्यंत ते केले असतां त्यांपासून कांहीं इजा होत नाहीं; परंतु थकवा येऊन श्रम करूं नये असें वाटूं लागल्यावरही जर ते तसेच चालविले तर मात्र त्यांपासून खात्रीनें अपाय झाल्याशिवाय रहावयाचा नाहीं. आतां जे लोक बरेच दिवसपर्यंत आजारी आहेत त्यांच्या मनाच्या कलांस अनुसरतां कामा नये हें मात्र अगदीं खरें आहे. जे लोक

नेहमीं घरांतच राहतात, वर्षानुवर्षे बाहेर पडतच नाहींत, किंवा जे शारीरिक श्रम न करितां नेहमीं मानसिक श्रमामध्येंच निमग्न असतात; किंवा जे क्षुधेचें मान न पहातां केवळ घड्याळाकडे पाहूनच जेवणाचा बेत ठेवितात, अस लोक जर आपल्या दूषित कलांस अनुसरून वागतील तर मात्र खात्रीनें फसतील ह्यांत संशय नाहीं; परंतु त्यांनीं एवढी गोष्ट चांगली लक्षांत ठेवावी कीं, ते प्रथमतःच आपल्या कलांस अनुसरून वागले नाहींत त्याचेंच हें फळ होय. लहानपणीं जर त्यांनीं शारीरिक प्रवृत्तिरूपी गुरूंची कधींही अवज्ञा केली नसती, तर त्यांचाच त्यांस अगदीं अखेरपर्यंत खऱ्या गुरूप्रमाणें उपयोग झाला असता.

शैत्य किंवा उष्णता ह्यांपासून होणाऱ्या शारीरिक प्रवृत्तींवरून कपड्यां लत्त्यांच्या संबंधाची व्यवस्था कशी ठेविली पाहिजे ह्याचें आपणांस ज्ञान होण्यासारखें असतां त्याकडे अगदीं दुर्लक्ष करून ती व्यवस्था मनास मानेल तशी ठेवणें ह्मणजे अगदीं अनुचित होय. मुलांस लहानपणीं भरपूर कपडे न दिल्यानें तीं पुढें रांकट होतील असें कित्येक लोक समजतात, परंतु हा त्यांचा निवळ भ्रम आहे; अशा रीतीनें मुलें रांकट तर होत नाहींतच, परंतु उलट त्यांपैकीं पुष्कळांस स्वर्गपंथाचेंच लवकर अवलंबन करावें लागतें. मुलें आधींच दिसण्यामध्यें किती नाजूक दिसतात; आणि एवढ्यावरूनच त्यांस अशा प्रकारें रांकट करणें उपयोगीं नाहीं हें आपणांस कळून यावें. तसेंच मुलें लहानपणीं कशीं वरचेवर आजारी पडतात ह्या गोष्टीचाही जीं अविचारी आईबापें असतील त्यांनीं विचार केला पाहिजे असें डाक्टर कोम्बी साहेबांचें मत आहे. मुलांस रांकट केलें पाहिजे अशाविषयीं जीं कारणें लोक देतात त्यांत तर कांहींच अर्थ नाहीं. शेतकरी लोकांचीं मुलेंबाळें आंगांत नीट कपडे नसतानांही थंडी वाऱ्यामध्यें इकडे तिकडे फिरत असतात हें पाहून, व या गोष्टीचा एकंदर शेतकरी लोक प्रकृतीनें सुदृढ असतात ह्या गोष्टीशीं संबंध जडवून, श्रीमंतलोक उघड्या आंगानें फिरले तरी शरीर प्रकृति सुदृढ राहते, असा सिद्धांत ठरवून तसें लोक करण्यास लागतात; व त्याप्रमाणें आपल्या मुलांसही कपडे अगदीं बातावेतानें देण्याचा ठराव करितात. शेतकरी लोकांचीं मुलें खेड्यापाड्यांतून हिरव्या चार मैदानावर इकडे तिकडे उड्या मारीत असतात, व त्यांस अशाच प्रकारच्या दुसऱ्याही पुष्कळ सोई असतात,

त्यांचा वेळ बहुतकरून नेहमीं खेळण्यांत जातो. त्यांस सर्व दिवसभर ताजी हवा मिळते, व अतिशय मानसिक श्रम होऊन त्यांच्या शरीरास व मनास त्रास पोहोंचतो असें कधीं घडून येत नाहीं; ह्या सर्व गोष्टी ते विसरून जातात. अशीं त्यांची शरीरप्रकृति सुदृढ राहण्यास कारणें असल्यामुळें त्यांची प्रकृति कपडयालत्यांची टंचाई असतांनाही सुदृढ राहण्याचा संभव आहे. कपडयालत्यांचे टंचाईमुळें त्यांची शरीर प्रकृति सुदृढ राहते असें मात्र मानतां येणार नाहीं. आह्मांस असें वाटतें कीं वरील सिद्धांत खरा असला पाहिजे, व मुलांच्या आंगांत कपडे नसल्यानें जीवनास योग्य अशी उष्णता बाहेर जाऊन तीपासून अपाय झाल्याखेरीज राहवयाचा नाहीं.

कारण प्रकृति थंडीवाऱ्याची पर्वा न करण्यासारखी धट्टीकट्टी असून आंग उघडें राहिलें तर त्या पासून आंगांत रोंकटपणा येतो खरा, परंतु शरीराची वाढ खुंटते. ही गोष्ट मनुष्यास व इतर प्राण्यांस सारखीच लागू पडते. शेटलंड बेटासारख्या थंड प्रदेशांतील तट्टें थंडीवाऱ्यामध्यें उष्ण प्रदेशांतील घोडयांपेक्षां जास्त टिकाव काढितात खरा परंतु तीं वाढीनें खुरटीं असतात. स्काटलंडांतील अधिक थंड हवेमध्यें राहणारीं मेंढरें व गुरेंढोरें इंग्लंडांतील मेंढरें व गुरेंढोरें ह्यांच्या मानानें पाहिलीं तर खुरटीं असतात. आर्तिक व अन्तार्तिक महासागरांतील बेटांमध्यें राहणारे लोकांची उंची पुष्कळ कमी असते. लापलंडचे लोक व उत्तर अमेरिकेमधील इंदियन लोक ठेंगणेच असतात. तसेंच टेराडेल्फिइगो बेटामधील लोक हिंवाळ्याच्या कडक थंडीमध्यें अंगदीं उघडया अंगानें फिरतात; परंतु त्यांच्याविषयीं डारविन साहेब असें ह्मणतात कीं, ते इतके कुरूप व खुरटे असतात कीं त्यांस मनुष्यें मानण्यासच पंचाईत पडावयाची.

शास्त्रीय गोष्टींचा विचार केल्यास असें दिसून येईल कीं, आंगांतून उष्णता पुष्कळ बाहेर गेल्यामुळें हा खुरटेपणा उत्पन्न होतो. आह्मी असें पाहतों कीं अन्न व इतर सर्व गोष्टी यथास्थित असतांनाही हा खुरटेपणा उत्पन्न होतो. कारण शरीरांतील उष्णतेचा दूरच्या पदार्थांशीं सतत विनिमय सुरू असल्यामुळें तें नेहमीं गार होत असतें; व ह्मणून आक्सिजन वायूशीं संयोग पावून ती उष्णता भरून काढण्याकरितां आपणास जास्त अन्न खालें पाहिजे. परंतु पचन करण्याच्या गात्रांचे सामर्थ्य नियं-

मितच असतें, व ह्मणून आंगांत राखण्याकरितां आक्सिजन वायूशीं संयोग पावणारा अन्नाचा रस गात्रांस पुष्कळ तयार करावयाचा असला ह्मणजे त्यांस शरीराची वाढ होण्यास जो तशाच प्रकारचा रस लागतो तो बनवितां येणार नाहीं. उष्णता उत्पन्न करणाऱ्या द्रव्यांचा एकीकडे अतिशय खप झाला ह्मणजे दुसरेकडे ह्या द्रव्यांचा तोटा आलाच पाहिजे. ह्यास्तव अखेरीस शरीर खुरटें किंवा निर्जीव झालेंच पाहिजे; किंबहुना शरीरामध्यें हे दोन्हींही दोष उत्पन्न झाले पाहिजेत.

ह्याच कारणास्तव आह्मीं कपडयालत्त्यांस इतकें महत्व देतों. लीबिग साहेबांचें असें ह्मणणें आहे कीं, "शरीरांतील उष्णतेच्या संबंधानें पाहिलें तर कपडालत्ता अमुक अन्नाचें काम करितो असेंच केवळ समजावयाचें." कपडालत्ता आगांतील उष्णता जावयाचें मान कमी करितो; व अर्थात त्यामुळें उष्णता उत्पन्न करणाऱ्या द्रव्यांचीही गरज कमी कमी होत जाते. कोडयास उष्णता उत्पन्न करणारीं द्रव्यें फारशीं तयार करण्याचें नसलें ह्मणजे दुसरीं द्रव्यें पुष्कळपणीं बनविण्याची त्यास सवड राहते. जे लोक गुरेंढोरें वगैरे बाळगितात त्यांच्या अनुभावरूनही अशा प्रकारें उष्णता कमी होत जाते हें सिद्ध होतें. प्राण्यांस थंडीमध्यें दिवस काढावयाचे पडले ह्मणजे आंगांतील मेद, स्नायु, किंवा वाढ ह्यांतून कशासतरी हिसका आलाच पाहिजे. ज्या गुरांढोरांस माजवावयाचें असेल, त्यांस थंड हवेमध्यें उघडीं सोडतां कामा नये; तसें केलें तर त्यांची वाढ खुंटावयाची, किंवा त्यांच्या खाण्यापिण्याचा जास्त खर्च आपल्या आंगावर बसावयाचा. ऑपरली साहेबांचें असें ह्मणणें आहे कीं शिकारी घोडयांस चांगलें सुदृढ राखावयाचें असेल तर त्यांचा तबेला गरम राहील अशीच तजवीज केली पाहिजे. शर्यतीकरितां घोडे बाळगणारे लोकांचें तर असें ठरींव मत होऊन गेलें आहे कीं, शर्यतीचे घोडयांस कधींच उघडें ठेवितां कामा नये.

ह्याप्रमाणें निरनिराळ्या लोकांच्या निरनिराळ्या स्थिति मनांत आणून जो शास्त्रीय सिद्धांत ठरतो त्यास शेतकरी व पारधी लोकांची संमति आहेच. बरें, ह्या सिद्धांताचा अंमल मुलांच्या शरीरप्रकृतींवर तर द्विगुणित रीतीनें होतो. मुलें जितकीं लहान असतील, व त्यांची वाढ जसजशी जलद चालली असेल त्याच मानानें त्यांस थंडीची पीडा होत असते.

फ्रान्स देशामध्यें तान्ह्या मुलांस त्यांच्या जन्मांची नोंद करण्याकरितां अधिकाऱ्याकडे नेल्यामुळें मेल्याचीं उदाहरणें वारंवार घडून येतात. क्वेटिलेट साहेबानें असें सिद्ध करून दिलें आहे कीं, बेल्जम देशामध्यें ज्यानेवारी महिन्यामध्यें लहान मुलांचे मरणाची संख्या जुलई महिन्यामधील मुलांच्या मरणाच्या संखेच्या दुप्पट असते. रशिआमध्यें तर लहान मुलें मरण्याचा कांहीं अनर्थच आहे. अगदीं ज्वानींत येण्याच्या सुमारास सुद्धां आपली वाढ पूर्ण झालेली नसल्यामुळें शरीर उघडें ठेवीत गेलें तर त्यापासून आपणांस तादृश इजा होते. उदाहरणार्थ एखादी लढाई बरेच दिवस चालत असून तींत हाल होत असले तर तरुण तरुण शिपाईच आधीं भराभर मरून जातात; ह्याचें कारण उघडच आहे. मुलांचा आकार आणि एकंदर शरीराचा भाग यांमधील प्रमाण बदलत जात असल्यामुळें, जाणत्या मनुष्यापेक्षां मुलाच्या आंगांतून उष्णता अधिक नाहींशी होत असते, असा उल्लेख आह्मीं पूर्वीच केला आहे. आतां येथें एवढेंच सांगण्याची जरूरी आहे कीं, ह्या प्रकारें मुलांचा जो तोटा होतो तो कांहीं लहानसा तोटा नव्हे लेमन साहेबांचें असें ह्मणणें आहे कीं,मुलांच्या आणि इतर लहानप्राण्यांच्या आंगांतून जो कार्बानिक आसिड ग्यास बाहेर जातो त्याचें वजन करून पाहिलें तर असें दिसून येतें कीं, मुलांच्या शरीरांतून कारबानिक आसिड ग्यास जाणत्या मनुष्याच्या शरीराच्या तितक्या वजनाच्या भागांतून जितका जातो त्यापेक्षां दुपटीनें अधिक बाहेर जातो. आतां हे खरें आहे कीं ज्या मानानें शरीरांत उष्णता उत्पन्न होते त्याच मानानें साधारणपणें हा ग्यास बाहेर जात असतो; आणि ह्यावरून आह्मांस असें दिसतें कीं, मुलांच्या शरीरप्रकृतीमध्यें इतर कोणत्याही प्रकारचा कमतरपणा नसला तरी त्यांस उष्णता उत्पन्न करणाऱ्या द्रव्यांचा पुरवठा जाणत्या मनुष्यास करावा लागतो त्याच्या दुप्पट करावा लागतो.

तर मग मुलांचे कपडयाच्या संबंधानें हाल करणें ह्मणजे केवढा मूर्खपणा आहे तो पहा. वापाची वाढ जरी पूर्ण झालेली असली, त्याच्या अंगांतून उष्णता जाण्याचें मान जरी कमी असलें, व शरीराची नेहमीं होणारी झीज भरून काढणें ह्या पलीकडे दुसऱ्या कोणत्याही गोष्टीची त्याची शरीरप्रकृति नीट राहण्यास आवश्यकता नसते, असें जरी असलें तरी आमचें असें विचारणें आहे कीं, तो चांगला आंगभर पोषाख

घातल्याशिवाय आपण बाहेर फिरावयास जाणें चांगलें असें समजतो काय? अर्थात् नाहीं. परंतु ह्याप्रमाणें तो जें करण्यास स्वतः भीत असतो तेंच मुलांच्या आंगीं सहन करण्याचें सामर्थ्य नसतांनाही त्यांस करावयास लावितों ! कदाचित तो जरी असें त्याच्याकडून प्रत्यक्ष करवीत नसला तरी त्यांस असें कोणी करावयास लाविलें तर असें करूंनये, असें तरी तो कधीं ह्मणत नाहीं. त्यानें ही गोष्ट लक्ष्यांत आणावी कीं, उष्णता राखण्याकरितां जें अन्नांतील सत्व खर्च होतें तें फुकटच जातें; व तितका वाढ होण्याकडे त्या सत्वाचा तोटा येतो; आणि ताप, पडसें, खोकला वगैरे दुखण्यांतून जरी मुलें सुटलीं तरी त्याच्या योगानें त्यांची वाढ खुंटून त्यांच्या एकंदर बांध्यास धक्का पोहोंचल्या शिवाय राहवयाचा नाहीं.

ह्यास्तव आह्मीं असें ह्मणतों कीं कपडयांचा बेत अगदीं सतत ठरीव राखतां कामानये; तर शरीरास कधीं जरा सुद्धां थंडी न लागे अशा रीतीनें कपडे बदलून ते वेळोवेळीं कमजास्त ही करीत गेलें पाहिजे. असा कपडयांच्या संबंधानें नियम असला पाहिजे. हा नियम शास्त्रज्ञ लोकांस व वैद्यांस अगदीं मान्य आहे. ज्या ज्या लोकांना ह्या संबंधानें विचार करण्याचा अधिकार पोहोंचतो, त्या सर्वांचें असें मत आहे कीं, थंडीवाऱ्यामध्यें मुलांस उघडें राहूं देणें ह्मणजे मोठी चूक होय. तशांत एकमेकांचें पाहून आपणांस वाईट चाली अधिकच लागतात हें जर खरें असेल, तर आधीं आपणांस ह्या चालीं विषयीं खबरदारी ठेविली पाहिजे.

अमुकच एका भलत्या रीतीनें मुलांचे कपडे असले पाहिजेत असें समजून आईनीं मुलांच्या कपडयालत्याचा बेत त्याप्रमाणें ठेवावा, व त्याच्या योगानें त्यांच्या प्रकृतीस बराच अपाय व्हावा ही गोष्ट खरोखर शोचनीय आहे. लोकांमध्यें सुरू असलेल्या पोषाखांच्या रीतीभातींस अनुसरून स्त्रियांनीं आपल्या मुलांबाळांच्या पोशाकाचा बेत ठेवावा हें तरी गैरच आहे. एखादा ठरींव बाजारांत आयता मिळणारा पोशाक मुलांकरितां आणावा, व तो त्यांस पुरेसा व योग्य आहे कीं नाहीं ह्याविषयीं कांहींएक विचार न करितां एकदम तो त्यांस द्यावा हें तर फारच गैर आहे. अशा पोशाकापासून थोडीबहुत तरी इजा होतेच होते; वारंवार मुलांस दुखणींबाणीं येतात, त्यांची वाढ खुंटते, शरीरप्रकृतीचें मान

अगदीं बिघडून जातें, व कित्येक वेळां तीं अकालीं मृत्यूच्या मुखीं पडतात. बरें, हें सर्व करावयाचें ह्मणाल तर कशासाठीं? लोकांच्या लहरीस ज्या कापडाचे व ज्याप्रकारचे मुलांचे आंगरखे असले पाहिजेत असें वाटतें, तशाच प्रकारचे व तशाच कापडाचे आपल्या मुलांचे आंगरखे असले पाहिजेत असें आईस वाटतें ह्मणून. ह्याप्रमाणें एकंदर धर्तीस अनुसरून पोशाक असावा एवढ्याच हेतूनें त्यांस अपुरा कपडालत्त देऊन, दुखण्यांत पाडून,त्यांस आई कष्ट भोगावयास लावित्ते असें नाहीं;तर अशाच प्रकारचा दुसरा एक हेतु मनांत धरून ती त्यांच्या पोशाकाची धर्ती अगदीं अशी बांधून टाकिते कीं,त्यांत कोणत्याही प्रकारचा हितावह खेळ किंवा व्यायाम करितांच यऊं नये. डोळ्यांस चांगेल दिसावें ह्मणून कांहीं एकाप्रकारचा कपडा व रंग ती पसंत करिते. बरें, तो कपडा व त्याचा रंग मुलांच्या दांडग्या खेळाच्या तडाक्यापुढें मुळींच टिकण्यासारखा नसतो मग कपडे बिघडूं नयेत ह्मणून दांडगाईचे खेळ खेळण्याची त्यांसती अगदीं बंदी करून टाकिते. जमिनीवर मुलगें सरपटलें तर ती त्यास असा दपटशा देते कीं, "उभें रहा, तुझें आंगडें लोळून मळत आहे" बरें मुलें कधीं बाहेर गेलीं, व दाईच्या ताब्यांतील एखादें मूल कोठें जरा चांगला रस्ता सोडून खडकाबिडकावर चढूं लागलें कीं ती त्यास ह्मणणार "फिरमागें तुझें पाय मोजे मळतील." ह्या प्रकारें दोन प्रकारांनीं नुकसान होत असतें. आपल्या मनाप्रमाणें मुलांनीं सुरेख दिसावें, व जे लोक आपल्या घरीं येतात त्यांनीं त्यांस पाहून "वा" ह्मणावें ह्मणून आई त्यांस नेहमीं तंग, तोकडे व भपकेदार कपडे घालिते, व हे सहजीं बिघडून जाणारे कपडे मळूं नयेत ह्मणून मुलें जी स्वभाविक दांडगाई करितात व जी त्यांनीं केलीच पाहिजे ती त्यांस ती करूं देत नाहीं. कपडे आंगभर नसले ह्मणजे व्यायाम करण्याची जरूरी दुप्पट वाढते, परंतु ती कपडे बिघडतात ह्मणून अगदीं बंद केली जाते!! ह्या रीतीस अनुसरून चालणाऱ्या लोकांच्या मनांत तिचे दुष्ट व भयंकर परिणाम बिंबतील तर फार चांगलें होईल. ह्याप्रमाणें केवळ चांगलें दिसण्याकडे एक सारखें लक्ष्य देत गेल्यामुळें मुलें अकालीं मरण येऊन आईच्या हौसरूपी राक्षसीच्या भक्षस्थानीं जरी न पडलीं, तरी त्यांची पुढें प्रकृति बिघडून जाते,आंगांत ताकद नाहींशी होते, व त्यांस धंद्यारोजगारांत यश न येऊन सर्व सुखांस तीं अंतरतात,

सार्वजनिक वाचनालय, बेळगाव.

असें ह्मणण्यास आह्मांस कांहीं शंका वाटत नाहीं. ह्या संबंधानें कडक व सणसणीत उपाय योजावे असें जरी आमचें ह्मणणें नाहीं, तरी आह्मांस इतकें खचित वाटतें कीं, बापांनीं ह्या कामीं मन घातलें तर चांगलें होईल इतकेंच नव्हे, तर त्यांनीं अशाप्रकारें मन घालणें अगदीं जरूर आहे.

ह्यासंबंधानें आमचीं मतें खालीं लिहिल्याप्रमाणें आहेतः—मुलांचे कपडे त्यांच्या आंगात अतिशय उष्णता येण्यासारखे नसून त्यांस पुन्हां साधारणपणें कधीं थंडीची बाधा होऊं नये असे असले पाहिजेत. कापूस किंवा ताग ह्याचे किंवा दोन्हीच्या मिश्रणाचे हलके कपडे जसे नेहमीं घालतात तसे न घालतां आंगांतील उष्णता बाहेर न जाईल अशाप्रकारचा कांहीं भक्कम लोंकरीचा कपडा घेऊन त्याचे त्यांस कपडे करून दिले पाहिजेत; ते इतके मजबूत असावे कीं, मुलांनीं लहानपणचे खेळ खेळून कितीही धुडकुस घातला तरी त्यांस कांहीं होऊं नये; व त्यांचा रंगही असा असावा कीं तो वापरण्यानें किंवा हवेनें बिघडतां कामा नये.

शरीरसंपत्ति चांगली राहण्यास ज्या गोष्टी अगत्याच्या आहेत, असें लोक मानितात, त्या सर्वांत शरीरास व्यायाम असणें ही गोष्ट अत्यंत अगत्याची आहे असें अंशतः बहुतेक लोकांच्या मनांत वागतच आहे. यास्तव याविषयीं मुलांच्या संबंधानें तरी विशेष चर्चा करीत बसण्याचें कारण नाहीं. मोठमोठ्या शहरामध्यें सरकारी व खासगी शाळांसभोंवतीं मुलांस खेळण्याकरितां ह्मणून बरीच जागा ठेवलेली आपण पाहतों. तसेंच उघड्या मैदानांत धांवण्याचे वगैरे खेळ खेळण्याकरितां बराच वेळ या शाळांतून राखून ठेवण्याची वहिवाट आहे; व शिवाय असे खेळ मुलांस पाहिजेत ही गोष्टही आतां सर्व लोकांस मान्य झाली आहे. दुसऱ्या कोणत्याही गोष्टीच्या संबंधानें जरी नाहीं, तरी या गोष्टीच्या संबंधानें लोक आतां असें कबूल करितातसें दिसतें कीं, मुलांचे स्वाभाविक कलांस अनुसरून चालण्यापासून फायदाच आहे. सकाळीं व संध्याकाळीं फार वेळ शिकण्याचें काम चालले असतां मधून कांहीं थोडा वेळ मोकळ्या हवेमध्यें इकडेतिकडे फिरूं देण्याची जी सांप्रतची चाल आहे, तीवरून असें दिसून येतें कीं, विद्यार्थ्यांचे शरीरप्रकृतीकडे लक्ष देऊन तदनुसार शाळेंतील नियम असावे असें आतां दिवसानुदिवस लोकांस वाटूं लागलें

आहे. तर या गोष्टीच्या संबंधानें लोकांची आतां विशेष कानउघाडणी करण्याचें कारण राहिलें आहे असें आह्मांस वाटत नाहीं.

वरील प्रकार कबूल करितांना आह्मांस मध्यें निदान "मुलांच्या संबंधानें तरी" असे शब्द घालावे लागले. दुर्दैवेंकरून या गोष्टीच्या संबंधानें शाळेंत जाणाऱ्या मुलींची स्थिति फारच भिन्न आहे. मुलांच्या आणि मुलींच्या स्थितीची तुलना करण्याची नेहमीं संधि यावी हा तरी कांहींसा चमत्कारच आहे. एक मुलांची व एक मुलींची शाळा अशा दोन शाळा आमच्या अगदीं दृष्टीच्या टप्याच्या आंतच आहेत, व ह्यास्तव त्यांतील भिन्नभिन्न चाली आमच्या नेहमीं पाहण्यांत येतात. एकीकडे सभोंवतालची बहुतेक मोठी बाग अगदीं मोकळी असून रेती घालून तयार केलेली आहे, मध्यें मल्लखांबासारखे पुष्कळ खांब तालमेकरितां उभेकेलेले आहेत, व खेळ खेळण्याकरितां ही जागा ठेविलेली आहे. दररोज सकाळचें जेवण होण्यापूर्वी, अकरा वाजतां, बारा वाजतां, पुन्हा संध्याकाळीं, व शेवटीं सर्व शाळेचें काम आटोपल्यावर, मुलगे खेळावयास बाहेर पडत असतांना त्यांच्या ओरडण्यानें व हंसण्या खिदळण्याच्या गोंगाटानें सभोंवतालची सर्व जागा अगदीं दणाणून जाते; व ते जोंपर्यंत बाहेर असतात तोंपर्यंत आमचे डोळे व कान एकसारखी आमची अशी खात्री करीत असतात कीं, त्यांस ह्या गमतीच्या व्यायामापासून आनंद होऊन ते त्यामध्यें अगदीं गर्क होऊन गेले आहेत. अशा आनंदानें त्यांच्या नाडीस स्फुर्ति येऊन ती वेगानें उडूं लागते, व त्यापावरून ती जणूंकाय असें सतत आरोग्य राहून प्रत्येक इंद्रियाचें काम नीटपणें चालेल अशी त्यांची खात्रीच करीत आहे!! आमच्या घराशेजारीं मुलांच्या शाळेइतकी जवळ मुलींचीही शाळा होती, परंतु ती आहे असें आह्मांस मुद्दाम कोणी सांगेपर्यंत माहीत नव्हतें. त्या मुलींच्या शाळेसभोंवतालची जागा ही तितकीच मोठी होती. परंतु तींत मुलींस खेळण्याकरितां कांहीं सोई केलेल्या मात्र कोठें दिसून आल्या नाहींत. तिमध्यें सुरेख हिरव्या गार गवताचीं लहान निरनिराळ्या आकाराचीं मैदानें, रंगीबेरंगी रेती वगैरे घालून केलेले रस्ते, झुबकेदार झाडझुडपें, फुलझाडें वगैरे दृष्टीस पडत असत, व एकंदर सर्व व्यवस्था अगदीं एखाद्या शहरांतील थाटदार बागेप्रमाणें होती. परंतु त्यांत कोणाचें हंसणें किंवा ओरडणें ऐकून पांच चार म-

हिन्यांत आमचें तिकडे कधीं एकदां तरी लक्ष्य गेलें आहे मुळींच झालें नाहीं. कधीं कधीं मुली हातांत पुस्तकें घेऊन आपले धडे पाठ करीत किंवा एकमेकींच्या हातांत हात घालून इकडे तिकडे फिरतांना दृष्टीस पडत. नाहींच ह्मणावें तर खरोखर एकदां एक मुलगी दुसरीच्या पाठीस लागून सभोंवार धांवतांना आह्मीं पाहिलेली आमच्या स्मरणांत आहे. परंतु ह्याशिवाय तेथें कधीं कोणत्याही प्रकारचा दांडगाईचा व्यायाम चालल्याचें आमच्या दृष्टोत्पत्तीस आलेंच नाहीं असें आह्मीं खात्रीनें सांगतों.

हा इतका आश्चर्य वाटण्यासारखा फरक कां असावा? मुलांच्या आणि मुलींच्या शरीराची ठेवण इतकी भिन्न आहे काय कीं मुलींस अशा दांडगाईच्या खेळांची कांहीं जरूरीच नाहीं? मुलगे जे आरडाओरडीचे खेळ खेळतात ते खेळ खेळण्याचे मुलींच्या कधींच मनांत येत नसेल काय? किंवा शरीराची वाढ पूर्ण होण्यास जी आंगामध्यें चलाखी लागते, ती या वरील कलांच्या योगानें मुलांच्या आंगीं येते, व मुलींच्या आंगीं अशा प्रकारचे स्वाभाविक कल जगन्नियंत्यानें उत्पन्न केले आहेत, त्यांमध्यें त्याचा शाळांतील शिक्षकर्णींस त्यांपासून त्रास पोहोंचावा या शिवाय दुसरा कांहीं उद्देशच नाहीं असेंच समजावयाचें कीं काय? आह्मांस उगीच आपला एक असा संशय येतो कीं, लोकांची साधारणपणें अशी समजूत आहे कीं, स्त्रियांच्या शरीराचा बांधा मजबूत असणें उपयोगी नाहीं; त्यांची प्रकृति रांकट असून त्यांच्या आंगीं पुष्कळ शक्ति असली कीं त्यांच्या आंगीं मर्दानीबाणा येतो;त्यांच्या आंगीं एक प्रकारचा नाजूकपणा असलाच पाहिजे; त्यांच्या शक्तीचें मान इतकें बेताचें असलें पाहिजे कीं त्यांच्यानें एक दोन मैलांपेक्षां जास्त चालवूंच नये; त्यांची क्षुधा थोडी असून नेहमीं त्यांनीं जेवतांना मला हें नको, तें नको, असें केलेंच पाहिजे; व शक्ति नसली ह्मणजे बहुतकरून जो भित्रेपणा अंगांत असावयाचाच, तो भित्रेपणा स्त्रीजातीला विशेष शोभतो. कोणी उघडपणें असें ह्मणणारे मिळतील, असें आह्मास वाटत नाहीं; परंतु शिक्षकिणींच्या मनांतील उत्तम स्त्रीची कल्पना वरील लक्षणाशीं पुष्कळ अंशीं जमत असेल असा आमचा तर्क आहे. आमचा तर्क जर खरा असेल, तर आपल्या समजुतीप्रमाणें उत्तम स्त्री बनविण्यास त्यांचे वरील सर्व उरींव प्रकार अगदीं

योग्य आहेत असें कबूल केलेंच पाहिजे. परंतु उत्तम स्त्रीची कल्पना वरच्याप्रमाणें असणें ह्मणजे मोठी चूक आहे. पुरुषांच्या मनांत अशा मर्दानी बाण्याच्या स्त्रिया बहुधा भरत नाहींत ही गोष्ट खरी आहे. पुरुषांच्या अंगीं स्त्रियांपेक्षां अधिक शक्ति असावी व त्यांनीं रक्षणार्थ पुरुषावर अवलंबून असावें,हें एक स्त्रिया मनोहर होण्यास कारण आहे हेंही आह्मांस अगदीं मान्य आहे. परंतु आह्मी असें सांगतों कीं, जन्मतःच असा स्त्रीपुरुषांमध्यें फरक असतो आणि ह्मणूनच पुरुषांस तरी अशा प्रकारचा फरक असणें इष्ट वाटतें. हा फरक राहण्यास मुद्दाम आपण खटपट केली पाहिजे असा कांहीं भाग नाहीं; व हा फरक आपण मुद्दाम शिक्षणानें वाढवीत गेलों तर स्त्रिया ज्याप्रमाणें हल्लीं आपणास मनोहर वाटतात तशा वाटणार नाहींत; उलट ह्यामुळें त्यांचा आपणास तिटकाराच येत जाईल.

वरील सर्व प्रकार असला पाहिजे असें ज्याचें ह्मणणें आहे तो असें ह्मणेल कीं, तर मग मुलींनीं मुलांप्रमाणें धिंगाणा घालून इकडे तिकडे धांवावें व दांडगें व धाटिंगण बनावें!! शाळेंतील शिक्षकवर्गांच्या मनांत नेहमीं हीच भीति असते अशी आमची समजूत आहे. शोधाअंतीं आह्मांस असें कळून आलें आहे कीं मुलींच्या शाळांतून मुलांचे नेहमींचे आरडाओरडीचे खेळ मुली खेळल्या असतां त्या शिक्षेस पात्र होतात; व आमचें असें मत आहे कीं स्त्री जातीस न शोभणाऱ्या चाली त्यांस लागतील ह्याच भीतीनें अशी मनाई केलेली असावी. परंतु ह्या भीतीमध्यें कांहीं अर्थ नाहीं. कारण मुलगे अशा प्रकारचे खेळ खेळल्यानें जर पुढील त्यांच्या शिष्टसंप्रदायांस हरकत येत नाहीं, तर मुली अशाप्रकारचे खेळ खेळल्यानें पुढील त्यांच्या शिष्टसंप्रदायांस हरकत कां यावी? मुलगे खेळाचे जागीं असले ह्मणजे दांडगाईचे खेळ खेळतील, परंतु एकदां शाळा सुटली ह्मणजे रस्त्यांत आट्यापाट्यांनीं व दिवाणखान्यांत खोखोनीं खेळतांनां तुह्मांस ते कधीं आढळतात काय? मुलगे मोठे होऊन त्यांस बरें वाईट कळूं लागलें ह्मणजे लहानपणचें खेळाचें बरें त्यांच्या आंगचें नाहींसें होतें; पुढें आपल्या हातून कदाचित् मोठ्या माणसाचे हातून होऊं नये असें कृत्य होईल ह्याची त्यांस काळजी लागते; व कांहींची तर ही काळजी भलत्याच थरास जाते. याप्रमाणें पुढें आंगांत पोक्तपणा आल्यानें जर मुलांचे लहानपणचे खेळ बंद होतात, तर स्त्रिया जाणत्या झाल्या-

नंतर " अंगनाभूषणं लज्जा " हें तत्व त्यांस चांगलें समजूं लागलें म्हणजे त्यांचेंही लहानपणचे खेळ सुटणार नाहींत काय? दिसण्यांत चांगलें कोणतें, वाईट कोणतें, इकडे पुरुषांपेक्षां स्त्रियांचेंच लक्ष्य जास्त असतें; आणि म्हणून दांडगाई व फाजीलपणा दाबून ठेविला पाहिजे असें त्यांच्याच मनांत विशेष येणार नाहीं काय? शाळांतील शिक्षकणी त्यांच्यावर कडक नजर ठेवितात, म्हणूनच स्त्रियांचा नैसर्गिक विनय राहतो असें मानणें म्हणजे केवढा वेडेपणा आहे?

व्यायामाच्या संबंधानें आपल्या कृतींनीं झालेले अपाय टाळण्याकरितां आपण आणखी कांहीं नवीन उपाय योजूं लागतों. इतर सर्व गोष्टींमध्येंही असाच प्रकार चालतो. सहजीं होणारा व्यायाम बंद करून व्यायाम नसल्यामुळें होणारे वाईट परिणाम दृष्टोत्पत्तीस येऊं लागले म्हणजे लोक आपण होऊन तालीम सुरू करितात. कांहीं नाहीं त्यापेक्षां हें बरें ही गोष्ट आम्हीं कबूल करितों; परंतु खेळाचे सर्व उपयोग ह्यापासून होतील ही गोष्ट मात्र आम्हांस कबूल नाहीं. तालमेमध्यें कांहीं प्रत्यक्ष दोष आहेत व कित्येक गुणावह गोष्टींचा अभाव आहे. लहानपणचे खेळांमध्यें आपल्या स्नायूंस नाना प्रकारची गति मिळते. तालीम करतांना तर आपल्या स्नायूंस जी गति मिळते ती कांहीं अंशीं ठरीव व नियमितच असते; ह्यामुळें तीपासून शरीराचे सर्व भागांस सारखा व्यायाम पोहोंचत नाहीं. ह्याप्रमाणें शरीराच्या कांहीं विशेष भागांसच विशेष श्रम पडल्यामुळें थकवा लौकर येतो. व शिवाय आणखी असेंही सांगितलें पाहिजे कीं, अशी नेहमीं शरीराचे नियमित भागांसच जर मेहनत पडत गेली तर आपले शरीराचे भाग सारखे प्रमाणानें वाढत जाणार नाहींत. तालमेचें श्रम सर्व भागांस सारखे वांटले जात नाहींत, म्हणूनच आपल्या हातून मेहनत कमी होते असें नाहीं, तर तालीम करितांना मौज वाटत नसल्यामुळेंही ती आपल्याच्यानें फार वेळ होत नाहीं. शाळेंतील धडयांप्रमाणें तालमेचे प्रकार नेहमीं अगदीं ठरवून ठेविल्यानें तर फारच कंटाळा येतो; परंतु असें जरी नसलें, तरी तालमेचे नियमित प्रकारांचा त्यांमध्यें मौज नसल्यामुळें कंटाळा खात्रीनें यावयाचाच. एकमेकांच्या चढाओढीनें आंगामध्यें एके प्रकारची ईर्ष्या येते खरी, परंतु नानाप्रकारचे खेळ खेळल्यापासून होणाऱ्या आनंदाप्रमाणें

ही ईर्ष्या फार वेळ राहत नाहीं. परंतु तालमेपासून होणारा अतिशय मोठा तोटा अद्यापि सांगावयाचाच आहे. तालमेपासून स्नायूंस जे श्रम होतात ते कमी तर असतातच, परंतु ते कमी प्रतीचेही असतात. तालीम करण्याचें आपण लौकर सोडून देतों याचें कारण तीमध्यें आपणांस मौज वाटत नाहीं, हें आहे असें आह्मी सांगितलेंच आहे; व तालमेपासून शरीरावर होणारे परिणाम तादृश चांगले नसतात, याचेंही कारण हेंच आहे. दोन्ही प्रकारच्या व्यायामांपासून जोंपर्यंत शरीरास सारखेच श्रम होत असतील, तोंपर्यंत त्यांपासून आनंद होतो किंवा नाहीं हें पाहण्याचें कारण नाहीं असें बहुतेक लोक समजतात, परंतु ही मोठी त्यांची चुकी आहे. मनाप्रमाणें कांहीं गोष्ट होऊन आनंद झाला ह्मणजे आंगामध्यें उमेद येऊन मोठी हुशारी वाटते. एखाद्या आजारी मनुष्यास चांगली बातमी समजली, किंवा त्यास एखादा जुना मित्र भेटला ह्मणजे त्यास कसें वाटतें तें पहा. अशक्त झालेल्या आजारी माणसास चांगले वैद्य आनंदी लोकांच्या मंडळींत जाण्यास मुद्दाम सांगतात. थारेपालट करणें हें आरोग्यास किती चांगलें आहे ह्याचा विचार करा. खरा प्रकार असा आहे कीं, आनंदवृत्ति हें एक मोठें गुणकारी पौष्टिक औषध आहे. तीपासून रुधिराभिसरण वेगानें चालून आपल्या सर्व जीवनक्रिया सुलभ रीतीनें चालतात; व अशा रीतीनें प्रकृति सुदृढ असली तर जास्त सुदृढ होत जाते व बिघडली असली तर ताळ्यावर येते. ह्याप्रमाणें तालमेपेक्षां खेळाचेंच वास्तविक महत्व जास्त ठरतें. मुलांना खेळ खेळतांना वाटते ती गंमत, त्यांची दांडगाई चालली असतां आनंदाच्या भरांत चालतो तो गोंगाट, वगैरे सर्व गोष्टी त्यापासून होणाऱ्या श्रमापेक्षां कमी योग्यतेच्या होत असें कधीं मानतां येणार नाहीं. ह्यास्तव आह्मीं असें समजतों कीं, ज्या अर्थीं, तालमेपासून मनास उत्साह व आनंद प्राप्त होत नाहींत, त्या अर्थी तीमध्यें कांहीं तरी मूळचेच दोष असले पाहिजेत.

मुळींच श्रम न करण्यापेक्षां तालमेपासून होणारे श्रम बरे, व अशा प्रकारचे श्रम केले तर त्यांपासून भरींत भर पडून जास्त फायदेही होत जातील हें आह्मास अगदीं कबूल आहे. तथापि आपल्या सहजीं मनांत येऊन जे आपण श्रम करितों त्या श्रमांची वरील श्रमांच्यानें कधींही बरो-

बरी व्हावयाची नाहीं. मुलांस, आणि मुलींस काय, जे खेळ व्यायामाकरितां खेळावेसे वाटतात, ते खेळ त्यांची शरीरप्रकृति दुरुस्त राहण्यास अगदीं अवश्य आहेत. जो कोणी वरील खेळांच्या आड येतो तो शरीराची वाढ पूर्ण होण्यास जीं ईश्वरदत्त साधनें आहेत, त्यांच्या आड येतो असेंच समजलें पाहिजे.

अद्यापि एक गोष्टीचा विचार कर्तव्य आहे; व ती आमच्या मतें मागील सर्व गोष्टींपेक्षां विशेष महत्वाची आहे. लोक नेहमीं असें ह्मणत असतात कीं शिकलेल्या मंडळीमध्यें अगदीं भर ज्वानींत किंवा ज्वानीचे बेतांत आलेले लोक त्यांच्या आधीच्या पिढीच्या लोकांसारखे मजबूत नसतात; व त्यांची वाढही त्यांच्याप्रमाणें पूर्ण झालेली नसते.* प्रथमतःच जेव्हां हें मत आमच्या कानीं आलें, तेव्हां पूर्वीचें तेवढें सर्व कांहीं चांगलें व हल्लींचें सर्व वाईट असें ह्मणण्याची जी एक पूर्वापार चाल पडत आली आहे, त्या चालीस अनुसरूनच हें मत असावें असें आह्मांस वाटलें; पूर्वीच्या चिलखतांच्या वगैरे मानावरून पाहिलें तर हल्लींचे लोक पूर्वीच्या लोकांपेक्षां शरीरानें मोठे आहेत असें ठरतें, व हल्लींच्या लोकांचे वांचण्याचेंही मान पूर्वीपेक्षां कमी नाहीं जास्तच आहे, असें जननमरणाच्या नोंदणी पत्रकांवरून सिद्ध होत आहे. ह्या गोष्टी मनांत आणून हें मत निरर्थक आहे असें आह्मांस वाटलें व तिकडे आह्मीं फार लक्ष्यही दिलें नाहीं. परंतु सूक्ष्म विचाराअंतीं आतां आमचें हें मत बदलेलें आहे. मजूर लोक शिवायकरून बहुतेकांविषयीं आह्मांस असें आढळून आलें आहे कीं, पुष्कळ मुलें आपल्या आईबापांइतकीं उंच वाढत नाहींत व तसेंच वयाच्या मानानें पाहिलें तरी त्यांच्या शरीराचा आकार वगैरेही कमी प्रतीचाच असतो. शस्त्रवैद्यांचें असें ह्मणणें आहे

* हें हर्बर्ट स्पेन्सर यांचें मत इंग्लंडांतील लोकांपरतेंच खरें मानलें पाहिजे; कारण ह्या देशांतील मानसिक श्रम करणारेच काय, परंतु इतर सर्व लोकही शरिरप्रकृतीच्या संबंधानें उत्तरोत्तर निकृष्टदशेप्रतच जात चालले आहेत, व पेशव्यांच्या पदरींचे प्रसिद्ध सरदार परशुरामपंत पटवर्धन यांचें चिलखत व छत्रपति शिवाजी महाराज ह्यांची भवानी तरवार ह्यांविषयीं ज्या आख्यायिका लोकांमध्यें प्रसिद्ध आहेत त्यावरूनही असेंच सिद्ध होत आहे.

कीं, अलीकडे लोकांस शिरांतील रक्त काढून घेण्याचें पूर्वीच्या लोकांप्रमाणें सहन होत नाहीं. हल्लीं अकालीं टक्कल पडलेले लोक पूर्वीपेक्षां जास्त दिसण्यांत येतात. अलीकडच्या मंडळीमध्यें लौकर दांत अधु झालेल्या लोकांची संख्या पाहिली तर खरोखर अचंबा वाटण्यासारखी आहे. साधारण एकंदर ताकदीचें मान पाहिलें तरी असेंच अचंबा वाटण्यासारखें आहे. पूर्वीचे लोक खाण्यापिण्याच्या कामांत जरी हल्लींच्या लोकांप्रमाणें मिताहारी नसत, तरी त्यांच्या आंगीं रांकटपणा जास्त असे; जरी आमच्या आधींच्या पिढीचे लोक पाहिजे तितके जागत असत, मोकळी हवा व स्वच्छता ह्यांची फारशी पर्वा करीत नसत, तरी त्यांस वृद्धापकालपर्यंत दुखणें बाणें न येतां सतत उद्योग करण्याची त्यांच्या आंगीं ताकद असे. अलीकडील वकील आणि न्यायाधीश ह्यांचींच उदाहरणें पाहिलीं ह्मणजे आमच्या बोलण्याची सत्यता दिसून येईल. हल्लीं आपण शरीर प्रकृतीची विशेष काळजी बाळगितों, खाण्यापिण्यामध्यें मिताहारीपणा राखितों; मोकळी हवा, स्नान इत्यादि गोष्टींकडे आमचें विशेष लक्ष असतें; प्रतिवर्षी हवा पालटण्यास गांवोगांव फिरतों; हल्लीं आपणास वैद्यशास्त्राचीही विशेष माहिती झालेली आहे; व इतकें असूनही आपलें नेहमीचें काम करितांनाच आपले नाकीं नव येतात. आरोग्यरक्षणाचे नियमांकडे पूर्वजांपेक्षां आपलें लक्ष विशेष आहे; आपलें पूर्वज तर ह्यांपैकीं पुष्कळ नियम मोडीत असत, असें असूनही ते आमच्यापेक्षां अधिक सशक्त होते, आणि आमच्या पुढच्या पिढीच्या लोकांचीं तोंडें पाहिलीं व त्यांस वारंवार कशीं दुखणीं येतात हें मनांत आणिलें ह्मणजे तर त्यांच्यामध्यें आमचीही ताकद राहण्याचा संभव दिसत नाहीं.

असें कां असावें? हल्लीं कमी खाण्याचा प्रघात जो जिकडे तिकडे पडत चालला आहे असें आह्मीं सांगितलें आहे त्यापेक्षां पूर्वीचा मुलाबाळांचा व जाणते मनुष्यांचा ओ येईतों खाण्याचा जो प्रघात होता त्यापासून कमी अपाय होत असत असें का समजावयाचें? मुलांस रांकट करण्याकरितां त्यांस कपडेलत्ते कमी दिले पाहिजेत असें जें एक पोकळ भ्रमाचें मत निघालें आहे, त्याचें कां हें फळ? भलत्या शिष्ट संप्रदायाच्या नादीं लागून लहानपणचे खेळ आपण कांहीं अंशीं बंद करितों त्या मुळेंच कां असें घडून येतें? आह्मीं दिलेल्याकारणांवरून असा तर्क करितां

येईल कीं वरील गोष्टींपैकीं प्रत्येक गोष्ट अंशतः वरील अनर्थास कारणीभूत होते. वरील अनर्थ उत्पन्न करण्यास आणखी एक कारणाची भर पडते आणि सर्वांमध्यें ह्याचा प्रभाव विशेष आहे. असें कदाचित् झटलें तरी चालेल. तें कारण कोणतें झणाल तर मानसिक श्रम.

हल्लींचे सर्व धंदे असे आहेत कीं ते करतांना तरुणांस अगर झाताऱ्यांस नेहमीं एकसारखी ताण पडत असते. सर्व प्रकारच्या कामधंद्यांमध्यें चढाओढीचा प्रकार विशेष असल्यामुळें, प्रत्येक जाणत्या मनुष्यास आपलें सर्व कसब व ताकद खर्च करावी लागते. आणि अशा दांडग्या चढाओढीमध्यें टिकाव काढतां यावा झणून, शिकणारे लोकांस पूर्वीपेक्षां विशेष कडक शिस्त भोगण्यास तयार असलें पाहिजे;ह्याप्रमाणें दोन्हीकडून नुकसान होत असतें. बापांस चढाओढी करणाऱ्या असंख्य लोकांबरोबर टेंक देऊन खपावयाचें असतें; अशा कठीण स्थितीमध्यें त्यास खाण्यापिण्याचा बेत नीट ठेवण्याकरितां बराच खर्च करावा लागतो; सकाळ संध्याकाळ एकसारखें सर्व वर्षभर काम करावयाचें असतें; कांहीं व्यायाम करण्यास वेळ फारच थोडा मिळतो, व सुट्याही अगदीं बेताच्याच असतात. ह्याप्रमाणें एकसारखे घरीं अतिशय काम करून त्याची शरीरप्रकृति अगदीं बिघडून जाते. पुढें त्यांना मुलें होतात तींही अशक्तच निपजतात. अशा ह्या अशक्त मुलांची आधींच अशी स्थिति असते कीं तीं नेहमींच्या साधारण श्रमांनींच थकून जावयाचीं; तशांत त्यांस पूर्वीच्या पिढीच्या दांडग्या मुलांना जो अभ्यास करावा लागत असे त्यापेक्षांही विशेष तऱ्हेचा व विशेष मेहनतीचा अभ्यास करावा लागतो.

अशा स्थितीपासून होणारे भयंकर अनर्थ आपल्या नेहमीं दृष्टीस पडतात. पाहिजे तेथें तुझी जा, तेथें तुझांस असे कांहीं मुलगे आढळून येतील कीं ज्यांनीं आपली प्रकृति अभ्यासामुळें बिघडून घेतली आहे. एखाद्यास अशा रीतीनें आंगामध्यें आलेली अशक्तता घालविण्याकरितां व आंगामध्यें चांगला तजेला येण्याकरितां एक वर्ष अभ्यासच बंद करावा लागतो. कोणाचा कित्येक महिनेपर्यंत मेंदूच बिघडून जातो; व पुढेंही प्रकृति अशीच राहील अशी त्यांस धास्ती पडते. शाळेमध्यें कोणत्या तरी कारणानें संताप येऊन, अमक्यास ज्वर आला असेंही कोठें कोठें ऐकूं येतच आहे. एखाद्या मुलास एकदां अभ्यास बंद

करावा लागला असून पुन्हा तो शाळेंत जाऊं लागल्यावर घेरी आल्यामुळें वर्गांतून वारंवार उचलून न्यावें लागलें अशींही उदाहरणें कोठें कोठें ऐकूं येत आहेत. वरील उदाहरणें आह्मीं कोठून हुडकून काढलेलीं नाहींत. गेल्या दोन वर्षांत अगदीं जवळच्या टप्यांतच घडून आलेलीं उदाहरणें आहेत, व तीं आमच्या सहजीं नजरेस आलेलीं आहेत. बरें अशाप्रकारचे उदाहरणांचा आमच्या जवळचा साठा संपला असें नाहीं. अगदीं थोड्या दिवसां पूर्वी वरील दुःखकारक स्थिति कशी पिढीनपिढी चालू राहते हें आमच्या वाचण्यांत आलें. आह्मी सांगणार ती एका स्त्रीची गोष्ट आहे. ह्या स्त्रीची आईबापें चांगलीं सशक्त व धष्टपुष्ट होतीं, व ही स्काटलन्ड देशांतील एका शाळेंत जात असे. त्या शाळेमध्येंच मुलींच्या जेवणाखाण्याचा बेत ठेविला जात असे, तेथें तीस भ्रम अतिशय पडून खाण्यास पोटभर मिळत नसे. त्या शाळेंतील अशा शिस्तीनें तिची प्रकृति बिघडून गेली. सकाळीं उठल्याबरोबर तिला सर्व कांहीं फिरतेंसें वाटावें; तिच्या ह्या अशा स्थितीमुळें तिच्या मुलांचाही मेंदू बिघडून त्यांपैकीं कित्येकांचें साधारण थोड्या अभ्यासानेंही डोकें दुखूं लागावें व चक्कर यावी अशी स्थिति झाली आहे. पाठशाळेंतील सर्व अभ्यास पूर्ण करून आपली प्रकृति बिघडून घेतलेली एक स्त्री आह्मी हल्लीं नेहमीं पहात आहों. तेथें तिच्यावर अभ्यासाचें ओझें इतकें पडत असे कीं तिला फिरून अगर दुसऱ्या कोणत्याही रीतीनें व्यायाम वगैरे करण्यास वेळच राहूं नये. आतां तिची सर्व विद्या पुरी झाली आहे, परंतु अजूनही तिची नेहमीं कांहींना कांहींतरी कुरकुर आहेच. तिची क्षुधा अगदीं मंद झाली आहे, व तीही पुन्हा लागेल तेव्हां लागेल. हवा गरम असतानांही तिचे हातापायांचीं बोटें गार लागावीं; अशक्ततेमुळें तिला नेहमीं अगदीं हळूहळू चालावें लागतें, व तेंही फार वेळ चालतां कामा नये; जिना चढून गेली कीं ती धापा टाकावयास लागते; तिची नजर अगदीं कमी होऊन गेली आहे; तिची वाढ खुंटल्यासारखी झाली आहे, व तिच्या सर्व शरीरास शिथिलता आली आहे. हे परिणाम तिला हल्लीं भोगावे लागत आहेत. तिच्याच बरोबर अभ्यास करणारी तिची एक मैत्रीण आहे, तिचीही स्थिति अशीच झाली आहे. अगदीं शांतवृत्तीच्या मित्रमंडळीपासूनही तीस त्रास येऊन घेरी

येते. आतां तिच्या वैद्यानें तिला अभ्यास अगदीं बंद करावयास सांगितलें आहे.

ह्याप्रमाणें मोठमोठे अपाय जर इतके होतात, तर बारीकसारीक दिसण्यांत न येण्यासारखे अपाय किती होत असतील ह्याचा विचार तुम्हींच करावा. अति श्रम केल्यापासून प्रत्यक्ष मोठें दुखणें आल्याचें जर एक उदाहरण असलें, तर एकदम दिसण्यांत न येणारें व हळूहळू जंमतजमत दुखणें आल्याचीं निदान पांच सहा तरी उदाहरणें असतील. प्रकृति अशक्त होऊन गेल्यामुळें अगर दुसऱ्या कांहीं कारणांमुळें इंद्रियांचीं कर्में बरोबर चालत नाहींत अशीं उदाहरणें आहेतच; वाढ खुंटून पुढें लौकरच अगदीं बंद झाल्याचीं उदाहरणें बरींच सांपडतील; हळूहळू प्रकृतीचें मान क्षयाकडे वळून पुढें क्षयरोग कायम झाल्याचीं उदाहरणें दिसण्यांत येतातच. मोठेपणीं काम पडतें त्याच्या योगानें मेंदू बिघडून जे हल्लीं विशेष रोग होतात ते झाल्याचीं उदाहरणें ह्मणजे कमी आहेत असें नाहीं. व्यापार धंद्यामध्यें अति श्रम करणाऱ्यांस कशीं वारंवार दुखणीं येतात ह्याचा विचार करून अति श्रमापासून मुलांच्या पूर्ण वाढ न झालेल्या शरीरांवर होणारे भयंकर परिणाम मनांत आणले, तर पुष्कळ लोकांच्या प्रकृति कशा बिघडत जातात हें आपणांस स्पष्ट कळून येईल. लहान मुलांच्यानें मोठ्या माणसांइतके हाल काढवावयाचे नाहींत. पूर्ण वाढ झालेल्या जाणत्या माणसांसही जर त्यांस जे अतिशय मानसिक श्रम पडतात त्यांचीं फळें भोगावीं लागतात, तर मुलांस मुद्धां जर वारंवार तितकेच मानसिक श्रम करावे लागले तर त्यांच्या प्रकृतीस किती धक्का पोहोंचत असेल ह्याचा तुम्हींच विचार करावा.

शाळेमध्यें मुलांवर जी कडक शिस्त ठेवितात ती जर मनांत आणिली तर तीपासून मोठे अपाय होतात ह्या गोष्टीचा आह्मांस चमत्कार वाटत नाहीं, परंतु मुलें ती शिस्त कशी सहन करितात ह्याच गोष्टीचा आह्मांस विशेष चमत्कार वाटतो. सर जॉन फॉर्बससाहेब पुष्कळ शोध करून मिळविलेल्या स्वतःच्या माहितीवरून असें सांगतात कीं, इंग्लंडामधील मध्यम प्रतीच्या मुलींच्या शाळांमध्यें जी व्यवस्था चालते तिचें मान खालीं लिहिल्याप्रमाणें आहे. चोवीस तासांचा तपशील खालीं

लिहिल्याप्रमाणें आहे. तासांच्या पुढचा मिनिटांचा वगैरे तपशील आह्मी येथें देत नाहीं.

झोंप.	९ तास (लहानास १० तास.)
शाळेंतील अभ्यास व इतर धंदे.	९ तास.
जाणत्यांनीं शाळेंत किंवा घरीं मनास वाटतील ते अभ्यास करावे अगर मनास वाटेल तें काम करावें; मुलांनीं खेळावें.	३½ तास (लहानास २½ तास.)
जेवण.	१½ तास.
मोकळे हवेमध्यें फिरणें व इतर व्यायाम करणें; या वेळेस तरी पुस्तकें हातांत असावयाचींच, व हें तरी नेमल्या वेळीं हवा चांगली असेल तर.	१ तास.
	२४ तास.

अशा प्रकारच्या शिस्तीस सर जॉन फॉर्बस साहेब विलक्षण कडक शिस्त ह्मणतात; व हीपासून परिणाम तरी काय होतात? अशक्तता, निस्तेजपणा, औदासीन्य, सदां दुखणें, या खेरीज दुसरे परिणाम काय असावयाचे आहेत? ते यापेक्षां दुसऱ्याही कांहीं गोष्टी सांगतात. विद्या संपादन करण्याची विशेष काळजी बाळगून शरीरप्रकृतीकडे दुर्लक्ष्य केल्यानें व एकसारखा पुष्कळ वेळ डोळ्यांस त्रास दिल्यानें नेहमीं इंद्रियांचीं कामें बरोबर चालत नाहींत, व शिवाय आपल्यास कोणत्यातरी एकप्रकारची कुरूपता येते. ते असें सांगतात कीं, आह्मीं अगदीं अलीकडे एक मुलींची शाळा पाहिली; तेथें मुलींच्या जेवणाखाणाचा वगैरे सर्व बेत ठेवीत असत; त्या शाळेंत चाळीस मुली होत्या. बरोबर चांगला शोध केल्यावर आह्मांस असें समजून आलें कीं, त्या शाळेमध्यें दोन वर्षपर्यंत राहिलेल्या मुलीस थोडें बहुततरी पोंक आलें नाहीं, असें कधीं

झालेंच नाहीं; आणि त्या शाळेंतील बहुतेक मुलींनीं तर दोन दोन वर्षे तेथें काढलींच होतीं.

वरील लेख सन १८८३ तील आहे. तेव्हांपासून वरील स्थितींमध्यें कांहीं कदाचित् सुधारणा झाली असेल. आमची अशी उमेद आहे कीं कांहींतरी सुधारणा झाली असावी. परंतु अशा प्रकारची शिस्त अजून पुष्कळ ठिकाणीं सुरू आहे. कोठें कोठें तर जास्तच कडकपणा दिसून येतो, असें आह्मी आपल्या स्वतःच्या अनुभवावरून सांगतों. आह्मी एकदां मुलांच्या पाठशाळेमध्यें गेलों होतों. शाळाकरितां चांगले शिकेलेले शिक्षक मिळावे ह्मणून ज्या अलीकडे कित्येक पाठशाळा झाल्या आहेत त्यापैकींच ही एक पाठशाळा होती. येथें खासगी लोकांनीं चालविलेल्या शाळांपेक्षां व्यवस्था शहाणपणाची असेल असें वाटलें होतें. कारण येथें सरकारी अधिकाऱ्यांची देखरेख होती. तेथें नेहमींचा क्रम खाली लिहिल्याप्रमाणें होता.

(१) सहा वाजतां मूलांस उठवितात; (२) सातपासून आठपर्यंत अभ्यास; (३) आठपासून नऊ पर्यंत धर्मशास्त्रवाचन, उपासना, व सकाळचें जेवण; (४) नऊपासून बारापर्यंत अभ्यास; बारापासून सव्वापर्यंत नांवाची सुटी फिरण्याकरितां व इतर व्यायामाकरितां ह्मणून दिलेली, परंतु बहुतेक वेळ अभ्यासांतच जातो; (५) सव्वापासून दोनपर्यंत दुपारचें जेवण (जेवणाला बहुतकरून वीस मिनिटें लागतात); (६) दोनपासून पांचपर्यंत अभ्यास; (७) पांचपासून सहापर्यंत चहा व कांहीं कर्मणूक. (८) सहापासून साडेआठपर्यंत अभ्यास (९) साडेआठपासून साडेनऊपर्यंत दुसरे दिवसाचे धडे स्वतः तयार करावयाचे; दहा वाजतां निजावयाचें.

ह्याप्रमाणें चौवीस तासांपैकीं आठ तास झोंप मिळते, सव्वाचार तास स्नान, उपासना, व जेवणखाण्यांत जातात, त्यांतच मधून मधून उगीच थोडा वेळ विश्रांति मिळावयाची; साडेदहा तास अभ्यासांत जातात, सव्वा तास व्यायामाकरितां दिलेला असतो. व्यायाम करणें मुलांच्या मर्जीवरच असल्यामुळें फारसा कोणी व्यायाम करीतच नाहीं. अभ्यासाकरितां डेविलेल्या साडेदहा तासांत व्यायामाचे वेळाची भर पडून अभ्यासाचे साडेअकरा तास होतात इतकेंच नव्हे, तर कित्येक विद्यार्थी आपले धडे करण्याकरितां पहाटेस चार वाजतां उठतात, व असें करण्याला

खरोखर त्यांना त्यांच्या गुरूकडूनही उत्तेजन मिळतें. नियमित वेळांत पुष्कळ अभ्यास शिकवावयाचे असतात व ते परीक्षेमध्यें चांगले पसार झाले तर, गुरूची हुशारी व्हावयाची असते, ह्यामुळें त्यासही फार काळजी असते. ह्यामुळें दररोज मुलांस बार बारा तेरतेरा तास अभ्यास करावा असा गुरूचाही नेहमीं उपदेश चाललेला असतो.

अशा शिक्षणापासून शरीरप्रकृतीस मोठा धक्का बसेल, असें सांगण्यास कोणी ज्योतिषी नको. तेथें रहाणाऱ्या एका विद्यार्थ्यानें आह्मांस असें सांगितलें कीं, विद्यार्थी तेथें येतात तेव्हां ज्यांच्या आंगावर चांगली टवटवी व लाली असते ते लौकरच फिकट व निस्तेज दिसूं लागतात. तेथें असणारांस दुखणीं वारंवार येतात. अजारी लोकांच्या नोंदणीपत्रकावर नेहमीं कांहीं तरी असावयाचेंच. अजीर्ण, भूक न लागणें, हें तर आपलें नेहमीं आहेच. आमांश, हगवण यांची सांतही असावयाचीच. ह्या अजारानें सर्व वर्षभर येथील विद्यार्थ्यांपैकीं एक तृतीयांश विद्यार्थी तरी सतत पडलेले असावयाचे. कपाळ दुखण्याची कुरकुर बहुतेकांची असतेच. कित्येकांचे तर महिन्याचे महिने कपाळ दुखत असतें. शेंकडा कांहीं अगदीं थकत जाऊन शाळा सोडून जातात. जी पाठशाळा फार दिवसांची, जिच्यावर हल्लींच्या मोठमोठ्या प्रसिद्ध विद्वानांची देखरेख आहे, व जिचा सर्व शाळांनीं कित्ता घ्यावयाचा, तेथें अशी स्थिती असावी, ही मोठी विस्मय करण्यासारखी गोष्ट होय. तयारीस थोडा वेळ नेमलेला असून, परीक्षाही फार कडक होत असल्यामुळें, उमेदवारांस इतकी सक्त मेहनत करावी लागते कीं त्याच्या योगानें त्यांच्या प्रकृति अगदीं बिघडून जातात. असे कडक नियम करणारांस त्यांच्या ह्या नियमांवरून जरी आपणांस दुष्ट ह्मणतां नच आलें, तरी ते मूर्ख आहेत असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं.

अशी स्थिति अगदीं थोडे ठिकाणींच ह्मणजे अशा श्रेष्ठ प्रतींच्या शाळांमध्यें असावयाची. परंतु अशी अत्यंत शोचनीय स्थिति कोठें कोठें तरी आहे एवढाच पुरावा अलीकडच्या मुलांस मानसिक श्रम जास्त पडतात असें मानण्यास थोडा आहे असें नाहीं. ह्या पाठशाळांमध्यें असे नियम सुरू आहेत, एवढ्यावरूनच त्यांस विद्वान लोकांची संमति आहे असें समजलें पाहिजे. आणि ह्मणून दुसरा कांहीं पुरावा नसतांही हल्लीं

शिक्षणाचें मान विशेष कडक करण्याकडेच लोकांचा कल आहे, असें सिद्ध होतें.

अगदीं लहान मुलांस अतिशय अभ्यास करण्यास लाविलें असतां जे भयंकर परिणाम होतात ते साधारण सर्व लोकांस माहीत असावे, आणि मुलें मोठीं झाल्यावर तरुणपणीं त्यांस विशेष अभ्यास करावयास लाविल्यानें होणारे वाईट परिणाम त्यांच्या ध्यानांत येऊं नयेत हा तरी चमत्कारच आहे. मुलांकडून अगदीं लहानपणीं पूर्ण विद्या करविल्यानें होणारे अनर्थ अंशतः बहुतेक लोकांस होत आहेतच. मुलांचें लक्ष अगदीं लहानपणीं विद्येकडे लावणें हें सर्व जातींच्या लोकांस पसंत नाहीं. आणि कोणत्या कारणांवरून कोणतीं कार्यें व्हावयाचीं,हें त्यांस ज्या मानानें कळत असेल त्या मानानें मुलांचें लक्ष लहानपणींच विद्येकडे लाविल्यानें होणारे अपायांची त्यांची भीति कमीजास्त असावयाची. प्राणिधर्मशास्त्र शिकविणाऱ्या एका प्रसिद्ध अध्यापकानें आह्मांस असें सांगितलें आहे कीं, मी आपल्या मुलास आठ वर्षांचा होईपर्यंत कांहींच शिकूं देणार नाहीं; ह्यावरून त्याचें मत काय असावें ह्याचा तुह्मीच विचार करा. परंतु अगदीं लहानपणीं मुलांस जुलमानें शिक्षण दिल्यानें त्यांच्या आंगीं अशक्तता येते किंवा शेवटीं बुद्धितरी मंद होते, किंवा त्यांस अकालीं मरण येतें, इत्यादि गोष्टी लोकांस माहीत आहेत खऱ्या, परंतु तारुण्यामध्यें अशा गोष्टी घडून येतात हें त्यांच्या लक्ष्यांत आलें असेलसें दिसत नाहीं; परंतु खरोखर त्या तारुण्यांतही घडून येतात. आपल्या मानसिक शक्ति नियमित क्रमानें व नियमित मानानेंच पक्क देशेस येत असतात. त्याच क्रमास व त्याच मानास अनुसरून आपलें शिक्षण असलें तर बरें. सहजीं लक्ष्यांत न येण्यासारखे गहन व कठीण विषय लहानपणीं शिकवून श्रेष्ट प्रतीच्या मानासिक शक्तींस जर ताण पडलें, व मुलाच्या वयास न शोभण्यासारखी अतिशय विद्या त्यांच्याकडून करविली, तर अकालीं झालेल्या या लाभांबद्दल त्यांस तेवढाच किंवा त्याहून जास्त धक्का बसल्याशिवाय राहवयाचा नाहीं.

सृष्टीमध्यें सर्व कामें अगदीं हिशेबानें चालत असतात. जी जी गोष्ट सृष्टिनियमानें ज्या ज्या वेळीं घडून यावयाची ती ती त्या त्या वेळीं न घडूं देण्याविषयीं जर आपण कांहीं खटपट केली, तर तिचा टोला आपणांस दुसरे कोठें तरी बसल्याशिवाय राहवयाचा नाहीं. आपल्या शरीराची व मनाची वाढ

सृष्टिनियमानें होत असतां वयाच्या मानानें वाढीस लागणाऱ्या जरूर त्या गोष्टींचा जर आपण योग्य रीतीनें पुरवठा करीत गेलों तर आपलें काम बरेंच सुरळीतपणें होणार आहे. आतां अमुक एक भागाची अकालीं फाजील वाढ झाली पाहिजे असा जर आपण आग्रह धरिला तर सृष्टिनियंता कांहींशा नाखुषीनें आपल्या ह्मणण्याप्रमाणें होऊंदेईल; परंतु हें मध्येंच जास्त काम पडल्यामुळें दुसरें एखादें महत्वाचें काम करावयाचें तसेंच राहील. आपल्या आंगीं जीवनव्यापार चालविण्याची जी शक्ति असते, ती नियमितच असते; व ती अशाप्रकारें नियमित असल्यामुळें तिजपासून होणारे जीवनव्यापारही नियमित असले पाहिजेत. लहानपणीं किंवा तारुण्यामध्यें ह्या जीवनव्यापार चालविणारे शक्तीचा पुष्कळ तऱ्हांनीं विशेष खप होत असतो. दररोजच्या श्रमांनीं होणारे शरीराची झीज भरून काढावयाची असते; दररोजच्या मानसिक श्रमांनीं मेंदूचा जो खप होत असतो तो भरून काढावयाचा असतो. ह्याप्रमाणें पुष्कळ रीतींनीं होणारा खप भरून काढावयाचा असतो, व तो खप भरून काढण्यास पुष्कळ अन्नाची गरज लागते; तितक्या अन्नाचें पचन झालें पाहिजे. आतां ह्यांपैकीं कोणत्या तरी एका कामाकडे ह्या जीवनशक्तीचा विशेष उपयोग करावयाचा ह्मणजे तितकी जीवनशक्ति दुसरेकडची कमी केली पाहिजे हें शास्त्रीय रीत्या व प्रत्येकाचे अनुभवावरूनही चांगलें सिद्ध होत आहे. उदहरणार्थ ही गोष्ट प्रत्येकास माहीत आहे कीं जडान्न खाल्यानें आपल्या शरीरास व मनास असें विलक्षण मांद्य येतें कीं शेवटीं आपणांस कधीं कधीं झोंप येते. ह्मणजे जडान्न पचविण्यास आपल्याला इतकें कठीण पडतें. शारीर श्रम विशेष झाल्यानें विचारशक्ति मंदावते; एकदम एखादें मेहनतीचें काम पडलें असतां आपणांस थोडा वेळ अगदीं पडून रहावें लागतें. पंधरा वीस कोश चालून थकवा आला असतां आपलें मन कोणत्याच कामाकडे लागत नाहीं; सतत एक महिनाभर पायमार्गाचा प्रवास झाल्यावर आपल्या मानसिक शक्ति अगदीं क्षीण होऊन जातात, व त्या पूर्व स्थितीवर येण्यास कांहीं दिवस लागतात. शेतकरी आपलें आयुष्य शारीरश्रमांतच घालवितात यामुळें त्यांच्या बुद्धीस फारशी तरतरी नसते; या सर्व गोष्टी प्रत्येकास माहीत आहेतच. लहानपणीं मुलांची वाढ कांहीं

प्रसंगीं फारच जलद होत असते. अशा वेळीं त्यांच्या आंगांतील ताकद नाहींसा होऊन त्यांस अगदीं पडून राहावेंसें वाटतें; व त्यांच्या शारीरिक व मानसिक शक्ति अगदीं क्षीण होऊन जातात ही गोष्ट आपल्या अगदीं माहितींतली आहे. जेवणानंतर अतिशय शारीरिक श्रम केले तर पचन-क्रिया बंद पडतात, व मुलांस अगदीं लहान वयामध्यें श्रमाचीं कामें करण्यास लाविलें तर तीं खुरटीं निपजतात; बरें याच्या उलट सर्व व्यवस्था ठेविली तर सर्व प्रकार उलट घडून येतो; तर यावरून असें समजावयाचें कीं एका कामांत आपली शक्ति फार खर्च झाली ह्मणजे तिचा दुसऱ्या कामांत तोटा येतो; ह्याप्रमाणें हा नियम ठळक ठळक गोष्टींसच लागू पडतो असें नाहीं, तर इतर सर्व बारीकसारीक गोष्टींसही हाच नियम लागू पडतो. मोठमोठ्या किंवा बारीकसारीक कामामध्यें आपल्या शक्तीचा गैरशिस्त उपयोग एकसारखा किंवा कधींकधीं जरी होत गेला तरी नुकसान होतेंच. ह्मणून लहानपणीं मुलांकडून सहजीं होण्यासारखे जे मानसिक श्रम त्यांपेक्षां जर अधिक करविले, तर त्यांचे आंगांतील ताकद तिकडेच खर्च होऊन जाईल; इतर कामास त्याच्या आंगामध्यें जी ताकद राहिली पाहिजे ती राहणार नाहीं; व असें होत गेल्यानें त्यांस कोणत्या तरी प्रकारचे हाल काढावेच लागतील. आतां हे हाल कोणते ह्याचा थोडक्यांत विचार करूं.

मानसिक श्रम जितके करावे त्यांपेक्षां जास्त केले तर शरीराचे वाढीला त्याच्या योगानें थोडा हिसका बसेल असें जरी मानिलें तरी एकंदर शरीराचा बांधा उंची, किंवा आंगलट हीं पूर्णत्वास न पोहोंचून त्यांत कांहीं तरी कमतरमणा दिसून आल्याशिवाय रहावयाचा नाहीं. मानसिक श्रम चालले असतां, व नंतर, मेंदूस व मस्तकांतील इतर भागांस झालेला खप भरून येण्याकरितां ज्या रक्ताचा पुरवठा होत असतो तें रक्त झटलें ह्मणजे शरीरांतील सर्व अवयवांतून अभिसरण पावत असतें. शरीराची वाढ होण्यास व झीज भरून येण्यास ज्या रक्ताचा उपयोग व्हावयाचा, तें रक्त त्याप्रमाणें नाहींसें होऊन शरीराची खराबी खात्रीनें होतेच; बरें ह्या फाजील शिक्षणापासून जो फायदा होतो त्याच्या योगानें ही खराबी भरून येते काय? तसेंच जें जास्ती ज्ञान आपण प्राप्त करून घेतों ते तेंवढें असतें का कीं, त्याच्या योगानें शरीराची वाढ खुंटते ती व बांधा

पूर्ण दशेस न आल्यामुळें आंगांत ताकद व सोशिकता नसल्यामुळें नुकसानी होते ती भरून येईल ? जर आपण मानसिक श्रम फार करीत गेलों, तर त्यापासून जे दुष्ट परिणाम घडून येतात तेही फारच भयंकर असतात. त्याच्या योगानें शरीर पूर्णदशेस येण्यास अपाय होतो इतकेंच नाहीं, तर मेंदूसही हिसका बसतो. प्राणिधर्मशास्त्राचा असा नियम आहे कीं, कोणत्याही अवयवाची वाढ होणें आणि त्यास पक्कदशा प्राप्त होणें या दोन स्थितींमध्यें परस्पर विरोध असलाच पाहिजे. हा नियम पहिल्यानें एमइसिडोर सेंट हिलेर ह्यानें शोधून काढिला. नंतर लुइस साहेबानें " खुरटे व राक्षस रूपी प्राणी " ह्या विषयावर लिहिलेल्या आपल्या निबंधामध्यें ह्याच नियमाचा उल्लेख केलेला आहे. हा विरोध स्पष्टपणें लक्षांत येण्याकरितां वाढ ह्या शब्दाचा अर्थ आकाराची वाढ इतकाच घेतला पाहिजे, व पक्कदशा ह्या शब्दांचा अर्थ घटकावयांची वाढ असा घेतला पाहिजे. आतां हा नियम असा आहे कीं, या दोन्ही स्थितींपैकीं कोणत्याही एका स्थितीमध्यें विशेष वाढ झाली, ह्मणजे दुसऱ्या स्थितीमध्यें वाढीचें मान कमी झालेंच पाहिजे. सुरवंटाचा आकार फार जलद वाढत असतो, परंतु त्याची वाढ पूर्ण होण्यापूर्वी जसा त्याचा बांधा असतो तसाच वाढ पूर्ण झाल्यावरही असतो; नंतर त्यांत कांहीं विशेष प्रकार दिसून येतात असें नाहीं. कीटकांचें जन्मतःचें आवरण निघून गेल्यावर, जी त्यांस स्थिति प्राप्त होते, त्या स्थितीमध्यें उलट प्रकार दिसून येतो; ह्मणजे या स्थितीमध्यें कीटकांचें वजन कमी होतें; परंतु बांध्यामध्यें पुष्कळ विशेष प्रकार भराभर दिसून येत असतात. हा विरोध कृमिकीटकांमध्यें जसा स्पष्टपणें दिसून येतो तसा मोठ्या प्राण्यांमध्यें स्पष्टपणें दिसून येत नाहीं, कारण त्यांच्यामध्यें दोन्ही स्थित्यंतरें एकदम सुरू असतात. परंतु पुरुषजातीची व स्त्रीजातीची स्थिति पाहिली तर हा विरोध बराच स्पष्टपणें दिसून येतो. मुलीचें शरीर आणि मन ह्यांस लौकरच पक्कदशा प्राप्त होते. आणि त्यांची वाढ लौकरच बंद होते. मुलाचे शरीरास आणि मनास पक्कदशा प्राप्त होते ती हळू हळू प्राप्त होते; व त्यांची वाढही बऱ्याच कालपर्यंत चालते. ज्या वयामध्यें स्त्री पक्व होऊन परिपूर्ण दशेस येते, व ज्यावेळेस तिच्या मानसिक शक्तिही अगदीं पूर्णदशेस

येऊन पोहोंचलेल्या असतात, त्या वयांत पुरुषाची जीवनशक्ति विशेषेंकरून वाढीकडे खर्च होत असल्यामुळें, त्यांचा बांधा कांहींसा अपुराच असतो; आणि त्या वयामध्यें त्यांस स्त्रियांची टापटीप व बुद्धि नसते. यावरूनही वरील गोष्टीची सत्यता सिद्ध होते. हा नियम एकंदर सर्व गात्रांस व इंद्रियांस सारखा लागू पडतो. कोणत्याही गात्रांचे सर्व भाग अकालींच जर पूर्णदशेस येऊन पोंहोचले, तर त्याची वाढ अकालींच बंद होते; व ही गोष्ट शरीराच्या प्रत्येक गात्रास जशी लागू पडते, तशी मनाचे ही प्रत्येक शक्तीस लागू पडते. लहानपणीं मेंदू आकारानें बराच मोठा असतो, परंतु त्याची घटना कच्ची असते; मेंदूस जर पडावें त्यापेक्षां जास्ती काम करावें लागलें, तर वयाच्या मानानें त्याची घटनाही बरीच परिपूर्ण होऊन जाईल; परंतु ह्याचा शेवटीं असा परिणाम होऊन जाईल कीं, शरीराची वाढ खुरटी होईल; व आंगामध्यें जितकी ताकद यावयाची, तितकी येणार नाहीं. अकालीं पूर्णदशेस येऊन पोहोंचलेले तरुण लोक व मुलें पहिल्यानें इतकीं राकट असतात कीं, तीं कशासही दाद देत नाहींत; परंतु पुढें तीं एकदम टेंकीस येतात, आणि त्यांच्या आईबापांच्या सर्व आशांचा भंग होतो; ह्याचें तरी अंशतः (किंवा मुख्यत्वेंकरूनही झटलें तरी चालेल) हेंच कारण असावें.

अतिशिक्षणाचे हे परिणाम तर अपायकारक आहेतच; परंतु अतिशिक्षणापासून शरीराची जी हानि होते, तिच्यापुढें ते कांहींच नाहींत; त्याच्या योगानें आपली प्रकृति अगदीं क्षीण होऊन जाते, आंगामध्यें ताकद राहत नाहीं, व आपणास एक प्रकारची अगदीं उदासीनता येते. प्राणिधर्मशास्त्राच्या ज्ञानावरून आह्मांस अलीकडे असें समजलें आहे कीं, मेंदू आणि इंद्रियांचे व्यापार यांचा फारच निकटचा संबंध आहे. मेंदूस फार काम पडलें असतां, अन्नपचन, रुधिराभिसरण इत्यादि क्रिया नीटपणें चालत नाहींत, आणि त्यामुळें इंद्रियांचे व्यापार बंद पडतात. मेंदू, आणि कोठ्यांतील गात्रें ह्यांस जोडणारा जो एक व्हेगस नांवाचा ज्ञाततंतु आहे त्यास त्रास पोहोंचला असतां, काय होतें हें दाखविण्याकरितां वेबरसाहेबानें केलेला प्रथम प्रयोग ज्यांनीं वारंवार पाहिला असेल, व या ज्ञाततंतूस त्रास पोहोंचला असतां रक्ताशयाचे व्यापार कसे बंद पडतात, त्रास कमी

झाल्यावर ते पुन्हां हळूहळू कसे सुरू होतात; व तो त्रास सुरू झाला ह्मणजे ते पुन्हां कसे बंद पडातात, हें ज्यांच्या पाहण्यांत असेल, त्यांस मेंदूस अतिशय त्रास पोहोंचला असतां, शरीर कसें खंगून जातें याची चांगली कल्पना करितां येईल. ह्याप्रमाणें शास्त्रीय रीत्या सिद्ध करून दिलेले परिणाम अगदीं खरे आहेत, असें आमच्या प्रत्यक्ष अनुभवासही येतें. आशा, भय, राग, आनंद इत्यादि मनोविकारांनीं छाति कशी धडधडते, ह्याचा ज्यास अनुभव नाहीं, असा एकही मनुष्य मिळावयाचा नाहीं. हे मनोविकार अत्यंत प्रबल असतांना रक्ताशयाचे व्यापार चालण्यास किती कठीण पडतें, ह्याचा तरी प्रत्येकास अनुभव आहे. मनोवृत्ति अतिशय खवळल्यामुळें रक्ताशयाचा व्यापार अगदीं बंद पडून अगदीं मूर्च्छा आल्याचा अनुभव जरी पुष्कळांस नसला,तरी निदान या गोष्टींचा कार्यकारणभाव आहे,इतकें तरी प्रत्येकास माहीत असलेंच पाहिजे. विशेष मनाची चलबिचल उडाली असली, ह्मणजे कोठ्यांत गडबड होते, ही गोष्ट नेहमींच्या अनुभवांतली आहे. विशेष आनंद किंवा दुःख झालें असतां, क्षुधा नाहींशी होते, ही गोष्ट तर अगदीं सर्वसाधारण आहे. जेवण झाल्याबरोबर लागलेंच जर कांहीं एखादें विशेष आनंदाचें किंवा दुःखाचें वर्तमान घडून आलें, तर खाल्लेलें अन्न कोठ्यामध्यें ठरत नाहीं, व ठरलेंच तर त्याचें पचन होण्यास फारच त्रास व आयास पडतात. जे लोक आपले मेंदूस अतिशय त्रास देऊन, आपली बुद्धि नेहमीं कोणत्या तरी कामांत चालवीत असतात,ते लोक तरी आपल्या अनुभवावरून खात्रीनें असें सांगतील कीं, अशा प्रकारच्या श्रमापासूनही वरच्या सारखेच परिणाम घडून येतात. ह्याप्रमाणें शरीर आणि मेंदू यांमधील संबंध मोठमोठ्या गोष्टींमध्यें मात्र स्पष्टपणें दिसून येतो इतकेंच नाहीं, तर बारीकसारीक गोष्टींमध्येंही तो संबंध तितक्याच स्पष्टपणें दिसून येतो. ज्याप्रमाणें थोडावेळच जरी मेंदूस मोठा त्रास बसला तरी कोठ्यामध्यें थोडाच वेळ पण मोठी गडबड उडते, त्याचप्रमाणें मेंदूस साधारण पण पुष्कळ वेळ पर्यंत त्रास बसला तर कोठ्यामध्येंही साधारणच पण पुष्कळ वेळपर्यंत गडबड उडत असते. हा केवळ तर्क नव्हे, तर सर्व वैद्यांचेंही असेंच मत पडतें; आणि पुष्कळ दिवसपर्यंत काढलेल्या हालांवरून आह्मांसही असेंच मत देणें भाग आहे. मानसिक श्रम विशेष केल्यानें कैकवेळां आप-

ल्या शरीरास नानाप्रकारचे हाल काढावे लागतात; व त्यांतून सुटका होण्यास पुष्कळ दिवस अगदीं उद्योग सोडून बसावें लागतें. कधीं कधीं विशेषेंकरून रक्ताशय अगदीं बिघडून जातो, उरामध्यें नेहमीं धडधड सुरू असते; नाडी चालण्याचें मान मंदावून दर मिनिटास ७२ ठोके असावयाचे तें साठांवर किंवा कमीवरही येऊन बसतें; कोठ्यामध्यें खुटखुट सुरू होऊन अगदीं सर्व तंत्र बिघडून जातें, अजीर्णाची बाधा सुरू होऊन जीव नकोसा होतो, व सर्व उपाय थकल्यासारखे होऊन कधीं बरे होऊं तेव्हां होऊं, असें ह्मणून वाट पहात बसावें लागतें. पुष्कळांना तर रक्ताशयाची व कोठ्याची बाधा एकदम सुरू होते; बहुतकरून पुष्कळ लोकांची झोंप कमी होऊन ते वरचेवर जागे होतात, व त्यांच्या मनाला थोडी बहुत तरी उदासीनता प्राप्त होते.

तर मग मुलांस आणि तरुण मनुष्यांस मानसिक श्रम विशेष पडून जर त्यांस फार त्रास पडला तर त्यापासून किती दुःख काढावें लागत असेल ह्याचा वाचकांनींच विचार करावा. मेंदूस जरा फाजील श्रम पडले कीं प्रकृतीमध्यें थोडाबहुत तरी घोंटाळा झालाच पाहिजे. ते श्रम स्वतंत्र एखादें दुखणें आणण्यासारखे जरी फाजील नसले, तरी त्यांपासून प्रकृति हळू हळू बिघडत गेलीच पाहिजे. भूक एकदां नाजूक व श्रीमंतीची होऊन गेली, व अन्नाचें पचन बरोबर न होऊन रुधिराभिसरण अगदीं मंद होऊन गेलें ह्मणजे शरीर कसें जमत जावें? आंगामध्यें शुद्ध रक्ताचा चांगला पुरवठा असला तरच सर्व जीवनव्यापार योग्य रीतीनें चालतात. आंगांत चांगलें शुद्ध रक्त पुरेसें नसेल तर शरीरांतील मांसग्रंथि रक्ताचा अंश नीटपणें शोषून घेण्यास समर्थ होणार नाहींत; शरीरांतील गात्रांचीं कामें नीटपणें चालणार नाहींत; ज्ञानतंतु, स्नायु, व शरीराच्या त्वचेचे पडदे, आणि दुसऱ्या प्रकारचे भाग नीटपणें भरून येणार नाहींत; व वाढ व्हावी तशी होणार नाहीं. शरीराची वाढ चालली असतां कोठा क्षीण होऊन जर त्यापासून कोता व अशुद्ध रक्ताचा पुरवठा होऊं लागला, व रक्ताशयाचा व्यापार जर मंद होऊन रुधिराभिसरण नेहमींप्रमाणें न चालतां जर अगदीं हळू हळू व बेतानें चालूं लागलें, तर काय भयंकर परिणाम होतील ह्याचा तुह्मींच विचार करावा

ह्याप्रमाणें या विषयावर विचार करणाऱ्या लोकांस अतिशय अभ्यासानें शरीरप्रकृति बिघडून जाते ही गोष्ट जर कबूल केलीच पाहिजे, तर मग जुलुमानें ज्ञान कोंदण्याच्या वरील पद्धतीस जितका दोष द्यावा तितका थोडाच असें ह्मणण्यास कांहीं हरकत आहे काय? खरोखर कसाही विचार केला तरी ही रीति फार गैर आहे असें कबूल करावेंच लागतें. ज्ञान संपादन करण्याच्या संबंधानें पाहिलें तरी ही रीति गैरच असें ह्मणावें लागतें. कारण शरीराप्रमाणें मनाची पचनशक्ति नियमितच असते. शिकलेलें ज्ञान अगदीं आपलेंसें होण्यापूर्वी जर आपण अधिक अधिक गोष्टींचें ज्ञान संपादीत गेलों, तर तें ज्ञान ध्यानांत ठरावयाचें नाहीं, व तें आपल्या बुद्धिरूपी पटामध्यें अगदीं मिळून जावयाचें नाहीं. ज्या परीक्षेकरितां तें ज्ञान संपादिलें असतें ती परीक्षा झाल्याबरोबर तें आपण अगदीं विसरून जातों. या रीतीनें अभ्यास केला, तर अभ्यासाचा कंटाळा येतो ह्मणूनही या रीतीस दोष देणें भाग आहे. एक सारखा मानसिक श्रम करीत गेल्यामुळें त्रास येऊन किंवा आपला मेंदू बिघडून जाऊन आपणांस पुस्तकांचा कंटाळाच येऊं लागतो. शिक्षणपद्धति योग्य असल्यानें जी आपली स्वतःसिद्ध सुधारणा होत असते, तिच्या ऐवजीं ह्या पद्धतीच्या योगानें आपली आंतबट्ट्याची सुधारणा होत असते. ह्या पद्धतीमध्यें असें एक अगदीं गृहीत धरलें जातें कीं, ज्ञान संपादन केलें ह्मणजे सर्व कांहीं झालें, व ह्मणूनही ह्या पद्धतीस गैर ह्मणणें भाग आहे. कारण अशा रीतीनें अभ्यास करणाऱ्या लोकांच्या मनांत हें येत नाहीं कीं, संपादलेलें ज्ञान अगदीं आपलेंसें करून घेणें हेंच विशेष महत्त्वाचें आहे, व तसें करण्यास तें ज्ञान आपल्या मनांत सतत पुष्कळ दिवस घोळत राहूं दिलें पाहिजे. एकंदर लोकांच्या बुद्धीची वाढ कशी होत जाते ह्याविषयीं हंबोल्ट साहेब लिहीत असतां असें ह्मणतात कीं, प्रत्येक सृष्ट पदार्थाचें वर्णन अघळपघळ रीतीनें दिलेलें असल्यास त्यापासून एकंदर सृष्टिसौंदर्याचें ज्ञान स्पष्टपणें होत नाहीं. असेंच प्रत्येक मनुष्याच्या बद्धीच्या वाढीविषयीं ह्मटलें तरी चालेल. पुष्कळ गोष्टींचें वरवरचें पोकळ ज्ञान अतिशय संपादन केलें असल्यास त्या ज्ञानाचें बुद्धीस ओझें होऊन तीं अगदीं कुंठित होऊन जाते. ज्या ज्ञानास बुद्धिरूपी शरीराचा मेद ह्मणतां येईल अशा ज्ञानाची किंमत कांहीं नाहीं; परंतु

जें ज्ञान बुद्धिरूपी शरीराचे स्नायु बनून जातें तें ज्ञान अत्यंत मौल्यवान् समजावें. या पद्धतीच्या योगानें बुद्धीचा प्रसार चांगला होत असेल म्हणून कदाचित् तिला चांगलें म्हणतां येईल असें कोणास वाटेल, परंतु तसें कांहीं नाहीं असें आम्हीं वर दाखविलेंच आहे; उलट या रीतीस आम्हांस वाईटच म्हटलें पाहिजे, कारण कीं या रीतीच्या योगानें आपल्या आंगांतील ताकद अगदीं नष्ट होते, व त्यामुळें आपल्या बुद्धिबलानें संपादन केलेल्या ज्ञानाचा आपल्यास पुढें संसारामध्यें लाभ करून घेतां येत नाहीं. जे लोक मुलांचे शरीरांची काळजी न घेतां केवळ त्यांस ज्ञानप्राप्ति करून देण्याविषयीं फार उत्सुक असतात, त्यांचे ध्यानांत व्यवहारामध्यें आपले धंदे सुरळीतपणें चालण्यास आपल्या आंगामध्यें चांगली ताकद असली पाहिजे ही गोष्ट बागत नाहीं असें दिसतें. ज्या पद्धतीच्या योगानें ज्ञानाचा संचय करितां करितां आपली सर्व शक्ति नष्ट होते त्या पद्धतीच्या योगानें आपली हानिच होते असें समजलें पाहिजे.आंगांत चांगली ताकद असली म्हणजे दृढनिश्चय, आणि सतत उद्योग करण्याची संवय हे गुण आपल्या आंगीं सहजीं असतातच; आणि या गुणांच्या योगानें विद्येचा भाग आंगामध्यें जरी पुष्कळ कमी असला तरी तो भरून काढितां येतो.शरीरसंपत्ति चांगली राखून जर आपण पुरेशी विद्या संपादन केली असेल, व वरील दोन गुण जर आपल्या आंगांत पूर्णपणें वास करीत असतील, तर अभ्यास करकरून पाप्यांचीं पितरें बनलेल्या जाडया विद्वानासही आपण झपाट्यासरसे मागें टाकूं. लहान व वाईटसाईट यंत्र असून जर तें खूप जोरानें चालविलें, तर त्याच्या योगानें आपणांस मोठें व उत्तम प्रतीचें यंत्र हळू हळू चालवून जें काम व्हावयाचें त्याच्यापेक्षां जास्त काम आपल्या पदरांत पाडून घेतां येईल. यंत्र उत्तम बनवितां बनवितां वाफ उत्पन्न करणाऱ्या वाफेच्या बंबाचें वाटोळें करून वाफ उत्पन्न करण्याच्या साधनांचा निकाल लावणें म्हणजे केवढें शहाणपण होय?

ही शिक्षणपद्धति चुकीची म्हणण्यास शेवटचें कारण असें आहे कीं जे तिचा अंगीकार करितात त्यांस ह्या संसारामध्यें आपलें खरें हित कोणतें हें नीटपणीं कळत नाहीं असें म्हणावें लागतें. ह्या पद्धतीच्या योगानें आपणास संसारामध्यें लाभच होत जातात, असें जरी मानिलें, तरी तिच्या योगानें आपली

शरीरप्रकृति जन्माची बिघडून जाते हीं सर्व लाभांस मागें सारणारी एक महाहानिच होते असें समजलें पाहिजे. संपत्ति पुष्कळ असून, जर आपली प्रकृति नेहमीं नादुरुस्त असेल तर त्या संपत्तीचा उपयोग काय? नांव मिळवितां मिळवितां जर आपली प्रकृति बिघडून आपणास आतां मरतों, घटकेनें मरतों अशा भीतीनें ग्रस्त करून टाकिलें असलें, तर त्या मिळविलेल्या नांवलौकिकाचें आपणास काय महत्व वाटावें? खरोखर अन्नपचन चांगलें होत आहे, नाडी सणसणीत चालली आहे, नेहमीं मन उल्हासांत निमग्न आहे इत्यादि गोष्टीच खऱ्या सुखास कारणीभूत आहेत. ह्यांशिवाय बाह्यसुख केवढें असलें, तरी त्याचा कांहीं उपयोग नाहीं. शरीरास पुष्कळ दिवस अस्वास्थ्य असलें, तर आपल्या सर्व मोठमोठ्या आशांचा भंग होतो; व एक शरीरप्रकृति चांगली असून आंगांत सणसणीतपणा असला ह्मणजे आपण मोठमोठ्या आरिष्टांसही दाद देत नाहीं. तर मग आमचें असें ह्मणणें आहे कीं, हें अतिशिक्षण सर्वस्वीं दोषास पात्र आहे;—ह्याच्या योगानें संपादिलेलें ज्ञान आपण लौकर विसरून जातों; ज्ञान संपादण्यापेक्षां तें ज्ञान आपलेंसें करून घेणें महत्वाचें असतां तिकडे तें आपणांस दुर्लक्ष करावयास लावितें. संपादन केलेल्या ज्ञानाचा उपयोग करितां यावा ह्मणून आंगामध्यें जी ताकद पाहिजे ती त्याच्या योगानें कमी होते, किंबहुना नाहींशी होते; त्याच्या योगानें आपल्या शरीरप्रकृतीची हानि होते; आणि अशी हानि होत असली ह्मणजे संसारामध्यें यश येत गेलें तरी आपणास सुख होत नाहीं, व आपलें दुःख द्विगुणित होतें.

ह्या अतिशिक्षणाचे परिणाम पुरुषांपेक्षां स्त्रियांस अधिक जाचतात असें ह्मटलें पाहिजे. मुलांस अतिशय अभ्यासापासून झालेला त्रास ते कांहीं अंशीं गमतीचे व दांडगाईचे खेळ खेळून कमी करितात. परंतु मुलींस असे खेळ खेळण्याची बंदी असल्यामुळें त्यांची ही मुख्य कर्मणूक जाऊन त्यांस हा त्रास अगदीं पूर्णपणें भोगावा लागतो; व ह्यामुळेंच शिकलेल्या स्त्रियांमध्यें पूर्ण वाढ झालेल्या व सुदृढ प्रकृतीच्या स्त्रिया आपणास थोड्या आढळतात. लंडन शहरांतील श्रीमंत लोकांच्या दिवाणखान्यांत फिकट, अष्टवक्रा, व अपरिस्फुटावयवा अशा स्त्रिया नजरेस पडतात. त्या सर्वांनीं अभ्यासाची मेहनत करून व विश्रांती-

साठीं लहानपणचे गमतीचे खेळ खेळावयाचे ते न खेळून आपल्या कृतींनींच आपल्याला हल्लींची दशा आणिली आहे, असें ह्मटलें पाहिजे. त्यांच्या विद्वत्तेचा व कुशलतेचा संसारामध्यें कांहीं उपयोग व्हावयाचा तो तर होत नाहींच; परंतु त्यांची शरीरप्रकृति अशी क्षीण झालेली असल्यामुळें त्यांच्या संसारांतील सुखाचा अगदीं घोंटाळा उडून जातो. आईबापांची आपल्या मुलीलोकांस पसंत पडाव्या अशी फार इच्छा असते व या उद्देशानें तीं त्यांच्या शरीरप्रकृतीकडेही दुर्लक्ष्य करून त्यांच्याकडून चांगली विद्या करवितात. परंतु हा त्यांचा मोठा वेडेपणा आहे. आतां ह्यावरून त्यांचें पुरुषांच्या आवडीकडे लक्ष नसतें असें ह्मणा, किंवा त्यांचीं आवड कोणत्या प्रकारची असते हें त्यांस कळत नाहीं असें ह्मणा. पुरुष बायकांच्या विद्वत्तेला भुलत नाहींत; तर त्यांच्या सौंदर्याला, सुस्वभावाला व शहाणपणालाच भुलतात. कोणत्या विदुषीनें आपल्या इतिहासाच्या विशाळ ज्ञानानें एखाद्या पुरुषास आपलेसें करून घेतलें आहे ? कोणत्या पंडितेच्या गीर्वाण भाषाभिज्ञतेमुळें एखाद्या पुरुषाची लटपट उडाली आहे ? कोणता पुरुष एखाद्या स्त्रीच्या तार्किकयानें तिचा दास बनून गेला आहे? तर कमलवदना व मृगनयना अशा स्त्रियांसच पाहून पुरुषांची धांदल उडते. स्त्रियांचा सुरेख व गोंडस बांधा पाहून पुरुष मोहित व्हावयाचेच. प्रकृति निकोप असली ह्मणजे वृत्ति नेहमीं सुप्रसन्न व आनंदमय असावयाची; व अशी वृत्ति असणे हें पुष्कळ अंशीं प्रीति उत्पन्न करण्यास कारण आहे. दुसऱ्या कोणत्याही गुणांची पर्वा न करितां स्त्रियांच्या केवळ रूपास भुलून पुरुष त्यांच्या नादीं लागल्याचीं उदाहरणें प्रत्येकाच्या पाहण्यांत आहेत. परंतु स्त्रीचा स्वभाव व रूप पाहिल्याशिवाय केवळ तिच्या विद्वत्तेस मोहून जाणारा पुरुष बहुधां एकही दाखवितां येणार नाहीं. खरा प्रकार असा आहे कीं, ज्या निरनिराळ्या मनोभावांचें न्यूनाधिक्येंकरून मिश्रण होऊन पुरुषांच्या अंतःकरणामध्यें प्रीति ह्मणून मनोविकार उत्पन्न होतो, त्यामध्य शरीरसौष्ठवदर्शनजन्य मनोभावच विशेष प्रबल असतो; त्यांचा सुस्वभावादि गोष्टींपासून होणारे मनोभावांचें प्राबल्य त्याच्याहून कमी प्रतीचें असतें; त्यांची विद्वता वगैरे पाहून होणारे मनोभावांचें प्राबल्य तर फारच कमी असतें; व त्यांत तरी त्यांनीं संपादन केलेल्या ज्ञानाकडे पुरुषांचें लक्ष

नसतेंच झटलें तरी चालेल; स्त्रियांची आंगची बुद्धि, विचार-शक्ति, व शहाणपण ह्याच गुणांकडे पुरुषांची नजर विशेषेंकरून असते. ह्याप्रमाणें भलत्याच गोष्टींस पुरुष भुलून जातात असें झणणें झणजे पुरुषाच्या योग्यतेस कमीपणा आणण्यासारखें आहे असें कित्येकांस वाटेल. परंतु त्यांस आमचें असें उत्तर आहे कीं ह्याप्रमाणें ईश्वराच्या योजनांस दोष देणें झणजे अज्ञान होय. ईश्वराच्या योजनेमधील संकेत जरी आपणास स्पष्टपणें कळून आला नाहीं, तरी त्यांचा कांहीं महदुपयोग होत असावा असें मानणें आह्मांस भाग आहे. परंतु जे कोणी लक्षपूर्वक अवलोकन करितील, त्यांस ईश्वरी संकेतही स्पष्टपणें दिसून येणार आहे. पुढच्या पिढीचें कल्याण होऊं देणें हा एक जगन्नियंत्याचा विशेष हेतु असला पाहिजे; विशेषेंकरून त्याच्या अनंत हेतूंमध्यें हाच हेतु प्रमुख असला पाहिजे. शरीरप्रकृति चांगली नसून बुद्धि ज्ञानानें प्रगल्भ झालेली असली, तरी तिचा तादृश उपयोग होत नाहीं. अशा बुद्धीचा प्रभाव लौकरच एक दोन पिढ्यांत लयास जाईल. आतां याच्या उलट शरीरप्रकृति चांगली असून विद्या जरी थोडी कमी असली, तरी पुढच्या पिढ्यांमध्यें तीच विद्या पुष्कळपणीं वाढवितां येईल. ह्यावरून ईश्वराच्या वरील योजनांची खरी योग्यता आपल्या ध्यानांत आली पाहिजे. होणारा फायदा मनांत न आणितां वरील प्रवृत्ति कायमच्या बसून गेल्या असल्यामुळें त्यांस अनुसरून आपलें वर्तन असणें अवश्य आहे एवढीच गोष्ट मनांत आणून आपणांस मुलींच्या स्मरणशक्तीस ताण देऊन त्यांची प्रकृति बिघडविणें झणजे केवढा वेडेपणा आहे हें कळलें पाहिजे. विद्या जितकी करवेल तितकी खुशाल करवावी; जितकी विद्या अधिक असेल तितकें चांगलेंच; परंतु त्यापासून प्रकृति मात्र बिघडूं देतां कामा नये. पोपटविद्या कमी शिकवून बुद्धि सुधारण्याकडे जर विशेष लक्ष्य दिलें, व शाळा सोडल्यापासून लग्न होईपर्यंत जो वेळ फुकट जातो त्या वेळामध्यें जर शिक्षणाचा क्रम सुरू ठेविला तर बरीच पुष्कळ विद्या साध्य होईल असें येथें सांगणें गैर होणार नाहीं. परंतु शरीरप्रकृति बिघडेल अशा रीतीनें किंवा बिघडे इतकी विद्या शिकविणें झणजे जो मुख्य हेतु मनामध्यें धरून विद्येसाठीं श्रम व खर्च करावयाचा त्या हेतूवर पाणी ओतणें होय. कांहीं देशांमध्यें आईबापें मुलींकडून

अतिअभ्यास करवून संसारांतील सर्व सुखांविषयीं त्यांचा आशाभंग करून टाकितात; अशा रीतीनें तीं त्यांची शरीरप्रकृति क्षीणकरून त्यांस हालअपेष्टा भोगावयास लावून नेहमीं उदासीनतेमध्यें आयुष्याचे दिवस काढावयास व कित्येकांस जन्मभर अविवाहित राहण्यास भाग पाडितात.

ह्याप्रमाणें मुलांच्या शारीर शिक्षणामध्यें पुष्कळ मोठे दोष आहेत. त्यांच्या खाण्यापिण्याचा व कपडयालत्त्यांचा बेत आपण नीट राखीत नाहीं; त्यांच्याकडून (निदान शिकणाऱ्या मुलींकडून तरी) व्यायाम कमी करवितों; व त्यांस अतिशय मानसिकश्रम करावयास लावितों. एकंदरीनें पाहतां ही शिक्षणपद्धति फार कडकच होय. मुलांस आपण देतों थोडें, आणि त्यांच्यापासून घेतों फार, व त्यांचे जीवनशक्तीस विशेष त्रास पोहोंचवून लहानपणींच त्यांजकडून मोठ्या मनुष्यांप्रमाणें काम करून घेतों. आणि असें होऊं देणें अगदीं रास्त नाहीं. गर्भाशयामध्यें जीवनशक्ति वाढीकडे खर्च होत असते; मुलें तान्हीं असतांना तरी वाढीमध्यें जीवनशक्ति इतकी खर्च होते कीं, त्यांचे शारीरिक व मानसिक व्यापार सुरू होण्यासारखी फारशी तिची शिल्लकच राहत नाहीं. अल्पवयामध्यें व तारुण्यामध्यें वाढीचेंच मान विशेष जोराचें असल्यामुळें त्या वयामध्यें इतर गोष्टींचें मान जरा आटपतें धरिलें पाहिजे. या वयामध्येंही वाढीची नड इतकी महत्वाची आहे कीं अशावेळीं मुलांस पुष्कळ देऊन थोडें घेतलें पाहिजे. वाढीचें मान ज्याप्रमाणें कमीजास्ती असेल त्याचें मानानें मानसिक व शारीरिक श्रम जास्ती किंवा कमी करीत गेलें पाहिजे; व वाढीचें मान कमी होत जाईल तसतसें आपणास शरीराचे आणि मनाचें व्यापार वाढवितां येतील.

हल्लींची आपली सुधारलेली स्थिति हीच या अतिशिक्षणास कारण झाली आहे. प्राचीनकाळीं ज्यावेळेस परवित्तापहार व स्ववित्तरक्षण हेच लोकांचे मुख्य व्यवसाय असत, त्यावेळेस आंगामध्यें चांगली दांडगी शक्ति व धैर्य असणें याच गोष्टींची विशेष आवश्यकता होती. अशा समयीं शरीर चांगलें बनविणें हीच कायती बहुतकरून मोठी विद्या मानली जात असे; मन सुधारण्याकडे कोणी फारसें लक्ष देत नसे. ज्यावेळेस देशामध्यें सर्वत्र दंगे धोपे अगदीं जारीनें सुरू असत, त्यावेळेस मन सुधारणें म्हणजे एक हलकी गोष्ट आहे असें मानीत असत. परंतु आतां जिकडे तिकडे बरीच शांतता आहे; आतां हातानें जीं कामें करावयाचीं त्यांशिवाय इतर कामामध्यें शारीरिक शक्तीचा उपयोग करण्याची फारशी गरज पडत

नाहीं. सांप्रत सर्व व्यवहार बुद्धीबलावर चालतात, तर अशासमयीं लोकांनीं आपली बुद्धि सुधारण्याकडेच विशेष लक्ष द्यावें हेंही स्वाभाविकच आहे. शरीर सुधारण्याकडे लक्ष देणें व मन सुधारण्याकडे दुर्लक्ष करणें असें पूर्वीचे लोक करीत असत. हल्लीं आमची कृति अगदीं उलट आहे. परंतु या दोन्ही स्थिति चुकीच्या आहेत असें आमचें मत आहे. ज्याअर्थीं मानसिक सुधारणा झटली झणजे त्यामध्यें शारीरिक सुधारणा आलीच पाहिजे. त्याअर्थीं शरीर सुधारण्याकडे दुर्लक्ष करून केवळ मन सुधारीत बसणें उपयोगाचें नाहीं ही गोष्ट आपल्या लक्षांत आलीच पाहिजे. प्राचीन आणि अर्वाचीन स्थितींचें संमेलन होऊन गेलें पाहिजे.

सारांश आरोग्यरक्षण हें आपलें कर्तव्यकर्म आहे, अशी आपली खात्री झाली पाहिजे, त्याखेरीज शरीर आणि मन योग्य रीतीनें सुधारण्याकडे आपलें लक्ष लागण्याचा काळ समीप आणण्यास दुसरें कांहीं साधन दिसत नाहीं. शरीराच्या संबंधानें आपलीं कर्तव्यकर्मे आहेत ही गोष्ट अगदीं थोड्यांच्याच मनांत वागत असेल. लोकांच्या कृतींवरून असें दिसतें कीं, आपण शरीराची व्यवस्था मनास मानेल तशी ठेवण्यास मुकत्यार आहों. सृष्टिनियमांस सोडून आपलें वर्तन ठेविल्यानें जीं दुखणीं येतात तीं आपल्या भोगांमुळें आपणावर येतात अशी त्यांची समजूत असते. तीं झणजे आपल्या गैरशिस्त वर्तनाचीं फळें असतील असें त्यांस वाटत नाहीं. एखादा मोठा घोर अपराध करून जीं दुःखें भोगावयास लागावीं, तींच दुःखें लोक आपल्यावर अवलंबून असणारांवर व पुढच्या पिढीवर आपल्या कृत्यांनीं आणितात; आणि त्याबद्दल आपण कांहीं दोषी आहों असें त्यांस बिलकुल वाटतही नाहीं. मद्यपान करणें झणजे आरोग्यरक्षणाचा नियम मोडणें होय, व तें निषेधास पात्र आहे असें लोक समजतात एवढी गोष्ट मात्र खरी आहे; परंतु याचप्रमाणें दुसऱ्या पुष्कळ गोष्टींमध्यें फाजीलपणा करून आरोग्यरक्षणाचे इतर नियमांपैकीं प्रत्येक नियम आपण मोडीत असतों, व मद्यपान जर निषेधास पात्र आहे तर आपलें तेंही करणें निषेधास पात्र आहे ही गोष्ट त्यांच्या लक्षांत येत नाहीं. खरा प्रकार असा आहे कीं, जेव्हां जेव्हां आपण आरोग्यरक्षणाचे नियम मोडितों तेव्हां तेव्हां आपण शरीराच्या संबंधानें आपलें कर्तव्य करण्यास चुकून पाप करितों ही गोष्ट साधारण सर्व लोकांच्या मनांत नीट बिंबेल तेव्हांच मुलांच्या शारीर सुखाकडे लोक द्यावें तसें लक्ष देऊं लागतील.

सार्वजनिक वाचनालय, सातारा.

येथपर्यंत आरोग्यरक्षणाचें महत्व, त्यासंबंधानें आपल्या हातून होत असलेली हेळसांड, तिचीं कारणें, व तिजपासून आपल्यावर व आपल्या संततीवर होणारे भयंकर परिणाम इत्यादि गोष्टींचें विवरण विस्तारेंकरून पूर्वी होऊन गेलेंच आहे. आतां आमचें सर्व लोकांस एवढेंच विचारणें आहे, जी गोष्ट आपणांस अत्यंत महत्वाची, व जी पूर्णपणें आपणांस साध्य करून घेतां आली तरच या जगांतील सर्व व्यवहार योग्य रीतीनें तडीस नेतां येण्याची शक्यता, तिजकडे केवळ डोळेझांक करून आपणांस व आपल्या मुलाबाळांस घोर क्लेशांत पाडून घेणें हें आह्मांसारख्या समजुतदार मानवी प्राण्यांस उचित आहे काय? आपण अनेकवेळां केवळ तात्कालिक सुखाकडे लक्ष देऊन भावि अनंत शाश्वतिक सुखांस मुकतों; व विशेषेंकरून शरीर प्रकृतीच्या संबंधानें तर आपल्या हातून ही चूक वारंवार होत असते. शरीरप्रकृतीचें मान मनांत न आणितां जिवापलीकडे श्रम करून लहान वयामध्यें विद्यापीठांतील श्रेष्ठ पदवी संपादन करणें ह्मणजे मोठें भूषण आहे खरें, परंतु केवळ ह्या भूषणाच्या पाठीस लागून अतिश्रमानें आपल्या शरीराची सर्वस्वीं हानि करून घेणें शहाणपणाचें होईल काय? मंडळीमध्यें आहारविहारादि गोष्टींमध्यें चढाओढीचे प्रकार सुरू असतां तेथें आपण हार न गेल्यानें आपली एक प्रकारची वाहवा होऊन आपणास मोठी शाबासकी मिळते हें खरें, परंतु ही तात्कालिक शुष्क शाबासकी मिळविण्याकरितां अतिरिक्तपणा करून आमणांवर दुखणें आणणें ह्मणजे निवळ मूर्खपणाच नव्हे काय? असो, अशीं शेंकडों उदाहरणें देतां येतील. आतां ह्या संबंधानें आमचें एवढेंच ह्मणणें आहे कीं, अशा प्रसंगीं प्रत्येकानें आपल्या शरीरप्रकृतीचें मान मनांत आणून तदनुसार आपलें वर्तन ठेविलें पाहिजे. जगनियंत्यानें आपणांस ह्या कामीं उपयोगीं पडण्यासारख्या ज्या अनेक नैसर्गिक शारीरिकप्रवृत्ति दिल्या आहेत, त्या कधीं दूषित करूं न देतां तदनुरोधानें वागणें हें आपलें कर्तव्य आहे. हें कर्तव्य करण्यास जर आपण चूकूं, तर आपण त्याच्या दृष्टीनें दोषी ठरूं, ही गोष्ट प्रत्येकानें पूर्णपणें ध्यानांत ठेविली पाहिजे.

समाप्त.

वाचनालय, सातारा

या पुस्तकामध्यें कांहीं अर्वाचीन शास्त्राकरितां वगैरे अगदीं नवीन शब्द योजावे लागले त्यांची अर्थासह यादी.

अन्यसापेक्षयोग्यता—परस्पर तुलना करून ठरविलेली योग्यता.

अव्यक्त आणि व्यक्त (Indefinite and definite)—" अव्यक्त " ह्मणजे ज्याविषयीं पूर्ण आणि निश्चित ज्ञान नाहीं तें; " व्यक्त " ह्मणजे ज्याविषयीं पूर्ण आणि निश्चित ज्ञान आहे तें.

क्षितिजसमसूत्ररेषा (Horizontal lines)—क्षितिजाला समांतर ज्या रेषा त्या.

खनिजपदार्थशास्त्र (Mineralogy)—खनिज पदार्थांच्या गुण धर्मांचें ज्यामध्यें विवेचन केलें आहे तें शास्त्र.

परिणतिवाद (Evolution Theory)—सृष्ट पदार्थांमध्यें रूपांतर होत जाऊन त्यास सांप्रतची स्थिति प्राप्त झाली हें ज्या मतानें स्थापित केलें जातें तें मत.

भाषाविज्ञानशास्त्र (Philology)—शब्दांची व्युत्पत्ति व भाषांचा परस्पर संबंध ज्या शास्त्रावरून व्यक्त केला जातो तें शास्त्र.

मानसशास्त्र (Psychology)—मनाच्या गुणधर्मांचें ज्या शास्त्रामध्यें विवेचन केलें जातें तें शास्त्र.

यथादर्शनचित्रलेखनविद्या (Perspective)—अंतरांच्या मानानें पदार्थ जसे दिसतात तसें चित्रांमध्यें दाखविण्याची कला.

समाजसंस्थाशास्त्र ((Sociology)—समाज कसा होत गेला व त्याचे सर्व व्यवहार कसे चालतात याचें ज्यामध्यें विवेचन केलें आहे तें शास्त्र.

शुद्धिपत्र.

पृष्ठ.	ओळ.	शुद्ध.
२८	शेवटची	'१८११' बद्दल '१८१०' वाचावें.
४८	२	'अगदीं' पुढील 'अशी' गाळावें.
५१	२०	'वगैरे' पुढील 'गोष्टी' गाळावें.
५३	१५	'नसते;' पुढील 'त्यामध्यें' गाळावें.
५४	२७	'आपल्या प्रतिनिधींशीं' बद्दल 'पदार्थांशीं' वाचावें.
५८	८	'आपली' बद्दल 'त्याची' वाचावें.
,,	२६	'पुढें' शब्दापुढें स्वल्पविराम पाहिजे.
,,	२९	'समजत असतील' बद्दल 'समजतील' वाचावें.
८३	२५।२६	२६ व्या ओळींतील शेवटचा 'करून' शब्द २५ व्या ओळींतील 'पृथक्करण' शब्दापुढें वाचावा.
,,	शेवटची	'धर्मीचे' बद्दल 'धर्माचें', 'धर्माचें' बद्दल 'धर्मीचें' असें वाचावें.
९४	२८	'ह्यावरून' बद्दल 'ह्याप्रमाणें' वाचावें.
९५	३	'ह्यासंबंधानें' बद्दल 'ह्याप्रमाणें' वाचावें.
१२४	१६	'पाहिजेत' पुढें अर्धविराम वाचावा.
१२६	४	'दिसतो' बद्दल 'दिसला होता' वाचावें.
,,	१२।१३	'दुसऱ्या.....दाखवितां येतात' ह्या शब्दांबद्दल 'पोकळीमधील कमजास्त लांबीच्या निराळ्या दिशांनीं काढलेल्या रेषा बरोबर रीतीनें दाखविल्या जातात' हे शब्द वाचावे.
१३७	१६	'आपण' पुढें 'स्वतः' वाचावें.
१४९	१०	'अशा' बद्दल 'आशा' वाचावें.
१५८	२८	'कीं' शब्दापुढें 'तें' वाचावें.